सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर

नागपूर जिल्हा

भाग २

दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

नागपूर जिल्हा गॅझेटिअर

भाग-२

महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर

महाराष्ट्र शासन

नागपूर जिल्हा

भाग - २

संपादक

डॉ. अरुणचंद्र शं. पाठक

[एम. ए. एम. फिल., पीएच. डी.]

मुंबई

दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन

२००५

महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर

नागपूर जिल्हा भाग - २

प्रथम आवृत्ती [इंग्रजी] : १९०८
द्वितीय आवृत्ती [इंग्रजी] : १९६६
प्रथम आवृत्ती [इंग्रजी] पुनर्मुद्रण : १९९९
मराठी आवृत्ती [सुधारित] : २००५
जिल्हा दर्शनिका, खंड-सात [भाग-२]

प्रकाशक :

अध्यक्ष, संपादक मंडळ दर्शनिका,
सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग,
महाराष्ट्र शासन, मुंबई

(सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन)

मुद्रक :

व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
कोल्हापूर

कार्यालय :

दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन,
२७, बरजोरजी भरुचा मार्ग,
फोर्ट, मुंबई ४०० ०२३

ग्रंथ मिळण्याची ठिकाणे :

१] शासकीय ग्रंथ भांडार, नेताजी सुभाष रोड,
मुंबई--४०० ००४

२] शासकीय मुद्रणालय व ग्रंथ भांडार, सिव्हिल लाईन्स,
नागपूर-४४० ००१

३] शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथ भांडार,
पुणे--४११ ००१

४] शासकीय मुद्रणालय व ग्रंथ भांडार,
औरंगाबाद--४३१ ००१

५] शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
ताराबाई पार्क, कोल्हापूर--४१६ ००३

"या गॅझेटिअरमधील नोंदी तज्ञ सहयोगकर्ते लेखक तसेच कार्यालयातील संदर्भ साहित्य, शासकीय, निमशासकीय कार्यालयांनी पुरविलेल्या माहिती आधारे केल्या असून त्या संपादक मंडळ सदस्यांनी तपासल्या आहेत."

अनुक्रमणिका

प्रस्तावना

ऋणनिर्देश

नकाशा : नागपूर जिल्हा प्राकृतिक

प्रकरण १० : सामाजिक सेवा . . . . . .

- शिक्षण
- साक्षरता
- प्रौढ शिक्षण
- पूर्व प्राथमिक शिक्षण
- प्राथमिक शिक्षण
- माध्यमिक शिक्षण
- उच्च शिक्षण
- कृषि व पशुवैद्यकीय शिक्षण
- तंत्र शिक्षण
- ग्रंथालये
- सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय सेवा
- समाजकल्याण
- धर्मादाय व स्वयंसेवी संस्था
- जिल्ह्यातील काही सेवाभावी संस्था
- तक्ते.

प्रकरण ११ : संस्कृती . . . . . .

- जिल्ह्यातील संस्कृत शिक्षणाची परंपरा
- संतसाहित्य व परंपरा
- मराठी साहित्य
- हिंदी साहित्य
- जिल्ह्यातील संस्कृत पत्रकारिता
- वृत्तपत्रे व पत्रकारिता
- संगीत
- मराठी नाटककारांची परंपरा
- रंगभूमी संबंधात नाट्यसंस्थांचे योगदान
- व्यावसायिक रंगभूमीचे स्वरूप
- नाट्य दिग्दर्शकांचे योगदान
- चित्रपट निर्मिती

- विदर्भातील बोलीभाषा
- विविध लोककला प्रकार
- आधुनिक चित्रकला व मूर्तिकला
- नागपूर शहरातील शिल्पकला
- नागपुरमधील कलाशिक्षण
- कलाविषयक उपक्रम व संस्था
- वैदर्भीय कला अकादमी
- जिल्ह्यातील वृत्तपत्रांची यादी.

प्रकरण १२ : प्रेक्षणीय स्थळे . . . . . .

नकाशा : १) नागपूर शहराची सुदूर संवेदन उपग्रहाद्वारे घेतलेली प्रतिमा
२) रामटेक शहराची सुदूर संवेदन उपग्रहाद्वारे घेतलेली प्रतिमा

- अडम
- अदासा
- अंभोरा
- कळमेश्वर
- काटोल
- कामठी
- कुवारा भिवसेन
- केलवध
- कोराडी
- खापा
- घुघुसगड
- छोटी देवरी शैलाश्रय
- जुनापाणी
- थारसा
- धापेवाडा
- नगरधन
- नागपूर शहर
- नांदपूर
- नैकुंड
- पारडसिंगा
- पारसिवनी
- पाटणसावंगी

- पुलर लेणी
- बेला
- बोरगाव
- भागीमाहरी
- भिवकुंड
- भूगाव
- मनसर
- माहुरझरी
- मांढळ
- मौदा
- रामटेक
- रायपूर
- वाकोडी
- सावनेर
- हिंगणा.

परिशिष्ट १ . . . . . .
परिशिष्ट २ . . . . . .
परिशिष्ट ३ . . . . . .
ग्रामनिर्देशिका . . . . . .
संदर्भसूची . . . .
सूची . . . . . .
प्रकाशनांची यादी . . . . . .

अंतर्भूत असलेले नकाशे व छायाचित्रे

नकाशे

१) नागपूर जिल्हा प्राकृतिक

२) नागपूर शहराची सुदूर संवेदन (उपग्रहाद्वारे घेतलेली प्रतिमा)

३) रामटेक शहराची सुदूर संवेदन (उपग्रहाद्वारे घेतलेली प्रतिमा)

छायाचित्रे

१) उत्खनित शिळावर्तुळे

१) शिळावर्तुळातील चौक, भागीमाहारी

२) महापाषाण संस्कृतीच्या घराचे अवशेष, भागीमाहारी

३) लोहाची अवजारे, माहुरझरी ... ...

४) शिळावर्तुळात सापडलेला तांब्याच्या पत्र्याचा घोड्याचा दागिना, खापा (इ.स. पूर्व ६ वे शतक)

५) शिळावर्तुळातून प्राप्त झालेला तांब्याचा गडवा, माहुरझरी

६) शिळावर्तुळातील फरश्यांची पेटिका, रायपूर

७) महापाषाण संस्कृती, शुध्द लोखंड तयार करण्याची भट्टी, नैकुंड

८) शिळावर्तुळे महापाषाण युग, माहुरझरी, नागपूर

२) वाकाटक-मूर्तीशिल्पे, अन्य स्मारके

१) वाकाटक कालीन वास्तुअवशेष, मनसर

२) हिडींबा टेकडी उत्खनीत अवशेष, मनसर

३) किन्नर, मनसर

४) शिवमूर्ति, मनसर

५) सोमास्कंद शिव, नांदपूर

६) नृसिंह, रामटेक

७) उमा आणि स्कंद, नांदपूर

८) महिषासूर मर्दिनी, नांदपूर

९) महासदाशिव मूर्ती, मांढळ

१०) दुर्गामूर्ती, मांढळ

११) ब्रह्मामूर्ती, मांढळ

१२) विष्णूमूर्ती, मांढळ

१३) नैगमेषमूर्ती, मांढळ

१४) बलराममूर्ती, मांढळ

१५) सदाशिव, मांढळ

१६) लकुलिश, मांढळ

१७) आचार्य, नगरधन

१८) बुध्द, हमलापुरी

१९) विष्णूशिर्ष, रामटेक

२०) श्री चक्रधर मंदिर, मनसर

२१) नगरधन किल्ला

२२) धापेवाडा- रथ

प्रस्तावना

नागपूर जिल्हा गॅझेटिअर प्रकाशित करीत असताना मनस्वी आनंद होत आहे. या विभागाने केलेल्या सामुहिक परिश्रमाची ही फलश्रुती आहे. हा ग्रंथ ऐतिहासिक संदर्भ साहित्यात मोलाची भर घालील असा विश्वास वाटतो. वास्तविक गॅझेटिअर निर्मिती ही एक स्वतंत्र ज्ञानशाखा बनली आहे. गॅझेटिअरच्या संकल्पनेत होणारे परिवर्तन स्वाभाविक आहे. गॅझेटिअर म्हणजे प्राकृतिक भूस्वरूप, नद्या, वनसंपदा, स्थळांची भौगोलिक माहिती, लोकांच्या चालीरीती, राजघराण्याचा इतिहास, अर्थव्यवस्था, महसूल, प्रशासन आणि पुरावशेषांचा तपशील देणारा कोश ही मूळ संकल्पना प्रमाण मानून गॅझेटिअरच्या कक्षा संकुचित करणे उचित नव्हे. नवनवीन संशोधनातून उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे प्रत्येक विषयाच्या विविध पैलूंचे ऐतिहासिक दृष्टिकोनातून विवेचन करणे आवश्यक आहे. नवीन साधनसामग्रीच्या आधारे राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहासावर नवा प्रकाश टाकणे अपरिहार्य आहे. विद्यमान ग्रंथ या दृष्टिकोनातून लिहिण्याचा प्रयत्न केलेला असून मराठी जिल्हा गॅझेटिअर मालिकेतील हा सातवा खंड. विश्वकोश किंवा गॅझेटिअर हे अत्यंत उपयुक्त ठरणारे असे ग्रंथ असून त्याची विशिष्ट कालावधीनंतर पुनरावृत्ती होणे सर्वार्थाने उपयुक्त ठरते. त्यादृष्टीने नागपूर जिल्हा गॅझेटिअरची ही मराठी आवृत्ती उपलब्ध करून देण्यात येत आहे.

नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअरची इंग्रजी आवृत्ती आर. व्ही. रसेल यांनी सेंट्रल प्रॉव्हिन्सेस डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर्स मालिकेत सन १९०८ मध्ये प्रकाशित केली. त्या आवृत्तीची उपयुक्तता लक्षात घेऊन त्याचे पुनर्मुद्रण १९९९ मध्ये करण्यात आले. हा ग्रंथ खचितच अभ्यासपूर्ण आहे. याचे वैशिष्ट्य म्हणजे प्रमुख जातींची समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून दिलेली माहिती व काही पुरातत्वीय नोंदी, महसुली तपशील होय. तथापि तत्कालीन उपलब्ध माहितीआधारे इतिहासविषयक नोंदी करताना त्यांना काही मर्यादाही होत्या. भारत सरकारने सुचविलेल्या आकृतिबंधानुसार सन १९६६ मध्ये सेतू माधवराव पगडी यांनी नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर संपादित करून प्रकाशित केले. या सुधारित इंग्रजी आवृत्तीमध्ये प्राचीन व मध्ययुगीन इतिहास विस्ताराने देण्यात आला आहे. विशेषत: नागपूरच्या भोसले घराण्याविषयीची माहितीही विस्ताराने दिली गेली आहे. तथापि ब्रिटिश राजवटीतील सुधारणा व संस्कार यातून निर्माण झालेल्या प्रबोधनाच्या प्रेरणा आणि राष्ट्रवादी आंदोलने यासारख्या बाबींची अपेक्षित नोंद त्यात झाली नाही. नागपूर जिल्ह्याची

पुरवणी १९७८ मध्ये प्रकाशित करण्यात आली. यात केवळ विविध सांख्यिकीय माहिती देण्यात आली. एका विशिष्ट आकृतिबंधाच्या मर्यादेत वरील गॅझेटिअर ग्रंथ प्रकाशित करण्यात आला.

आता विविध क्षेत्रामध्ये मूलगामी स्वरूपाचे संशोधन होत असून मूळात इतिहास लेखनाच्या दृष्टिकोनामध्ये आमूलाग्र बदल झाले आहेत. तेव्हा जिल्हा गॅझेटिअर प्रकाशित करताना स्वातंत्र्योत्तर काळातील पाच दशकांमध्ये विविध क्षेत्रांमध्ये झालेल्या बदलांचा सर्वांगीण संशोधनाच्या आधारे आढावा घेतला आहे. इतिहास लेखन ही सतत सुरू राहणारी प्रक्रिया आहे. नवनवीन संशोधनातून प्राप्त झालेल्या माहितीच्या विश्लेषणात्मक दृष्टिकोनातून घेतलेला आढावा, स्वातंत्र्य आंदोलनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन, आधुनिक काळातील एत्द्देशीय आशाआकांक्षा व त्यांनी केलेली आंदोलने याचा परामर्श इतिहास लेखकास घेणे आवश्यक ठरते. या गॅझेटिअरमध्ये तसा तो घेण्याचा प्रयत्न केला आहे. नागपूर गॅझेटिअरच्या पूर्वीच्या आवृत्तीतील माहिती देताना प्रामुख्याने आर. व्ही. रसेल यांनी प्रकाशित केलेले १९०८ मधील गॅझेटिअर पायाभूत मानले गेले आहे. अर्थात सर्वच माहितीची पुनरावृत्ती करणे स्थलसंकोचामुळे शक्य झाले नाही. स्वाभाविकपणे हा ग्रंथ पूर्वीच्या आवृत्तीचे केवळ भाषांतर किंवा रूपांतर नाही तर नव्या आकृतिबंधानुसार केलेली नवनिर्मिती आहे. एकूण १२ प्रकरणात या ग्रंथाची मांडणी केली आहे. ग्रंथ दोन भागात प्रकाशित करत आहोत.

नागपूर जिल्ह्याचे स्थान हे भारताच्या केंद्रस्थानी असून जिल्ह्याला महनीयता प्राप्त झाली आहे. भौगोलिकदृष्ट्या सातपुडा डोंगर, गरमसूर, महादागड टेकड्या आणि पश्चिमेला वर्धा नदी तर पूर्व भागात वेणगंगा नदीच्या सीमारेषा आहेत. त्याच्या उत्तरेला मध्यप्रदेश, पूर्वेस भंडारा, दक्षिणेला चंद्रपूर, पश्चिमेस वर्धा व अमरावती हे जिल्हे येतात. वेणगंगेच्या उपखोऱ्यांनी हा भाग संपन्न झाला असून कानन, सांड, नाग व अंबा या नद्या पुढे वेणगंगेला मिळतात. प्रामुख्याने हा भाग पठारी क्षेत्राचा आहे. येथे जाम व वेणा नदी याही प्रवाहीत आहेत. नागपूरची जडणघडण, तेथील माणसांची प्रकृती आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी याचा विचार करताना भौगोलिक वैशिष्ट्यांचा परिणाम निश्चितपणे जाणवतो. पठारी प्रदेशात लोखंड, कोळसा आणि मँगनीजचे साठे परिपूर्ण असून या पठारावर इ.स.पू. आठव्या व नवव्या शतकापासून महापाषाणयुगीन माणसाने वसाहत केल्याचे आढळते. नागपूर व विदर्भाच्या संदर्भामध्ये महापाषाणयुगीन वसाहत हे याचे वेगळे वैशिष्ट्य आहे. विदर्भाचे आदरातिथ्य आणि अगत्यशीलतेबद्दल जो लौकिक दिसून येतो तो प्रामुख्याने नागपूर जिल्ह्यातही जाणवतो.

या क्षेत्रात झालेल्या मानवी वाटचालीचा मागोवा घेताना अश्मयुगीन कालखंडाच्या विविध टप्प्यातील अवशेष येथे मिळालेत. या परिसरामध्ये

महापाषाण कालखंडातच सुसंस्कृत आणि सुस्थीर वस्ती झाली. पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत या क्षेत्रात शेतीची सुरुवात उशीरा झाली म्हणजे इ. स. पू. आठव्या व नवव्या शतकात सुरू झाली. नागपूरजवळ हिंगणा व सेमीनारी हिल जुनापानी आणि माहूरझरी भागात मोठमोठ्या शिळांची तयार केलेली शिळावर्तुळे पाहावयास मिळतात. खैरवाडा येथे अशी सुमारे १५०० शिळावर्तुळे नोंदवली गेली. १८६७ साली रिव्हेट फॅरनॅक याने जुनापानी, १८७० साली पिअर्स यानी कामठी आणि १८७१ साली कॅरी याने खैरवाडा येथे उत्खनन केले. पुढील काळात या संस्कृतीचा शोध घेण्याचे काम मोठ्या प्रमाणामध्ये नागपूर विद्यापीठ व पुरातत्व विभाग यानी केले आहे. डॉ. शां. भा. देव, डॉ. गो. बं. देगलूरकर, डॉ. ग. का. माने यांचे या क्षेत्रातील काम उल्लेखनीय आहे. ही नावे प्रातिनिधीक ठरावी. या संस्कृतीचे स्वत:चे असे वैशिष्ट्य म्हणजे परिसरातील ही संस्कृती मौर्यकालीन लोहयुगीन संस्कृतीपेक्षा निश्चितपणे आधीची असून तिची सुरुवात इ.स.पू. आठव्या व नवव्या शतकात झाली असावी. येथील भौगोलिक परिसराचे प्रतिबिंब सांस्कृतिक जीवनामध्ये उमटले आहे. निसर्गत: आढळणारा कोळसा व लोखंडाच्या पट्ट्यात विदर्भातील महापाषाणयुगीन संस्कृतीची स्थळे आढळतात. यांच्या मृदभांड्यामध्ये अभ्रकाचा अंश आढळतो. टाकळघाट, खापा, बोरगाव, माहूरझरी या भागात झालेल्या उत्खननात विदर्भातील आद्य शेतकरी आणि कारागिर यांच्याविषयीचे महत्त्वपूर्ण पुरावे उपलब्ध झाले असून शेतकऱ्यांच्या जीवनपध्दतीबद्दल भारतात इतरत्र किंवा पश्चिम महाराष्ट्रात उपलब्ध न झालेले पुरावे स्पष्ट झाले. अडीच हजार वर्षापूर्वी विदर्भात या संस्कृतीच्या लोकांनी शेतीत लोखंडाच्या वापराची सुरुवात केली. शेतीला लागणारी कुदळीसारखी हत्यारे, लोखंडी विळे आणि प्रत्यक्ष धान्याचे जळालेले अवशेष हे उत्खनकांना उपलब्ध झाले आहेत. या वसाहतीपूर्वी येथे अन्य वसाहती नव्हत्या हेही स्पष्ट झाले. अशुध्द लोखंडापासून शुध्द लोखंड तयार करणारी भट्टी नैकुंड येथे मिळाली. उत्खनकाच्या मते इ. स. पू. पाचवे शतक हा याचा कालखंड असून पेंच नदीच्या काठी नैकुंड येथे मिळालेला हा पुरावा भारतीय इतिहासाच्या संदर्भात महत्त्वाचा ठरतो. महापाषाणयुगीन लोकांनी लोहार कामात तांत्रिक दृष्टीने उच्च पातळी गाठली होती हेच यातून स्पष्ट होते. जिल्ह्यातील ही माणसे दहा ते बारा किलो अशुध्द लोखंडापासून तीन किलो शुध्द लोखंड बनवत व ते उच्च प्रतीचे असे. टाकळघाट येथे काश्याच्या वस्तू सापडल्या यावरून काश्याच्या कारागिरीत त्यांची प्रगती स्पष्ट होते. याशिवाय सोन्याचे अलंकार व विविध आकारप्रकारचे मणी सापडले आहेत. येथील शिळावर्तुळांचा संबंध सिथीयनांसी नव्हे तर स्थानिक लमाणांशी किंवा अहिरांशी लावता येतो. यांची दफनभूमी आणि वसाहत फारशी दूर नव्हती. बारमाही वाहणाऱ्या नद्यांच्या काठी असणारी काही स्थळे वसाहतीसाठी व दफनासाठी उपयोगात येत. तथापि याच

वसाहती काहिशा मर्यादित स्वरूपाच्या उपलब्ध झाल्या आहेत. शेतीसाठी उपयुक्त असणाऱ्या जागेची मर्यादा लक्षात घेऊन या लोकांनी दफनभूमीसाठी विपूल दगड असलेला परंतु पाणी नसलेली बोरगाव जुनापाणी सारखी स्थळे निवडली, तर वसाहतीसाठी मात्र टाकळघाट, खैरवाडा, नैकुंड, भागीमाहरी नद्यांच्या काठच्या जागा निवडल्या. विशेष म्हणजे आंध्र आणि तामिळनाडुमध्ये या संस्कृतीचा काळ विदर्भातील या संस्कृतीच्या काळानंतरचा असल्याने हे लोक विदर्भातून दक्षिणेकडे सरकले असावेत असे अनुमान करता येते. जिल्ह्यात आढळणाऱ्या महापाषाणयुगीन संस्कृतीचे लोक विदर्भातील पहिले शेतकरी आणि कारागीर ठरतात हे महाराष्ट्राच्या संदर्भात या जिल्ह्याचे विशेष योगदान मानावे लागेल. या संस्कृतीशी संबंधित स्थळांची माहिती या दर्शनिकेतून सारांशाने दिली आहे.

जिल्ह्याचे आणखी एक वैशिष्ट्ये म्हणजे इ.स.पू. आठव्या व नवव्या शतकापासनू इ.स.पू. चौथ्या-पाचव्या शतकापर्यंत आढळणाऱ्या महापाषाणयुगीन संस्कृतीच्या लोकांनी शेती व धातु कलेचा पाया घातला असला तरी हे लोक नागर संस्कृतीचे जनक नव्हते. सिंधु संस्कृतीचा काळ सोडला तर दुसऱ्या नागरीकरणाची सुरुवात मौर्यकाळापासून झाली. सुसंघटीत स्वरूपाची धर्मसंकल्पना आणि आर्थिकदृष्ट्या संपन्नता याविषयीचे पुरावे जसे पवनी येथे आढळले, तसे या जिल्ह्यातील अडम येथेही आढळले. प्रचंड तटबंदीयुक्त नगराच्या खुणा येथे आढळल्या. याशिवाय अडम येथे सापडलेले आगस्टस आणि तायबेरिअस या रोमन राज्याची सुवर्ण नाणी व अन्य वास्तूअवशेष पवनारच्या उत्खननाप्रमाणे येथे अवशेष उपलब्ध झाले. सातवाहन आणि सातवाहनोत्तर काळाच्या संदर्भात प्राचीन ऐतिहासिक नागरीकरणाच्या संदर्भात एक महत्त्वाचा पुरावा आहे. मनसर व रामटेक तर वाकाटककालीन शिल्पावशेष आणि वास्तू अवशेष हे या जिल्ह्याने महाराष्ट्राला दिलेली एक मौलिक देणगी मानावी लागते. महाराष्ट्राच्या मंदिर स्थापत्याच्या संदर्भामध्ये मनसर व रामटेक येथील मंदिरे त्यांचे विविध तलविन्यास यांचे आगळेवेगळे स्थान आहे. शुष्कसंधी मंदिराचा इ.स. चौथ्या-पाचव्या शतकापासून येथे प्रारंभ झाला होता हे आता स्पष्ट झाले आहे. मांढळ, मनसर, रामटेक, नगरधन, हमलापुरी याठिकाणी मिळालेले वाकाटककालीन शिल्पावशेष, मांढळचे ताम्रपट, रामटेकचा शिलालेख यामध्ये येथील सांस्कृतिक वैशिष्ट्यावर नव्याने प्रकाश पडला आहे. त्रिविक्रम मंदिर, भोगराम मंदिर किंवा केवलनृसिंह मंदिर या रामटेक येथील वास्तू तसेच मांढळ येथील विटातील वास्तू अवशेष आणि मूर्तीशिल्प हे एकूणच भारतीय शिल्पशास्त्राच्या विकासात वेगळे स्थान ठेवणारे आहे. मनसर येथील वाकाटककालीन उत्खनीत अवशेष महाराष्ट्राचे संदर्भात महत्वपूर्ण आहेत. डॉ. वा. वि. मिराशी, डॉ. वि. भि. कोलते, डॉ. अजयमित्र शास्त्री, डॉ. अ. प्र. जामखेडकर, डॉ. चंद्रशेखर गुप्त, जगतपती जोशी, ए. के. शर्मा या राष्ट्रीय पातळीवरील संशोधकांचे योगदान

या जिल्ह्याच्या सांस्कृतिक इतिहासाच्या दृष्टीने अनन्यसाधारण आहे. या ग्रंथात या जिल्ह्यातील भौगोलिक वैशिष्ट्य याबरोबरच कृषि विकास, उद्योगधंदे, वाहतूक व दळणवळण, सामाजिक सेवा यांची नोंद आहे.

गॅझेटिअरचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या जिल्ह्यातील लोकजीवन व विशेषत: सांस्कृतिक जीवनाचा वेध प्रथमच सखोलपणे घेण्यात आला. नागपूर येथे असलेल्या प्रगल्भ विद्यापीठ क्षेत्रात कार्यरत असलेल्या त्या त्या क्षेत्रातील जाणकार तज्ञ अभ्यासकांचे योगदान हे या जिल्हा दर्शनिकेचे वेगळेपण मानावे लागेल. जिल्ह्यातील इतिहास, समाजजीवन याचबरोबर सांस्कृतिकदृष्ट्या विविध अंगांचा विचार करताना साहित्य, संतसाहित्य, शिक्षण, परंपरा, संगीत, कला, नाट्य, शिल्प, पत्रकारिता अशा विविध विषयांना स्पर्श करणारे व त्यांचा यथार्थ परिचय करून देणारे लेखन त्या त्या क्षेत्रातील तज्ञांनी केले आहे हे विशेष. तर जिल्ह्यातील सर्व प्रेक्षणीय स्थळांची नोंद केली गेली आहे.

हा जिल्हा प्राचीन इतिहासामध्ये महापाषाणवर्तुळे आणि वाकाटक वास्तू व शिल्पामुळे स्वत:चे वेगळेपण ठेवतो. तर मध्ययुगीन इतिहासात रघुजी भोसल्यांचे कर्तृत्व गौरवाने नोंदवावे लागते. आधुनिक इतिहासामध्ये नागपूर येथील काँग्रेसचे अधिवेशन. वैशिष्ट्यपूर्ण झेंडा सत्याग्रह तसेच हिंदू महासभेचे अधिवेशन, संघाची स्थापना, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौध्द धर्माची दीक्षाभूमीवर दीक्षा घेतली, या व अशा अनेक घटना, प्रसंग तसेच संपन्न सांस्कृतिक वैविध्यपूर्ण जीवन लाभलेला हा जिल्हा याची नोंद दर्शनिकेत करताना काही मर्यादा निश्चितपणे पडल्या आहेत. असे असूनही योग्य नोंद घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.

याशिवाय जिल्ह्याविषयीची वैशिष्ट्यपूर्ण माहिती देणारे रिमोट कन्ट्रोल सेन्सिंगव्दारे प्राप्त झालेले वैशिष्ट्यपूर्ण नकाशे प्रथमच गॅझेटिअर ग्रंथात अंतर्भूत होत आहेत हे मी जाणीवपूर्वक नमूद करीत आहे. या जिल्ह्याचे वेगळेपण दर्शविणारी छायाचित्रे उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे. ही दर्शनिका (गॅझेटिअर) दोन भागात प्रकाशित करण्यात येत असून प्रथम भागात प्रकरण १ ते ९ पर्यंत समाविष्ट केले आहे. तर दुसऱ्या भागात प्रकरण १० ते १२ आणि ग्रामनिर्देशिका हा भाग देण्यात आला आहे. जिल्ह्यातील गावांची ग्रामनामसूची (ग्रामनिर्देशिका) मराठी जिल्हा गॅझेटिअरच्या आवृत्तीमध्ये प्रथमच या जिल्ह्यासाठी तयार करण्यात आली असून ती देण्यात आली आहे, हे मी येथे नोंदवित आहे.

या मालिकेत लातूर जिल्हा दर्शनिका प्रगतीपथावर असून राज्यस्तरीय राज्य गॅझेटिअर ग्रंथ मालिकेत "वनस्पतीशास्त्र व वनसंपदा" या ग्रंथाचे मुद्रण सुरू आहे तर इतिहास : प्राचीन काळ (खंड १) आणि महाराष्ट्र : इतिहास-प्राचीन काळ (खंड १, भाग-२) स्थापत्य व कला आणि औषधी

वनस्पती ही माहितीपूर्ण राज्य गॅझेटिअर्स या विभागाने अलीकडेच प्रकाशित केली आहेत. ब्रिटिशकालीन विदर्भासी संबंधीत सर्व गॅझेटिअर ग्रंथ पुनर्मुद्रित स्वरूपात उपलब्ध करून दिले आहेत. याशिवाय जिल्हा गॅझेटिअर इंग्रजी सुधारित आवृत्तीपैकी नागपूर, नांदेड, नाशिक, पुणे व औरंगाबाद गॅझेटिअर ग्रंथ सीडीवर उपलब्ध आहेत.

विविध विषयावर माहिती संकलन करताना ग्रंथ प्रकाशनास विलंब होत असल्याने मंदन अवधी (Time-lag) गेलेला आहे. यातील उणीवाची जाणीव ठेवूनच एका मर्यादेत ही दर्शनिका प्रकाशित करीत आहे. मूळात हा एक भौगोलिक कोश या प्रारंभिक संकल्पनेपासून ब्रिटिशांना प्रशासकीय सोयीसाठी माहिती पुरविणारा ग्रंथ आणि आज बदलत्या दृष्टिकोनातून समाजाभिमुख शासन या संकल्पनेचा स्वीकार केल्यावर विविध क्षेत्रातील विकासविषयक संकल्पनेचा आराखडा मांडताना सहाय्यभूत होणारा ग्रंथ म्हणून ही दर्शनिका अपेक्षित आहे. त्या दृष्टीने झालेला प्रयत्न संशोधक, अभ्यासू नागरिक आणि प्रशासन यांना उपयुक्त ठरेल अशी आशा व्यक्त करतो.

मुंबई
विजयादशमी,
१२ ऑक्टोबर, २००५,
(आश्विन शुध्द ९, शके १९२७)

अरुणचंद्र शं. पाठक,
कार्यकारी संपादक व सचिव.

ऋणनिर्देश

भारतवर्षामध्ये गॅझेटिअर निर्मितीसाठी म्हणून तत्कालीन ब्रिटिश शासनाने सेन्ट्रल प्रॉव्हिन्सेस डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर्ससाठी जी गॅझेटिअर ग्रंथनिर्मिती झाली त्यात प्रामुख्याने तत्कालीन संपादक आर. व्ही. रसेल, सी. ब्राऊन व ए. ई. नेल्सन यांचा सहभाग होता. हे काम प्रामुख्याने एकोणीसाव्या शतकाच्या पहिल्या-दुसऱ्या दशकात पूर्ण झाले. तर गॅझेटिअर ऑफ दि बॉम्बे प्रेसिडेन्सीसाठी ग्रंथनिर्मिती ही प्रामुख्याने जेम्स एम. कॅम्बेल यांच्या नेतृत्वाखाली झाली.

बॉम्बे प्रेसिडेन्सीचे गॅझेटिअर हे ग्रंथ काहीसे विस्तृत असून हीच परंपरा गॅझेटिअर विभागाच्या मराठी सुधारित आवृत्तीसाठी म्हणून स्वीकारली गेली. स्वातंत्र्योत्तर काळात ब्रिटिशकालीन सुधारित इंग्रजी गॅझेटिअर ग्रंथमालिकेचे काम १९४९ मध्ये घेण्यात आले. त्यामध्ये नागपूर गॅझेटिअर १९६६ मध्ये प्रकाशित करण्यात आले. याचे संपादन सेतु माधवराव पगडी यांनी केले.

मराठी आवृत्ती संपादित करताना शक्य तितक्या विस्ताराने सर्व उपलब्ध साहित्य व संशोधनात्मक सामुग्रीचा आधार घेऊन एकूण १२ प्रकरणात नागपूर जिल्हा दर्शनिकेची मांडणी केली आहे. उपलब्ध आधारसाहित्य, विविध ग्रंथ, शासकीय कार्यालयाकडून प्राप्त झालेली माहिती आणि प्रत्यक्ष सर्वेक्षणाद्वारे संकलित केलेली माहिती या ग्रंथात समाविष्ट करण्यात आली आहे. हा ग्रंथ विद्वान संशोधक, प्रशासक आणि जिज्ञासु अभ्यासकांना अत्यंत उपयुक्त ठरावा. मराठी जिल्हा गॅझेटिअर ग्रंथ मालेत प्रथमत: नागपूर जिल्हा दर्शनिकेत सुधारित इंग्रजी गॅझेटिअरप्रमाणे ग्रामनिर्देशिका (Directory of Villages and Towns) दिली आहे. ही माहिती प्रामुख्याने जिल्हा परिषद व त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या बी. डी. ओ. आणि ग्रामसेवकांच्यावतीने भरून घेण्यात आली आहे. स्वाभाविकपणे एकूण प्रक्रियेमध्ये ग्रंथातील माहिती संकलित केल्यानंतर बराच विलंब झाला असल्याकारणाने यामध्ये अपरिहार्यपणे मंदन अवधी (Time-lag) गेलेला आहे. हे मी नम्रपणे नमूद करतो. या ग्रंथाचे वेगळेपण म्हणून मी असे स्पष्ट नमूद करतो की एखाद्या जिल्ह्याचे गॅझेटिअर तयार करताना स्थानिक पातळीवरील त्या क्षेत्रातील तज्ञ व अभ्यासकांचा प्रथमच इतका मोठ्या प्रमाणामध्ये सहभाग घेतला आहे. त्यांच्या योगदानामुळे या क्षेत्रातील कामाला जास्तीत जास्त न्याय देण्याचा प्रयत्न झाला आहे. नागपूरसारख्या प्रगल्भ

शिक्षण व संशोधन क्षेत्रातील जिल्ह्याची दर्शनिका (गॅझेटिअर) निर्माण करताना अशा प्रकारच्या त्या त्या क्षेत्रातील तज्ञांचा जाणिवपूर्वक सहभाग या ग्रंथात असून ही निश्चितच गौरवास्पद बाब आहे असे मला वाटते.

तज्ञ सहयोगकर्ता लेखकांच्या लेखनाव्यतिरिक्त ग्रंथातील बहुतांश लेखन कार्यालयातील विविध अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केले असून संपादकीय तपासणीनंतर सर्व मजकूर महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर संपादक मंडळाचे मान्यवर सभासदांनी तपासून दिले आहे. त्यांनी केलेल्या सूचनांचा स्वीकार करून आवश्यक त्या ठिकाणी योग्य संस्कार केले आहेत. हा ग्रंथ पूर्ण होत असतानाच प्राप्त कालावधीमध्ये एकूण दोन संपादक मंडळाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले असून त्यांचा मी ऋणी आहे. ग्रंथ प्रकाशनाला पाठवित असताना पुढील संपादक मंडळ कार्यरत होते.

डॉ. जनार्दन वाघमारे, डॉ. श्रीधर गुप्ते, डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. यशवंत मनोहर, डॉ. फक्रुद्दीन बेन्नुर, डॉ. श्रीनिवास ओमणवार, डॉ. कि. का. चौधरी, डॉ. आर. एस. सोळुंके, डॉ. उत्तम रूद्रवार, डॉ. राजेंद्र कुंभार, डॉ. सुधीर गव्हाणे, श्री. मधुकर भावे आणि डॉ. उर्मिला पवार व संपादक मंडळाचे पदसिध्द अध्यक्ष म्हणून सचिव, सांस्कृतिक कार्य यांनी वेळोवेळी काम पाहिले आहे. या आणि पूर्वीच्या संपादक मंडळ सदस्यांमध्ये प्रामुख्याने ज्यांनी या गॅझेटिअरच्या अनेक प्रकरणांचे लेखन स्वत: बारकाईने तपासले आहे, त्यात सूचना केल्या आहेत व त्याला योग्य प्रारूप प्राप्त करून दिले त्यात डॉ. भा. ल. भोळे, डॉ. एस. व्ही. खांदेवाले, डॉ. उषा देशमुख यापूर्वीच्या संपादक मंडळ सदस्यांचे तसेच डॉ. यशवंत मनोहर व अन्य सर्व संपादक मंडळ सदस्यांचे मी विशेष ऋण व्यक्त करतो. डॉ. शांता कोठेकर यांनी प्रारंभीपासून नागपूर जिल्हा स्वीकृत सदस्य या नात्याने जवळपास सर्वच प्रकरणे स्वत: तपासली असून अत्यंत मौलिक असे योगदान दिले आहे. या सर्वांचे मी ऋण व्यक्त करतो.

विद्यमान ग्रंथामध्ये सहयोगकर्ते लेखक म्हणून पुढील मान्यवरांनी योगदान दिले आहे.

भूगोल या प्रकरणामध्ये भूगोल या भागाचे लेखन प्रा. के. टी. कोलते, भूविज्ञान-डॉ. जी. जी. देशपांडे आणि वनसंपदा-डॉ. र. ल. कोल्हे यांनी लेखन केले आहे. इतिहास प्रकरणामध्ये अनुक्रमे प्राचीनकाळ-डॉ. अजयमित्र शास्त्री, गोंड राजवंश, डॉ. रा. श्री. मोरवंचीकर, भोसलेकालीन समाजजीवन-डॉ. तु. वि. गेडाम, नागपूरकर भोसले डॉ. शांता कोठेकर. आधुनिक काळ-डॉ. पी. एल. जोशी, (१८५७ ते १९२०) आणि डॉ. अ. प्रा. शेट्ये (१९२० ते १९४७) यांनी लेखन केले आहे. गॅझेटिअरच्या दृष्टीने व या जिल्ह्याच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरणारे संस्कृती हे प्रकरण लिहिताना अनुक्रमे संस्कृत साहित्य-डॉ. स. मो. अयाचित,

मराठी साहित्य-डॉ.आशा सावदेकर, हिंदी साहित्य-प्रा. योगेश्वरी शास्त्री, संत साहित्य व परंपरा-डॉ. सुरेश डोळके, संस्कृत पत्रकारिता-डॉ. न. र. फत्तरकिने, मराठी पत्रकारिता-डॉ. श्रीपाद जोशी, संगीत परंपरा-डॉ. सुलभा पंडित, नाट्य, रंगभूमी व चित्रपटसृष्टी-डॉ. विनोद इंदुरकर आणि आधुनिक चित्रकला व शिल्पकला-डॉ. मनीषा पाटील अशा विविध भागांचे लेखन त्या त्या क्षेत्रातील मान्यवरांनी केले आहे. याशिवाय डॉ. वऱ्हाडपांडे, डॉ. विलास देशपांडे, प्रा. सुनंदा देशपांडे, डॉ. श्रीपाद चितळे यांच्या सहकार्याची पण मी नोंद घेत आहे.

प्रेक्षणीय स्थळे या प्रकरणात उत्खनीत स्थळे व रामटेक, अडम, मांढळ आणि पारशिवनी अशा काही स्थळांचे लेखन डॉ. अ. शं. पाठक यांनी केले असून नागपूर शहराच्या संदर्भात डॉ. प्रभाकर गद्रे यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. याशिवाय या ग्रंथात नागपूर परिसरातील टांकसाळी व नाणी याविषयी श्री. दिलीप बलसेकर, संशोधन अधिकारी, भारतीय मुद्राशास्त्र शोध संस्था, अंजनेरी, नाशिक यानी टिपण लिहिले असून जिल्ह्यातील प्राप्त ताम्रपट व शिलालेख यांची सूची व त्यातील स्थलनामे यावर डॉ. हरिहर ठोसर यानी एक टिपण लिहिले आहे. श्री. गजभिये, संचालक, पुरातत्व विभाग तसेच डॉ. ए. के. शर्मा यानी मनसर येथील संशोधक व उत्खनन, या सर्वांनी योगदान दिले असून नागपूर विद्यापीठातील डॉ. चंद्रशेखर गुप्ते यांनी वाकाटककालीन छायाचित्रे पुरविली आहेत. याशिवाय ग्रंथातील ग्रामनिर्देशिकेसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तसेच गट विकास अधिकारी यांचेही मी ऋण व्यक्त करतो. नकाशासाठी संचालक, रिमोट सेन्सींग ॲप्लीकेशन्स केंद्र, नागपूर तथा महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती केंद्र, पुणे यांचा मी आभारी आहे.

विद्यमान ग्रंथाचे संकलन व प्रकाशन प्रक्रियेमध्ये मला सहाय्य करणारे सर्वश्री. प्र. नि. नारखेडे, सहसंपादक; नि. रा. पाटील, रा. र. हनवतकर, त्रि. मा. केंद्रे, प्र. रा. गवळी, संशोधन अधिकारी तसेच के. झिं. राऊत, ध. जि. नावडकर, सु. श्री. गायकवाड, रा. स. कुंभार, ग. ना. परब, शा. का. मर्गज, अं. रा. पवार व तु. भा. सुकाळे सर्व सहायक संशोधन अधिकारी तसेच या कार्यालयातील सहायक तसेच कार्यालयातील विविध स्तरावरील कर्मचारी यांनी केलेल्या सहकार्याचा उल्लेख करणे आवश्यक वाटते त्या सर्वांचा मी आभारी आहे.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ, महाराष्ट्र रिमोट सेन्सींग ॲप्लीकेशन्स सेंटर, नागपूर, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन यांचा मी ऋणी आहे. जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जिल्हा माहिती अधिकारी तसेच संचालक, पुरातत्व विभाग डेक्कन कॉलेज पुणे, सहायक संचालक, पुरातत्व विभाग, अभिरक्षक,

मध्यवर्ती संग्रहालय यांनी पुरविलेली छायाचित्रे व सहकार्याबद्दल मी त्यांचे ऋण व्यक्त करतो. ग्रंथछपाई उत्तम व त्वरित करून देण्यासाठी संचालक, उपसंचालक, शासन मुद्रण लेखनसामग्री व प्रकाशन, मुंबई आणि श्री. अ. जी. सुर्वे, व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर व त्यांचे सर्व सहकारी यांनी केलेल्या कामगिरीबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

हे गॅझेटिअर व्हावे यासाठी जाणिवपूर्वक प्रयत्न करून आग्रही राहणारे मा. ना. श्री. अशोक चव्हाण, मंत्री सांस्कृतिक कार्य, मा. ना. श्री. अनिलजी देशमुख, मंत्री सार्वजनिक बांधकाम, श्री. राणा जगजितसिंह पाटील, राज्यमंत्री सांस्कृतिक कार्य यांचेही व्यक्तीश: ऋण व्यक्त करतो. या विभागास सातत्याने प्रोत्साहन दिल्याबद्दल मी मा. सौ. संजीवनी कुट्टी, सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग यांचे ऋण व्यक्त करतो.

मुंबई
विजयादशमी,
१२ ऑक्टोबर, २००५,
(आश्विन शुध्द ९, शके १९२७)

अरुणचंद्र शं. पाठक,
कार्यकारी संपादक व सचिव.

प्रकरण १०

सामाजिक सेवा

जिल्ह्यातील विविध स्तरांवरील शिक्षण, ग्रंथालय सुविधा, सार्वजनिक आरोग्य, समाजकल्याण व धर्मादाय स्वयंसेवी संस्था या सामाजिक सेवांचा इतिहास व माहिती या प्रकरणात दिलेली आहे.

शिक्षण

वाकाटक काळात रामटेकवरील कविश्रेष्ठ कालीदासाचे निवास, त्याने केलेली श्रेष्ठ काव्य निर्मिती व प्रतिभासंपन्न वाकाटक नृपती येथील साहित्य व भाषाशास्त्र याबाबतची शैक्षणिक अभ्यासाची परंपरा स्पष्ट करतात. पुढे यादवांच्या राजवटीत शिक्षणास राजाश्रय मिळाला. हे विविध अग्रहारावरून स्पष्ट होते. या प्रदेशावर बहमनी राजवट प्रस्थापित झाल्यावर शैक्षणिक सुविधांमध्ये वाढ जरी झाली नसली तरी शैक्षणिक कार्यात बहमनी राजांनी व्यत्यय आणल्याचे दिसत नाही. बहमनीनंतर स्थानिक गोंड राजे प्रबळ झाले. त्यांनी मुघल सम्राटांचे अधिपत्य स्वीकारून प्रशासन व्यवस्था आपणाकडे कायम ठेवली. गोंड राजांच्या काळात त्यांच्या किल्ल्यात मदरसा भरत असे. पुढे नागपूरकर भोसल्यांच्या काळात वीर राघवाचार्य चंद्रपूरकर, कृष्णशास्त्री रामानुज, सदाशिव भट्ट घुले, सीताराम शास्त्री वखरे यांच्यासारख्या धर्म, न्याय, व्याकरण, अलंकार इत्यादी शास्त्रांत पारंगत असलेल्या पंडितांना आश्रय मिळालेला होता. साहजिकच वेद, न्याय, व्याकरण इत्यादी शास्त्रांचे अध्ययन करण्याकरिता अनेक ब्राह्मण विद्यार्थी या पंडितांकडे येत. त्यावेळी शिक्षण नि:शुल्क असून ते गुरुकुल पध्दतीने दिले जात होते. ह्याच काळात कारकुनी शिक्षण देणाऱ्या पंतोजीच्या शाळा होत्या. या शाळांमधून पावकी ते औटकीपर्यंतचे पाढे, तोंडी हिशेब, मोडी व मराठी लेखन-वाचनाचे शिक्षण देण्यात येई. ते संपल्यावर सावकारी पेढीवर वहीखाते कीर्द खतावणी, ताळा, व्याजाचा हिशेब व कर्जाचा पूर्जा कसा लिहावा याचे शिक्षण देण्यात येई. या काळात मोडीबरोबर फारसीतून पत्रव्यवहार होत असल्यामुळे ब्राह्मण व इतर जातींतील मुले मुनशीकडे [मुनशी मुसलमान, कायस्थ व ब्राह्मण असत] फारसीचे शिक्षण घेत असत. व्यावसायिक शिक्षण त्या-त्या व्यावसायिकांकडून त्यांच्या मुलांना घरीच प्राप्त होत असे.

क्वचित काही गावांत खाजगी पाठशाळा होत्या. गावातील शास्त्री किंवा पुरोहित विद्यार्थ्यांना आपल्या घरी बोलावित व आपल्या खाजगी पाठशाळेत त्यांना नि:शुल्क विद्यादान करीत. या पाठशाळांमध्ये प्रामुख्याने संस्कृतचे अध्यापन होत असे. ब्रिटिश अंमलापूर्वी नागपूरमध्ये वरीलप्रमाणे मदरसा, गुरुकुल पध्दतीची शाळा, पंतोजीची शाळा व मिशनऱ्यांची शाळा या प्रकारच्या शाळा अस्तित्वात होत्या. इ. स. १८२६ मध्ये नागपूरला ४६ सार्वजनिक शाळा होत्या **(विदर्भ संशोधन मंडळ,** १९६०, पृ. १४०.) त्यापैकी ४० मराठी [मोडीतून शिक्षण देणाऱ्या], ३ बाळबोध, २ फारसी व एका शाळेत फारसीच्या माध्यमातून मराठी व हिंदुस्थानी

शिक्षणाची सुविधा देणाऱ्या शाळा होत्या. या शाळांमध्ये अनुक्रमे ८२४, ३९, २२ व ५१ असे एकूण ९३६ विद्यार्थी होते. याव्यतिरिक्त नि:शुल्क विद्यादान करणाऱ्या काही खाजगी पाठशाळा होत्या. त्यात ३२३ विद्यार्थी व ५६ शिक्षक होते. या विद्यार्थांपैकी १५९ वेदशास्त्र, १२६ फारसी, ३३ अरबी व ५ तेलुगु शिकणारे होते. सार्वजनिक शाळेत प्रत्येक विद्यार्थी महिन्याला तीन आणे शुल्क देत असे. साधारणत: शिक्षकाला सरासरी ३ रुपये १२ आणे मासिक वेतन मिळत असे. तर काही शिक्षकांना दुप्पटीने वेतन दिले जाई. मराठी हिंदुस्थानी शाळेचा खर्च खाजगी वर्गणीतून भागविला जाई. ही शाळा रेसिडेंसीतील अँटानी नामक कारकुनाच्या देखरेखीखाली सुरू होती. या शाळेत बायबलच्या नव्या व जुन्या करारांची त्या भाषेतील भाषांतरे शिकविण्यात येत. खाजगी शाळेतील शिक्षकास साधारणत: सरासरी दोन रुपये महिना वेतन मिळत असे. याशिवाय अन्नधान्य, कपडे वगैरे मिळत असत. काही शिक्षकांना हे वेतन ३० रुपयापर्यंत मिळत होते.

इ. स. १८४० मध्ये युरोपियन विद्यार्थ्यांसाठी नागपूरला एक शाळा सुरू करण्यात आली. इ. स. १८४२ मध्ये जर्मन मिशनने नागपूरला गोंडाकरिता शाळा सुरू केली. परंतु त्यातील ४ मिशनऱ्यांचा मृत्यू झाल्यामुळे ती शाळा लवकरच बंद पडली. पुढे २ मे १८४६ ला रेव्ह. स्टीफन हिस्लॉप यांनी नागपूरला इतर रहिवाशांकरिता शाळा सुरू केली. यासाठी मराठी व हिंदी क्रमिक पुस्तके श्रीरामपूरच्या रेव्हरंड केरी यांनी पुरविली होती. याच काळात मिशनऱ्यांनी नागपूर प्रांतात प्रवेश करून आपल्या शाळा स्थापन करण्यास सुरुवात केली. रेव्ह. स्टीफन हिस्लॉप यांनी इ. स. १८४९ मध्ये नागपूरला मुलींसाठी जनाना मिशन स्कूल नावाची शाळा सुरू केली. इ. स. १८५१ मध्ये या शाळेत ४८ विद्यार्थिनी होत्या. इ. स. १८५२ मध्ये कामठीला सेंट फ्रांसिस डी-सेल्स शाळा सुरू झाली. ही शाळा २१ जानेवारी १८७० ला नागपूरला स्थलांतरित करण्यात आली. या शाळेत इ. स. १८७२ पर्यंत उर्दू शिकवित असत. त्यानंतर येथे लॅटिन भाषेचे शिक्षण देण्यात येऊ लागले. येथे मॅट्रिकनंतरचे दोन वर्षाचे वर्गही भरत असत. महाविद्यालयीन शिक्षण देणारी नागपूरमधील ही पहिली शाळा होय. इ. स. १८५८ मध्ये मिसेस कूपर यांनी नागपूरला कुपर्स स्कूल सुरू केली. ती आज सेंट उर्सुला गर्ल्स हायस्कूल या नावाने परिचित आहे. या शाळेला चर्च ऑफ स्कॉटलंडतर्फे आर्थिक सहाय्य दिले जाते. इ. स. १८६३ मध्ये कामठीला शासकीय माध्यमिक शाळा स्थापन झाली. तिचे इ. स. १९०१ मध्ये हायस्कूलमध्ये रुपांतर झाले. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९०८, पृ. २८९.) या शाळेशी मागासवर्गीय मुलांची शाळा व बंसीलाल प्रायमरी शाळा संलग्न होती.

इ. स. १८६१ मध्ये ब्रिटिशांनी नवीन पध्दतीचे शिक्षण देण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक वर्ग तयार करण्यासाठी पुणे व मुंबईहून प्रशिक्षित शिक्षक आणून नागपूरला नॉर्मल ट्रेनिंग स्कूल सुरू केले. इ. स. १८६२ मध्ये तत्कालीन रेव्ह. जॉर्ज कॉटन यांनी नागपूरला बिशप कॉटन स्कूल सुरू केली. सुरुवातीला या शाळेत केवळ युरोपियन विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात होता. इ. स. १८६९ मध्ये नागपूरला मुन्शी जमालुद्दीन यांचे वाड्यात श्रीमंत अहिरराव, श्रीमंत चिटणीस इत्यादीनी 'दि ग्रँट इन-एड अँग्लो व्हर्नाक्यूलर स्कूल' ही प्राथमिक शाळा सुरू केली. या शाळेत १२७ विद्यार्थी होते. याच वर्षी कर्नल फेल्टन यांच्या सूचनेवरून

या शाळेत इंग्रजी वर्ग सुरू करण्यात आले. स्थानिक लोकांनी चालविलेली परंतु इंग्रजी शिक्षणाची सोय असणारी ही पहिलीच शाळा होती. लोक आग्रहास्तव तेथे संस्कृत शिकविण्यासाठी राजश्री गोपाल नारायण शास्त्री यांची नियुक्ती करण्यात येऊन ते उन्हाळ्याच्या सुट्टीत सकाळी दोन तास मुलांना शाळेत संस्कृत शिकवित होते. इ. स. १८७० मध्ये शाळेला सिटी स्कूल हे नाव देण्यात आले. इ. स. १८९३ मध्ये हे नाव बदलून नील सिटी हायस्कूल करण्यात आले. आज ही शाळा श्री. दादासाहेब धनवटे नगर विद्यालय या नावाने परिचित आहे. इ. स. १८७३ पर्यंत विद्यार्थ्यांना मॅट्रिकची परीक्षा देण्यासाठी मुंबईला जावे लागत होते. लेखी परीक्षेशिवाय मौखिक परीक्षाही घेण्यात येत असे. इ. स. १८७५ मध्ये नागपूरला फ्रेंच मिशनरी यांनी कॉन्व्हेंट डे-स्कूल सुरू केली. आता ही शाळा सेंट जोसेफ कॉन्व्हेंट या नावाने ओळखली जाते. याच शाळेतून सेंट जॉन हायस्कूल नावाची नवीन शाळा निर्माण झाली. सरकारी मदत न घेता गोपाळराव भिडे व मोरेश्वर पारधी यांनी इ. स. १८७८ मध्ये नागपूरला भिडे गर्ल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून भिडे यांचे वाड्यात पहिली मुलींची शाळा सुरू केली. इ. स. १९२३ पर्यंत शासकीय मान्यता न मिळालेली ही शाळा सुरू ठेवण्यासाठी पालकांनी दरमहा १० रुपये फी देऊन आर्थिक सहाय्य केले. मुलींनीही भाऊबीजेच्या निमित्ताने घरोघरी जाऊन आपल्या राष्ट्रीय वृत्तीचा परिचय देत शाळेसाठी निधी गोळा करण्याचा उपक्रम राबविला. ९ डिसेंबर १८७९ ला नागपूर येथे भोसले वेदशाळा स्थापन झाली. त्यात वेद, व्याकरण, ब्रह्मकर्म, आयुर्वेद, न्याय आणि खगोलशास्त्राचे शिक्षण दिले जाते.

ब्रिटिशांनी इ. स. १८८१ मध्ये शाळांना शासकीय अनुदान देण्याचे धोरण जाहीर केले. याच वर्षी नागपूरला आदितवार दरवाजा नावाची शाळा सुरू होऊन तिला सरकारकडून मान्यता व अनुदान मिळाले. इ. स. १८८३ पर्यंत ही शाळा निल सिटी हायस्कूलचे मुख्याध्यापकांचे देखरेखीखालीच सुरू होती. इ. स. १८८२ मध्ये लॉर्ड रिपनच्या सुधारणांनुसार प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी स्थानिक संस्थाकडे सोपविण्यात आली. त्याकाळी नागपूर हे प्रमुख शैक्षणिक केंद्र म्हणून ओळखले जात होते.

महाविद्यालयीन शिक्षणासाठी नागपूरला रेव्हरंड जे. पी. कुपर यांनी इ. स. १८८३ मध्ये हिस्लॉप कॉलेजची स्थापना केली. या कॉलेजमध्ये सुरुवातीपासूनच कला व विज्ञान विषय एकत्रित होते आणि दोन वर्षांच्या इंटरमिजिएट (एफ. ए.) अभ्यासक्रमासाठी सहा आणि पुढच्या तीन वर्षाच्या बी. ए. अभ्यासक्रमासाठी ऐच्छिक सोबत पाच विषय महिना दोन रुपये फी घेऊन शिकविले जात. हिस्लॉप कॉलेजच्या स्थापनेने शिक्षणाच्या स्पर्धेत मिशनऱ्यांनी पुन्हा एकदा आघाडी मिळविली होती. अशा प्रकारचे दुसरे कॉलेज स्थापन होऊ नये म्हणून रेव्ह. कूपरने सरकारकडे प्रयत्नांची शर्थ केली. यावेळी हिस्लॉप कॉलेजमध्ये २१ विद्यार्थी होते. तरी सुध्दा बिपिन कृष्ण बोस, मुकुंद बाळकृष्ण बुटी, रंभाजीराव महाडिक, बापुराव दादा, राजा सुलेमानखाँ व मिया खुशीर्द हुसेन यांनी नागपूरला दुसरे महाविद्यालय सुरू करण्यासाठी 'मॉरिस मेमोरिअल फंड' स्थापन केला व त्यात १,५५,२८९ रुपये जमा झाले. **(विदर्भ संशोधन मंडळ,** १९६०, पृ. १४६-१४७.) त्यानंतर जुलै १८८३ मध्ये मध्यप्रातांच्या मुख्य कमिशनरला पत्र देऊन कॉलेज सुरू करण्यास परवानगी मागितली. तसेच १६ फेब्रुवारी

१८८५ रोजी 'मॉरिस मेमोरिअल फंडाचे' रुपांतर नागपूर मॉरिस कॉलेज असोशिएशन या संस्थेत करून नियामक मंडळाची नोंदणी केली. जून १८८५ मध्ये मॉरिस कॉलेज स्थापन झाले. हे कॉलेज कलकत्ता विद्यापीठाशी संलग्न झाले व त्यास एम. ए. पर्यंतचे वर्ग शिकविण्याची परवानगी देण्यात आली. १५ मे १८८६ ला मॉरिस कॉलेजला विधि वर्ग सुरू करण्याची परवानगी मिळाली. इ. स. १८८५ मध्ये श्रीधरपंत पारखी व नीलकंठराव उधोजी यांनी नागपूरला सरकारी अनुदानाशिवाय नेटिव्ह जनरल इन्स्टिट्यूटची स्थापना केली. राष्ट्रीय वृत्तीचे शिक्षण देणारी सर्वसामान्य जनतेसाठी खुली असलेली ही शाळा इ. स. १८९१ मध्ये नागपूर इंग्लिश स्कूल व इ. स. १९१५ पासून न्यू इंग्लिश हायस्कूल म्हणून ओळखली जाऊ लागली. याच वर्षी (इ. स. १८८५) राजे आजमशहा यांच्या किल्ल्यात सिटी स्कूलच्या व्यवस्थापनाने मुस्लिम विद्यार्थ्यांसाठी उर्दू शाळा सुरू केली. कामठीला १८८५ मध्ये इलिस गर्ल्स स्कूलची (ब्रिगेडिअर जनरल इलिस) स्थापना झाली.

या वर्षापासून इतर माध्यमातून शिक्षण देणाऱ्या विविध शाळांची भर नागपूरच्या शैक्षणिक क्षेत्रात पडत गेली. इ. स. १८८७ मध्ये पारसी मुला-मुलींसाठी दि एम्प्रेस मिल जोरोस्ट्रियन चिल्ड्रेन्स स्कूल (टाटा पारसी गर्ल्स हायस्कूल) व इ. स. १८८८ मध्ये खानबहादूर एच. एम. मलक यांनी अंजुमन हामी-ए-इस्लाम ही शाळा सुरू केली. रावसाहेब ए. वासुदेव मुदलियार यांनी दक्षिण भारतीयांसाठी इ. स. १८९४ मध्ये दि तमिल मिक्स्ड् स्कूल (सरस्वती विद्यालय) ची स्थापना केली. त्यापूर्वी बुटी प्रायमरी शाळा सुरू करण्यात आली.

एलेक्सिस पोड्सिन यांनी नागपूरला सेंट जोसेफ टेक्निकल स्कूल ही पहिली तांत्रिक शाळा (शासकीय तंत्र निकेतन) इ. स. १८९८ मध्ये स्थापन केली. इ. स. १९०२ मध्ये नागपूरला रावसाहेब पटवर्धन यांनी एक माध्यमिक शाळा स्थापन केली. ही शाळा इ. स. १९१० मध्ये शासनाला हस्तांतरित करण्यात आली आणि शासकीय पटवर्धन माध्यमिक शाळा म्हणून ओळखली जाऊ लागली. ही जिल्ह्यातील पहिली शासकीय माध्यमिक शाळा होय. नागपुरात विविध प्रदेशातून बहुभाषिक लोकांचे आगमन झाले. त्यातूनच गुजराथी मुलांसाठी इतवारी गुजराथी शाळा (१९०५) व तामिळ आणि हिंदी भाषिकांसाठी प्रॉव्हिडन्स गर्ल्स स्कूल (१९०६), बंगाली भाषिकांची दीनानाथ हायस्कूल (१९१८) स्थापन केली. तसेच १९१३ मध्ये मोहपा एज्युकेशन सोसायटीने प्राथमिक शाळा सुरू केली. अण्णासाहेब खोत, नारायणराव पंढरपूरकर, डॉ. ल. वा. परांजपे, दामुअण्णा देशमुख, ओगले व लांडगे या मंडळींनी पुढाकार घेऊन १९१५ मध्ये श्रीमती दादीबाई देशमुख हिंदू मुलींची शाळा सुरू केली. नागपूरच्या औद्योगिक विकासामुळे तंत्र व धंदे शिक्षण देणे ब्रिटिश सरकारला अपरिहार्य होऊन शासनाने इ. स. १९०६ मध्ये कृषि महाविद्यालय आणि व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिट्यूट (इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स), १९१४ मध्ये शासकीय तंत्र निकेतन व रॉबर्टसन मेडिकल स्कूल (शासकीय मेडिकल कॉलेज) तसेच इ. स. १९१८ मध्ये हॅण्डीक्राफ्ट स्कूल (शासकीय तंत्र माध्यमिक तथा औद्योगिक शाळा) या संस्था नागपूरात सुरू केल्या.

इ. स. १९२० च्या सेंट्रल प्रॉव्हिसेंस ॲण्ड बेरार लोकल सेल्फ गव्हर्नमेंट ॲक्टनुसार

विदर्भातील स्थानिक स्वराज्य संस्थांना स्थिरता लाभली. त्यांच्याकडे शिक्षण हा विषय सोपविण्यात आला. इ. स. १९३९ च्या अधिनियमानुसार डिस्ट्रिक्ट कॉन्सिल व लोकल बोर्ड अस्तित्वात आले. त्यांच्याकडे शिक्षणाची जबाबदारी सोपविण्यात आली. परंतु ही प्रशासनिक व्यवस्था १९४९ च्या सेंट्रल प्रॉव्हिसेंस ॲण्ड बेरार लोकल सेल्फ गव्हर्नमेंट ॲक्टनुसार बदलण्यात आली. पुढे इ. स. १९५२ मध्ये प्रत्येक तालुक्यासाठी जनपदसभा स्थापन करण्यात आल्या. जनपद सभांना व्यापक अधिकार देऊन प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली.

औद्योगिक प्रगतीमुळे शिक्षणाचे महत्त्व वाढून शासन व नगरपालिकांनी स्थापन केलेल्या शाळा अपुऱ्या पडू लागल्या. ग्रामीण भागातील लोकांनाही शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी, तसेच माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणाची सुविधा जिल्ह्यात उपलब्ध करून देण्यासाठी जिल्ह्यातील शिक्षणप्रेमी लोकांनी दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने इ. स. १९२० ते १९४८ या कालावधीत विविध शैक्षणिक संख्या स्थापन केल्या. यात प्रामुख्याने नागपूरातील मागासवर्गीयांची पहिली शाळा एस. सी. एस. गर्ल्स स्कूल (१९२२), मथुरादास राठी हायस्कूल (१९२५), सेवासदन मुलींची शाळा (१९२७), सुळे हायस्कूल (१९२७), सेंट अन्थोनी हायस्कूल (१९२८), धरमपेठ शिक्षण संस्था (१९२९), मातृसेवा सेवा संघ (१९२९), श्री. बिंझाणी नगर महाविद्यालय (१९३०), विमेन्स एज्युकेशन सोसायटीचे लेडी अमृताबाई डागा महिला महाविद्यालय (१९३२), सी. पी. बेरार एज्युकेशन सोसायटी (१९३२), नागपूर शिक्षण मंडळ (१९३३), भारतीय शिक्षण मंडळ (१९३३), पाध्ये मॉडेल हायस्कूल व कुर्वेज मॉडेल स्कूल (१९३४), लोकांची शाळा, केंद्र विद्यालय, नूतन भारत शाळा, मडिया हायस्कूल, सोमलवार हायस्कूल, धनवटे नॅशनल महाविद्यालय (१९३५), हडस हायस्कूल (१९४२), लक्ष्मीनारायण तंत्रशास्त्र संस्था (१९४२), लक्ष्मीदेवी धीरन कन्या शाळा (१९४५), गोविंदराम सेकसरिया अर्थ-वाणिज्य महाविद्यालय (१९४५), शासकीय वैद्यक महाविद्यालय (१९४७), सिंधी एज्युकेशन सोसायटी (१९४८), सिंधी हिंदी विद्या समिती (१९४८), उमरेडची आयडिअल एज्युकेशन सोसायटी (१९३६) व रामटेक येथील श्री समर्थ शिक्षण मंडळ (१९३७) आदि संस्थांचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

जिल्ह्यात इ. स. १९०५ मध्ये एकूण १९६ शाळा होत्या व त्यात १३,७८८ विद्यार्थी होते. इ. स. १९०६ व १९०७ मध्ये शाळांची संख्या अनुक्रमे १८९, १९३ व विद्यार्थ्यांची संख्या १४,०२७ व १४,२३६ होती. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९०८, पृ. २६९.) स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर इ. स. १९५१ मध्ये ३९३ प्राथमिक शाळा (४८,९७६ विद्यार्थी व १,१७७ शिक्षक), ६३ माध्यमिक शाळा (२४,५४२ विद्यार्थी व १,०५२ शिक्षक), ९ महाविद्यालये व १० इतर संस्था (४६८ विद्यार्थी व ११ शिक्षक) कार्यरत होत्या. या वर्षी नागपूर महानगरपालिकेच्या अधिकार क्षेत्रातील काही भागात आणि ५ खेड्यांमध्ये सक्तीचे प्राथमिक शिक्षण लागू करण्यात आले. इ.स. १९६१ मध्ये १,०६४ प्राथमिक शाळा (१,३३,८५३ विद्यार्थी व ४,१९० शिक्षक), १५१ माध्यमिक शाळा (६४,१२२ विद्यार्थी व २,६३७ शिक्षक) व २१ महाविद्यालये (१२,८३३ विद्यार्थी) व ७ इतर संस्था (४८९ विद्यार्थी व ४० शिक्षक) होत्या. या वर्षी प्राथमिक व माध्यमिक शाळा जिल्ह्यात सर्वत्र विखुरल्या होत्या. नागपूर तालुक्यामध्ये सर्वात

जास्त ४३९ प्राथमिक व १०४ माध्यमिक शाळा होत्या आणि सावनेर तालुक्यामध्ये १३१ प्राथमिक शाळा व रामटेक तालुक्यात सर्वात कमी ९ माध्यमिक शाळा होत्या. ३१ मार्च १९६२ रोजी जिल्ह्यातील १,०९५ प्राथमिक शाळांपैकी ७६७ शाळा जिल्हा परिषदेकडे व ९५ शाळा खाजगी संस्थांकडे होत्या. या प्राथमिक शाळा जिल्ह्यातील १२ शहरांत व ७२० खेड्यांमध्ये होत्या. तसेच ५६४ खेड्यांना एक मैलाच्या आत प्राथमिक शाळेच्या सोयी उपलब्ध होत्या. या शाळांमध्ये ४,२८६ शिक्षक होते. त्यापैकी ३,७३७ शिक्षक प्रशिक्षित होते. तसेच १७० माध्यमिक शाळांमध्ये ७२,३८१ विद्यार्थी (५०,४४१ मुले व २१,९४० मुली) व २,९२५ शिक्षक (१,६६१ प्रशिक्षित) होते. **(जिल्हा जनगणना निर्देशग्रंथ, नागपूर,** १९६१.) सन १९९९-२००० मध्ये जिल्ह्यात ८१३ पूर्व प्राथमिक शाळा, १,७३९ प्राथमिक, ५२० माध्यमिक व १७५ उच्च माध्यमिक शाळा होत्या. त्याशिवाय १५२ महाविद्यालये होती.

मुंबई प्रांतातील शैक्षणिक पध्दतीपेक्षा विदर्भातील पध्दती वेगळी होती. विदर्भात इयत्ता ४ थी पर्यंत प्राथमिक शिक्षण, तर ५ वी ते ७ वी चे वर्ग असलेल्या शाळांना मिडल स्कूल संबोधत असत. तत्कालीन आकृतिबंधानुसार ८ वी ते १० वी चे वर्ग असलेल्या शाळांना माध्यमिक शाळा तर ११ वी चे वर्ग जोडलेल्या शाळांना उच्च माध्यमिक शाळा संबोधत असत. विदर्भ प्रदेश मुंबई राज्यात १९५६ मध्ये विलीन झाल्यानंतरसुध्दा हीच पध्दती अस्तित्वात होती. पुढे भाषावार प्रांत रचनेप्रमाणे महाराष्ट्र राज्य निर्माण झाल्यानंतरसुध्दा (१९६०) हीच पध्दती सुरू राहिली. इ.स. १९६२ च्या जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियमानुसार प्राथमिक शिक्षणाची सर्व जबाबदारी जिल्हा परिषदेकडे सोपविण्यात आली. तथापि नगरपालिका क्षेत्रातील प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषदेच्या अधिकार क्षेत्रात न घेता नगरपालिकांकडेच ठेवण्यात आले. सध्या जिल्हा पातळीवर शिक्षण विभागाचा मुख्य म्हणून शिक्षणाधिकारी असून मदतीस दोन उप शिक्षणाधिकारी असतात. राज्यामध्ये पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा भागात वेगवेगळ्या शैक्षणिक पध्दती प्रचलित होत्या. या पध्दतीमध्ये सुसूत्रता आणून एकत्रीकरण करण्याचा सरकारने निर्णय घेतला. त्यानुसार इ. स. १९७० मधील शैक्षणिक पुनर्रचनेनुसार १०+२+३ असा आकृतीबंध स्वीकारण्यात आला. शालांत परीक्षेचा दहा वर्षांचा सुधारित अभ्यासक्रम १९७२ च्या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता आठवीपासून कार्यान्वित करण्यात आला. ११ वी व १२ वी चे वर्ग आवश्यकतेनुसार माध्यमिक शाळा व महाविद्यालयांना जोडण्यात आले. परिणामत: पदवी परीक्षेचा अभ्यासक्रम तीन वर्षांचा करण्यात आला. मातृभाषेतून शिक्षण व महाविद्यालयांच्या सुविधांमुळे १९७० ते २००० या काळात नागपूर जिल्ह्यात शिक्षणाचा मोठा प्रसार झाला. त्यामुळे जिल्ह्यात ठिकठिकाणी माध्यमिक विद्यालये तसेच कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये ज्ञानदानाचे कार्य करीत आहेत. जिल्ह्यातील साक्षरता, पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, महाविद्यालये तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, कृषि व पशुवैद्यकीय शिक्षण, प्रौढ शिक्षण या विषयांची माहिती खाली दिली आहे.

साक्षरता : ब्रिटिश राजवटीपूर्वी साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प असून फक्त उच्च पदस्थांमध्ये साक्षरतेचा काही प्रमाणात प्रसार झालेला होता. तर महिला तसेच मागासलेल्या जाती जमातींमध्ये साक्षरतेचे प्रमाण नगण्य होते. ब्रिटिश अमदानीतील पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रसार,

शिक्षण विषयक वाढत्या सोयी, समाज सुधारकांचे प्रयत्न व नवीन शैक्षणिक कायदे यामुळे साक्षरतेच्या प्रमाणात वाढ होत गेली.

नागपूर जिल्ह्यात १८९१ च्या जनगणनेनुसार बहुसंख्येने आढळणाऱ्या ६,६३,००० हिंदू लोकसंख्येपैकी ७,५२४ पुरुष व २०२ महिला शिक्षण घेत होत्या. यावर्षी २०,२३४ हिंदू पुरुष व ५१२ महिला साक्षर झालेल्या होत्या. तसेच जिल्ह्यातील एकूण ४३,३५० मुसलमान लोकसंख्येपैकी १,१९५ पुरुष व ११४ महिला शिक्षण घेत होत्या. तर ३,१०९ मुसलमान पुरुष व ३५५ मुसलमान महिला साक्षर झाल्या होत्या. त्यातील ६६ महिला १४ वर्षांच्या आतील वयोगटातील होत्या. यावेळी जिल्ह्यात अल्प प्रमाणात असलेल्या धर्मियांची शिक्षण वा साक्षरतेची आकडेवारी पुढीलप्रमाणे होती. **(सेन्सस ऑफ इंडिया,** १८९१, व्हॉल्यूम १२, सेंट्रल प्रॉव्हिसेंस ॲण्ड फ्युडेटरीज, पार्ट-२, पृ. ४६-५४.)

धर्म	लोकसंख्या	शिक्षण घेत असलेले		साक्षर	
		पुरुष	महिला	पुरुष	महिला
ख्रिश्चन	५,५२१	५५६	३९५	२,१५०	६८९
जैन	३,१४१	१२४	२	६७६	८
पारशी	३७६	४०	३३	१३१	६९
ज्यू	९७	८	३	२५	२०
बौध्द	२३४	२	--	११३	--
शीख	१५३	७	--	६९	१
इतर	४१,९८४	२१	--	३७	१

इ. स. १९०१ च्या जनगणनेनुसार साक्षरतेचे प्रमाणानुसार जिल्ह्यातील ९.१५ प्रतिशत पुरुष व ०.६५ प्रतिशत महिला साक्षर होत्या. या प्रांतातील अन्य जिल्ह्यांच्या तुलनेत हे प्रमाण सर्वाधिक होते. त्यात हिंदू ८.१५ प्रतिशत व मुसलमान १८.६६ प्रतिशत साक्षर होते. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९०८, पृ. २७०-७१.**)** प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाच्या प्रसारामुळे साक्षरतेच्या टक्केवारीत बरीच वाढ झाली. इ.स. १९०१ पासून जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येशी साक्षरतेची टक्केवारी पुढील विवरणपत्रात दिलेली आहे. **(डिस्ट्रिक्ट सेन्सस हँडबुक,** १९८१, नागपूर जिल्हा, पृ. १६ व **डिस्ट्रिक्ट सेन्सस हँडबुक,** १९९१, नागपूर जिल्हा, पृ. ४२)

जनगणना वर्ष	एकूण लोकसंख्येशी साक्षरतेची टक्केवारी		
	एकूण	पुरुष	महिला
१९०१	४.९२	९.१५	०.६५
१९११	५.३६	९.८१	०.८४
१९२१	७.१६	१२.४३	१.७२
१९३१	९.४०	१५.६८	२.८२
१९४१	१३.९५	२२.३३	५.१८

१९५१	२४.४३	३३.८६	१४.४०
१९६१	३५.१५	४८.०६	२१.२६
१९७१	४५.२६	५६.०९	३३.५१
१९८१	५४.३६	६३.७४	४४.६२
१९९१	७३.०४	८१.७९	६४.७४

वरील विवरणावरून गेल्या ९० वर्षात साक्षरतेच्या टक्केवारीत जवळ जवळ १५ पट वाढ झाली. विशेषत: १९३१ पासून स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण जलद गतीने वाढले. इ.स. १९३१-१९९१ दरम्यानच्या काळात पुरुषांच्या साक्षरतेचे प्रमाण पाच पट वाढले आणि त्याच काळात स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण २२ पटीपेक्षा जास्त वाढले. इ.स. १९३७-१९३९ मध्ये पहिल्या काँग्रेस प्रांतिक मंडळाने साक्षरता व शिक्षण प्रसारासाठी भरीव कामगिरी केल्याने व स्वातंत्र्योत्तर काळात लागू केलेली सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना यामुळे साक्षरतेत लक्षणीय वाढ झाली.

स्वातंत्र्योत्तर काळात शासनाने पंचवार्षिक योजनांतर्गत राबविलेली ग्रामशिक्षण मोहीम, राष्ट्रीय व राज्य प्रौढ शिक्षण कार्यक्रम, मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना दिलेल्या शैक्षणिक सवलती यामुळे जिल्ह्यात विविध शैक्षणिक स्तरांवर झालेला विकास खालील विवरणपत्रावरून दिसून येतो. **(सेंसस ऑफ इंडिया,** १९९१, सिरीज-१४, महाराष्ट्र भाग-४ अे, सोशल ॲण्ड कल्चरल टेबल्स, पृ. २५२-५७, ३५१-५३.)

शैक्षणिक स्तर, १९९१

शैक्षणिक स्तर	जिल्हा (नागरी व ग्रामीण)
एकूण लोकसंख्या	३२,८७,१३९
साक्षर (शैक्षणिक स्तर नसलेले)	३,६९,३८०

शैक्षणिक स्तर, १९९१ (क्रमश:)

शैक्षणिक स्तर	जिल्हा (नागरी व ग्रामीण)
प्राथमिक	५,३८,७०३
माध्यमिक	५,१४,४६२
मॅट्रिक्युलेशन	२,९८,५७३
हाइयर सेकंडरी	१,२८,९२९
पदवीसमान नसलेल्या अतांत्रिक पदविका	१,३४०
पदवीसमान नसलेल्या तांत्रिक पदविका	२४,७१०

पदवीधर (तांत्रिक पदविकाधारक वगळून)	१,५१,०६९
पदव्युत्तर (तांत्रिक पद पदव्युत्तर धारक वगळून)	३३,५३०

तांत्रिक पदवी किंवा पदवी समान असलेल्या पदविका किंवा पदव्युत्तर

अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र	९,३२०
वैद्यकशास्त्र	६,०१०
कृषि व डेअरी	५३०
पशु चिकित्सा	३२०
शिक्षण शास्त्र	७,१४०
इतर	१५०

सन १९९१ मध्ये राज्यात साक्षरतेच्या प्रमाणात जिल्हा तिसऱ्या क्रमांकावर होता. यावर्षी जिल्ह्यात नागपूर (शहरी) तालुक्यात साक्षरतेची टक्केवारी सर्वात जास्त (८१.९८ प्रतिशत) त्याखालोखाल कामठी (७१.८६), कळमेश्वर (६९.०१), नागपूर (ग्रामीण ६७.४७), नरखेड (६७.२६), काटोल (६७.०६), हिंगणा (६७.००), सावनेर (६६.२९), उमरेड (६६.२३), मौदा (६०.८१), पारशिवनी (६०.७७), रामटेक (६०.४२), भिवापूर (५९.४२), व सर्वात कमी टक्केवारी कुही तालुक्याची (५८.२४) होती. **(डिस्ट्रिक्ट सेन्सस हँडबुक,** १९९१, नागपूर जिल्हा, पृ. ४२.) तक्ता क्रमांक १ मध्ये जिल्ह्यातील १९६१ ते १९९१ पर्यंतची तालुकानिहाय साक्षरता टक्केवारी दिलेली आहे. (सर्व तक्ते प्रकरणाच्या शेवटी दिले आहेत.)

साक्षरता व शिक्षण याबाबतीत अनुसूचित जातींपेक्षा अनुसूचित जमाती फारच मागासलेल्या आहेत. अनुसूचित जातींमधील स्त्री-पुरुष शैक्षणिकदृष्ट्या आता पूर्वीसारखे मागासलेले राहिलेले नाहीत. सन १९६१ मध्ये ग्रामीण व नागरी भागात अनुसूचित जातींचे साक्षरतेचे सरासरी प्रमाण अनुक्रमे २०.९२ प्रतिशत व ४८.२५ प्रतिशत होते. अनुसूचित जातींपैकी महार या जातीची लोकसंख्या १५,४७७ असून त्यावर्षी ती जिल्ह्यातील सर्वात मोठी जात होती. या जातीतील पुरुषांच्या साक्षरतेचे प्रमाण ग्रामीण व नागरी क्षेत्रात अनुक्रमे ३७.२३ प्रतिशत व ६२.०० प्रतिशत होते तर महिलांचे साक्षरतेचे प्रमाण ८.१४ प्रतिशत व ३१.६३ प्रतिशत होते. **(जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ**, १९६१, नागपूर जिल्हा पृ. १८-१९.) सन १९८१ मध्ये अनुसूचित जातींच्या एकूण १,८२,३९५ लोकसंख्येपैकी (पु. ९४,४९४, म. ८७,९०१) ४६.२८ प्रतिशत लोक साक्षर होते. त्यामध्ये ५३,७५६ पुरुष, ३०,६५६ स्त्रियांचा समावेश होता. तर अनुसूचित जमातींच्या एकूण ३,५३,३०३ लोकसंख्येपैकी (पु. १,८१,८८७, म. १,७१,४१६) ४२.६३ प्रतिशत लोक साक्षर होते. त्यामध्ये ९८,११० पुरुष तर ५२,४९४ स्त्रियांचा समावेश होता. **(डिस्ट्रिक्ट सेन्सस हँडबुक,** १९८१, नागपूर जिल्हा, पृ. २०८, २१०.) सन १९९१ मध्ये अनुसूचित जातींच्या एकूण ६,१९,२२६ लोकसंख्येपैकी ७१.०५ प्रतिशत (पु. ७९.११, म. ६२.४१) लोक साक्षर, तर अनुसूचित जमातींच्या एकूण ४,५७,७१५ लोकसंख्येपैकी ६२.२१ प्रतिशत (पु. ७३.०३, म. ५०.६४) लोक साक्षर होते. **(डिस्ट्रिक्ट सेन्सस हँडबुक,** १९९१, नागपूर जिल्हा, पृ. ४४.)

अनुक्रमणिका

प्रौढ शिक्षण : पहिल्या पंचवार्षिक योजनेत ग्रामशिक्षण मोहिमेअंतर्गत जिल्ह्यात ४८० समाजशिक्षणाच्या वर्गांद्वारे ३०,००० प्रौढ (महिला व पुरुष) शिक्षण घेत होते. दुसऱ्या योजना काळात या कार्यक्रमाची गती कायम ठेऊन सुमारे ६०० वर्ग घेण्यात येऊन ३६,००० प्रौढांना त्याचा लाभ देण्यात आला. राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रमांतर्गत प्रौढ शिक्षण योजना २ ऑक्टोबर १९७८ पासून या जिल्ह्यात कार्यान्वित करण्यात आली. योजनेची साक्षरता, कार्यात्मकता व जाणीव-जागृती ही तीन अंगे असून त्यानुसार १५ ते ३५ वयोगटातील निरक्षर महिला व पुरुषांना या योजनेत सहभागी करून घेण्यात येते. या योजनेव्यतिरिक्त जिल्ह्यात राज्य प्रौढ शिक्षण कार्यक्रमही राबविण्यात येतो. त्यास सुरुवातीपासूनच उत्तम प्रतिसाद मिळत आहे. सन १९८२-८३ मध्ये जिल्ह्यात १२० प्रौढ शिक्षण केंद्रे कार्यरत होती. त्यात पुरुषांपेक्षा (१,६७२) महिलांचा (२,०८१) अधिक सहभाग होता. सन १९८५-८६ मध्ये एकूण २४,६५३ प्रौढांपैकी (पु. ८,९९०, म. १५,६७३) १४,७९२ प्रौढ (पु. ५,३८८, म. ९,४०४) साक्षर झाले. सन १९९०-९१ मध्ये १४९४ केंद्रांमध्ये ४१,७३३ प्रौढांपैकी (पु. १७,३३०, म. २४,४०३) २५,८८५ प्रौढ (पु. १०,३९५, म. १५,४९०) साक्षर झालेले होते. सन २००१-२००२ मध्ये जिल्ह्यातील प्रौढ शिक्षण केंद्रांची तालुकानिहाय प्रौढ शिक्षण केंद्रे व त्यातील प्रौढांची माहिती तक्ता क्रमांक २ मध्ये दिलेली आहे. (पहा तक्ता क्रमांक २ व ३.)

देशातील १५ ते ४५ वयोगटातील निरक्षरतेचे संपूर्ण निर्मूलन करण्यासाठी १९८८ मध्ये स्थापन झालेल्या राष्ट्रीय साक्षरता अभियानाद्वारे हा जिल्हा १९९४-९५ मध्ये १०० टक्के साक्षर करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. दिनांक ३ सप्टेंबर १९९५ व ३० नोव्हेंबर १९९६ रोजी केलेल्या सर्वेक्षणानुसार जिल्ह्यात १,९३,१७४ प्रौढ साक्षर झाले होते. (जिल्हा प्रौढ शिक्षणाधिकारी, नागपूर.) भारतीय प्रबंध संस्था, अहमदाबाद या संस्थेच्या माध्यमाने नोव्हेंबर १९९८ मध्ये संपूर्ण साक्षरता अभियानाचे बाह्य मूल्यमापन केले असता जिल्ह्यात ९५ टक्के साक्षरतेचे उद्दिष्ट साध्य झाले. सन २००१-२००२ मध्ये १,६६,२३९ प्रौढ साक्षर झाले होते. त्यात १,१३,६०७ महिलांचा सहभाग होता. याच वर्षी अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींचे साक्षर झालेल्या प्रौढांची संख्या अनुक्रमे ३१,४६० व ४३,९१० होती. जिल्ह्यातील तालुकानिहाय प्रौढ साक्षरांची आकडेवारी तक्ता क्रमांक ३ मध्ये दिली आहे.

राष्ट्रीय साक्षरता अभियानाद्वारे नवसाक्षर प्रौढांना व्यावसायिक प्रशिक्षण देऊन त्यांना साक्षरोत्तर करण्याचे १३ सप्टेंबर १९९९ पासून आरंभ झाला. साक्षरोत्तर कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता जिल्हा स्तरावर सर्वेक्षण समिती. प्रशिक्षण समिती, देखरेख व संनियंत्रण समिती, अध्ययन-अध्यापन साहित्य निर्मिती समिती व वातावरण निर्मिती समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. साक्षरोत्तर कार्यक्रमामध्ये १,७८,००० नवसाक्षर प्रौढांचे भौतिक लक्ष्य असून १,६०,००० नवसाक्षर प्रौढांची पटनोंदणी अपेक्षित आहे. या नवसाक्षर प्रौढांना गाव स्तरावर ३,५६० लोकशिक्षण केंद्र सुरू करण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी केंद्र शासनातर्फे रुपये १,४९,११,००० मंजूर करण्यात आलेले आहेत.

पूर्व प्राथमिक शिक्षण : जिल्ह्यात पूर्व प्राथमिक शिक्षणाची सुरुवात स्वातंत्र्योत्तर काळात बालक मंदिर, व बालवाड्यांद्वारे झाली. वयाची चार ते पाच वर्षे पूर्ण झालेल्या बालकांसाठी प्राथमिक शाळेतूनच चालविलेल्या बालवाड्यांमधून बालवर्गाची सुरुवात करण्यात आली. या बालवर्गाची निर्मिती हेच पूर्व-प्राथमिक शिक्षणाचे मूळ होय. जिल्ह्यात नागपूरला इ. स. १९३४ मध्ये मुंबईच्या नूतन बालकृष्ण संघाचे सहकार्याने भगिनी मंडळाने बालक मंदिर सुरू केले. त्यात इ. स. १९६० मध्ये ९६ विद्यार्थी होते. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेतील कार्यक्रमानुसार नागपूर जिल्ह्यात ५९ बालक मंदिरे सुरू झाली. सन १९७२-७३ मध्ये जिल्ह्यात ९० बालकमंदिरे होती व त्यात ६,७५५ विद्यार्थी होते. सन १९९०-९१ मध्ये जिल्ह्यात ५२८ पूर्व प्राथमिक शाळा होत्या. त्यापैकी १२६ इंग्रजी, ३७६ मराठी, २३ हिंदी व तीन उर्दू माध्यमांच्या शाळा होत्या. जिल्ह्यातील पूर्व-प्राथमिक (बालक मंदिर) शिक्षणाची आकडेवारी खाली दिली आहे. (शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नागपूर)

वर्ष	शाळा	विद्यार्थी		मागासवर्गीय विद्यार्थी		शिक्षक	
		मुले	मुली	मुले	मुली	प्रशिक्षित	अप्रशिक्षित
१९९०-९१	५२८	१४,३७२	९,९७३	१३,६५३	९,१०२	६९	५०२
१९९५-९६	५७५	१५,६२०	१०,५१४	१४,८४०	९,८९४	७५	५१५
१९९९-२०००	८१३	१९,१५१	१५,३७०	--	--	७०२	--

सन १९७२-७३ ते १९९९-२००० या कालावधीत पूर्व प्राथमिक शाळा व त्यातील विद्यार्थ्यांत लक्षणीय वाढ झाली. मुलांमध्ये शाळेची गोडी लावण्यासाठी शासनाने लहान खेड्यांतून ३ ते ५ वयोगटातील मुलांसाठी १९७८ पासून बालवाड्या सुरू केल्या. त्यात खेळ, गाणी व संस्कारात्मक शिक्षण दिले जाते. प्रत्येक बालवाडीसाठी अंशकालिक बालवाडी सेवकांची रु. ५०० प्रमाणे १० महिने मानधन देऊन नियुक्ती करण्यात येते. प्रत्येक नवीन बालवाडीकरिता खेळणी, तक्ते वगैरे साहित्य खरेदीसाठी रु. ५,००० अनुदान देण्यात येते. तसेच प्रत्येक बालवाडीस साहित्य देखभाल व दुरुस्तीसाठी वार्षिक रु. ५०० देण्यात येतात.

प्राथमिक शिक्षण : ब्रिटिश अमलाच्या प्रारंभानंतर ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रसिध्द चार्टरनुसार १८५४ मध्ये डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन व इन्स्पेक्टर ऑफ स्कूल ही पदे निर्माण करून मध्यप्रांतासाठी शिक्षणावर देखरेख करण्यासाठी खास यंत्रणा उभारण्यात आली. त्यानुसार सर्व शाळांच्या कारभारावर नागपूर मंडळाच्या शिक्षण निरीक्षकांची व दोन उपनिरीक्षकांची देखरेख असे. याशिवाय मुलींच्या व युरोपियन शाळेंसाठी विशेष निरीक्षिका व निरीक्षक होते. इ. स. १८८२ च्या लॉर्ड रिपनच्या सुधारणांनुसार व इंडियन एज्युकेशन कमिशनच्या शिफारसींनुसार प्राथमिक शिक्षण स्थानिक संस्थांकडे सोपविले. तत्पूर्वी १८२६ मध्ये नागपूरला ४५ सार्वजनिक शाळा होत्या. त्यापैकी ४० मराठी म्हणजे मोडीतून, तीन बाळबोधीतून व दोन फारसीतून (त्यापैकी एका शाळेत फारसीच्या माध्यमातून मराठी व हिंदुस्थानी) शिक्षण देण्यात येई. या शाळांमध्ये एकूण ९३६ विद्यार्थी होते. याशिवाय निशुल्क विद्यादान करणाऱ्या काही खाजगी शाळा होत्या व त्यात एकूण ३२३ विद्यार्थी व

५६ शिक्षक होते. त्यात १५९ वेदशास्त्र, १२६ फारसी, ३३ अरबी व ५५ तेलुगु शिकणारे होते. सार्वजनिक व खाजगी शाळेतील शिक्षकास अनुक्रमे सुमारे ३.७५ रुपये व २ रुपये मासिक वेतन मिळत असे. त्यावेळी मुसलमानांकरिता वेगळी शाळा नव्हती. तथापि गोंड व भोसल्यांच्या काळात विद्यार्थी उर्दूचे शिक्षण मौलवींच्या घरी जाऊन प्राप्त करीत असत. इ. स. १८४० मध्ये नागपूरला युरोपियन मुलांसाठी पहिली प्राथमिक शाळा सुरू झाली. परंतु इतर मुलांसाठी कोणतीच सोय नव्हती. पुढे इ. स. १८४२ मध्ये जर्मन मिशनने नागपूरला गोंडाकरिता शाळा सुरू केली. परंतु ती शाळा लवकरच बंद पडली. पुढे रेव्ह. स्टीफन हिस्लॉपने २ मे १८४६ ला नागपूरला शाळा सुरू केली. ख्रिस्तीकरण्याच्या प्रयत्नामुळे रेव्ह. हिस्लॉप यांना स्थानिक जनतेचा बराच विरोध होता. असाच विरोध शाळेला होईल असे त्यांना वाटत होते. परंतु पहिल्या वर्षी ३० विद्यार्थी शाळेत पाठवून स्थानिक जनतेने त्याला चांगला प्रतिसाद दिला. या यशाने प्रोत्साहित होऊन हिस्लॉपने १८४९ मध्ये मुलींसाठी जनाना मिशन स्कूल ही स्वतंत्र शाळा स्थापन केली. या शाळेत काही दिवस राजघराण्यातील मुली शिकत होत्या. इ. स. १८५१ मध्ये त्यात ४८ मुली होत्या. हिस्लॉपने मराठी भाषेतून शिक्षण देण्यास विशेष महत्त्व दिले. तेव्हा मराठी भाषेची पुस्तके उपलब्ध नव्हती. त्यावेळेस श्रीरामपूरच्या रेव्ह. केरीने हिन्दी पुस्तके पुरविली व त्याचे मराठीतून भाषांतर करण्यात आले.

इ. स. १८५८ मध्ये नागपूरला चर्च ऑफ स्कॉटलंडने वित्त सहाय्य दिलेली सेंट उर्सुला प्रायमरी शाळा मिसेस कूपर यांनी सुरू केली. त्यानंतर लवकरच रेव्ह. हिस्लॉपने अशाच प्रकारची शाळा नागपूरला सुरू केली. त्यात पाल्यांना पाठविण्यास पालकांचा विरोध होता. तथापि कालांतराने मुले त्या शाळेत जाऊ लागली. इ. स. १८६१-६२ पर्यंत मिशनऱ्यांच्या शाळा बऱ्याच भरभराटीस आल्या होत्या. हिस्लॉपच्या शाळेत त्यावेळी ४०० मुले व २० मुली होत्या. प्रत्येक जिल्ह्यात व तालुक्याच्या ठिकाणी सरकारी शाळा उघडण्याचे धोरण शासनाने ठरविले असले तरी नागपुरात मिशनऱ्यांच्या शाळांना कोणतीही स्पर्धा उत्पन्न होऊ नये यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आले. १८६२ मध्ये या प्रांतात प्रथमच शिक्षण खाते सुरू करण्यात आले व पहिल्याच अंदाजपत्रकात नागपूर विभागासाठी ५०,००० रुपयांची तरतूद करण्यात आली. इ. स. १८६९ मध्ये नागपूरला दि ग्रँट-इन-एड अँग्लो व्हर्नाक्यूलर स्कूल मुन्शी जमालुद्दीन यांचे घरी सुरू झाली. त्यात १२७ विद्यार्थी होते. या शाळेचे १८७० मध्ये जुने नाव बदलून सिटी स्कूल करण्यात आले. १८९३ मध्ये पुन्हा हे नाव बदलून 'निल सिटी हायस्कूल' करण्यात आले तर आज ही शाळा श्री. दादासाहेब धनवटे नगर विद्यालय या नावाने प्रसिध्द आहे.

सन १९०५ मध्ये जिल्ह्यात १३१ प्राथमिक शाळांमध्ये ८,९६७ विद्यार्थी तर १९०६-०७ मध्ये ९,८३४ विद्यार्थी होते. त्यात मुलांचे प्रमाण ४६.६ प्रतिशत व मुलींचे ०.३६ प्रतिशत होते. या शाळांपैकी बहुतांश शाळांना अल्प अनुदान मिळत असे. ग्रामीण शाळांचा शिक्षण विषयक कारभार डिस्ट्रिक्ट कौन्सिलकडे होता. मात्र सर्व बाबींवर शासकीय विभागीय निरीक्षकाची देखरेख होती. सन १९०८ मध्ये शासनाने प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी नागपूर नगरपालिकेकडे

सोपविली. नागपूर नगरपालिकेने १९११ मध्ये दोन मराठी व एक हिंदी शाळा सुरू केल्यामुळे यावर्षी नगरपालिकेच्या नियंत्रणाखाली सहा शाळा होत्या. स्थानिक लोकांनी १९१५ मध्ये श्रीमती दादीबाई देशमुख हिंदू मुलींची शाळा सुरू केली.

मॉंटेग्यू-चेम्सफोर्ड योजनेनुसार १९२२ पासून नागपूर जिल्ह्यात द्विदल पध्दती सुरू झाली. सन १९२६-२७ पर्यंत नगरपालिकेने मुलींच्या शाळा सुरू केल्या नव्हत्या. तथापि यावर्षी दोन शाळा चालविण्यास घेतल्या होत्या. त्यात १७८ मुली होत्या. त्यानंतर मात्र मुलींसाठी शाळा सुरू केल्या. १ जुलै १९२८ पासून नगरपालिका क्षेत्रात सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू केले. इ. स. १९३६ ते १९३९ या कालावधीत कॉंग्रेस मंत्रिमंडळाने सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा पास केला. तसेच मध्यप्रदेश शासनाचा प्राथमिक शिक्षण अधिनियम १९५० व सुधारित अधिनियम १८५६ नुसार मोफत सक्तीच्या प्राथमिक योजना १००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावांमध्ये ७ ते ८ वयोमान गटातील मुलांना लागू करून नंतर ती क्रमाक्रमाने ७ ते ९, ९ ते १० व ७ ते ११ वयाच्या गटातील सर्व मुलानांही लागू करण्यात आली. त्यामुळे शाळांच्या संख्येत विशेष वाढ झाली.

सन १९५१ मध्ये ३९३ प्राथमिक शाळांमध्ये ४८,९७६ विद्यार्थी व १,१७७ शिक्षक होते. तत्पूर्वी १९५० मध्ये पाच मुलोद्योग शाळा होत्या. त्यापैकी चार वर्धा शिक्षण योजनेनुसार शासकीय शाळा होत्या. सन १९५५-५६ मध्ये २७ प्राथमिक शाळांचे ज्युनिअर मुलोद्योग शाळांमध्ये रुपांतर झाले. याच कालावधीत १९२२ पासून अस्तित्वात असलेली द्विदल पध्दती बंद करून एक शिक्षक एक तुकडी हे तत्त्व स्वीकारण्यात आले. सन १९५९-६० मध्ये जिल्ह्यात ९८२ प्राथमिक शाळा होत्या. त्यापैकी १२९ कन्या शाळा होत्या. त्यात ७,२९३ शिक्षक (५,११२ पुरुष + २,१८१ महिला) होते. त्यापैकी ३,१३९ प्रशिक्षित शिक्षक (२,१२७ पुरुष + १,०१२ महिला) होते. जिल्हा परिषद स्थापन होईपर्यंत जनपद सभा व नगरपालिकांकडे प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था होती. सन १९६२ मध्ये जिल्हा परिषदेच्या स्थापनेपासून प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी मुख्यत्वे जिल्हा परिषद, पंचायत समिती, स्थानिक संस्था व खाजगी संस्था यांच्यावर सोपविण्यात आली. यावर्षी जिल्ह्यातील १,०९५ शाळांपैकी ७६७ (७०%) शाळा जिल्हा परिषदेच्या व ९५ (९%) शाळा खाजगी होत्या. त्यात एकूण ४,२८६ शिक्षक (३,७३७ प्रशिक्षित) होते. यावर्षी जिल्ह्यातील ३६९ गावांमध्ये शाळा नव्हत्या. सन १९७०-७१ मध्ये १,७७८ प्राथमिक शाळांमध्ये २,३८,३२३ विद्यार्थी व ६,६५९ शिक्षक होते. सन १९९०-९१ मध्ये २,१३२ शाळांमधून ४,१९,३५८ विद्यार्थी (२,१७,७४९ मुले + २,०१,६०९ मुली) व १०,४४१ शिक्षक (९,९६९ प्रशिक्षितांपैकी ५,४३२ महिला शिक्षिका) होते, तर १९९८-९९ मध्ये २,४६५ प्राथमिक शाळांमधून ४,५१,२८९ विद्यार्थी (२,३२,४८४ मुले व २,१८,८०५ मुली) व १३,१०७ शिक्षक (१२,८३८ प्रशिक्षित) होते. तक्ता क्रमांक ४ मध्ये १९९८-९९ मधील व्यवस्थापनानुसार शाळांची माहिती दिली आहे.

माध्यमिक शिक्षण : इ. स. १८४६ मध्ये रेव्ह. स्टीफन हिस्लॉप यांनी नागपूरला पहिली इंग्रजी शाळा सुरू केली. या शाळेत १८६१-६२ मध्ये ६०० विद्यार्थी (४०० मुले + २०० मुली) होते. ही शाळा सुमारे ४५ वर्षांपूर्वी बंद झाली. कामठी येथे १८५२ मध्ये सेंट फ्रॉंसिस डी-सेल्स शाळा सुरू करण्यात आली. ही शाळा १८७० मध्ये नागपूरला स्थलांतरील

झाली. या शाळेत १८७२ पर्यंत उर्दू शिकवत असत. त्यानंतर या शाळेत लॅटिन भाषेचे शिक्षण देणे सुरू झाले. ही शाळा कलकत्ता विद्यापीठाशी संलग्न होती. येथे मॅट्रिकनंतरचे दोन वर्षांचे वर्ग भरत असत. इ. स. १८५८ मध्ये मिसेस कूपर यांनी नागपूरला कूपर्स स्कूल सद्याची सेंट उर्सुला गर्ल्स हायस्कूल सुरू केली. इ. स. १८६२ मध्ये रेव्ह. जॉर्ज कॉटन यांनी बिशप कॉटन स्कूलची नागपूर येथे स्थापना केली. सुरुवातीला या शाळेत केवळ युरोपियन विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात असे. या शाळेत ज्युनिअर व सिनियर कॅम्ब्रिजसाठी विद्यार्थी बसवत असत. इ. स. १८६९ मध्ये नागपूरला दि ग्रँट-इन-एड अँग्लो व्हर्नाक्यूलर स्कूल सुरू झाली. या शाळेला इ. स. १८७० मध्ये सिटी स्कूल हे नाव देण्यात आले. ब्रिटिश कमिशनर नील यांनी या शाळेला इमारत मिळवून दिल्यामुळे १८९३ मध्ये तिला नील सिटी हायस्कूल नाव देण्यात आले. आज ही शाळा श्री. दादासाहेब धनवटे नगर विद्यालय या नावाने प्रसिध्द आहे. इ. स. १८७५ मध्ये फ्रेंच मिशनरींनी नागपूरला कॉन्व्हेंट डे-स्कूल (सेंट जोसेफ कॉन्व्हेंट) सुरू केली. या शाळेतून सेंट जॉन हायस्कूल ही नवी शाळा सुरू झाली. भिडे गर्ल्स एज्युकेशन सोसायटीने इ. स. १८७८ मध्ये नागपूरला भिडे गर्ल्स हायस्कूल सुरू केले. या शाळेला इ. स. १९२३ पर्यंत शासकीय मान्यता न मिळाल्यामुळे ही शाळा सुरू ठेवण्यासाठी पालकांनी दरमहा दहा रुपये फी देऊन आर्थिक सहाय्य केले.

इ. स. १८८१ मध्ये इंग्रज सरकारने शासनाची मान्यता घेऊनच शाळा सुरू कराव्यात व अशा शाळांनी मागणी केल्यास त्यांना शासकीय अनुदान देण्याचे नवीन धोरण जाहीर केले. त्यानुसार नागपूर मधील तीन शाळांना मान्यता व अनुदान मिळाले. इ. स. १८८५ मध्ये नागपूरला श्रीधरपंत पारखी व नीलकंठराव उधोजी यांच्या प्रयत्नांनी सरकारी अनुदानाशिवाय नेटिव्ह जनरल इन्स्टिट्यूटची स्थापना झाली. राष्ट्रीय वृत्तीचे शिक्षण देणारी सर्वसामान्य जनतेसाठी खुली असलेली ही शाळा इ. स. १८९१ मध्ये नागपूर इंग्लिश स्कूल व १९१५ पासून न्यू इंग्लिश हायस्कूल म्हणून ओळखली जाऊ लागली. इ. स. १८८७ पासून इतर माध्यमातून शिक्षण देणाऱ्या विविध शाळांची नागपूरच्या शैक्षणिक क्षेत्रात भर पडत गेली. याच वर्षी नागपूरला दि एम्प्रेस मिल जोरोस्ट्रियन चिल्ड्रेन्स स्कूल (टाटा पारसी गर्ल्स हायस्कूल), इ. स. १८८८ मध्ये अंजुमन हामी ए-इस्लाम ही शैक्षणिक संस्था, इ. स. १८९४ मध्ये दि तमिल मिक्सड स्कूल (सरस्वती विद्यालय) या शाळा सुरू झाल्या.

इ. स. १९०२ मध्ये रावबहादूर रामचंद्रराव पटवर्धन यांनी पटवर्धन माध्यमिक शाळा सुरू केली. ही शाळा १९१८ मध्ये शासनाला हस्तांतरित झाल्यामुळे शासकीय पटवर्धन माध्यमिक शाळा हे नाव देण्यात आले. इ. स. १९०८ च्या नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर नुसार जिल्ह्यात ४ मिडल स्कूल व ३ अनुदानित हायस्कूल होते. या हायस्कूलमध्ये ४१२ विद्यार्थी होते. नागपूर जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाबरोबरच अन्य प्रदेशातून बहुभाषिक लोकांचे नागपुरात आगमन झाले. त्यातूनच त्या त्या भाषिकांनी आपल्या मुलामुलींसाठी नागपूरमध्ये शाळा सुरू केल्या. गुजराथी मुलांसाठी इतवारी गुजराथी शाळा (१९०५), तामिळ आणि हिंदी भाषिकांसाठी प्रॉव्हिडन्स गर्ल्स स्कूल (१९०६), बंगाली भाषिकांची दीनानाथ हायस्कूल (१९१८), हिंदी भाषिकांसाठी मथुरादास राठी हायस्कूल (१९२५) या शाळा सुरू झाल्या. तत्पूर्वी मागासवर्गीयांची पहिली शाळा एस. सी. एस. गर्ल्स स्कूल १९२२ मध्ये नागपूरला सुरू झाली. इ. स. १९२५ ते १९४५ या कालावधीत नागपूरमध्ये सेवासदन मुलींची शाळा, धरमपेठ स्कूल, सी. पी. ॲण्ड बेरार हायस्कूल, दीनानाथ हायस्कूल, सुळे हायस्कूल, सेंट

ॲन्थोनी हायस्कूल, पाध्ये मॉडेल हायस्कूल, कुर्वेज न्यू मॉडेल स्कूल, नवयुग विद्यालय, सोमलवार हायस्कूल, हडस हायस्कूल, धौसे स्कूल, लक्ष्मीदेवी धीरन कन्या शाळा, नुतन भारत शाळा, मडिया हायस्कूल व बच्छराज व्यास विद्यालय सुरू झाले होते. १९४७ मध्ये भारत पाक फाळणीमुळे सिंध प्रांतातून आलेल्या लोकांनी १९४८ मध्ये नागपूरला सिंधी एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून सिंधी हिंदी हायस्कूल, गर्ल्स हायस्कूल, ओंकारलाल सिंधू विद्यालय व महात्मा गांधी सेंटेनियल हायस्कूलची स्थापना केली. तर पंजाबी लोकांनी गुरु नानक हायस्कूल सुरू केले.

जिल्ह्यातील माध्यमिक शाळांची १९५१ पासून दशवार्षिक अंतराने आकडेवारी खाली दिली आहे.

वर्ष	शाळा	विद्यार्थी	शिक्षक
१९५१	६३	२४,५४२	१,०५२
१९६१	१५१	६,४१,२२	२,६३७
१९७१	२८९	१,२८,०८४	७,०००
१९८०-८१	३०३	२,०५,०००	७,०००
१९९०-९१	४३४	२,०५,६५०	६,७७३
१९९९-२०००	६९५	३,८८,५३४	१२,१६१

तक्ता क्रमांक ५ मध्ये १९९९-२००० ची माध्यमिक शाळांची व्यवस्थापनानुसार आकडेवारी दिली आहे.

नवी दिल्लीच्या नवोदय विद्यालय समितीने १९८५-८६ मध्ये सुरू केलेल्या नवोदय विद्यालय केंद्र योजनेद्वारा नागपूर जिल्ह्यात १९९८-९९ मध्ये पाच विद्यालये होती. त्यात ३,०५८ विद्यार्थी (१,१८२ मुली) व १६७ शिक्षक होते.

कनिष्ठ महाविद्यालये : सन १९७२ पर्यंत १ ते ५ पर्यंत प्राथमिक शाळा, ५ वी ते ७ वी पर्यंत मिडल स्कूल व ८ वी ते १० वी माध्यमिक शाळा आणि ८ वी ते ११ वी पर्यंत उच्च माध्यमिक शाळा असा शैक्षणिक आकृतिबंध होता. इयत्ता १० वी किंवा ११ वी नंतर शालांत परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर महाविद्यालयात प्रवेश मिळत असे. यावेळी अर्थातच महाविद्यालयीन पदवी परीक्षा अभ्यासक्रम तीन ते चार वर्षांचा होता. तथापि ही स्थिती फक्त विदर्भ विभागातच होती. पश्चिम महाराष्ट्र व कोकण विभागात वेगळा शैक्षणिक आकृतिबंध होता. म्हणून या विविध विभागातील आकृतिबंधांचा व नवीन शैक्षणिक गरजांचा विचार करून राष्ट्रीय धोरणानुसार शासनाने १९७२ पासून १०+२+३ हा संपूर्ण राज्यासाठी एकच समान शैक्षणिक आकृतिबंध स्वीकारला. त्यानुसार या वर्षापासून ८ व्या इयत्तेमध्ये माध्यमिक शिक्षणाचा नवीन आकृतिबंध कार्यान्वित करण्यात आला व तीन भाषा, गणित, विज्ञान व सामाजिक अभ्यास हे विषय सक्तीचे करण्यात आले. त्यानुसार १९७५-७६ च्या शैक्षणिक वर्षापासून सुधारित शैक्षणिक आकृतिबंधानुरूप दहावी शालांत परीक्षा घेण्यास प्रारंभ

झाला. त्यानंतर +२ स्तरावरील ११ वी व १२ वी चा उच्च माध्यमिक अभ्यासक्रम कार्यान्वित झाला. त्यासाठी ११ वी व १२ वीचे वर्ग आवश्यकतेनुसार सक्षम उच्च माध्यमिक शाळा व महाविद्यालयांना जोडण्यात आले. या दोन वर्षाच्या अभ्यासक्रमात विविध प्रकारच्या महाविद्यालयीन अभ्यासक्रमाची ओळख करून देण्याबरोबरच अभियांत्रिकी व वैद्यकीय वगैरे सारख्या व्यावसायिक शिक्षणासाठी लागणारी पूर्व पीठिकाही तयार करण्यात येते. जिल्ह्यात १९९५-९६ मध्ये १८३ संस्थांमध्ये (१४५ शाळा + ३८ कनिष्ठ महाविद्यालये) ७७० तुकड्या होत्या व त्यात ५७,६६२ विद्यार्थी होते. त्यापैकी २६,५९४ मुली होत्या. या व्यतिरिक्त १,५७७ शिक्षकांमध्ये ५५० शिक्षिका होत्या. **(शिक्षणावर दृष्टिक्षेप**, १९९५-९६, पृ. १३२-३३.) सन १९९९-२००० मध्ये १७५ शाळांची व ३७ महाविद्यालयांशी कनिष्ठ महाविद्यालये संलग्न होती. त्यापैकी १८० अनुदानित व ३२ विनाअनुदानित होते. या कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये एकूण ९९९ तुकड्या (११ व १२ वीच्या) व ८२,०२१ विद्यार्थी होते. (शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, नागपूर यांच्या माहिती आधारे.)

उच्च शिक्षण : रेव्हरंड डेविड व्हीटनने १८८२ मध्ये फ्री चर्च मिशनमार्फत मध्यप्रांत प्रादेशिक समितीच्या रेव्हरंड डब्ल्यू आब्लॅकेट आणि ब्राऊनिंग समोर फर्स्ट आर्टस् (एफ. ए.) आणि पुढे बी. ए. चे वर्ग सुरू करण्याचा निर्धार व्यक्त केला. त्यानुसार फ्री स्कॉटिश चर्चचे रेव्हरंड स्टीफन हिस्लॉप यांनी १८८३ मध्ये नागपूरला हिस्लॉप महाविद्यालय सुरू केले. या महाविद्यालयास युनायटेड फ्री चर्च, स्काटलंडने आर्थिक सहाय्य केले तर शासनाने अनुदान दिले होते. (हिस्लॉप महाविद्यालय यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीवरून.) या महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य रेव्हरंड जे. जी. कूपर (१८८३-१८९०) होते. सुरुवातीपासून कला आणि विज्ञान विषय एकत्र होते आणि दोन वर्षाच्या इंटरमिजिएट (एफ. ए.) अभ्यासक्रमासाठी सहा आणि पुढच्या दोन वर्षांच्या बी. ए. अभ्यासक्रमासाठी दोन रुपये फी घेऊन शिकविले जात असे. या महाविद्यालयात १८८३ मध्ये नऊ तर १८८४ मध्ये २१ विद्यार्थी होते. हे महाविद्यालय १८८५ मध्ये कलकत्ता विद्यापीठाशी संलग्न झाले. इ. स. १८८८ मध्ये बी. ए. ची पदवी घेऊन पहिली तुकडी बाहेर पडली. लॉर्ड कर्झनने नेमलेल्या विद्यापीठ आयोगामुळे १९०५ मध्ये हिस्लॉप महाविद्यालय अलाहाबाद विद्यापीठाशी संलग्न झाले आणि शाळा व महाविद्यालय हे वेगळे करण्यात आले. मासिक फी १० रुपये झाली. असहकार चळवळीनंतर मार्च १९२१ मध्ये या महाविद्यालयात १९९ तर जुलै १९२१ मध्ये ११९ विद्यार्थी होते. हे महाविद्यालय १९२३ मध्ये नागपूर विद्यापीठाशी संलग्न झाले.

इ. स. १८८५ मध्ये नागपूरला मॉरिस कॉलेज (वसंतराव नाईक कला व समाज विज्ञान संस्था) स्थापन झाले. हे कॉलेज स्थापन करण्यास कर्नल प्लेफ़ेअर, कार्यवाह आयुक्त, जबलपूर आणि ब्राऊनिंग, इन्स्पेक्टर जनरल ऑफ एज्युकेशन त्याचप्रमाणे हिस्लॉप महाविद्यालयाचे प्राचार्य रेव्हरंड जे. जी. कूपर यांनी विरोध केला होता. परंतु कार्यवाह प्रमुख आयुक्त नील यांच्यामुळे तो यशस्वी झाला नाही. हे महाविद्यालय स्थापन करण्यासाठी नागपूर व छत्तीसगड डिव्हिजन मधील लोकांनी १,५५,२८९

रुपये निधी गोळा केला. या निधीचा उपयोग मॉरिस कॉलेजच्या उभारणीसाठी करण्याचा ठरला. देणगीची एकूण रक्कम १,७०,४५० रुपये पर्यंत पोहोचली. या कॉलेजसाठी शासन व स्थानिक स्वराज्य संस्थांनी अनुदान दिले. हे कॉलेज सुरुवातीला कलकत्ता विद्यापीठाशी संलग्न होते. या विद्यापीठाने मॉरिस कॉलेजला एम. ए. पर्यंतचे वर्ग शिकविण्याची परवानगी दिली होती. त्यावेळेस या महाविद्यालयात कला व विज्ञान स्वतंत्र अभ्यासक्रम नव्हते. विद्यार्थ्यांना इतिहास व अर्थशास्त्राबरोबर पदार्थ विज्ञान शास्त्र व त्रिकोणमिती हे विषय शिकविले जात होते. इ. स. १८८६ मध्ये या महाविद्यालयात विधी शाखा सुरू झाली. इ. स. १९०५ मध्ये मॉरिस कॉलेज अलाहाबाद विद्यापीठाशी संलग्न झाले. १ जुलै १९१५ पासून ते सरकारी कॉलेज झाले. १९१७ मध्ये कॉलेजच्या वसतिगृहात ९४ विद्यार्थ्यांच्या राहण्याची व्यवस्था होती. कॉलेजमध्ये ३०० विद्यार्थी होते. प्लेगच्या साथीमध्ये कॉलेज ४-१२-१९१९ ते २-१-१९२० पर्यंत बंद होते. यावेळी अगोदर मॉरिस कॉलेजमध्ये विधी व एम. ए. वर्ग वगळता एकूण ३४५ विद्यार्थी होते. परंतु ही संख्या जुलै १९२१ मध्ये २७० इ ाली. इ. स. १९२३ मध्ये नागपूर विद्यापीठाची स्थापना झाल्यावर हे कॉलेज विद्यापीठाशी संलग्न झाले.

सन १९०६ मध्ये नागपूरला व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिट्यूट (इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स) व नागपूर कृषि महाविद्यालय, १९३० मध्ये बिंझाणी नगर महाविद्यालय, १९३२ मध्ये लेडी अमृताबाई डागा महिला कॉलेज फॉर वुमेन ऑफ आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स, १९३५ मध्ये धनवटे नॅशनल कॉलेज, १९४५ मध्ये बॅरिस्टर एस. के. वानखेडे विद्यापीठ शिक्षण महाविद्यालय व गोविंदराम सेकसरिया अर्थ व वाणिज्य महाविद्यालय सुरू झाले. या महाविद्यालयामुळे पुणे, मुंबई व कलकत्ता येथे उच्च शिक्षणासाठी जाव्या लागणाऱ्या विद्यार्थ्यांना आपल्या जिल्ह्यात सुविधा उपलब्ध झाल्या. स्वातंत्र्योत्तर काळात महाविद्यालये स्थापन करण्यास उत्तेजन मिळाले. त्यामुळे १९६१ मध्ये जिल्ह्यात २१ महाविद्यालये होती व त्यात १२,८३३ विद्यार्थी होते. सन १९७०-७१ मध्ये २२ महाविद्यालयांत २१,००० विद्यार्थी व २,००० शिक्षक होते. सन १९९२-९३ मध्ये जिल्ह्यात ७५ महाविद्यालयांपैकी ५३ महाविद्यालयांमध्ये ३४,६५० विद्यार्थी (१६,८४१ मुली) व १,२७४ शिक्षक (४०९ महिला) होते. सन १९९८-९९ मध्ये जिल्ह्यातील १४१ महाविद्यालयांमध्ये ७२,००० विद्यार्थी व ३,४८० शिक्षक होते. तक्ता क्रमांक ६ मध्ये जिल्ह्यातील १९९९-२००० या वर्षातील कला, वाणिज्य, विज्ञान, विधि, ग्रंथालयशास्त्र व समाजकार्य या महाविद्यालयांची माहिती दिली आहे.

याशिवाय केंद्र शासनाने नागपूरला नॅशनल डिफेन्स कॉलेज (स्थापना १९५७), केंद्रिय श्रमिक शिक्षा बोर्ड (स्थापना १९५८) व नॅशनल थर्मल आणि पावर इन्स्टिट्यूट (स्थापना १९८०) स्थापन केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधि महाविद्यालय (स्थापना १९२५) **:** आज या नावाने ओळखले जाणारे हे मुळ विधी महाविद्यालय कलकत्ता विद्यापीठाने मॉरीस कॉलेजला १५ मे १८८६ रोजी सुरू करण्याची परवानगी दिली. प्राचार्य डॉ. स्टॅनले शॉ (ज्युरिसपुडन्स), जे. फ्रेझर (कॉन्ट्रक्ट) आणि बी. के. बोस (हिंदू लॉ) यांनी शिकविण्याची जबाबदारी स्वीकारली. सुरुवातीस मॉरिस कॉलेज खाजगी व्यवस्थापनांतर्गत येत असले तरी विधी

शाखा शासकीय होती. त्यातील प्राध्यापकांची नियुक्ती शासन करीत असे. या शाखेचे विद्यार्थी १९०६ पर्यंत कलकत्ता विद्यापीठाच्या बी. एल. परीक्षेला आणि १९२३ पर्यंत अलाहाबाद विद्यापीठाच्या एल. एल. बी. परीक्षेला बसत. सन १९१७ ते १९२२ या कालावधीत २३७ विद्यार्थी परीक्षा उत्तीर्ण झाले होते. विधी शाखा नागपूर विद्यापीठाचे घटक कॉलेज व्हावे अशी कुलगुरू सर बिपीन कृष्ण बोस यांची इच्छा होती. त्यानुसार १९२५ मध्ये विद्यापीठाच्या विधी महाविद्यालयाची स्थापना झाली. या महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य सर व्हिव्हियन बोस (सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश) होते. १९४० मध्ये महाविद्यालयाची स्वतंत्र इमारत तयार झाली. १९७९ साली या महाविद्यालयाची एक शाखा महाल भागात सुरू करण्यात आली. तत्पूर्वी १९६७ मध्ये तीन वर्षीय अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. १९८४ पासून पाच वर्षीय अभ्यासक्रम महाविद्यालयात सुरू करण्यात आला. सन १९९९-२००० मध्ये तीन वर्षीय अभ्यासक्रमात १,४०९ विद्यार्थी व पाच वर्षीय अभ्यासक्रमात ७२० विद्यार्थी होते. महाविद्यालय सुरू झाल्यापासून आजतागायत हजारो विद्यार्थ्यांनी कायद्याचे शिक्षण घेतले आहे. या महाविद्यालयात न्या. हिदायतुल्ला, न्या. एस. पी. कोतवाल, न्या. वाय. एस. तांबे यांनी अध्यापनाचे कार्य केले आहे.

विज्ञान संस्था (इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स-स्थापना १९०६) : सन १९०६ मध्ये व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिट्यूट (इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स) ही संस्था नागपूरला सुरू झाली. १९०७ मध्ये कला व विज्ञान अभ्यासक्रम वेगळे झाल्यावर आणि ही संस्था अलाहाबाद विद्यापीठाशी संलग्न झाल्यावर या संस्थेचे व्हिक्टोरिया कॉलेज ऑफ सायन्स असे नामकरण झाले. हिस्लॉप व मॉरिस कॉलेजचे विद्यार्थी पदार्थ विज्ञान आणि रसायन शास्त्र शिकण्यासाठी या कॉलेजमध्ये येत होते. त्याची प्रात्यक्षिक परीक्षा म्युअर सेंट्रल कॉलेज अलाहाबाद येथे होत असे. या कॉलेजचे संस्थापक प्राचार्य आर. एस. बेकेट हे रसायनशास्त्र तर एम. एल. डे पदार्थ विज्ञान शिकवित. १९१७ ते १९२२ या कालावधीत या कॉलेजमधून ५८ बी. एससी. व १५ एम.एससी. विद्यार्थी उत्तीर्ण झाले. या महाविद्यालयाचा इमारतीचा शिलान्यास २४ जुलै १९२६ रोजी गव्हर्नर जनरल सर इर्विन यांनी केला असून १९२९ मध्ये इमारतीचे उद्घाटन सी. पी अॅण्ड बेरारचे गव्हर्नर सर मॉटेग्यू बटलर यांनी केले. या वर्षीपासून या महाविद्यालयाचे विज्ञान महाविद्यालय असे नामकरण झाले. या महाविद्यालयात ३०० विद्यार्थी होते. अल्पावधीत सी. पी. अॅण्ड बेरार प्रांतात हे एक नामांकित महाविद्यालय गणले जाऊ लागले. सन १९५४ मध्ये या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची संख्या १,१०० झाली. सन १९६६ पासून हे महाविद्यालय इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स या नावाने संबोधले जाऊ लागले. १९९२-९३ मध्ये त्यात १,०६५ विद्यार्थी (६२५ विद्यार्थीनी) व ९८ प्राध्यापक होते. सन १९९८-९९ मध्ये या महाविद्यालयात ९४० विद्यार्थी (६५५ विद्यार्थीनी) व ८५ प्राध्यापक होते. सन १९९९-२००० मध्ये महाविद्यालयाची दोन वसतिगृहे (एक मुलींचे) होती व त्यात १०४ विद्यार्थी होते. महाविद्यालयातील ग्रंथालयात ४६,२६१ ग्रंथ असून अद्ययावत प्रयोगशाळा आहे. या महाविद्यालयातील अनेक माजी विद्यार्थी विविध उच्च पदांवर विराजमान असून काहींनी मौलिक संशोधन केले आहे.

हिस्लॉप कॉलेज, नागपूर (स्थापना १८८३) : युनायटेड फ्री चर्च मिशनने १८८३ मध्ये नागपूरला हिस्लॉप कॉलेजची स्थापना केली. या कॉलेजचे संस्थापक-प्राचार्य रेव्हरंड जे.

जी. कूपर (१८८३-९०) होते. कूपरनंतर तर्कशास्त्राचे प्राध्यापक रेव्हरंड डेविड व्हीटन (१८९०-१९०६), डॉ. ए. रॉबर्टसन (१९०६-१९१८), इंग्रजी व अर्थशास्त्राचे प्राध्यापक डॉ. मॅकफॅडेन (१९१८-१९२०) आणि रेव्हरंड टी. डब्ल्यू. गार्डिनर (१९२०-१९४१) यांनी प्राचार्यपद सांभाळले होते. हे कॉलेज १८८५ मध्ये कलकत्ता विद्यापीठाशी संलग्न झाले. सुरुवातीपासून कला व विज्ञान विषय एकत्र होते आणि दोन वर्षांच्या इंटरमिजियट (एफ. ए.) अभ्यासक्रमासाठी सहा आणि पुढच्या दोन वर्षांच्या बी. ए. अभ्यासक्रमासाठी ऐच्छिक सोबत पाच विषय मासिक २ रुपये फी घेऊन शिकवले जात. रेव्हरंड कूपरने १८६३ मध्ये महाल भागात बांधलेली फ्री चर्च शाळा आणि हिस्लॉप कॉलेज एकत्रच ठेवले. लॉर्ड कझ र्ानने नेमलेल्या विद्यापीठ आयोगामुळे १९०५ मध्ये हिस्लॉप कॉलेज अलाहाबाद विद्यापीठाशी संलग्न झाले आणि महाल भागातील इमारतीत शाळा आणि महाविद्यालय हे वेगळे करण्यात आले. शासकीय अनुदानाव्यतिरिक्त कॉलेजसाठी अमेरिकन डिसायपल्स मिशन आणि इतर ख्रिस्ती मिशन्सकडून आर्थिक सहाय्य मिळत असे. असहकार चळवळीपूर्वी हिस्लॉप कॉलेजमध्ये २९५ विद्यार्थी होते. परंतु चळवळीनंतर ही संख्या मार्च १९२१ मध्ये १९९ तर जुलै १९२१ मध्ये ११९ एवढी झाली. हे कॉलेज १९२३ मध्ये नागपूर विद्यापीठाशी संलग्न झाले व अल्पावधीत नागपूर विद्यापीठात हे एक नामांकित कॉलेज गणले जाऊ लागले. महाविद्यालयाची भव्य इमारत १९६० मध्ये बांधून झाल्यावर त्या इमारतीत कॉलेज स्थलांतरित झाले. सन १९९२-९३ मध्ये ३,५०० विद्यार्थी (१२०० विद्यार्थीनी) या महाविद्यालयातून शिक्षणाचा लाभ घेत होते. १९९९-२००० मध्ये त्यांची संख्या ३,९६४ झाली. या कॉलेजमध्ये १२१ शिक्षक व ९३ शिक्षकेतर कर्मचारी होते. ग्रंथालयातील ग्रंथांची संख्या ५८,४९३ होती. या कॉलेजमध्ये वाङ्मय व समाजविज्ञान, वाणिज्य आणि विज्ञान हे अभ्यासक्रम सुरू आहेत. या कॉलेजद्वारे चर्चासत्रे, परिसंवाद, वक्तृत्व स्पर्धा, व्याख्याने, क्रीडा इत्यादी कार्यक्रम आयोजित केले जातात.

कॅप्टन सी. के. नायडू, न्यायमूर्ति एम. बी. नियोगी, न्यायमूर्ति चांदूरकर, न्यायमूर्ति जसनारायण पटेल, डॉ. पुरुषोत्तम भांडारकर, शांताराम पोटदूखे, तेजसिंहराव भोसले, सरोज खापर्डे, मुकूल वासनिक, विलास मुतेमवार, सतीश चतुर्वेदी, अनिस अहमद, नितीन राऊत, प्रकाश गजभिये, अभिजीत वंजारी, रेव्ह. विनोद पिटर, व्हिक्टर प्रेरस, शिरिश दुपल्लीवार, राजकुमार तिरपुडे, डॉ. आशिष भेलवा हे या महाविद्यालयाचे विद्यार्थी होत. या व्यतिरिक्त अनेक माजी विद्यार्थी विविध उच्च पदांवर कार्यरत आहेत.

वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था, नागपूर (मॉरिस कॉलेज) (स्थापना १८८५) **:** नील सिटी हायस्कूल नियामक मंडळाने मध्यप्रांताचे निवृत्त मुख्य आयुक्त सर जॉन मॉरिस यांचे नावाने मॉरिस मेमोरिअल फंड स्थापन केला. त्यासाठी नागपूरच्या शिक्षणप्रेमी लोकांनी वर्गणी गोळा करून व राव बहादूर मुकुंद बाळकृष्ण बुटी, रा. सा. माधवराव गंगाधरराव चिटणीस, शेठ कस्तूरचंद अबीरचंद, रंभाजीराव महाडिक, सर बिपिन कृष्ण बोस यांच्या देणगीतून तसेच छत्तीसगड डिव्हिजनमधील लोकांनी केलेल्या आर्थिक मदतीतून १८८५ मध्ये नागपूरला मॉरिस कॉलेज स्थापन झाले. प्रारंभी हे कॉलेज तुळशीबागेत भरत असे. नंतर ते सिटीस्कूलमध्ये आणण्यात आले. सुरुवातीला हे कॉलेज कलकत्ता विद्यापीठाशी संलग्न होते. परंतु १९०४ च्या विद्यापीठ कायद्यानुसार १९०५ मध्ये

मॉरिस कॉलेज अलाहाबाद विद्यापीठाला जोडण्यात आले. जुलै १९११ मध्ये हे कॉलेज रेसिडेन्सीच्या ऐतिहासिक वास्तूत हलविण्यात आले. तथापि १९१५ मध्ये ते इंग्रजांच्या जुन्या इमारतीत स्थलांतरीत झाले. २८ फेब्रुवारी १९१६ ला हे कॉलेज शासनाच्या अधिपत्याखाली आले व १९२३ मध्ये ते नागपूर विद्यापीठाशी संलग्न झाले.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर १९४७ मध्ये मॉरिस कॉलेजचे नाव वसंतराव नाईक शासकीय महाविद्यालय करण्यात आले. या महाविद्यालयाला संशोधन संस्थेचा दर्जा देण्यासाठी १९८५ मध्ये कला व समाज विज्ञान संस्था हे नाव देण्यात आले व प्राचार्याऐवजी संचालक पद निर्माण केले गेले. या महाविद्यालयात कला व समाज विज्ञान शाखेतील अभ्यासक्रम शिकविला जातो. सन १९९२-९३ मध्ये महाविद्यालयात २,१४५ विद्यार्थी (१,१०६ विद्यार्थीनी) व ९२ शिक्षक होते. सन १९९९-२००० मध्ये १,७६७ विद्यार्थी (९२३ विद्यार्थीनी) व ७० शिक्षक व ६४ शिक्षकेतर कर्मचारी होते. महाविद्यालयाची दोन वसतिगृहे (त्यापैकी एक मुलींचे) असून त्यात ७५ विद्यार्थी आहेत. महाविद्यालयाचे ग्रंथालयात ६५,१९५ पुस्तके आहेत.

महामहोपाध्याय ताम्हण, महान तत्वज्ञ डॉ. बजेंद्र प्रसाद सील, प्रा. एस. सी. रॉय, प्रा. एस. पी. बॅनर्जी, डॉ. जोन्स, ओवेन, चेशायर व त्यानंतर डॉ. मिराशी, डॉ. सिन्हा, डॉ. वि. भि. कोलते अशा ज्ञानवंत व्यक्ती प्राचार्य व प्राध्यापकपदी लाभल्यामुळे संस्थेची सतत भरभराट झाली.

या महाविद्यालयातील अनेक माजी विद्यार्थी विविध उच्च पदांवर विराजमान असून अनेक नामवंत विद्यार्थ्यांनी आपल्या जीवन कार्याचा अलौकीक ठसा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात कायम ठेवला आहे. त्यात संस्थेने देशाला लोकनायक बापुजी अणे, आचार्य दादा धर्माधिकारी, मा. ज. कानेटकर, बॅरिस्टर शेषराव वानखेडे, वसंतराव नाईक, ए. बी. वर्धन, नरेंद्र तिडके, नासिकराव तिरपुडे, सुधाकरराव नाईक, महादेवराव शिवणकर यासारखे राजकीय नेते दिले. सर्वोच्च न्यायालयाचे भूतपूर्व सरन्यायाधीश न्या. हिदायतुल्ला याच महाविद्यालयाचे विद्यार्थी, नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. टी. जे. केदार, डब्ल्यू. आर. पुराणिक, एम. बी. नियोगी, के. टी. मंगळमूर्ती, जी. बी. बडकस, डॉ. वि. भि. कोलते, डॉ. वी. वाय. गोहोकार, जाल. पी. मिमी हे मॉरिस कॉलेजचे विद्यार्थी होते.

श्री. बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर (स्थापना १९३०) **:** नागपूर शिक्षण मंडळाचे 'नागपूर कॉलेज' नागपूरला १७ जुलै १९३० ला सुरू झाले. जुलै १९३१ पासून या कॉलेजचे वर्ग नील सिटी हायस्कूलच्या इमारतीत भरत होते. अर्थात पहिले दोन वर्षे कॉलेजचे वर्ग सकाळी तर कधी कधी रात्री भरत. हे कॉलेज नील सिटी हायस्कूलच्या इमारतीत भरत असल्यामुळे १९३२ पासून हे कॉलेज सिटी कॉलेज म्हणून संबोधले जाऊ लागले. यावर्षी या कॉलेजमध्ये १२० विद्यार्थी होते. याच वर्षी नागपूर विद्यापीठाने या कॉलेजला मान्यता दिली. तथापि १९३७ पर्यंत या कॉलेजला शासनाकडून अनुदान मिळत नव्हते. या कालावधीत विद्यार्थ्यांच्या फीमधून सर्व खर्च भागविण्यात येत होता. १९४२ च्या 'चलेजाव' आंदोलनात या कॉलेजच्या अनेक विद्यार्थ्यांनी भाग घेतला. या चळवळीत भाग

घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सभा घेणे, चर्चा करणे यासारख्या गोष्टींसाठी या महाविद्यालयाकडून निर्भयपणे आधार व आश्रय दिला जात असे. त्यामुळे या महाविद्यालयाचे १९४२ मध्ये सरकारी अनुदान बंद झाले. **(नागपूर शिक्षण मंडळ,** सुवर्ण महोत्सव स्मरणिका, १९८५.) परंतु या कॉलेजला आईदानजी बिंझाणी यांनी १९४२ मध्ये रु. ५१,१०१ ची देणगी दिल्यामुळे या महाविद्यालयाची आर्थिक स्थिती दुरूस्त झाली व तेव्हापासून या कॉलेजचे नाव श्री. बिंझ ाणी नगर महाविद्यालय करण्यात आले. या महाविद्यालयाने १९४७ पासून नोकरी करून शिक्षण घेण्याची सोय उपलब्ध करून दिली. सन १९७२-७३ मध्ये या महाविद्यालयात १,००० विद्यार्थी व ३२ शिक्षक होते. सन २००१-२००२ मध्ये त्यात १५३१ विद्यार्थी होते. या महाविद्यालयातील ग्रंथालयात २९,५७९ ग्रंथ आहेत.

या महाविद्यालयातील अनेक माजी विद्यार्थी विविध उच्च पदांवर विराजमान असून अनेक विद्यार्थ्यांनी राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात ठसा उमटविला आहे. पी. व्ही. नरसिंहराव, डॉ. व्ही. एम. दांडेकर, बी. एस. परांजपे, डॉ. शामाचरण दुबे, डॉ. बी. एन. मुखर्जी, डॉ. जी. एम. कुलकर्णी, ए. बी. वर्धन, न्या चंद्रशेखर धर्माधिकारी, न्यायमूर्ति बी. ए. मासोदकर, डॉ. मधुकर आष्टीकर, डॉ. श्रीनिवास खांदेवाले, डॉ. एस. ए. देशपांडे हे याच महाविद्यालयाचे विद्यार्थी होत.

लेडी अमृताबाई डागा आणि श्रीमती रत्नीदेवी पुरोहित महिला महाविद्यालय, नागपूर (स्थापना १९३२) **:** मध्य भारतातील मुलींच्या शिक्षणात अग्रेसर असलेली ही शैक्षणिक संस्था मागील ७० वर्षांपासून मुलींचा शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील विकासाचे प्रमुख उद्दिष्ट ठेवून कार्यरत आहे. १९३२ मध्ये फक्त सात विद्यार्थिनी असलेले हे महाविद्यालय नागपूरला (पूर्वीचे सेंट्रल कॉलेज फॉर वुमेन) स्थापन झाले. त्या काळात महिलांसाठी वेगळी शिक्षण संस्था सुरू करणे अत्यंत कठीण होते. तरीसुध्दा जनहित कल्याणाची जाणीव असलेल्या नागरिकांनी 'वुमेन्स एज्युकेशन सोसायटी' ची स्थाना केली. या. मु. पाठक हे संस्थेचे संस्थापक सचिव होते तर रमाबाई तांबे या महाविद्यालयाच्या प्रथम प्राचार्या होत्या. १९५० मध्ये या महाविद्यालयात व्हर्नाक्यूलर माध्यमातून शिक्षण देणे सुरू झाले. इमारतीची भव्य इमारत १९६१ मध्ये उभारली. विशाल सभागृह, स्वयंरोजगार केंद्र, जिमखाना, अद्ययावत प्रयोगशाळा, प्रशस्त क्रीडांगण, मदर ॲण्ड चाईल्ड केअर सेंटर, ॲडव्हेंचर क्लब व संपन्न ग्रंथालयाने हे महाविद्यालय समृध्द आहे. सन १९९९-२००० मध्ये या महाविद्यालयात ३,०६३ विद्यार्थींनी, १०९ शिक्षक (११ पुरूष), ९९ शिक्षकेतर कर्मचारी होते. महाविद्यालयाचे स्वतंत्र वसतिगृह असून त्यात १०४ विद्यार्थींनी होत्या.

सध्या महाविद्यालयात कला, समाजशास्त्र, गृहविज्ञानशास्त्र, विज्ञान, वाणिज्य, गृहविज्ञान, तंत्रज्ञान शाखा कार्यरत आहेत. महाविद्यालयात गृह-अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मानव विकास, गृहविज्ञान विस्तार व शिक्षण शाखा (होम सायन्स एक्स्टेंशन ॲण्ड एज्युकेशन), कॉसमेटिक टेक्नॉलॉजी आणि हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट या विषयांचे पदव्युत्तर वर्ग घेतले जातात.

धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर (स्थापना १९३५) **:** १९३५ ला वर्धा येथे वासुदेव आर्टस् कॉलेज या नावाने स्थापन करण्यात आलेले हे महाविद्यालय १९४२ मध्ये नॅशनल कॉलेज म्हणून नागपूरला स्थलांतरित झाले. १९५१ मध्ये दादासाहेब धनवटे यांनी देणगी

स्वरूपात ६०,००० रुपये दिल्यानंतर या महाविद्यालयास धनवटे नॅशनल कॉलेज म्हणून नाव देण्यात आले. महाविद्यालयात कला व वाणिज्य तसेच स्नातक व स्नातकोत्तर शिक्षण, मराठी व इंग्रजी माध्यमातून दिले जाते. त्याचप्रमाणे एम. बी. ए., एम. आय. आर. पी. एम. व डी. आय. आर. पी. एम., एम. फिल. हे व्यावसायिक शिक्षण दिले जाते. सन २००१-२००२ मध्ये ३,४२६ विद्यार्थी (वरिष्ठ व कनिष्ठ), ६६ शिक्षक व ३४ शिक्षकेतर कर्मचारी होते. या महाविद्यालयातील ग्रंथालयातील ग्रंथांची संख्या ५२,४५२ होती.

या महाविद्यालयातील अनेक माजी विद्यार्थी विविध उच्च पदांवर विराजमान असून विनोद गुडघे पाटील, अनंतराव घारड, पांडूरंग हिवरकर हे राजकीय क्षेत्रात कार्यरत आहेत.

गो. से. अर्थ वाणिज्य महाविद्यालय, नागपूर (स्थापना १९४५) : वर्धा येथील शिक्षा मंडळाने वाणिज्य शिक्षणाचा मराठी, हिंदी व इंग्रजी माध्यमातून प्रभावी प्रसार करण्यासाठी ७ जुलै १९४५ ला या महाविद्यालयाची स्थापना केली. सुरुवातीला या महाविद्यायात ७० विद्यार्थी होते. सन १९९८-१९९९ मध्ये कनिष्ठ व वरिष्ठ या दोन्ही विभागात ३,४०५ विद्यार्थी होते. महाविद्यालयाची भव्य इमारत असून प्रशस्त क्रीडांगण व १०० विद्यार्थ्यांसाठी सर्व सोयीनी युक्त स्वतंत्र वसतीगृह आहे. महाविद्यालयाच्या ग्रंथालयात ३३,४२४ ग्रंथ आहेत. अल्पावधीत नागपूर विद्यापीठात हे एक नामांकित महाविद्यालय गणले जाऊ लागले.

या महाविद्यालयास कमलनयन बजाज, रामकृष्ण बजाज, श्रीमन नारायणजी या नामांकित व्यक्तीचे मार्गदर्शन प्राप्त झाले आहे.

मथुरादास मोहता विज्ञान महाविद्यालय, नागपूर (स्थापना १९४९) **:** नागपूर शिक्षण मंडळाचे हे महाविद्यालय मथुरादास मोहता यांचे देणगीतून स्थापन झाले. इ.स. १९५२ मध्ये या महाविद्यालयात जीवशास्त्र व वनस्पतिशास्त्र या दोन विभागांची सुरुवात झाली. याचे उद्घाटन तत्कालीन अर्थमंत्री चिंतामणराव देशमुख यांनी केले. विदर्भातील खनिज संपत्ती लक्षात घेऊन या महाविद्यालयाने १९५३ मध्ये भूगर्भशास्त्र हा विषय शिकविण्यास सुरुवात केली. तत्पूर्वी हा विषय केवळ १९४६ पासून नागपूर विद्यापीठात शिकविला जात असे. इ. स. १९७२-७३ मध्ये या महाविद्यालयात ९९७ विद्यार्थी व ५४ अध्यापक होते. इ. स. २००१-२००२ मध्ये विद्यार्थ्यांची संख्या १,४१६ झाली. या महाविद्यालयाची स्वत:ची इमारत असून सूसज्ज प्रयोगशाळा व ग्रंथालय आहे. या ग्रंथालयातील ग्रंथांची संख्या २८,४३९ आहे.

डॉ. के. बी. पवार, डॉ. एस. एस. बाभुळकर, डॉ. डी. एस. सकसेना, डॉ. के. एच. माकडे, डॉ. पी. एन. चौधरी, डॉ. उदय बोधनकर, अतिकूर रहिम, ॲड. अमृत आचार्य, न्यायमूर्ति पी. आर. बेलोरकर, डॉ. पी. बी. सप्रे हे या महाविद्यालयाचे विद्यार्थी होत.

आर. एस. मुंडले धरमपेठ कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर (स्थापना १९६०) **:** धरमपेठ शिक्षण संस्थेने या महाविद्यालयाची स्थापना केली असून त्यात वाणिज्य, वाङ्मय व समाजविज्ञान आणि विधि हे अभ्यासक्रम शिकविले जातात. या तिन्ही शाखेत स्नातक व स्नातकोत्तर विभाग असून कनिष्ठ महाविद्यालय आहे. इ. स. १९७२-७३ मध्ये या महाविद्यालयात १,५३७ विद्यार्थी व ५४ अध्यापक होते. इ. स. २००१-

२००२ मध्ये ३,७०६ विद्यार्थी (वरीष्ठ व कनिष्ठ) ५६ अध्यापक व ३६ शिक्षकेत्तर कर्मचारी होते. या महाविद्यालयाची स्वत:ची इमारत असून अद्ययावत ग्रंथालय आहे. या ग्रंथालयातील ग्रंथांची संख्या ३२,०८७ आहे.

डॉ. आंबेडकर महाविद्यालय, नागपूर (स्थापना १९६४) **:** डॉ. बाबासाहेब स्मारक समितीने या महाविद्यालयाची स्थापना केली असून त्यात वाणिज्य, वाङ्मय व समाजविज्ञान हे अभ्यासक्रम शिकविले जात. इ. स. १९६९ मध्ये या महाविद्यालयात विज्ञान शाखा सुरू झाली. या तिन्ही शाखेत स्नातक व स्नातकोत्तर विभाग आहेत. इ. स. १९७२-७३ मध्ये या महाविद्यालयात १,७५० विद्यार्थी व ५१ अध्यापक होते. सन १९७५-७६ पासून या महाविद्यालयाला जोडूनच कनिष्ठ महाविद्यालय सुरू करण्यात आले. इ. स. १९८४ व १९८५ मध्ये अनुक्रमे विधि व एम. बी. ए. हे अभ्यासक्रम महाविद्यालयात सुरू झाले. या महाविद्यालयात २००१-२००२ मध्ये एकूण ३,४६२ विद्यार्थी, ८१ अध्यापक व ६० शिक्षकेत्तर कर्मचारी होते. महाविद्यालयाची स्वत:ची इमारत असून त्यात सूसज्ज प्रयोगशाळा व अद्ययावत ग्रंथालय आहे. या ग्रंथालयातील ग्रंथांची संख्या ३०,३१५ आहे.

शिक्षण प्रशिक्षण : सन १८८९ मध्ये नागपूरला प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी 'सेंट्रल ट्रेनिंग इन्स्टिट्यूशन' ची स्थापना झाली. तथापि १९०२ मध्ये त्याचे जबलपूरला स्थलांतर करण्यात आले. सन १९०७ मध्ये नागपूरला एक नॉर्मल स्कूल होते व त्यात ८० विद्यार्थी प्रशिक्षण घेत होते. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९०८ पृ. २६९.) याशिवाय जिल्ह्यात सहा व्हर्नाक्यूलर मिडल स्कूलमध्ये शिक्षकांसाठी प्रशिक्षण वर्ग चालविले जात व नऊ व्हर्नाक्यूलर मिडल स्कूलमध्ये शिक्षक प्रमाणपत्र परीक्षेची तयारी करून घेत असत. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९०८ पृ. २७०.) सन १९१९ मध्ये नागपूरला शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी व्हर्नाक्यूलर मिडल स्कूल सुरू केले. (जोशी, प. ल., **नागपूर नगर संस्था शताब्दि ग्रंथ**, खंड ३, १९६४, नागपूर महानगरपालिका पृ. १३४.) सन १९३० मध्ये सेवा सदन संस्थेने शिक्षिकांच्या प्रशिक्षणासाठी नागपूरला 'सेवा सदन नॉर्मल स्कूल' सुरू केले. हेच सध्याचे 'सेवा सदन अध्यापिका विद्यालय' होय. सन १९५४ मध्ये याच संस्थेने पूर्व प्राथमिक शिक्षण प्रशिक्षण विद्यालय सुरू केले. हेच सध्याचे 'यशोदाबाई खरे अध्यापिका विद्यालय' होय. याच वर्षी शासकीय पूर्व प्राथमिक शिक्षण विद्यालय सुरू झाले. सन १९५९-६० मध्ये जिल्ह्यात १४ अध्यापक विद्यालये (चार महिलांसाठी) होती. त्यापैकी पुरुषांसाठी एक शासकीय अध्यापक विद्यालय होते. या अध्यापक विद्यालयांमध्ये एकूण १,३७३ शिक्षक प्रशिक्षण घेत होते. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९६६ पृ. ६४१.) मुलोद्योग शिक्षणाच्या धर्तीवर शिक्षण संस्थांची पुनर्रचना करण्याचे शासनाचे धोरणामुळे अध्यापक विद्यालयातून हस्तव्यवसाय, विणकाम, सूत कताई, शेती, बागबगीचा काम व लाकूड काम करण्याची व्यवस्था करण्यात आली. त्यासाठी शिक्षकाचा दर्जा वाढविण्याच्या हेतूने बिगरशासकीय अध्यापक विद्यालयाचे अनुदान सहाय्यात वाढ करण्यात आली. जिल्ह्यात अशा प्रकारचे शासकीय मुलोद्योग अध्यापक विद्यालय कामठीस होते. सन १९७१-७२ मध्ये जिल्ह्यात १० अध्यापक विद्यालये (१,०२८ विद्यार्थी) व तीन पूर्व प्राथमिक शिक्षण प्रशिक्षण विद्यालये (२२१ विद्यार्थी) होती. सप्टेंबर १९८१ अखेर जिल्ह्यात सात अध्यापक विद्यालये (५३४ विद्यार्थी) व दोन पूर्व

प्राथमिक शिक्षण प्रशिक्षण विद्यालये (२२१ विद्यार्थी) होती. सन १९९८-९९ मध्ये जिल्ह्यातील २४ अध्यापक विद्यालयांपैकी एक शासकीय, ११ अनुदानित व १२ विनाअनुदानित अध्यापक विद्यालये होती. अनुदानित अध्यापक विद्यालयांपैकी पाच अध्यापक विद्यालये मुलींची होती. या अध्यापक विद्यालयांमध्ये २,०८४ विद्यार्थी होते त्यापैकी १,१२४ विद्यार्थीनी होत्या व त्यात १८० शिक्षक कार्यरत होते. **(शिक्षणावर दृष्टिक्षेप**, १९९८-९९, पृ. १५८-५९.)

विदर्भातील माध्यमिक शाळांसाठी प्रशिक्षित शिक्षक वर्ग तयार करण्याच्या दृष्टीने २ जुलै १९४५ रोजी नागपूर विद्यापीठाने 'विद्यापीठ शिक्षण महाविद्यालय' सुरू केले. हेच सद्याचे बॅरि. एस. के. वानखेडे विद्यापीठ शिक्षण महाविद्यालय होय. प्रारंभी फक्त ४५ विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्यावेळी विदर्भात शिक्षकांना शिक्षण देणारे हे एकमेव महाविद्यालय होते. या महाविद्यालयाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे तीन्ही माध्यमातून (हिंदी, मराठी व इंग्रजी) प्रशिक्षण दिले जाते. माध्यमिक शाळेमध्ये शिकविल्या जाणाऱ्या सर्व विषयांच्या म्हणजेच १६ अध्यापन पध्दतीची सोय फक्त याच महाविद्यालयात आहे. हा अभ्यासक्रम एक वर्षाचा आहे. प्रथम यास 'प्रशिक्षण स्नातक' (बी. टी.) म्हटले जाई. १९५० नंतर मात्र यास 'शिक्षण स्नातक' (बी. एड.) म्हणून संबोधले जाऊ लागले. इ. स. १९५० मध्ये पदव्युत्तर विभाग सुरू करण्यात आला. सन १९५७ ते १९६७ या कालावधीत पदविका अभ्यासक्रम राबविण्यात आला. तसेच अल्पकालीन बी. टी. चाही अभ्यासक्रम राबविण्यात आला. नॅशनल कौन्सिल फॉर एज्युकेशनल रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग या संस्थेच्या मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे १९६३ पासून विस्तार सेवा विभाग सुरू करण्यात आला. या महाविद्यालयात मे १९७९ मध्ये अवकाशकालीन बी. एड.चा अभ्यासक्रम सुरू झाला. ३० सप्टेंबर १९८१ ला या महाविद्यालयात ४५१ विद्यार्थी होते. **(स्टॅटिस्टिकल ॲबस्टॅक्ट**, १९८१-८२, पृ. २७६.) सन १९८४ मध्ये काटोल येथे शिक्षण महाविद्यालय सुरू झाले. सन १९८४-८५ मध्ये जिल्ह्यातील या दोन महाविद्यालयात ४५३ विद्यार्थी व १९ शिक्षक होते. सन १९८६ मध्ये नागपूरला अरुण जोशी शिक्षण महाविद्यालय सुरू झाले. याशिवाय १९९० मध्ये नागपूरला जनरल आवारी अध्यापक महाविद्यालय, राधिका अध्यापक महाविद्यालय, वसंत शिक्षण महाविद्यालय, ज्योतिबा फुले अध्यापक महाविद्यालय व काटोल येथे महिला अध्यापक महाविद्यालय सुरू झाले. सन १९९८-९९ मध्ये जिल्ह्यातील आठ अध्यापक महाविद्यालयात ८३८ विद्यार्थी होते त्यापैकी ४३० विद्यार्थीनी होत्या व ४९ शिक्षक होते. **(शिक्षणावर दृष्टिक्षेप,** १९९८-९९, पृ. १६२-१६३.)

शारीरिक शिक्षण : नागरिक शिक्षण मंडळ संस्थेने १९६० मध्ये नागपूरला शारीरिक शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी 'ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालय' सुरू केले. या महाविद्यालयात प्रारंभी शासकीय सी. पी. एड हे प्रमाणपत्र व डी. पी. एड हा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम राबविण्यात येत होता. सन १९७१ साली नागपूरला 'नागपूर शारीरिक शिक्षण महाविद्यालय' सुरू झाले. सन १९७१-७२ मध्ये जिल्ह्यातील दोन महाविद्यालयात ९१ विद्यार्थी शिक्षण घेत होते. सन १९९६-९७ मध्ये जिल्ह्यातील १२ शारीरिक शिक्षण महाविद्यालयात ३,३४० विद्यार्थी व १०० शिक्षक कार्यरत होते. सन १९९९-२००० मध्ये २६ महाविद्यालये होती.

वैद्यकीय शिक्षण : नागपूरला ४ जुलै १९१४ रोजी रॉबर्टसन मेडिकल स्कूलची स्थापना

झाली. त्यात ४ वर्षीय अभ्यासक्रम शिकविला जात असे. सुरुवातीला या स्कूलमध्ये २५ विद्यार्थी होते. सी. पी. अँड बेरार मधील ती एकमात्र वैद्यकीय शिक्षण देणारी स्कूल होती. सन १९१७-२२ या कालावधीत ८६ विद्यार्थ्यांना १५ ते १७ रुपये दरमहा शिष्यवृत्ती देण्यात येत असे. शासकीय मध्यप्रांत मेडिकल परीक्षा बोर्ड परीक्षेत पास होणाऱ्या विद्यार्थ्यास लायसन्स मेडिकल प्रॅक्टिशनर्स, सी. पी. एल. एम. पी. सी. पी अशी सनद देत. ही स्कूल मेयो रुग्णालयाशी संलग्न होती. नागपूरचे सिव्हिल सर्जन त्याचे अधिक्षक होते. प्रत्येकी ८० विद्यार्थी क्षमतेची दोन वसतिगृहे बांधण्यात आली. या मेडिकल स्कूलने १९२० मध्ये कंपाऊंडसाठी वर्ग सुरू केले. दाई वर्गासाठी स्कॉलरशीपची रक्कम दरमहा १ ते ४ रुपये असे. सन १९२२ पर्यंत १२० विद्यार्थिनींना स्कॉलरशीप देण्यात आली. सन १९३१ मध्ये या स्कूलमध्ये २१२ विद्यार्थी होते. त्यापैकी आठ मुली होत्या.

नागपूर विद्यापीठाच्या स्थापनेनंतर रॉबर्टसन मेडिकल स्कूलचे रुपांतर मेडिकल कॉलेजमध्ये करण्याचे प्रयत्न करण्यात आले. परंतु ओवेन कमिटीने (१९३७) त्याला विरोध केला. या संदर्भात १९४० च्या दरम्यान विद्यापीठाकडूनही प्रयत्न करण्यात आले. कुलगुरू टी. जी. केदार, सर. के. व्ही. कुकडे, डॉ. हसन इत्यादींनी मेडिकल कॉलेजसाठी प्रयत्न केले. तरीही युध्दकालीन परिस्थितीमुळे सरकारने या योजनेस मंजुरी दिली नाही. पंजाब, युनायटेड प्रॉव्हिन्सेस, ओरिसा, सिंध प्रांतात युध्द काळातच मेडिकल कॉलेजेस स्थापन झाली होती. त्यानुसार विद्यापीठीय मंडळींनी चँसेलरकडे फिर्याद केली. त्यास यश येऊन शासनाने मेडिकल कॉलेजची योजना जुलै १९४५ मध्ये मान्य केली. जून १९४६ मध्ये आरोग्यमंत्री डॉ. जीवराज मेहता यांच्या सल्ल्यानुसार ही योजना मान्य झाली. कर्नल सर के. व्ही. कुकडे यांनी त्यासाठी १८९ एकर जागा मिळवून दिली व जुलै १९४७ पासून शासकीय मेडिकल कॉलेज सुरू झाले. जानेवारी १९४८ ते डिसेंबर १९५२ पर्यंत कॉलेजच्या इमारतीचे आणि रुग्णालयाचे बांधकाम पूर्ण झाले. रुग्णालयाचे उद्घाटन २ ऑक्टोबर १९५२ रोजी मध्य प्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री पंडित रविशंकर शुक्ल तर महाविद्यालयाच्या इमारतीचे उद्घाटन २७ मार्च १९५३ रोजी राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या हस्ते झाले. सन १९५१ मध्ये प्रथमच घेण्यात आलेल्या एम. बी. बी. एस. परीक्षेत १३ पैकी ७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

नागपूरला १९६७ मध्ये राज्य शासनाने इंदिरा गांधी आयुर्विज्ञान महाविद्यालय तर १९९० मध्ये विद्या शिक्षण प्रसारक मंडळाने एन. के. पी. साळवे इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस स्थापन केले. सन १९९८-९९ मध्ये जिल्ह्यातील तीन महाविद्यालयांमध्ये २,४१२ विद्यार्थी होते. तसेच नागपूरला शासकीय दंत महाविद्यालय (१९६८) व विद्या शिक्षण प्रसारक दंत महाविद्यालय (१९९६) सुरू आहे. याव्यतिरिक्त आयुर्वेदातील वैद्यकीय अभ्यासक्रमाची तीन महाविद्यालये नागपूरात सुरू असून त्यापैकी राज्य सरकारचे शासकीय आयुर्वेद महाविद्यालय (१९६५), भारतीय विद्या समितीचे श्री. आयुर्वेद महाविद्यालय (१९७२) व बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमिटीचे भाऊसाहेब मुळक आयुर्वेद महाविद्यालय होय. नागपूरला सत्विकित्सा प्रसारक मंडळाचे नागपूर कॉलेज ऑफ होमिओपॅथी ॲण्ड बायोकेमेस्ट्री (१९८५) या संस्थेत होमिओपॅथी अभ्यासक्रम शिकविण्यात येतो. तर जमिया अरेबिक रशिदिया या संस्थेच्या ताज तिब्बिया कॉलेज ॲण्ड रशिदीया रुग्णालयात (१९९०) युनानी शिक्षण दिले जाते.

कृषि व पशुवैद्यकीय शिक्षण

कृषि महाविद्यालय : सन १९०६ मध्ये नागपूरला कृषि महाविद्यालय स्थापन झाले व जी. इव्हान्स यांची संस्थापक प्राचार्य पदी नियुक्ती झाली. सन १९०७ मध्ये रॉबर्ट जे. ॲलन प्राचार्य झाले. त्यांनी या महाविद्यालयास देशात उत्कृष्ट संस्था म्हणून प्रसिध्दी मिळवून दिली. सुरुवातीला भारतीय कृषि बोर्डाच्या नियमानुसार प्रारंभ झालेला त्रिवर्षीय अभ्यासक्रम पुढे साडेतीन वर्षांचा झाला. एल. ए. जी. हा दोन वर्षीय डिप्लोमा उत्तीर्ण करणाऱ्यास सर्टिफिकेट दिले जात होते. हे महाविद्यालय १९२५ मध्ये नागपूर विद्यापीठाशी संलग्न झाले. या विद्यापीठाने १९२९ मध्ये इंटरमिजिएट व स्नातक पदवीसाठी (बी. एजी.) परीक्षा घेतल्या. या परीक्षेत अनुक्रमे १८ व ८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. १९३० मध्ये दोन वर्षीय अभ्यासक्रम बंद होऊन इंटरमिजिएट आणि स्नातक अभ्यासक्रम प्रत्येकी दोन-दोन वर्षांचे झाले. १९३८ पासून बी. एससी. (ॲग्रि.) ही पदवी देण्यात आली. १९६८ पासून हे महाविद्यालय अकोल्याच्या डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाशी संलग्न करण्यात आले. या महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू असून १९७० मध्ये या दोन्ही अभ्यासक्रमासाठी एकूण ५११ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. १९८० मध्ये या महाविद्यालयात ४६९ विद्यार्थी व ५३ शिक्षक होते. सन २००० मध्ये विद्यार्थ्यांची संख्या ७९७ झाली. या वर्षी त्यात ५२ शिक्षक होते. (डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाकडून प्राप्त माहितीवरून.) महाविद्यालयाला सुसज्ज विद्यार्थी वसतिगृह आहे.

या व्यतिरिक्त दोन वर्षीय कृषि प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी कृषि विद्यालय, सावंगी (१९७४), भैय्याजी किनखेडे कृषि विद्यालय, पिंपळा (१९९०), राणी लक्ष्मीबाई कृषि विद्यालय, सावरगांव (१९९३), कृषि विद्यालय, मौदा (२०००), रविशंकर कृषि विद्यालय, बेसूर भिवापूर (२०००) या संस्था कार्यरत असून सन २००० मध्ये त्यात एकूण ४८० विद्यार्थी व ३७ शिक्षक होते. तसेच दुग्धव्यवसाय व पशुसंवर्धन अभ्यासक्रम संत गुलाबबाबा आश्रम, नागपूर (१९८९) येथे सुरू असून त्यात १२० विद्यार्थी व ८ शिक्षक आहेत. नागपूरला माळी प्रशिक्षण केंद्र (१९९०) असून त्यात एक वर्षीय अभ्यासक्रम सुरू आहे. या केंद्रात सन २००० मध्ये २५ विद्यार्थी व दोन शिक्षक होते. (डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाकडून प्राप्त माहितीवरून.)

पशुवैद्यकीय महाविद्यालय : सन १९५८ मध्ये नागपूरला नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय स्थापन झाले. (डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाकडून प्राप्त माहितीवरून.) तत्पूर्वी हे महाविद्यालय शासनाच्या पशुसंवर्धन विभागांतर्गत कार्यरत होते. हे महाविद्यालय १९६८ पर्यंत नागपूर विद्यापीठाशी संलग्न होते. तथापि अकोला येथे डॉ. पंजाबराव कृषि विद्यापीठ स्थापन झाल्यामुळे हे महाविद्यालय १९६८ मध्ये कृषि विद्यापीठाशी संलग्न करण्यात आले. या महाविद्यालयात पदवी, पदव्युत्तर स्नातक व स्नातकोत्तर शिक्षण दिले जाते. हे महाविद्यालय शेतकरी, बेरोजगार व पशुपालक यांचेकरिता प्रशिक्षण वर्ग चालविते. त्याचप्रमाणे महाविद्यालयातर्फे शेतकरी व पशुपालकांना उपयोगी साहित्यावरील पुस्तके प्रकाशित केली जातात. महाविद्यालयातर्फे दवाखाना चालविण्यात येत असून महाविद्यालयाजवळच फिरते पशुचिकीत्सालय उपलब्ध आहे. महाविद्यालयात पशु शरीरशास्त्र व जीवरसायनशास्त्र, पशुव्यवस्थापन, जननशास्त्र व संकरण जंतुशास्त्र, पशुपोषणशास्त्र, विकृतिशास्त्र, औषधिशास्त्र, परजीविशास्त्र, पशुवैद्यक विस्तार, दुग्ध व्यवसाय शास्त्र,

शल्यचिकित्सा इत्यादी १३ स्वतंत्र विभाग आहेत. त्यात विविध विषयांवर संशोधन करण्याची सोय उपलब्ध आहे. सन १९७० मध्ये या महाविद्यालयात २३६ विद्यार्थी व ५८ शिक्षक होते. सन १९८० मध्ये विद्यार्थ्यांची संख्या २४६ झाली. सन २००० मध्ये त्यात ३२६ विद्यार्थी व ६५ शिक्षक होते. डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाकडून प्राप्त माहितीवरून. या महाविद्यालयाची तीन वसतिगृहे असून त्यापैकी एक मुलींसाठी आहे. महाविद्यालयातील कुक्कुटपालन प्रक्षेत्र २.३९ हेक्टर व पशुपैदास प्रक्षेत्र १२०.९२ हेक्टरमध्ये आहेत.

तंत्र शिक्षण

अभियांत्रिकी महाविद्यालय : जिल्ह्यात १९४२ पर्यंत एकही अभियांत्रिकी महाविद्यालय नव्हते. नागपूर विद्यापीठाने रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण या खाणमालकाकडून देणगी घेऊन ऑगस्ट १९४२ मध्ये ३१.५६५५ हेक्टर (७८ एकर) परिसरात लक्ष्मीनारायण तांत्रिक संस्था सुरू केली. त्यावेळी ७ विद्यार्थ्यांच्या प्रवेशावर जनरल इंजिनिअरिंग, केमिकल इंजिनिअरिंग व ऑईल टेक्नॉलॉजीच्या विशेष शिक्षणासह दोन वर्षांचा बी.एससी. टेक. हा अभ्यासक्रम सुरू केला. १९४५-४६ मध्ये तांत्रिक प्रशिक्षणाच्या सोयी वाढविण्याच्या दृष्टीने सुसज्ज पायलट प्लान्ट इमारत, वर्कशॉप, प्रयोगशाळा व विद्यार्थ्यांच्या निवासासाठी वसतिगृह कार्यान्वित झाले. १९४८ मध्ये ऑईल टेक्नॉलॉजी व केमिकल इंजिनिअरिंग हे अभ्यासक्रम अनुक्रमे १२ विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन सुरू केले. या संस्थेत चार वर्षीय बी. टेक. केमिकल इंजिनिअरींग आणि पाच वर्षीय इंटिग्रेटेड केमिकल इंजिनिअरींग तंत्रशास्त्र स्नातक (बी. टेक.) अभ्यासक्रमही सुरू करण्यात आले. इ. स. १९६४ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने संस्थेला तीन वर्षीय बी. एससी. टेक. अभ्यासक्रम ऑईल टेक्नॉलॉजीमध्ये सुरू करण्यास परवानगी दिली. इ. स. १९६६ मध्ये तंत्रशास्त्र पारंगत (एम. टेक.) अभ्यासक्रम केमिकल इंजिनिअरींग व केमिकल टेक्नॉलॉजी या शाखांमध्ये सुरू झाला. तंत्रशिक्षणाची वाढती निकड लक्षात घेवून १९७१ मध्ये तीन वर्षीय फूड टेक्नॉलॉजी व पेट्रोकेमिकल टेक्नॉलॉजी हे अभ्यासक्रम सुरू केले. तसेच १९७६ मध्ये सेल्युलोज टेक्नॉलॉजी हा अभ्यासक्रम सुरू केला. इ. स. १९७७ मध्ये बदललेल्या १०+२ शिक्षण प्रणालीनुसार नवीन चार वर्षीय तंत्रशास्त्र स्नातक (बी. टेक.) अभ्यासक्रम सुरू झाला. १९९४ मध्ये औद्योगिक क्षेत्राची आवश्यकता लक्षात घेवून तीन वर्षीय बी. एससी. टेक. अभ्यासक्रम बंद करून त्याऐवजी चार वर्षीय तंत्रशास्त्र स्नातक (बी. टेक.) केमिकल टेक्नॉलॉजी हा अभ्यासक्रम ऑईल टेक्नॉलॉजी, पेट्रोकेमिकल टेक्नॉलॉजी, फूड टेक्नॉलॉजी व पल्प ॲण्ड पेपर टेक्नॉलॉजी शाखांमध्ये सुरू करण्यात आला. इ. स. १९९५ मध्ये त्यात पॉलीमर ॲण्ड प्लॉस्टिक शाखा कार्यान्वित झाली. या संस्थेत केमिकल इंजिनिअरिंग, फूड टेक्नॉलॉजी, ऑईल टेक्नॉलॉजी, पल्प ॲण्ड पेपर टेक्नॉलॉजी, पेट्रो केमिकल टेक्नॉलॉजी, प्लॉस्टिक ॲण्ड पॉलीमर टेक्नॉलॉजी व सरफेस कोटींग टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमाचे शिक्षण दिले जाते.

सन १९५६-५७ मध्ये शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू झाले. १९६० मध्ये शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विश्वेश्वरय्या प्रादेशिक अभियांत्रिकी महाविद्यालयात (विश्वेश्वरय्या रिजनल कॉलेज ऑफ इंजिनिअरींग) रुपांतर झाले. सुरुवातीला या महाविद्यालयात

१५० विद्यार्थी होते. या महाविद्यालयातील पदवी पर्यंतचा खर्च केंद्र सरकार व राज्य शासन करीत असून पदव्युत्तर शिक्षणावरील खर्चास केंद्र सरकार अनुदान देते. या महाविद्यालयात स्थापत्य, विद्युत, अणुविद्युत यंत्र, कॉम्प्यूटर सायन्स, धातूशास्त्र व खणिकर्म अभियांत्रिकी अभ्यासक्रम शिकविले जातात. या महाविद्यालयाचा परिसर ८४.९८४ हेक्टरचा (२१० एकर) असून त्यात महाविद्यालयातील सर्व अभ्यासक्रमांचे विभाग, प्रयोगशाळा, वर्कशॉप व विद्यार्थ्यांना राहण्यासाठी सुसज्ज वसतिगृह आहे. सन १९९९-२००० मध्ये जिल्ह्यात १३ महाविद्यालये होती. त्यापैकी विश्वेश्वरय्या प्रादेशिक अभियांत्रिकी महाविद्यालय व लक्ष्मीनारायण तंत्र महाविद्यालय ही शासकीय महाविद्यालये व ११ विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये होती. त्यामध्ये यशवंतराव चव्हाण अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर (स्थापना १९८४), रामदेवबाबा कमला नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर (स्थापना १९८४), कर्मवीर दादासाहेब कन्नमवार अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर (स्थापना १९८४), कवि कुलगुरू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲण्ड सायन्स, रामटेक (स्थापना १९८५), प्रियदर्शनी अभियांत्रिकी महाविद्यालय, लोकमान्य टिळक जनकल्याण शिक्षण संस्था, नागपूर (स्थापना १९९०), जी. एच. रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर (स्थापना १९९६), दामोदरपंत दुपल्लीवार अभियांत्रिकी महाविद्यालय, बुटीबोरी (स्थापना १९९८), श्रीमती राधिकाताई पांडव अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर (स्थापना १९९९), डॉ. सी. व्ही. रमण इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, नागपूर (स्थापना १९९९), अंजुमन अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर (स्थापना १९९९) व उमरेड अभियांत्रिकी महाविद्यालय, उमरेड (स्थापना १९९०) यांचा समावेश आहे.

यांव्यतिरिक्त नागपूरला विश्वेश्वरय्या रिजनल कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (विद्यार्थी २०) हे शासकीय असून विनाअनुदानित एल. ए. डी. कॉलेज ऑफ ऑर्किटेक्चर फॉर वुमेन (विद्यार्थीनी ४०), प्रियदर्शनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड आर्किटेक्चर (विद्यार्थी ४०) व रामटेकला कवी कुलगुरू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲण्ड सायन्स (विद्यार्थी ४०) या वास्तुशास्त्र पदवी देणाऱ्या संस्था आहेत. हॉटेल मॅनेजमेंट पदवीचे नागपूरला विनाअनुदानित तिरपुडे कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी (विद्यार्थी ८०) आहे. औषधी निर्माणशास्त्र पदवी संस्थांमध्ये नागपूरला नागपूर युनिर्व्हसिटी डिपार्टमेंट ऑफ फार्मास्युटिकल सायन्स अनुदानित असून त्यात ३० विद्यार्थी असतात. तर विनाअनुदानित नगर युवक शिक्षण संस्थेचे कॉलेज ऑफ फार्मसी (विद्यार्थी ६०), लोकमान्य टिळक जनकल्याण शिक्षण संस्थेचे कॉलेज ऑफ फार्मसी (विद्यार्थी ४०) व कामठीला सदाशिवराव पाटील शिक्षण संस्थेचे श्रीमती किशोरीताई भोयर कॉलेज ऑफ फार्मसी (विद्यार्थी २०) आहेत. तसेच नागपूरला डिपार्टमेंट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, नागपूर विद्यापीठ अनुदानित असून विद्यार्थी क्षमता ६० आहे. विनाअनुदानित जी. एस. कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड इकॉनॉमिक्स, डिपार्टमेंट ऑफ मॅनेजमेंट सायन्स ॲण्ड रिसर्च (विद्यार्थी ४०), पंजाबराव देशमुख इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट टेक्नॉलॉजी ॲण्ड रिसर्च (विद्यार्थी ६०), डॉ. आंबेडकर कॉलेज, डिपार्टमेंट ऑफ मॅनेजमेंट स्टडिज ॲण्ड रिसर्च (विद्यार्थी ६०), नगर युवक शिक्षण संस्थेचे, इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च (विद्यार्थी ६०), सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट (विद्यार्थी ६०), लोकमान्य टिळक इन्स्टिट्यूट

ऑफ मॅनेजमेंट स्टडिज ॲण्ड रिसर्च, (विद्यार्थी ६०), डिपार्टमेंट ऑफ मॅनेजमेंट स्टडिज ॲण्ड रिसर्च, युगांतर एज्युकेशन सोसायटी, तिरपुडे कॉलेज ऑफ सोशल वर्क (विद्यार्थी ६०), रामटेकला कवी कुलगुरु इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲण्ड सायन्स (विद्यार्थी ६०), व काटोलला डिपार्टमेंट ऑफ मॅनेजमेंट स्टडिज व्दारा नबीरा महाविद्यालय (विद्यार्थी ६०) या व्यवस्थापन शास्त्र पदवी संस्था आहेत.

नागपूरला १९६७ मध्ये शासकीय चित्रकला महाविद्यालय ही कला शिक्षण देणारी (पदवी व पदविका) शैक्षणिक संस्था स्थापन झाली. तत्पूर्वी या संस्थेची सुरुवात १९४७ मध्ये कला शिक्षक जी. के. जोशीराव यांच्या मार्गदर्शनाखाली शासकीय तंत्रनिकेतनमध्ये एक कला विभाग म्हणून झाली. त्यात तीन वर्षाचा अभ्यासक्रम होता.

एप्रिल १९६७ पासून ही संस्था स्वतंत्र ललीत कला शिक्षण संस्था म्हणून कार्यरत आहे. या महाविद्यालयात पाच वर्षांचा पदवी अभ्यासक्रम कला स्नातक, रेखा व रंग कला किंवा कला स्नातक उपयोजित कला अशी पदवी प्राप्त करता येते. या व्यतिरिक्त कला शिक्षण प्रशिक्षण अंशकालिन छायाचित्रण व जाळीमुद्रण तसेच उन्हाळी व हिवाळी सुट्टीमध्ये एकूण तीन वर्षांचा कालावधी असलेला अे. एम. प्रमाणपत्र अभ्यासक्रम शिकविले जातात. सन १९७१-७२ मध्ये या महाविद्यालयात १७५ विद्यार्थी होते. सन १९९२-९३ मध्ये त्यांची संख्या ३४४ झाली. त्यापैकी ८९ विद्यार्थीनी होत्या व त्यात २६ शिक्षक होते. सन १९९९-२००० मध्ये या महाविद्यालयात २४६ विद्यार्थी होते. त्यापैकी १०८ विद्यार्थीनी होत्या. त्यात २७ शिक्षक व २४ शिक्षकेतर कर्मचारी होते.

राष्ट्रीय अग्निशमन महाविद्यालय : केंद्र शासनाने रामपूरला (उ. प्र.) १९५६ मध्ये राष्ट्रीय अग्निशमन महाविद्यालय स्थापन केले. पुढे राज्य पुनर्रचनेनंतर व राष्ट्रीय दृष्टिकोनातून हे महाविद्यालय नागपूरला स्थलांतरीत झाले. अग्निशी संबंधित सर्व प्रकारचे प्रशिक्षण देणारी एकमात्र संस्था असून बी. ई. चा अभ्यासक्रमही राबविते. या महाविद्यालयात देशाच्या विभिन्न भागातील प्रशिक्षणार्थी शिक्षण घेण्यास येत असतात.

तंत्रनिकेतन : नागपूरला १४ जुलै १९१४ ला शासकीय अभियांत्रिकी शाळा (शासकीय तंत्रनिकेतन) स्थापन झाली. त्यात सिव्हील व मेकॅनिकल इंजिनियरिंग विभाग होते. सिव्हील इंजिनियरिंग विभागात सार्वजनिक बांधकाम विभागासाठी तीन वर्षांचा ओव्हरसियरचा व दोन वर्षांचा सब ओव्हरसियरचा आणि मेकॅनिकल विभागात तीन वर्षांचा डिप्लोमा व दोन वर्षांचा सर्टिफिकेट अभ्यासक्रम सुरू होते. या शाळेत सुरुवातीला १६ विद्यार्थी होते. तत्पूर्वी १८८८ मध्ये नागपूरला दोन वर्षांचा अभियांत्रिकी अभ्यासक्रम सुरू झाला होता. परंतु त्यावेळी विद्यार्थ्यांचा ओढा कला शाखेकडे अधिक असल्यामुळे अभियांत्रिकी वर्गांसाठी विद्यार्थी मिळत नसत. सन १९१५ मध्ये या शाळेत ऑटोमोबाईल विभाग सुरू होऊन त्यात मोटार मेकॅनिकचा चार वर्षांचा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. १९१७ मध्ये अभियांत्रिकी शाळेचे अधीक्षक ग्रीन यांना खाजगीरित्या (कार्यालयीन वेळेशिवाय) कन्सल्टेशनद्वारे फी स्वीकारण्याची परवानगी देण्यात आली. बेकेट यांनी चौथ्या वर्षाच्या मेकॅनिकल इंजिनियरिंगच्या विद्यार्थ्यांसाठी खाजगी दुकानांमध्ये प्रशिक्षणाची व्यवस्था केली. तसेच सिव्हील इंजिनियरिंगच्या विद्यार्थ्यांसाठी प्रमुख अभियंत्यांच्या अनुमतीने अशी व्यवस्था करवून घेण्याचा डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन यांना आदेश दिला. जानेवारी १९१८ मध्ये सेंट्रल प्रोव्हॉसिंस लेजिस्लेटिव्ह

कौंसिलमध्ये सर्व शासकीय स्कॉलरशिप घेणाऱ्या इंजिनियरिंगच्या विद्यार्थ्यांना मिल किंवा फॅक्टरी मध्ये कमीत कमी सहा महिने प्रशिक्षण देण्याचे ठरविण्यात आले. पुढे मेकॅनिकल इंजिनियरिंगचा अभ्यासक्रम चार वर्षे तीन महिन्याचा करण्यात आला.

व्हॉईसरॉय लॉर्ड चेम्सफोर्ड यांनी २३ ऑक्टोबर १९२० ला अभियांत्रिकी शाळेच्या नव्या इमारतीचे उद्घाटन केले. या शाळेत १९२१-२२ मध्ये ८२; १९२२-२३ मध्ये ९४ तर १९२३-२४ मध्ये १०४ विद्यार्थी होते. सन १९२७ मध्ये विद्यार्थ्यांची संख्या १६० झाली. ही शाळा विज्ञान संस्थेच्या प्राचार्यांचे अधिपत्याखाली कार्यरत होती. एप्रिल १९२७ मध्ये या शाळेचे प्राचार्य म्हणून ग्रीन हॉल्ग यांची नियुक्ती झाली. सन १९२९ मध्ये मोटार मेकॅनिकचा अभ्यासक्रम स्वयंचलित यंत्रशास्त्रात रुपांतरित होऊन तीन वर्षांचा पदविका अभ्यासक्रम झाला. हा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर एक वर्षाचे प्रात्यक्षिक शिक्षण घ्यावे लागत होते. त्याशिवाय पदविका प्राप्त होत नव्हती.

सिव्हिल शाखेचा अभ्यासक्रम ओव्हरसिअर व सब ओव्हरसिअर असा दोन विभागात विभागला होता. ओव्हरसिअरला एक वर्षाचे तर सब ओव्हरसिअरला सहा महिन्याचे प्रात्यक्षिक शिक्षण पूर्ण करावे लागत असे. मॅट्रिकनंतर हे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी मोफत असत. एवढेच नव्हे तर विद्यार्थ्यास आकर्षित करण्यासाठी गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीही दिली जात होती.

सन १९३६ मध्ये ही शाळा नागपूर विद्यापीठाशी संलग्न होऊन अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम सुरू झाला. १९३८ मध्ये या संस्थेचे सी. सी. चॅटर्जी हे पहिले भारतीय प्राचार्य झाले. दुसऱ्या महायुध्दाचे काळात सुशिक्षित तंत्रज्ञाची गरज भासू लागली. त्यावेळी तंत्रज्ञांना सैनिकी शिक्षण देण्यास शासकीय अभियांत्रिकी शाळेत 'सिव्हिल मिल' हे केंद्र सुरू करण्यात आले. सन १९४१ मध्ये या केंद्रात लोहारकाम, सुतारकाम, वेल्डिंग, फिटिंग, मोल्डींग, टॅनिंग इत्यादी विषयांचे शिक्षण दिले जात होते. महायुध्दाचे अखेरीस या केंद्रातून १,५०० विद्यार्थी प्रशिक्षण घेऊन बाहेर पडले. सन १९४६ मध्ये हे केंद्र बिलासपूर (मध्यप्रदेश) येथे स्थलांतरित झाले. सन १९४७ मध्ये वरील अभ्यासक्रमाव्यतिरिक्त विद्युत, कला व वास्तुशास्त्र पदविका अभ्यासक्रम सुरू झाले. या अभ्यासक्रमांपैकी पहिले दोन अभ्यासक्रम तीन वर्षाचे व तिसरा अभ्यासक्रम चार वर्षांचा होता. सन १९५४ मध्ये या शाळेचे नाव 'शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतन' असे झाले. तथापि १९५६ नंतर तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालय भिन्न संस्था म्हणून संबोधण्यास सुरुवात झाली. सन १९५८ मध्ये अभियांत्रिकी महाविद्यालय, तंत्रनिकेतन व औद्योगिक प्रशिक्षण संस्था या वेगवेगळ्या झाल्या. सन १९५८-५९ पासून तंत्रशिक्षण संचालनालयाशी सर्व अभ्यासक्रम संलग्न करण्यात आले. मात्र कला व वास्तुशास्त्र हे अभ्यासक्रम नागपूर विद्यापीठाशी संलग्न राहिले. सन १९६०-६१ मध्ये या तंत्रनिकेतनात १७९ विद्यार्थी होते. सन १९६४ पासून या संस्थेत स्थापत्य, यंत्र, विद्युत, धातुशास्त्र, खाणकाम इत्यादी अभ्यासक्रम शिकविले जातात. या संस्थेत सुसज्ज वर्कशॉप व ग्रंथालय आहेत. सन १९८०-८१ मध्ये या तंत्रनिकेतनामध्ये ८७२ विद्यार्थी व ७२ शिक्षक होते. सन १९९५-९६ मध्ये जिल्ह्यात नऊ

तंत्रनिकेतन होती. सन १९९९-२००० मध्ये जिल्ह्यात एक शासकीय अभियांत्रिकी तंत्रनिकेतन व आठ अशासकीय विनाअनुदानित तंत्रनिकेतने होती. त्याची माहिती खाली दिली आहे.

संस्था	अभ्यासक्रम	प्रवेश क्षमता
अ) शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर	स्थापत्य	७०
	विद्युत	६०
	यंत्र	६०
	मायनिंग	३०
	पॅकेजिंग	३०
	टेक्सटाईल	२०
	धातुशास्त्र	३०
	इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन	६०
ब) अशासकीय तंत्रनिकेतन (विना-अनुदान)		
१. दत्ता मेघे तंत्रनिकेतन, नागपूर	स्थापत्य	३०
	केमिकल	३०
	संगणक	३०
	विद्युत	६०
	अणुविद्युत ॲण्ड कम्युनिकेशन	४०
	इंडस्ट्रिअल	६०
	यंत्र	१२०
२. शंकरराव धवड तंत्रनिकेतन, नागपूर	विद्युत	६०
	यंत्र	६०
	अणुविद्युत आणि टेलिकम्युनिकेशन	४०
३. प्रियदर्शनी तंत्रनिकेतन, नागपूर	यंत्र	६०
	संगणक	६०
	इंडस्ट्रियल इलेक्टॉनिक्स	६०
	विद्युत	६०
	अणुविद्युत	४०
४. स्व. वसंतदादा तंत्रनिकेतन, नागपूर	संगणक	६०
	विद्युत	३०
	इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलीकम्युनिकेशन	६०
	यंत्र	९०

संस्था	अभ्यासक्रम	प्रवेश क्षमता	
५.	कामठी तंत्रनिकेतन, कामठी	इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलीकम्युनिकेशन	६०
		संगणक टेक्नॉलॉजी	६०
		माइन आणि माइन सर्व्हेइंग	३०
		स्थापत्य	३०
		विद्युत	६०
६.	अंकुश तंत्रनिकेतन, डिगडोह, नागपूर	स्वयंचल	६०
		स्थापत्य	३०
		अणुविद्युत आणि टेलीकम्युनिकेशन	६०
		इंडस्ट्रिअल इलेक्ट्रॉनिक्स	३०
		यंत्र	६०
		संगणक	६०
७.	अंजूमन तंत्रनिकेतन, नागपूर	यंत्र	९०
		स्थापत्य	३०
		इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलीकम्युनिकेशन	९०
		संगणक	६०
८.	नागपूर तंत्रनिकेतन, नागपूर	संगणक	३०
		यंत्र	६०
		स्थापत्य	६०
		खाण आणि खनिकर्म सर्व्हेक्षण	६०
		इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलीकम्युनिकेशन	६०
		केमिकल	३०

या व्यतिरिक्त इन्स्टिट्यूट ऑफ डिप्लोमा इन फार्मसी (अनुदानित), नागपूर; श्रीमती कुसुमताई वानखेडे इन्स्टिट्यूट ऑफ फॉर्मसी (अनुदानित), काटोल; रवि बहउद्देशिय शिक्षण संस्था, नागपूर; गुरूनानक टेक्निकल इन्स्टिट्यूट ऑफ फॉर्मसी, नागपूर; श्रीमती शांतीबाई पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, कामठी व जे. एल. चतुर्वेदी इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, नागपूर या विनाअनुदानित औषधी निर्माण पदविका संस्था कार्यरत आहेत. नागपूरच्या शासकीय हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरिंग टेक्नॉलॉजी व विनाअनुदानित स्नेह महिला विकास हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरिंग टेक्नॉलॉजी या पदविका संस्थांची विद्यार्थी क्षमता अनुक्रमे ६० आहे. तसेच विनाअनुदान तत्त्वावर नागपूरला नगरयुवक शिक्षण संस्थेची संगणक संस्था, इंदिरा गांधी संगणक संस्था, मेघा संगणक संस्था, विश्वभारती संगणक संस्था, दि प्रिझम संगणक संस्था, तुकडोजी महाराज संगणक संस्था, अभिनव संगणक संस्थेचे कॉम्प्यूटर सायन्स ॲण्ड सॉफ्टवेअर्स इन्स्टिट्यूट, तिरपुडे संगणक संस्था, चैतन्य बहुउद्देशिय शिक्षण संस्था व खापरखेडाला विश्वश्वरैय्या संगणक संस्था कार्यरत असून त्यात प्रत्येकी ६० विद्यार्थी असतात. नागपूरच्या इंगोले इन्स्टिट्यूट ऑफ प्रिंटींग टेक्नॉलॉजी या संस्थेची विद्यार्थी क्षमता ६० आहे. याशिवाय नागपूरला वुमेन्स तंत्रनिकेतन ॲण्ड गारमेंट टेक्नॉलॉजी

(विद्यार्थी १२०), इंडियन तंत्रनिकेतन (विद्यार्थी ३०), महिला इन्स्टिट्यूट ऑफ गारमेंट टेक्नॉलॉजी (विद्यार्थी ४०), ठाकरे इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी (विद्यार्थी ३०) व जुमळे इन्स्टिट्यूट ऑफ गारमेंट टेक्नॉलाजी (विद्यार्थी ४०) या इतर पदविका संस्था कार्यरत आहेत.

औद्योगिक प्रशिक्षण संस्था : नवीन आकृतिबंधानुसार (१०+२+३) इयत्ता ८ वी ते १० वी व उच्चस्तर माध्यमिक पातळीवर इयत्ता ११ वी ते १२ वी मध्ये तांत्रिक शिक्षण दिले जाते. शालान्त परीक्षेला तांत्रिक विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांना तांत्रिक उच्च माध्यमिक शाळा, तंत्रनिकेतने व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रवेश देण्यात येतो. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थ्यांच्या संघाता (वेल्डर), वीजतंत्री, कातारी, शिवण, सुतार, यांत्रिकी, छपाई इत्यादीचे प्रशिक्षण दिले जाते. जिल्ह्यात सन १९५७ मध्ये नागपूर येथे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू झाली. सन १९९६-९७ मध्ये जिल्ह्यात २२ औद्योगिक प्रशिक्षण संस्था होत्या. त्यापैकी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था काटोल (१९८१, प्रवेश क्षमता १७२), उमरेड (१९८४, प्रवेश क्षमता १५६), रामटेक (१९८४, प्रवेश क्षमता १५२), नागपूर (मुलींसाठी, १९८५, प्रवेश क्षमता १४०), सावनेर (१९९१, प्रवेश क्षमता १२८), कळमेश्वर (१९९४, प्रवेश क्षमता ७६), पारशिवणी (१९९५, प्रवेश क्षमता ६०), नरखेड (१९९५, प्रवेश क्षमता ६०), कामठी (१९९५, प्रवेश क्षमता ७६), हिंगणा (१९९५, प्रवेश क्षमता ६०), मौदा (प्रवेश क्षमता ९२), नागपूर ग्रामीण (१९९७, प्रवेश क्षमता ४४), कुही (१९९७, प्रवेश क्षमता ४८) व भिवापूर (१९९७, प्रवेश क्षमता ६४) येथे होत्या. (उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, नागपूरकडून प्राप्त माहिती आधारे.) याशिवाय खतीजाबाई टेक्निकल इन्स्टिट्यूट, नागपूर (१९६७); सेंट जोसेफ टेक्निकल इन्स्टिट्यूट, नागपूर (१९६८); दत्ता मेघे औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागपूर (१९८७); श्रीराम औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बाबदेव (१९८९); औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागपूर (मुलींचे १९८९); इंदिरा गांधी टेक्निकल आणि व्होकेशनल इन्स्टिट्यूट, कळमेश्वर (१९८९); प्रकाश औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागपूर-वाडी (१९८९) या सात अशासकीय संस्था होत्या. सन १९९८-९९ मध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची संख्या ३० झाली. त्यात ४,८३६ विद्यार्थी (३५२ मुली) व ४०० शिक्षक (९२ शिक्षिका) होते.

तंत्र शिक्षण शाळा : नवीन आकृतिबंधानुसार (१०+२+३) इयत्ता ८ वी ते १० वी व उच्चस्तर पातळीवर इयत्ता ११ वी १२ वी मध्ये तांत्रिक शिक्षण दिले जाते. शालान्त परीक्षेला तांत्रिक विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांना तांत्रिक उच्च माध्यमिक शाळा, तंत्रनिकेतन व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रवेश देण्यात येतो. जिल्ह्यात १९९७-९८ मध्ये पटवर्धन उच्च माध्यमिक विद्यालय, नागपूर (स्थापना १९५८, प्रवेश क्षमता ६०) (पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता दिलेली आहे.); शासकीय तांत्रिक विद्यालय, नागपूर (स्थापना १९७०, प्रवेश क्षमता २४०); शासकीय तांत्रिक विद्यालय, देवलापार (स्थापना १९७७, प्रवेश क्षमता १२०); शासकीय तांत्रिक विद्यालय, काटोल (स्थापना १९८४, प्रवेश क्षमता १२०); शासकीय तांत्रिक विद्यालय, सावनेर (स्थापना १९८४, प्रवेश क्षमता १२०) व शासकीय तांत्रिक विद्यालय, नरखेड (स्थापना १९८५, प्रवेश क्षमता १२०), ही शासकीय तांत्रिक विद्यालये होती. शिवाय

अंजुमन हायर सेकंडरी स्कूल, नागपूर (स्थापना १९७०, प्रवेश क्षमता ६०) व कृष्णराव वानखेडे तांत्रिक विद्यालय, कोहली (स्थापना १९८९, प्रवेश क्षमता ६०) ही दोन अशासकीय तांत्रिक विद्यालये होती. या तांत्रिक विद्यालयात पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम, द्विलक्षी अभ्यासक्रम, कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम व प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देण्यात येते. सन १९९८-९९ मध्ये जिल्ह्यातील आठ तांत्रिक शाळांमध्ये १,४९२ विद्यार्थी (१,३०९ मुले + १८३ मुली) होते. (उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, नागपूरकडून प्राप्त माहिती आधारे.)

नागपूर विद्यापीठ

नागपूर विद्यापीठाची स्थापना ४ ऑगस्ट १९२३ रोजी झाली. परंतु त्यापूर्वी १९०२ पासून त्यासाठी प्रयत्न होत होते. सन १९१३ मध्ये राव बहादूर व्ही. आर. पंडित यांच्या प्रयत्नामुळे प्रांतीय सरकारने नागपूर विद्यापीठ स्थापन करण्याची कल्पना मान्य करून त्यासाठी एक समिती स्थापन केली. या समितीने १९१५ मध्ये याबाबतचा अहवाल सादर केला. तथापि पहिल्या महायुध्दामुळे त्यावर कार्यवाही होऊ शकली नाही. युध्दोत्तर काळात, विशेषत: १९२० नंतर या प्रकरणास पुन्हा चालना मिळून तत्कालिन शिक्षण मंत्री एन. के. केळकर यांनी समितीच्या शिफारशीना मूर्त स्वरूप दिले. त्यानुसार छत्तीसगड, जबलपूर, रायपूर व विदर्भासाठी एक विद्यापीठ स्थापन करण्याचे निश्चित केले. यासाठी १ ऑगस्ट १९२३ रोजी संमत केलेल्या कायद्यानुसार नागपूर विद्यापीठ अस्तित्वात आले. या विद्यापीठाचे पहिले कुलगुरू सर बिपिन कृष्ण बोस होते. सन १९२३ ते २००५ या कालावधीतील कुलगुरूची माहिती तक्ता क्रमांक ६ मध्ये दिली आहे.

या विद्यापीठाच्या अधिपत्याखाली भौगोलिक दृष्ट्या फार मोठा भूप्रदेश येत होता, तरी प्रत्यक्षात मात्र विद्यापीठांतर्गत सहा महाविद्यालये (नागपूर येथील हिस्लॉप कॉलेज, मॉरिस कॉलेज व व्हिक्टोरिया कॉलेज ऑफ सायन्स; अमरावती येथील किंग एडवर्ड कॉलेज; जबलपूर येथील राबर्टसन कॉलेज व स्पेन्स ट्रेनिंग कॉलेज), ९१७ विद्यार्थी आणि चार विद्याशाखा होत्या. विद्यापीठाचा पहिला दीक्षान्त समारोह २८ नोव्हेंबर १९२४ रोजी झाला. त्यात ७४ विद्यार्थ्यांना पदवी बहाल करण्यात आली. सन १९२५ मध्ये विद्यापीठ परीक्षेला ८७८ विद्यार्थी बसले होते. याच वर्षी विद्यापीठाने विधि महाविद्यालयाची (डॉ. आंबेडकर विधि महाविद्यालय) स्थापना केली. सर जमशेटजी टाटा यांनी नागपूर विद्यापीठाला एक लाख रुपये देणगी दिली. त्यातूनच १९२७ मध्ये विद्यापीठाची मूळ वास्तू उभी राहिली. सन १९३७ नंतर सरकारने उच्च शिक्षणास प्रोत्साहन देऊन व्यवस्थापनासाठी लागणाऱ्या वार्षिक अनुदानात वाढ केली. त्याचबरोबर खाजगी शिक्षण संस्था निर्माण करण्यास प्रोत्साहन दिले. त्यामुळे १९३८ मध्ये विद्यापीठाशी १७ महाविद्यालये संलग्न होती व त्यात ३,८०१ विद्यार्थी होते. यावर्षी विद्यापीठाने महात्मा गांधीना डॉक्टर ऑफ लॉ ही मानद पदवी देऊन सन्मानित केले. वंदे मातरम् चळवळीत भाग घेतलेल्या ५०० विद्यार्थ्यांना उस्मानिया विद्यापीठातून निष्कासित करण्यात आले. त्यांना विद्यापीठांतर्गत असलेल्या महाविद्यालयात प्रवेश देण्याचा

धाडसी आणि अभूतपूर्व निर्णय या विद्यापीठाने घेऊन त्यांच्या परीक्षा १९३९ च्या मध्यात घेतल्या. तसेच १९४२ च्या चले जाव चळवळीत भाग घेतल्यामुळे ज्यांच्या अध्ययनात व्यत्यय आला त्यांच्यासाठी परीक्षा घेऊन विद्यापीठाने एका विशेष दीक्षांत समारोहाचे आयोजन केले होते. सन १९४३ मध्ये 'स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर' यांना 'डॉक्टर ऑफ लॉ' ही मानद पदवी देऊन सन्मानित केले. दीक्षांत समारोहाचे भाषणासाठी १९३९ मध्ये डॉ. सरोजनी नायडू, १९४४ मध्ये सी. राजगोपालाचार्य व १९४६ मध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांना निमंत्रित केले. यावरून विद्यापीठाचा स्वतंत्र बाणा दिसून येतो.

विदर्भातील शिक्षकांना प्रशिक्षित करण्यासाठी २ जुलै १९४५ रोजी विद्यापीठ शिक्षण महाविद्यालय (एस. के. वानखेडे विद्यापीठ शिक्षण महाविद्यालय) स्थापना करण्यात आले. तर विद्यापीठाने १९४६ मध्ये राज्यशास्त्र व लोकप्रशासन, जीवरसायनशास्त्र आणि भूविज्ञानशास्त्र हे शैक्षणिक विभाग सुरू केले. याचवर्षी जबलपूर येथील राबर्टसन कॉलेज व स्पेन्स ट्रेनिंग कॉलेज सागर विद्यापीठाकडे हस्तांतरित केले. सन १९४७ मध्ये विद्यापीठाशी २४ महाविद्यालये संलग्न होती. त्यात विद्यापीठांतर्गत असलेल्या सहा संस्थांचाही अंतर्भाव होता. स्वातंत्र्योत्तर काळात उच्च शिक्षणाच्या बाबतीत सरकारने जरी पूर्ण जबाबदारी स्वत:वर घेतली नाही, तरी उच्च शिक्षणाची जबाबदारी घेऊ इच्छिणाऱ्या खाजगी व्यक्ती आणि संस्थांना प्रोत्साहन दिले. त्यामुळे १९६८-६९ मध्ये विद्यापीठाशी संलग्न असलेल्या ९७ महाविद्यालयांमध्ये ५६,५२२ विद्यार्थी व २,३२२ अध्यापक होते. यावर्षी विद्यापीठात १३१ परीक्षा केंद्रांमधून ६९,०७१ परीक्षार्थी बसले होते. सन १९७८-७९ मध्ये १३८ महाविद्यालये, ४१,९७९ विद्यार्थी, ५९,८३५ परीक्षार्थी व १८९ परीक्षा केंद्रे होती. सन १९८३ मध्ये अमरावती विद्यापीठाची स्थापना झाल्यामुळे अमरावती, यवतमाळ, बुलाढाणा, अकोला व वाशीम या जिल्ह्यांतील महाविद्यालये त्या विद्यापीठाशी संलग्न करण्यात आली. तथापि १९८३ ते १९९९-२००० हा कालखंड विचारात घेतला तर या बदलाचा फारसा प्रतिकूल परिणाम झाला नाही. परंतु तालुका पातळीवरची महाविद्यालये तर स्थिरावलीच त्याचबरोबर खेड्यांकडे नव्या संस्थांचा ओघ वाढू लागल्यामुळे १९९९-२००० मध्ये या विद्यापीठाशी ३०५ संलग्न महाविद्यालये झाली. त्यांपैकी १२ शासकीय महाविद्यालये व २९३ अशासकीय महाविद्यालये होती.

सन १९६९ मध्ये अकोला येथे डॉ. पंजाबराव कृषि विद्यापीठ स्थापन झाले. त्यामुळे नागपूर विद्यापीठांतर्गत असलेली कृषि व पशुवैद्यकीय विद्याशाखा अकोला येथील विद्यापीठाशी संलग्न झाल्या. नागपूर विद्यापीठात सन १९९९-२००० मध्ये वाङ्मय, विज्ञान, वैद्यक, वाणिज्य, विधी, शिक्षण, अभियांत्रिकी व तांत्रिक, गृहविज्ञान व आयुर्वेद या विद्याशाखा होत्या. या विद्याशाखांनुसार असलेल्या महाविद्यालयांची आकडेवारी पुढे दिली आहे.

अ.क्र.	विद्याशाखा	महाविद्यालयांची संख्या
१.	वाङ्मय व समाजविज्ञान	२९
२.	वाङ्मय, समाजविज्ञान व वाणिज्य	६८
३.	विज्ञान	१४
४.	वाणिज्य	८
५.	आयुर्वेद	३
६.	विधि	३
७.	शिक्षण	७५
८.	अभियांत्रिकी	१६
९.	तांत्रिकी	२
१०.	ग्रंथालयशास्त्र	८
११.	वैद्यक	५
१२.	दंत	३
१३.	औषधी	३
१४.	समाज कार्य	२१
१५.	ललित कला	२
१६.	संगीत	१
१७.	वृत्त विद्या	२
१८.	वाङ्मय, समाजविज्ञान व विज्ञान	४
१९.	वाङ्मय, समाजविज्ञान, विधि व गृहविज्ञान	१
२०.	विधी व गृहविज्ञान	१
२१.	विज्ञान व वाणिज्य	१
२२.	वाङ्मय व समाजविज्ञान, विज्ञान व गृहविज्ञान	१
२३.	होमिओपॅथी ॲण्ड बायोकेमिस्ट्री	४
२४.	हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरिंग	३
२५.	युनानी	१
२६.	वाङ्मय, समाजविज्ञान, विज्ञान आणि वाणिज्य	२८
२७.	वाङ्मय, समाजविज्ञान, वाणिज्य व विधी	२
२८.	वाङ्मय, समाजविज्ञान व गृह विज्ञान	२
२९.	वाङ्मय, समाजविज्ञान, विज्ञान वाणिज्य व विधि	१
३०.	वाङ्मय, समाजविज्ञान, विज्ञान, वाणिज्य, गृहविज्ञान व तांत्रिकी गृहविज्ञान आणि वास्तुविज्ञान	१
३१.	समाजविज्ञान	१
३२.	कॉम्प्यूटर सायन्स	१

तसेच जून २००० अखेर विद्यापीठात प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती व पुरातत्व (१९५५), ग्रंथालय व माहितीशास्त्र (१९५६), औषधिनिर्माण शास्त्र (१९५६), इंग्रजी (१९५८), मराठी (१९५८), संस्कृत (१९५८), पाली-प्राकृत (१९५८), हिंदी (१९५८), तत्त्वज्ञान (१९५८), अर्थशास्त्र (१९५८), विधि (१९६३), वनस्पतीशास्त्र (१९६३), रसायनशास्त्र (१९६३), प्राणीशास्त्र (१९६३), गणित (१९६३), पदार्थविज्ञान (१९६३), समाजशास्त्र (१९६३), मानसशास्त्र (१९६३), गृहविज्ञान (१९६८), जनसंवाद (१९६९),

भाषाशास्त्र, परकीय व भारतीय भाषा (१९६९), व्यवसाय प्रबंधन (१९७०), सांख्यिकीशास्त्र (१९७६), सूक्ष्म जीवशास्त्र (१९७६), शिक्षण (१९७७), गांधी विचार धारा (१९७९), ललित कला (१९८०), प्रवास आणि पर्यटन (१९८५), शारीरिक शिक्षण (१९८६), विद्युत परमाणूशास्त्र (१९८६), डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा (१९८८) व सेंटर फॉर सेरिकल्चर ॲण्ड बायोलॉजिकल पेस्ट मॅनेजमेंट रिसर्च (१९८८) हे अभ्यासक्रम सुरू होते. या शैक्षणिक विभागांमध्ये १९९९-२००० मध्ये २,७६५ विद्यार्थी व २,५६६ परीक्षार्थी होते. याशिवाय ऑक्टोबर १९९९ ते २८ फेब्रुवारी २००० पर्यंत विविध शाखामधून १०८ विद्यार्थ्यांनी आचार्य पदवी (पी. एचडी.) प्राप्त केली होती.

विद्यापीठाचे स्वतंत्र ग्रंथालय असून ते १९२३ मध्ये स्थापन झाले. त्याशिवाय विद्यापीठाची वसतिगृहे आहेत. महिला विद्यार्थी वसतिगृह १९६६ मध्ये सुरू झाले. औषधिशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांसाठी डिसेंबर १९८७ मध्ये एक स्वतंत्र वसतीगृह सुरू करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त वाढावी यासाठी विद्यापीठात नॅशनल कॅडेट कॉर्प्सची निर्मिती करण्यात आली. त्याचवेळी महाविद्यालयांमध्ये शारीरिक शिक्षणाचे विभाग सुरू करण्यात आले. राज्य पातळीवर व राष्ट्रीय पातळीवर वेगवेगळ्या खेळांमध्ये विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळू लागली. विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव मिळण्यासाठी विद्यापीठाने छंद मंदिराची निर्मिती केली. याशिवाय विद्यापीठाने १९६९ मध्ये राष्ट्रीय सेवा योजना सुरू केली. ही योजना प्रारंभीच्या कालावधीत आठ जिल्ह्यातील १० महाविद्यालयात सुरू होती. सन १९९८ मध्ये १९८ महाविद्यालयात ही योजना कार्यान्वित होती. या योजनेत २७३ कार्यक्रमाधिकारी व २२,००० विद्यार्थी सहभागी झाले होते. १८ सप्टेंबर १९७८ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आर्थिक सहकार्याने 'प्रौढ शिक्षण आणि विस्तार सेवा विभाग' स्थापन करण्यात आला. इ. स. १९८२ मध्ये या विभागाची पुनर्रचना करून निरंतर व प्रौढ शिक्षण आणि विस्तार विभाग सुरू करण्यात आला. जुलै १९८८ पासून ॲकॅडेमिक स्टॉफ कॉलेज सुरू झाले असून त्यात शिक्षकांकरिता उद्‌बोधन वर्ग तसेच ५ वर्षाचा सेवाकाळ पूर्ण करणाऱ्या अधिव्याख्याताकरिता उजळणी वर्गांचे आयोजन करण्यात येते. याव्यतिरिक्त १९९५ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन स्थापन करण्यात आले.

कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ : या विद्यापीठाची स्थापना रामटेक येथे १८ सप्टेंबर १९९७ ला झाली. हे विद्यापीठ महाराष्ट्रातील पहिले संस्कृत विद्यापीठ असून भारतातील नववे संस्कृत विद्यापीठ आहे. या विद्यापीठात संस्कृत भाषेतून लिहिल्या गेलेल्या विज्ञान, तंत्रज्ञानाचा अभ्यास होणार आहे. या विद्यापीठाने ११ पदविका अभ्यासक्रम सुरू केले आहेत. त्यात आगम, साधना, पाली व प्राकृत हे भाषाविषयक अभ्यासक्रम असून वास्तुशास्त्र, योगशास्त्र, वेदांग, ज्योतिबा, संगीत, पर्यावरण, संस्कृती व नीतिमूल्य हे विज्ञान आणि परंपराविषयक अभ्यासक्रम आहेत. पदवीस्तरावर विद्यापीठाने विशारद, स्नातक, व्यावसायिक स्नातक, प्रशासकीय सेवा, वेदांग ज्योतिष आणि योगविद्या हे अभ्यासक्रम सुरू केले आहेत. पदव्युत्तर स्तरावर एम. एम. (पारंगत) अभ्यासक्रम सुरू केला असून त्यात साहित्य, वेद, व्याकरण धर्मतत्त्वज्ञान, संस्कृती, वेदांत, प्राचीन, विज्ञान, तंत्रज्ञान, प्राच्यविद्या

अभ्यास व संशोधन, रामायण, महाभारत, पुराण, योगशास्त्र, या विषयांचे अध्ययन केले जाते. विद्यापीठाचे नागपूर व मुंबई येथे केंद्र असून नाशिक, यवतमाळ येथे अभ्यासक्रम सुरू झाले आहेत. डॉ. चांहदे यांची प्रथम कुलगुरू म्हणून नियुक्ती केली गेली.

इ. स. १९९८-९९ या पहिल्याच शैक्षणिक सत्रात रामटेक व नागपूर या दोन केंद्रात आगम या एकाच अभ्यासक्रमासाठी सुमारे १,००० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. या अभ्यासक्रमात मातृभाषा पध्दतीने संस्कृत शिकविले जाते. इ. स. १९९९-२००० या शैक्षणिक सत्रात विविध अभ्यासक्रम सुरू झाले असून सर्व अभ्यासक्रमातील विद्यार्थी संख्या १,२०० होती.

ग्रंथालये

नागपूरला नेटिव्ह जनरल लायब्ररी म्हणजेच आजचे राष्ट्रीय वाचनालय १८८२ मध्ये स्थापन झाले. पुढे १८९५ मध्ये नागपूरला राजाराम सीताराम दीक्षित वाचनालयाची औपचारिकरीत्या जरी स्थापना झाली असली तरी ते १८६९ पासून अस्तित्वात होते. सन १९०७ मध्ये रामकृष्णपुरी वाचनालय सुरू झाले. मुंबई ग्रंथालयाच्या धर्तीवर दादीबाई देशमुख कन्या शाळेत १९१५ मध्ये एक ग्रंथालय सुरू झाले. हे ग्रंथालय सुरू करण्यामध्ये मुख्यत: शं. ज. खोत यांचे प्रयत्न होते. परंतु ते प्रयत्न अल्पजीवी ठरले व ते ग्रंथालय दादीबाई देशमुख कन्या शाळेला जोडण्यात आले. इ. स. १९१५-१९४८ या कालावधीत जिल्ह्यात खेड, धापेवाडा, बोरी व मुधोळ येथे जनपद वाचनालय, नागपूर येथे सदर मुस्लिम ग्रंथालय, शहामुलजी देवजी ग्रंथालय, नागपूर विद्यापीठ ग्रंथालय, अभ्युदय ग्रंथालय, मुस्लिम ग्रंथालय, हिंदुधर्म संस्कृती मंदिर, सरस्वती वाचनालय, आंध्र क्लब ग्रंथालय, ग्रामीण प्रचार समिती, रामकृष्ण आश्रम वाचनालय, कामठी येथे अंजुमन इस्लामिक ग्रंथालय व आझाद ग्रंथालय, मौदा येथे नूतन वाचनालय, काटोल येथे विश्वेश्वर वाचनालय, मोहपा येथे मोहपा म्युनिसिपल वाचनालय आदि वाचनालये सुरू झाली. नागपूर महानगरपालिकेने १ एप्रिल १९४८ ला एक वाचनालय सुरू केले. सन १९५५ मध्ये या वाचनालयात राष्ट्रमाता कस्तुरबा वाचनालयाचे विलीनीकरण झाल्यावर त्याचे कस्तुरबा नगरपालिका वाचनालय असे पुनर्नामाभिधान करण्यात आले. सन १९६३-६४ मध्ये शासन मान्यता असलेली २१ ग्रंथालये होती व त्यांना ५,२४२ रुपये अनुदान मंजूर केले होते.

महाराष्ट्र शासनाने ग्रंथालय विधेयक मांडल्याने १९६७ मध्ये राज्यात ग्रंथालय कायदा प्रथमच पास झाला. सन १९७१ पासून नवीन अनुदान संहिता अस्तित्वात आल्यावर ग्रंथालयांची ग्रंथसंपदा व सदस्य संख्या लक्षात घेऊन त्यांचे अ, ब, क, ड प्रवर्गात वर्गीकरण करण्यात आले. सन १९९० मध्ये शासकीय अनुदान प्राप्त १६२ ग्रंथालये होती. दिनांक ३१ मार्च २००२ रोजी त्याची संख्या २०० झाली. त्यात सात अ वर्गीय, ३३ ब वर्गीय, ७८ क वर्गीय व ८२ ड वर्गीय होती.

सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय सेवा

इतिहास : तिसऱ्या रघुजीच्या वेळेस १८४९ मध्ये नागपूरला एक दवाखाना (सिटी

हॉस्पिटल) बांधण्यात आला. हेच सध्याचे मेयो सार्वजनिक रुग्णालय होय. हा दवाखाना बांधण्यास रेसिडेंसी सर्जन डॉ. मॉइंटायर यांनी सूचना केली होती. राजेसाहेबांनी या दवाखान्याची इमारत स्वखर्चाने बांधून दिली. त्याशिवाय १,१०० नागपूरी रुपये दरमहा या संस्थेच्या व्यवस्थेकरिता देण्यात येत असत. रुग्णांच्या जेवण्याची व्यवस्था व आरोग्याधिकाऱ्याचा सर्व खर्च यातून होत असे. सन १८५३ मध्ये नागपूर प्रांत खालसा झाल्यावर इंग्रज कंपनीच्या कोर्ट ऑफ डायरेक्टर्सनी आपल्या दिनांक १२ नोव्हेंबर १८५६ च्या पत्रात लिहिले होते की, 'मराठ्यांच्या काळात इंग्रजी प्रभावामुळे का होईना, नागपूरकर गरीब जनतेला हॉस्पिटल संबंधी ज्या सुखसोयी प्राप्त होत आहेत. त्या चालू ठेवण्यात येतील असा आम्हाला भरवसा वाटतो.' ब्रिटीशांच्या काळात सुरुवातीला सिटी हॉस्पिटलवर पुढीलप्रमाणे खर्च करण्यात येत असे :-- १) सिव्हिल सर्जन भत्ता रु. १००, २) नेटिव्ह डॉक्टर रु. ७०, ३) मद्रास सेकंड ड्रेसर रु. २५, देवी टोचणारे प्रत्येकी रु. १० प्रमाणे एकूण रु. ३०, ४) नोकरवर्ग जेवण व इतर खर्च रु. ६४. नेटिव्ह डॉक्टर नंतर सब असिस्टंट सर्जनची नेमणूक करण्यात आली. हा सर्व खर्च प्रांतिक सरकार करीत असे. **(नागपूर नगरसंस्था शताब्दि ग्रंथ**, १९६४, पृ. १०१-१०२.) या दवाखान्याचे सिव्हिल सर्जन डॉ. डब्ल्यू डब्ल्यू ह्यूड होते. या दवाखान्याच्या दोन स्वतंत्र इमारतीत अनुक्रमे ५ व ३ खोल्या होत्या. स्त्री व पुरूष रुग्णांची स्वतंत्र व्यवस्था होती. त्यावेळी देवी टोचण्याकरिता वर्षातून जास्तीत जास्त एक हजार लोक येत. हा दवाखाना सिताबर्डी व सिव्हिल विभागापासून बरेच अंतरावर असल्यामुळे तेथील लोकांच्या सोयीसाठी सिताबर्डी येथे बाह्य रुग्णालय स्थापन केले. या दवाखान्यात शल्यचिकित्सेची अल्प प्रमाणात व्यवस्था होती. सन १८६२ मध्ये नागपुरातील महाल विभागात सिटी हॉस्पिटलची शाखा सुरू केली. या धर्मादाय दवाखान्यासाठी सिव्हिल सर्जन डॉ. ह्यूड यांनी गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसी यांच्या स्मरणार्थ दोन हजार रुपये देणगी दिली. यानंतर रा. ब. बंसीलाल अबीरचंद यांनी रु. ७,००० ची देणगी दिली. या दवाखान्यात प्रथम श्रेणीचे नेटिव्ह डॉक्टर मीर इनायत हुसैन यांची नेमणूक करण्यात आली होती. (पूर्वोक्त, १९६४, पृ. १०२.) सन १८७४ मध्ये सिटी हॉस्पिटलचे मेयो मेमोरिअल हॉस्पिटल असे नामाभिधान करण्यात आले. तथापि १८७५ पासून फक्त मेयो हॉस्पिटल हे नाव रूढ झाले. **(धन्वंतरी**, १९९२, इंदिरा गांधी मेडिकल कॉलेज, नागपूर.) या दवाखान्याचा विकास लेडी डफरिन फंड सारख्या अनेक धर्मादाय संस्थानी मदत केल्यामुळे झाला. हे रुग्णालय १८.२११ हेक्टरमध्ये वसलेले असून त्यात ५०० रुग्णांची सोय होते. प्रादेशिक मनोरुग्णालय जबलपूर येथे १८६४ मध्ये स्थापन झाले व १९०४ मध्ये ते नागपूरला स्थलांतरित करण्यात आले. (वैद्यकीय अधीक्षक, प्रादेशिक रुग्णालय, नागपूर यांचे माहितीवरून.) त्यात जवळजवळ ६१० रुग्ण राहण्याची सोय उपलब्ध आहे. स्कॉटीश मिशनने नागपूरला १८९१ मध्ये दवाखाना व १८९६ मध्ये महिला व बालकांसाठी म्युर मेमोरिअल हॉस्पिटलची स्थापना केली. सन १९०५-०६ मध्ये जिल्ह्यात वीस रुग्णालये व दवाखाने होते. त्यापैकी १२ नागपुरात होते. त्यात मेयो हॉस्पिटल, डफरीन हॉस्पिटल, म्यूर मेमोरिअल मिशन हॉस्पिटल आणि प्रत्येकी दोन दवाखाने रेल्वे व गिरणीचे होते. मेयो हॉस्पिटल चांगले सुसज्ज होते व त्यात ८४ खाटा होत्या. रुग्णालयात खाजगी

कक्ष होते. त्यात ब्रिटिशांची विशेष सोय करण्यात येत असे. रुग्णालयातील शस्त्रक्रिया दालनावर रु. २२,००० खर्च केले होते. डफरीन हॉस्पिटलची प्रमुख डॉक्टर महिला होती. त्यात ३५ खाटा होत्या. स्कॉटिश युनायटेड फ्री चर्च मिशनचे म्युर मेमोरिअल हॉस्पिटल मध्ये २० खाटा होत्या. या दवाखान्यातही प्रमुख मुख्य डॉक्टर महिला होती. याशिवाय जिल्ह्यात १२ सार्वजनिक दवाखाने होते. त्यापैकी पाच नागपुरात व प्रत्येकी एक उमरेड, रामटेक, खापा, काटोल, मोवाड, कुही व सावनेरला होता. तसेच सावनेर येथे स्कॉटिश फ्री चर्च मिशन एक दवाखाना चालवित असे. सावनेर व कुही येथील दवाखान्याची इमारत बांधण्यासाठी निधी गोळा केला. परंतु त्यावर्षी दवाखान्याची इमारत बांधण्यात आली नाही. तसेच कळमेश्वर व पारशिवनी येथे सार्वजनिक दवाखाना सुरू करण्यासाठी लोकांकडून वर्गणी गोळा केली. उमरेड व काटोल येथील दवाखान्यात रुग्णांसाठी दोन वार्ड होते व त्यात प्रत्येकी ११ व ८ खाटांची सोय होती. खापा येथील दवाखान्यास लहान कक्ष (वार्ड) जोडला होता. तसेच रामटेक येथील दवाखान्यात दोन मोठे कक्ष (वार्ड) बांधून देण्याचे समृध्द ठेकेदारांनी मान्य केले होते. सन १९०६ मध्ये १२ दवाखान्यामध्ये १,२९७ आंतररुग्ण व २,५९,२१२ बाह्यरुग्णांवर उपचार करण्यात आले. दररोज सरासरी ६६ आंतररुग्ण व १,५८८ बाह्यरुग्ण उपचार घेत होते. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९०८, पृ. २७१-७२.) या दवाखान्यांपैकी नऊ दवाखान्यांत प्रसाविका होत्या. यावर्षी १२ दवाखान्यांचे उत्पन्न रु. ५५,३७७ होते. हे उत्पन्न मध्यप्रांतचा महसूल, स्थानिक निधी (लोकल फंड) व खाजगी वर्गणीद्वारे प्राप्त झाले होते. याच वर्षी नागपूरच्या मनो रुग्णालयात १५० सहवासी होते. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९०८, पृ. २७२) याशिवाय कामठी येथील छावणी दवाखान्यात नागरिकांना वैद्यकीय मदत पुरविली जात होती. त्यात ३० आंतररुग्णांची सोय होती. स्त्रियांच्या दवाखान्यात १४ खाटा होत्या. हा दवाखाना मुख्य इमारतीच्या अतिशय जवळ होता. तथापि या दवाखान्याचा उपयोग संस्था व विशिष्ट वर्गच करीत होता. हा दवाखाना सदर बाजाराच्या मध्यवर्ती भागात फार लोकप्रिय होता. एप्रिल १९०७ मध्ये हा दवाखाना रॉयल आर्मी मेडिकल कॉर्पोरेशनच्या अधिकाऱ्याचे नियंत्रणाखाली आणून त्यांना भत्ता म्हणून दरमहा रु. १८० छावणी निधीतून दिले जात असत. तसेच कामठीतील सदर बाजार भागात छावणी प्राधिकरणाकडून प्रमाणपत्र घेऊन काही खाजगी दवाखाने सुरू होते. त्यापैकी अत्यंत उपयोगी व चांगली व्यवस्था असलेली सेंट मेरी डिस्पेन्सरी होती. ही सेंट जोसेफच्या परिसेविकेच्या नियंत्रणाखाली होती. सन १९०५-०६ मध्ये या दवाखान्यात ७,१५० बाह्यरुग्णांवर मोफत उपचार करण्यात आले. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९०८, पृ. २८९-९०.)

सन १९१०-११ मध्ये गरीब व मध्यमवर्गीय स्त्रियांसाठी वेगळ्या औषधालयाची गरज लक्षात घेऊन दवाखाना बांधण्यासाठी रा. ब. बापुराव दादा, उपाध्यक्ष, नागपूर नगरपालिका, यांनी रु. ११,००० ची देणगी दिली. या दवाखान्यात एक सुतिकेची खोली ठेवण्याची सोय

केली. या दवाखान्याची प्रमुख म्हणून स्त्री सब असिस्टंट सर्जनची नियुक्ती करण्याचे ठरले. या दवाखान्याचे नियंत्रण 'सेंट्रल प्रॉव्हीन्सेस ब्रँच ऑफ दी नॅशनल असोशिएशन फॉर सप्लाय ॲण्ड फीमेल मेडिकल एड टू दी वुइमेन ऑफ इंडिया' या संघटनेकडे होते. हा सुतिकागृहवजा दवाखाना जानेवारी १९१४ मध्ये सुरू झाला. यावर्षी दोन सुतिका भरती करण्यात आल्या व १२८३ स्त्रियांवर औषधोपचार करण्यात आला. या दवाखान्याच्या प्रमुख स्त्री डॉक्टरचे वेतन सरकार देत असे व बाकीच्या कर्मचाऱ्यांचे वेतन आणि इतर खर्च नगरपालिका फंडातून होत असे. आठवड्यातून दोन दिवस डफरीन हॉस्पिटलच्या लेडी सुपरिटेन्डेट या दवाखान्याला भेट देत असत. यावेळी चार स्त्री परिचारिका वा दाईची नियुक्ती करण्यात आली. (जोशी, प. ल., **नागपूर नगरसंस्था शताब्दि** ग्रंथ, नागपूर महानगरपालिका, १९६४, पृ. १०३.) याच वर्षी नागपूरला रॉबर्टसन मेडिकल स्कूलची स्थापना झाली. सन १९१८ मध्ये स्त्रियांसाठी डागा मेमोरिअल हॉस्पिटल स्थापन झाले. हे रुग्णालय मेयो रुग्णालयास संलग्न होते. ऑक्टोबर १९२३ पासून प्रांतिक सरकारकडून दाजी डिस्पेन्सरी, रा. ब. बन्सीलाल डिस्पेन्सरी, बुटी डिस्पेन्सरी, डिक डिस्पेन्सरी, सिव्हिल स्टेशन डिस्पेन्सरी व इंदोरा दवाखाना यापैकी पहिली तीन औषधालये नागपूर नगरपालिकेला व सिव्हिल स्टेशन डिस्पेन्सरी सब कमेटीला हस्तांतरित करण्यात आली. सन १९२३ मध्ये शहर विभागातील प्रत्येक डिस्पेन्सरीत दररोज सरासरी ११२ रुग्णांवर उपचार करण्यात येत होते. प्रत्येक डिस्पेन्सरीत एक दाई व दोन कंपाऊंडर होते. पालिकेच्या दवाखान्याचे डॉक्टर हे शासकीय होते. परंतु त्यांची सेवा पालिकेने उसनी घेतलेली होती. सन १९२३-२४ मध्ये नागपूरला महानगरपालिकेने पृथःकरण दवाखाना व कमलाताई हॉस्पेट यांनी मातृसेवा संघाचे सुतिकागृह सुरू केले. सन १९३३-३४ मध्ये नागपूर महानगरपालिकेने दोन आयुर्वेदिक व दोन युनानी दवाखाने सुरू केले. त्यानंतर जवळ जवळ २२ वर्षात एकाही दवाखान्याची भर पडली नाही. परंतु सिव्हिल स्टेशन सब कमेटीने १९४६ मध्ये नागपूरला एक आयुर्वेदिक दवाखाना सुरू केला. या दवाखान्याच्या परिसरात १९४७ मध्ये स्त्रियांसाठी दवाखाना स्थापन केला. याचवर्षी नागपूर येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय स्थापन झाले. या रुग्णालयात सर्व सोयी उपलब्ध होत्या. सन १९५८ मध्ये जिल्ह्यात १२ रुग्णालये होती व त्यात १,३०७ खाटा होत्या. याचवर्षी या दवाखान्यांमध्ये ७,८९,१७६ रुग्णांवर उपचार करण्यात आले. त्यापैकी ४१,५०७ आंतररुग्ण व ७,४७,६०२ बाह्य रुग्ण होते. या वर्षी विषम चिकित्सेचे २१ दवाखाने होते. जिल्ह्यात १७३ डॉक्टर होते. त्यापैकी १५२ नागरी विभागात व २१ ग्रामीण विभागात होते. तसेच ३७० परिचारिका होत्या. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९६६, पृ. ६४९.) सन १९६० मध्ये १७ रुग्णालये, २२ दवाखाने (सरकारी किंवा सरकारी मदत मिळणारे दवाखाने) दोन प्रसुतिगृहे व २९ ग्रामीण उपचार केंद्रामधून एकूण ३०,३१३ आंतर व १०,४७,२०५ बाह्य रुग्णांवर उपचार करण्यात आले. त्यात १,७१२ खाटा, १३४ डॉक्टर व १६३ परिचारिका होत्या. त्याशिवाय जिल्ह्यात ५२ आयुर्वेदिक दवाखाने होते. त्यापैकी १५ दवाखान्यांना शासकीय मदत दिली जात होती. **(जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ,** १९६१, पृ. २५.) त्यावर्षी भिषक (फिजिशियन), शल्य चिकित्सक (सर्जन), दंतवैद्य, परिचारिका, औषध निर्माते व इतर वैद्यकीय व आरोग्य विषयक तंत्रज्ञ म्हणून काम

करणाऱ्यांची संख्या ३,४६१ होती. जिल्ह्यात दर एक लाख लोकसंख्येमागे वैद्यकीय व्यवसायीकांची संख्या ८१ होती. सन १९६२ पासून जिल्हा परिषदेची प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये व कुटीर रुग्णालयांद्वारा ग्रामीण जनतेसाठी आरोग्य सेवा उपलब्ध झाल्या.

जिल्ह्यात १९७१-७२ मध्ये खाजगी व सार्वजनिक अशी २५ रुग्णालये, १३ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ९९ दवाखाने व दोन क्षयरोग रुग्णालये कार्यरत होती. त्यात एकूण ३,९४६ खाटा होत्या. गरीब व ग्रामीण रुग्णांना कमी खर्चात उपचार मिळावा या उद्देशाने १९७४ मध्ये नागपूरला राष्ट्रसंत तुकडोजी रिजनल कॅन्सर सेंटरची स्थापना झाली. त्यात ६० खाटांची सोय आहे. डिसेंबर १९८१ अखेर सार्वजनिक आणि सार्वजनिक सहाय्यात संस्थाप्रणित ४७ रुग्णालये, १३ प्राथमिक आरोग्य केंद्रे चार ग्रामीण रुग्णालये, १५८ दवाखाने, सहा प्राथमिक आरोग्य पथके व तीन क्षयरोग रुग्णालये आणि रुग्ण चिकित्सालये कार्यरत होते. त्यात एकूण ५,७११ खाटा होत्या. याशिवाय जिल्ह्यात २८ प्रसुतिगृहे होती. **(जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन**, नागपूर जिल्हा, १९८१-८२, पृ. ११४.) सन १९९१ मध्ये जिल्ह्यात २९ रुग्णालये, १३५ दवाखाने, २६ प्रसुतिगृहे व ४८ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यरत होती. त्यात ८८३ डॉक्टर व वैद्य, १,९१६ परिचारिका व ५,०६२ खाटा होत्या. यावर्षी ३,५६,६०० आंतर रुग्ण व ८४,००,६०० बाह्य रुग्णांवर उपचार करण्यात आले. सन १९९९ मध्ये सार्वजनिक व अर्थसहाय्यीत संस्थाप्रणित २३ रुग्णालये, १२४ दवाखाने, २३ प्रसुतीगृहे व ४५ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ३०० आरोग्य उपकेंद्रे कार्यरत होती. त्यात ४११ डॉक्टर व १८६८ परिचारिका होत्या तर दर लाख लोकसंख्येमागे सार्वजनिक वैद्यकीय संस्थांतील खाटाची संख्या १५२ होती. तसेच उपचार केलेल्या आंतररुग्णांची संख्या ४,९५,३०० व बाह्यरुग्णांची संख्या १९,९८,२०० होती. **(जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन**, नागपूर जिल्हा, १९९९-२०००, पृ. १५५.)

जन्म-मृत्यू : जिल्ह्यात नागरी भागात जन्म मृत्यूची नोंद नगरपालिका ठेवित असे. जन्म मृत्यूची सांख्यिकीय आकडेवारी सॅनेटरी इन्स्पेक्टर जमा करीत. ग्रामीण भागात पोलीस पाटील अशाप्रकारच्या नोंदी घेऊन मामलेदारद्वारा आरोग्य खात्याच्या उप आयुक्ताकडे पाठवित असत. सध्या ग्रामीण भागात ही नोंद ग्रामसेवक ठेवतो. सन १८८१-१८९० या कालावधीत जिल्ह्यातील जन्म दर अनुक्रमे ४१.५ व मृत्यू दर ३१.९ होता. सन १८९९ मध्ये जिल्ह्यात प्लेगचा प्रार्दुभाव होऊन १८९९-१९०० मध्ये नागपूर शहरातील १,००० लोक मृत्यूमुखी पडले. सन १९०२-०३ मध्ये या रोगाची मोठ्या प्रमाणावर लागण होऊन जिल्ह्यातील ७,५०० लोक मृत्यूमुखी पडले. त्यामध्ये नागपूर शहरातील ६,३०० लोक होते. ही साथ १९०३-०४ पर्यंत जिल्ह्यात कायम राहिली. त्यामुळे यावर्षी जिल्ह्यातील १८,००० लोक मृत्यूमुखी पडले. त्यामध्ये नागपूर व कामठी शहरातील अनुक्रमे ८,००० व ३,७०० लोक होते. सन १९०४-०५ मध्ये प्लेगची साथ मोठ्या शहरात नव्हती तरीसुध्दा जिल्ह्यातील १,४०० लोक मृत्यूमुखी पडले. सन १९०५-०६ मध्ये या रोगाची मोठ्या प्रमाणावर लागण होऊन ६,००० लोक मृत्यूमुखी पडले. त्यापैकी ४,६०० लोक नागपूर शहरातील होते. सन १९०६-०७ मध्ये उंदीर मारण्याची मोहिम राबविण्यात येऊन अदमासे

१,००,००० उंदीर मारण्यात आले. परिणामी ऑगस्ट १९०६ ते मार्च १९०७ या कालावधीत ८,००० पेक्षा कमी लोक मृत्यूमुखी पडले. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९०८, पृ. ६४-६५.) या साथीने सन १९०९ मध्ये उग्ररूप धारण करून ती बराच काळपर्यंत अस्तित्वात होती. सन १९११ मध्ये जिल्ह्यातील जन्म व मृत्यू दर अनुक्रमे ४८ व ४४ होते. **(सेन्सस ऑफ इंडिया, १९११,** व्हॉल्यूम १०, सेंट्रल प्रॉव्हिसेंस ॲण्ड बेरार पार्ट-१, पृ. ४०.) सन १९११-१२ मध्ये प्लेगची साथ आटोक्यात आणण्यासाठी कॅप्टन मॉरिसन यांचे देखरेखीखाली एक पथक उभारण्यात आले. त्याच सुमारास ऑक्टोबर १९११ मध्ये प्लेगच्या साथीमुळे धापेवाडा व नरखेड येथील बऱ्याच लोकांनी नागपूरात स्थलांतर केले. त्यामुळे नागपूर शहरात १९१३ मध्ये प्लेगचा प्रसार झाला. तो एप्रिल १९१४ पर्यंत कायम होता. या काळात नागपूर शहरातील ४,६१५ लोक मृत्यूमुखी पडले. नागपूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने केलेल्या उपाययोजनाना न जुमानता प्लेगची साथ १९२० पर्यंत नागपूर शहरात कायम राहिली. सन १९२१ मध्ये जिल्ह्यात नागरी व ग्रामीण भागातील जन्मदर दर हजारी अनुक्रमे ४१ व ४१.३ होता. तर मृत्यू दर अनुक्रमे ४८.६ व ४०.८ होता. सन १९३१ मध्ये जन्म दरात वाढ होऊन तो अनुक्रमे ४१.९ व ४९.२ झाला. तथापि मृत्यू दर कमी होऊन तो अनुक्रमे ३२.६ व ३४.६ झाला. **(सेन्सस ऑफ इंडिया, १९३१,** व्हॉल्यूम १२, सेंट्रल प्रॉव्हिसेंस ॲण्ड बेरार पार्ट-१, पृ. ८३.) स्वातंत्र्य प्राप्तीनंतर जिल्ह्यात साथीच्या रोगावर व इतर रोगावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजना करण्यात आल्या. सन १९६१ मध्ये जन्म संख्या ७१,५९७ व मृत्यूसंख्या ३७,८३१ तर बालमृत्यू संख्या ६,४१० होती. सन १९८१ मध्ये जन्म, मृत्यू व बालमृत्यूचे दरहजारी प्रमाण अनुक्रमे २०.८, ६.७ व ४० होते. सन १९९१-९२ मध्ये जन्मसंख्या ५४,८२७ व मृत्यूसंख्या १८,२७८ होती. तर जन्मदर १७०८ व मृत्यूदर ५.६ होता. बालमृत्यूचा दर २२ होता. सन १९९९ मध्ये जन्म संख्या ७५,६२५, मृत्यूसंख्या २१,१९० व बालमृत्यूची संख्या ७२० होती तर दरहजारी जन्मदर १९.४७ व मृत्यूदर ५.४६ होता. तक्ता क्रमांक ७ मध्ये १९५६ ते १९९९-२००० पर्यंतची निवडक वर्षांची रोगनिहाय मृत्यूविषयक आकडेवारी दिलेली आहे.

रोग प्रतिबंधक उपाय : आधुनिक औषधे व उपचार पध्दतीच्या संशोधनापूर्वी कॉलरा, देवी, गोवर, घटसर्प, क्षय, हत्तीरोग, धर्नुवात, पोटाचे व आतड्याचे विकार, हिवताप तसेच श्वसन विषयक रोग जिल्ह्यात अस्तित्वात होते. हिवताप, हत्तीरोग, क्षय व कुष्ठरोगावर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष पथकांची स्थापना करण्यात आली. साथीच्या रोगांविरुध्द प्रतिबंधक उपाय म्हणून जिल्ह्यात १८९०-९१ मध्ये २२,५६१ व्यक्तींना लस टोचण्यात आली. सन १९००-१९०१ मध्ये नागरी व ग्रामीण भागात मिळून २५,३१० व्यक्तींचे लसीकरण करण्यात आले. हे प्रमाण दरहजारी ३३ होते. सन १९०१ मध्ये नागपूर येथे व्हॅक्सीन इन्स्टिट्यूटची स्थापना करण्यात आली. या संस्थेत देवी व कॉलरा प्रतिबंधक लस तयार करण्यात येते. (सहायक संचालक, आरोग्यसेवा, प्रभारी लस निर्माण संस्था, नागपूर.) सन १९०५-०६ मध्ये २७,१४९ व्यक्तींना लस टोचण्यात आली. हे प्रमाण दरहजारी ४२ होते. सन १९०८ च्या नागपूर गॅझेटिअरनुसार नागपूर व उमरेड नगरपालिकेने सक्तीने लसीकरण केले होते. तसेच संपूर्ण जिल्ह्यातही लस टोचणीस चांगले यश प्राप्त झाले होते. या लस

टोचणीसाठी ३,४६० रुपये किंमतीची लस उपयोगात आणली. लस टोचण्यासाठी एक अधीक्षक व १७ लस टोचक होते. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९०८,** पृ. २७२.) कॉलरा व देवी या साथीच्या रोगांवर उपचार करण्यासाठी १९२३-२४ मध्ये विविक्ती रुग्णालयाची (Isolation Hospital) नागपूर येथे स्थापना करण्यात आली. त्यात सुरुवातीला ४ खाटा होत्या. तथापि आवश्यकतेनुसार त्यात १६ खाटांची सोय करण्यात येत असे. सन १९२१ ते १९३० या कालावधीत विविध रोगांमुळे २,८०,७८९ व्यक्ती मृत्यू पावल्या. पहिल्या पंचवार्षिक योजनेत राष्ट्रीय हिवताप नियंत्रण कार्यक्रमानुसार नागपूर व वर्धा जिल्ह्यातील ४५ खेड्यांतील ७६,००० लोकवस्तीच्या भागांत हिवताप नियंत्रणाचे एक पथक कार्यरत होते. या पथकामार्फत वर्षातून दोन वेळा डी. डी. टी. फवारणीचे काम होत असे. तर काही भागात डासांच्या अळ्यांच्या निर्मूलनाचे काम केले जात होते. राष्ट्रीय फायलेरिया नियंत्रण कार्यक्रमानुसार जिल्ह्यात एक नियंत्रक पथक ठेवण्यात आले. हे पथक विशिष्ट जातीचे (C. Fgtigance) डास कमी करण्यासाठी ५०० खेड्यात वर्षातून ३ वेळा डेल्डिन फवारण्याचे व या रोगांची संसर्गबाधा कमी करण्यासाठी हेट्रॅझॅन (Hetrazan) हे औषध मोठ्या प्रमाणावर वाटण्याचे काम करीत असे. या उपाययोजनेमुळे या रोगांच्या प्रसाराला बराच आळा बसून सुमारे ३,००,००० लोकवस्तीला संरक्षण मिळाले होते. क्षयरोग आटोक्यात आणण्यासाठी ५,००,८४४ लोकांची बी. सी. जी. टेस्ट घेण्यात आली व १,७७,६८१ लोकांना लस टोचण्यात आली.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात राष्ट्रीय हिवताप नियंत्रण कार्यक्रम विस्तृत करून तो जिल्ह्यात हिवताप निर्मूलन कार्यक्रम म्हणून अंमलात आणला. फायलेरिया नियंत्रण कार्यक्रम व बी. सी. जी. लस टोचणेही सुरू होते. सन १९६१ मध्ये विविध रोगांमुळे मृत्यूमुखी पडलेल्याची संख्या ३७,८३१ होती. त्यानंतर मृत्यूदरात घटीचे कारण प्रगत वैद्यकीय शास्त्रानुसार उपचार व प्रतिबंधक उपाय होते. देवीचे तर संपूर्णत: निर्मूलन झाल्याचा दावा करण्यात येतो. त्यामुळे १९९९-२००० मध्ये जिल्ह्यातील मृत्यूची संख्या १९,९६७ झाली. जिल्ह्यात निरनिराळ्या रोगाबाबतच्या प्रतिबंधक योजनांची माहिती पुढे दिलेली आहे.

हिवताप निर्मूलन योजना : पहिल्या पंचवार्षिक योजनेत राष्ट्रीय हिवताप निर्मूलन पथकाचे अंतर्गत नागपूर येथे एक हिवताप नियंत्रण पथक होते. हे पथक नागपूर आणि वर्धा जिल्ह्यातील ४५ खेड्यातील ७६,००० लोकवस्तीच्या भागात कार्यरत होते. या पथकामार्फत वर्षातून दोन वेळा डी. डी. टी. फवारणीचे व काही भागात डासांच्या अळ्यांचे निर्मूलन करण्याचे काम केले जात होते. सन १९६० मध्ये नागपूर येथे जिल्ह्यासाठी स्वतंत्र हिवताप नियंत्रण केंद्र स्थापन झाले. सन १९६०-६१ मध्ये या पथकाने १५७ खेड्यांना भेटी देऊन तेथील लहान मुलांच्या रक्ताची तपासणी केली व ८० खेड्यातील जन्मलेल्या बाळांची तपासणी केली. सन १९७०-७१ मध्ये १,३४,९१५ व्यक्तींची रक्त तपासणी केली असता ६३२ रुग्ण आढळले. सन १९८०-८१ मध्ये जिल्ह्यात तिनदा डी. डी. टी. चा फवारा मारण्यात आला. यावर्षी १,८५,७३२ रक्त नमुन्यांमध्ये ५,४३२ रक्त नमुने दुषित आढळले. यावर्षी तीन प्राथमिक आरोग्य केंद्रे, एक सरकारी दवाखाना व एक हिवताप पथक यांनी ८७ रुग्णांवर उपचार केले. सन १९९०-९१ मध्ये सहा प्राथमिक केंद्रे, दोन सरकारी दवाखाने व एक हिवताप पथक यांनी १८३ हिवतापाच्या रुग्णांवर उपचार केले. यावर्षी

२,६१,४४५ व्यक्तींची रक्त तपासणी केली असता २,६५३ व्यक्तींचे रक्त दूषित आढळले. तसेच ३,१८,८२६ घरांमध्ये (गुरांचे गोठे धरून) डी. डी. टी. चा फवारा मारण्यात आला. (जिल्हा हिवताप अधिकारी, नागपूर यांच्याकडून प्राप्त माहिती आधारे.) सन २०००-२००१ मध्ये १७ प्राथमिक आरोग्य केंद्रे, एक हिवताप पथक व ९ रुग्णालयात एकूण २५१ रुग्णावर उपचार करण्यात आले. यावर्षी ४,६७,४६८ व्यक्तींचे रक्त तपासले असता २,०९९ व्यक्तींचे रक्त दूषित आढळले. हिवताप निर्मूलन कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात प्रत्यक्ष देखरेख, अप्रत्यक्ष देखरेख, हिवताप क्लिनिक, हिवताप उपचार केंद्रे, औषध वाटप केंद्रे, किटकनाशक फवारणी, गृहीत उपचार, हिवताप रोग्यांना संपूर्ण उपचार, तापाच्या रोग्याच्या परीक्षणासाठी रक्त नमुना घेणे व अळीनाशक प्रतिबंधक उपाय हे कार्यक्रम हाती घेण्यात आले.

देवी निर्मूलन योजना : जिल्ह्यात या रोगाचा १९ व्या शतकात बऱ्याच वेळा प्रादूर्भाव झालेला आहे. यामुळे मागील ३६ वर्षांपैकी सात वर्षामध्ये (१९०८ पूर्वी) १,००० रुग्णांपेक्षा जास्त व्यक्तींचा मृत्यू झाला होता. सन १८८९ मध्ये या रोगाचा उद्रेक होऊन जवळ जवळ ३,२०० रुग्ण मृत्यू पावले. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९०८, पृ. ६४.) या रोगावर लस तयार करण्यासाठी नागपूर येथे १९०१ मध्ये व्हॅक्सीन इन्स्टिट्यूटची स्थापना करण्यात आली. ही संस्था जिल्ह्यात लस टोचण्याचे कार्य करीत होती. सन १९०७-०८ मध्ये या रोगामुळे नागपुरात २२८ व्यक्ती मृत्यू पावल्या. सन १९११ मध्ये या रोगाची साथ पूर्ण वर्षभर होती. त्यात मे १९१२ अखेरपर्यंत नागपूरला ७१८ व्यक्ती दगावल्या होत्या. या साथीचे वेळी महानगरपालिकेने ४ इन्स्पेक्टर व ४ हवालदार विशेष कामावर ठेवून घेरोघरी तपासणी करून देवी प्रतिबंधक लस टोचण्याचे काम केले. सन १९३० ते १९३२ या कालावधीत नागपूरमध्ये ६८५ रुग्ण होते व ३४२ व्यक्ती मृत्यू पावल्या. यावेळी देवीच्या रोगापासून बचाव करण्यासाठी रोगाचा प्रसार कसा होत आहे व त्याचे प्रतिबंधक उपाय काय आहेत हे नमूद केलेली मराठीतून पत्रके प्रसारीत करण्यात आली. तसेच वर्तमानपत्रांतून व सिनेमा स्लाईडमधून लोकांना सूचना देण्यात आल्या. त्याचप्रमाणे प्रचलित पध्दतीनुसार दवंडी पिटून शहरातील लोकांना सावध केले. लागण असलेली घरे व कपड्यांना विशुध्द करण्यात येत असे. शहरात ५ लसटोचक व एक प्रशिक्षित सॅनिटरी इन्स्पेक्टर लस टोचण्याचे काम करीत होते. सन १९३४ ते १९३७ या कालावधीत जिल्ह्यात देवीची साथ सातत्याने राहिली. त्यानंतर १९४० मध्ये नागपुरात १,०१६ रुग्ण व ६२३ व्यक्ती मृत्यू पावल्या. सन १९५० मध्ये आलेली साथ जून १९५१ पर्यंत होती. या काळात नागपूर शहरात १,४६५ रुग्ण व १,०३६ लोक मृत्यू पावले. त्यापैकी ४३० मृत्यू १ वर्षाच्या आतील मुलांचे होते. त्यानंतर १९६० मध्ये देवीची साथ आली. त्यावेळी प्रतिबंधक लस टोचण्याची पराकाष्ठा केली. तथापि, १९६१ मध्ये ४६५ लोक मृत्यू पावले. **(नागपूर जिल्हा पुरवणी गॅझेटिअर,** १९७८, पृ. ३८.) या रोगास नियंत्रित करण्यासाठी १९६२ पासून राष्ट्रीय देवी निर्मूलन योजना जिल्ह्यात कार्यान्वित करण्यात आली. सन १९७७ मध्ये या रोगाचे जिल्ह्यातून समूळ उच्चाटन करण्यात आले.

कॉलरा नियंत्रण : या रोगाचा १९ व्या शतकात या जिल्ह्यात प्रादुर्भाव झाला होता. यामुळे १८७२ पासून १९०८ पर्यंतच्या कालावधीतील १२ वर्षांमध्ये १,००० पेक्षा अधिक लोक दगावले होते. सन १८७८ व १९०० या वर्षी ३,००० पेक्षा जास्त व्यक्ती मृत्यू पावल्या.

तथापि १८८३ मध्ये या रोगाच्या उद्रेकाने ५००० लोक मृत्यूमुखी पडले. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९०८, पृ. ६४.) १ मे १९०८ रोजी कॉलराचा पहिला रुग्ण लोणारा येथून नागपूर येथे आला. या वर्षी नागपुरात सप्टेंबरच्या मध्यापर्यंत १३८ व्यक्ती मृत्यू पावल्या. जुलै १९१० मध्ये नागपूरला जगन्नाथपुरीहून दोन रुग्ण आल्यामुळे १९१०-११ या काळात या रोगाची साथ आली. सन १९१४ मध्ये कॉलऱ्याची मोठ्या प्रमाणावर साथ येऊन त्यामुळे नागपुरात पाच आठवड्यात ३१७ लोक मृत्यूमुखी पडले. सन १९२१ मध्ये पहिली इंडिजिनियस केस नागपूरला झाली. ही साथ सहा महिने पर्यंत होती. आणि त्यामुळे ९६० व्यक्ती मृत्यूमुखी पडल्या. या रोगाने १४ जुलै १९२१ रोजी नागपुरात ५० व्यक्ती मृत्यू पावल्या. सन १९३४-३५ मध्ये हा रोग साथीच्या स्वरुपात मध्यप्रांतातील बहुतांश भागात पसरला होता. त्यावेळी नागपूर जिल्हा कॉलऱ्याने ग्रासला होता. यावर्षी नागपुरात २५७ लोक मृत्यूमुखी पडले. सन १९३८ मध्ये या रोगाची साथ आली. त्यावेळी नागपूर शहरात ४५३ रुग्ण व ३२९ व्यक्ती मरण पावल्या. सन १९५७ मध्ये जिल्ह्यात ६०८ लोक मृत्यू पावल्याची नोंद आढळते. कॉलऱ्याचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन शासनाने १९७१ पासून जिल्ह्यात कॉलरा नियंत्रण कार्यक्रम राबविण्यास सुरुवात केली. त्यामुळे होणाऱ्या मृत्यूच्या प्रमाणात घट होऊन १९८१ साली फक्त ५ व्यक्ती मृत्यू पावल्या. यावर्षी ६,६६,८२६ व्यक्तींना कॉलरा प्रतिबंधक लस टोचली. सन १९८८ मध्ये नागपूर शहरात २,०६,६५० व्यक्तींना लस टोचण्यात आली. तथापि २२ लोकांना या रोगाची लागण झाली होती. सन १९९९ मध्ये या रोगामुळे एकही व्यक्ती दगावलेली नाही.

क्षयरोग नियंत्रण : सन १९०१ मध्ये नागपुरात ४२ रुग्णांवर उपचार करण्यात आले. सन १९०५ मध्ये त्यांची संख्या ६२१ झाली. क्षयरोग निवारण्यासाठी १९५४ मध्ये बी. सी. जी. योजना सुरू झाली. या योजनेअंतर्गत जिल्ह्यात चार पथके कार्यरत होती. त्यांनी जिल्ह्यातील सर्व शाळांमधून लस टोचण्याचे काम केले. तत्पूर्वी १९५२ मध्ये जागतिक आरोग्य संघटनेच्या सहकार्याने नागपूर येथील वैद्यकीय महाविद्यालयात क्षयरोग निवारण केंद्र सुरू झाले. सुरुवातीला त्यात ५० खाटा होत्या. १९६० मध्ये त्यांची संख्या १५० झाली. या केंद्रात क्षयरोगावर उपचार करण्यासंबंधीचे विशेष प्रशिक्षण देण्यात येते. याशिवाय मेयो हॉस्पिटल, नागपूर, आरोग्यपथक, सावनेर, प्राथमिक स्वास्थ्य केंद्र, भिवापूर व शासकीय रुग्णालय, रामटेक येथे क्षयरोग उपकेंद्रे आहेत. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात मेयो हॉस्पिटमध्ये क्षयरोग्यांकरिता २१ खाटांची सोय करण्यात आली.

सन १९५६-५७ मध्ये जिल्ह्यात ५,००,८४४ व्यक्तींची बी. सी. जी. (टेस्ट) चाचणी करण्यात येऊन १,७७,६८१ व्यक्तींना लस टोचण्यात आली. सन १९७१ मध्ये या रोगामुळे ६६५ रोगी दगावले होते. सन १९८१ मध्ये त्याची संख्या १०२७ झाली. **(सांख्यिकीय गोषवारा,** महाराष्ट्र राज्य, १९८१-८२, पृ. ३०४.) सन १९८६-८७ मध्ये जिल्ह्यात चार क्षयरोग रुग्णालये व रुग्ण चिकित्सालये होती. यावर्षी ६५,६३५ व्यक्तींना लच टोचण्यात आली. सन १९९३-९४ मध्ये १,००,३११ व्यक्तींना क्षय रोगाची लस टोचण्यात आली. सन १९९६ मध्ये ९३,५१२ लोकांना लस टोचण्यात आली. तथापि यावर्षी क्षयरोगामुळे ४०८ व्यक्ती दगावले होते. सन १९९९ मध्ये क्षयरोगामुळे दगावलेल्या व्यक्तींची संख्या ४७८ होती.

कुष्ठरोग निवारण : सन १८९१ मध्ये जिल्ह्यात ७७३ कुष्ठरोगी होते. सन १९०१ मध्ये त्यांची संख्या ५४९ झाली. त्यामध्ये १४० महिला होत्या. याच वर्षी कुष्ठरोग रुग्णालय स्थापन झाले व त्यात ४७ कुष्ठरोगी होते. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९०८, पृ. ६४.)

जिल्ह्यात राष्ट्रीय कुष्ठरोग नियंत्रण योजनेखाली १९५९ मध्ये कुष्ठरोग निवारण कार्य सुरू झाले. त्यानुसार ६ सप्टेंबर १९५९ ला उमरेड येथे कुष्ठरोग नियंत्रण केंद्र स्थापन झाले. या केंद्राअंतर्गत उमरेड, भिवापूर व कुही या तीन तालुक्यांचा समावेश होता. त्यात २५८ गावे समाविष्ट होती. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९६६, पृ. ६५४.) या तीन तालुक्यांमध्ये एकूण आठ कुष्ठरोग उपचार उपविभाग निर्माण करून कुष्ठरोग नियंत्रणाचे कार्य सुरू झाले. सन १९६१ मध्ये नागपूर व पारशिवनी येथे प्रत्येकी एक कुष्ठरोग नियंत्रण केंद्र होते. नागपूर येथील मेयो हॉस्पिटलमधील कुष्ठरोग नियंत्रण केंद्रात रुग्णांसाठी ६ खाटांची सोय होती. तसेच काटोल, मौदा, नरखेड व सावनेर येथे सर्वेक्षण, शिक्षण व उपचार पथक होते. याशिवाय शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात कुष्ठरोग प्रशिक्षण केंद्र असून वैद्यकीय पदवीधारकांना कुष्ठरोगाविषयी प्रशिक्षण दिले जाते. या केंद्रात २५०० रोगी उपचार घेत होते. सन १९८०-८१ मध्ये १५ शहरे व १,६५८ गावांत सर्वेक्षण केले असता ७४९ रुग्ण आढळले. हे प्रमाण दर हजारी एक इतके होते. यावर्षी या रुग्णांपैकी ४७ रुग्ण मृत्यू पावले. सन १९९०-९१ मध्ये १३,६९,३५० व्यक्तींची तपासणी केली असता २,७६० रोगी आढळले. हे प्रमाण दरहजारी २.०५ होते. यावर्षी जिल्ह्यात २६ सर्वेक्षण व उपचार केंद्रे, ३ नागरी कुष्ठरोग केंद्रे व २ कुष्ठरोग नियंत्रण पथके होती. इ. स. १९९२-९३ मध्ये १६५८ खेडी व १५ शहरांचे सर्वेक्षण केले असता ३,९६७ रुग्ण आढळले. त्याचे दरहजारी प्रमाण २.९ होते. यावर्षी कुष्ठरोगाचे प्रमाण दरहजारी १.९० होते.

अंधत्व निवारण : राष्ट्रीय अंधत्व निर्मूलन कार्यक्रम नोव्हेंबर १९७६ पासून जिल्ह्यात अस्तित्वात आला. तेव्हापासून १९८७ पर्यंत ७,६०० लोकांवर नेत्र शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या आहेत. तीन शासकीय रुग्णालयात (मेयो रुग्णालय, डागा स्मृति रुग्णालय व शासकीय वैद्यकीय महाविद्याल) नेत्र चिकित्सा केंद्रे आहेत. ग्रामीण भागात नेत्र विशारदांद्वारा मोतीबिंदू शिबिरेही भरविली जातात.

कुटुंब कल्याण योजना : राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत लोकसंख्या नियंत्रणासाठी १९५७ पासून नसबंदी शस्त्रक्रियेव्यतिरिक्त संतती-प्रतिबंधक साधने व गोळ्यांद्वारे संतती नियमन करण्यात येते. या कामासाठी एक फिरते कुटुंब नियोजन पथक नागपूर येथे सुरू करण्यात आले. याशिवाय कळमेश्वर, नरखेड, मौदा, कुही, काटोल व सावनेर येथे ग्रामीण कुटुंब नियोजन केंद्र होते. तसेच स्थानिक समिती व स्वयंसेवी संस्था शासकीय अनुदान घेऊन नागरी विभागात कुटुंब नियोजन केंद्रे चालवितात. इ. स. १९६७-६८ मध्ये ३४ केंद्रातर्फे १७,४०८ नसबंदी शस्त्रक्रिया (१४,९६९ पुरुष + २,४३९ स्त्री) व १,६२६ लूप (गर्भाशय वलये) बसविण्यात आले. सन १९७२-७३ मध्ये ३० केंद्रात २४,९३० नसबंदी शस्त्रक्रिया (पुरूष २,३९४ + स्त्री ४,५३६) व ४९५ लूप (गर्भाशय वलये) बसविण्यात आले. सन १९८१-८२ मध्ये २९ केंद्रांमध्ये २२,६४३ नसबंदी (पुरूष १२,६६६ स्त्री ९,९७७) शस्त्रक्रिया व २,६१६ लूप (गर्भाशय वलये) बसविण्यात आले. त्यापैकी १६ ग्रामीण कुटुंब

केंद्रांत १२,४८८ नसबंदी (पुरूष ८,८२७, स्त्री ३,६६१) शस्त्रक्रिया व ४३४ लूप बसविण्यात आले. सन १९९०-९१ मध्ये २९ ग्रामीण कुटुंबकल्याण केंद्रे, ३० नागरी कुटुंब कल्याण केंद्रे, ७ शासकीय कुटुंब कल्याण केंद्रे व २३ स्थानिक व स्वयंसेवी संस्थांची केंद्रे यामधून २५,०३० उद्दिष्टांपैकी एकूण २३,८७१ (पुरुष १७५१, स्त्री २२,१२०) संतती प्रतिबंधक शस्त्रक्रिया करण्यात आल्या. यावर्षी लूप बसविण्याचे २१,४२० या उद्दिष्टांपेक्षा अधिक जास्त म्हणजे २१,९३२ इतके लूप बसविण्यात आले. **(सांख्यिकीय गोषवारा**, महाराष्ट्र राज्य, १९८९-९०, १९९०-९१, पृ. ३१०-१२.) सन १९९६-९७ मध्ये ७० केंद्रांमध्ये २१,८१० (पुरुष ३७०, स्त्री २१,४४०) संतती प्रतिबंधक शस्त्रक्रिया करण्यात जिल्ह्याने यश मिळविले. या केंद्रांपैकी ४१ ग्रामीण कुटुंब कल्याण केंद्रांमध्ये ९,८३५ (पुरुष १५३, स्त्री ९,६८२) संतती प्रतिबंधक शस्त्रक्रिया करण्यात आल्या. यावर्षी जिल्ह्यात २०,२१८ लूप बसविण्यात आले. सन १९९८-९९ मध्ये कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत १०,३८२ लूप बसविले तर ७,५३७ महिलांना संतती नियंत्रणाच्या औषधाचे वाटप करण्यात आले. या व्यतिरिक्त सुमारे १७,००० पुरुषांना संतती नियंत्रणाचे साहित्य व औषधे देण्यात आली. यापूर्वीच्या तीन दशकांपासून नसबंदी करणाऱ्या पुरुषांचे प्रमाण घटत गेले आहे. तर इतर गर्भनिरोधक साधनांचा वापर करणाऱ्यांचे प्रमाण दूसरीकडे वाढत असल्याचेही दिसते. याचाच परिणाम म्हणून १९७२-७३ मध्ये २६.८ इतका असलेला जन्मदर १९९९-२००० मध्ये १९.४६ पर्यंत खाली आलेला आहे. हल्ली कुटुंब नियोजन कार्यक्रमात शासकीय व सेवाभावी संस्थांव्यतिरिक्त खाजगी डॉक्टरांनाही सहभागी करून घेण्यात येते.

माता व बालसंगोपन कार्यक्रम : हा कार्यक्रम कुटुंब-कल्याण कार्यक्रमाचाच एक भाग असून नोव्हेंबर १९६९ पासून तो राज्यात कार्यान्वित करण्यात आला. त्यानुसार लहान बालकांना होणारा घटसर्प, डांग्या खोकला, धनुर्वात व पोलिओ तसेच गरोदर मातांना होणारा धनुर्वात यापासून संरक्षणासाठी रोगप्रतिबंधक लस व लोहयुक्त गोळ्यांचे वाटप केले जाते. केंद्र सरकारप्रणित दुहेरी लसीमार्फत धनुर्वात प्रतिबंधक योजना १९७५ पासून राबविण्यास सुरुवात झाली. सन १९८६-८७ मध्ये १,२९,९५० मातांना व ६५,९८० बालकांना धनुर्वात प्रतिबंधक लस, तर १,३८,१९४ बालकांना पोलिओ, ३०,९३७ बालकांना बी. सी. जी., ४६,३५० बालकांना विषमज्वर, ८,१८४ बालकांना गोवर, ६५,६३५ बालकांना दुहेरी व ४५,७८६ बालकांना तिहेरी लस टोचण्यात आली. सन १९९९-२००० मध्ये ८५,२२६ गर्भवतींना धनुर्वात प्रतिबंधक लस टोचण्यात आली. तर १,२२,५६१ बालकांनाही धनुर्वात प्रतिबंधक लस टोचण्यात आली. यावर्षी ७७,७७८ बालकांना गोवर, ७७,३५६ बालकांना पोलिओ, ९६,३०२ माता व बालकांना बी. सी. जी., तर ७४,६०७ बालकांना दुहेरी व ७७,४६४ बालकांना तिहेरी लस टोचण्यात आली. त्यामुळे जिल्ह्यातील बाल मृत्यूची संख्या ७२० इतकी होती.

समाजकल्याण

सन १९५६ पूर्वी या विभागाचे मागासवर्गीय कल्याण विभाग असे नाव होते. त्यांनतर या विभागाचे समाजकल्याण विभाग असे नामांतर झाले. तर २००१ पासून त्यास सामाजिक

न्याय असे संबोधण्यास सुरुवात झाली. सन १९६२ पासून समाजकल्याण खात्याचे काम जिल्हा परिषदेकडे सोपविण्यात येऊन २१ सप्टेंबर १९७१ पासून शासकीय समाजकल्याण योजना राबविण्यासाठी जिल्हा परिषद समाजकल्याण समिती गठीत करण्यात आली. जिल्हा परिषदेच्या एकूण उत्पन्नाच्या १५ टक्के रक्कम राखीव ठेवण्यात येऊन त्यातून स्थानिक स्तरावरील समाजकल्याण योजना समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद तर जिल्हा पातळीवरील राज्यस्तरीय योजना शासकीय जिल्हा समाजकल्याण अधिकाऱ्यामार्फत राबविण्यात येतात. समाजकल्याण विषयक योजनांच्या कार्यवाहीत सुसंगती आणण्यासाठी १ मे १९८३ पासून समाजकल्याण व आदिवासी असे दोन स्वतंत्र विभाग करण्यात आले. सन १९९१ मध्ये महिला, बाल व अपंग विकास विभागाची निर्मिती करण्यात आली.

समाजकल्याणात मागासवर्गीयांचे कल्याण तसेच अपंग, महिला व बालकल्याणाच्या योजना अंतर्भूत आहेत. या कार्याचे मुख्यत्वे दोन भाग असून पहिल्या भागात मागासलेल्या वर्गाची विविध योजनांद्वारे शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नती करणे, तर दुसऱ्या भागात प्रामुख्याने शारीरिक व मानसिक व्यंग असलेल्या व्यक्ती व अनाथ, निराधार, संकटात असलेल्या महिला आणि अनाथ व गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळलेल्या बालकांचे कल्याण व पुनर्वसन यांचा समावेश आहे.

जिल्हा समाजकल्याण कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना :

मागासवर्ग कल्याण : मागासलेल्या वर्गामध्ये शिक्षण प्रसार व्हावा म्हणून शासनाने विविध शैक्षणिक स्तरानुसार विद्यार्थ्यांना आर्थिक व शैक्षणिक सवलती दिल्या असून त्यात शिष्यवृत्ती, वसतिगृहे व आश्रमशाळा यांचा समावेश आहे.

भारत सरकार शिष्यवृत्ती योजना : या केंद्र व राज्य पुरस्कृत योजनेंतर्गत ज्यांच्या पालकांचे मासिक उत्पन्न १,५०० ते २,००० रु. पेक्षा अधिक नाही अशा अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या वसतिगृहात राहणाऱ्या व न राहणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमानुसार अनुक्रमे दरमहा ६५ ते १२५ रु. व ११५ ते २५० रु. शिष्यवृत्ती दिली जाते. यातील अनुसूचित जातींकरिता केंद्र सरकार व अनुसूचित जमातींकरिता राज्य सरकार शिष्यवृत्ती देते. सन १९६२-६३ व १९८०-८१ मध्ये अनुक्रमे एकूण १,१०७ व १,२१० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली होती. सन १९९९-२००० मध्ये या योजनेचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अनुक्रमे १७,१७६ व ३,८२५ होती. याशिवाय शिक्षण फी व परीक्षा फी या राज्य पुरस्कृत योजनेच्या १९६२-६३ व १९८०-८१ मध्ये अनुक्रमे १४,०६४ व ९६,९२२ मागासवर्गीय विद्यार्थ्यानी लाभ घेतला. इ. स. १९९८-९९ मध्ये अनुसूचित जातीच्या ८५,८०९, अनुसूचित जमातीच्या ३५,४८९ व विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या २३,१६१ विद्यार्थ्यानी लाभ घेतला.

मागसवर्गीय विद्यार्थ्याना उच्च शिक्षण घेता यावे या उद्देशाने शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती या योजनेखाली विद्यार्थ्याना आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात येते. या योजने- अंतर्गत १९९८-९९ मध्ये अनुसूचित जातीच्या ४,७९४, अनुसूचित जमाती ४,३२९, विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या २,२०० तर विशेष मागास प्रवर्गाच्या १५७ विद्यार्थ्यानी लाभ घेतला. शिक्षण शुल्क

व परीक्षा शुल्क सहाय्य योजनेत अनुसूचित जातीच्या २,४७४, अनुसूचित जमाती ९१० व विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या १६९ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांच्या वसतिगृहात राहणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता देण्यासाठी केंद्र व राज्य सरकारतर्फे एक योजना राबविली जाते. सन १९९९-२००० मध्ये या योजनेअंतर्गत ३१० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला असून त्यांचेवर ३.१० लाख रुपये खर्च झाले होते.

अनुसूचित जाती व अनुसूचित जामातींच्या विद्यार्थ्यांनी तांत्रिक शिक्षणाकडे वळण्याकरिता शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन प्रदान करण्याची योजना राबविली जाते. हस्तकला प्रशिक्षण योजनेखाली ३३ टक्के विद्यार्थ्यांना दरमहा रुपये ४० विद्यावेतन दिले जाते. या योजनेखाली विद्यावेतन घेणाऱ्या अनुसूचित जाती व विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या विद्यार्थ्यांना दरमहा रुपये २० प्रमाणे जादा विद्यावेतन दिले जाते. तांत्रिक प्रशिक्षण योजनेखाली ज्या अनुसूचित जाती व विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या विद्यार्थ्यांना काहीच विद्यावेतन मिळत नाही, त्यांना दरमहा रु. ६० प्रमाणे विद्यावेतन दिले जाते. वसतिगृह निवासी विद्यार्थ्याला या योजनेअंतर्गत दरमहा रु. ४० प्रमाणे विद्यावेतन मिळते. त्यांना दरमहा रु. ६० प्रमाणे जादा विद्यावेतन देण्यात येते. तसेच हस्तकला प्रशिक्षण योजनेखाली ज्या विद्यार्थ्यांना काहीच विद्यावेतन मिळत नाही. त्यांना दरमहा रु. १०० प्रमाणे विद्यावेतन दिले जाते. यासाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे पालकांचे उत्पन्न वार्षिक १२,००० पेक्षा अधिक नसावे. या योजनेअंतर्गत १९९९-२००० जिल्ह्यातील ११ शासकीय औद्योगिक संस्थेतील विद्यावेतनावर १७,२२,००० रुपये खर्च झाले व १,०७६ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

केंद्रपुरस्कृत वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या विद्यार्थ्यांसाठी पुस्तकपेढी योजना १९७८-७९ पासून सुरू झाली. सन १९९१-९२ मध्ये तंत्रनिकेतन, कृषी व पशुवैद्यकीय महाविद्यालयांमध्ये ही योजना सुरू करण्यात आली. ही योजना केंद्र पुरस्कृत योजना असल्याने केंद्र सरकार व राज्य शासन यांचे ५०% समन्वयाने ही योजना राबविण्यात येते. या महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचे दोन विद्यार्थ्यामध्ये एक पुस्तकसंच पुरविण्यात येतो. या योजनेचा फायदा घेणाऱ्या विद्यार्थ्याचे पालकांचे उत्पन्न वार्षिक रु. २४,००० पेक्षा अधिक नाही, जे विद्यार्थी भारत सरकार शिष्यवृत्तीधारक आहेत त्या अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येतो. या योजनेअंतर्गत १९९९-२००० मध्ये जिल्ह्यातील ३५१ अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या विद्यार्थ्यांनी (अभियांत्रिकी-९८, वैद्यकीय-१२४, तंत्रनिकेतन-१२५ व पशुवैद्यकीय-४) लाभ घेतला असून त्यावर १० लाख रुपये खर्च झाले.

सैनिक शाळांतील मागासवर्गिय विद्यार्थ्यासाठी विशेष निर्वाह भत्ता देण्याची योजना केंद्र व राज्य पुरस्कृत आहे. सन १९९९-२००० मध्ये या योजनेचा अनुसूचित जातीतील ४ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. त्यासाठी ४८,००० रुपये खर्च करण्यात आले.

अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या पालकांच्या मुलांना शालांत परीक्षापूर्व शिष्यवृत्ती देण्याची योजना सुरू आहे. या योजनेअंतर्गत इयत्ता तिसरी ते पाचवी पर्यंत शिकणाऱ्या निवासी विद्यार्थ्यांना २०० रु. व ९ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या निवासी विद्यार्थ्यांना २०० रु. प्रमाणे दरमहा शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. तथापि इयत्ता पहिली ते पाचवीमध्ये शिकणाऱ्या अनिवासी विद्यार्थ्यांना २५ रुपये, इयत्ता दहावी ते आठवी मध्ये शिकणाऱ्या अनिवासी विद्यार्थ्यांना ४० रुपये व दहावीमध्ये शिकणाऱ्या अनिवासी विद्यार्थ्यांना ५० रुपये प्रमाणे दरमहा शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. या योजनेअंतर्गत १९९९-२००० मध्ये जिल्ह्यातील १,१५० अनिवासी विद्यार्थ्यांनी लाभ घेतला असून ११.५० लाख रुपये खर्च झाले.

या योजनांव्यतिरिक्त जिल्ह्यात राज्य सरकार पुरस्कृत दलित वस्ती सुधारणा योजना, अस्पृश्यता निवारण प्रचार योजनाही राबविली जाते.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह : शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांची राहण्याची व जेवणाची सोय मोफत करण्यात येते. शिवाय विभागीय स्तरावर दरमहा दरडोई ५० रुपये व अन्य बाबी व पुरक खर्चासाठी दरमहा दरडोई १०० रुपये देण्यात येतात. तसेच तालुका व जिल्हा स्तरावरील अन्य वसतिगृहातील विद्यार्थ्याना दरमहा दरडोई २५ रुपये देण्यात येतात. मात्र पुरकभत्ता म्हणून अन्य कोणतीही रक्कम देण्यात येत नाही. जिल्ह्यात १९९०-९१ मध्ये सात वसतिगृहे होती. सन १९९९-२००० मध्ये आठ शासकीय वसतिगृहे होती. त्यापैकी दोन मुलींची होती. या वसतिगृहांमध्ये ८०० विद्यार्थी (मुले ४९०, मुली ३१०) होते. त्यांचेवर ८७.४७ लाख रुपये खर्च झाले होते.

या वसतिगृहांव्यतिरिक्त १९९८-१९९९ मध्ये जिल्ह्यात स्वयंसेवी संस्थांची ९९ वसतिगृहे होती. त्यापैकी ३८ वसतिगृहे मुलींची होती. या वसतिगृहांमध्ये ३,५०७ विद्यार्थी (मुले २,१००, मुली १,४०७) होते. त्यापैकी अनुसूचित जातीचे २,३३७, अनुसूचित जमातींचे २८९, विमुक्त जाती व भटक्या जमातींचे १४०, आर्थिकदृष्ट्या दुर्बल मागासलेले ४०३ व विशेष मागास प्रवर्ग तसेच अंध व अपंग १५४ विद्यार्थी होते. या संस्थांना या वर्षी ९४,४५,८७१ रुपये अनुदान दिले. या वसतिगृहांपैकी १५ वसतिगृहे मालकीच्या इमारतीत असून ८४ वसतिगृहे भाड्याच्या इमारतीत सुरू होती. वसतिगृहांची इमारत बांधण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना केंद्र शासन व राज्य शासन अनुक्रमे ४५ टक्के अनुदान देते. सन १९९९-२००० मध्ये जिल्ह्यातील दोन वसतिगृहांना अनुदान दिले असून एका वसतिगृहाचे काम पूर्ण झाले.

निवासी शाळा : सफाई कामगारांची सामाजिक व आर्थिक उन्नती व्हावी या उद्देशाने शासनाने या समाजातील मुलांची राहण्यासह प्राथमिक शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी स्वीकारून १९९६-९७ मध्ये एक निवासी शाळा सुरू केली. या शाळेत १९९९-२००० मध्ये ११० विद्यार्थी होते व त्यांचेवर १२.५४ लाख रुपये खर्च झाले होते.

आश्रम शाळा : विमुक्त व भटक्या जमातींमधील मुलांसाठी आश्रमशाळा योजना १९५३ मध्ये सुरू केली. शिक्षणांसाठी अनुकूल वातावरण उपलब्ध करून देऊन मुलांवर चांगले संस्कार व्हावे व पुढारलेल्या समाजातील मुलांबरोबर सहजीवनाचा लाभ घेता यावा. या हेतूने शासनाने आश्रमशाळांची योजना कार्यान्वित केली. ही योजना १९७४-७५ पर्यंत शिक्षण

संचालनालय राबवित असे. जून १९७५ पासून समाजकल्याण विभाग राबवित आहे. जिल्ह्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या मुलांसाठी स्वयंसेवी संस्थामार्फत आश्रमशाळा स्थापन करण्यात आलेल्या आहेत. त्यांना शासन आर्थिक सहाय्य देते. जिल्ह्यात डिसेंबर १९९९ पर्यंत आश्रमशाळा सुरू होत्या व त्यात शिक्षणाची सोय उपलब्ध होती. या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत एकूण १,६३६ विद्यार्थी असून त्यापैकी ८४५ विद्यार्थी निवासी व ७९१ विद्यार्थी अनिवासी आहेत. या विद्यार्थ्यांना गणवेश, स्टेशनरी, क्रमिक पुस्तके, आंथरुण-पांघरुण शासनाकडून देण्यात येते. डिसेंबर १९९९ पर्यंत ७९१ विद्यार्थांपैकी ६५० विद्यार्थांना गणवेश, ७४७ विद्यार्थाना स्टेशनरी, ७३६ विद्यार्थांना क्रमिक पुस्तके व ७१२ विद्यार्थांना आंथरुण-पांघरूण वाटप करण्यात आले.

बालवाडी : अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व विमुक्त जातीच्या मुलांचा शैक्षणिक व सांस्कृतिक विकासासाठी बालवाडी योजना सुरू करण्यात आली. सन १९५७-५८ मध्ये बेला (ता. उमरेड) येथे एक बालवाडी सुरू झाली. या बालवाडीतील ३० मुलांसाठी आवश्यक कर्मचारी वर्ग देण्यात आला होता. सन १९६२-६३ मध्ये जिल्ह्यात आठ बालवाड्या होत्या. सन १९९०-९१ मध्ये जिल्ह्यात ४० बालवाड्या होत्या व त्यात १,३११ विद्यार्थी होते. त्यांना एकूण १,०६,०३८ रुपये अनुदान देण्यात आले होते. सन १९९८-९९ मध्ये त्यांची संख्या २६ झाली. यावर्षी बालवाड्यांना एकूण १,४२,००० रुपये अनुदान देण्यात आले.

विविध योजना : या व्यतिरिक्त मागासवर्गीय गृहनिर्माण योजनेचा १९९९-२००० मध्ये ३० संस्थांनी लाभ घेतला व त्यासाठी ७.५० लाख रुपये खर्च झाला. याच वर्षी ११ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील एकूण १,०७६ मागासवर्गीय लाभार्थींना विद्यावेतन देण्यात आले. त्याचप्रमाणे ३० स्वंयसेवी संस्थेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ६.४६ लाख रुपये खर्च झाले. त्याचप्रमाणे दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत जिल्ह्यात १९९९-२००० मध्ये ४९९.९० लाख रुपये खर्च झाले. सन १९९९-२००० मध्ये रोजगारासाठी समाज कल्याण कार्यालयातील सेवायोजन विभागात ३,५९,९८० मागासवर्गीय उमेदवारांची नाव नोंदणी करण्यात आली असून ३,६१२ उमेदवारांची संबंधित विभागाकडे नोकरीसाठी शिफारस करण्यात आली. त्याचप्रमाणे डिसेंबर १९९९ अखेरपर्यंत ३५,५५८ अपंग उमेदवारांची नाव नोंदणी करण्यात आली. त्यापैकी ९३६ उमदेवारांची निरनिराळ्या कार्यालयाकडे नोकरीकरिता शिफारस केली. याशिवाय सहाव्या पंचवार्षिक योजनेपासून अनुसूचित जातीसाठी विशेष घटक योजना सुरू करण्यात आली. या योजनेअंतर्गत विविध योजनांवर जिल्ह्यात ऑक्टोबर १९९९ पर्यंत ४,५७,४१,००० रुपये खर्च करण्यात आले.

अपंग कल्याण : शारीरिकदृष्ट्या मतीमंद, मुकबधीर, अंध व अस्थिव्यंग असलेल्या मुलांना शालेय शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण व वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्याकरिता शासनाने तसेच सेवाभावी संस्थांनी ६ ते १८ वयोगटातील अपंग मुलांकरिता निवासी विशेष विद्यालये स्थापन केलेली आहेत. नागपूर येथे १ ऑगस्ट १९१५ रोजी भोसले मुकबधीर विद्यालय स्थापन करण्यात आले. त्यात मुकबधीर विद्यार्थ्यांच्या निवासाची सोय होती. या शाळेत विद्यार्थ्याना शिक्षणाबरोबर रंगकाम, वेतकाम, शिवणकाम इत्यादी प्रकारचे व्यावसायिक शिक्षण दिले जाते. या शाळेत २०० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो.

इ. स. १९२८ मध्ये नागपूरला सेंट्रल प्रोव्हिसेंस ॲण्ड बेरार ब्लाईंड रीलिफ असोसिऐशनने निवासी अंध मुलांची शाळा सुरू केली. अंध मुलांनी स्वबळावर आपली उपजीविका चालवावी या उद्देशाने ही संस्था स्थापन झाली असून त्यात संगीत व हस्तकलेचे ब्रेललिपीमधून शिक्षण दिले जाते. तेव्हाच्या मध्यप्रदेशातील ही एकमेव शाळा होती. या शाळेत नऊ ते सोळा वर्षा दरम्यानच्या मुलांना प्रवेश देऊन त्यांची राहण्याची, जेवणाची व शिक्षणाची सोय निशुल्क केली जाते. प्रारंभी या शाळेत चार मुले होती. इ. स. १९५७ मध्ये या शाळेत अंध मुलींना प्रवेश देणे सुरू झाले. इ. स. १९६३ मध्ये या शाळेत १३ मुली होत्या. इ. स. १९७१ मध्ये त्यात १२५ अंध विद्यार्थी होते.

इ. सन १९४६ मध्ये नागपूरला मुकबधीर औद्योगिक संस्था स्थापन झाली. या संस्थेत पूर्व-प्राथमिक ते दहावीपर्यंत शिक्षणाची सोय असून त्यात तीन वर्षे वयाच्या मुलांपासून प्रवेश देण्यात येतो. सुरुवातीला या संस्थेत सोळा वर्षावरील मुलामुलींना प्रवेश दिला जात असे व भाषेचे जुजबी ज्ञान देऊन तांत्रिक शिक्षण देण्याचे कार्य करीत. इ. स. १९५८ मध्ये नागपूर येथे भारत मूक विद्यालय सुरू झाले. शासनाने १९६० मध्ये शारीरिक अपंगत्व असलेल्या मुलामुलींसाठी विनामूल्य शालेय आणि व्यावसायिक शिक्षण देण्यासाठी एक शाळा व वसतिगृह सुरू केले. या वसतिगृहात २० विद्यार्थ्यांची राहण्याची सोय होती. या शाळेत प्रवेश घेतलेल्या अपंग मुलांवर विनामुल्य उपचार केले जात. मातृसेवासंघाने दूर्बल मनस्क मुलांसाठी १ एप्रिल १९६० रोजी नंदनवन शाळा सुरू केली. त्यात सुरुवातीला २० मुले व ५ प्रौढ होते. या शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण, संगीत व हस्तकला तसेच वैद्यकीय उपचार विनामूल्य दिले जात असून वसतिगृहात त्यांची विनामूल्य सोय करण्यात येते. या शाळेला शासनाव्यतिरिक्त १९६५-७० या कालावधीत अमेरिकेकडून अनुदान मिळत होते. सप्टेंबर १९८५ ला या शाळेत ११२ विद्यार्थी व संरक्षित कर्मशाळेत ८० विद्यार्थी होते.

सन २०००-२००१ मध्ये जिल्ह्यात अंध विद्यालय-२, मुकबधिर विद्यालय-८, अस्थिव्यंग-६ व संमिश्र केंद्र-७ होते व त्यात एकूण १,०५० विद्यार्थी होते. त्यांचेवर १,९५,००,००० रुपये खर्च झाले. यावर्षी शासनाने आठवीपर्यंत शिक्षण घेत असलेल्या १,००० विद्यार्थ्यांना तसेच आठवीनंतरच्या ८४० अपंगाना शिष्यवृत्ती दिली.

याव्यतिरिक्त २०००-२००१ मध्ये नागपूर जिल्ह्यात एक शासकीय अपंग बहुउद्देशीय संमिश्र केंद्र होते. त्यात ५० विद्यार्थी होते. या केंद्रात अंध, मुकबधिर व विकलांग मुलांना शिक्षण, वैद्यकीय उचार व पूर्व-व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते.

प्रशिक्षित अपंगांना प्रशिक्षणानंतर लगेच नोकरी उपलब्ध होत नसल्याने त्यांना स्वतंत्र व्यवसाय करण्यासाठी रुपये ५०० ते १,००० पर्यंत वस्तू स्वरूपात सहाय्य देण्यात येते. नागपूर जिल्ह्यात २०००-२००१ या वर्षी ४५ अपंगाना रु. ४५,००० इतकी आर्थिक मदत करण्यात आली.

अपंगांचे पुनर्वसन करण्यासाठी नागपूर येथे अपंगांकरिता मार्गदर्शन व सल्ला केंद्र असून त्यात एक वैद्यकीय समाज कार्यकर्ता व एक मदतनीस आहे. या केंद्राने २०००-२००१ या वर्षात २,१०० अपंगांना मदत केली.

भिक्षेकऱ्यांकडून होणाऱ्या उपद्रवाचा प्रतिबंध करण्याच्या उद्देशाने दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात नागपूर येथे एक भिक्षेकरी स्वीकार गृह स्थापन करण्यात आले. या केंद्रात १९९९-२००० मध्ये ८३ भिक्षेकरी होते. त्यांना न्यायालयात उभे केले असताना ६० व्यक्तींना निर्दोष सोडण्यात आले व १८ व्यक्तींना जामिनावर सोडण्यात आले. याशिवाय ५ व्यक्तींना भिक्षेकरी गृहात बंदिस्त ठेवण्यात आले. या केंद्रात भिक्षेकऱ्यांना शिवणकाम, विणकाम व हस्तकला शिकविण्यात येते. या केंद्राची प्रवेश क्षमता ५७ भिक्षेकऱ्यांची आहे.

गरीब व निराधार अपंगांना वृध्दाश्रम अनुदान योजनेअंतर्गत वृध्दाश्रमात प्रवेश देऊन त्यांना आसरा, वैद्यकीय उपचार इत्यादी दिला जातो. या वृध्दाश्रमांना दरमहा दरडोई रु. ३३५ या प्रमाणे अनुदान दिले जाते. इ. स. २०००-२००१ मध्ये नागपूर जिल्ह्यात पाच वृध्दाश्रमे होती. या वृध्दाश्रमांमध्ये २१० लाभार्थी (पुरूष ११०, स्त्री १००) होते.

याशिवाय रमाधाम धर्तीवर आदासा येथे एक मातोश्री आश्रम असून त्यात ५० वृध्द राहू शकतात. सध्या या वृध्दाश्रमात ४४ वृध्द (स्त्री-पुरूष) आहेत.

बाल कल्याण : समाजातील निराधार, निराश्रित बालकांना अन्न, वस्त्र, निवारा, संगोपन तसेच शिक्षण देऊन स्वावलंबी बनविण्याकरिता बालसदन योजनेअंतर्गत जिल्ह्यात १९९९-२००० मध्ये ८ बालसदन संस्था सुरू होत्या. या संस्थामध्ये १५२ लाभार्थी होते. यावर्षी संस्थांना ९,१५,००० रुपये अनुदान देण्यात आले. बालसदनातील निराधार मुलांचेही उदरनिर्वाह संगोपन व शिक्षणाकरिता दरमहा दरडोई ४५० रुपये अनुदान दिले जाते. तसेच भाडेपोटी दरमहा दरडोई ५० रुपये अनुदान देण्यात येते.

बालगृहे व विशेष गृहे : गुन्हेगारी प्रवृत्तीच्या मुलांना सुधारण्यासाठी प्रथम शासकीय अभिक्षणगृहात ठेवले जाते. त्यानंतर त्याचे शासकीय अथवा स्वयंसेवी संस्थांचे बालगृह व विशेषगृहात पुनर्वसन केले जाते. अभिक्षणगृहातील मुला-मुलींच्या पोषण, शिक्षण व उन्नतीसाठी दरमहा २५० रुपये अनुदान दिले जाते. बालगृहात पाठविण्यापूर्वीच्या अल्पावधीत या मुलांची योग्य ती काळजी घेऊन व्यक्तीचिकित्सा केली जाते. योग्य ते औषधोपचार, शालेय शिक्षण, औद्योगिक शिक्षण दिले जाते. बालगृहात राहण्याचा कालावधी जास्तीत जास्त म्हणजे मुलांसाठी वयाच्या १८ वर्षे व मुलींसाठी २० वर्षे एवढा असतो. या संस्थांचा मुख्य उद्देश मुलांचे योग्य पुनर्वसन करणे हाच आहे. हे पुनर्वसन मुलांची संस्थेतून मुक्तता, मुदतपूर्व सुटका, पालकांच्या स्वाधीन करणे, मुलींचे विवाह करणे किंवा दुसऱ्या संस्थेत बदली करून केले जाते. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात नागपूर येथे एक शासकीय बालगृह सुरू होते.

सन १९९७-९८ मध्ये जिल्ह्यात सात बालगृहे (मुले-५, मुली-२) होती. त्यापैकी तीन शासकीय (मुले-२, मुली-१) होती. या बालगृहांची एकूण क्षमता ३२० मुले व १७५ मुलींची असून यावर्षी बालगृहांमध्ये २६९ मुले व मुली होत्या. त्यापैकी ८८ मुलांचे व ४५ मुलींचे पुनर्वसन करण्यात आले. सन १९९९-२००० मध्ये जिल्ह्यातील सात बालगृहांमध्ये ३६० मुले व मुली होत्या. त्यापैकी ७० मुले व ८० मुलींचे पुनर्वसन करण्यात आले.

संगोपन व संरक्षणाची गरज असलेल्या निराधार व निराश्रित बालकांच्या कल्याणाची बालकाश्रम योजनेअंतर्गत १९९९-२००० मध्ये जिल्ह्यातील निराधार व निराश्रित मुले यांच्यासाठी असलेल्या (तीन) डेस्टीट्यूट होममध्ये ४८ लाभार्थी होते. या डेस्टीट्यूट होमला २,८९,००० रुपये अनुदान देण्यात आले.

मुले बालगुन्हेगारीकडे जाऊ नयेत, उन्मार्गी होऊ नये यासाठी प्रतिबंधक स्वरुपाचे कार्य बाल मार्गदर्शन केंद्रातून केले जाते. गलिच्छ लोकवस्ती व झोपडपट्टीतून अशी केंद्रे चालविली जातात. सन १९९९-२००० मध्ये जिल्ह्यात दोन केंद्रे होती. त्यापैकी एक शासकीय होते. या दोन केंद्रामध्ये २०० लाभार्थी होते.

सानुदान संगोपन योजने अंतर्गत जर एखादा मुलगा कोर्ट कमिटेड असेल तर त्याची मुदतपूर्व सुटका करून त्यास लाइसेन्सवर सोडण्यात येते. जे पालक अशा मुलांना सांभाळण्यास तयार असतील त्यांचे ताब्यात देण्यात येते. दिनांक १ एप्रिल १९९४ पासून प्रत्येक मुलामागे ४५० रुपये प्रमाणे पालकांना अनुदान देण्यात येते. हे अनुदान १८ वर्षापर्यंत देण्यात येते. या योजनेअंतर्गत १९९९-२००० मध्ये जिल्ह्यात प्रत्येकी एक मुलांना सांभाळणाऱ्या कुटुंबाची संख्या २५ होती. या कुटुंबांना ४२,००० रुपये अनुदान देण्यात आले.

अशासकीय अनाथालये : नागपूर येथे १९२२ मध्ये बालकल्याण योजनेअंतर्गत अनाथ विद्यार्थीगृह व १९२७ मध्ये स्वामी श्रध्दानंद अनाथालय सुरू झाले. या अनाथालयात असहाय व निराश्रीत महिलांना निवास व अनाथ तसेच गरीब, गरजू व पददलितांच्या मुलांना शिक्षण दिले जाते. त्यांना स्वत:चा व्यवसाय सुरू करण्यासाठी मार्गदर्शन केले जाते. याशिवाय निराश्रित महिला व विधवांचे लग्न करून देणे तसेच त्यांना शिवणकाम व विणकामाचे प्रशिक्षण देण्याचे काम केले जाते. या संस्थांना एका मुलास दरमहा अनुदान ४५० रुपये व ५० रुपये भाडे याप्रमाणे अनुदान दिले जाते. सन १९९९-२००० मध्ये जिल्ह्यातील तीन अनाथालयात ५५ लाभार्थी होते. त्यांचेसाठी ३,३१,००० रुपये अनुदान देण्यात आले. या अनाथालयांची एकूण प्रवेश संख्या १३० होती. या संस्था मुलांना दत्तक देऊन व संगोपन योजनेद्वारे पुनर्वसन करतात.

एकात्मिक बाल विकास सेवा योजना : ही योजना बालकांच्या पोषण व आरोग्यविषयक दर्जात सुधार करण्यासाठी तसेच बालमृत्यूंचे व आजाराचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने १९७५-७६ पासून जिल्ह्यात सुरु झाली. या योजनेअंतर्गत पूरक पोषण आहार, लसीकरण, आरोग्य तपासणी, संदर्भ आरोग्य सेवा, अनौपचारिक शिक्षण व आरोग्य आणि सकस आहार या सोयी पुरविण्यात येतात. सन १९९९-२००० मध्ये जिल्ह्यात १,३८८ अंगणवाडी पोषण केंद्रांमध्ये १,३०,००० लाभार्थी होते.

शासकीय निरीक्षण गृहे : गुन्हेगारी प्रवृत्तीकडे झुकणाऱ्या व उन्मार्गी मुलांचे निरीक्षण करण्यासाठी व त्यांना सुधारण्यासाठी बाल न्याय अधिनियम १९८६ च्या कार्यकक्षेत येणाऱ्या मुलामुलींवर परिवीक्षा अधिकारी यांच्या देखरेखीखाली निरीक्षणगृहात ठेवले जाते. त्यानंतर पुनर्वसन, शैक्षणिक व योग्य ती दखल घेण्यासाठी प्रथम त्यांना बाल न्यायालयापुढे उभे करून नंतर शासकीय बालगृह, विशेषगृह व स्वयंसेवी संस्थाचे बालगृहांमध्ये पाठविले जाते. जिल्ह्यात १९९९-२००० मध्ये दोन निरीक्षणगृहे (मुलांचे-१, मुलींचे-१) होती व त्यात

एकूण ७५ मुले-मुली होत्या. त्यांचेवर १४,००,००० रुपये खर्च झाले. या निरीक्षण गृहामध्ये प्रत्येकी ५० मुले व ५० मुली एवढी क्षमता आहे. या निरीक्षण गृहात मुले-मुली यांना अल्पकालावधीसाठी ठेवले जाते. बालगृहात पाठविण्यापूर्वीच्या अल्पावधीत त्यांची योग्य ती काळजी घेऊन व्यक्तीचिकित्सा केली जाते व योग्य ते औषधोपचार, शालेय शिक्षण, औद्योगिक शिक्षण दिले जाते.

महिला विकास : निराधार, निराश्रित, परित्यक्ता, विभक्त, विधवा, वेश्या व्यवसायापासून मुक्त करण्यात आलेल्या महिलांना तात्पुरता आधार देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी शासनामार्फत शासकीय महिला राज्यगृह, शासकीय महिला संरक्षणगृह, स्वयंसेवी संस्थामार्फत आधारगृह व हुंडाग्रस्त महिलांच्या पुनर्वसनासाठी माहेर अशा योजना जिल्ह्यात राबविण्यात येत आहेत. राज्यगृह व आधारगृहामध्ये १८ वर्षाच्या वरील महिलांना प्रवेश मिळतो. नागपूरला १९५७ मध्ये महिला राज्यगृह स्थापन झाले. या संस्थेत १९६१ पर्यंत ३४६ महिलांना आश्रय देण्यात आला. त्यापैकी ३०० महिलांचे पुनर्वसन करण्यात आले. त्यातील ३३ महिलांचे विवाह करून देण्यात आले. यावर्षी या संस्थेत ५१ महिला होत्या व त्यांचेवर ३५,००० रुपये खर्च झाले. सन १९९७-९८ मध्ये जिल्ह्यात राज्यगृह-२, संरक्षणगृह-१ व आधारगृह-१ असे एकूण ४ केंद्रे माहेर योजनेअंतर्गत कार्यरत होती. या चार केंद्रामध्ये १०८ लाभार्थी होते. त्यापैकी ६४ लाभार्थीचे (पालकाकडे पाठविली-१२, इतर मार्गाने-५१, नोकरी दिली-१) पुनर्वसन केले. त्यांचेवर यावर्षी २६,०२,००० रुपये खर्च झाले. सन २००१-२००२ मध्ये जिल्ह्यातील चार केंद्रामध्ये (राज्यगृह-२, संरक्षणगृह-१ व आधारगृह-१) १३० लाभार्थी होते. स्वयंसेवी संस्थांना या कार्यासाठी दरमहा दरडोई २५० रुपये व महिलेस दरमहा २५० रुपये व लाभार्थी महिलेसोबत असलेल्या पहिल्या मुलास १५० रुपये व दुसऱ्या मुलास १०० रुपये दरमहा अनुदान देण्यात येते. शासकीय संस्थेतील लाभार्थ्यास सध्या मिळत असलेल्या इतर सोयीशिवाय याचप्रमाणे अनुदान देण्यात येते.

महिला कल्याण : आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकातील अत्यंत कमी शिक्षण असणाऱ्या निराधार, निराश्रित तसेच विधवा महिलांच्या कल्याणासाठी जिल्ह्यात खालीलप्रमाणे योजना राबविण्यात येत आहेत.

निराधार, निराश्रित विधवांचे मुलींच्या विवाहाकरिता २,००० रुपये अनुदान देण्याच्या योजनेअंतर्गत १९९७-९८ मध्ये जिल्ह्यात १५ लाभार्थीना ३०,००० रुपयांचे अनुदान देण्यात आले. सन १९९९-२००० मध्ये ६४ लाभार्थीना १,२८,००० रुपये अनुदान दिले.

व्यावसायिक प्रशिक्षण योजनेअंतर्गत माध्यमिक अथवा उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या परंतु आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण देऊन स्वावलंबी बनविण्यासाठी राज्य शासनाची ही योजना १९८५ मध्ये सुरू करण्यात आली. त्यानुसार दरडोई दरमहा १०० रुपये प्रमाणे विद्यावेतन देण्यात येते. प्रशिक्षणाचा कालावधी सहा महिने ते दोन वर्षांचा असतो. सन १९९९-२००० मध्ये १६६ महिलांनी या योजनेचा लाभ घेतला व त्यावर १,००,००० रुपये खर्च झाले.

स्वयंरोजगार योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या कमकुवत गटातील महिलांना या राज्यपुरस्कृत योजनेद्वारे प्रत्येकी ५०० रुपये आर्थिक मदत देण्यात येते. ही योजना जिल्ह्यात १ एप्रिल

१९८५ पासून लागू करण्यात आलेल्या या योजनेद्वारे १९९९-२००० मध्ये ५२४ महिलांना आर्थिक सहाय्य देण्यात आले. त्यावर २,६२,००० रुपये खर्च झाले.

महिला मंडळांना सहाय्यक अनुदान योजनेअंतर्गत ग्रामीण विभागातील गरजू महिलांना प्रशिक्षण अथवा उत्पादन केंद्रातून तसेच सामूहिक स्वयंपाकगृहामधून स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यात येतो. या योजनेअंतर्गत जिल्ह्यात २० संस्थाना १,९९,००० रुपये अनुदान देण्यात आले.

गरजू महिलांना घरबसल्या काम मिळावे व त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होता यावे या हेतूने कामधेनू योजना १९९५-९६ पासून जिल्ह्यात सुरू झाली. या योजनेअंतर्गत १९९९-२००० मध्ये १६६६ लाभार्थीसाठी ४,००,००० रुपये अनुदान वाटप केले. यामध्ये नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेमार्फत गरजू महिलांना घरबसल्या काम देण्यात येते. त्याकरिता स्वयंसेवी संस्थांना एक गरजू महिलेला दरमहा कमीत कमी ५०० रुपये इतके खर्च वजा जाता मिळकत मिळवून दिल्यास शासनाकडून दरमहा २० रुपये प्रमाणे व्यवस्थापन अनुदान देण्यात येते.

धर्मादाय व स्वयंसेवी संस्था

समाजाच्या कल्याणासाठी विविध क्षेत्रात सेवाभावी वृत्तीने कार्यरत अशा बऱ्याच संस्था जिल्ह्यात आहेत. त्यामध्ये १८६० च्या सोसायटीज् रजिस्ट्रेशन ॲक्टखाली नोंदणीकृत संस्थाचा समावेश होतो. स्वातंत्र्योत्तर काळात सेवाभावी संस्थांचे नियमन करण्यासाठी १८६० च्या अधिनियमाखेरिज १९५० चा मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम (बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट) शासनाने अमलात आणला. नोंदणीकृत सर्वच संस्थांची माहिती स्थलसंकोचामुळे येथे देणे शक्य नसले तरी स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात स्थापन झालेल्या परंतु वैशिष्ट्य पूर्ण काम करणाऱ्या निवडक संस्थांची माहिती खाली दिली आहे.

जिल्ह्यातील नोंदणीकृत धर्मादाय संस्थांची १९७१ पासून दशवार्षिक अंतराने संख्या खालीलप्रमाणे होती.

वर्ष	कार्यरत संख्या	वर्ष	कार्यरत संख्या
१९७१	१३९६	१९९१	९६१९
१९८१	३२८८	२००१	२१,५१४

डिसेंबर २००१ मध्ये २१,५१४ नोंदणीकृत संस्था होत्या. त्यात हिंदूच्या ९६४, मुसलमानाच्या २०९ व ख्रिश्चनाच्या १३ संस्था होत्या.

भोसला वेदशास्त्र महाविद्यालय, नागपूर : भोसले राजघराण्याच्या प्रयत्नांनी सुरू झालेली वेद व संस्कृत विद्येच्या उपासनेची परंपरा पुढे तशीच चालू राहिली. तिला संघटित स्वरूप देण्याचा पहिला प्रयत्न वेदविद्या प्रकांडपंडित कृष्णशास्त्री टोकेकर यांनी १८६९ मध्ये केला. दहा वर्षे त्यांनी स्वत:च्या प्रयत्नांनी वेदशाळा चालविल्यानंतर ९ डिसेंबर १८७९ ला भोसले वेदशास्त्र महाविद्यालयाची स्थापना केली. या महाविद्यालयास तत्कालीन नागपूरचे दादासाहेब कप्तान, गोपाळराव भिडे, मार्तंडराव वाईकर, श्रीराम मारवाडी यांनी सुसंघटित स्वरूप दिले.

या महाविद्यालयाचे पहिले मुख्याध्यापक म. म. भट्टजीशास्त्री घाटे होते. तर वेदमूर्ति नानाजी वझे, बापूजी दातार हे वेदांचे अध्यापक होते.

वैयाकरणकेसरी बाळशास्त्री घाटे, म. म. कृष्णाशास्त्री घुले, म. म. भाऊशास्त्री घुले, वैदिक शिरोमणि नारायणबोवा आर्वीकर, म. म. केशवरावजी ताम्हन, डॉ. मुंजे, लोकनायक बापूजी आणे, रावबहादूर दादासाहेब परांडे, माधवराव किनखेडे, रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण, शिवरामपंत मुंजे व जागेश्वरराव बोधनकर यांच्या देणगीतून १९२१ मध्ये संस्थेची इमारत उभी झाली. (भोसला वेदशास्त्र महाविद्यालय, नागपूर यांच्याकडून प्राप्त माहिती आधारे.) या महाविद्यालयाचा मुख्य उद्देश वेद व संस्कृत भाषेचे लोकांना ज्ञान देणे व त्याबद्दल आवड निर्माण करणे आहे. ही संस्था ५ मे १९२१ ला १८६० च्या सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्टनुसार रजिस्टर झाली. इ. स. १९३० मध्ये काशीचे पंडित महामहोपाध्याय लक्ष्मणशास्त्री द्रविड यांच्या हस्ते संस्थेला संस्कृत महाविद्यालयाचे स्वरुप देण्यात आले. याच वर्षी नागपूरचे ॲडव्होकेट रावबहादूर बळवंतराव महाजन यांनी रु. ५,००० चा ग्रंथसंग्रह संस्थेला भेट दिला. त्यातून स्वतंत्र ग्रंथालय सुरू झाले. त्यात अनेक प्राचीन व दुर्मिळ ग्रंथ व हस्तलिखिते आहेत.

आर्यसंस्कृती व प्राच्य विद्येच्या अध्यापनाची परंपरा या संस्थेने जोपासली असून प्राचीन गुरूकुलाच्या धर्तीवर येथे वेदांचे व संस्कृत शास्त्रांचे अध्यापन सुरू आहे. शास्त्रीय विभाग, वैदिक विभाग व याज्ञिक विभाग या तिन्ही स्तरावर अध्यापन सुरू असते. इ. स. १९३८ पासून संस्कृत परीक्षांचे वर्ग या महाविद्यालयात सुरू झाले. येथे अध्यापनाशिवाय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी विविध प्रकारचे उत्सव व व्याख्याने आयोजित केली जातात.

या महाविद्यालयात शास्त्रीय, याज्ञिक, वैदिक अभ्यासक्रमाबरोबर विद्यापीठाअंतर्गत असणाऱ्या पूर्व प्राज्ञ, प्राज्ञ, विशारद, शास्त्री तसेच भाषा प्रचारिणी सभेच्या प्रथमा, द्वितीया, तृतीया व प्रवेश परिचय या परीक्षांचे अभ्यासक्रम राबविले जातात. येथून आतापर्यंत सुमारे १२,००० च्या वर विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले आहे. येथे वेदाध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यास निवासाची सोय उपलब्ध करून दिली जाते.

श्री नागपूर गुजराथी मंडळ, नागपूर (१९०५) : राजाराम दिक्षीत, सौभाग्यचंद कोठारी, देवजीभाई घावर, मौ. अेम. आर. मलक, पोपटलाल शहा, डाह्याभाई सुतारिया, नानजीभाई शहा, प्रेमजीभाई शाह, वसंतजीभाई शाह, जयदेवशंकरभाई ठाकर, जहाभाई जिजिभाई पटेल यांनी ही संस्था स्थापन केली. या संस्थेने १९०५ मध्ये नागपूरला मलक इतवारी गुजराती प्राथमिक शाळा सुरू केली. याव्यतिरिक्त संस्थेची नागपूरला बृजलाल मणिलाल वसंत वाणिज्य, जयदेवशंकर मणिशंकर ठाकर कला व जशभाई जिजिभाई पटेल विज्ञान महाविद्यालय, उमिया शंकर नारायणजी हायस्कूल, पकवासा गुजराती गर्ल्स हायस्कूल, महावीर छबलबाई गुजराती प्राथमिक कन्या शाळा, श्रीमती चंचलबेन नारायणभाई पटेल शिशुविहार या शाखा आहेत. संस्थेच्या महाविद्यालय व सर्व शाळांना शासनाकडून अनुदान प्राप्त होत असते. संस्थेने सुरुवातीला भाड्याच्या घरातून शाळा स्थापन करून सुरुवात केली असली तरी आज विद्याप्रेमी व दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने वरील सर्व शिक्षण संस्था स्वत:च्या इमारतीत कार्यरत आहेत.

मोहपा एज्युकेशन सोसायटी, मोहपा (१९१३) : इ. स. १९१३ मध्ये मोहपा एज्युकेशन

सोसायटीची स्थापना होऊन संस्थेने मुलींची प्राथमिक शाळा सुरू केली. परंतु पाच वर्षानंतर ही शाळा सरकारकडे हस्तांतरित केली. या संस्थेने १९६३ मध्ये पिंपळा व कोहळी येथे प्रत्येकी एक माध्यमिक शाळा सुरू केली. तसेच मोहपा येथे मुलींसाठी वेगळी माध्यमिक शाळा सुरू केली.

भोसले मुक विद्यालय, नागपूर (१९१५) : मुक बधीर विद्यार्थ्यांना उपयोगी शिक्षण देणे तसेच त्यांना वेतकाम, शिवणकाम, रंगकाम इत्यादीचे शिक्षण देऊन स्वावलंबी बनविणे या उद्देशाने नागपूर येथे या विद्यालयाची १ ऑगस्ट १९१५ ला स्थापना झाली. त्यासाठी शाळेत सर्व प्रकारच्या सोयी उपलब्ध करून दिल्या जातात. त्याचा फायदा जास्तीत जास्त २०० विद्यार्थी घेतात. शाळेची स्वत:ची इमारत आहे.

बेंगाली एज्युकेशन सोसायटी, नागपूर (१९१८) : या संस्थेची स्थापना सर बिपीन कृष्ण बोस, जे. सी. मित्रा, प्रो. एस. सी. रॉय, एस. एम. डे, तुलसीचरण डे, एस. पी. चॅटर्जी, एस. सी. दत्ता, सी. के. मुकर्जी व डी. आर. मुझुमदार यांच्या प्रयत्नानी झाली. सुरुवातीला दिनानाथ स्कूल सोसायटी या नावाने ही संस्था स्थापन झाली, तद्नंतर काही वर्षानी नावात बदल करून बेंगाली एज्युकेशन सोसायटी (१९१८) या नावांनी नोंदणी करण्यात आली. तत्पूर्वी बंगाली समाजातील मुला-मुलींच्या शिक्षणाकरिता १९०२ मध्ये नागपूरला प्रायमरी शाळा स्थापन करून पुढे त्याचे रूपांतर मिडल स्कूलमध्ये करण्यात आले होते. तथापि विद्यार्थ्यांची वाढती संख्या लक्षात घेऊन दिनानाथ हायस्कूल मध्ये रूपांतर करण्यात आले. सद्या संस्थेच्या नागपुरात दिनानाथ हायस्कूल, दिनानाथ कनिष्ठ महाविद्यालय, दिनानाथ कॉम्पुटर प्रशिक्षण अभ्यासक्रम, बेंगाली हायस्कूल, बेंगाली प्रायमरी स्कूल व बेंगाली के. जी. स्कूल या शाळा कार्यरत आहेत. तसेच पर्यावरणाबाबत विद्यार्थ्यांच्या मनात प्रेम उत्पन्न व्हावे म्हणून सदा हरितक्रांती असावी म्हणून संस्थेने 'पर्यावरण संघटना' स्थापन केली. विद्यार्थ्यांना शिक्षणात गोडी निर्माण व्हावी व सामाजिक तथा नैतिक ज्ञान मिळावे आणि अभ्यासाला उपयोगी असणारी पुस्तके मिळावी म्हणून संस्थेने बंगाली भाषेतील व इतर भाषेतील पुस्तकांचा संग्रह करून मोठ्या ग्रंथालयाची स्थापना केली. या संस्थेच्या शाळेतून न्यायमूर्ति ए. पी. सेन, बंगाली चित्रपटांतील सुप्रसिध्द अभिनेता व कलकत्त्याचे शेरिफ वसंत चौधरी, हिंदी चित्रपट सृष्टीतील सुप्रसिध्द अभिनेत्री जया बच्चन व छत्रपती पुरस्कार विजेते मित्र यांनी शिक्षण घेतलेले आहे.

भगिनी मंडळ, नागपूर (१९२०) : गरजू भगिनी व मुले यांची सर्वांगीण उन्नती करण्यासाठी नागपूरला सप्टेंबर १९२० मध्ये भगिनी मंडळाची स्थापना झाली. या मंडळाने १९३३ मध्ये वाचनालय व ग्रंथालय सुरू केले. १९३९ मध्ये मुंबईतील नुतन बाळकृष्ण संघाचे सहकार्याने बालक मंदिर सुरू केले. या बालक मंदिरास शासनाची मान्यता मिळाली. इ. स. १९५४ मध्ये भगिनी मंडळाने उद्योगमंदिर सुरू केले. हे मंडळ सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत किर्तन, भजन, परिसंवाद, भाषणे, नाटक इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करते.

मातृसेवा संघ, नागपूर (१९२१) : मध्यम व कनिष्ठ वर्गाच्या हिंदू स्त्रियांच्या बाळंतपणासंबंधी येणाऱ्या अडचणी दूर करण्याच्या उद्देशाने ही संस्था ८ मे १९२१ रोजी कमलाताई होस्पेट, वेणूताई नेने व सीताबाई गाडगीळ, गंगाबाई गोखले व सावित्रीबाई मटंगे यानी स्थापन

केली. या संस्थेच्या कार्यास मथुराबाई द्रवीड, रमाबाई तांबे लक्ष्मीबाई गाडगीळ, लक्ष्मीबाई केळकर यांनी हातभार लावला. या संस्थेने सुरुवातीला नागपूर येथे चार खाटांचे सूतिकागृह सुरू केले. या सुतिकागृहास डफरिन हॉस्पिटलच्या डॉक्टर व्दारकाबाई कमळाकर यांनी आर्थिक सहाय्य मिळवून देण्याचे आश्वासन दिले. त्याप्रमाणे १९२१ मध्ये नागपूरला बलवंत संगीत मंडळीचा मुक्काम असताना 'वीर विडंबन' या नाटकाच्या एका प्रयोगाचे उत्पन्न मिळवून दिले. ही संस्था १३ मार्च १९२५ ला सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्टअन्वये नोंदविण्यात आली. ही संस्था १९२१ ते १९४८ पर्यंत सिताबर्डी सुतिकागृह या नावाने पंजियत होती. सन १९५४ पासून ही संस्था मातृसेवा संघ या नावांनी सुरू झाली. इ. स. १९२६ मध्ये सरकारने इमारत बांधण्यासाठी २ एकर जमीन दिली. ही जागा कमी पडेल म्हणून संस्थेने १८३६ चौरस फूट जागा विकत घेतली. या संस्थेतर्फे १९२६ पासून विद्यार्थिनींना सी. पी. मेडिकल एक्झामिनेशन बोर्डाच्या सूतिकाशास्त्राच्या परीक्षेस पाठविले जात होते. इ. स. १९३३ मध्ये कस्तुरबा गांधी व १९३४ मध्ये जमनालाल बजाज यांनी या संस्थेला भेट दिली. सन १९४२ च्या 'चले जाव' चळवळीमध्ये या संस्थेतील कार्यकर्त्यांनी भाग घेतल्यामुळे या संस्थेवर पोलिसांची करडी नजर होती.

इ. स. १९५१ मध्ये संस्थेच्या इमारतीचे उद्घाटन मध्यप्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री पं. रविशंकर शुक्ल यांच्या हस्ते झाले. या संस्थेचे कार्य लक्षात घेऊन १९६१ मध्ये कमलाताई होस्पेट यांना पद्मश्री देण्यात आली. सद्या या संस्थेच्या सुतिकागृहाच्या २० शाखा जिल्ह्यात व जिल्ह्याबाहेर असून मंदबुध्दी मुलांसाठी नंदनवन शाळा, समाजशिक्षण महिला महाविद्यालय व वृध्दांसाठी पंचवटी आश्रम कार्यरत आहेत. याव्यतिरिक्त एक वसतिगृहही आहे.

अनाथ विद्यार्थीगृह, नागपूर (१९२२) : गरीब, गरजू व पददलितांच्या मुलांचा शैक्षणिक विकास करून त्याद्वारे या विद्यार्थ्यांना चांगले नागरिक घडविणे या उद्देशाने ही संस्था गोविंद गणेश उपाख्य काकासाहेब चोळकर यांनी मोहिते वाड्यात सुरू केली. संस्थेचा उद्देश केवळ अनाथ विद्यार्थ्यांचा बौध्दिक व भौतिक विकास करणे इतका नसून उद्योग व व्यवसायाचे प्रशिक्षण देऊन त्यांचा आत्मविश्वास वाढविणे हा सुध्दा आहे. या संस्थेची इ. स. १९२६ मध्ये नोंदणी झाली. याच वर्षी संस्थेला डॉ. भवानी शंकर नियोगी नगरपालिकेचे अध्यक्ष असताना २.०२३ हेक्टर (५ एकर) जमीन नागपूरमधील लकडगंज भागात देण्यात आली. त्यावर इमारत बांधण्यासाठी पार्वतीबाई चिटणवीस, गंगाबाई गोखले, श्रीमंत बाबुराव देशमुख, ॲड. पुराणिक, डॉ. ल. वा. गावंडे इत्यादिंनी आर्थिक सहाय्य दिले. त्याचप्रमाणे संस्थेस मुंबईचे डॉ. गोपाळराव देशमुख यांनी आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ रु. १३,००० चे दान दिले. त्यातून विनायकराव देशमुख हायस्कूलची इमारत बांधण्यात आली. संस्थेस लीलाताई उपाख्य, माईसाहेब सुभेदार यांनी रु. १०,००० ची देणगी दिली. याशिवाय मा. ना. घटाटे, न्याय. अण्णासाहेब सुभेदार, रामलालजी बाजपाई, न्या. नियोगी, बापुसाहेब घाडगे, धुंडीराजपंत पाठक, कमल तळवलकर, कमलाताई कोरके, गोपाळरावजी भातारकर, सुरेंद्र अग्रवाल, नानाजी आंबेकर, सुरेश जुनघरे, गोगटे यांनी आर्थिक सहाय्य दिले असून लहान मोठ्या स्वरुपात आर्थिक सहाय्य मिळते.

ही संस्था माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षण देत असून गरीब विद्यार्थ्यांची वसतिगृह व

भोजनाची मोफत सोय करते. या वसतिगृहामध्ये २०० मुलांच्या निवासाची सोय करण्यात आली आहे. सध्या संस्थेत कोर्ट कमिटेड अभिक्षण गृह आणि निराधार व निराश्रित मुले या तीन योजनांचे अंतर्गत २००१-२००२ मध्ये १३० मुले होती. संस्थेचे बालक मंदिर, प्राथमिक शाळा, शिवणवर्ग सुरू असून शिधावाटप व स्टेशनरीचे दुकानही आहे. संस्थेची १६.१८७ हेक्टर जमीनही आहे. ही संस्था तीन कारखान्यांचे संचालन करीत असून त्यात मुलांना औद्योगिक शिक्षण देते. संस्थेच्या प्रयत्नातून विनायकराव देशमुख हायस्कूल सोसायटीची निर्मिती करण्यात आली असून त्याद्वारे तीन माध्यमिक शाळा व त्यास संलग्नित तीन कनिष्ठ महाविद्यालये चालविली जात आहेत. त्यात एक मुलींची माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाचा समावेश आहे. ही संस्था अंदाजे ५,००० विद्यार्थी व विद्यार्थिनीच्या विद्यादानाचे कार्य करीत आहे.

संस्थेला पंडित मोतीलाल नेहरू, मौलाना अब्दुल कलाम आझाद व बॅरि. एम. आर. जयकर (१९२५), पंडित मदन मोहन मालवीय (१९२६), लाला लजपत रॉय (१९२७), महात्मा गांधी (१९३३), पंडित जवाहरलाल नेहरू (१९३६), पंडित हृदयनाथ कुंझरु (१९४१), विनायक दामोदर सावरकर, महर्षी कर्वे, पंडित रविशंकर शुक्ल, बी. जी. खरे, पं. द्वारकाप्रसाद मिश्रा व वसंतराव नाईक यांनी भेट देऊन संस्थेचा गौरव केला.

सेवा सदन सोसायटी, नागपूर : पुणे सेवा सदन संस्थेच्या कार्याचा प्रसार करण्यासाठी व द्रव्यनिधी गोळा करण्यासाठी गोपाल कृष्ण देवधर व ग. बा. गरूड हे प्रचार करीत असत. इ. स. १९२६ मध्ये देवधर व गरूड नागपूरला असताना रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण यांच्या भेटीत नागपुरातील प्रौढ गरजू महिलांना विद्यार्जन द्यावे असे विचार व्यक्त करण्यात आले. या कार्यासाठी कर्नल के. व्ही. कुकडे यांनी ३,००० रुपयांची देणगी दिली. तसेच काही प्रतिष्ठीत व्यक्तींनीही देणग्या दिल्या. देणगीद्वारे रु. ९,००० इतकी रक्कम जमा झाल्यानंतर २ जानेवारी १९२७ रोजी नागपूरला सेवासदन सोसायटीच्या शाखेची स्थापना झाली. नागपूर सेवा सदनच्या प्रगतीचे प्रमुख कर्नल के. व्ही. कुकडे, पेट्रन न्या. भवानीशंकर नियोगी, न्या. वा. रा. पुराणिक या त्रिमूर्तीना जाते. या वर्षी चार प्रौढ विद्यार्थिनींच्या शिक्षणासाठी वसतिगृहाची सुरुवात झाली. पहिली दोन-तीन वर्षे प्रौढ महिलांचे प्राथमिक शिक्षण, इंग्लिश भाषेचे वर्ग, शिवण, गायन, वादन व नर्सिंगचे वर्ग सुरू होते. १ जुलै १९३० ला सेवासदन नॉर्मल स्कूलची स्थापना झाली. इ. स. १९३२ मध्ये प्राथमिक शाळा-प्राक्टिसिंग स्कूल म्हणून काढण्यात आली. अशा प्रकारे स्त्री-शिक्षिका तयार करण्यासाठी उपयुक्त शिक्षणक्रम संस्थेने सुरू केला. याशिवाय १९२८ मध्ये सेंट जॉन ॲम्बुलन्स असोसिएशनच्या परीक्षेला महिलांना संस्थेतर्फे पाठविण्यात आले. संस्थेतर्फे खास मेडिकल कमिटी स्थापून ऑनररी डॉक्टर्स व प्राध्यापकांच्या मदतीने प्राथमिक उपचार आरोग्यशास्त्र, गृहपरिचर्या या विषयांचे वर्ग चालविले जात होते. संस्थेने सुरुवातीचे दहा वर्षात महिलांना पाच वर्षात मॅट्रिक व खाजगीरित्या इंटर आर्टचे परीक्षेला बसण्यासाठी खास वर्ग सुरू केले होते. हे शिक्षण प्रसाराचे कार्याचे खर्च सरकारकडून आर्थिक मदत न घेता केवळ वैदर्भिय दानशुर मंडळीकडून मिळालेल्या देणग्या, वर्ग शुल्क व वसतिगृहाचे उत्पन्न यातून भागविला जात होता.

सन १९४०-४१ मध्ये मध्यप्रांत सरकारकडून संस्थेला १.०११ हेक्टर (२.५ एकर) जागा

दान मिळाली. त्यावर संस्थेची इमारत १९४५ पर्यंत उभी राहिली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सेवा सदन संस्थेत प्रौढ स्त्रियांबरोबर मुलीही शिक्षणाचा लाभ घेण्यास येऊ लागल्या. पुढे प्रौढ स्त्रियांची संख्या कमी होऊन ५ ते १८ वयोगटांच्या विद्यार्थिनींची संख्या वाढली. इ. स. १९५० मध्ये संस्थेच्या हायस्कूलला शासनाची मान्यता मिळून अनुदानही मिळू लागले. सद्या संस्थेतर्फे नागपूरला सेवासदन हायस्कूल, सेवासदन अध्यापक विद्यालय, यशोदाबाई खरे अध्यापक विद्यालय, सेवासदन प्रायमरी शाळा, सेवासदन बालक मंदीर, पाळणाघर, पूर्व-प्राथमिक प्रशिक्षण केंद्र व सेवासदन वसतिगृह सुरू आहेत.

श्री श्रध्दानंद अनाथालय, नागपूर (१९२७) : या संस्थेची स्थापना १ फेब्रुवारी १९२७ ला स्वामी श्रध्दानंद यांच्या स्मरणार्थ स्मारकरुपाने सर गंगाधरराव चिटणवीस, राजे लक्ष्मणराव भोसले व रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण यांनी दिलेल्या देणगीतून झाली. तसेच या कामी सरदार व्यंकटराव गुजर, जस्टीस भवानीशंकर नियोगी, डॉ. बी. एस. मुंजे, कर्नल के. व्ही. कुकडे, दाजीसाहेब बुटी, रावसाहेब डी. लक्ष्मीनारायण यांचा हातभार लागला. यावेळी महाराष्ट्रात अशाच प्रकारची पंढरपूर येथे संस्था कार्यरत होती. मध्यप्रदेश व वऱ्हाड येथून पुष्कळ महिला पंढरपूरला आश्रमासाठी जात असत. त्या सर्वांना आश्रय मिळावा म्हणून श्री. श्रध्दानंद अनाथालयाची स्थापना झाली. त्यावेळी बालहत्त्या प्रतिबंधगृह अनाथालय, विधवा विवाह व शुध्दीगृह चालविले जात होते. या संस्थेची इमारत बांधण्यासाठी सदाशिवराव बुटी यांनी १.८०४ हेक्टर (४.४६ एकर) जमीन दान दिली. इमारतीसाठी निधी गोळा करण्यास जनतेनेही मदत केली. जनतेने दिलेल्या देणग्यामधून संस्थेची इमारत उभी झाली असून या इमारतीचा शिलान्यास ३० मार्च १९६१ ला तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी केला.

इ. स. १९३० मध्ये मुंबईच्या श्रध्दानंद अनाथ महिलाश्रम येथे लहान मुलांचे संगोपन व जोपासना चांगल्या तऱ्हेने होऊ शकत नसल्याने तेथील व्यवस्थापकाच्या विनंतीवरून श्रध्दानंद अनाथालयाने अशा मुलांच्या पालन पोषणाची जबाबदारी स्वीकारली. १९ फेब्रुवारी १९३७ ला ही संस्था सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्टखाली रजिस्टर झाली. याचवेळी संस्थेला बॉम्बे चिल्ड्रन्स ॲक्टखाली 'फिटपर्सन' म्हणून मान्यता मिळाली. संस्थेत ज्यूडिशिअल कोर्टाकडून कोर्ट कमिटेड मुले-मुली येऊ लागल्या. संस्था रिमांड-होम म्हणून मान्यता पात्र झाली. ज्युव्हेनाईल कोर्टातून एक दिवस ते १८ वर्षांपर्यंतच्या मुली संस्थेत पाठविल्या जातात. येथील मुले आठव्या वर्षी अनाथ विद्यार्थीगृह किंवा संस्थेतील सर्टीफाईड स्कूल फॉर बॉईज येथे पाठविण्यात येतात. या विभागातील शिक्षणायोग्य मुली शाळेत पाठविल्या जातात. संस्थेच्या होम फॉर डेस्टीट्यूट विमेन या विभागात निराश्रीत महिलांना आधार देऊन त्यांना काम, आश्रय, जेवण व कपडा देण्याचे काम या विभागात केले जाते. याव्यतिरिक्त रेस्क्यू होम फॉर विमेन विभागात कुमारी माता व विधवा महिलांना बाळंतपणासाठी ठेवून घेतले जाते. बाळंतपणानंतर काही महिला घरी जातात व काही संस्थेतच राहतात. ज्या निराश्रीत महिला असतात त्यांना शिवणकाम व विणकामाचे प्रशिक्षण देण्याचे काम ही संस्था करते.

या संस्थेने बालक मंदिर, शिवण क्लास, गायन क्लास, बालवाचनालय व मॅटर्निटी होम सुरू केले असून हुंडाग्रस्त महिलांसाठी माहेर हे केंद्र सुरू केले आहे.

ब्लाईंड रिलिफ असोशिएशन, नागपूर (१९२८) : या संस्थेची स्थापना वामनराव

वाडेगावकर यांनी २२ मार्च १९२८ ला केली. संस्थेने १९ ऑगस्ट १९२८ रोजी नागपूरला अंध विद्यालयाची स्थापना केली. हे मध्यप्रदेशातील एकमेव अंध विद्यालय होते. या संस्थेच्या स्थापनेचा उद्देश अंधांना ब्रेल लिपीची ओळख करून देणे आणि ते अवगत करू शकणाऱ्या कलागुणांचे शिक्षण देणे हा होय. या शाळेत नऊ ते सोळा वर्षांमधील अंध मुलांना प्रवेश देण्यात येतो. त्यांना शैक्षणिक, वसतिगृह व भोजनाच्या मोफत सुविधा पुरविण्यात येतात. प्रारंभी या शाळेत ४ मुले होती. जानेवारी १९५७ पासून या विद्यालयात अंध मुलींना प्रवेश देण्यास सुरुवात झाली. इ. स. १९६३ मध्ये या विद्यालयात १३ अंध विद्यार्थिनींना प्रवेश देण्यात आलेला होता. इ. स. १९७१ मध्ये या विद्यालयात १२५ नेत्रहीन मुलामुलींचा तसेच कर्मचारी वर्गाचा समावेश होता. अंध विद्यार्थ्यांना अवगत होऊ शकणाऱ्या विविध हस्तव्यवसायांचे ज्ञान देण्यासाठी येथे एक स्वतंत्र शाखा आहे. संस्थेच्या मालकीच्या १.६१८७४ हेक्टर (४ एकर) जमिनीवर विद्यालयाची स्वत:ची इमारत असून ती १९३५ मध्ये बांधण्यात आली आहे. या इमारतीसाठी टाटा व वाडिया यांचेकडून प्रत्येकी रु. ५,००० चे अनुदान मिळाले होते. त्याशिवाय लोकहितैषी मंडळींकडून देणग्या आणि शासनाकडून निधी मिळाला होता. सन १९६४-६५ च्या सुमारास विद्यालयातील अंध सहवासी विद्यार्थिनीसाठी दरवर्षी रु. १५,००० केंद्रिय समाज कल्याण मंडळाकडून प्राप्त होत असत. या संस्थेस विश्वस्त मंडळ असून ते व्यवस्थापन पहात असते.

रामकृष्ण मठ, नागपूर (१९२८) : स्वामी विवेकानंद यांनी सन १९०१ मध्ये कलकत्ता येथे रामकृष्ण मठ व रामकृष्ण मिशन ही संस्था स्थापन केली. हिंदू धर्म व तत्वज्ञान विचार व संस्कार करणारी ही सेवाभावी संस्था, याच संस्थेची शाखा नागपूरला १९२८ पासून कार्यरत आहे. ही संस्था रामकृष्ण परमहंस व विवेकानंद यांच्या साहित्यांचे मराठी व हिंदी भाषेत प्रकाशन करीत असते. आश्रमद्वारे एक ग्रंथालय व वाचनालय चालविले जात असून ग्रंथालयात विविध विषयांवरील ४२,१६१ ग्रंथ आहेत. या ग्रंथालयाचा १६०० पेक्षा जास्त सभासद व इतर नैमित्तिक वाचक लाभ घेत असतात. तसेच वाचनालयात १४ वृत्तपत्रे व ७० नियतकालिके येत असून त्यांचा १२५ वाचक दररोज लाभ घेतात. याव्यतिरिक्त दरवर्षी ६६,९०९ रुग्णांवर उपचार करणारा होमिओपॅथी दवाखाना, सुमारे ७० खेड्यातील लोकांना औषधी व आरोग्याच्या सोयी प्रदान करणारा (ॲलोपॅथी) फिरता दवाखाना, एक फिजियोथेरपी विभाग, वीस गरीब व होतकरू महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह ही सेवा कार्येही या आश्रमाद्वारे सुरू आहेत. येथील मंदिरात नियमित पूजा-आरती, प्रार्थना, संकीर्तने इत्यादी सुरू असतात. दर रविवारी धार्मिक व सांस्कृतिक प्रवचन होत असते. याशिवाय अवतार-महापुरुषांचे जन्मोत्सव यथोचित कार्यक्रमाद्वारे साजरे केले जातात. या संस्थेच्या प्रकाशन विभागातून रामकृष्ण व विवेकानंदावर हिंदी व मराठीतून आतापर्यंत ३१८ पुस्तके प्रकाशित झाली असून मराठीतून 'जीवन विकास' मासिक प्रकाशित केले जाते. रामकृष्ण मठाची नवीन वास्तू उभारण्यात आली आहे. उंच अधिष्ठानावर उभारलेली ही वास्तू विविध शैलीतील शिखर-शिखरीका आणि मुख्य गाभाऱ्यासमोरील भव्य आयाताकार सभामंडप, त्याच्या गजपृष्ठाकार छतासाठी उल्लेखनीय ठरतो.

विदर्भ साहित्य संघ, नागपूर (१९२३) : विदर्भ साहित्य संघ ही सांस्कृतिक व शैक्षणिक संस्था आहे. ही संस्था सुरुवातीला १९२३ मध्ये अमरावतीला स्थापन झाली. त्यानंतर १९३० मध्ये ती नागपूरला स्थलांतरीत झाली. संस्था मराठी भाषा, साहित्य, ऐतिहासिक संशोधन

व धार्मिक अभिलेख यांच्या विकासासाठी तसेच नाट्य, चित्रकला, संगीत इत्यादी कलांना प्रोत्साहन देत असते. संघातर्फे कविसंमेलन, व्याख्यानमाला, पुस्तक प्रकाशन, नाट्यशोध, घर, आंगण, सांस्कृतिक कार्यक्रम, शालेय स्पर्धा, नाट्यस्पर्धा, नैमित्तिक कार्यक्रम, विशेष कार्यक्रम, परिसंवाद, चर्चा, शैक्षणिक व संगीत इत्यादी उपक्रम वर्षभर सुरू असतात. विदर्भ साहित्य संघाचे सुमारे ३,८०० पेक्षा अधिक सभासद असून जिल्ह्यात सात व जिल्ह्याबाहेर ३६ शाखा कार्यरत आहेत. संघाचे श्री. शिवाजी संदर्भ ग्रंथालय असून त्याद्वारे ग्रंथ सहवास ही चळवळ राबविली जाते. या ग्रंथालयातील ब्रेल लिपी प्रत्यक्ष नेत्रहीन अभ्यासकांच्या गरजपूर्तीसाठी असल्यामुळे ब्रेल लिपीतील अनेक नवीन ग्रंथ तथा नियतकालिकांची खरेदी करण्यात आली. अनेक अंध विद्यार्थ्यांना वाचनिक व लेखनिक उपलब्ध करून दिले जाते. विदर्भ साहित्य संघाच्या सद्याच्या जागेवर असलेल्या इमारतीचे व रंगमंदिराचे नूतनीकरण करण्यासाठी एका भव्य अद्ययावत तंत्रयुक्त सांस्कृतिक संकुलाची निर्मिती सुरू करण्यात आली आहे. ह्या नव्या वातानुकूलित वास्तूत साधारणपणे दोन नाट्यगृहे, एक संगीत सभागृह, एक चित्रशाळा, एक तालीम कक्ष, संदर्भ ग्रंथालय, एक अभ्यास वर्ग, दोन अद्यावत अतिथी गृहे, साऊन्ड रेकॉर्डिंग कक्ष, रंगभूषा कक्ष, संघ कार्यालयासाठी कक्ष इत्यादी अत्यावश्यक सोयींचा समावेश असेल.

सी. पी. ॲण्ड बेरार एज्युकेशन सोसायटी, नागपूर (१९३०) : या संस्थेच्या स्थापनेस ॲड. अे. व्ही. खरे, श्रीमंत सरदार व्यंकटराव गुजर, बॅरि. डब्ल्यू. व्ही. देशपांडे, एम. एन. कागभट, जी. एस. गोखले, के. बी. फडणवीस व ॲड. एम. आर. राजकारणे यांचा हातभार लागला. या संस्थेची नागपूरला सी. पी. ॲंड बेरार प्राथमिक शाळा, सी. पी. ॲण्ड बेरार हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय (दोन शाखा), सी. पी. ॲंड बेरार कला-वाणिज्य महाविद्यालय, श्री. दत्त बालक मंदिर व कोंढाळीला लखोटिया हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय सुरू आहेत. या संस्थेतून वामन कृष्ण चोरघडे, दिनदयालजी गुप्त, दत्ता मेघे, भाऊराव मुळक, ले. कर्नल प्रताप मार्तंडराव जोग यांनी शिक्षण घेतलेले आहे.

अरविंदाश्रम : सीताबर्डी भागात योगी अरविंदाश्रम सोसायटीचे एक उपासना केंद्र कार्यरत आहे.

हायस्कूल सोसायटी, सावनेर (१९३०) : गरीब, हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने भालेराव गुरूजीनी ही संस्था स्थापन केली. या संस्थेने एक माध्यमिक शाळा, दोन कनिष्ठ महाविद्यालये आणि एक महाविद्यालय सुरू केले. या संस्थेतून एम. सहारे, माजी अध्यक्ष, केंद्रीय लोकसेवा आयोग, यांनी शिक्षण घेतले आहे.

नागपूर शिक्षण मंडळ, नागपूर (१९३२) : न्यायमूर्ती तात्यासाहेब किनखेडे, दा. तु. मंगळमूर्ती, ॲड. गं. सी. ब्रम्हराक्षस, आप्पासाहेब देशपांडे, चितळे, ॲड. आ. वि. वझलवार यांनी स्थापन केलेल्या या संस्थेतर्फे सद्या श्री. दादासाहेब धनवटे नगर विद्यालय, रमेश चांडक इंग्लिश स्कूल, श्री. बिंझाणी नगर महाविद्यालय, मथुरादास मोहता विज्ञान महाविद्यालय व श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालय कार्यरत आहेत. सन १९३२ ते १९४२ पर्यंत महाविद्यालयात मुलींना प्रवेश नव्हता. सन १९४१ मध्ये मुलींना महाविद्यालयात प्रवेश देण्याचा नागपूर शिक्षण मंडळाने ठराव केला. या मंडळाने श्री. बिंझाणी नगर महाविद्यालयात 'वंदे मातरम्' चळवळीतील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला होता. तेव्हापासून हैद्राबाद संस्थानातून श्री.

बिंझाणी नगर महाविद्यालयामध्ये मोठ्या प्रमाणात विद्यार्थी येऊ लागले ते १९४८ पर्यंत सतत येत होते. सन १९४२ च्या 'चलेजाव' आंदोलनात भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना सभा घेणे, चर्चा करणे यासारख्या गोष्टींसाठी महाविद्यालयात निर्भयपणे आधार व आश्रय दिला जात असे. सन १९४३ मध्ये नागपूर शिक्षण मंडळाने सहशिक्षणाचे महत्त्वाचे पाऊल उचलले. याच सुमारास सिटी जिमखाना संस्थेच्या आश्रयाखाली आला. या संस्थेने नागपुरातच नव्हे तर राज्यात देशी खेळांची आवड निर्माण करून नागपुरात व्यायाम प्रसाराचे कार्य केले. सन १९४७ मध्ये नोकरी करून शिक्षण घेण्याची सोय या संस्थेने आपल्या महाविद्यालयात उपलब्ध करून दिली.

या संस्थेअंतर्गत असलेल्या शाळा व महाविद्यालयातून लोकनायक बापूजी अणे, न्यायमूर्ति के. तू. मंगलमूर्ति, पी. व्ही. नरसिंहराव, वसंतराव नाईक, भय्याजी पांढरीपांडे, डॉ. के. एल. दफ्तरी, न्यायमूर्ति रा. ना. पाध्ये, न्यायमूर्ति सी. एस. धर्माधिकारी, न्यायमूर्ति श्री. ए. मासोदकर, न्यायमूर्ति पी. आ. बेलोरकर, ए. बी. वर्धन, डॉ. व्ही. एम. दांडेकर, बी. एस. परांजपे, डॉ. बी. आर. आष्टीकर, पुरूषोत्तम दारव्हेकर, प्रभाकर खर्डेनवीस, नितीन गडकरी, डॉ. बी. आर. आकरे यांनी शिक्षण घेतले आहे.

वुमेन्स एज्युकेशन सोसायटी, नागपूर (१९३२) : महाराष्ट्रातील मुलींच्या उच्च शिक्षणासाठी या. मु. पाठक, एम. बी. नियोगी, रमाबाई तांबे व मिस के. एस. रंगाराव यांनी ही संस्था स्थापन केली. या संस्थेने नागपूरला एल. ए. डी. ॲण्ड श्रीमती रत्नीदेवी पुरोहित महाविद्यालय ऑफ होम सायन्स ॲंड होमसायन्स टेक्नॉलॉजी सुरू केले. त्यात गृहशास्त्र विज्ञान, वास्तुशिल्प शास्त्र, तांत्रिक शिक्षण, कला विज्ञान व वाणिज्य शाखेचे अभ्यासक्रम शिकविले जातात. या संस्थेचे एक कनिष्ठ महाविद्यालय, वुमेन्स टेक्निकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, एक छात्रालय व दोन ग्रंथालये आहेत.

श्री ब्रम्हकर्म वर्धिनी संस्कृत महाविद्यालय, नागपूर (१९३३) : विदर्भ व इतर प्रांतात संस्कृतचा प्रचार व प्रसारासाठी माधवदास तुलसीदास पारेख यांनी या संस्थेची स्थापना केली. त्यासाठी गुलाबचंदजी मेहता, मुलचंदजी रामजी त्रिवेद्वी, मन्नालाल उमाजी त्रिवेद्वी, जयदेवशंकर मणिशंकर ठाकर यांनी सहकार्य केले. संस्थेने १९४७ मध्ये स्वत:ची इमारत उभी केली. संस्थेची एक पाठशाळा (१९३३) आहे. त्यात प्रथमा, पूर्व माध्यमा, उत्तर माध्यमा, शास्त्री, आचार्य आदि अभ्यासक्रम सुरू असून दरवर्षी २० ते २५ विद्यार्थी संस्कृत पंडित उपाधीत उत्तीर्ण होतात. संस्थेस केंद्रशासन व राज्य शासनाकडून १९५० पासून अनुदान दिले जाते. संस्थेचे एक ग्रंथालय व वसतिगृहही आहे. वसतिगृहामध्ये सुमारे ४० विद्यार्थ्यांची निवास व भोजनाची सोय आहे.

विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर (१९३४) : डॉ. भवानीशंकर नियोगी व डॉ. वा. वि. मिराशी यांच्या प्रेरणेने या मंडळाची १४ जानेवारी १९३४ ला स्थापना झाली. या मंडळाच्या कार्यालय व विकासाला ग. त्र्यं. माडखोलकर, ह. ना. नेने, डॉ. वि. भि. कोलते, प्रा. भ. श्री. पंडित, डॉ. ग. त्र्यं. देशपांडे, रा. पु. सगदेव यांनी हातभार लावला. मंडळाचे मुख्य कार्य संशोधन व त्याचे प्रकाशन होय. निबंध वाचन व व्याख्याने आरंभापासूनच सातत्याने आयोजित केली जातात. इ. स. १९५८ पासून मंडळाने संशोधनपर लेखांच्या प्रकाशनासाठी एक 'वार्षिक' अंक प्रकाशित करण्यास सुरुवात केली. त्यात महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील संशोधकांचे अनेक विषयांवरील निवडक लेख प्रकाशित केले जातात.

प्रारंभी मंडळाला स्वत:ची स्वतंत्र इमारत नव्हती. मंडळाचे स्थापनेपासून १९५४ पर्यंत कार्यालय व ग्रंथालय श्री. बिंझाणी सिटी महाविद्यालयात होते. इ. स. १९६५ पर्यंत मंडळाचे कार्यालय विदर्भ साहित्य संघाचे इमारतीत होते. याच वर्षी संस्थेच्या स्वत:च्या इमारतीचे उद्‌घाटन राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांच्या हस्ते झाले. मंडळाचा जुना ग्रंथसंग्रह अल्प असला तरी निवडक आहे. ग्रंथालयात सुमारे ६,००० चे वर निवडक ग्रंथ आहेत.

आयडिअल एज्युकेशन सोसायटी, उमरेड (१९३६) : ही संस्था १३ ऑक्टोबर १९३६ ला उमरेड येथे स्थापन झाली. संस्थेचे १९ सभासद असून त्यापैकी सहा महिला आहेत. सद्या या संस्थेअंतर्गत मुलांसाठी व मुलींसाठी प्रत्येकी एक माध्यमिक शाळा, एक प्राथमिक शाळा व एक बालक मंदिर सुरू आहे. संस्थेला १९६१ मध्ये शासनाकडून रु. ४२,१२८ चे आर्थिक सहाय्य मिळाले होते. नगरपालिकेकडून कन्या शाळेला रु. १०० व बालक मंदिराला केंद्रीय समाज कल्याण बोर्डाकडून रु. २,९०० मिळाले होते.

धरमपेठ शिक्षण संस्था, नागपूर (१९३७) : ही संस्था १९३७ मध्ये स्थापन झाली. या संस्थेतर्फे सद्या नागपूरला आर. एस. मुंडले धरमपेठ कला, वाणिज्य महाविद्यालय (वरिष्ठ व कनिष्ठ धरमपेठ), म. पा. देव विज्ञान महाविद्यालय (वरिष्ठ व कनिष्ठ), तारकुंडे धरमपेठ, माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, श्रीमती मिराबाई संचेती धरमपेठ, माध्यमिक कन्या शाळा, धरमपेठ शिक्षण संस्थेची अंबाझरी प्रकल्प इंग्रजी माध्यम शाळा, आर. एस. मुंडले, इंग्रजी माध्यम शाळा, कै. मनोरमाबाई मुंडले, धरमपेठ प्राथमिक मराठी मुलांची शाळा, धरमपेठ प्राथमिक मराठी मुलींची शाळा व शिशु विकास मंदिर कार्यरत आहेत. त्यात एकूण ११,७४३ विद्यार्थी, ३१८ शिक्षक व १५७ इतर कर्मचारी आहेत.

विदर्भ राष्ट्रभाषा प्रचार समिती, नागपूर (१९३७) : इ. स. १९३६ मध्ये नागपूरला हिंदी साहित्य संम्मेलन भरले होते. लखनौ काँग्रेस अधिवेशनानंतर वर्ध्याला परत येत असताना महात्मा गांधी, वल्लभभाई पटेल व जमनालालजी बजाज यांना साहित्य संम्मेलनास मार्गदर्शन करण्यास्तव आग्रह करण्यात आला. त्याला मान देऊन गांधीजी, पटेल व बजाज संम्मेलनास उपस्थित राहिले. त्यांच्या सूचनेनुसार हिंदी प्रचार समिती स्थापन करणेचे ठरले. त्याप्रमाणे विदर्भ राष्ट्रभाषा प्रचार समितीची स्थापना झाली. ही केंद्रीय राष्ट्रभाषा प्रचार समितीची शाखा असून समितीचे कार्यक्षेत्र संपूर्ण विदर्भात आहे. समिती राष्ट्रभाषा म्हणून हिंदी भाषेचा प्रचार करण्याचे काम करते. तसेच वर्धा येथील राष्ट्रभाषा प्रचार समिती अंतर्गत घेण्यात येत असलेल्या हिंदी भाषेच्या विविध प्रकारच्या १३ परीक्षा समितीतर्फे घेण्यात येतात.

श्री समर्थ शिक्षण मंडळ, रामटेक (१९३७) : स्वातंत्र्यपूर्व काळात रामटेक तालुक्यातील विद्यार्थ्यांना हायस्कूल शिक्षणासाठी नागपूरला जावे लागत असे. त्यामुळे केवळ समृध्द लोकच आपल्या मुलांना नागपूरला शिक्षणाकरिता पाठवित. हायस्कूल शिक्षणापासून मुली पूर्णत: वंचित होत्या. त्यासाठी सदाशिवराव उर्फ दादाजी पट्टलवार, ॲड. महादेवराव देवळे, बाबुराव नवरे, भैय्याजी तोतडे, डी. टी. मंगळमूर्ती, दादाजी नवरे, आबाजी भाके यांनी ही संस्था स्थापन करून रामटेकला समर्थ हायस्कूल (१९३७) सुरू केले. हायस्कूलला के. टी. मंगळमूर्ती यांनी मान्यता मिळवून दिली. १९४१ मध्ये या हायस्कूलमधील विद्यार्थी सर्टीफिकेट परीक्षेला बसविण्यात आले. त्यांचा निकाल १०० प्रतिशत लागला होता.

संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व शिक्षकांनी अनेक अडचणींना व आर्थिक संकटांना तोंड देवून

समर्थ हायस्कूल १९४४ पर्यंत चालविले. पण त्यानंतर मात्र आर्थिक समस्येमुळे ही शाळा नगरपरिषदेला हस्तांतरित केली. परंतु तत्कालीन ब्रिटीश शासनाच्या धोरणानुसार हायस्कूल चालविणे हे नगरपरिषदेचे काम नाही या सबबीखाली हे हायस्कूल चालविण्यास परवानगी नाकारली. अशावेळी घनश्यामजी किंमतकर, एम. के. नायडू, दामोदरराव किंमतकर, रामजी महाजन, एन. एस. फडणवीस, केशवराव झाडे यांनी समर्थ हायस्कूलला जीवदान दिले. सन १९५१-५३ मध्ये संस्थेच्या इमारतीत समर्थ हायस्कूल सुरू झाले. सद्या संस्थेच्या पाच इमारती व दोन कार्यशाळा (वर्कशॉप) आहेत. संस्थेचा विस्तार व विकासामध्ये विद्यमान अध्यक्ष मधुकरराव किंमतकर यांचे प्रयत्न विशेष उल्लेखनीय आहेत. सद्या संस्था समर्थ हायस्कूल, समर्थ प्राथमिक शाळा, समर्थ कॉन्व्हेंट, विज्ञान व कला कनिष्ठ महाविद्यालय तसेच किमान कौशल्यावर आधारित व्यावसायिक अभ्यासक्रम राबवित आहे. सन २००१-२००२ मध्ये या संस्थांमध्ये एकूण २७२१ विद्यार्थी व ७१ शिक्षक होते.

या संस्थेच्या शाळेतून व महाविद्यालयातून ॲड. मधुकरराव किंमतकर, अशोक खोत, आय. ए. एस., डॉ. एल. जी. चिंचोळकर, एस. एस. खोत, वामनराव ठाकरे व डॉ. एस. एस. कुरेशी या नामांकित व्यक्तिंनी शिक्षण घेतले आहे.

मूक आणि बधिर औद्योगिक संस्था, नागपूर (१९४६) : ही संस्था २६ नोव्हेंबर १९४६ ला काही त्यागी समाजकर्त्यांनी सुरू केली. याच वर्षी तिला शासनाची मान्यताही मिळाली. संस्थेची शाळा प्रथम शुक्रवार तलावाजवळ सुरू झाली. नंतर ती भोसला मूक विद्यालयाच्या इमारतीत स्थलांतरित करण्यात आली. सद्या शाळा स्वत:च्या इमारतीत सुरू आहे. पूर्वी या शाळेत १६ वर्षावरील मुला-मुलींना प्रवेश देऊन भाषेचे जुजबी ज्ञान देत असत. तसेच त्यांना तांत्रिक शिक्षणही देण्यात येत असे. सद्या शाळेत पूर्व प्राथमिक ते दहावीपर्यंत शिक्षणाची सोय असून येथे संपूर्ण भारतातून विद्यार्थी प्रवेश घेतात. शालेय शिक्षणाव्यतिरिक्त क्रीडा व सांस्कृतिक कला क्षेत्रात विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यात येते. विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे ज्ञानासाठी नर्सरीचे प्रशिक्षणही देण्यात येते. संस्थेचे 'मुक बधिर' मुला-मुलींचे वसतिगृह असून त्यात ५० मुले व २० मुली करीता राहण्याची सोय आहे. शाळेचे ग्रंथालयही आहे.

सिंधी हिंदी विद्या समिती, नागपूर (१९४८) : इ. स. १९४७ ला हिंदूस्थानच्या फाळणीनंतर बहुतांश सिंधी निर्वासित भारतात स्थायिक झाले. नागपूरला स्थायिक झालेल्या सिंघी समाजातील लोकांनी शैक्षणिक कार्यासाठी सिंधी हिंदी विद्या समिती स्थापन केली. या समितीने १९४८ मध्ये नागपूरला प्रायमरी शाळा सुरू केली. सद्या या समितीअंतर्गत २६ शिक्षण संस्था कार्यरत आहेत. त्यात सिंधु महाविद्यालय, सिंधु ज्युनिअर कॉलेज, सिंधु व्होकेशनल कॉलेज, सिंधी हिंदी हायर सेकंडरी स्कूल, सिंधी हिंदी ज्युनिअर कॉलेज, सिंधी हिंदी ज्युनिअर व्होकेशनल कॉलेज, सिंधी हिंदी गर्ल्स हायस्कूल, बाबा नानक सिंधी हिंदी हायस्कूल, बाबा नानक सिंधी ज्युनिअर कॉलेज, बाबा नानक सिंधु हिंदी ज्युनिअर व्होकेशनल कॉलेज, सिंधी हिंदी हायस्कूल, सिंधी हिंदी ज्युनिअर कॉलेज, सिंधी हिंदी इंग्लिश प्रायमरी स्कूल, सिंधी हिंदी किंडर गार्डन, के. टी. आर. सिंधु इंग्लिश हायस्कूल, सिंधी हिंदी बॉईज प्रायमरी स्कूल, सिंधी हिंदी गर्ल्स प्रायमरी स्कूल, सिंधी हिंदी इंग्लिश प्रायमरी स्कूल, सिंधी हिंदी बापक मंदिर, सिंधी हिंदी पाठशाळा, सिंधी हिंदी बालक मंदिर,

बाबा नानक सिंधी हिंदी पाठशाळा, बाबा नानक सिंधी हिंदी बालक मंदिर, शास्त्री सिंधी हिंदी पाठशाळा व शास्त्री सिंधी हिंदी बालक मंदिर यांचा समावेश आहे.

संस्कृत भाषा प्रचारिनी सभा, नागपूर (१९५०) : ही संस्था २० नोव्हेंबर १९५० रोजी नागपूरला स्थापन झाली. या संस्थेचा मुख्य उद्देश संस्कृतचा अभ्यास व प्रचार करणे होता. या संस्थेचे नागपूरला किनखेडे संस्कृत विद्यालय असून त्यात विद्यार्थ्यांना संस्कृत परीक्षेसाठी शिक्षण व प्रशिक्षण दिले जाते. त्या संस्थेतर्फे संस्कृतमधून 'भवितव्यम्' हे साप्ताहिकही काढण्यात येते.

कला कुंज, नागपूर (१९५५) : ही संस्था नागपूरला १९५५ मध्ये स्थापन झाली. त्यात महिलांना भारतीय शास्त्रीय संगीताचे शिक्षण दिले जाते. नृत्य कलेची वाढ करण्यासाठी ही संस्था प्रसिध्द नर्तिकींचे कार्यक्रम आयोजित करीत असते.

वनिता विकास गृह, नागपूर (१९५७) : ही संस्था ७ डिसेंबर १९५७ ला नागपूर येथे स्त्रियांच्या सामाजिक, सांस्कृतिक व नैतिक आरोग्यासंबंधीच्या विकास कार्यक्रमाखाली सुरू झाली. याची व्यवस्था नागपूर नगर महिला मंडळाकडे असून यामार्फत निराश्रित, विभक्त, विधवा, वेश्या व्यवसायापासून मुक्त करण्यात आलेल्या स्त्रियांच्या पुनर्वसनाचे कार्य केले जाते. त्यासाठी त्यांचे संगोपनाचे काम करून प्रशिक्षण देण्यात येते व शक्य झाल्यास पुन्हा संसार थाटून देण्यात येतात.

इ. स. १९६१ पर्यंत ३४६ महिलांना आश्रय देण्यात आला. त्यापैकी ३०० महिलांचे पुनर्वसन करण्यात आले. त्यातील ३३ महिलांचे विवाह करून देण्यात आले. १९६२ मध्ये या संस्थेत ५४ महिला होत्या.

नागरिक शिक्षण मंडळ, नागपूर (१९५५) : ईश्वरबाबू देशमुख व त्यांचे सहकारी कमलनाथ ढोक यांनी शहरातील तसेच ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी नागपूर शिक्षण मंडळाची स्थापना केली. मंडळाने केवळ शालेय शिक्षणावर भर न देता व्यावसायिक, शारीरिक व समाजकार्याचे शिक्षण देणारे महाविद्यालय तसेच ग्रामीण विभागातील नेतृत्वास शिक्षण देण्यासाठी पंचायत राज प्रशिक्षण केंद्र आणि एक शिबिर संकुल विकसित केले आहे. सद्या या संस्थेच्या नागपूरला राष्ट्रीय विद्यालय, नागरिक अध्यापक विद्यालय, राष्ट्रीय विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालय, पंचायत राज प्रशिक्षण केंद्र, स्व. भय्याजी पांढरीपांडे नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सोशल वर्क, राष्ट्रीय अध्यापक विद्यालय, कुही येथे ऋख्खडाश्रम विद्यालय व ऋख्खडाश्रम कनिष्ठ महाविद्यालय, मांढळ येथे राष्ट्रीय विद्यालय, रामटेक येथे नागार्जून शारीरिक शिक्षण महाविद्यालय या शैक्षणिक शाखा कार्यरत आहेत. याव्यतिरिक्त नागपूरला एक वसतिगृह व अंबाळा येथे नागरिक शिक्षण मंडळ शिबीर संकुल आहे.

संस्थेचे क्रीडांगणावर जिल्हा, राज्य व राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जातात. तसेच सामाजिक प्रबोधनासाठी परिषदा, संमेलने भरविण्यासाठी त्याचा वापरही करण्यात येतो. संस्थेचा 'दसरा महोत्सव' नागपुरातील सांस्कृतिक आकर्षण ठरले आहे. विशेष म्हणजे ईश्वर देशमुख शारीरिक महाविद्यालयात संपूर्ण भारतातून विद्यार्थी शिक्षणासाठी येतात.

नागपूर साहित्य सभा, नागपूर (१९५६) : नागपूर साहित्य सभा १९५६ मध्ये नागपूरला

स्थापन झाली. या संस्थेचे २०० सभासद असून संस्था सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यास प्रोत्साहन देण्याचे कामही करते. संस्था व्याख्याने तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजनही करीत असते.

डॉ. हेडगेवार स्मारक समिती, नागपूर (१९५७) : डॉ. हेडगेवारांचे सुंदर व सुदृढ स्मारक व्हावे. तसेच डॉक्टरांनी राष्ट्राच्या सर्वांगीण उन्नतीकरिता जे प्रयत्न केले त्या प्रयत्नांना पुढे नेण्यासाठी व साहित्यिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक व धर्मादाय चळवळी चालविण्यासाठी डॉ. हेडगेवार स्मारक समितीची स्थापना करण्यात आली. इ. स. १९६२ मध्ये डॉ. हेडगेवारांच्या स्मृति मंदिराचे काम पूर्ण झाले. या मंदिराचे सभोवती विस्तीर्ण पटांगण आहे. या पटांगणाचा उपयोग शारीरिक शिक्षण देण्याकरिता केला जातो. निवासी शारीरिक शिक्षण वर्गाला येणाऱ्यांच्या निवासाकरिता स्मृतिभवन, पांडुरंग भवन, माधव भवन व यादव भवन बांधण्यात आले असून यादव भवनात संस्थेच्यावतीने शालेय-ग्रामीण विद्यार्थ्यांकरिता संस्कारदेय वसतिगृह चालविण्यात येते.

समाज प्रबोधनाकरिता आध्यात्मिक सत्संगाचे कार्यक्रम समाजातील अन्यान्य संस्था आयोजित करतात. समिती त्यांना जागा उपलब्ध करून देते व सर्व प्रकारची मदत करते. इ. स. १९८९ मध्ये समितीने सेवाकार्याचे पोषण व्हावे म्हणून एक सेवा निधी संकलित केला. या निधीच्या व्याजातून सेवा प्रकल्पांना सहायता करण्यात येते. भारतीय कुष्ठ निवारक संघ, चांपा, वनवासी कन्या छात्रावास, नागपूर, पूर्वांचल शिक्षा परिषद, आसाम, भारतीय उत्कर्ष मंडळ व वनवासी कल्याण आश्रम इत्यादी संस्थांना नियमितपणे अनुदान दिले जाते.

महाराष्ट्र भाषा सभा, नागपूर (१९५७) : महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे या संस्थेची ही शाखा नागपूरला १९५७ मध्ये स्थापन झाली. याद्वारे हिंदी भाषेचा प्रसार त्याचबरोबर हिंदी साहित्यात वाढ करण्याचे काम करण्यात येते. या संस्थेद्वारे मराठी पुस्तकांचे हिंदीमध्ये भाषांतराचे कामही केले जाते. संस्था महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे अंतर्गत होणाऱ्या सर्व हिंदी परीक्षांचे आयोजनही करीत असते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, नागपूर (१९५७) : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर (६ डिसेंबर १९५६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी ही 'दिक्षाभूमी' डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे स्मारक उभारण्यासाठी स्मारक समितीला प्रदान केली. या समितीचे अध्यक्ष दादासाहेब गायकवाड व उपाध्यक्ष ना. ह. कुंभारे असताना स्मारक समितीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मध्यवर्ती स्मारकाचे निर्माण कार्य सुरू केले. सद्या स्मारक समितीचे अध्यक्ष रा. सु. गवई असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली समितीचे कार्य अखंडपणे सुरू आहे. समितीने नागपूरला डॉ. आंबेडकर महाविद्यालय (१९६४) व बौध्द भिक्षूसाठी 'भिक्खू निवास' (१९६८) तसेच गोंदियाला डॉ. आंबेडकर विद्यालय आणि तुमसरला डॉ. आंबेडकर प्रायमरी शाळा सुरू केली आहे. याव्यतिरिक्त नागपूरला पाली भाषेच्या प्रचार-प्रसारासाठी पाली भाषा प्रचार समिती स्थापन केली आहे. समितीने महाविद्यालयाची इमारत, सुसज्ज प्रयोगशाळा, अद्ययावत ग्रंथालय, इत्यादीवर सुमारे रु. १ कोटी खर्च केले.

अनुक्रमणिका

विदर्भ हिंदी साहित्य संमेलन, नागपूर (१९५९) : विदर्भात हिंदी साहित्य व भाषेचा प्रसार तसेच साहित्यिकांना प्रोत्साहन देण्यासाठी विदर्भ हिंदी साहित्य संमेलन समितीची स्थापना करण्यात आली. या समितीमार्फत प्रयाग येथील हिंदी परीक्षा घेण्यात येतात. तसेच साहित्यिक सेवा, मोफत वाचनालय, ग्रंथालय, साहित्यिकांचे कार्यक्रमाचे आयोजन, परिसंवाद, परिचर्चा, साहित्यिक गोष्टी इत्यादी कार्यक्रम राबविले जातात.

जिल्ह्यातील काही सेवाभावी संस्था

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, नागपूर
युगांतर शिक्षण संस्था, नागपूर
हिस्लॉप एज्युकेशन सोसायटी, नागपूर
नागपूर गुजराती केलवाणी मंडळ, नागपूर
सिंधी विद्या समिती, नागपूर
क्रीडा मंडळ, नागपूर
भारतीय विद्या समिती, नागपूर
आर्य विद्या स्मारक समिती, नागपूर
उमर सेवा मंडळ, नागपूर
वैदर्भिय महिला संस्था, नागपूर
साईबाबा लोकसेवा संस्था, नागपूर
डॉ. पंजाबराव स्मृति शिक्षण संस्था, नागपूर
महात्मा बहुउद्देशिय शिक्षण संस्था, नागपूर
ग्रामीण विकास संस्था, नागपूर
सतीमाता शिक्षण संस्था, नागपूर
नॅशनल सेंटर फॉर रुरल डेव्हलपमेंट, नागपूर
नागपूर मॅनेजमेंट असोसिएशन, नागपूर
आर्य विद्या सभा, नागपूर
डॉ. हेडगेवार स्मारक समिती, नागपूर
पब्लिक वेल्फेअर सोसायटी, बुटीबोरी
लॉर्ड बुध्दाज सारीपुत्र ज्ञान प्रसारक शिक्षण संस्था, नागपूर
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज टेक्निकल एज्युकेशन सोसायटी, नागपूर
गुरुदत्त शिक्षण मंडळ, नागपूर
महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था, नागपूर
लॉयन्स युथ फेडरेशन, नागपूर
आंतर भारती आश्रम, (दाभा) नागपूर
महाराष्ट्र शिक्षण संस्था, नागपूर

अनुक्रमणिका

अंकुश शिक्षण संस्था, नागपूर
हरिजन सेवक संघ, नागपूर
सिंधु युवक मंडळ, नागपूर
लोक शिक्षण संस्था, नागपूर
सोमलवार अकॅडेमी एज्युकेशन सोसायटी, नागपूर
इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट अफेअर्स,
लिबरल एज्युकेशन सोसायटी, नागपूर
गणपतराव थोटे सेवा संस्था, नागपूर
महिला सेवा समाज, नागपूर
आदर्श विद्यामंदिर संस्था, नागपूर
न्यू इंग्लिश हायस्कूल असोसिएशन, नागपूर
अंजुमन हमी ए-इस्लाम, नागपूर
युगांतर एज्युकेशन सोसायटी, नागपूर
ग्राम उत्कर्ष शिक्षण संस्था, नागपूर
लक्ष्मीदेवी धीरन कन्या विद्यालय सोसायटी, नागपूर
स्नेह महिला विकास संस्था, नागपूर
श्री दत्त शिक्षण प्रसारक मंडळ, कामठी
दि न्यु एज एज्युकेशन सोसायटी, नागपूर
ग्रामीण ज्ञान विकास शिक्षण संस्था, सावरगाव
सेठ रामनाथ लोहिया हायस्कूल एज्युकेशन सोसायटी, कामठी
डॉ. पंजाबराव देशमुख शिक्षण संस्था, काटोल
भारतीय बौध्द साहित्य प्रचार संघ, कामठी
शिक्षण प्रसारक मंडळ, कामठी
शेठ श्रीराम एज्युकेशन सोसायटी, कामठी
श्री सदाशिवराव पाटील शिक्षण संस्था, कामठी
दि नागपूर डिस्ट्रिक्ट आदिवासी सेवा मंडळ, खापा
राष्ट्रविकास शिक्षण संस्था, खापा
हायस्कूल एज्युकेशन सोसायटी, सावनेर
शहीद पंजाराम स्मारक समिती, सावनेर
श्री गुरुदेव एज्युकेशन सोसायटी, नागपूर
भारतीय बाल विकास समाज, नागपूर
नागपूर हाऊसेस ऑफ मेरी अमॅक्यूलेट, नागपूर
भारतीय व्यायाम शाळा, नागपूर
भारत एज्युकेशन सोसायटी, नागपूर
नागपूर प्रदेश एज्युकेशन सोसायटी, नागपूर
भागवत पद सभा, नागपूर
रवि बहुउद्देशीय शैक्षणिक संस्था, नागपूर

अनुक्रमणिका

दि भगत कंवरराम सेवा मंडळ, नागपूर
राज एज्युकेशन सोसायटी, नागपूर
भगवान बुध्द विहार सार्वजनिक संस्था, नागपूर
बौध्दजन विकास मंडळ, नागपूर
नागपूर एज्युकेशन सोसायटी, नागपूर
आदर्श विद्यामंदिर, नागपूर
गोंड सभा पाठशाळा सोसायटी, नागपूर
भारतीय कला निकुंज, नागपूर
नॅशनल एज्युकेशन सोसायटी, नागपूर
फाईन आर्ट सोसायटी, नागपूर
अनंत शिक्षण संस्था, नागपूर
ॲपोलो बास्केट बॉल क्लब, नागपूर
मोतीबाग एज्युकेशन सोसायटी, नागपूर
अभिनव शिक्षण संस्था, नागपूर
नागपूर स्कूल ऑफ आर्टस सोसायटी, नागपूर
मिलिंद एज्युकेशन सोसायटी, नागपूर
ॲक्टीव यूथ क्लब, नागपूर
आदर्श क्रीडा मंडळ, नागपूर
आदर्श युग प्रवर्तक शिक्षण मंडळ, नागपूर
आदर्श ज्ञान प्रकाश शिक्षणसंस्था, नागपूर
आनंद एज्युकेशन सोसायटी, नागपूर
दि उदय एज्युकेशन सोसायटी, नागपूर
एज्युकेशन बोर्ड ऑफ नागपूर चर्च कौन्सिल, नागपूर
राष्ट्रसेवा समाज, नागपूर
कल्चरल एज्युकेशन सोसायटी, नागपूर
राष्ट्रभाषा अध्ययन समिती, नागपूर
कला तरंग, नागपूर
कला मंदिर, नागपूर
चतुर संगीत शिक्षण मंडळ, नागपूर
भारतीय वैद्यक समन्वय समिती, नागपूर
संताजी शिक्षण विकास संस्था, नागपूर
विजय व्यायाम सुधार शाळा आणि क्रीडा मंडळ, नागपूर
नगर युवक संस्था, नागपूर
जामदार हायस्कूल एज्युकेशन सोसायटी, नागपूर
रामदेव बाबा स्मारक सार्वजनिक संस्था, नागपूर
जीवन विकास एज्युकेशन सोसायटी, नागपूर
बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमेटी, नागपूर

अनुक्रमणिका

जुमडे टेलरिंग ॲण्ड कटिंग कॉलेज, नागपूर
सत्यिकित्सा प्रसारक मंडळ, नागपूर
नॅशनल एज्युकेशन सोसायटी, नागपूर
श्री समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूर
भारतीय आर. बी. दामले ग्रामसुधार तथा शिक्षण प्रचार सोसायटी, नागपूर
जनरल आवारी स्मृती संस्था, नागपूर
स्त्री शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूर
नवोदय शिक्षण संस्था, नागपूर
प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, नागपूर
सन्मार्ग शिक्षण संस्था, नागपूर
महात्मा फुले एज्युकेशन सोसायटी, नागपूर
विद्या शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूर
नागपूर गीता मंदिर ट्रस्ट, नागपूर
लोकमान्य टिळक जनकल्याण शिक्षण संस्था, नागपूर
प्रागतिक अध्यापक शिक्षण संस्था, नागपूर
जमेथा अरेबिक रशिदिया, नागपूर
श्री नित्यानंद शिक्षण संस्था ट्रस्ट, नागपूर
बाबुरावजी काळे शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूर
मॉडेल एज्युकेशन सोसायटी, नागपूर
पुरूषोत्तम खापर्डे हेल्थ ॲण्ड एज्युकेशन सोसायटी, नागपूर
श्री पांडुरंग प्रासादिक शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूर
दि यंग रिव्होल्युशन पँथर संस्था, नागपूर
प्रबुध्द शिक्षण मंडळ, नागपूर
सेवादल शिक्षण संस्था, नागपूर
प्रबोधिनी शिक्षण संस्था, नागपूर
अखिल भारतीय आदिवासी हलबा विकास परिषद, नागपूर
न्यू मॉडेल लिटररी अँड इंडस्ट्रिअल एज्युकेशन सोसायटी, नागपूर
श्री निकेतन बहुउद्देशिय संस्था, नागपूर
भारत सेवक समाज, नागपूर
वर्धमान नगर सर्वोदय केंद्र, नागपूर
श्री गणेश शिक्षण मंडळ, नागपूर
कर्नाटक संघ, नागपूर
आंध्र असोसिएशन, नागपूर
लिमजी फिरोज बिलीमोरिया पॅव्हेलियन ट्रस्ट, नागपूर
दि जमशेटजी नवशेरवानजी टाटा पारसी गर्ल्स हायस्कूल ट्रस्ट, नागपूर
दि विदर्भ रिजन कौन्सिल फॉर चाईल्ड वेल्फेअर, नागपूर
भिडे गर्ल्स स्कूल सोसायटी, नागपूर

दि यूथ कौन्सिल, नागपूर
श्री महावीर एज्युकेशन सोसायटी, नागपूर
क्रांतीमंदिर ट्रस्ट, नागपूर
फेडरेल एज्युकेशन सोसायटी, नागपूर
सार्वजनिक हनुमान सुधार संस्था, नागपूर
नवजीवन समाज, नागपूर
रविनगर वनिता समाज, नागपूर
फ्रेंडस् एज्युकेशन सोसायटी, नागपूर
दि नागपूर टेनिस ट्रस्ट, फॉर्म लँड, नागपूर
जवाहर एज्युकेशन सोसायटी, नागपूर
अभ्यंकर स्मारक, नागपूर
टिळक विद्यालय, नागपूर
विदर्भ रिजनल कबड्डी असोसिएशन, नागपूर
नवयुवक शिक्षण संस्था, नागपूर
ताराबाई सरंजामे ट्रस्ट, नागपूर
दि टिचर्स एज्युकेशन सोसायटी, नागपूर
शांती जैन ट्रस्ट फंड, नागपूर
विदर्भ एज्युकेशन कर्मचारी संघ, नागपूर
बाबुळखेडा विकास मंडळ, नागपूर
समाजकल्याण मंडळ, नागपूर
सार्वजनिक आखाडा, नागपूर
मित्रमंडळ भवन ट्रस्ट, नागपूर
छावणी व्यायाम शाळा, नागपूर
भिसिकर आखाडा, पंचकमेटी, नागपूर
काळे फाऊंडेशन ट्रस्ट, नागपूर
श्रमिक समाजसेवा मंडळ, नागपूर
आर. बी. सी. एन. नायडू आंध्र टेम्पल ट्रस्ट, नागपूर
प्राथमिक काँग्रेस पंचायत, नागपूर
जयस्वाल आखाडा, नागपूर
श्री संत रविदास व्यवस्थापक मंडळ, नागपूर
सिटिझन अपलिफ्ट सोसायटी, नागपूर
सिटिझन एज्युकेशन सोसायटी, नागपूर
सिध्द नागार्जुन वैद्यक शिक्षण समिती, नागपूर
सिध्दार्थ एज्युकेशन सोसायटी, नागपूर
सिंधी हिंदी विद्या समिती, नागपूर
सिंधु एज्युकेशन सोसायटी, नागपूर
सिव्हिलाईजड एज्युकेशन सोसायटी, नागपूर

स्त्री शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूर
सुभानिया एज्युकेशन सोसायटी, नागपूर
सुर्योदयी विद्या प्रचार समिती, नागपूर
सुरूची निकेतन, नागपूर
सेवादल शिक्षण संस्था, नागपूर
सोसायटी ऑफ ॲग्रिकल्चर ॲण्ड इंडस्ट्रिज, नागपूर
सोसायटी ऑफ सिस्टर ऑफ सेंट जोसेफ, नागपूर
श्री संताजी एज्युकेशन सोसायटी, नागपूर
हरदास एज्युकेशन ॲण्ड कल्चरल सोसायटी, कामठी
हुसामिया एज्युकेशन सोसायटी, नागपूर
ज्ञानगंगा भारतीय एज्युकेशन ॲण्ड कल्चरल सोसायटी, नागपूर
दि ज्ञान प्रसारक एज्युकेशन सोसायटी, नागपूर
ज्ञानसागर शिक्षण संस्था, नागपूर
विद्या प्रसारक मंडळ, सावनेर
विनोबा एज्युकेशन सोसायटी, तेलकामठी
विश्वव्यापी शैक्षणिक संस्था, वेलतुर
ग्रामीण विकास संस्था, नागपूर
वुमेन्स एज्युकेशन सोसायटी, नागपूर
श्री शारदा गायन वादनालय, नागपूर
दि शिख एज्युकेशन सोसायटी, नागपूर
शिशु विकास एज्युकेशन सोसायटी, नागपूर
दि शिक्षण प्रसारक मंडळ, कामठी
दि शिक्षण विकास मंडळ, रामटेक
शिक्षण विकास मंडळ, नागपूर
सतचिकित्सा प्रसारक मंडळ, नागपूर
श्री समर्थ शिक्षण मंडळ, रामटेक
सरस्वती मंदिर, नागपूर
सरस्वती शिक्षण मंडळ, नागपूर
सरस्वती शिक्षण संस्था, नांदागोमुख
सरस्वती सदन, नागपूर
दि सर्वोदय शिक्षण मंडळ, नागपूर
सर्वोदयी शिक्षण मंडळ, पारशिवनी
स्वस्तिक एज्युकेशन सोसायटी, नागपूर
साऊथ इंडियन एज्युकेशन सोसायटी, नागपूर
मध्यप्रदेश शारीरिक शिक्षण एवंम क्रीडा मंडळ, नागपूर
दि उमरेड ॲकडेमी ऑफ आर्टस ॲण्ड सायन्सेस, उमरेड
अखिल भारतीय शिवशक्ती एज्युकेशन सोसायटी, उमरेड

जीवन शिक्षण मंडळ, उमरेड
दलित सेवा शिक्षण मंडळ, उमरेड
आदर्श शिक्षण संस्था, उमरेड
उमरेड तहसिल आदर्श विद्या सेवा, उमरेड
महात्मा फुले समता शिक्षण संस्था, नागपूर
बाळ गंगाधर टिळक बहुउद्देशिय शिक्षण संस्था, नागपूर
श्रीराम शिक्षण संस्था, रामटेक
विद्यासागर शिक्षण संस्था, रामटेक
रामटेक तालुका समाजसेवा मंडळ, रामटेक
विकास महिला मंडळ, रामटेक
राष्ट्रीय आदर्श विद्यालय शिक्षण मंडळ, रामटेक
ग्रामहित शिक्षण मंडळ, रामटेक
डॉ. पंजाबराव देशमुख शिक्षण संस्था, नागपूर
ग्रामसुधार योजना, थुगांवदेव
पिपल्स वेल्फेअर सोसायटी, नागपूर
जनता शिक्षण मंडळ, नागपूर
ग्रामविकास शिक्षण संस्था, नागपूर
ताजाबाद कमेटी, नागपूर
श्रीराम ग्रामविकास शिक्षण संस्था, नागपूर
दि बाल शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूर
बसवेश्वर शिक्षण संस्था, नागपूर
श्री चैतन्नेश्वर शिक्षण मंडळ, नागपूर
विद्या प्रसारक संस्था, मोहपा
मोहपा शिक्षण संस्था, मोहपा
बालक मंदिर धरमपेठ, नागपूर
साईकृपा किसान शिक्षण संस्था, बुटीबोरी
व्यंकटेश शिक्षण संस्था, बुटीबोरी
शिंदे शिक्षण संस्था, सावरगाव
श्री सच्चिदानंद शिक्षण संस्था, नागपूर
श्री संत गुलाबबाबा शिक्षण संस्था, कोंढाळी
नवजीवन शिक्षण संस्था, मोवाड
बॅरिस्टर शेषराव वानखेडे फिप्टीसिक्थ बर्थडे फेडरेशन, नागपूर
सेवादल शिक्षण संस्था, खैरगाव
श्री गणेश व्यायाम सेवा मंडळ, नागपूर
चोखामेळा समाज गर्ल्स स्कूल, नागपूर
शिक्षण प्रसारक मंडळ, काटोल
आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ, काटोल

ग्रामस्थ महिला बाल उन्नतिमंडळ, काटोल
बनारसीदास रूइया हायस्कूल कमेटी, काटोल
जनता शिक्षण प्रसारक मंडळ, केळवद
लोकसेवा संघ, गौंडखैरी
दलित शिक्षण संस्था, सावनेर
नगर सुधार समिती, कन्हान
भिवापूर व्यायाम शाळा, भिवापूर
भिवापूर एज्युकेशन सोसायटी, भिवापूर
यशवंत शिक्षण प्रसारक समिती, गुमगाव
सरस्वती महिला मंडळ, कुही
अनुरूध्द एज्युकेशन सोसायटी, टाकळघाट
श्री कृषक समाज शिक्षण मंडळ, शिवणगाव
आदिवासी ज्ञान विकास शिक्षण संस्था, शिवणगाव
भंसाळी ग्रामसेवा मंडळ, टाकळी
श्री एज्युकेशन सोसायटी, घोरड
प्रेरणा शिक्षण संस्था, नरखेड
श्री गजानन शिक्षण प्रसारक मंडळ, भारसिंगी
श्री गणेश प्रसादिक शिक्षण संस्था, पाटणसावंगी
जनता शिक्षण प्रसारक मंडळ, जलालखेडा
बापू शिक्षण संस्था, कान्होलीबारा
दि जनसेवक एज्युकेशन सोसायटी, रिधोरा
भारतीय कृषक शैक्षणिक संस्था, वडोदा
बहुउद्देशीय ग्रामीण विकास संस्था, महालगाव
तरूण युवक मंडळ, बुटीबोरी
ग्रामीण शिक्षण संस्था, थडीपवनी
लोकसेवा शिक्षण संस्था, सिर्सी
दि लोक जीवन मंडळ, बेला
दि लोकमान्य शिक्षण संस्था, वाडेगाव

तक्ता क्रमांक १

तालुकानिहाय साक्षरता टक्केवारी

जिल्हा-तालुका	वर्ष	एकूण			ग्रामीण			नागरी		
		एकूण	पुरुष	महिला	एकूण	पुरुष	महिला	एकूण	पुरुष	महिला
जिल्हा	१९६१	३५.१५	४८.०६	२१.२६	२०.९२	३३.२०	८.२८	४८.२५	६१.१८	३३.७५
	१९७१	४५.२६	५६.०९	३३.५१	३१.९९	४३.७५	१९.६०	५६.४१	६६.४१	४५.५४
	१९८१	५४.५६	६३.७४	४४.६२	४१.३८	५२.१८	२९.८८	६४.६०	७२.४२	५६.०३
	१९९१	७३.६४	८१.७९	६४.७४	६१.६८	७२.१५	५०.३९	८०.९१	८७.६०	७३.५५
काटोल	१९६१	२७.९०	४०.३२	१४.७६	२५.१७	३७.०५	१२.६९	४०.०१	५४.५८	२४.१४
	१९७१	३८.८०	४९.८९	२७.०१	३६.३८	४७.७९	२४.९६	४८.६५	६०.३८	३५.८७
	१९८१	४८.२६	५७.८७	३८.०९	४५.६९	५५.४०	३५.४५	५८.६७	६७.७९	४८.८८
	१९९१	६७.५२	७७.०५	५७.१४	६३.८३	७३.४७	५३.३३	८२.६१	९१.६७	७२.७३
सावनेर	१९६१	२८.१४	४२.९३	१२.६९	२५.१३	३९.१४	१०.५५	३९.१३	५६.६२	२०.५७
	१९७१	६७.८०	४९.९१	२४.९२	३५.४९	४७.८०	२२.८६	४६.४९	५९.५३	३२.४६
	१९८१	४७.१४	५८.१५	३५.३०	४३.७८	५४.८५	३१.८९	५७.२८	६८.०८	४५.६२
	१९९१	६६.२३	७६.५४	५४.७९	६२.१०	७२.००	४८.८९	७४.५८	८३.८७	६४.२९

तक्ता क्रमांक १--क्रमश:

जिल्हा-तालुका	वर्ष	एकूण			ग्रामीण			नागरी		
		एकूण	पुरुष	महिला	एकूण	पुरुष	महिला	एकूण	पुरुष	महिला
रामटेक	१९६१	२०.२२	३२.८४	७.१६	१८.८१	३१.०१	६.१९	३९.८०	५७.९४	२०.६६
	१९७१	३१.००	४३.३७	१७.९१	२९.९५	४१.७४	१६.७२	४५.१४	५८.७०	२९.८७
	१९८१	३८.८८	५०.३८	२६.५२	३७.२२	४८.७४	२४.८३	५४.१६	६५.३२	४२.०५
	१९९१	६०.९५	७२.७३	४७.०६	५६.२५	६८.२९	४२.११	७३.०८	८४.६२	६१.५४
नागपूर	१९६१	४४.८१	५७.४४	३०.८१	२१.१६	३३.७५	८.३३	४९.५५	६१.९५	३५.५५
	१९७१	५३.५९	६३.३२	४२.८१	३१.८८	४३.४८	१९.३६	५७.७३	६७.०४	४७.३४
	१९८१	६२.१७	७०.१०	५३.४६	४४.००	५४.३३	३२.७१	६५.६१	७३.०८	५७.४१
	१९९१	६७.५७	७४.५८	५९.६२	६५.५९	७३.४७	५६.८२	७७.७८	८०.००	७५.००
नागपूर (श.)	१९९१	८१.९४	८८.२५	७५.१३	--	--	--	८१.९४	८८.२४	७५.०४
उमरेड	१९६१	१८.८७	३०.७९	६.७७	१६.४१	२७.५३	५.२१	३७.२६	५४.३२	१८.८४
	१९७१	३०.३१	४२.७५	१७.५२	२८.४१	४०.४७	१६.०८	४४.८८	५९.९३	२८.८५
	१९८१	४०.२८	५१.४८	२८.७४	३८.२८	४९.३८	२६.८९	५४.९८	६६.६६	४२.६०
	१९९१	६६.३६	७७.१९	५४.७२	६१.६४	७१.०५	४८.५७	७३.६८	८५.००	६६.६७
पारशिवनी	१९६१	--	--	--	--	--	--	--	--	--
	१९७१	--	--	--	--	--	--	--	--	--
	१९८१	--	--	--	--	--	--	--	--	--
	१९९१	६०.७८	७०.३७	४८.९८	५७.५३	६८.४२	४५.७१	६८.९६	८०.००	५७.१४

अनुक्रमणिका

मौदा	१९६१	--	--	--	--	--	--	--	--	--
	१९७१	--	--	--	--	--	--	--	--	--
	१९८१	--	--	--	--	--	--	--	--	--
	१९९१	६०.६७	७३.३३	३८.८९	--	--	--	६०.६७	७३.३६	३८.८९
कामठी	१९६१	--	--	--	--	--	--	--	--	--
	१९७१	--	--	--	--	--	--	--	--	--
	१९८१	--	--	--	--	--	--	--	--	--
	१९९१	७२.१९	८१.०१	६२.५०	६१.०२	७३.३३	४८.२८	७८.२६	८५.७२	७०.४५
कुही	१९६१	--	--	--	--	--	--	--	--	--
	१९७१	--	--	--	--	--	--	--	--	--
	१९८१	--	--	--	--	--	--	--	--	--
	१९९१	५८.२४	६९.५६	४६.६७	--	--	--	५८.२४	६९.५६	४६.६७
भिवापूर	१९६१	--	--	--	--	--	--	--	--	--
	१९७१	--	--	--	--	--	--	--	--	--
	१९८१	--	--	--	--	--	--	--	--	--
	१९९१	५९.३८	७१.८८	४६.८८	--	--	--	५९.३८	७१.७८	४६.८८

तक्ता क्रमांक १--समाप्त

जिल्हा-तालुका	वर्ष	एकूण			ग्रामीण			नागरी		
		एकूण	पुरुष	महिला	एकूण	पुरुष	महिला	एकूण	पुरुष	महिला
हिंगणा	१९६१	--	--	--	--	--	--	--	--	--
	१९७१	--	--	--	--	--	--	--	--	--
	१९८१	--	--	--	--	--	--	--	--	--
	१९९१	६७.०२	७६.४७	५५.८१	६५.००	७४.४२	५२.६३	७८.५७	८७.५०	६६.६७
नरखेड	१९६१	--	--	--	--	--	--	--	--	--
	१९७१	--	--	--	--	--	--	--	--	--
	१९८१	--	--	--	--	--	--	--	--	--
	१९९१	६६.९७	९१.४९	५७.६९	६५.१२	७३.३३	५६.१०	७३.९१	८३.३३	६३.९४
कळमेश्वर	१९६१	--	--	--	--	--	--	--	--	--
	१९७१	--	--	--	--	--	--	--	--	--
	१९८१	--	--	--	--	--	--	--	--	--
	१९९१	६९.५१	७७.०७	५८.९७	७४.२९	५६.२५	६६.६७	७५.००	८७.५०	७१.४३

अनुक्रमणिका

तक्ता क्रमांक २

नागपूर जिल्ह्यातील प्रौढ शिक्षण केंद्रे

तालुका	प्रौढ शिक्षण केंद्र	पटावरील प्रौढांची संख्या		
		पुरुष	महिला	एकूण
जिल्हा एकूण	३,५६०	५२,६३२	१,१३,६०७	१,६६,२३९
नागपूर (शहर)	७६०	६,२३४	२८,८८९	३५,१२३
नागपूर (ग्रामीण)	१६६	२,७९९	५,०९०	७,८८९
हिंगणा	१९०	३,४६५	६,०८४	९,५४९
कामठी	१४५	२,९८१	६,१०६	९,०८७
काटोल	२४३	३,६४०	६,२३०	९,८७०
नरखेड	१९३	४,४२०	५,४६९	९,८८९
सावनेर	२७०	४,४१३	९,०५९	१३,४७२
कळमेश्वर	१४५	२,६०४	४,७९९	७,४०३
रामटेक	२९५	४,८४४	९,४३५	१४,२७९
पारशिवनी	२२२	३,७१०	६,७६०	१०,४७०
मौदा	२३४	३,७८२	७,०१३	१०,७९५
उमरेड	२२६	२,३२४	४,९८८	७,३१२
भिवापूर	१७९	२,५५२	५,२९७	७,८४९
कुही	२५१	४,८६४	८,३८८	१३,२५२

तक्ता क्रमांक ३

तालुकानिहाय प्रौढ साक्षरता, २००१-२००२

तालुका	एकूण	पुरुष	महिला
नागपूर (शहर)	३५,१२३	६,२८४	२८,८८९
नागपूर (ग्रामीण)	७,८८९	२,७९९	५,०९०
कामठी	९,०८७	२,९८१	६,१०६
हिंगणा	९,५४९	३,४६५	६,०८४
उमरेड	७,३१२	२,३२४	४,९८८
कुही	१३,२५२	४,८६४	८,३८८
भिवापूर७,८४९	२,५५२	५,२९७	
रामटेक	१४,२७९	४,८४४	९,४३५
मौदा	१०,७९५	३,७८२	७,०१३
पारशिवनी	१०,४७०	३,७१०	६,७६०
काटोल९,८७०	३,६४०	६,२३०	
नरखेड	९,८८९	४,४२०	५,४६९
कळमेश्वर	७,४०३	२,६०४	४,७९९
सावनेर१३,४७२	४,४१३	९,०५९	
एकूण ..	१,६६,२३९	५२,६३२	१,१३,६०७

तक्ता क्रमांक ४

जिल्ह्यातील प्राथमिक शाळा, १९९८-९९

व्यवस्थापन	शाळा	विद्यार्थी		शिक्षक		एकूण प्रशिक्षित
		मुले	मुली	पुरूष	महिला	
केंद्र सरकार	५	८५१	८२२	२३	३१	५४
राज्य शासन	५	६६१	५७८	१८	१९	३७
जिल्हा परिषद--						
ग्रामीण	१,५१३	९२,९३२	८६,३४०	३,२२७	२,८९०	६,११७
नागरी	--	--	--	--	--	--
नगरपालिका	३४६	४३,३०५	४१,४७३	७६७	१,४५७	२,२२४
खाजगी अनुदानित	३२५	६१,५४२	६१,९४९	६९९	२,३३८	२,९२०
खाजगी विनाअनुदानित	२७१	३३,१९३	२७,६४३	२९८	१,३४०	१,४८६
एकूण ..	२,४६५	२,३२,४८४	२,१८,८०५	५,०३२	८,०७५	१२,८३८

तक्ता क्रमांक ५

जिल्ह्यातील माध्यमिक शाळा, १९९९-२०००

व्यवस्थापन	शाळा	विद्यार्थी		शिक्षक		एकूण प्रशिक्षित
		मुले	मुली	पुरुष	महिला	
केंद्र सरकार	५	१,८८५	१,१८५	६२	९०	१५२
राज्य शासन	३	५४९	४८५	२३	१७	४०
जिल्हा परिषद (पूर्वशासकीय)	५	१,५२४	१,८२२	५५	६०	११५
जिल्हा परिषद अनुदानित	१	३,२०७	३,०२६	१२६	६२	१८८
नगरपालिका	२४	१०,८९४	१०,६४५	२८६	२३५	५२१
खाजगी अनुदानित	५१३	१,५३,७१०	१,५२,०६३	६,१२१	४,०४४	१०,१२७
खाजगी विनाअनुदानित	१३४	१२,९१८	१४,६२१	५०१	४७९	८२९
एकूण ..	६९५	१,८४,६८७	१,८३,८४७	७,१७४	४,९८७	११,९७२

तक्ता क्रमांक ६

नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू

अ. क्र.	नाव	कालावधी
१.	सर बिपिन कृष्ण बोस	१९२३-२९
२.	व्ही. एम. केळकर, कार्यकारी	१९२९
३.	रेव्ह. डॉ. जे. एफ. मेंकफाडयेन	१९२९-३२
४.	सर एम. बी. नियोगी	१९३२-३६
५.	दिवान बहादूर व्ही. एम. केळकर, कार्यकारी	१९३४
६.	सर हरि सिंग गौर	१९३६-३८
७.	कर्नल के. व्ही. कुकडे, कार्यकारी	१९३६
८.	लेफ्टनंट कर्नल डॉ. टि. जे. केदार	१९३८-४४
९.	न्यायमूर्ती श्री. डब्ल्यू. आर. पुराणिक	१९४४-४७
१०.	पंडित कुंजीलाल दुबे	१९४७-५६
११.	न्यायमूर्ती श्री. के. मंगलमूर्ती	१९५६-५९
१२.	कर्नल न्यायमूर्ती जी. बी. बडकस	१९५९-६२
१३.	कर्नल न्यायमूर्ती एस. पी. कोतवाल	१९६२-६४
१४.	न्यायमूर्ती श्री. पी. पी. देव	१९६४-६६
१५.	डॉ. वि. भि. कोलते	१९६६-७२
१६.	डॉ. पु. स. मेने, प्रभारी	१९७२-७५
१७.	डॉ. दे. य. गोहोकर	१९७५-७८
१८.	प्राचार्य मो. म. लांजेवार, कार्यकारी	१९७७
१९.	डी. बी. कपूर, कार्यकारी	१९७८
२०.	प्रा. वा. मो. काळमेघ	१९७८-८१
२१.	जाल. पी. गिमी, कार्यकारी	१९८१
२२.	प्राचार्य जी. बी. कदम	१९८१-८५
२३.	के. शिवराम कृष्णन, कार्यकारी	६.८.८४ ते ४.९.८४ ७.१२.८५ ते १६.१२.८५
२४.	डॉ. एम. ए. चान्सरकर	१९८५-८८
२५.	डॉ. म. गो. बोकरे	१९८८-९०
२६.	हरीभाऊ पी. केदार, कार्यकारी	१९९०
२७.	एम. आर. पाटील, कार्यकारी	२.२.१९९१ ते १.४.१९९१
२८.	डॉ. पु. ल. भांडारकर	१९९०-९३
२९.	गिरीश गोखले, कार्यकारी	जुलै १९९३ ते डिसेंबर १९९३
३०.	जी. आर. बेडगे, कार्यकारी	डिसेंबर १९९३ ते एप्रिल १९९४
३१.	प्राचार्य मोरेश्वर गाभे	१९९४-९७
३२.	डॉ. भालचंद्र बा. चोपणे	२५ एप्रिल ९७ ते १९ जुलै ९९
३३.	ज. स. सहारिया	१९ जुलै १९९९ ते जानेवारी २०००
३४.	डॉ. अरूण सातपुतळे	१४ जाने. २००० ते १४ जाने. २००५

अनुक्रमणिका

तक्ता क्रमांक ७

रोगनिहाय मृत्यूसंख्या--नागपूर जिल्हा

वर्ष	पटकी	देवी	प्लेग	ताप	क्षय	श्वसन विषयक	आमांश व अतिसार	हृदय विकार	घटसर्प	पोलिओ	कुष्ठरोग	कर्करोग	धर्नुवात	कावीळ	इतर आजार
१९५६	--	१५१	--	१३,४३४	--	२,१६७	१,१४५	--	--	--	--	--	--	--	--
१९६०	--	११९	--	८,७७२	--	३,९२०	३,४१२	--	--	--	--	--	--	--	--
१९६५	---------- उपलब्ध नाही. ----------									---------- उपलब्ध नाही. ----------					
१९७५	---------- उपलब्ध नाही. ----------									---------- उपलब्ध नाही. ----------					
१९८०	--	--	--	१,४८५	८८१	१,०४३	२८२	७३	९	५	४१	३८२	१२४	९९	११,०६८
१९८५-८६	७	--	--	१,०६९	६९४	३३०	१८३	६०६	५	९	१५	३७६	९७	४०	६,५४२
१९९१-९२	--	--	--	५२६	५७२	३९०	१३४	८२६	४	५	५	४०५	२२	११४	६,००६
१९९९-२०००	--	--	--	२७२	४७८	३९८	६	१,५०२	--	--	--	२४९	--	--	१७,०६२

अनुक्रमणिका

प्रकरण ११

संस्कृती

नागपूर जिल्ह्याला अतिशय समृध्द असा सांस्कृतिक वारसा लाभला आहे. नागपूर शहराचा त्रिशताब्दी महोत्सव अलीकडेच साजरा झाला आहे. असे असले तरी नाग नदीच्या परिसरात मिळालेल्या पुरातत्त्वीय अवशेषांवरून असे स्पष्ट होते की, प्रागैतिहासिक काळापासून या स्थानावर मानवी वसाहत होती. बृहदाश्मयुगीन शिलावर्तुळांचे या जिल्ह्यातील विपुलता आणि वैविध्य ही महाराष्ट्र इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानावी लागते. सांस्कृतिक संचिताचा शोध घेताना मराठीतील आद्य कवी मुकुंदराज हे अंभोरा येथीलच होते आणि याहीपूर्वी कविश्रेष्ठ कालिदासाचे वास्तव्य रामटेक येथे झाले. येथपासून साहित्यनिर्मितीची प्रेरणा प्राप्त झाली व पुढे सातत्याने सुरू राहिली असे मानावे लागते. येथील संस्कृत, हिंदी, मराठी भाषेतील वैविध्यपूर्ण साहित्याचा ओझरता परिचय या प्रकरणात करून देण्यात आला आहे. जिल्ह्यातील सुफी व संत परंपरा त्यांनी निर्माण केलेले साहित्य तसेच संगीत परंपरा, नाट्य व रंगभूमी या क्षेत्राची उत्तरमध्ययुगीन काळापासूनची वाटचाल आधुनिक काळात पथनाट्याचा झालेला अविष्कार येथील शिल्प आणि चित्रपरंपरा यांचा परिचय तसेच या जिल्ह्यातील पत्रकारितेची चळवळ. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील पत्रकारितेची वाटचाल आणि आजची इ-मेल डॉटकॉम पत्रकारिता यांचा नोंद घेण्याचा प्रयत्न या प्रकरणात झाला आहे.

जिल्ह्यातील संस्कृत शिक्षणाची परंपरा

(अयाचित, स. मो. यांनी या भागाचे लेखन केले आहे.)

एकोणीसाव्या शतकाच्या आरंभीचा नागपूरचा ब्रिटीश रेसिडेंट सर रिचर्ड जेन्किन्स याच्या तत्कालीन अहवालानुसार १८२६ साली नागपूरात ४६ सार्वजनिक शाळांतून ९३६ विद्यार्थी शिकत होते. याखेरीज मैदाने, मठ, मंदिरे, खाजगी निवासस्थाने यातून ५६ खाजगी संस्था कार्य करीत होत्या. त्यात एकूण ३२३ विद्यार्थी व ५६ शिक्षक होते. यापैकी काही अरबी-फारसीच्या मदरसा सोडल्या तर बाकी शिक्षण संस्था संस्कृत पाठशाळेचे कार्य करीत होत्या व त्यात १५९ विद्यार्थी वेदशास्त्रांचे अध्ययन करीत होते. १८६२ मध्ये नागपूर व जबलपूर येथे मिळून १० ते १२ मिशनरी शाळा होत्या. याच वर्षी शिक्षण खाते निर्माण झाले. हळूहळू खाजगी शाळा स्थिर होऊ लागल्या. नील सिटी हायस्कूलमध्ये व्यं. गो. डाऊ हे संस्कृत शिक्षक अतिशय लोकप्रिय झाले. १८८५ मध्ये मॉरिस कॉलेजची नागपूरच्या तुळशीबागेत स्थापना झाली. १९११ मध्ये हे कॉलेज शासनाने आपल्या ताब्यात घेतले. त्यानंतर पंतोजीच्या शाळा व मौलवींचे मदरसे गेले व त्या जागी उभी राहिलेली भव्य विद्यालये विद्यार्थ्यांनी भरून जाऊ लागली. मॉरिसमधून 'दाजी हरि वाडेगावकर' पदक मिळविणाऱ्यामध्ये स्त्रियांचाही सहभाग होता. या संस्थांमधून संस्कृतचे शिक्षण मिळाले. त्यासाठी ज्यांनी अध्यापन केले त्यात तत्कालीन पंडितांचा सिंहाचा वाटा आहे, या पंडितांचा परिपोष

अनुक्रमणिका

भोसले कुळातील राजांनी केला. उत्तर पेशवाई काळापासून जी माहिती मिळते त्यावरून हे स्पष्ट दिसून येते. या परंपरेतून येथील महाविद्यालयांना प्रिं. ताम्हण, रोडे, देहाडराय, दाणी इत्यादि विद्वान अध्यापक लाभले. या परंपरेची माहिती पुढे दिलेली आहे. तत्पूर्वी केवळ संस्कृतलाच वाहिलेल्या काही संस्थांचा संक्षिप्त इतिहास खालीलप्रमाणे आहे.

भोसला वेदशास्त्र महाविद्यालय ही नागपूरातीलच नव्हे, तर अखिल महाराष्ट्रातील सर्वात जुनी संस्था असावी. ९ डिसेंबर, १८७९ रोजी तिची स्थापना नागपूरचे तत्कालीन पुढारी दादासाहेब कप्तान, गोपाळराव भिडे, मार्तंडराव वाईकर, श्रीराम मारवाडी यांनी महालातील प्रसिध्द रुक्मिणी मंदिरात केली. स्थानिक राजघराण्याने संस्कृत विद्येला दिलेल्या प्रोत्साहनाने प्रेरित होऊन राजाच्या नावे प्रजेने स्वतंत्रपणे स्थापन केलेली ही संस्था आहे. भट्टजी शास्त्री घाटे, वेदमुर्ति नानाजी वझे व बापूजी दातार हे या संस्थेचे पहिले शिक्षक. प्रतिमास १० ते २० रुपये नाममात्र वेतनावर त्यांनी हौसेने अध्यापन केले, इतकेच नव्हे तर स्वत: ५०० रुपयांच्या देणग्याही दिल्या. बाळशास्त्री घाटे, कृष्णशास्त्री तेलंग, भाऊशास्त्री घुले, वेदशिरोमणि नारायणबुवा आर्वीकर, शंकरशास्त्री (उर्फ भय्याजी) आर्वीकर, केशवराव ताम्हण, पंडित सम्राट कृष्णशास्त्री घुले, नानाजी व बाबूराव धामणकर अशा नामवंतांनीही या संस्थेत अध्यापन केले आहे. मौखिक परंपरा व शास्त्राध्ययन या दोन्ही परंपरा या संस्थेने प्रोत्साहित केल्या.

१९५१ मध्ये प्रबोधिनी एकादशीला नागपूरात सं. ना. उर्फ अप्पासाहेब कुलकर्णी यांनी पुढाकार घेऊन संस्कृत भाषा प्रचारिणी सभेची स्थापना केली. १९५१ मध्ये अप्पासाहेबांनीच वर्णेकरांना सहाय्याला घेऊन 'संस्कृत-भवितव्यम्' या साप्ताहिकाची मुहूर्तमेढ रोवली.

भवितव्यम्च्याही अगोदर बऱ्याच वर्षापूर्वी त्र्यंबकशास्त्री जोशी यांनी स्वबळावर गीर्वाण मासिक चालविले होते.

इतवारी भागात ब्रह्मकर्मवर्धिनी ही संस्थाही अनेक वर्षे संस्कृत शिक्षणाची जोपासना करीत आहे. उत्तरेकडून आलेले पुष्कळ विद्यार्थी या संस्थेचा लाभ घेतात.

१९५५ मध्ये नागपूर विद्यापीठाने स्नातकोत्तर संस्कृत विभाग सुरू केला. त्यात आरंभी वा. वि. मिराशी व नंतर ग. त्र्यं. देशपांडे, श्री. भा. वर्णेकर, के रा. जोशी, रुपा कुलकर्णी यांनी विभाग प्रमुखपद सांभाळले. विद्यापीठाचे माजी कुलगुरु तु. ज. केदार यांनी वेदस्थान या विस्तृत निबंधात 'वेदात आढळणारी भौगोलिक परिस्थिती प्राचीन आर्मेनियात दिसते' असे प्रतिपादन केले. गुणाकर पिंपळापुरे यांनी कित्येक वर्षे परिश्रम घेऊन 'शतपथाची काण्वसंहिता' सिध्द केली आहे. विद्यापीठात संस्कृतचा स्नातकोत्तर विभाग सुरू होण्यापूर्वी स्नातकोत्तर वर्ग मॉरिस कॉलेज ह्या शासकीय महाविद्यालयात होत. १९६४-६५ च्या सत्रापासून तेथील एम. ए. (संस्कृतचे) वर्ग बंद करण्यात आले व संस्कृतचे स्नातकोत्तर वर्ग फक्त विद्यापीठात होऊ लागले.

आधुनिक नागपूर जिल्ह्याची संस्कृतविषयक पांडित्य परंपरा मृत्यंजय कोकिळ यांच्यापासून सुरू होते. उपलब्ध माहितीप्रमाणे तेच नागपूरचे पहिले संस्कृत ग्रंथकार. त्यांचा ज्योतिषशास्त्रावरील स्वतंत्र ग्रंथ व त्यावरील त्यांचीच टीका नागपूर विद्यापीठाच्या हस्तलिखित

ग्रंथालयात उपलब्ध आहे. त्यांचा काळ सन १७५० च्या आसपासचा धरता येईल. त्यांच्या शिष्यापैकी शिवरामभट्टांचे चिरंजीव सीतारामशास्त्री यांचे मूळ गाव सावनेर तालुक्यातील केळवद. सीतारामशास्त्री (१७९२-१८५७) केळवदकर याच नावाने ते प्रसिध्द झाले. आबाजी वखरे यांच्या शिफारशीवरून सीतारामशास्त्रींना भोसल्यांनी एक हजार रुपये व पत्र देऊन काशी येथे अध्ययनासाठी पाठविले. अमृतराव पेशव्यांचे आश्रित पंडित जगन्नाथ गाडगीळ यांच्याजवळ त्यांनी व्याकरण व न्यायशास्त्रांचे अध्ययन केले. नागपूरास परतल्यावर त्यांना तिसऱ्या रघुजीने सरन्यायाधीश केले.

घुले घराणे : पंडित परंपरा निर्माण करण्याचे श्रेय घुले व माटे या दोन घराण्यांकडेच प्रामुख्याने जाते. घुल्यांचे घराणे मुळचे दक्षिणेकडचे. गंगारामभट्ट घुले पेशव्यांबरोबर काशीस गेले असता तेथेच स्थायिक झाले. त्यांचे पुत्र अनंतभट्ट यांनी महाभारतावर 'दुर्बोधपदचंद्रिका' ही टीका लिहिली. त्यांच्या दोन मुलांपैकी राजारामभट्टांची सप्तशतीवरील 'देशोध्दार' ही टीका प्रसिध्द आहे. नंतरच्या पिढीतील प्रसिध्द रामकृष्णभट्ट यांचे 'नामस्मरणदीपिका', 'अष्टावक्रटीका', 'भागवतविरोधपरिहार' आदी बरेच ग्रंथ आहेत. त्यांना बुंदेलखंडाचे राजे खुमानसिंग यांनी चार गावे जहागीर म्हणून दिली होती.

सदाशिवशास्त्री : रामकृष्णांचे पुत्र सदाशिवभट्ट (१७८१-१८५३) हेच नागपूरच्या पंडित परंपरेचे जनक. उपनयनापूर्वीच त्यांचे साहित्याचे अध्ययन पूर्ण झाले होते. नंतर घरीच मीमांसा-धर्मशास्त्राचे अध्ययन झाल्यावर त्यांनी प्रसिध्द पंडित बाळंभट्ट पायगुडे यांचे शिष्य प्राणनाथाचार्य यांच्याजवळ काशी येथे न्याय व व्याकरणाचा अभ्यास केला. पेशव्यांनी त्यांना 'वैयाकरणकेसरी' ही पदवी दिली. त्यांचा 'शब्देंदुशेखरावरील विवृत्ति' (भट्टी/सदाशिवभट्टी) हा ग्रंथ प्रसिध्द आहे. मात्र तो आज उपलब्ध नाही.

दुसऱ्या रघुजीजवळ वीर राघवाचार्य चंद्रपूरकर व त्यांचा पुतण्या अप्पासाहेब यांच्याजवळ कृष्णशास्त्री रामानुज असे दोन पंडित होते. त्यावेळी (एकोणीसाव्या शतकाच्या आरंभी) ते नागपूरात प्रसिध्द होते. काशीहून आलेले सदाशिवशास्त्री द्वितीय रघुजीच्या आग्रहाने नागपूर येथेच स्थायिक झाले. प्रतिवर्ष २,५०० रुपयांची नेमणूक झाली व नंतर १८२६ मध्ये कळमेश्वरजवळील वरुड हे गाव त्यांना जहागीर म्हणून मिळाले. सदाशिवशास्त्री व्याकरणाइतकेच धर्मशास्त्रातही पारंगत होते.

भाऊशास्त्री : सदाशिवशास्त्रींचे दोनही पुत्र हरिरामशास्त्री व चिंतामणीशास्त्री उत्तम वैयाकरणी होते. पण दोघेही सदाशिवशास्त्री यांच्या हयातीतच स्वर्गवासी झाले. हरिरामशास्त्रींचे पुत्र सीतारामशास्त्री (१८२८-१९२५) हे भाऊशास्त्री या नावाने नागपूरच्या परंपरेत प्रसिध्द आहेत. त्यांचा जन्म व अध्ययन काशीस झाले असले तरी ते पुढे नागपूरासच स्थायिक झाले. त्यांनी सदाशिवशास्त्रींचे शिष्य रंगाचार्य यांच्यावजळ व्याकरणाचे भाष्यान्त अध्ययन केले. भाऊशास्त्रींचे चुलतबंधु बाबजी हे शास्त्रपांडित्यापेक्षा संगीततज्ञ म्हणून प्रसिध्दी पावले. भाऊशास्त्रींचा १९१८ मध्ये ब्रिटीश शासनाने 'महामहोपाध्याय' पदवी देऊन गौरव केला.

रंगाचार्य : रंगाचार्यांनी ग्रंथरचना केली नाही, पण अध्यापनास वाहून घेतले. रंगाचार्य आपल्या विद्वत्तेने अद्वितीय होते. त्यांच्याजवळच्या हस्तलिखितांचा संग्रह बडोद्यास नेला गेला असे सांगतात.

अनुक्रमणिका

कृष्णशास्त्री : भाऊशास्त्रींचे थोरले चिरंजीव बाळशास्त्री. बाळशास्त्रीच्या एका चिरंजीवांनी कीर्तनकाराचा व्यवसाय स्वीकारला होता. भाऊशास्त्रींचे दुसरे चिरंजीव कृष्णशास्त्री हे भट्टजीशास्त्री घाटे यांचेकडे व्याकरण व इंग्रजीही शिकले. त्यांचा विद्यार्थीदशेतील 'पतितोध्दारमीमांसा' हा निबंध भट्टजीशास्त्रींना संयुक्तिक वाटला होता. आधुनिक विचारांशी संपर्क आल्याने त्यांनी अनेक भाषांचा अभ्यास केला व शास्त्रातही नवी दृष्टी अवलंबिली. ऋग्वेदाचे मराठीत भाषांतर करण्यासाठी त्यांनी एक मासिकही काढले होते. परंतु ते ५-६ अंकानंतर बंद पडले. महादेवाचे मूळ स्वरूप, ऋग्वेदातील सरस्वती नदी, मित्र व अमित्र, दाशराज्ञ युध्द, भ्रातृत्व आणि सपत्न इत्यादी लेख त्यांनी लिहिले. कृष्णशास्त्रींच्या नावावर 'क्षैत्रध्वान्तदिवाकर' व 'सापिण्ड्यभास्कर' असे दोन ग्रंथ आहेत. चित्रमयजगत् मासिकात त्यांनी गीतारहस्याच्या समर्थनार्थ लेखमाला लिहिली. 'रघुकुमारांचे पौर्वापर्य' व 'आषाढस्य प्रथमदिवसे की प्रशमदिवसे' हे त्यांचे साहित्यविषयक लेख. 'हरहरीयम्' हे त्यांचे लघुकाव्य. त्यावर त्यांनीच टीका लिहिली होती. कृष्णशास्त्री सनातनी विचारांचे असले तरी तर्कनिष्ठ व स्पष्टवक्ते होते. कृष्णशास्त्रींच्या लेखांचा एक संग्रह प्रसिध्द झाला आहे.

गंगाधरशास्त्री : घुले परंपरेकडून घाटे परंपरेकडे वळण्यापूर्वी एकोणीसाव्या शतकाच्या द्वितीय चरणातील गंगाधरशास्त्री मंगरुळकरांचा उल्लेख आवश्यक आहे. सीतारामशास्त्री केळवदकरांचे शिष्य गंगाधरशास्त्री हे कवी व अनेक शास्त्रांवर स्वतंत्र ग्रंथ लिहिणारे म्हणून साहित्याच्या इतिहासात वैशिष्ट्यपूर्ण ठरतील. जानोजी भोसल्यांच्या सूचनेवरून त्यांनी जे 'संगीतराघव' नामक काव्य लिहिले, ते गीतगोविंदच्या अनुकरणाने निर्माण झालेल्या अनेक काव्यग्रंथापैकी होय. गंगाधरशास्त्रींचे १७-१८ ग्रंथ हस्तलिखित स्वरूपात नागपूर विद्यापीठाच्या हस्तलिखित विभागात आहेत. त्यापैकी काही त्यांचे बंधू चंद्रशेखर यांच्या हस्ताक्षरात आहेत. या कवीवरील वि. वा. करंबेळकर यांचा भांडारकर प्राच्याविद्या संस्थेच्या वार्षिकातील लेख सविस्तर आहे. हर्षदा दवे यांनीही आपल्या प्रबंधात याविषयी नोंदी केल्या आहेत.

घाटे घराणे : जयकृष्ण श्रीकृष्ण घाटे/भट (१८३४-१९१०) यांचे मूलस्थान अमरावती जिल्ह्यातील तळेगाव (दशसहस्त्र). हेच भट्टजीशास्त्री घाटे या नावाने प्रसिध्द आहेत. त्यांचा जन्म १८३४ च्या सुमारास झाला. भट्टजींचे वडील उपजीविकेसाठी नागपूरास भोसल्यांकडे आले, त्याच वेळी बनारस विद्यापीठातील म. म. पा. अंबादासशास्त्रींचे वडील कृष्णशास्त्री बार्शीकर (बारसे/लंगडे) हेही नागपूरास आले. कृष्णशास्त्रींचे व्याकरणाचे अध्ययन सदाशिवशास्त्री घुले यांचे काशीतील शिष्य भिकोबा पाठक यांचेकडे झाले होते. भट्टजीशास्त्री यांचे साहित्य व महाभाष्यान्त व्याकरणाचे अध्ययन कृष्णशास्त्रीकडे झाले. त्यांनी न्याय, धर्मशास्त्र आणि वेदांग ज्योतिषाचेही अध्ययन केले होते. अध्यापन मात्र ते साहित्य व व्याकरण या विषयांचेच करीत. व्याकरणाचे बाबतीत त्यांचे स्थान रंगाचार्याच्या नंतरचेच समजले जाते. त्यांची 'उत्तरराम-चरिता'वरील टीका १८९५ मध्ये मुद्रित झाली, परंतु 'प्रसन्नराघव' नाटकाच्या पहिल्या दोन अंकावर त्यांनी लिहिलेली टीका प्रसिध्द झाली नाही. ब्रिटीश शासनाने त्यांना १९०० साली महामहोपाध्याय पदवी दिली. सरदार खंडोपंत माणकेश्वर यांनी त्यांना सर्व सांसारिक सामग्रीसह घर व मोरुपार या मालगुजारी नावाचा अर्धा हिस्सा दिला. पुनर्विवाहित असलेल्या वामनराव कोल्हटकरांकडे भट्टजींनी प्रवचन केल्यामुळे त्यांच्यावर ग्रामण्याची

आपत्तीही आली होती. प्रथम एम. ए. पदवी प्राप्त केलेले नागपूरातील बापूरावदादा किनखेडे, तसेच म. म. पा. केशवराव ताम्हण, म. म. पा. सदाशिव जयराम देहाडराय, गोपाळ आन्याजी पोफळी, ना. दा. वाडेगावकर, प्रभाकरशास्त्री रोडे, दाजीशास्त्री पर्वते, बाळशास्त्री घाटे, गोपाळराव गर्दे, गोविंदराव वैद्य, माधवराव डाऊ व बाबाजी डाऊ हे भट्टजींच्याच शिष्यवर्गापैकी होत. वाडेगावकर हे प्रसिध्द वैय्याकरण म्हणून व माधवराव डाऊ संस्कृत कवी म्हणून प्रसिध्दीस आले. गोपाळराव गर्दे यांच्या सहाय्याने वाडेगावकरांनी 'परिभाषेंदुशेखर' व 'मनोरमा' चा काही भाग आपल्या मराठी अनुवादाने सुबोध केला. गोपाळरावांचा वेदांत, धर्मशास्त्र व ज्योतिषाचा चांगला व्यासंग होता. हिस्लॉपमधील प्रा. गोविंद बळवंत बापट यांच्याबरोबर त्यांनी 'गादाधरी' चे अध्ययन केले होते. विद्यार्थ्याविषयी त्यांना आत्मियता वाटत असे.

भट्टजींचे शिष्य बाळशास्त्री घाटे अग्निहोत्री होते. त्यांनी आपले सर्व आयुष्य अध्यापनास वाहिले हाते. गोपाळरावांची व्याकरणाच्या शास्त्रार्धात, तर बाळशास्त्रींची प्रक्रियेची चांगली तयारी होती. त्यांच्या शिष्यांपैकी पंडित वसंतराव शेवडे हेही त्यांच्या हाताखाली प्रक्रियेत तितकेच तरबेज झाले.

माधवराव डाऊ उर्फ बापूसाहेब यांचे 'विनोदलहरी' हे काव्य व्यंकटेश गोविंद डाऊ उर्फ बाबाजी यांच्या टीकेसह प्रकाशित झाले. या काव्याची तुलना माघाच्या 'शिशुपालवधा'बरोबर केली जाई.

पंढरीनाथशास्त्री : भट्टजींचे चिरंजीव पंढरीनाथशास्त्री यांनी बुध्दिमत्ता व पांडित्य याबरोबरच मल्लविद्या आणि नाट्यदिग्दर्शन या क्षेत्रातही नाव मिळविले. वयाच्या दहाव्या वर्षापर्यंत त्यांचे 'कौमुदीचे' अध्ययन पूर्ण झाले होते. वेदमूर्ती नानाजी वझे यांच्याजवळ त्यांनी ऋग्वेदसंहिता पूर्ण करून पद व क्रमाचे अध्ययन सुरू केले होते. न्यायशास्त्रातील आपले गुरु गजाननबाबा वखरे यांच्यावर त्यांनी एक अष्टकही लिहिले होते. नंतर मात्र ते मल्लविद्येकडे व नाट्याकडे अधिक कलले. कर्मसंन्यास आणि राशिचक्र ही त्यांची दोन नाटके आज उपलब्ध नाहीत. पंजाबातील शास्त्री परीक्षा देऊन त्यांनी एक वर्ष हिस्लॉपमध्ये प्राध्यापकीही केली. 'सहृदयाल्हादक नागपूरकर नाटक मंडळी' प्रमाणेच त्यांनी 'सरस्वती मुखमंडन पाठशाला' स्थापन केली. नागपूरातील आद्य संस्कृत पत्रकार व गीर्वाण मासिकाचे संस्थापक संपादक त्र्यंबकशास्त्री जोशी हे पंढरीनाथ शास्त्रींचेच शिष्य. पंढरीनाथशास्त्रींनी परिभाषेंदुशेखराचे मराठीकरण केले, परंतु ते अप्रसिध्दच राहिले. ते प्रगत विचारांचे होते. मुस्लिम कुटुंबात बरीच वर्षे राहिलेल्या एका तरुण ब्राम्हण विधवेला पश्चात्तापानंतर त्यांनी प्रायश्चित देऊन शुध्द करून घेतले होते.

घाटे घराण्यातील वासुदेवशास्त्री (१८९०-१९८३) यांचेही अध्ययन भट्टजींजवळच झाले. नंतर कृष्णशास्त्रींचे चिरंजीव अंबादासशास्त्री बारसे यांच्याकडे बनारसला ते तीन-तीन वर्षे व्याकरण व न्याय शिकले व नंतर नागपूरास परतले. यानंतर त्यांनी आपले वडील बाळशास्त्री यांचेजवळ अध्ययन सुरू ठेवले. त्यांना क्रोडपत्रांची चांगली माहिती होती. अध्यापन व कर्मकांड यात त्यांनी आपले आयुष्य व्यतीत केले. घाटे घराण्याची हस्तलिखिते

त्यांनी नागपूर विद्यापीठास दिली. डॉ. मुंजे यांच्याबरोबर त्यांचा संस्कृतमध्ये पत्रव्यवहार चालत असे.

अन्य पंडित परंपरा : घुले व घाटे या घराण्यांनी निर्माण केलेल्या शिष्यपरंपरेत न बसणारे अनेक संस्कृत पंडित नागपूरात प्रसिध्द झाले. यामध्ये गजाननशास्त्री वखरे (१९०४-१९०६) हे अग्रगण्य होत. त्यांचे वडील सीतारामशास्त्री उर्फ आबाजी हे उत्तम पुराणिक होते. गजाननशास्त्रींचे पूर्वज मूळचे पैठणचे. नंतर ते भोसल्यांचा आश्रय मिळाल्यामुळे अमरावती जिल्ह्यातील वरुडहून नागपूरास स्थायिक झाले. गजाननशास्त्री सीतारामशास्त्री केळवदकरांकडून न्यायशास्त्र शिकले. तसे त्यांचे गुरु होते रामशास्त्री खरे. सदाशिवशास्त्री घुले यांजकडे ते कारक शिकले. त्यांच्या नावावर 'उध्दवकृत-गोपीसान्तवन' संज्ञक आर्यशतक आहे. त्यांची एक प्रत उपलब्ध झाली आहे. अखिल भारतीय कीर्तीच्या या नैयायिकाचा गौरव बडोद्यास गायकवाडांनी केल्याची नोंद आहे.

व्यंकटराव परभु उर्फ रावसाहेब हे विनोदी शीघ्रकवी म्हणून जानोजी भोसल्यांच्या दरबारी होते. त्यांच्या 'कृष्णावीचि' या काव्यावर भट्टजींची टीका प्रकाशित झाली आहे.

रामकृष्णबुवा करताळकर (१८४४-१९०२) हे बहुगुणी हरदास होते. १८८५ मध्ये त्यांनी संतचरित्रावर 'सच्चरितमालिका' हा १२,३२१ ओव्यांचा लिहिलेला ग्रंथ अप्रकाशित आहे.

साहित्यिक व पुराणिक गोपाळशास्त्री हरदास यांचे शिष्य विष्णुशास्त्री तेलंग (१८६२-१९२९) हे उत्तम प्रवचनकार होते. त्यांची महाभारतातील टीका नागपूर विद्यापीठाच्या हस्तलिखित विभागात आहे.

म. म. पा. केशव गोपाळ ताम्हण मूळचे चंद्रपूरचे. साहित्य आणि व्याकरणात निपुण. प्रथम लखनौला प्राध्यापक व नंतर नागपूरास मॉरिस कॉलेजचे प्राचार्य म्हणून नागपूरच्या परंपरेत प्रसिध्दी पावले. नागपूर विद्यापीठाने त्यांना डी. लिट. ही सन्मान्य पदवी दिली. त्यांनी स्फुट काव्यरचना केली आहे.

वेदांतशास्त्री शास्त्रचिंतामणि गोपाळ केशव गर्दे (जन्म १८७२) हे मूळचे सागरचे. ते व्याकरण व अलंकारशास्त्रातही निपूण होते.

दत्तात्रेयशास्त्री येरकुंटवार यांनी 'आत्मनिवेदनम्' हे महाकाव्याच्या स्वरूपात आपले आत्मचरित्र लिहिले आहे. त्यात समकालीन संस्कृतीचे उत्कृष्ट चित्रण आढळते.

राजकीय क्षेत्रात नावाजलेले डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे हेही पंडित परंपरेत शोभणारे संस्कृतज्ञ होते. त्यांचा नेत्रचिकित्सेवर संस्कृतमध्ये ग्रंथ आहे.

अधिवक्ता म्हणून नागपूरात नावाजलेले पंडित शिवरामपंत बारलिंगे हे संस्कृत पंडित म्हणूनही प्रसिध्द होते. त्यांचे संशोधनात्मक स्फुट लेख अभ्यसनीय आहेत. प्रा. स. गो. सोपलवार यांची संस्कृत भाषणावरील पकड व त्यातील लालित्य अविस्मरणीय आहे.

अनुक्रमणिका

साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास हे नाव तर महाराष्ट्रभर विख्यात आहे. त्यांची रामायण-महाभारतावरील व्याख्याने पुस्तकरुपाने प्रसिध्द झाली आहेत. वक्ते म्हणूनच ते प्रसिध्दीला आले, तरी त्यांच्या कार्याचे मूळ पांडित्यातच आहे.

म. म. पा. वासुदेव विष्णु मिराशी हेही प्रसिध्द व्यक्तिमत्व आहे. संस्कृत साहित्यावर त्यांचे प्रभुत्व होते. कालिदास व भवभूति यावरील त्यांचे ग्रंथ प्रमाणभूत झालेले आहेत. कालिदास दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या दरबारहून वाकाटकांकडे नागपूरला आला व रामटेक येथे त्याने मेघदूत काव्य लिहिले हे त्यांचे संशोधन बहुमान्य झालेले आहे. आजच्या विदर्भ संशोधन मंडळाचे ते आधारस्तंभ व संस्थापक होते. लघुकौमुदी, हर्षचरित्र (सार) या ग्रंथांचे त्यांचे संपादन विद्यार्थ्यांना अत्यंत उपयुक्त आहे.

नागपूर विद्यापीठाचे संस्कृत विभागप्रमुख गजानन त्र्यंबक देशपांडे 'भारतीय साहित्यशास्त्र' या पारितोषिक विजेत्या ग्रंथामुळे सर्व परिचित आहेत. सांख्यशास्त्रावरील त्यांचा ग्रंथ विद्वताप्रचुर आहे. वेद आणि व्याकरण यावरील त्यांचे लेखन मान्यता पावले आहे.

श्रीधर भास्कर वर्णेकर : हे पत्रकार, संस्कृत वक्ते, महाकवि, नाटककार व प्रचारक म्हणून सर्वज्ञात आहेत. त्यांचे 'शिवराज्यमाहोदयम्' हे महाकाव्य इतिहासात कायमचे नोंदले जाईल. 'विवेकानंदविजयम्' हे महानाटकही उच्च दर्जाचे आहे. 'राष्ट्रशक्ति' हे साप्ताहिक त्यांनी काही काळ चालविले. 'संस्कृत-भवितव्यम्' साप्ताहिकाचेही पहिले संपादक तेच. त्यांच्याविषयी सविस्तर लेखन डॉ. पंकज चांदे यांच्या प्रबंधात पाहण्यास मिळेल.

केशव लक्ष्मण दप्तरी उर्फ भाऊजी हे नाव संस्कृत पंडित म्हणून ज्ञात होण्यापेक्षा संस्कृतचे अभिनव शास्त्रकार म्हणून मान्य झाले आहे. उपनिषदर्थदीपीका, जैमिन्यर्थदीपिका इत्यादी. त्यांचे ग्रंथ 'आधुनिक युगाला साजणारे धर्मशास्त्रकार', म्हणून त्यांची कीर्ति दिगंत करतात. लोकमान्यांच्या सूचनेवरून त्यांनी पंचांग चळवळीसाठी 'करणकल्पलता' हा ग्रंथ लिहून नक्षत्रज्योतिषावरील आपले नैपुण्य प्रकट केले.

प्रा. दिवाकर विश्वनाथ वऱ्हाडपांडे हे उत्तम संस्कृत लेखक व भवितव्य साप्ताहिकाचे संपादक म्हणून प्रसिध्द आहेत. त्यांच्याबरोबर भवितव्याचे संपादक म्हणून अनेक वर्षे केशव रामराव जोशी यांनी लेखन/संपादन कार्य केले. त्यांचे ललित लेख व नाट्यप्रवेश 'संस्कृत-त्रिदलम्' या नावाने नुकतेच प्रसिध्द झाले आहेत. वैशेषिकशास्त्र, आयुर्वेद व पाश्चात्य विज्ञान यांच्या तौलनिक अभ्यासावर द्रव्यगुणविज्ञानविषयक लेखन ते करीत आहेत. 'न्यायसिध्दान्तमुक्तावली' या ग्रंथाचा त्यांचा मराठी अनुवाद भांडारकर प्राच्यविद्या संस्थेने प्रकाशित केलेला आहे. संस्कृतातील त्यांचे स्फुट लेखन रोचक आहे.

सदाशिव अंबादास डांगे व त्यांच्या पत्नी वैदिक संशोधनात्मक लेखनासाठी प्रसिध्द आहेत. मुंबईला स्थायिक झालेले डांगे आरंभीची काही वर्षे नागपूर विद्यापीठातच होते. विदर्भ संशोधन मंडळाच्या वार्षिकात ते नियमित लेखन करतात.

श्री. कृ. लिमये शासकीय महाविद्यालयातून संस्कृतचे प्राध्यापक म्हणून निवृत्त झाले. त्यांचा 'मीमांसा/धर्मशास्त्र' या विषयावर प्रबंध आहे.

वि. वा. करंबेळकर हे शासकीय महाविद्यालयातील प्राध्यापक होते. त्यांचे अनेक ग्रंथ हस्तलिखित स्वरूपात उपलब्ध आहेत. दासबोधाचे संस्कृत रूपांतर इत्यादींचा यात समावेश होतो. त्यांचे संशोधनात्मक लेखही 'इंडियन ॲन्टिक्वेरी' इत्यादि प्रसिध्द नियतकालिकात प्रसिध्द झाल्याने ते सर्वपरिचित आहेत. त्यांचा अथर्ववेद व आयुर्वेदाचा विशेष व्यासंग होता. चंडेश्वराची 'रत्नदीपिका' त्यांनी संपादन केली. त्यानंतर दीड-दोन वर्षे सीतारामशास्त्री कुरुंदकर हे नावाजलेले नैयायिक त्यांना सहायक म्हणून लाभले.

म. म. पा. देहाडराय, प्रभाकरशास्त्री रोडे, बापूशास्त्री देव, कृष्णशास्त्री घोंगे, रामशास्त्री खरे, गोविंदशास्त्री, रामप्रतापशास्त्री, माधवशास्त्री दाणी, सरस्वतीप्रसाद चतुर्वेदी, अंबादासशास्त्री पांडे ही नागपूरच्या संस्कृत पंडितांपैकी आणखी काही नावे. विशेषत: व्याकरण आणि काही प्रमाणात न्याय व साहित्य यावर येथील पंडितांनी भर दिलेला दिसतो, या शास्त्रांत त्यांचे नैपुण्य आणि अध्यापनकौशल्य महाराष्ट्राच्या बाहेरही गाजले होते. शंकरराव चट्टे हेही संस्कृत विद्येच्या क्षेत्रात एक ख्यातकीर्त नाव आहे. अध्यापनाबरोबरच त्यांनी विदर्भ संशोधन मंडळाचे कार्यवाह म्हणून अनेक हस्तलिखितांचा संग्रह केला. त्यांचा स्वत:चा पुस्तकसंग्रह मोठा होता. काशीस अध्ययन केलेले नागपूरातील भारतीशास्त्री हे पंडित फारसे प्रसिध्द नसले तरी प्राचीन न्यायशास्त्रातील पंडित म्हणून आदरणीय आहेत. मधुकर त्र्यंबक सहस्त्रबुध्दे मूळचे नाशिकचे, परंतु पुण्यास बरीच वर्षे भांडारकर प्राच्यविद्या संस्थेत काम करून, नागपूर विद्यापीठातून प्राध्यापक म्हणून निवृत्त झाले आहेत. त्यांचा 'वेदातील विज्ञान' या विषयावर मोठा अधिकार आहे. भवानीशंकर नियोगी (उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायमुर्ती), प्राचार्य पांढरीपांडे, वि. के. पाळेकर उर्फ अप्रबुध्द आणि त्यांचे शिष्य ब. स. येरकुंटवार हे संस्कृत विद्येत स्वतंत्र रीतीने अवगाहन केलेले विद्वान होत. नियोगी व पांढरीपांडे उपनिषदांचे अभ्यासक, तर अप्रबुध्द आणि येरकुंटवार सनातन वैदिक धर्माचे जाज्वल्य अभिमानी, येरकुंटवारानी 'प्रज्ञालोक' मासिकातून अनेक वर्षे सातत्याने संस्कृत विद्येचे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले आहे. नारायणशास्त्री द्रविड हे भारतीय आणि पाश्चात्य तत्त्वज्ञानात सारखेच निपुण असून ते नागपूरचे भूषण आहेत.

नागपूरच्या उज्ज्वल पंडित परंपरेचा हा इतिहास पाहता येथे लेखनकार्यही बरेच होत असल्याचे अनुमान करता येते. रावबहादुर हीरालाल जैन यांनी या शतकाच्या आरंभीच्या दशकातच पूर्ण विदर्भातील हस्तलिखितांची विस्तृत सूची शासनाकडे दिली, ती १९२६ साली प्रकाशित झाली. तत्पुर्वी १८७५ मध्ये प्रसिध्द झालेल्या संक्षिप्त अहवालात १८२५ मध्ये नागपूरात ३०९ हस्तलिखिते होती असा उल्लेख आहे. १४ एप्रिल १९४४ रोजी नागपूर विद्यापीठाने य. खु. देशपांडे यांच्या पुढाकाराने हस्तलिखित विभाग सुरू केला. १९६० अखेर या विभागात २५०० हस्तलिखिते होती. १९६१ मध्ये या विभागाची पुनर्रचना होऊन प्रथम सदाशिव लक्ष्मीधर कात्रे या संशोधक पंडिताची (विक्रम विद्यापीठातून निवृत्त झाल्यावर) हस्तलिखिताधिकारी म्हणून नेमणूक झाली. त्यानंतर १९६५ पासून १९८७ पर्यंत सदाशिव मोरेश्वर अयाचित यांनी या विभागाचा भार स्वीकारला. त्यांच्या निवृत्तीच्या वेळी हस्तलिखितांची संख्या १५,००० पर्यंत पोहोचली होती. १९५७ मध्ये करंबेळकरांनी याच्या तालिकेचा पहिला खंड प्रसिध्द केला. दुसऱ्या व तिसऱ्या खंडाचे हस्तलिखित मुद्रणासाठी तयार आहे. रामटेक

येथे मिळालेल्या दोन दुर्मिळ पोथ्यांच्या आधाराने अयाचित यांनी 'सिंदूरगिरिमाहात्म्य' प्रकाशित केले. विभागातील एका हस्तलिखिताची निवड झाल्यावर आणखी नऊ पोथ्या इतर स्थळांहून, तसेच इंग्लंड व जर्मनीहून आणवून 'गीतगोविंदा'वरील एका विस्तृत भाष्याचा पहिला खंड प्रकाशनासाठी तयार करण्यात आला. अनेक विद्वांनाना या सामग्रीचा व मार्गदर्शनाचा उपयोग झाला. भोसले घराण्याच्या विशाल हस्तलिखित संग्रहापैकी काही भाग या विभागाने मिळविला आहे.

पाटणसावंगीसारख्या बाजूच्या गावातही मोठाले व महत्त्वाचे हस्तलिखितसंग्रह होते, त्यांचाही काही भाग मिळाला आहे. नागपूरजवळील कान्होलीबारा येथील रामचंद्र गुरु काशीगिरी गोसाई यांच्याजवळ 'वृध्दचाणक्य' ची प्रत असल्याचा उल्लेख हीरालाल यांच्या सूचीवरून मिळतो. एकट्या वखरे घराण्याच्या संग्रहावरूनही त्यावेळी संस्कृतविद्येसाठी कसे परिश्रम घेतले जात असत याची माहिती अयाचितांच्याच तद्विषयक एका लेखावरून मिळेल. गागाभट्टीची एक प्रत भोसले संग्रहात असल्याचा उल्लेख मिळतो. एकूण, नागपूरचा हस्तलिखित संग्रह संख्यात्मक व गुणात्मक दृष्टीने उत्तम आहे व सर्व भारतात (जुन्या संस्थानिकांची संग्रहालये वगळता) विद्यापीठीय स्तरावर हा विभाग वरच्या श्रेणीचा आहे. नागपूरची पंडित परंपराही वैशिष्ट्यपूर्ण व बहुरंगी आहे.

नागपूर येथील विद्यापीठाच्या स्तरावर संस्कृत भाषा सामान्य नागरिकांपर्यंत पोचविण्याचे कार्य, त्यादृष्टीने संस्कृत भाषेचे सुबोध लेखन करण्याचे कार्य विद्यापीठातील संस्कृत विभागाच्या प्राध्यापक वृंदाने केले. डॉ. वर्णेकर यांचे लिखाण अतिशय रसाळ आहे. सध्या विभागप्रमुख असलेल्या डॉ. रुपा कुलकर्णी यांचे अभिनवगुप्ताच्या लोचन टीकेवर, गुलाबराव महाराजांच्या संगीत ग्रंथावर व वज्रसूचीवर केलेले लेखन प्रकाशित झाले आहे. महाराष्ट्र शासनाने १९९७ साली राज्यातील पहिले संस्कृत विश्वविद्यालय स्थापन करण्याचा निर्णय घेतला. हा मान नागपूर जिल्ह्यातील रामटेकला मिळाला. हे विश्वविद्यालय कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय म्हणून प्रसिध्द आहे. अध्ययन, अध्यापन तसेच प्रशासनकार्याचा अनुभव असलेले डॉ. पंकज चांदे संस्कृत विश्वविद्यालयाचे पहिले कुलगुरु आहेत. संस्कृत नाट्यक्षेत्र हे त्यांच्या अध्ययनाच्या आवडीचे क्षेत्र असून त्यांनी पन्नासच्या वर संस्कृत लघुनाटके रचली आहेत. कौटिल्याचे अर्थशास्त्र व बालसाहित्य यावरही त्यांचे लिखाण प्रसिध्द आहे. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे त्यांनी व डॉ. रुपा कुलकर्णी यांनी मिळून सुश्राव्य अशा बालगीतांच्या ध्वनीफिती उपलब्ध करून दिल्या. बालकांच्यात संस्कृत काव्याची गोडी निर्माण करण्याच्या दृष्टीने ह्या ध्वनिफितींना उत्तम प्रतिसाद मिळाला आहे.

संस्कृतचा वापर संभाषणासाठी करण्याचा उपक्रमही संस्कृत भारती या संस्थेतर्फे राबविला जातो. अशी सुमारे पन्नास शिबिरे नागपूरला मागील काही वर्षात आयोजित करण्यात आली. त्यालाही मिळालेला प्रतिसाद उत्साहवर्धक होता. संस्कृत अध्ययनाच्या दृष्टीने, नागपूरच्या भोसला वेदशाळा, हिंदू धर्म संस्कृती मंदिर, आमटे स्मारक, विद्यापीठातील प्राचीन हस्तलिखितांचा विभाग ह्या संस्था ग्रंथसंभारासाठी समृध्द म्हणून नावाजलेल्या आहेत.

संतसाहित्य व परंपरा

(डोळके, सुरेश महादेव, जेष्ठ महानुभव अभ्यासक (नागपूर) यांनी या भागाचे लेखन केले आहे.)

नागपूर जिल्ह्यातील संतसाहित्य व परंपरा या विषयाचा आढावा पुढीलप्रमाणे घेता यईल.

मुकुंदराज : आद्य ग्रंथकार व साक्षात्कारी संत मुकुंदराज हे मराठीचे आद्यकवी होत. जिल्ह्यातील वैनगंगेच्या तीरावरील आंभोरा गावचे आध्यात्मिक संत हरिनाथ यांच्या आध्यात्मिक सामर्थ्याने आकृष्ट होऊन ते काशीहून येथे आले. हरिनाथांचे शिष्य रघुनाथ उर्फ रामचंद्र यांचे त्यांनी शिष्यत्व पत्करले व येथेच 'विवेकसिंधू' हा महत्वपूर्ण ग्रंथ लिहिला. यातील एका ओवीत वर्णिलेली अंबानगरी म्हणजे आंभोरे गाव होय. विद्वानांमध्ये मात्र मुकुंदराजांच्या स्थळाप्रमाणे 'विवेकसिंधूच्या' रचनाकाळासंबंधीही मतभेद आहेत. पण ज्योतिर्गणिताच्या निरनिराळ्या रीतींनी व सूक्ष्म गणिताच्या निरनिराळ्या पध्दतींनी विचार केल्यास हा काळ 'शके १११० (इ. स. ११८८) साधारण संवत्सर' हाच पूर्णपणे शास्त्रीय ठरतो व तोच विवेकसिंधूचा रचनाकाळ मानावा लागतो. 'विवेकसिंधूतील' तत्त्वज्ञान ज्ञानमार्गाला सर्वश्रेष्ठत्व देणारे आहे. याचे साहित्यशास्त्रदृष्ट्या अभिनवत्व म्हणजे मुकुंदराजांनी मराठीत आणलेला 'ब्रम्हरस' हा स्वतंत्र व नवीन रस. हा शांतरसाहून भिन्न आहे. याचे प्रवर्तक अर्थातच मुकुंदराज हेच आहेत. मराठीतील आद्यग्रंथ म्हणून या ग्रंथाचे मराठी वाङ्मयातील स्थान अढळ आहे. मुकुंदराजांनी या ग्रंथानंतर आंभोरे येथेच 'परमामृत' हा ग्रंथ लिहिला.

कोलबा स्वामी महाराज : विदर्भाचे पंढरपूर मानण्यात येत असलेल्या धर्मपुरी उर्फ धापेवाडा या पुण्यक्षेत्री कोलबा स्वामी महाराज (इ.स. १६५७-१७६१) हे मोठे सत्पुरुष होऊन गेले. मकरंदपुरी या आपल्या गुरुबंधुच्या आग्रहावरून धर्मशेटी व रंगारी जातीत जन्मलेल्या संतपुरुषाचे त्यांनी शिष्यत्व स्वीकारले. या वेळेपासून त्यांना ईश्वराचा ध्यास लागला. कोलबाजींची अध्यात्मात बरीच प्रगती झाली होती. ईश्वरकृपेच्या दृढ श्रद्धेने व आत्मसाक्षात्काराने त्यांच्या वाणीत सामर्थ्य आले होते. यामुळे व लोकोपकारक वृत्तीमुळे अनेक लोक त्यांचे अनुग्रहत्व स्वीकारीत. व्याधिपिडीतांना व्याधिमुक्त करणे, दु:खितांचे दु:ख निवारण करणे, भक्तांचे दारिद्र्यहरण करणे अशी लोकोपयोगी कृत्ये करण्यात कोलबाजी धन्यता मानीत. धापेवाडा येथे त्यांचा मठ व गादी असून दरवर्षी तेथे यात्रोत्सव होत असतो.

धापेवाडा येथे विठ्ठल-रुक्मिणीचे सुंदर मंदिर असून पंढरपूरचा विठ्ठल या स्थानी अवतरला अशी नागपूर जिल्ह्यातील भक्तांची भावना आहे. धापेवाड्याचे एक भगवद्भक्त उमाजी बाबा खोलकुटे (अठराचे शतक) यांचा या मंदिराशी व मूर्तीशी संबंध असल्याचे सांगतात. उमाजी बाबा नित्यनेमाने पंढरीची वारी करीत. पण त्यांचे वय झाल्यावर विठ्ठलाने त्यांना स्वप्नात दृष्टांत देऊन त्यांच्याकडून धापेवाडा येथे आपले उपरोक्त मंदिर बांधून घेतले. मोहपा येथील तत्कालीन संतपुरुष मनाजीपंत विंचुर्णे उर्फ श्रीसच्चिदानंदस्वामी यांच्या हस्ते इ.स. १७४० मध्ये त्यात विठ्ठल-रुक्मिणीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. आषाढ वद्य प्रतिपदेस साक्षात पांडुरंग पंढरपूर सोडून धापेवाड्यास येतात अशी येथे श्रध्दा आहे. या दिवशी येथे मोठी यात्रा भरते.

अनुक्रमणिका

सच्चिदानंद स्वामी : श्री सच्चिदानंद स्वामी (इ.स. १७२१-१७९६) या नावाने प्रसिध्द असलेले मनाजीपंत गणेश विंचुर्णे यांचा जन्म सारस्वतपूर (सावनेर) येथे झाला. बालपणापासून त्यांना कृष्णभक्तीचा ध्यास होता. मातापित्याच्या मृत्यूनंतर ते मोहपा येथे आले व तेथील विद्वान सत्पुरुष अच्युतानंद स्वामी यांचे शिष्यत्व पत्करले. त्यांनी मनाजीपंतांचे नाव 'महामती स्वामी' असे ठेवले. त्यांच्या अध्यात्मिक सामर्थ्याने दामाजीपंत व्यवहारेंसारखे भक्त त्यांच्याकडे आकृष्ट होऊन शिष्यत्व स्वीकारीत.

सच्चिदानंद स्वामींनी केलेले गोसेवेचे सामाजिक कार्यही विशेष महत्त्वाचे आहे. आज प्रांतभर प्रसिध्द असलेल्या मोहपा येथील बैलबाजाराचे मूळ त्यांनी २५० वर्षापूर्वी आचरलेल्या गोसेवेच्या व्रतात आहे. हा बैलबाजार त्यांनीच सुरू केला. सच्चिदानंदांनी चमत्कार केले नाहीत. मात्र ते काव्यरचना करीत. श्री नृसिंहस्वामी आष्टीकर यांच्याकडून इ.स. १७९६ मध्ये त्यांनी संन्यासदीक्षा घेऊन याच वर्षी समाधी घेतली.

पुरुषोत्तम महाराज जडी : (इ. स. १७४०-१८२०) नावाचे एक सत्पुरुष काटोल येथे होऊन गेले. त्यांनी लहान वयातच पूर्ण ऋग्वेद आत्मसात केला. नागपूरचे राजे मुधोजी उर्फ आप्पासाहेब भोसले यांनी त्यांची भेट घेतली होती. जडी महाराज रामभक्त असल्याने राम व मारुतीच्या सेवेतच निमग्न रहात. वाचासिध्दी, जनकल्याण व निःस्पृह वृत्ती यामुळे त्यांची कीर्ती दूरवर पसरली. त्यांना अनेक शिष्य लाभले होते.

कुरुक्षेत्रनजीक तीन कोसांवर असलेल्या जकार नामक गावाहून माधवदास नावाचे एक येागी १७५ वर्षांपूर्वी धापेवाडा येथे आले होते. येथे त्यांनी कोकेमहाराज उर्फ धनकर यांना उपदेश दिला. माधवदासांना झेंडेवाले माधवदास असेही म्हणत. याची दंतकथा अशी की, वृध्दापकाळामुळे अनेक वेळा कुरुक्षेत्राहून धापेवाडा येथे येऊन दर्शन देणे कठीण असल्यामुळे त्यांनी शिष्य कोकेबुवांना धापेवाडा येथे एक ध्वज किंवा झेंडा उभारुन दिला व 'हा झेंडा काहीही कारण नसताना जेव्हा मोडून पडेल, तेव्हा आपली प्रयाणवेळ झाली असे समजावे' असे सांगून ते कुरुक्षेत्री गेले. पुढे पाच-सहा महिन्यांनी वैशाख वद्य सप्तमीस हा झेंडा काहीही कारण नसताना भर दुपारी मोडून पडला. भक्तांनी जकार येथे जाऊन पाहिले, तो अगदी त्याच वेळेस माधवदासांनी इहलोकी प्रयाण केल्याचे आढळले. या प्रकारामुळेच त्यांना झेंडेवाले असे नाव मिळाले.

माधवदासांनी 'अलक्ष्यनिधान' नावाचा तत्त्वज्ञानवर ग्रंथ लिहून त्यात अद्वैत तत्त्वज्ञान, ईश्वर व सद्‌गुरु यांच्या ऐक्याचे, निष्काम कर्मयोगाचे व परमपावन अध्यात्म विद्येचे ठाशीव प्रतिपादन केले आहे. हा ग्रंथ इ.स. १८०० मध्ये पूर्ण झाल्याचे ग्रंथातील उल्लेखावरून दिसते. धापेवाडा येथे मठात माधवदासांच्या पुण्यतिथीचा उत्सव साजरा होतो. मठाच्या दक्षिण भागात शिवमंदिरानजीक कोके महाराज यांची समाधी आहे.

डाऊ महाराज उर्फ तेलियास्वामी : या नावाने प्रसिध्दीस आलेल्या एका अवलिया सत्पुरुषाचा जन्म नागपूर येथे झाला. त्यांनी महाराष्ट्र कवी अमृतराय (शके १६२०-१६७५) यांच्याकडून गुरुपदेश घेतला होता असे 'सच्चरितमालिका' ग्रंथात लेखकाने नमूद केले आहे.बालवयातच त्यांनी वेदशास्त्रे-पुराणे यांचे अध्ययन केले होते. पुढे प्रपंचत्याग करून

त्यांनी दोन हातात दोन गाडगी घेतली व त्यात तेल मागून ते अंगलेपन करू लागले. त्यामुळे त्यांना 'तेलियाबुवा' असे नाव पडले. तेलियाबुवा सदोदित मुक्त संचार करीत. त्यांना भविष्यज्ञानही असावे. त्यांनी अंतर्ज्ञानाने अनेकांचे रक्षण व संकट निवारण केले. नागपूरला अयाचित मंदिरासमोर मंगळवारीचे रस्त्यावर डाऊ महाराजांचे मंदिर असून तेथेच त्यांची समाधी व विठ्ठलमूर्ती आहे.

आत्माराम महाराज अवधूत : यांचा जन्म नांदगाव येथे झाला. यांच्या घराण्यात पूर्वीपासून असलेली मुघलांची रिसालदारी हे चालवित होते. गुरुच्या शोधात असताना त्यांची उद्धव चिद्धन यांच्याशी गाठ पडली. त्यांनीच आत्माराम महाराजांना अनुग्रह दिला. त्या क्षणापासून त्यांनी सर्वसंगपरित्याग करून रामटेक जवळील नागार्जून पहाडावर बारा वर्षे तपश्चर्या केली. त्यानंतर नागपूरला येऊन आपल्या उपदेशाने अनेकांचा उध्दार केला. दत्तावतार म्हणूनही त्यांची ख्याती होती. त्यामुळे त्यांना 'अवधूत' हे नाव मिळाले. उध्दवचिध्दनांच्या काळाचा अंदाज घेतल्यास आत्माराम महाराज सुमारे २०० वर्षांपूर्वी होऊन गेले असे म्हणता येईल. भाद्रपद पौर्णिमेस त्यांनी योगबलाने प्राण त्यागले. नागार्जून पहाडावर त्यांची समाधी आहे. अवधूतबुवांचा मठ म्हणून हे स्थान प्रसिध्द आहे.

पहिले रघुजी भोसले नागपूरात गादीवर असताना इ.स.१७५३ च्या सुमारास सदाशिव महादेव कात्यायन हे साधू चंद्रपूरहून येथे आले व सध्याच्या अयाचित मंदिराच्या जागी एका वृक्षाखाली तपश्चर्येस बसले. ते अयाचित वृत्तीने कालक्रमणा करीत म्हणून त्यांना 'अयाचित' हे नाव पडले. यांनी तिरुपती येथील व्यंकटेश दर्शनाने प्रभावित होऊन त्यांची वालुकामूर्ती तयार केली व ती स्थापन करून त्यावर लहानसे मंदिरही बांधले. तसेच उत्सवप्रसंगी देवमूर्तीच्या मिरवणुकीसाठी रथही तयार केला. अयाचित बुवांनी इ.स.१७९३ मध्ये समाधी घेतली. त्यांचे समाधिस्थान म्हणजे आजचे अयाचित मंदिर होय.

सावनेर येथे सुमारे १८ व्या शतकात सीताराम महाराज नामक सिध्दपुरुष होऊन गेले. त्यांनी ज्ञानेश्वराप्रमाणे जिवंत समाधी घेतली. त्यांचा मठ असून त्यात त्यांची पुण्यतिथी व अन्य उत्सव साजरे होतात.

स्वामी तुकाराम महाराज : (इ.स.१८१६-१८८३) हे दिव्य दृष्टीचे सत्पुरुष मोहपा (मधुपूरी) येथे होऊन गेले. त्यांनी आपल्या दिव्य दृष्टीचा उपयोग भक्तांवरील संकट निवारणासाठी केला. त्यांनी भक्तांना ज्ञानदृष्टी देऊन मनुष्य जीवाच्या उध्दारकार्यासाठी आपले जीवन वेचले. आश्रमाने संन्यस्त, पण वृत्तीने व कार्याने समाजस्थ असे त्यांचे लोककल्याणकारी जीवन होते. या सत्पुरुषाच्या थोरवीविषयी अनेक साधुसत्पुरुषांनी गौरवाने लिहीले आहे. तुकाराम महाराज कवीही होते. मोहपा येथे त्यांनी समाधी घेतली.

मारुती महाराज : उमरेड तालुक्यातील मांढळ गावच्या (आती, ता. कुही) मारुती महाराजांना (जन्म इ. स. १८१८) मारुतीचा अवतार मानले जाई. अनेक व्याधीग्रस्त लोक त्यांच्या आशीर्वादासाठी येत. ते नेहमी पाळण्यावर बसून झोके घेत भजन करीत. नागपूरचे राजे तिसरे रघुजी यांनी त्यांचे दर्शन घेतले होते. महाराजांची समाधी मांढळ येथे असून दिपावलीस मोठा उत्सव साजरा होतो.

मोतीबाबा जामदार : नागपुरातील ब्रह्मीभूत श्री मोतीबाबा जामदार (इ.स. १८४४-१९२५) हे प्रसिध्द सत्पुरुष नायब तहसिलदार होते. ते आर्वी येथे या नोकरीत असताना त्यांना परमार्थिक दृष्टी प्राप्त झाली. तेथील आप्पाजी महाराज घाटे या भगवद्भक्ताचा निकट सहवास त्यांना लाभला. मोतीबाबा महाराजांनी काही गावी मंदिरांची उभारणी, तर काही ठिकाणी मठ-मंदिरांचा जीर्णोध्दार अशी धर्मकार्ये केली आहेत. सेवानिवृत्तीनंतर ते नागपूरलाच होते. या काळात त्यांचे घर रंजल्यागांजल्यांचे आश्रयस्थान बनले होते. त्यांच्या प्रवचनास महामहोपाध्याय बापूजी ताम्हण यांनी तर त्यांना संस्कृतात रचलेली 'प्रशस्ती' अर्पण केली होती.

ब्रिटिश अधिकारी रँडचा वध केल्यावर चाफेकर बंधुंपैकी त्यांनी दामोदर यांना आपल्या वाड्यात दीड महिने आश्रय दिला होता. श्री नृसिंह सरस्वतींचा त्यांच्यावर अनुग्रह होता. मोतीबाबा कवी मोरोपंताच्या धर्तीवर काव्यरचनाही करीत. त्या ईश्वर व संतस्तुतीदर्शक असून आर्याबध्द व यमकअनुप्रास, श्लेष अलंकारयुक्त आहेत. याशिवाय काही शंकासमाधानार्थ त्यांनी पत्रेही लिहिली आहेत. ही पत्रे म्हणजे मोतीबाबांनी वेळोवेळी भक्तांना केलेला ज्ञानोपदेशच होय.

माधवराव महाराज : नागपूरच्या इतवारी विभागातील श्री नाथमंदिरात ज्यांची गादी आहे त्या श्री. माधवनाथ महाराजांनी (इ. स. १८५७-१९३६) आसेतुहिमाचल तीर्थयात्रा केल्या. नाशिकमधील वणी येथील सप्तशृंगी डोंगरावर त्यांनी कठोर तपश्चर्या केली. त्यांनी अनेक संसारीजनांस आपत्तीमुक्त व दु:खमुक्त केले. त्याचबरोबर अन्नदान, मंदिरांचे जीर्णोध्दार, नवीन मंदिर उभारणी अशी लोकोपयोगी कार्येही त्यांनी केली. देवगाव रंगारी येथील श्री बाळासाहेबांचे मंदिर व पुणे येथील दगडूशेठ हलवाई याचे सुप्रसिध्द दत्तमंदिर यामागील प्रेरणा यांचीच होती. जानेवारी १९३६ मध्ये ते पुण्याहून नागपूरला आले. माधवनाथ महाराजांची गादी व समाधी एकाच ठिकाणी असलेले एकमेव स्थान म्हणजेच नागपूरचे इतवारी भागातील श्रीनाथमंदिर होय.

ताजुद्दीनबाबा अवलिया : कामठी येथे जन्मलेले श्री ताजुद्दीनबाबा अवलिया (इ.स. १८६१-१९२५) हे पलटणीतल्या नागपूर रेजिमेंट नं. १३ मध्ये भरती झाले होते. पण लवकरच त्यांचे लक्ष संसारीक मोहमायेतून उडाल्यामुळे त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला. नोकरीनिमित्त सागरला असतानाच ते वेड्यासारखे भटकत. म्हणून त्यांना कामठीला आणण्यात आले. येथेही तोच क्रम चालू राहिल्यामुळे त्यांची नागपूर येथील पागलखान्यात रवानगी करण्यात आली. तेथे ते १६ वर्षे होते. त्यांच्या कृपाप्रसादासाठी लोकांची पागलखान्यात रीघ लागे. पुढे सप्टेंबर १९०८ मध्ये नागपूरचे राजे पाचवे रघुजीराव भोसले यांनी त्यांची सुटका करून निवासाचीही व्यवस्था केली. पण तेथून निघून ते वाकी (ता. सावनेर) येथे राहू लागले. येथील १२ वर्षांच्या काळातील त्यांच्या अनेक लीळा प्रसिध्द आहेत. ते भक्तांचे दु:ख निवारणही करीत. नागपूरला सक्करदरा येथे त्यांचे निर्वाण झाले.

तपकिरी बाबा : श्री विश्वनाथ झोलबाजी उर्फ तपकिरी बाबा (इ.स. १८७१-१९२५) यांनी मोहपा येथील स्वामी तुकाराम महाराज (इ. स. १८१६-१८८३) यांच्याकडून गुरुपदेश घेतला होता. संसारात राहूनही ते भक्तिमार्गाकडे वळले. आदासा, रामटेक इत्यादी स्थळांचे तीर्थाटन करून ते पंढरपूरला आले. निराहारामुळे 'निराहारी बाबा' व तपकीर

ओढण्यामुळे 'तपकिरीबाबा' या नावाने ते प्रसिध्द झाले. त्यांचे अनेक शिष्य या भागात आहेत. त्यांनी पंढरपूर येथे समाधी घेतली.

गोपाळबुवा ठमके : वऱ्हाड प्रांतातील पयोष्णी तीरावरील खोलापूर येथे जन्मलेले श्री गोपाळबुवा ठमके मातापित्याच्या मृत्यूनंतर नागपूरला आले व आद्यकवी मुकुंदराज यांच्या परंपरेतील बकाजी रंगनाथ यांना त्यांनी गुरु केले. मुकुंदराजांचे 'विवेकसिंधू' व 'परमामृत' हे ग्रंथ ते नित्यनेमाने वाचीत. कित्येक लोक त्यांच्या दर्शनास येत व अनुग्रह घेत. अनेकांना कृतार्थ करून व आपले पट्टशिष्य श्री गणोबा महाराज वाडी यांना गुरुपदेश देऊन गोपाळबुवांनी सन १९३९ मध्ये समाधी घेतली. त्यांचा मठ नागपूर येथील बुधवारीत श्री जागृतेश्वर मंदिराच्या आग्नेय कोनास आहे.

नागपूर येथील डोके घराण्याचे मूळ पुरुष लक्ष्मणबुवा हे चंद्रपूरहून नागपूरला आले. चंद्रपुरातील प्रसिध्द सत्पुरुष श्री गोविंदस्वामी यांचे हे शिष्य. लक्ष्मणबुवांना द्वितीय रघुजी भोसले यांनी इ.स. १७८७ मध्ये कुंभारी हा गाव (ता. रामटेक) मोकासा दिला होता.

यादवबुवा : या घराण्यातील दुसरी प्रसिध्द व्यक्ती म्हणजे यादवबुवा. यांनी आपल्या चुलत्यांकडूनच म्हणजे लक्ष्मणबुवांकडून मंत्रोपदेश घेऊन संन्यास घेतला. त्यांनी स्वत: एक मठ तयार करून त्यात विठ्ठल मूर्तीची स्थापना केली. ते सच्चिदानंदस्वामी या नावाने व समाजोपयोगी जीवनाने प्रसिध्द झाले. त्यांचे इ.स. १८७७ मध्ये निर्वाण झाले.

निकालस महाराज : नागपूरच्या इतवारी विभागातील निकालस मंदिरात गादी असलेले शंकरानंद उर्फ निकालस महाराज हे एक सिध्दयोगी सत्पुरुष होते. हे मूळचे गुजरातमधील जावरा संस्थानचे. सोमनाथपासून तीर्थयात्रेस प्रारंभ करून अनेक तीर्थांना भेटी देत ते पंढरपूर येथे आले. येथे त्यांनी बराच काळ व्यतित केला. येथेच त्यांना परमार्थिक दृष्टी लाभली. तीर्थयात्रा करीत ते अदिलाबाद येथे आले व तेथील सिध्दपुरुष श्री विश्वपुरी महाराजांचे त्यांनी शिष्यत्व स्वीकारले. त्यानंतर अल्पावधीत ते चंद्रपूर येथे आले. चंद्रपुरात त्यांचा एक मठही आहे. पुढे काही वर्षानंतर भक्तांनी त्यांना नागपूरास आणले. त्यांचे परमभक्त कै. सीतारामपंत वाराणशीवार यांनी त्यांच्यासाठी येथे स्थापन केलेला मठ 'निकालस मंदिर' नावाने प्रसिध्द आहे. इ.स. १८९५ मध्ये त्यांनी नागपूर येथेच देह ठेवला. भक्तगणांची संकटमुक्तता व त्यांनी दाखविलेला मुक्तिमार्ग यामुळे शंकरानंदाचा शिष्यपरिवार मोठा होता.

राजमहाराज कोष्टी : पहार्नी (जि. चंद्रपूर) येथे इ.स. १८७९ मध्ये जन्मलेल्या श्री राजामहाराज कोष्टी यांचे मूळे नाव 'राखडू' असे होते. लग्नानंतर अल्पावधीत पत्नीचा काही कारणाने अकस्मात मृत्यू झाल्यावर राजाबांच्या वृत्तीत फरक दिसू लागला. त्यांना वैराग्य आले. वडिलांच्या मृत्यूनंतर ते उमरेड येथे आले. भगवंताच्या नामस्मरणात देहभान विसरावे व लोकांना ईश्वरसेवेस प्रवृत्त करावे अशी त्यांची वृत्ती होती. त्यांच्या या वृत्तीमुळे व निरपेक्ष लोकसेवेमुळे लोकांची त्यांच्यावर भक्ती जडली. पराकोटीच्या आत्मसाधनेमुळे त्यांना काही सिध्दी प्राप्त झाल्या होत्या असे म्हणतात. त्यांची समाधी उमरेड येथील इतवारीतील शिवमंदीराच्या सभामंडपात आहे.

श्री लाटणे महाराज : (इ.स. १८९६-१९५०) नावाचे एक अवलिया उमरेड येथे होऊन गेले. त्यांचे वर्तन लोकविलक्षण असे होते. त्यांच्या सहवासाने व आशीर्वादाने अनेक

लोकांची संकटे दूर होत अशी श्रद्धा आहे. ते श्री राजामहाराजांचे शिष्य होते.

पूर्वी वर्णन केलेले गोपाळबुवा ठमके यांचे गणोबादादा वाडीवाले (१९ वे शतक) पट्टशिष्य होते. वऱ्हाड प्रांतात खोलापूरच्या पैलपार असलेल्या दारापूर गावी त्यांचा जन्म झाला. गोपाळबुवांच्या सेवेत ते अहर्निश मग्न असत. दाराहून ते नागपूरला आले. गुरुच्या दृष्टांतानुसार ते उत्तर दिशेकडील बापूचे पेठीजवळ भक्तजनांच्या आग्रहामुळे स्थिर झाले. भक्तमंडळी त्यांना भिक्षा आणून देत. एका भक्ताने तर त्यांना संपूर्ण वाडीच (गाव) अर्पण केली. तेव्हापासून 'गणोबाची वाडी' म्हणून हे ठिकाण प्रसिध्द आहे. व्याधिपिडीत त्यांच्याकडे कृपाप्रसादाकरिता येत. आंभोरा येथे असलेल्या चैतन्येश्वराच्या दर्शनास ते प्रतिवर्षी जात. पौष महिन्यातील शुध्द सप्तमीस चतुर्थाश्रम घेऊन गणोबाजी निजधामास गेले.

बाबुराव महाराज खातखेडकर : विदर्भातील एक साक्षात्कारी सत्पुरुष श्री बापुराव महाराज खातखेडकर (इ.स. १८९६-१९७२) यांचा जन्म वर्ध्याजवळील सिंदी (रामनगर) येथे झाला. आर्वीचे श्री आप्पाजी महाराज घाटे हे बापुरावांचे गुरु. त्यांनी बापुरावांना 'श्रीमद्भागवत' हा प्रसाद-ग्रंथ दिला. बापुरावांनी आयुष्यभर या ग्रंथाची उपासना केली व तसे करण्याचा भक्तांनाही उपदेश केला. यांच्या अंगी परमार्थिक सामर्थ्य होते. गोमातेविषयी त्यांना अत्यंत आदर होता. त्यांचे नागपूरला महाप्रयाण झाले.

साधु खराटे महाराज : हे कोकणस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संसारी असता व्याधीग्रस्त होऊन वैराग्य प्राप्त झाल्यानंतर ते अक्कलकोट स्वामी महाराजांच्या उपदेश व व्रताचरणामुळे व्याधीमुक्त झाले. ते जन्माने कोकणातील असले तरी त्यांचे बहुतांश आयुष्य व सेवाकार्य नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर, मोहपा, धापेवाडा, खापा, सावनेर व वाकोडी येथे व्यतित झाले. कोठेही गेले, तरी ते विष्णूमंदिरात रहात व स्थानिक मुलांसमवेत खराटा घेऊन गाव झाडून स्वच्छ करीत. त्यामुळे त्यांना 'खराटेबुवा' असे नाव पडले. गावोगावी हिंडून त्यांनी हे सामाजिक कार्य एक व्रताचरण म्हणून निष्ठेने केले. इ.स. १९१० मध्ये पांढुर्ण्यानजीक मारोडी येथे ते समाधिस्थ झाले.

भय्याजी महाराज : नागपूर जिल्ह्यातील सावनेर-काटोल मार्गावर सावंगी गावी श्री ताज आनंदाश्रमात ज्यांचे चैतन्य समाधी मंदिर आहे, त्या भय्याजी महाराजांचे (सन १९१०-१९८४) मूळ नाव सुखदेव. नागपूर येथील मॉरिश महाविद्यालयात (सध्याचे नागपूर महाविद्यालय) उच्च शिक्षण घेतानाच त्यांनी असहयोग आंदोलनात भाग घेतला. याच काळात तत्कालीन प्रसिध्द सत्पुरुष श्री ताजुद्दीनबाबा यांचा कृपाप्रसाद लाभल्याने आपल्या साधनास्थळाला त्यांनी 'श्री ताज आनंदाश्रम' हे नाव दिले. त्यांच्या आत्मसाधनेमुळे सुफी संप्रदायातील सत्पुरुष शफीबाबा यांनी भय्याजींना गुरुपदेश दिला. त्यानंतर त्यांनी सावंगीला आपल्याच शेतात बसून अध्यात्मसाधना केली. नि:स्पृह साधनेमुळे व आत्यंतिक गुरुनिष्ठेमुळे सर्व प्रकारच्या व्याधिग्रस्तांना, दु:खितांना त्यांच्या दर्शनाने व तीर्थप्रसादाने लाभ होत असे. सन १९८४ मध्ये भय्याजी आपल्या कर्मभूमीतच समाधिस्थ झाले.

अनसूयामाता : काटोल तालुक्यातील पारडसिंगा येथे जन्मलेल्या अनसूयामाता (इ.स. १९२०-१९९७) यांचा बालपणीच विवाह झाला होता. पण वैदेही वृत्तीमुळे त्यांचे मन संसारात रमले नाही. रिठी येथील मेहरामबाबा हे त्यांचे गुरु होत. भक्तगण त्यांना श्रध्देने

मायबाई म्हणत. त्यांच्या बोलण्यातून भक्तांना काही निश्चित संकेत, उपदेश व दिशा मिळे. समाजाच्या विविध स्तरात व अनेक प्रांतात त्यांचा भक्तवर्ग होता.

मराठी साहित्य

(सावदेकर, आशा, प्रोफेसर, मराठी पदव्युत्तर विभाग नागपूर विद्यापीठ (नागपूर) यांनी या भागाचे लेखन केले आहे.)

नागपूर शहराला व जिल्ह्याला स्वतंत्र साहित्यिक आणि सांस्कृतिक अस्तित्व फार पूर्वीपासूनच लाभलेले आहे. नागपूर येथील संत परंपरा मराठी आद्यकवी मुकुंदराज यांच्या परंपरेतील इंदोरा येथील गणोबा महाराज व जागेश्वर मंडळातील ठमकेबुवा यांच्यापासून सांगितली जाते. त्याच काळात मृत्युंजय, कोकीळ हे द्वितीय रघुजीच्या काळातील एक व्युत्पन्न साहित्यिक होते. त्यांचे शिष्य शिवरामशास्त्री केळवदकर व सीतारामशास्त्री वखरे होत. अवधूत बुवा आणि डोकेबुवा यांचे मठ नागपूरामध्ये अजुनही आहेत. साल्पेकरांचे 'देवघर' हे फार प्राचीन आहे. संत गुलाबराव महाराज आणि संत तुकडोजी या वैदर्भीय संताचे कार्य आणि परंपरा यांच्या खुणा अजूनही नागपूरमध्ये दाखविता येतात.

वैय्याकरण केसरी सदाशिवशास्त्री घुले यांच्यापासून म्हणजे १८१६ पासून नागपूरची पंडित परंपरा सुरू होते. महामहोपाध्याय घाटेशास्त्री यांनी 'उत्तर रामचरिता'वर एक टीका लिहिली होती. गंगाधरशास्त्री मंगरुळकर यांनी १६-१७ संस्कृत टीपा, टिप्पणी व पुस्तिका लिहिल्या, पण त्या अप्रकाशित राहिल्या. कृष्णशास्त्री घुले यांनी संशोधनपर लिखाण केले व 'हरहरीयम्' हे काव्य लिहिले. ते 'भवितव्य' या संस्कृत साप्ताहिकामधून प्रसिध्द झाले.

विदर्भाची सरस्वती उपासना फार जुनी आहे. बुध्दधर्माच्या माध्यमिक सिध्दांताचा प्रस्थापक नागार्जुन, दंडी, भवभूती, माखी, 'सप्तशती'कार हाल, 'बृहत्कथा'कार गुणाढ्य, 'कातंत्रसूत्र'कार शर्ववर्मा, राजा भोज, प्रवरसेन, हेमाद्री, बोपदेव, नलचंपूकार त्रिविक्रमभट, ज्योतिषाचार्य भास्कर इत्यादी अनेक विद्वानांची माहेरघरे या विदर्भ भूमीत होती.

नागपूरचे बिंदुमाधव पुराणिक आणि सदाशिवराव हे आधुनिक पोवाड्यांचे जनक होत. नागपूरातील तुंबडीवाले जो एक अप्पासाहेबांचा पोवाडा म्हणत तो नागपूरच्या कै. नीळकंठ बळवंत भवाळकर यांनी लिहून घेतला होता तो पुढे 'वागीश्वरी'च्या जानेवारी-फेब्रुवारी, १९३४ च्या अंकात प्रसिध्द झाला. देवानाथ (१७५४-१८२१) व दयाळनाथ (१७८८-१८३६) यांची कविता रा. अच्युतराव साठे आणि अग्निहोत्री यांनी टीपा व विस्तृत प्रस्तावना लिहून प्रसिध्द केली. उत्तम श्लोकांची 'देवीसप्तशती' रा. अणे यांच्या प्रस्तावनेसह प्रसिध्द झाली.

या प्रांतातील साहित्याचे बीजारोपण मूळचे मुंबईचे पण नोकरी निमित्त नागपूरला स्थायिक झालेले हरिपंत पंडित आणि वामनराव ओक यांनी केले. 'विविध- ज्ञानविस्तार' व 'काव्यसंग्रह' या मुंबईच्या नियतकालिकांशी यांचा संबंध असल्यामुळे नागपूरचे के. व्ही. लक्ष्मणराव, घंटय्या नायडू, श्रीधरपंत परांजपे, अळेकर, घुले, भवाळकर, दामुअण्णा ओक इत्यादी या नियतकालिकांद्वारे पुढे आले. वा. ब. पटवर्धन उर्फ कवी वसंत हे नागपूरच्या हिस्लॉप कॉलेजचे विद्यार्थी असून त्यांचा व केशवसुतांचा परिचय नागपूरचाच. मराठी वृत्तपत्र

'प्रभाकर'चे जनक गोविंद विठ्ठल उर्फ भाऊ महाजन आणि शीघ्रकवी नाना सोवनी हे नागपूरला स्थायिक झाले होते. नागपूर हे मध्यप्रदेशाच्या अगदी मध्यभागात असल्यामुळे इथे निरनिराळ्या भाषा एकत्र आल्या होत्या. त्यामुळे परस्पर विचार विनिमय होत असे. कै. माधवराव सप्रे यांची 'दासबोध' व 'गीतारहस्याची' भाषांतरे, कै.भगाडे यांचे 'ज्ञानेश्वरी'चे भाषांतर व यादवराव जामदार यांचे तुलसीरामायणाचे भाषांतर हे त्याचेच द्योतक आहे. बंगालीत लेखन करणारे श्री. देऊस्कर हे नागपूरचेच होते.

इंग्रजी विद्येचा प्रारंभ नागपूरमध्ये इ. स. १८४५ साली झाला. स्टीफन हिस्लॉप यांनी एका खाजगी इंग्रजी शाळेची स्थापना नागपूरमध्ये बाजारआळीत केली. फुरसतीच्या वेळी एकत्र जमून लेखन वाचन करण्यासाठी सुशिक्षित मंडळींनी सीताबर्डी येथे एक क्लब काढला होता. या क्लबचे उपाध्यक्ष यशवंतराव उदास यांनी 'धौममहाबलेश्वरवर्णन' असा स्थलवर्णनात्मक निबंध एका बैठकीत वाचला होता. हरिपंत पंडितांच्या नारायणराव पेशव्यांच्या वधावरील नाटकाचा बराचसा भाग येथे वाचून दाखविण्यात आला होता. वामनराव ओक यांनी 'माधवनिधन' काव्याचे वाचन केले होते. रघुनाथराव शहाणे यांनी झाशी संस्थानवर निबंध तर केशवराव भवाळकर यांनी गोंडी भाषेच्या व्याकरणावर निबंध वाचला होता. पुढे नोकरीमुळे हे सभासद विखुरले व क्लबचे रूपांतर राजाराम लायब्ररीत झाले. मात्र या मंडळींनी व्यक्तीशः ही चळवळ चालू ठेवली हे महत्त्वाचे आहे.

श्रीधरपंत परांजपे यांची 'केकावली'वरील 'बृहतटीका', केशव विश्वास फणसे यांचा 'मोरोपंतांचा व्यासंग' व 'काव्यरचना' प्रसिध्द आहे. के. व्ही. लक्ष्मणराव यांनी 'मुलेश्वर' वनपर्वचे संपादन केले, मोरोपंताच्या कर्णपर्ववर टीपा लिहिल्या. घंटय्या नायडू यांनी निर्यमक कवितेचा मराठीत पुरस्कार केला आणि 'मैना' हे ५६ श्लोकांचे खंडकाव्य प्रसिध्द केले. 'केशरी मंदील' नावाचे नाटकही त्यांनी लिहिले. १८८९ मध्ये 'मराठी भाषेची मूळ पीठिका' हा ग्रंथ त्यांनी लिहिला. रा. भवाळकर यांनी संत तुकारामाचे गुरु केशव चैतन्य यांच्या चरित्राचा 'केशवचैतन्य कल्पतरु' नामक ओवीबध्द ग्रंथ प्रसिध्द केला. मोरापंतांचे 'हरिवंश' त्यांच्या संपादकत्वाखाली काव्यसंग्रहात प्रसिध्द झाले. ओक यांनी मुलेश्वर, मोरोपंत, उध्दचिध्दन, शुभानंद वगैरे कवींच्या ग्रंथांच्या आवृत्त्या प्रसिध्द केलेल्या आहेत. रेव्हरंड टिळक यांची पहिली काव्ये बापाचे 'अश्रू व माझी भार्या', पहिले नाटक 'संगीत गोदुःखविमोचन' व 'काव्यकुसुमांजली' हे मासिक नागपूरामधून प्रसिध्द झाले. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी ज्ञानकोशाचा प्रारंभ नागपूरमध्ये केला आणि येथूनच त्यासाठी भांडवल गोळा केले.

कादंबरी क्षेत्र : नागपूरच्या कादंबरी क्षेत्रातील पहिल्या कांदबऱ्या म्हणून श्री. व्यं. केतकर यांच्या नागपूरच्या वास्तव जीवनावर लिहिलेल्या 'गोंडवनातील प्रियवंदा' आणि आशावादी यांचा उल्लेख करावा लागेल. विदर्भातील आणि नागपूर येथील श्री. पु. य. देशपांडे यांची १९२७ मध्ये 'बंधनाच्या पलीकडे' ही पहिली कांदबरी प्रसिध्द झाली. त्याच वर्षी नीळकंठ बळवंत भवाळकर यांची नीळकंठ जगन्नाथ मुळे या टोपणनावाने 'बहेन पिरोज' ही छोटीशी चर्चात्मक कांदबरी प्रसिध्द झाली. बुध्दिमान पुरुषाच्या बौध्दिक विकासासाठी तुल्यबळ स्त्री साहचर्चायी आवश्यकता म्हणजेच पत्नीव्यतिरिक्त अन्य बुध्दीवंत स्त्रीशी मैत्री हा वादळी विषय त्या कांदबरीत हाताळला गेला होता. पु. य. देशपांडे यांनी त्यानंतरही 'सुकलेले फूल',

'सदाफुली', 'विशाल जीवन', 'काळी राणी', 'नवे जग' अशा कादंबऱ्या लिहिल्या. समाजाची बंधने तोडणारा स्वतंत्र व्यक्तीवाद, पुरातन रूढ कल्पनांना तिलांजली देऊ पाहणारा बंडखोरपणा हा त्यांच्या कादंबऱ्यांचा विषय होता. सन १९३३ साली ग. त्र्यं. माडखोलकर यांनीही कादंबरी क्षेत्रात प्रथम प्रवेश केला. 'मुक्तात्मा, भंगलेले देऊळ, शाप, कांता, दुहेरी जीवन, मुखवटे, नवे संसार, अनघा, चंदनवाडी' अशा कादंबऱ्या निर्माण करणाऱ्या माडखोलकरांना क्रांतिकारी दृष्टीचे आकर्षण, चळवळीचे प्रत्ययकारी वर्णन, गांधीवादाला विरोध अशा वैशिष्ट्यांमुळे राजकीय कादंबरीकार मानले गेले. त्यानंतर महत्त्वाचे कादंबरीकार म्हणजे सीतावनवास, जीवनरहस्य, युध्दसंसार, अहिल्योध्दार अशा कादंबऱ्या लिहिणारे ना. के. बेहेरे त्यांची ध्येयाकडे (१९३४) ही कादंबरी विशेष गाजली. या. मु. पाठक यांनीही धबधब्याच्या धारेत या नावाची कादंबरी प्रसिध्द केली. यानंतर महत्त्वाचे कादंबरीकार म्हणजे पु. भा. भावे आणि शरच्चंद्र मुक्तिबोध हे होत. 'अकुलिना' (१९५१) ही पत्रात्मक कादंबरी लिहून भावे कांदबरीच्या क्षेत्रात प्रवेशले व त्यानंतर वर्षाव, अंतराळ, आग, पिंजरा, रोहिणी, मागे वळून, अडीच अक्षरे अशा महत्त्वाच्या कांदबऱ्या निर्माण करून ते स्थिरावले. दोन भिंती, सायंकाळ, राणी, रखमाच्या मुली या त्यांच्या अलीकडच्या कांदबऱ्या होत. शरच्चंद्र मुक्तिबोध यांनी क्षिप्रा, सरहद्द आणि जन हे वोळतु जेथे या तीन त्रिदलरुपातील कांदबऱ्या लिहून आपलें साहित्य सामर्थ्य स्पष्ट केले. केवळ वर्गीय दृष्टी न बाळगता एका तरुणाच्या मानसिक विकासाची जीवनस्पर्शी कहानी मुक्तिबोधांनी तीन भागात मांडली.

शंकर बाळाजी शास्त्री यांनी 'अमावस्या, अडेलतट्टू, कंगाल' या कांदबऱ्या लिहिल्या. परंतु स्वतंत्र कांदबऱ्यापेक्षा त्यांच्या अनुवादित कांदबऱ्या महत्त्पूर्ण ठरल्या. १९२८ ते १९३६ या काळात त्यांनी प्रेमचंद, शरच्चंद्र यांच्या कांदबऱ्या 'चिरजीवन, अनलज्वाला, नवी क्षितिजे' या शीर्षक नावाने अनुवादित केल्या. व्यंकटेश वकील यांची 'माती' (१९४६) ही कांदबरीही वैशिष्ट्यपूर्ण होती. बळवंत हरी पंडित यांच्या 'करुणसुंदरी, सुशील यमुना, भयंकर सूड' या कांदबऱ्याही नागपूरच्या कादंबरी विश्वात अग्रक्रमाने उल्लेखाव्या लागतील. शांताराम मांजरेकर यांनी 'भयंकर ग्रहदशा व राजा तोडरमल' (अनुवादित) व य. खु. देशपांडे यांची 'माझी शांती' या कांदबऱ्याही त्या काळात गाजल्या. अण्णाभाऊ उर्फ गोपाळ सीताराम पंचभाई यांनीही कादंबरी लेखनात लक्षणीय भर घातली. व्रजवासी या टोपण नावाने त्यांनी 'मंथरा, माझी तीनशे मुले, त्रिमुर्ती, इंदिरा' अशा कांदबऱ्या लिहिल्या. ना. रा. शेंडे यांच्या 'तांबडा दगड' या कादंबरीने या प्रवाहात एक वेगळेपणा आणला. अगदी अलीकडे वसंत वरखेडकर यांच्या 'सत्तावन्नचा सेनानी, प्रतिनिधी' या कांदबऱ्यानीही असेच वैशिष्ट्यपूर्ण कार्य केले. वसंत वऱ्हाडपांडे यांची 'चित्रशाळा', मनोहर तल्हार यांची 'माणूस', वामन इंगळे यांची 'काळा समुद्र', प्रभाकर सिराज यांची 'निळे कमळ' दिनकर देशपांडे यांच्या 'तपझिरी,' 'जागली' वामन पात्रीकर यांची 'जगबुडी' या कादंबऱ्या नवे वळण सूचित करणाऱ्या आहेत. याशिवाय अ. श्री. लोखंडे, योगेन्द्र मेश्राम, यशवंत मनोहर यांचे योगदान मोलाचे आहे. नव्या पिढीच्या कादंबरीकारांमध्ये इंदूमती शेवडे, यमुना शेवडे, सुनीती आफळे, आशा बगे, विजया ब्राह्मणकर, जयश्री रुईकर, वर्षा रेगे, शैलजा काळे, शुभांगी भडभडे, आशा सावदेकर, तारा शास्त्री, सुगंधा शेंडे या स्त्री कादंबरीकारांचा आवर्जून उल्लेख करावा

लागेल. आजच्या पुरुष कादंबरीकारांमध्ये रवींद्र शोभणे हे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. नागपूर प्रांतातील कादंबरीचा प्रवाह हा सतत असा नाविन्याचा शोध घेणारा व नवीन वळणांचे दर्शन घडविणारा राहिला आहे.

कथा वाङमय : नागपूरी कथा प्रवाहात व्यंकटेश वकील, प्र. शा. मांजरेकर, शंकरराव शास्त्री, व्य. नी. पंडित ही महत्त्वाची व्यक्तिमत्त्वे आहेत. पण ब. ह. पंडित, नीठकंठ बळवंत भवाळकर, शांताराम मांजरेकर यांच्या वाङ्मयीन कार्याच्या भक्कम पायावर ती उभी आहेत हे विसरता येत नाही. १९३५ च्या सुमारास मराठी कथेला महत्त्वपूर्ण वळण लावण्याचे कार्य करणारे दोन महत्त्वपूर्ण कथाकार म्हणजे वामनराव चोरघडे यांच्या 'धार', 'विहीर', 'अतिथी देवो भव', 'संस्कार' या महत्त्वपूर्ण कथा होत. शिवाय 'सुषमा', 'संस्कार', 'यौवन', 'हवन', 'प्रस्थान', 'पाथेय', 'प्रदीप', 'नागवेल', 'मजल', 'बेला' असे अनेक कथासंग्रह निर्माण करून त्यांनी कथा प्रवाहाला महत्त्वपूर्ण योगदान बहाल केले. आत्मपरता, लोक साहित्याचा संस्कार, ग्रामीण जीवनाचा गंध, गांधीवादी प्रभाव यातून चोरघडे यांच्या कथेला एक वेगळेपण प्राप्त झालेले आहे. १९३२ साली सुरू झालेला त्यांचा कथाप्रवास अव्याहत सुरू आहे.

कुसुमावती देशपांडे यांचे कथालेखन मोजके असले तरी संयम, हळुवारपणा आणि काव्यात्मता यामुळे त्यांची कथा मनात दीर्घकाळ दरवळत राहते. 'दीपकळी' (१९३५), 'दीपदान' (१९४०) व 'मोळी' (१९४६) हे त्यांचे कथासंग्रह 'माऊली', 'गवताचे पाते', 'लहानी' या त्यांच्या कथांमधून त्यांची चिंतनशीलता प्रकट झालेली आहे.

पु. भा. भावे हे वैदर्भिय कथाकारांमधील एक महत्त्वाचे नाव. 'पहिला पाऊस' या १९४६ साली प्रसिध्द झालेल्या कथासंग्रहाने त्यांचे सामर्थ्य प्रकट केले. जीवनानुभवाच्या दृष्टीने भावेंची कथा व्यापक तर आहेच, पण त्यांच्या स्वतंत्र, 'भावे' स्पर्शाने ती उत्कट झालेली आहे. 'सतरावे वर्ष', 'वैरी सीमेवर', 'स्वप्न', 'चार मुठी तांदूळ', 'फाटलेले आकाश', 'मुली', 'ध्यास', 'दुःख' या त्यांच्या महत्त्वाच्या कथा. 'पिंपळपान' सारख्या कथेतून ती कथा लघुनिबंधाजवळ जाते, तर 'सीमेवर' सारख्या कथेतून कथेत काव्यच विरघळून जाते. विशिष्ट मूल्यनिष्ठेने ते कथानिर्मिती करीत होते म्हणूनच त्यांच्या कथेने कथाविश्वावर एक ठळक असा ठसा उमटविलेला आहे.

नागपूरच्या कार्यक्षेत्राशी व साहित्याशी संबंधित ना. रा. शेंडे यांचे बालपण गणेशपूर खेड्यातले, पण त्यांची कथा वास्तवता आणि व्यथा यापेक्षा सौंदर्यवादाशीच जवळीक साधणारी आहे. त्यांचे 'सावली' व 'डोंगरमाथ्यावरील दिवा' हे कथासंग्रह प्रसिध्द आहेत.

योगेंद्र मेश्राम, (रक्ताळलेली लक्तरे), मुळ मराठवाड्यातील योगिराज वाघमारे (उद्रेक व बेगड) तसेच प्रकाश खरात या कथाकारांचे संग्रह म्हणजे दलित कथेचा अनेकांगी अविष्कार होय. ताराचंद्र खांडेकर, चंद्रकांत वानखेडे, वासुदेव डहाके ही अलीकडच्या दलित कथांच्या लेखकांची नावे होत. मनोहर तल्हार, वामन इंगळे, वसंत चिंचाळकर, रेमश गाडे, वसंत वाहोकार, रविंद्र शोभणे यांचे कथालेखनही महत्त्वाचे आहे. पुरुषकार म. त्र्यं. देव, 'मोराचं पिस' लिहिणारे बाळ गंगाधर देव, 'वास्तू', 'उत्सव' या कथासंग्रहांचे

निर्माते वसंत वऱ्हाडपांडे, 'रेक्वियम' कार द. भि. कुलकर्णी, सुधाकर जयवंत मोजक्या कथा लिहिणारे वामन निंबाळकर यांचाही उल्लेख करावा लागेल. या. वा. वडस्कर, प्रभाकर पुराणिक, वामन प्रभु, इंदुमती शेवडे यांची कामगिरीही महत्त्वाची आहे. स्त्री कथाकारांमध्ये शकुंतला जोग, तारा शास्त्री, वर्षा रेगे, कुंदा पारसनीस, मालती निमखेडकर विजया ब्राम्हणकर, शुभांगी भडभडे, कुमुद मंडलेकर, सुप्रिया अय्यर, यांची नावे अग्रभागी असली तरी कथा साहित्यात मोलाची भर घालणाऱ्या कथालेखिका म्हणून सुनीती आफळे, आशा बगे, वर्षा रेगे, जयश्री रुईकर, शैलजा काळे यांचा उल्लेख करावा लागेल. क्षमा लिमये, मंदाकिनी जहागिरदार, प्रतिभा कुलकर्णी यांचेही कथासंग्रह प्रसिध्द झालेले आहेत.

नागपूरची काव्यधारा : नागपूरच्या काव्यधारेत अग्रभागी 'पद्यपद्माकर' हा कविता संग्रह ठेवावा लागतो. १९०३ साली प्रसिध्द झालेल्या या काव्यसंग्रहात अच्युतराव साठे आणि नीळकंठ बळवंत भवाळकर यांच्या कविता एकत्रित केलेल्या आहेत. त्यात अनुवादित कवितांबरोबर स्वतंत्र कवितांचाही समावेश आहे. त्याच काळात नागपूर येथे नारायण रंगनाथ अळेकर, कृष्णशास्त्री घुले, केशव विश्वास फणसे, गोविंद पांडुरंग देवधर हेही कविता लिहित असत. त्या वेळच्या हौशी कवींच्या नावात शं. दा. पेंडसे, र. द. सरंजामे, ग. न. पंडित यांचाही समावेश होता.

ना. के. बेहेरे, आनंदराव टेकाडे, श्रीनिवास रामचंद्र बोबडे, जयकृष्णबुवा उपाध्ये हे त्यानंतरच्या पिढीतील महत्त्वाचे कवी होत. ना. के. बेहेरे यांची 'मोत्याची माळ' (१९३०), आनंदराव टेकाड्यांचे 'आनंदगीता' चे चार खंड, बोबडे यांची संस्कृतप्रचुर, विनोदी आणि स्वतंत्र कविता (१९१५ ते १९२५), विमलाबाई देशपांडे, लक्ष्मीबाई बेहेरे यांची भावकविता, कवी आ. रा. देशपांडे उर्फ कवी अनिल यांचे प्रक्षोभ रसाचा प्रत्यय देणारे व मुक्तछंदाचा पुरस्कार करणारे मानवतावादी काव्य, पु. य. देशपांडे यांचे 'निर्माल्य', या. मु. पाठक यांचे 'शशिमोहन', वि. भि. कोलते यांची 'लव्हाळी' (१९३३), राजा बढे, ना. ध. देशपांडे यांची गीतिकाव्यांची लकेर ही नागपूरची आरंभीची काव्यसंपदा होय. कवी जयकृष्ण केशव उपाध्ये यांची 'पोपटपंची' (१९२९), 'लोकमान्य चरितामृत' प्रथम खंड (१९२४) व 'उमरखय्यामच्या रुबा' यांचा त्यांनी केलेला अनुवाद (१९३२) महत्त्वपूर्ण आहे. गु. ह. देशपांडे, ना. घ. देशपांडे यांच्या नागपूरसंबंधी अनेक आठवणी आहेत. ना. घ. देशपांडे यांच्या 'शीळ'चा जन्म नागपूरला महाविद्यालयीन जीवनात झालेला आहे. ग. त्र्यं. माडखोलकरांची रविकिरण मंडळातील कविता व्याप्तीने कमी असली तरी तिचा संबंध नागपूरच्या त्यांच्या वास्तव्याशी नाही, ती त्यापूर्वीची आहे. पु. य. देशपांडे व विमलाबाई यांची कविता 'निर्माल्यमाला', या संग्रहात प्रसिध्द झालेली आहे. या. मु. पाठक यांची कविता 'पिंपळपान' या संपादनात (१९२९) व स्वतंत्ररीत्या 'फुले नी मुले' (१९३९) प्रसिध्द झाली असली तरी त्यांना खरा लौकिक प्राप्त झाला तो शशिमोहन या खंडकाव्यानेच. पापाचे निर्दालन सामाजिक दृष्टीने आवश्यक असते हे सांगणारे ते काव्य रसिकांना फार प्रिय झाले. भवानीशंकर श्रीधर पंडित यांची कविता 'पिचलेला पावा' (१९३३), 'उन्मेष आणि उद्रेक' (१९५०), 'सुवास आणि रस'(१९५३) या संग्रहातून, तर त्यांची शिशुगीते 'बीजेची कोर', 'चवथीचा चांद', 'अष्टमीचा चंद्र' व 'पौर्णिमेचे चांदणे' या संग्रहामधून १९४० साली प्रकाशित झाली.

कवी अनिलांची कविता 'फुलवात' (१९३२), 'भग्नमूर्ती' (१९४०), 'निर्वासित चिनी मुलास'

(१९४३), 'पेर्ते व्हा' (१९४७), 'सांगाती' (१९६१), 'दशपदी' (१९७६) या संग्रहांमधून प्रकटली. मुलछंद ते दशपती हे त्यांनी केलेले प्रयोग आत्मशोध घेणारे होते. त्यांचा उदंड आशावाद, वैयक्तिक स्वातंत्र्याचा पुरस्कार व विशाल मानवतावाद त्यांच्या कवितेत उमटला. १९४९ साली शरच्चंद्र मुक्तिबोधांचा 'नवी मळवाट' हा पहिला कविता संग्रह प्रकाशित झाला. त्यात व्यक्तिवादी मूल्यांपेक्षा सामाजिक परिवर्तनाला महत्त्व होते. आशावादी क्रांतीप्रवणता हा मुक्तिबोधी काव्याचा विशेष त्यांच्या 'यात्रिक' (१९५७) या कविता संग्रहात मुख्यत्त्वे प्रकटतो. सुरेश भट यांची कविता रसिकसापेक्षता व अंत:संगीत जपत फुलत होती. 'रुपगंधा' (१९६१) 'रंग माझा वेगळा' (१९७४) व अगदी अलीकडचा 'एल्गार' हे त्यांचे कविता संग्रह. झंझावाती शब्दांची योजना आणि जीवनाला भिडणारा आशय ही या कवितांची विशेषता आहे.

सन १९५५ मध्ये उषा लिमये यांचा 'विसावा' आणि शांताबाई दंडिगे यांचा 'एकदाणी' हे कौटुंबिक भावना जोपासणारे संग्रह प्रसिध्द झाले. राम शेवाळकर यांचा 'असोशी' (१९५६), 'रेघा' (१९६७), तर अगदी अलीकडे 'अंगारा' हे काव्यसंग्रह प्रसिध्द झाले. प्रेम, निसर्ग यांनी भारलेली आणि जीवनावर प्रेम करणारी कविता त्यांनी लिहिली. गुणाकर देशपांडे यांची 'जिव्हाळी' (१९६१) तील कविता तसेच प्रभाकर सिरास, द. भि. कुलकर्णी यांची कविता लक्षणीय आहे.

या काळातील नागपूरचे महत्त्वपूर्ण कवी म्हणजे ग्रेस होत. त्यांच्या 'संध्याकाळच्या कविता' (१९६७), 'राजपुत्र आणि डार्लिंग' (१९७०), 'चंद्रमाधवीचे प्रदेश' (१९७८) या कवितांमधील आत्ममग्नता आणि दु:खाचे सुजाण भान हे महत्त्वाचे विशेष आहेत. शब्दांच्यापलीकडे नाद, रूप, स्पर्श, रस, गंध यांनी युक्त असा भाववृत्तींचा सोहळा या कवितेत जाणवतो. याच काळातील सुधीर देव यांचा 'स्वप्नगंधा' (१९६३), सुंगधा शेंडे यांचा 'विरतं धुक' (१९७०), वामन इंगळे यांचा 'सूर्यसप्तक' (१९७३), वसंत वऱ्हाडपांडे यांचा 'या मनाचा पाळणा' (१९७२), सुरेश देशपांडे यांनी रचलेली छत्रपतींची गीतगाथा 'शिवरायांचे आठवावे रुप' (१९७४), शिरीष गोपाळ देशपांडे यांचा विज्ञान प्रतिमायुक्त कविता असणारा संग्रह 'लिटमस' (१९७३), मनोहर चिंतामणी वझे यांचा 'पंखपर्व' (१९७२), प्रकाश देशपांडे यांचा 'प्रश्नायन' (१९७५) हे महत्त्वाचे कथासंग्रह होत.

आजच्या पिढीतील नागपूरचे महत्त्वाचे कवी म्हणजे श्रीधर शनवारे होत. 'उन्हउतरणी' (१९७१), 'आतून बंद बेट' (१९७८), आणि 'थांग अथांग' (१९८६) हे त्यांचे कवितासंग्रह. कथात्मता हे त्यांच्या कवितेचे वैशिष्ट्य. मानवी जीवनातील दु:खाबरोबरच खास आपल्या अशा जाणीवा ही कविता जोपासते. याच कालखंडातील प्रभा गणोरकरांची कविता ही काव्यानुभवाला मध्यमवर्गीय स्त्रीच्या चौकटीबाहेर नेणारी कविता आहे. आधुनिक स्त्रीचे स्वत्व जपणारी ही कविता 'व्यतीत' (१९७४) आणि 'विवर्त' (१९८५) या संग्रहांमधून प्रकटते. स्त्रीकडे एक माणूस म्हणून पाहताना तिला अस्तित्वाविषयी पडणारे प्रश्न या कवितेत प्रकटतात. अंधाराचा स्वीकार आणि एकटेपणाचे भान हा या कवितेचा खरा गाभा आहे.

दलित कवितेतील नव्या भानाचा प्रवास करणारे नागपूरचे कवी वामन निंबाळकर, यशवंत मनोहर, ज्योती लांजेवार हे होत. गावकुसाबाहेरील दु:ख मराठी कवितेने आजवर का

जाणले नाही असा ज्वलंत प्रश्न वामन निंबाळकर यांची कविता विचारते, 'गावकुसाबाहेरील कविता' (१९७३) आणि 'महायुध्द' (१९८७) ही क्रांतीचा आत्मविश्वास जपणारी कविता वास्तवालाच युद्ध समजून सामोरी जाते. यशवंत मनोहर यांच्या कवितेत आत्मबलाचा उद्दाम उच्चार आहे. या कवितेतील मी ने विराट रूप धारण केले आहे. 'उत्थानगुंफा' (१९७७), 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर-एक चिंतन काव्य'(१९८२), 'मूर्तिभंजन' (१९८५) आणि 'जीवनायन' (२००१) असा या कवितेचा प्रवास आहे. शब्दांचे अवडंबर न माजवता ही कविता जीवनातील जाणिवा व्यक्त करीत राहते, याच काळात घुमसठ अनुभवूनही जगण्याची वाट शोधणारी, मृत्यूचे चिंतन मांडणारी कविता सुधाकर गायधनी यांनी निर्माण केली. 'कब्रीतला समाधिस्थ' (१९७३), 'देवदूत' (१९८१) या प्रवासात कवी वैचारिकतेकडून चिंतनशीलतेपर्यंत पोचलेला आहे. अविनाश वरोकर, यांचे 'अग्निपिसारा' आणि 'रक्तस्पंदन' (२००२) हे दोन महत्त्वाचे कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यांचे बहुचर्चित 'नूरन' हे खंडकाव्य १९६८ साली प्रकाशित झाले आहे. अगदी अलिकडे नागपूरमध्ये कवी दुर्गेश, श्रीपाद गंगाधर कावळे, बाळकृष्ण बन्नोरे, जयंत परांजपे, अनंत अमदाबादकर, दे. शि. दुधलकर, श्रीपाद भालचंद्र जोशी, जोगिंदरकौर महाजन, सुलभा हेर्लेकर, श्रध्दा पराते, मृणाल चिंचाळकर, ज्योती लांजेवार, उत्तरा हुद्दार, इंदुमती गंधे, मालती निमखेडकर अशी नव्या पिढीतील नावे घ्यावी लागतील. दलित कवितेच्या संदर्भात प्रकाश खरात, भाऊ पंचभाई, पसे-नजित ताकसांडे, हृदय चक्रधर, बबन चहांदे, मीना गजभिये, इ. मो. नारनवरे, अनिल ढेंगळे, अमर रामटेके, उल्हास मनोहर यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

समीक्षा, संशोधन आणि वैचारिक वाङ्मय प्रवाह : समीक्षा आणि संशोधन ह्या प्रांतात नागपूरला एक प्रदीर्घ आणि व्यापक अशी परंपरा लाभलेली आहे. इतिहास व संस्कृती क्षेत्रातही अनेक दिग्गज नागपूरला लाभलेले आहेत. वा. दा. ओकांनी १९८९ मध्ये साने यांच्या सहकार्याने 'नागपूरकर भोसल्यांच्या संबंधीचे कागदपत्र'प्रसिध्द केले. अनेक पंडितांनी विविध ज्ञानविस्तार मध्ये नागपूरकर भोसल्यांचा इतिहास लिहिला. नागपूरकर भोसले व वऱ्हाडचा साधार इतिहास लिहिण्याचे श्रेय या. मा. काळे यांना आहे. वा. दा. ओक, य. खु. देशपांडे, वि. भि. कोलते, भवाळकर, नेने यांनी अनेक प्राचीन व महानुभवीय मराठी वाङ्मय संपादित केले. ज्योतिषशास्त्रविषयक संधोधनात के. ल. दप्तरी यांची कामगिरी अतिशय महत्त्वाची आहे. प्रो. बनहट्टी, शं. दा. पेंडसे, भवाळकर, अळेकर, वा. वा. फडणीस, काळी यांचे वैचारिक संशोधनपर कार्य महत्त्वाचे आहे. सदाशिव हरी वाडेगावकर, मल्हारराव चिटणवीस यांनीही ज्योतिषशास्त्रात ग्रंथ निर्मिती केली. महानुभाव साहित्याचे प्रकांडपंडित व व्यासंगी अभ्यासक डॉ. वि. भि. कोलते यांनी प्राचीन कोरीव लेखांच्या संपादनाची परंपरा कायम राखली आहे. कै. ह. ना. नेने, य. खु. देशपांडे, दे. गो. लांडगे, बापूसाहेब उर्फ नी. ब. भवाळकर यांच्या नंतरच्या पिढीत महामहोपाध्याय वा. वि. मिराशी यांचे कार्य महत्त्वाचे होय. त्यांनी सातवाहन, वाकाटक, शिलाहार व कलचुरी राजवंशाचा अभ्यास करून त्यावर नवा प्रकाश टाकला. १९३४ मध्ये विदर्भ संशोधन मंडळाची स्थापना झाल्यानंतर मिराशींच्या प्रेरणेनेच 'नागपूरचा सांस्कृतिक इतिहास' दे. गो. लांडगे यांनी लिहिला.

पुरातत्व इतिहास व संस्कृती क्षेत्रात महामहोपाध्याय वा. वि. मिराशी, दे. गो. लांडगे,

तर महानुभावविषयक वाङ्मय संशोधनात नेने, भवाळकर, य. खु. देशपांडे, वा. ना. देशपांडे, वि. भि. कोलते, सुरेश डोळके, म. रा. जोशी ही नावे महत्त्वाची आहेत. इतिहास संशोधनात अजयमित्र शास्त्री, श्रीपाद चितळे, चंद्रशेखर गुप्त, शरद कोलारकर ही परंपरा सांगता येते. प्राचीन काव्याचे संपादन करणारे अभ्यासक म्हणून श्री. ना. बनहट्टी, ग. त्र्यं. देशपांडे, अ. ना. देशपांडे, वि. बा. प्रभुदेसाई, भा. श्री. परांजपे, श्री. मा. कुलकर्णी, वसंत वऱ्हाडपांडे ही नावे सांगता येतात. श्री. ना. बनहट्टी यांचा रंगभूमीचा इतिहास, अ. ना. देशपांडे यांचे प्राचीन व अर्वाचीन वाङ्मयेतिहासाचे एकखांबी कार्य, भ. श्री. पंडितांनी सातत्याने केलेली आधुनिक कवितेची समीक्षा, कुसुमावती देशपांडे व श्री. मा. कुलकर्णी यांचा कादंबरी अभ्यास, मा. गो. देशमुख यांनी मराठी साहित्यशास्त्राची केलेली मांडणी, सु. बा. कुलकर्णी, वि. बा. प्रभुदेसाई आणि वसंत वऱ्हाडपांडे यांचा भावशास्त्रीय अभ्यास असा फार मोठा व्यापक प्रवास नागपूरच्या साहित्यसमीक्षा व वैचारिक वाङ्मयाने केलेला आहे. जीवनवादी समीक्षा कुसुमावती देशपांडे, शरच्चंद्र मुक्तिबोध, यशवंत मनोहर यांनी लिहिली. साहित्य विचारात सौंदर्यापासून जीवनमूल्यांची फारकत केली तर वैचारिक आपत्ती उद्‌भवते हे कुसुमावती देशपांडे यांनी स्पष्ट केले. 'सृष्टी, सौंदर्य व साहित्यमूल्य' (१९७८) या आपल्या ग्रंथांतून मानवता हेच बदलत्या सामाजिक मूल्यांचे अधिष्टान मानले. शरच्चंद्र मुक्तिबोध आपल्या 'काही निबंध' (१९६३) व 'जीवन आणि साहित्य' (१९७२) या ग्रंथांमधून लेखकाची अनुभूती, सामाजिक मूल्यव्यवस्था यांचा सखोल विचार मांडतात. भा. श्री. परांजपे यांनी आपल्या 'रसज्ञांच्या खुणा' (१९७९) आणि 'मराठी समीक्षेचे आदिपर्व' (१९७१) या ग्रंथामधून समीक्षा आणि संशोधन यांच्या समन्वयावर भर दिलेला आहे. डॉ. वि. भि. कोलते यांच्या 'साहित्यसंचार' (१९६४) यासारख्या ग्रंथात समीक्षा आहेच, पण त्याचबरोबर समकालीनांच्या पुस्तकांना लिहिलेल्या अनेक प्रस्तावनांमधून त्यांची व्यासंगपूर्ण रसिकता स्पष्ट झाली आहे. आस्वादक समीक्षेचे बहुआयामी दर्शन द. भि. कुलकर्णी यांच्या समीक्षेतून घडते. 'ज्ञानेश्वरांचे श्रोतृसंवाद' (१९७५) 'चार शोधनिबंध' (१९७७) यासारखे संशोधन ग्रंथ, 'पहिली परंपरा' (१९७४) 'दुसरी परंपरा' (१९७६) यातील काव्यसमीक्षा, 'नाट्यवेध' (१९७८) ही नाट्यसमीक्षा, 'तिसऱ्यांदा रणांगण' (१९७६), 'पार्थिवतेचे उदयास्त' (१९७७) यासारखी समकालीन साहित्याची मर्मग्राही समीक्षा आणि 'मर्ढेकरांचे सौंदर्य शास्त्र' : 'पुनःस्थापना' (१९८२) व 'महाकाव्य' (१९७५) या प्रबंधातून त्यांनी अलौकिकवादी विचार ठळक केला. म. ना. लोही यांचे 'साहित्य आणि कला' (१९६६) व मनुताई नातू यांची 'विवेकाची गोठी' (१९७७) ही समीक्षा महत्त्वपूर्ण होती. विवेकवादाचे सूत्र धरून नातू यांनी 'समग्र आगरकर वाङ्मयाचे' संपादन केले. यशवंत मनोहर यांनी 'दलित साहित्य : सिध्दान्त आणि स्वरूप' (१९७८), 'दलित साहित्य चिंतन' (१९८८), 'समाज आणि साहित्य समीक्षा', युगसाक्षी साहित्य, (२००१) 'नवे साहित्यशास्त्र' (२००१) बा. सी. मर्ढेकर, यातून लौकिकवादी समीक्षा लिहिली. यशवंत मनोहर यांनी स्वत: काव्य समिक्षा ग्रंथात लेखन केलेच शिवाय साहित्यातील एक मोठी परंपरा उभी करण्याचे काम केले आहे. 'जनसाहित्याच्या दिशेने' (१९८८) हा या. वा. वडस्कर यांचा ग्रंथ आहे. जयंत परांजपे यांनी श्री. ना. पेंडसे यांच्या कादंबरी निर्मितीवर 'श्री. ना. पेंडसे : हस्त लिखित आणि परिष्करणे' (१९८३) या ग्रंथातून प्रकाश टाकला, तर दुर्बोधता हे केंद्र मानून कवी ग्रेस यांच्या कवितेची समीक्षा 'ग्रेस आणि दुर्बोधता' (१९८६)

या ग्रंथात केली. अक्षयकुमार काळे यांची अर्वाचीन कवितेची समीक्षा, वि. स. जोग यांनी मार्क्सवाद आणि मराठी साहित्य यावर टाकलेला प्रकाश, नाट्य क्षेत्राचा अभ्यास करणारे, प्रबंध प्रकाशित करणारे अरुण वेलणकर, शकुंतला खोत, कल्पना परांजपे, स्त्रियांच्या आत्मचरित्राचा अभ्यास मांडणाऱ्या विमल भालेराव, कादंबरी समीक्षा करणारे मदन कुलकर्णी, कवी, भा. रा. तांबे, जे. के. उपाध्ये, पु. भा. भावे असा विशेष लेखकाभ्यासावर भर देणाऱ्या आशा सावदेकर यांनीही समीक्षालेखन केलेले आहे. सु. श्री. पांढरीपांडे यांनी साहित्यातील तात्विक प्रश्नांची चिकित्सा करणारी समीक्षा 'साहित्य : स्वरूप, संदर्भ आणि सौंदर्य' (१९८५) या ग्रंथात लिहिली आहे. आरती कुलकर्णी यांचा दलित स्वकथनाचा अभ्यास, प्रकाश खरात यांचा 'दलितकथा' यावरील अभ्यास, दमयंती पांढरीपांडे यांचा बालकवींचा अभ्यास, वामन निंबाळकर, ज्योती लांजेवार यांनी केलेली दलित साहित्यमीमांसा अशा विविध रूपात आजची समीक्षा प्रकट होत आहे.

वैचारिक लेखनात माडखोलकर, दादा धर्माधिकारी, ब. स. येरकुंटवार, वि. स. जोग, भा. ल. भोळे, यशवंत मनोहर, धनराज डहाट, नागेश चौधरी, मा. गो. वैद्य ही नावे लक्षणीय आहेत. अगदी अलीकडे ताराचंद्र खांडेकर यांनी दलित धर्मांतराची आणि आंबेडकर तत्वज्ञानाची केलेली मीमांसाही महत्वपूर्ण आहे. तर मारोती चिद्‌मपल्ली यांनी निसर्ग अभ्यासातून पक्ष जीवनाचे केलेले निरिक्षण व ग्रंथ लेखन यात विशेष नोंद घ्यावी लागते.

चरित्र आणि आत्मचरित्र : नागपूरच्या जुन्या पिढीत बळवंत हरी पंडित यांनी आपल्या पित्याचे म्हणजे हरी महादेव पंडित यांचे चरित्र 'विविधज्ञान विस्तारात' प्रकाशित केले. 'देशसेवक' मधून श. ल. गोखले, जगदीशचंद्र बोस, जमशेटजी टाटा यांची छोटी चरित्रे लिहिली. भ. श्री. पंडित यांनी केशव शिवराम भवाळकर यांचे आत्मवृत्त संपादित केले. ज. रा. जोशी यांनी ना. भा. खरे यांचे चरित्र लिहिले. अप्रबुध्दांनी अण्णासाहेब पटवर्धन यांचे, तर डॉ. ब. स. येरकुंटवारांनी अप्रबुध्दाचे चरित्र लिहिले. वा. दा. ओक यांनी लिहिलेले लॉर्ड बेकन यांचे चरित्र ही जुन्या पिढीची साहित्यसेवा होय. पालकर यांचे डॉ. हेडगेवार यांचे चरित्र तसेच श्रीमती वीणा हरदास यांचे लोकनायक बापूजी अणे चरित्र ही महत्त्वाची आहेत. बाळकृष्ण शिवराम मुंजे यांचे चरित्र बाळशास्त्री हरदासांनी लिहिले. चक्रधर धरणीधर देशमुख यांनी लिहिलेले 'मेहेरबाबांचे चरित्र' (१९३९), शा. दा. पेंडसे यांचा समर्थचरित्रविषयक निबंध, दादा धर्माधिकारी यांनी लिहिलेले 'गांधी चरित्र' बाळशास्त्री हरदास यांनी लिहिलेले 'भाई परमानंद यांचे चरित्र', पहिले बाजीराव पेशवे यांचे ना. के. बेहेरे यांनी लिहिलेले चरित्र, वि. भि. कोलते यांचा 'भास्करभट्टबोरीकर' हा प्रबंध, 'काही उपकारीमाणसे' यासारखे उषाताई कोलते यांचे पुस्तक हेही चरित्र लेखनाचे नमुने होत. 'सूर्यपुत्र' सारखे चरित्र चिंतन, 'शककर्ते शिवराय' हे द्विखंडात्मक शिवचरित्र व संभाजीचे छोटेखानी चरित्र लिहून विजय देशमुख यांनी ऐतिहासिक व्यक्तींच्या चरित्रमालेत भर टाकलेली आहे. पु. भा. भावे यांचे 'प्रथमपुरुषी एकवचनी', वामन चोरघडे यांचे 'जडणघडण' ही अलीकडची महत्त्वाची आत्मचरित्रे होत. संस्कृत वाङ्मयाचा व्यासंग करणारे श्री. भा. वर्णेकर, के. रा. जोशी. मधुकर आष्टीकर, रुपा कुलकर्णी यांचीही एक वेगळी परंपरा मानावी लागेल. तत्त्वज्ञान क्षेत्रात सुरेंद्र बारलिंगे, प्रा. बखले, उषा गडकरी ही नावे लक्षणीय आहेत. ललित निबंधाच्या क्षेत्रात पु. भा. भावे, कवी ग्रेस उर्फ माणिक गोडघाटे, ना. बा. ठेंगडी, द.

भि. कुलकर्णी, राम शेवाळकर ही नावे महत्त्वाची आहेत. संपूर्ण मराठी शास्त्रीय व्याकरणाची निर्मिती करणारे मोरो केशव दामले हे नागपूरच्या नीलसिटी हायस्कूलचे मुख्याध्यापक होते. बालवाङ्मयात दिनकर देशपांडे, प्रभाकर पुराणिक, शैलजा काळे तर बालरंगभूमीच्या दृष्टीने रंजन दारव्हेकर, संजय पेंडसे ही नावे महत्त्वाची आहेत.

थोडक्यात, नागपूरचा साहित्यविषयक इतिहास हा निरनिराळ्या क्षेत्रात व प्रवाहात भरगच्च कामगिरी करणाऱ्या वाङ्मयसेवकांच्या कार्याने महत्त्वपूर्ण ठरलेला आहे. 'वागीश्वरी', 'विश्ववाणी', 'मुलांचे मासिक', 'सुषमा', 'काव्य कुसुमांजली', 'नीरजोल्लास', 'रसिकोद्यान', 'लोकरंजन' अशा अनेक जुन्या नियतकालिकांचे कार्य आज 'युगवाणी', 'समुचित', 'नवा सुधारक', 'प्रज्ञालोक' आदी नियतकालिक पुढे नेत आहेत.

हिंदी साहित्य

(शास्त्री योगेश्वरी (नागपूर) **भूतपूर्व अध्यक्ष हिंदी विभाग लेडी अमृताबाई** अमा तथा श्रीमती रत्नादेवी पुरोहित महिला महाविद्यालय यांनी या भागाचे लेखन केले आहे.)

महाराष्ट्रात वाङ्मयीनदृष्ट्या नागपूर जिल्ह्याचे स्थान बरेच वरचे आहे. भाषांत येथे मराठी व हिंदी या दोन्ही भाषेत निरंतर साहित्य निर्मिती सातत्याने होत आहे. सन १६३० पासून विसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत या जिल्ह्याने काव्य, कथा, कांदबरी, पत्रकारिता अशा विभिन्न क्षेत्रातील कित्येक विभूतींना जन्म व आश्रय देऊन त्यांची साहित्य-प्रतिभा विकसित केली आहे. आज त्यांचे महत्त्व केवळ विदर्भापुरतेच सीमित राहिले नसून संपूर्ण देशातील हिंदी साहित्य विश्वात ते गौरवास्पद ठरले आहे. लेखनाच्या सोयीच्यादृष्टीने या हिंदी साहित्य विश्वाची भोंसला काळ, रीतीकाळ व आधुनिक काळ अशी तीन भागात विभागणी करणे योग्य ठरेल.

भोंसला काळ

हा काळ संतकवींच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण होता. भोंसले व पेशवे काळात मराठी संत कवींबरोबर हिंदी संतकवीसुध्दा आपली काव्यप्रतिभा विकसित करीत होते. नागपूरात राहून हिंदी काव्यनिर्मिती करणाऱ्या संतकवींमध्ये गोस्वामी मानपुरी यांचे प्रमुख स्थान आहे. (शुक्ल, प्रयागदत्त, **हिंदी साहित्य की विदर्भ को देन,** १९६१, पृ. ३९-४०.) त्यांचे भाषांवर प्रभुत्व होते. 'मानपुरी पदावली' या त्यांच्या ग्रंथात ११२ हिंदी पदे आहेत. ही पदे वंदना, गुरूमहिमा, परमासक्ती, कृष्णलीला, उपदेश व चिंतन या सहा खंडात विषयानुसार विभागलेली आहेत. मानपुरींवर संत कबीरांचा जसा प्रभाव होता तसा संत ज्ञानेश्वरांचाही होता. आयुष्याच्या अखेरीस त्यांनी इ. स. १७३० मध्ये तत्कालीन निजाम राज्यात समाधी घेतली.

देवनाथ महाराज (इ.स. १७५४-१८२१) हे सतत भ्रमण करणारे संतकवी होते. त्यांनी नागपूरात हरिभक्तीचा प्रसार केला. त्यांची भजने गुढार्थक असून त्यावर मराठीचा स्पष्ट प्रभाव जाणवतो. (शुक्ल, प्रयागदत्त, **हिंदी साहित्य की विदर्भ को देन,** १९६१, पृ. ३९, ४०.)

विनयमोहन शर्मा यांनी देवनाथांच्या सुमारे पन्नास हिंदी पदांचे संकलन केले आहे. त्यांच्या पदांवर कबीर, सूरदास, तुलसीदास व मीरा या संतांचा प्रभाव दिसतो. कबीरांप्रमाणे त्यांनीही उलटबांसियाँ लिहिल्या आहेत. त्यात अलंकारिक छटा दृष्टीस पडते.

दयाळनाथ हे देवनाथ महाराजांचे पट्टशिष्य आणि नाथसंप्रदाय परंपरेतील १४ वे आचार्य. ते हिंदी, ब्रज (गुप्त नत्थूलाल, 'विदर्भ क्षेत्रीय हिंदी साहित्य के क्रमिक विकास का अनुशीलन', शोधनिबंध, नागपूर विद्यापीठ, पृ. १९३.) व उर्दू भाषांमध्ये उत्तम कीर्तन करीत. सततच्या भ्रमणामुळे त्यांची हिंदी गीते ठिकठिकाणी विखुरलेली आढळतात. त्यात गोप-गोपीविलाप इत्यादींचे सुंदर वर्णन असते.

चंद्रपूरहून नागपूरास स्थायिक झालेल्या मुकुंदराज यांना भोंसला राजघराण्यांने आश्रय दिला. ते चांगले कीर्तनकार होते. त्यांनी हिंदीपेक्षा मराठीत जास्त पदे लिहिली आहेत. असे असले तरी आतापर्यंत त्यांचे केवळ एक (गुप्त नत्थूलाल, 'विदर्भ क्षेत्रीय हिंदी साहित्य के क्रमिक विकास का अनुशीलन', शोधनिबंध, नागपूर विद्यापीठ, पृ. १९३. हिंदी पद उपलब्ध होऊ शकले ते पुढीलप्रमाणे :

गोकुल की गलियो मे, कान्हा बन्सी बजाये ।
ग्वाल बाल सब ब्रज के बसैया, सब मिल धूम मचाई ॥
सब सखियाँ मिल मंगल गावें, तन की सुथ बिसराई ।
मुकुंद कहे प्रभू छवि बरनू, मन की उनमनि पाई ॥

मुकुंदराजांचे पुत्र कृष्णानंद यांना लोक आदराने दादाजी साधू महाराज म्हणत. ते चांगले कीर्तनकार व उत्कृष्ट गायकही होते. त्यांनी मराठीत अनेक आख्याने लिहिली व त्यात मधुरता आणण्याकरिता हिंदीतील ख्यातनाम संतकवींच्या पदांचा समावेश केला. आख्यानात त्यांनी स्वत: लिहिलेली पदेही काही ठिकाणी आढळतात. त्यांना 'ब्रजविलास' व 'विनयपत्रिका' हे ग्रंथ विशेष प्रिय होते.

छंदशास्त्र व संगीतशास्त्राचे चांगले जाणकार असलेल्या दादाजी साधूंना त्यावेळी नागपूरचे आचार्य मानले जाई. ते आपल्या पदांमध्ये कृष्ण नावाचा वारंवार उपयोग करीत. त्यांचे 'रासक्रिडा आख्यान' प्रसिध्द आहे. (शुक्ल, प्रयागदत्त, पूर्वोक्त, पृ. ५८.)

भोंसला राज्याचा अस्त होण्याच्या काळात रामकृष्णबुवा करतालकर (१८४५-१९०२) नागपूरात येऊन स्थायिक झाले. त्यांची काही हिंदी कीर्तने व आख्याने अद्याप अप्रकाशित आहेत.

गोपालजी हरदास हे नागपूरचे उत्तम कथाकार व कीर्तनकार मानले जात. त्यांच्या मराठी हस्तलिखित पोथीत ६६ चरित्रे संग्रहित आहेत. त्यात काही संतांची चरित्रेही आहेत. त्यांनी मराठीबरोबरच संस्कृत व हिंदी पदेही रचली आहेत. त्यांची 'कबीरकमाल चरित्र' व 'माणकोजी बोधला चरित्र' यांचे वर्णन करणारी पदे उत्कृष्ट आहेत.

रीतीकाळ :

मुघल शासनव्यवस्था व त्यांच्या विलासी, ऐषारामी जीवनपध्दतीमुळे या सत्तेच्या उत्तरार्धात अधिकांश कवी राजाश्रय प्राप्तीच्या हेतुने शृंगारीक वाङ्मय निर्मितीकडे वळले. त्यामुळे रीतीकाळावर या गोष्टीचा फार प्रभाव पडला होता. १६ व्या शतकापासून १९ व्या

शतकापर्यंत एका बाजूस धार्मिक व नीतिप्रद ग्रंथ रचले गेले, तर दुसऱ्या बाजूने इतर भाषेतील साहित्याबरोबरच हिंदीतील शृंगारिक साहित्यकृती निर्माण झाल्या.

हिंदी वाङ्मयात शृंगारीक साहित्य निर्मितीची सुरूवात कवी केशवदास यांनी प्रथम केली. त्यांनी मुलतः साहित्यातील विविध रसांचे शास्त्रीय पध्दती नुसार वर्णन केले. मात्र अशा शृंगारीक ग्रंथनिर्मितीस प्रारंभ त्यांच्यानंतर सुमारे पन्नास वर्षांनी झाला. रीतीग्रंथ किंवा लक्षण ग्रंथांची परंपरा १६ व्या शतकात चिंतामणि त्रिपाठी यांनी निर्माण केली. सुप्रसिध्द कवी भूषण यांचे हे ज्येष्ठ बंधू. हिंदी काव्यक्षेत्रात दैवी परंपरेचा पुरस्कार केल्यामुळे त्यांच्यानंतर हिंदीमध्ये लक्षण ग्रंथांच्या निर्मितीस जोरदार चालना मिळाली. या परंपरेचा प्रभाव नागपूरसहीत महाराष्ट्रावरही झालेला दिसतो. या रीतीग्रंथ किंवा लक्षणग्रंथ परंपरेतील नागपूर जिल्ह्यातील काही प्रमुख कवी व त्यांच्या कार्याचा परिचय पुढीलप्रमाणे :

चिंतामणि त्रिपाठी : काही विद्वानांच्या मते हे नागपूरचे रहिवाशी होते. त्यांच्या संदर्भात शिवसिंह सेंगर यांनी आपल्या 'शिवसिंह सरोज' ग्रंथात पुढीलप्रमाणे लिहिले आहे. हे पुष्कळ दिवस नागपूरला सुर्यवंशी भोंसला मकरंदशाह यांच्याकडे राहिले व त्यांच्याच आज्ञेने 'भाषा पिंगल' नामक मोठा ग्रंथ लिहिला. (शुक्ल, रामचंद्र, **हिंदी साहित्य का इतिहास,** नागरी प्रचारिणी सभा, काशी, सं. ११९७, पृ. २३४.)

मात्र चिंतामणि त्रिपाठी यांनी सदर ग्रंथातील एका पदात म्हटले आहे :-

चिंतामणि कवी को हुक्म कियो साहि मकरंद ।
करौ लछ लछन सहित भाषा पिंगल छंद ॥

यातील साहि मकरंद म्हणजे शिवाजी महाराजांचे वडील शहाजी असून त्यांच्याच आज्ञेने चिंतामणिनी हा ग्रंथ लिहिला हे स्पष्ट होते. नागपूरला मकरंदशाह भोसले अस्तित्वातच नव्हते हे डॉ. कृष्ण दिवाकर यांनी पुराव्यांद्वारे प्रतिपादिले आहे. (कृष्ण, दिवाकर, **हिंदी साहित्य : शोध और समीक्षा,** १९७०, पृ. ३-५.) म्हणून चिंतामणिंनी नागपूरच्या मकरंदशाह भोसलेंच्या आश्रयास राहून 'भाषा पिंगल' ची रचना केली हे मत बरोबर नाही. (प्रभात (संपा.) : **हिंदी के विकास मे महाराष्ट्र का योगदान,** १९८२, पृ. १२.)

लोकमणि मिश्र : भानुदत्त मिश्र विरचित 'रसमंजरी' व 'रसतरंगिणी' या ग्रंथांवर आधारित असलेल्या 'नवरसरंग' या ग्रंथाचे लेखक लोकमणि मिश्र यांना प्रकाशात आणण्याचे श्रेय पंडित प्रयागदत्त शुक्ल यांना आहे. सन १९३५ मध्ये नागपुरचे कै. वा. हीरालाल पंडित यांच्याकडे त्यांना जी बारा हस्तलिखीते सापडली. त्यांच्यात लोकमणि मिश्र यांच्या या ग्रंथाचीही एक प्रत होती. त्यात ते विदर्भातील अलंकापुरीचे रहिवासी होते असे नमूद केले आहे व अलंकापुरी नागपूरचेच एक नाव होते. डॉ. वा. वि. मिराशी, डॉ. वि. भि. कोलते, म. म. दत्तो वामन पोतदार इत्यादींचे सुध्दा हेच मत आहे. (शुक्ल, प्रयागदत्त, पूर्वोक्त, पृ. ९४.)

लोकमणि मिश्र नागपूरचे द्वितीय रघुजी भोंसले (रघुनाथराव) यांचे दरबारी कवी होते. 'नवरसरंग' चे एक हस्तलिखीत या रघुजींचे पूत्र परजोसी यांचे आश्रित कवी सीताराम महापात्र यांनी तयार केले होते. म्हणून या महान कवीला रघुजी भोसल्यांचा आश्रय प्राप्त होता हे अनुमान करता येते.

हा ग्रंथ १२ अध्यायांत विभागलेला आहे. अध्यायांकरिता कवीने 'अंग' शब्दाचा वापर केलेला आहे व प्रत्येक अध्यायाच्या शेवटी त्या अध्यायाचा विषयोल्लेख करणारी पुष्पिका दिली आहे. यात फक्त नवरसांची चर्चा असावी असे ग्रंथाच्या शीर्षकावरून वाटले तरी त्यात त्याव्यतिरिक्त नायिका भेदाची चर्चाही केली आहे. हिंदी रीती वाङ्मयात त्रिपाठींच्या नंतर लोकमणि मिश्र यांच्या नवरसरंगचे स्थान आहे.

हरदेव : द्वितीय रघुजी भोंसले (रघुनाथराव) यांच्या दरबारातील हे एक दुसरे हिंदी कवी. त्यांनी रचलेला 'नायिका-लक्षण' नामक ग्रंथ अद्याप अनुपलब्ध आहे. (प्रभात (संपा.) : पूर्वोक्त, पृ. ५९.) शिवसिंह सेंगर यांनी हरदेवांना रघुनाथराव यांचे दरबारी कवी मानून त्यांचा काळ १७ व्या शतकाचा मध्य-उत्तरार्ध असा दिला आहे. तर डॉ. ग्रियर्सनच्या मते त्यांचा काळ १८ व्या शतकाच्या उत्तरार्धातील अगदी शेवटचा आहे. (कृष्ण, दिवाकर, **भोसला राजदरबार के हिंदी कवी,** नागरी सभा, शोधनिबंध, १९२६-२८, पृ. २७४.)

सीताराम महापात्र : हे सीतलदास या नावानेही ओळखले जात. यांनी लोकमणि मिश्र रचित 'नवरसरंग' ची प्रत तयार केली होती. त्यावरून हे लोकमणिंचे शिष्य होते व दोघांचाही संबंध नागपूरकर भोसल्यांशी असणे स्पष्ट आहे. हरिमोहन मालविय यांनी 'नवरसरंग' च्या प्रस्तावनेत या मताचे खंडण केलेले असले तरी सीताराम महापात्र यांनी आपण केलेल्या प्रतीच्या पुष्पिकेत (ही पुष्पिका कृष्ण दिवाकर यांनी आपल्या **भोंसला राजदरबार के हिंदी कवी** या ग्रंथात पृ. १३९ वर व डॉ. नत्थूलाल गुप्त यांनी आपल्या 'विदर्भ क्षेत्रीय हिंदी साहित्य के क्रमिक विकास का अनुशिलन'या नागपूर विद्यापीठाच्या शोधनिबंधात पृ. १९८ वर दिली आहे.) स्पष्टपणे परसोजी भोंसले यांच्या कारकिर्दीचा उल्लेख केला आहे. यांच्या 'उक्तिविलास' या ग्रंथाच्या पुष्पिकेत ते स्वत: व वडील मोतीराम हे कवी होते असा उल्लेख आहे. 'उक्तिविलास' ग्रंथातील एका दोह्यावरून स्पष्ट होते की, सीताराम महापात्र यांनी हा ग्रंथ नागपूरचे शेवटचे भोंसलावंशी नृपती बाजीराव उर्फ तृतीय रघुजी (१८१८-१८५३) यांच्याकरिता लिहिला होता.

महापात्र यांच्या कविता वऱ्हाडी शैलीमध्ये लिहिलेल्या असून त्यांतील सहजता उठून दिसते. 'उक्तिविलास' च्या प्रथम व द्वितीय व प्रसंगात क्रमश: १२५ व १०३ दोहे व सोरठे आहेत. त्यात वक्रोक्ति, अन्योक्ती, व्याधी, कणोक्ती, विशेषोक्ती, सहोक्ती, युक्तायुक्त इत्यादी अलंकारांची परिभाषा दिली आहे. तृतीय प्रसंगात १०२ दोहे व सोरठे असून त्याचे 'शृंगार प्रसंग' हे शिर्षक आहे. ब्रजभाषा, त्यातील म्हणी व बोली-चालीतील माधुर्य कवीने साफल्यपूर्वक अंकित केले आहे. करुण, अद्‌भूत, शांत असे विभिन्न रस

त्यांच्या काव्यात अनुभवता येतात. 'उक्तिविलासमध्ये' निती, भक्ती व शृंगार यांचा त्रिवेणी संगम साधलेला आहे. शृंगार प्रसंगाच्या शेवटी 'इदम् ग्रन्थं समाप्तम्' असे लिहिले आहे. यामुळे हा ग्रंथ अपूर्ण आहे हे प्रयागदत्त शुक्ल यांचे मत चुकीचे वाटते. शुक्ल यांनी आपल्या लेखामार्फत या ग्रंथाकडे विद्वानांचे लक्ष वेधले व त्यानंतर कृष्ण दिवाकर यांनी या ग्रंथाचे संपादन केले. जगदीश गुप्त यांच्या मतानुसार हा रीतीकालाच्या शेवटच्या ग्रंथांपैकी एक असून मुक्त शैलीतील रचनेचे हे उत्तम उदाहरण आहे. महापात्र इ.स. १८६५ मध्ये कैलासवासी झाले.

जगन्नाथप्रसाद भानू : हे प्राचीन परंपरेचे आधुनिक काळातील कवी असून त्यांना रीतीकाळातील कवींमध्ये स्थान आहे. हे विदर्भातील आचार्य कवी मानले जातात. रीती परंपरा व संस्कृत काव्यशास्त्रीय परंपरेला अनुसरुन त्यांनी छंद विशेषणयुक्त काव्यरचना केली. (गुप्त, नत्थूलाल, पूर्वोक्त, पृ. २१०.) छंदशास्त्रात त्यांच्या कवित्वाचा विकास झाला. रीती परंपरेस अनुसरुन भानूजींनी लक्षणग्रंथांची रचना केली. काव्यसर्मज्ञ व प्राचीन परंपरेचे कवी असूनसुध्दा त्यांनी २० व्या शतकाच्या कवींना प्रेरणा दिली. त्यांच्या 'काव्यप्रभाकर' या सर्वंकष ग्रंथाव्यतिरिक्त काव्यशास्त्राच्या विविध अंगांवर त्यांच्या 'अलंकार प्रश्नोत्तरी', 'नायिकाभेद शेकावली', 'काव्यप्रबंध', 'रसरत्नाकर', 'छन्दप्रभाकर' व 'छन्द सारावली' या साहित्यकृती उपलब्ध आहेत. यापैकी बहुतांश ग्रंथांना सुप्रसिध्द संस्कृत कवी भामह यांच्या काव्यालंकार ग्रंथाचा आधार आहे. त्यामुळे डॉ. भगीरथ मिश्रांच्या मते या ग्रंथांना रीतीशास्त्र ग्रंथांऐवजी काव्यशास्त्राचे ग्रंथ म्हणणे जास्त उपयुक्त आहे. (मिश्र, भगीरथ, **हिन्दी रीती साहित्य,** पृ. १०२.)

भानुजी 'रामचरितमानस' चे विशेष अभ्यासक असून त्याविषयी त्यांच्या अनेक साहित्यकृती प्रसिध्द आहेत. त्यात 'श्री तुलसीतत्वप्रकाश', 'श्री तुलसीभावप्रकाश', 'रामायण वर्णावली', 'नवपंचामृत रामायण', 'रामायण प्रश्नोत्तरी' इत्यादींचा उल्लेख करता येईल. याव्यतिरिक्त 'कालविज्ञान', 'श्री कालप्रबोध' आणि 'अंकविज्ञान' सारखी ज्योतिष व गणितविषयक पांडित्यपूर्ण पुस्तकेही लिहिली.

काव्यशास्त्रीय परंपरेच्या विकासात भानुजींचे योगदान, ऐतिहासिक महत्त्वाचे आहे. त्यांच्या कृतींनी अनेक तत्कालीन उदयोन्मुख कवींना मार्ग सापडला. ते उर्दू शायरही होते. उर्दू वाङ्मयात ते फैज या नावाने प्रसिध्द होते. यात त्यांच्या 'गुलजारे सखुन', 'गुलजारे पैज', 'तूम ही तो हो' इत्यादी रचना उपलब्ध आहेत. त्याशिवाय 'जयहरि चालीसा' व 'शीतलामाता भजनावली' याही त्यांच्याच रचना आहेत.

भानुजींचे वडील बक्षीराम हे सुध्दा कवी होते. सरकारी नोकरीत असताना त्यांनी काव्यशास्त्राव्यतिरिक्त गणित आदी विषयांवर अनेक पुस्तके लिहिली. हिन्दी साहित्यसेवेबद्दल त्यांना 'महामहोपाध्याय' व 'साहित्यवाचस्पती' सारख्या पदव्यांनी गौरवांकित करण्यात आले होते. ऑक्टोबर १९४५ मध्ये त्यांचा मृत्यू झाला.

अशारीतीने काही उणीवा असल्या, तरी नागपूरच्या रीतीकाळातील कवींची देणगी उपेक्षणीय नाही. नागपूरचे हे कवी रीती परंपरेची गौरवस्थाने आहेत.

अनुक्रमणिका

आधुनिक काळ

आचार्य रामचंद्र शुक्ल याच्या मते हिंदी साहित्याचा आधुनिक काळ सुमारे इ.स. १८४० पासून सुरू होतो. यास भारतेंदु युग असे म्हणतात. या युगापासून हिन्दी साहित्य विश्वात क्रांतिकारी परिवर्तने झाली. म्हणून भारतेंदु हरिश्चंद्र यांना या युगाचे अग्रदूत मानले जाते. पाश्चात्य शिक्षण पध्दतीच्या दुष्परिणामांच्या विरोधात स्वामी दयानंद सरस्वती यांनी स्थापन केलेल्या आर्यसमाजाचे योगदान फार महत्त्वपूर्ण होते. या संस्थेने हिन्दी भाषेला राष्ट्रभाषा मानून हिन्दीचा खूप प्रचार केला. हिन्दीच्या अभ्यासाबद्दल जनमानसात आवड निर्माण केली ही स्वामी दयानंदाची राष्ट्रासाठी फार मोठी देणगी मानली जाते. वैविध्याच्यादृष्टीने आधुनिक काल काही उत्थानात विभागता येतो.

प्रथम उत्थान : हिन्दी वाङ्मयाच्या आधुनिक काळाची सुरूवात भारतेंदु हरिश्चंद्र यांच्यापासून होते. त्यांनी आपल्या 'हिन्दी भाषा शीर्षक' ग्रंथात हिन्दीच्या बारा शैलींची उदाहरणे दिली आहेत. हिन्दीच्या विविध शैलींशी परिचित असल्यामुळे त्यांनी त्या सर्वांचे एकत्रिकरण केले. याच काळात हिन्दी-उर्दूचा वाद सुरू झाला. नागपूर यापासून अलग राहू शकले नाही.

या काळात पंडित शिवदयाळ शुक्ल, पं. शिवचरणलाल शर्मा व बाबू जगन्नाथप्रसाद उर्फ भानू हे नागपूरच्या तत्कालीन कवींमध्ये प्रमुख होते. (ब्योहार, राजेंद्रसिंह, **नक्षत्र,** १९४७, पृ. १०.) स्वामी दयानंदांच्या आर्यसमाजाच्या कार्याने प्रभावित होऊन या तिघांनी नागपूरमध्ये इ.स. १८८७ साली 'गोरक्षण सभे'ची स्थापना केली. संस्थेने गोरक्षण प्रचाराकरिता अनेक लहान-मोठी पुस्तके हिन्दी गद्य-पद्य शैलीत प्रसिध्द केली. सभेच्या वार्षिक संमेलनात भाग घेण्यासाठी वाराणसी, प्रयाग, दिल्ली, पाटना, कलकत्ता, लाहोर, पुणे, मुंबई, हैदराबाद, मद्रास इत्यादी ठिकाणांचे प्रतिनिधी येत हे विशेष. ही संस्था पंडित शिवदयाळ शुक्ल व पंडित शिवचरण शर्मा यांच्या संपादनाखाली हिन्दी व मराठी भाषेत एक पाक्षिक चालवित असे. रीतीने हिन्दीच्या प्रचार-प्रसाराकरिता गोरक्षण सभा व आर्यसमाजाने फार महत्त्वाची कामगिरी केली आहे. प्रथम उत्थान काळातील काही साहित्यिक व त्यांच्या कार्याचा परामर्श पुढीलप्रमाणे घेता येईल.

सावनेरचे रायबहादूर राघोबा पालिया हे हिन्दी साहित्यिक होते. त्यांचे पुत्र शुकदेव प्रसाद पालिया यांनी सन १९७७ मध्ये दशरथ शास्त्रींचा 'कृषीशासन' हा हिन्दी ग्रंथ प्रकाशित केला. भारतीय पुरातन कृषिशास्त्रावरील हा फार महत्त्वाचा ग्रंथ आहे. हा ग्रंथ अकरा अध्यायात विभागलेला आहे. याच काळातील कवी छत्रसाल तिवारी हे रायबहादूर राघोबा पालियांकडे रहात. त्यांचा एक काव्यसंग्रह पालियांकडे उपलब्ध आहे.

रामनारायण त्रिपाठी हे सीताबर्डीचे सावकार. मारवाडी समाजाच्या उध्दाराकरिता त्यांनी 'मारवाडी' नावाचे साप्ताहिक काढले. द्विवेदी युगात या साप्ताहिकाने अनेक लेखकांना प्रोत्साहन दिले. प्रयागस्थ हिन्दी साहित्य संमेलनाच्या स्थायी समितीचे ते सदस्य होते.

भगिरथ प्रसाद हे नागपूरचे रहिवासी असून त्यांचे हिन्दी साहित्य, समाज सुधारणेस वाहिलेले आहे. इ. स. १८९४ मध्ये ते प्रकाशित करण्यात आले. त्यात स्त्री शिक्षण व विधवाविवाहाचे समर्थन केले आहे.

अनुक्रमणिका

माधवराव सप्रे यांनी सन १९०६ मध्ये 'हिन्दी ग्रंथ प्रकाशन मंडळी' नामक संस्थेची स्थापना केली. या संस्थेने सप्रेंच्याच संचालनाखाली सर्वप्रथम अनेक हिन्दी निबंधांचे प्रकाशन केले. सन १९०८ मध्ये सप्रेंनी 'हिन्दी केसरी' ही पत्रिका सुरू केली. १२ सप्टेंबर १९०७ मध्ये त्यात 'हिन्दी की प्रतिष्ठा' हा शीर्षक लेख प्रकाशित झाला.

कविवर्य ज्ञारसराम शर्मा (कामठी) यांची गणना भारतेंदु युगातील संस्कृत व हिन्दीच्या विद्वानांमध्ये केली जाते. हे लेखक, वक्ता, संपादक व वैद्य होते. त्यांनी इ.स. १८९३ मध्ये कामठीहून 'मित्र' नामक पाक्षिक सुरू केले ते तीन वर्षे चालू राहिले. केशवभट्ट विरचित 'वृत्त रत्नाकर' या संस्कृत छंद ग्रंथावर त्यांनी 'सुबोधिनी' हा टिकाग्रंथ लिहिला. हा ग्रंथ मुंबई येथील व्यंकटेश मुद्रणालयाद्वारे प्रकाशित झाला. आयुर्वेदावर त्यांनी हिन्दीमध्ये 'अमृत सागर' हा ग्रंथ लिहिला.

गंगाप्रसाद अग्निहोत्री यांनी बाबू जगन्नाथप्रसाद उर्फ भानू यांच्याबरोबर इ. स. १८९८ मध्ये 'निबंधमालादर्श' या ग्रंथाचा हिन्दी अनुवाद केला. त्यांची प्रतिभा भारतेंदु युगात पल्लवीत होऊन द्विवेदी युगात विकसित झाली. निबंधाव्यतिरिक्त त्यांनी कालिदास, भवभूति, बाणभट्ट, सुबंधू व दण्डी यांची चरित्रे 'कविपंच' या पुस्तकात लिहिली. 'नागरी प्रचारिणी' प्रत्रिकेच्या प्रथम अंकात त्यांचा 'समालोचना' नावाचा प्रबंध प्रसिध्द झाला. ते हिन्दी समिक्षा सिध्दातांचे सूत्रकर्ते सुध्दा होते. अग्निहोत्रींच्या काव्यात ब्रज भाषा व खडी बोली यांचे मिश्रण दिसून येते. कालीदास, भवभूति, प्रणयी माधव, रसवाटिका, मेघदूत, राष्ट्रभाषा व जॉनसन यांचे जीवन इत्यादी ग्रंथांचा त्यांनी हिन्दी अनुवाद केला आहे.

द्वितीय उत्थान : सन १९०० ते १९२५ हा कालखंड द्विवेदी युग म्हणून संबोधला जातो. वास्तविक पाहता भारतेंदु युगाच्या उत्तरार्धात वाङ्मयीन क्षेत्रात काही आदर्शांची निर्मिती झाली. वैचारिक क्षेत्रात क्रांतिकारी बदल झाले. याच काळातील पंडित महावीर प्रसाद द्विवेदी यांचे योगदान लक्षात घेऊन हा कालखंड द्विवेदी युग म्हणून ओळखला जातो. द्विवेदींनी नागपूर येथे रेल्वेत नोकरी करीत असतांना 'सरस्वती' या नावाची हिन्दी पत्रिका काढली. त्यांच्यावर चिपळूणकर यांच्या निबंधमालेचा प्रभाव पडलेला दिसतो. (शुक्ल, प्रयागदत्त, पूर्वोक्त, पृ. १२०.) द्विवेदी यांनी जाणीवपूर्वक केलेल्या प्रयत्नांमधून 'सरस्वती' पत्रिकेच्या माध्यमातून खडी बोली प्रचलित झाली. या काळात काव्य केवळ मनोरंजन किंवा पांडित्य प्रदर्शनाचे साधन राहिले नाही, तर राष्ट्रीय उत्थानाचे एक माध्यम बनले हाते. याबाबत मैथीलीशरण गुप्त लिहितात--

केवल मनोरंजनही न कवि कर्म होना चाहिए ।
उसमें कुछ उपदेश का भी मर्म होना चाहिए ॥

याच काळात काव्यापेक्षा त्यातील विषयाला जास्त प्राधान्य मिळाले. खडी बोलीच्या माध्यमातून हिन्दी कवितेचा विकास झाला. तत्कालीन राष्ट्रीय जनजागरण मोहिमेचा एक भाग म्हणून नैतिकतेचा पुरस्कार, अस्पृश्योद्धार, विदेशीचा बहिष्कार, स्वदेशी आंदोलन इत्यादी बाबी या काळाचे वैशिष्ट्ये ठरले. त्यांच्या प्रभावापासून हिन्दी काव्य अलिप्त राहणे शक्य नव्हते. नागपूर परिसरातील विविध पत्र-पत्रिकांनी या काळात मोलाचे योगदान दिले आहे.

तृतीय उत्थान : हिन्दी वाङ्मयाच्या या तिसऱ्या टप्प्यात सन १९१६ च्या सुमारास प्रारंभ होतो. 'छायावाद' या नावाने हा काळ ओळखला जातो. आधुनिक काव्याच्या नव्या वळणाचे हे सूचक होते. द्विवेदी युगाच्या इतिवृतात्मकतेचा विरोध, काव्यातील सौंदर्याचे आकर्षण तथा काव्याचे विषय व्यक्तिप्रधानता ही या युगाची ठळक वैशिष्ट्ये होती.

चतुर्थ उत्थान : हे साधारणत: सन १९३६ मध्ये सुरू झाले. यास 'छायावादोत्तरकाळ' म्हणून ओळखले जाते. या काळाच्या केंद्रस्थानी प्रेमचंद हे होते. नागपूरातील अन्य प्रगतिशील दृष्टीच्या कवींमध्ये कमलाकांत पाठक, इंद्रपालसिंह, आझाद शाहू, ताराचंद जैन, हिरालाल जायस्वाल उर्फ हिरा यांचा उल्लेख करावा लागेल.

पंचम उत्थान : आधुनिक काळाचे पंचम उत्थान म्हणजे 'प्रयोगवाद' होय. याची सुरूवात सन १९४३ मध्ये 'तारसप्तक' या संग्रहाच्या प्रकाशनाने झाली. प्रयोगवाद हे हिन्दी काव्यधारेची नवीनतम संकल्पना असल्यामुळे याला नवी कविता या नावाने ओळखले जाते. काही विद्वान नवी कविता व प्रयोगवाद यांना भिन्न मानतात. असे असले तरी यामध्ये कोणताही भेद दाखविता येत नाही. सामाजिक संदर्भ लाभल्यामुळे नवी कविता थोडी क्लिष्ट बनली आहे. सत्याची अभिव्यंजना हे या कवितेचे उद्दिष्ट होते. नागपूरात या काव्यधारेच्या कवींमध्ये गजानन माधव मुक्तिबोध, रामकृष्ण श्रीवास्तव, भारती चौरसिया, मधुप पांडे ही नावे उल्लेखनीय आहेत. विदर्भात या काळी नवगीतांचीही परंपरा सुरू असल्याचे आढळते. मधुप पांडे व नरेंद्र पुरोहित हे या परंपरेतीलच होत.

आधुनिक युग विविधांगी आहे. नागपूरच्या साहित्यिकांनी हिंदीच्या विविध साहित्य शाखांना समृध्द केले आहे. हे साहित्यिक चतुर्थ उत्थानापासून आजपर्यंतचे आहेत. या काळात नागपूरात काव्याच्या क्षेत्रात गद्य काव्य, मुक्त काव्य, हास्यव्यंग काव्य, गीत व लोकगीत, गद्यसाहित्यात कादंबरी, कथा, नाटके, एकांकिका, आकाशवाणीवरील नाटके, निबंध, आलोचना, रेखाचित्रे, अहवाल, संस्मरणे, जीवनी इत्यादी वाङ्मयाबरोबर गौरवग्रंथ, प्रवासवर्णने, बालसाहित्य, अनुवादित साहित्य व पत्रकारिता इत्यादींचा विकास झाला. पुष्कळ साहित्यिकांनी एकात्मिक प्रकारचे लेखन केले आहे.

विसाव्या शतकाच्या प्रथम दशकात नागपूरहून 'हिन्दी-केसरी' (साप्ताहिक) व 'आर्यसेवक' (मासिक) सारख्या पत्रांचे प्रकाशन सुरू झाले होते. या पत्रांमुळे मराठी भाषा क्षेत्रात हिन्दी लेखकांना संधी मिळाली. काही मराठी भाषिक लेखकांनी हिन्दी साहित्य क्षेत्रात हिन्दी वाङ्मंयाच्या इतिहासाच्या दृष्टीने भरीव काम केलेले आहे हे नमूद करण्यासारखे आहे. यात अनंत गोपाल शेवडे, गजानन माधव मुक्तिबोध, प्रभाकर माचवे व शंकरशेष यांचे नाव गौरवाने घ्यावे लागते. या काळातील महत्त्वाचे साहित्यिक व त्यांच्या कार्याचा परिचय खालीलप्रमाणे--

पंडित गोवर्धन शर्मा छांगाणी : आयुर्वेद, ज्योतिष आणि काव्यक्षेत्रातील प्रतिभावंत विद्वान असलेले छांगाणी द्विवेदी युगाचे सामर्थ्यवान लेखक व कवी होते. आपला 'भास्कराचार्य की जन्मभूमी' हा शोधनिबंध त्यांनी 'सरस्वती' मासिकात प्रकाशित केला होता. त्यांचे अधिकांश काव्य खडी बोलीत असून ते समाज सुधारणेशी संबंधित होते. याचे हे

एक उदाहरण :

कर्तव्य को निज भूलकर, हम सो रहे है इन दिनों ।
इस समाज रवारव अमूल्य को, हम खो रहे है इन दिनों ॥

(शुक्ल, प्रयागदत्त, पूर्वोक्त, पृ. १५१.)

या काळी अनेक कवी खडीबोलीबरोबर ब्रजभाषेतही काव्य करीत होते. छांगाणींनी ब्रजभाषेत अनेक समस्यापूर्ती केल्या. त्यात भाषा सौंदर्य, प्रवाहीपणा व लालित्य दृगोच्चर होते. नागपूरच्या 'रसिक मित्र' पत्रिकेत त्यांचे समस्यापूर्ती सदर सतत प्रसिध्द होत होते. ते 'गिरीराज' या नावाने लिहीत. द्विवेदींच्या साहित्यिक आदर्शवादाचे कट्टर समर्थक असलेल्या छांगणींना काव्याच्या क्षेत्रातील रस व अलंकार याची जाणीव होती. डिंगल व पिंगल या दोन्ही क्षेत्रात त्यांच्या काही रचना आढळतात.

पंडित जगन्नाथप्रसाद शुक्ल : सन १९०१ मध्ये हे 'प्रयाग-समाचार' पत्राचे संपादक झाले. पं. महावीरप्रसाद द्विवेदी हे 'सरस्वती' मासिकाचे संपादक असतांना पं. कामताप्रसाद गुरु व पं. श्रीधर पाठक यांच्यामध्ये खडी बोलीबद्दल असलेला विवाद 'प्रयाग-समाचार' मधूनच उजेडात आला होता व शुक्लांच्या मध्यस्थीने संपुष्टातही आला होता. सन १९०३ मध्ये शुक्ल 'व्यंकटेश्वर' साप्ताहिकाचे संपादक म्हणून मुंबईस गेले व तेथे त्यांचे 'नीतीकुसूम' हे पुस्तक प्रसिध्द झाले. सन १९०७ मध्ये पं. माधवराव सप्रे यांच्या आग्रहाने ते 'केसरी' चे प्रमुख संपादक झाले. नागपूरात असतांना त्यांची 'नीतिसौंदर्य', 'नीतिकुसूम', 'आदर्श बालिका' व 'हमारा सुख क्या हो गया' ? इत्यादी पुस्तके प्रसिध्द झाली.

पंडित प्यारेलाल मिश्र : यांचे विविध लेख वेळोवेळी 'सरस्वती' मासिकामध्ये प्रसिध्द झाले. 'भारतमित्र' पत्राचे हे संपादक होते. विदेशातून परतल्यावर त्यांनी 'विलायती समाचारपत्रोंका इतिहास' नावाचा ग्रंथ लिहिला. 'दत्तक विधान कानून' हे त्यांचे हिन्दी अनुवादित पुस्तक उत्कृष्ट आहे.

पंडित प्रयागदत्त शुक्ल : हे हिन्दीतील प्रतिभावंत साहित्यिक, इतिहासतज्ञ, पुरातत्ववेत्ते, हस्तलिखितांचे संग्राहक व संपादक तसेच उत्तम पत्रकार होते. हिन्दी साहित्य क्षेत्रातील त्यांचे कार्य संस्मरणीय ठरते. विदर्भ हिन्दी साहित्य संमेलनाचे आधारस्तंभ असलेल्या शुक्लांची साहित्य-यात्रा सन १९१८ पासून सुरू झाली. सन १९१९ मध्ये ते 'संकल्प' साप्ताहिकाचे संपादक झाले व त्याचवर्षी 'नागपूरके भोंसले' हा ग्रंथ लिहिला. त्यांचे अनेक लेख 'सरस्वती' मासिकात प्रसिध्द झाले आहेत. सन १९२६ मध्ये रायबहादूर हिरालाल यांच्या सोबत त्यांनी हिन्दी दर्शनिकेचे कार्य केले. व याच संदर्भात 'नागपूर नेत्र', 'भण्डाराभ्रमर', 'हुशंगाबाद-हुंकार' व 'मध्यप्रांत-मरीचिका' ही पुस्तके लिहिण्यास रायबहादूर यांना सहकार्य केले. सन १९४०-४१ मध्ये 'वर्णाश्रम स्वराज्य संघ' या संस्थेद्वारा संचालित 'धर्मवीर' साप्ताहिकाचे ते संपादक झाले. 'मानवता' (अकोला) व 'प्रारब्ध' (नागपूर) या मासिकांचेही ते संपादक होते. त्यांच्या लेखनातून अमर्याद ज्ञान लालसा व सरल भाषा अनुभवास येते. त्यांची 'भोंसलोंकी उत्पत्ति', 'मध्यप्रदेश का इतिहास', 'सातपुडा की सभ्यता', 'हिन्दी साहित्य को विदर्भ की देन' आदी अनेक पुस्तके प्रसिध्द आहेत.

अनंतगोपाल शेवडे : २० व्या शतकाच्या तिसऱ्या व चौथ्या दशकात कथा वाङ्मय क्षेत्रात क्रांतीची सुरूवात झाली होती. या दशकांमध्ये भगवतीचरण वर्मा यांची 'चित्रलेखा', जैनेंद्रकुमार यांची 'सुनिता' व 'त्यागपत्र' आणि उपन्यास सम्राट प्रेमचंद यांची 'गोदान' इत्यादी कादंबऱ्या प्रसिध्द झाल्या होत्या.

याच काळात शेवडे यांनी 'भिखारीन तथा अन्य प्रारंभिक कहानियाँ' (१९२८), 'ईसाईबाला' (१९३२) व 'सन्दूक का मालिक' (१९३३) ही पुस्तके प्रसिध्द करून हिन्दी वाङ्मय क्षेत्रात पदार्पण केले. ते 'नागपूर टाईम्स' या इंग्रजी दैनिकाचे प्रबंध संपादक व हे प्रसिध्द करणाऱ्या 'नवसमाज लिमिटेड' संस्थेचे महाप्रबंधक होते. शेवडे यांना प्रेमचंदयुगीन गांधीवादी कादंबरीकार व कथाकार मानले जाते. त्यांचा पहिला हिंदी लेख अलाहाबादच्या 'बालसखा' नामक मासिकात १९२५ मध्ये प्रसिध्द झाला. 'कर्मवीर' या पत्रातही ते लिहीत असत. माखनलाल चतुर्वेदींच्या प्रेरणेने त्यांनी कथा व कांदबरी विश्वात प्रवेश केला. मुंशी प्रेमचंद यांनी शेवडेंच्या कथा 'हंस' मासिकात प्रसिध्द केल्या. भारत छोडो आंदोलनात तीन वर्षे तुरुंगात राहून त्यांनी 'पूर्णिमा', 'मृगजल' व 'निश्मगीत' या कादंबऱ्या तुरुंगातच लिहिल्या. त्यांच्या दहा कादंबऱ्या, तीन कथासंग्रह व 'तीसरी भूख नामक' ललित निबंधसंग्रह या रचना प्रसिध्द झालेल्या आहेत. (शुक्ल, प्रयागदत्त, पूर्वोक्त, पृ. १४४.) साहित्य क्षेत्रात शेवडे हे प्रेमचंद युगाचे महत्त्वपूर्ण घटक असून त्यांच्या सर्व कथा व कादंबऱ्या देशभक्तीची प्रेरणा देणाऱ्या आहेत. त्यांना हिन्दी साहित्य सेवेच्या गौरवार्थ राष्ट्रभाषा प्रचार समितीने (वर्धा) अखिल भारतीय महात्मा गांधी पुरस्कार प्रदान केला आहे. 'ज्वालामुखी' कादंबरीसाठी साहित्य अकादमीने त्यांना दिलेला पुरस्कार विशेष उल्लेखनीय आहे.

यमुनाताई शेवडे : अनंतगोपाळ शेवडेंच्या या धर्मपत्नी असून त्यांनी काही हिन्दी कांदबऱ्यांचा मराठी व मराठी कादंबऱ्यांचा हिन्दी अनुवाद केला आहे. त्यात त्यांच्या स्वतःच्या 'जीवनसंगीत' या कादंबरीच्या हिंदी अनुवादाचा समावेश आहे.

भवानीशंकर श्रीधर पंडित : हे मराठी भाषेतील विद्वान म्हणून परिचित असले तरी त्यांनी मराठी व हिन्दी अशा दोन्ही भाषेत अनुवादाचे महनीय कार्य केले आहे. कवी केशवसूत व विनायक यांच्याही अनेक कवितांचा हिन्दी अनुवाद केला आहे.

रघुनाथ भगाडे : यांनी सन १९१५ मध्ये 'ज्ञानेश्वरीचा' हिन्दी अनुवाद केला. हा अनुवाद हिन्दी साहित्य विश्वात फार लोकप्रिय असल्यामुळे याच्या १९२५ व १९५५ या वर्षी दोन आवृत्त्या प्रकाशित झाल्या.

कमलाकान्त पाठक : हे प्रतिष्ठीत निबंधकार, समिक्षक व कवी म्हणून प्रसिध्द आहेत. 'फुल और पत्ते' या काव्यसंग्रहात त्यांच्या १९३६ पासून १९५५ पर्यंतच्या ४१ रचना संकलित आहेत. हे संकलन आशय व रचना या दोन्ही दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण आहे. सुप्रसिध्द आलोचक आचार्य नन्ददुलारे वाजपेयी यांनी या संग्रहाच्या प्रवेशिकेत या गोष्टींची प्रशंसा केली आहे. पाठक यांचे याव्यतिरिक्त नाटक, निबंध व अनेक लेख प्रसिध्द झाले आहेत. 'संगम' हे त्यांचे तीन अंकी नाटक, तर 'मैथिलीशरण गुप्त', 'व्यक्ति और काव्य' हा प्रमुख

ग्रंथ आणि 'रचना और आलोचना' हा शोधनिबंध प्रसिध्द आहे.

दिनेश नंदिनी डालमिया : यांनी वडिलांच्या प्रेरणेने गद्य व पद्य या दोन्ही वाङ्मय प्रकारात रचना केल्या आहेत. पद्य रचनेत त्यांना फारसे साफल्य मिळाले नाही. त्यांची 'शबनम', 'मौक्तिकमाला', 'शरदिया', 'दुपहरिया', 'उरबाती' वगैरे पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. त्यात निसर्गदर्शन व व्यक्तिदर्शनाचा प्रत्यय येतो.

भदन्त आनंद कौशल्यायन : हे महनीय बौध्द भिक्षु पाली वाङ्मयाबरोबरच हिन्दी वाङ्मयास समर्पित झालेले व्यक्तिमत्व होते. त्यांनी निबंध, संस्मरणे, रेखाचित्रे, बालसाहित्य इत्यादी क्षेत्रात तसेच अनुवादित साहित्यात फार मोठी भर टाकली. अनेक विद्वानांनी यांची संस्मरणे व रेखाचित्रांना व्यक्तिवादी निबंधांच्या श्रेणीत ठेवले आहे. (शुक्ल, प्रयागदत्त, पूर्वोक्त, पृ. १५१.) डॉ. वृश्वंशलाल यांनी त्यांच्या निबंधांना रेखाचित्र मानले आहे. यांची आत्मपुरक व संस्मरणात्मक निबंधाची संकलने प्रसिध्द झालेली आहेत. 'तुलसी के तीन पात' व्यतिरिक्त यांचे सर्व निबंधसंग्रह संस्मरण व रेखाचित्रप्रधान आहेत. यात 'जो भूल न सका', 'जो लिखना पडा', 'रेल का टिकट' व 'बहानेबाजी' हे विशेष उल्लेखनीय आहेत. पर्यटक असल्यामुळे त्यांनी आपल्या विशाल अनुभव भांडाराचा आधार घेऊन अनेक वस्तुस्थळे, व्यक्ती व घटना यांची सुंदर रेखाचित्रे प्रसिध्द केली आहेत. 'राहुलजी रुस को' व 'बापू बम्बई की ओर' सारखे महत्वपूर्ण ऐतिहासिक लेखही प्रसिध्द आहेत. 'राम की कहानी', 'राम की जुबानी', 'यदि बाबा न होते', 'बौध्दधर्म : एक बुध्दिवादी समिक्षा', 'राहूल सांकृत्यायन' व 'श्री लंका' या त्यांच्या काही इतर रचना. त्यांच्या निबंधात प्रगतिवादी व सुधारणावादी दृष्टिकोन आढळतो. संस्मरणांमध्ये त्यांनी बाह्याडंबर, शोषण, जातिदंभ इत्यादीचे चित्रण मार्मिक शैलीत केले आहे.

अनुवादाच्या माध्यमातूनही त्यांनी हिन्दी साहित्यसेवेत अपूर्व वृध्दी केली आहे. 'अंगुतरनिकाय' (चार खंड), 'जातक', 'कलामासूक्त', 'महावंश', 'आगमशास्त्र', 'सच्चसंग्रही', 'बुध्दवचन' आणि 'मालिमौग्गलाल व्याकरण' या पाली भाषेतील त्यांच्या प्रमुख हिन्दी अनुवादकृती आहेत. याशिवाय 'ट्वेंटी फिप्त अवर' (Twenty fifth hour) या मूळ फ्रेंच कादंबरीच्या वर्जित जारगो यांनी केलेल्या इंग्रजी अनुवादाचे 'पच्चीसवा घण्टा' या नावाने हिन्दी रुपांतर, न्यूयॉर्कच्या रॉबर्टग्रीन इंगरसालचे लेख व भाषणे यांचे 'स्वतंत्रचिंतन' व 'धर्म के नाम पर' या शीर्षकाने हिन्दी रुपांतर, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सुप्रसिध्द ग्रंथांचा 'अछूत कौन और कैसे' व 'भगवान बुध्द और उनका धर्म' या नावाने हिन्दी अनुवाद केला आहे. 'स्वामी कृष्णानंद सोख्ता' : उर्दू शैलीच्या मुक्तककारांमध्ये नागपूरच्या या प्रसिध्द पत्रकारांचे नाव विशेष उल्लेखनीय आहे. त्यांची मुक्तके 'कलामे सोख्ता' या पुस्तकात संग्रहीत आहेत.

ब्रिजलाल बियाणी : यांचा 'जेल मे' हा संवादात्मक ग्रंथ व 'कल्पना-कानन' हा कल्पनात्मक निबंध-संग्रह प्रसिध्द आहे. 'विनोबा विचार और व्यक्तित्व' हा अन्य एक ग्रंथ असून इतर अनेक लेख व लप्पूकथा 'धर्मयुग', 'हिंदुस्थान' सारख्या सुप्रसिध्द साप्ताहिकांत प्रसिध्द झाल्या आहेत. तथापि, त्यांनी केलेले विदर्भ हिन्दी साहित्य संमेलनाचे पुनरुज्जीवन ही त्यांची प्रमुख हिन्दी साहित्य सेवा होय.

विष्णु भिकाजी कोलते : थोर संशोधक व साहित्यिक म्हणून ख्यातनाम असून 'मराठी सन्तों का सामाजिक कार्य' हा त्यांचा हिन्दी ग्रंथ प्रसिध्द आहे. याच्या प्रस्तावनेत सुप्रसिध्द हिन्दी साहित्यकार डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी यांनी या ग्रंथाची मुक्त कंठाने प्रशंसा केली आहे. कोलते अनेक वर्षे महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेच्या विदर्भ शाखेचे अध्यक्ष होते.

नरेंद्र मोहन अग्रवाल उर्फ पागल : यांचे 'पागल के स्वर', 'युगल चरण' व 'गोयल' हे तीन काव्यसंग्रह प्रसिध्द आहेत. 'पागल के स्वर' मध्ये पागलचे स्वर नसून कवीच्या संवेदना आहेत. यांची भाषा सोपी व ओघवती आहे.

रामेश्वर दयाल दुबे : हे नागपूरमधील प्रमुख बाल साहित्य प्रणेते असून त्यांनी कविता, नाटके संस्मरणात्मक रेखाचित्रे व एकांकिका लिहिल्या आहेत. 'चले चलो' आणि 'माँ ये कौन' हे त्यांचे काव्यसंग्रह, 'कुकुडू कूँ' व 'सप्तपर्ण' ही बालनाटके आणि 'ऋतुचक्र' ही एकांकिका प्रसिध्द आहे. 'बेडे जब छोटे थे' या शीर्षकाने काही महापुरुषांची रेखाचित्रेही सादर केली आहेत. याशिवाय सुमारे अडीचशे कविता विविध अंकांमध्ये प्रसिध्द केल्या आहेत.

आझाद शाहू : यांचे नाव भारतलाल शाहू असून नागपूरच्या लोकप्रिय हिन्दी कवींमध्ये यांचा समावेश करण्यात येतो. यांच्या १४ लप्पुगीत पुस्तिका प्रसिध्द झाल्या आहेत.

गोपाल गुप्त : यांनी के. ल. उपाख्य भाऊजी दप्तरींच्या 'सत्चिकित्सा', 'प्रकाशिका', 'होम्योपॅथिक निबंध पंचक' व 'शिक्षणाचा खेळखंडोबा' या मराठी ग्रंथांचा हिन्दी अनुवाद केला आहे.

रामचंद्र मिश्र : यांना संशोधन व निबंध याचा व्यासंग असून त्याच्या सबंध लिखाणात अथक परिश्रम व ज्ञानपिपासा अनुभवास येते. श्रीधर पाठक तथा हिन्दी का पूर्व स्वच्छन्दतावादी काल, हिन्दी परंपरा और तुलसीदास, संत नामदेव, भारतेंदु साहित्य वगैरे ग्रंथ प्रसिध्द आहेत. याशिवाय अनेक समिक्षात्मक निबंध वेळोवेळी लिहिले आहेत. 'हिन्दी के आलोचनात्मक निबंध' हा निबंध-संग्रह त्यांनी संपादित केला आहे. त्यांच्या संशोधन कार्याकरिता उत्तर प्रदेश शासनाचे पुरस्कार मिळाले आहेत.

इन्द्रपालसिंह उर्फ **इन्द्र :** यांनी कादंबरी, निबंध, आलोचना, एकांकिका, नाटक, हास्य-व्यंग व कविता इत्यादी अनेक प्रकारात लेखन केले आहे. 'शंख और विणा' हा त्यांचा प्रथम प्रसिध्द झालेला काव्यसंग्रह. याशिवाय 'इन्द्रधनुष' व 'पहली किरण' हे दोन अन्य काव्यसंग्रह असून 'सती अहिल्या' नावाचे खंडकाव्य व 'द्रोणाचार्य' नावाचे प्रबंधकाव्य प्रसिध्द झाले आहे. 'ठंडी आग', 'अंधेरे के घेरे में' या कांदबऱ्या, 'दर्दके साये में' हा कथासंग्रह, 'विषामृत' हा एकांकिका संग्रह, 'छुटकारा मुश्किल है' हा व्यंगसंग्रह तसेच 'हिन्दी साहित्य अतीत के झरोखेसे', 'हिन्दी साहित्य वर्तमान के दर्पण में, जीते जागते प्रश्न' व 'साहित्य चिन्तन' हे समिक्षात्मक ग्रंथ या त्यांच्या अन्य साहित्य कृती. 'द्रोणाचार्य' हे महाकाव्य महाराष्ट्र हिन्दी अकादमीद्वारा पुरस्कृत झाले आहे.

शिवकरण शर्मा छांगाणी : हे सुप्रसिध्द आयुर्वेद विद्वान असूनही गेल्या चाळीस वर्षापासून हिन्दी वाङ्मय क्षेत्रात आपले स्थान टिकवून आहेत. त्यांच्या 'हिमालय की पुकार' व 'नगाधिराज ने पुकारा है' या कविता वीररसयुक्त आहेत.

रामेश्वर शर्मा : यांनी साहित्याच्या विविध शाखांवर लेखन केले असले तरी ते प्रामुख्याने

प्रगतिवादी समिक्षक म्हणून विख्यात झाले. ललित निबंध व कवितांव्यतिरिक्त 'राष्ट्रीय स्वाधीनता और प्रगतिशील साहित्य' यासह अन्य तीन महत्त्वपूर्ण निबंधसंग्रह प्रसिध्द झाले आहेत.

दुर्गाशंकर मिश्र : यांचे साहित्यिक व्यक्तित्व मुख्यत्वे निबंधकार म्हणून विकसित झाले आहे. 'साहित्यिक साधना के सोपान' हा त्यांचा निबंध-संग्रह प्रसिध्द आहे. इतर पुस्तकांमध्ये 'अनुभूति और अध्ययन', 'सेनापति और उसका काव्य', 'चिन्तन-मनन', 'हिन्दी कविता और कुछ विचार' अशी अनेक समिक्षात्मक पुस्तके त्यांच्या नावे आहेत. त्यावरून त्यांचा कल समिक्षेकडे आहे हे स्पष्ट होईल.

अजयमित्र शास्त्री : हे जेष्ठ इतिहास संशोधक व पुरातत्वज्ञ आहेत. त्यांचे निबंध हिन्दीतील 'सम्मेलन पत्रिका', 'नागरी प्रचारिणी पत्रिका', 'कल्पना', 'अजन्ता', 'विशाल भारत', 'अमृत पत्रिका' इत्यादी अनेक पत्र-पत्रिकांत प्रसिध्द झाले आहेत. 'त्रिपुरी' व 'अजन्ता' हे त्यांचे दोन हिन्दी ग्रंथ प्रसिध्द आहेत.

रज्जन त्रिवेदी : विजय शंकर त्रिवेदी हे यांचे खरे नाव असून साहित्य जगतात ते रज्जन त्रिवेदी या नावाने प्रसिध्द आहेत. कविता, निबंध, कादंबरी, संस्मरण, कथा, नाटक अशा सर्व क्षेत्रात त्यांचा मुक्त संचार आहे. 'चंदनवन के सहजीवी', 'नदी फिर लौंट आयी', 'कौन किसे बांधे', 'कोई भी और', 'पराजय के पार' यासारख्या अनेक रोचक कादंबऱ्यांसोबत 'अंधेरे की परछाईयाँ', 'जिना जडके लोग' सारखे अनेक कथासंग्रह प्रसिध्द झाले आहेत. याशिवाय काही निबंध-संग्रहही प्रसिध्द आहेत.

योगेश्वरी शास्त्री : समिक्षा, निबंध, कथा, काव्य, व्यंगचित्रे व कादंबरी अशा अनेक साहित्यक्षेत्रात या प्रसिध्दी पावलेल्या आहेत. 'नन्ददुलारे वाजपेयी', 'स्वच्छन्दतावादी आलोचना के संदर्भ में' हा त्यांचा शोधग्रंथ प्रकाशित झालेला आहे. 'जीवन की परते' या शीर्षकाचा त्यांचा काव्यसंग्रहही प्रसिध्द आहे.

कृष्णकुमार चौबे : हे राष्ट्रीय ख्यातीचे गीतकार म्हणून प्रतिष्ठित आहेत. त्यांना हिन्दी साहित्य जगतात 'चैतन्यवाद'चे युगप्रवर्तक कवी मानले जाते.

उपरोल्लेखीत साहित्यिकांव्यतिरिक्त काही साहित्यिकांचा संक्षिप्त परिचय पुढीलप्रमाणे:

हिन्दीचे गजलकार म्हणून किर्ती मिळविलेले हनुमंत नायडू तेलुगु भाषिक असूनही त्यांचा हिन्दी साहित्य विश्वातील सर्व क्षेत्रात मुक्त संचार आहे. तज्ञ समिक्षक म्हणून ज्ञात असलेल्या सरयु प्रसाद मिश्र यांनी शोध समिक्षा, ललित लेखन व अनुवाद क्षेत्रात महत्त्वाची कामगिरी केली आहे. त्यांना अनेक साहित्य पुरस्कार प्राप्त झाले आहेत. मधुप पांडे हे अखिल भारतीय किर्तीचे गीतकार व हास्य-व्यंगकार म्हणून ज्ञात आहेत. 'काका हाथरसी' या हास्य-व्यंगाच्या क्षेत्रातील सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्काराने व 'हास्य रत्न' पदवीने ते सन्मानित आहेत. कान्ता सिन्हा, भागचन्द जैन, पुष्पलता जैन, चंद्रशेखर गुप्त, तारा बागडदेव, दिनकर यादव मार्डीकर, इन्दुमती गन्धे, सत्यवती मैया उषा, सुशीला टाकभोरे, अविनाश शास्त्री, विनोदकुमार उइके उर्फ दीप, जोगिन्दर कौर महाजन, रामप्रकाश सक्सेना, घनश्याम व्यास, महादेवराय कडू, दीनानाथ शुक्ल, नारायण गंगाधरराव वझे, थामदेव

कोलते, दत्तात्रय पुरुषोत्तम हरदास, रोजेंद्र पटौरिया, कुसूम पटौरिया, सुधा शर्मा, नंदिनी जठार, प्रतिमा दुबे आदि कित्येक साहित्यिकांनी हिन्दी साहित्याच्या विविध क्षेत्रात आपापल्या परीने मौलिक कामगिरी केली आहे व करीत आहेत. यात याव्यतिरिक्त गोविंद मराठे, हरभजनसिंह हंसपाल, कविता शनवारे, कुमुदिनी लाल, कुसूम श्रीवास्तव, लेखनलाल मुराई, बादलकुमार बॅनर्जी, आलोक रणदिवे, इन्दिरा किसलय, जगमोहन मिश्र, नारायण चंलानी, गोविंद उपाध्याय, शिवनारायण द्विवेदी, प्रकाशचंद्र, सागर खादीवाला, सुरेश वर्मा, सुधा काशी व करुणा उमरे या उल्लेखनीय नावांची यादीही फार मोठी आहे. या सर्वांच्या रचना वेळोवेळी विविध पत्र व अंकांमध्ये प्रकाशित होत असतात.

जिल्ह्यातील संस्कृत पत्रकारिता

(पत्तरकिने, न. र., (नागपूर) **संस्कृत भाषा प्रचारिणी सभाचे उपाध्यक्ष** यांनी या भागाचे लेखन केले आहे.)

'विदर्भ-विषय : सारस्वती जन्मभू:' हे कवि राजशेखरांचे वचन विदर्भातील संस्कृत सारस्वतांच्या मोठेपणाची ग्वाही देते. त्यातही नागपूर जिल्हा ही संस्कृत सारस्वतांची पुण्यभूमी व कर्मभूमी आहे. ह्या जिल्ह्यातील नागपूर, उमरेड, काटोल, सावनेर व रामटेक ह्या तहसिलीपैकी नागपूर, उमरेड व सावनेर तहसीलीत संस्कृत अध्ययन, अध्यापन व ग्रंथरचनेची परंपरा दिसते. पंडित अलोणी गुरुजींनी उमरेड येथे चालविलेली संस्कृत विद्येची सर्व शास्त्रांसह पंडित परंपरा जोपासण्याचा मान मात्र नागपूर नगरीलाच प्राप्त झाला. पंडित सदाशिवभट्ट घुले ह्यांचेपासून सुरू झालेल्या संस्कृताध्ययन परंपरेला १७५ वर्षे पूर्ण होत आली आहेत. सुरूवातीला संस्कृतातील शास्त्रांचे प्राचीन परंपरेने अध्ययन तसेच ब्रिटिशांचे राज्य दृढमूल झाल्यानंतर संस्कृतचे विद्यालय व महाविद्यालयात केले जाणारे अध्ययन ह्या दोनही परंपरेने संस्कृत विद्येची नागपूर जिल्ह्यात प्रगतीची वाटचाल आहे. (१९ व्या शतकाच्या सुरुवातीला वैय्याकरण केसरी सदाशिवभट्ट घुले यांचे नागपूरात आगमन झाले व ते नागपूरला स्थायी झाले. त्यांच्या शिष्यांमध्ये रंगाचार्य हे प्रसिध्द वैय्याकरण होते. ह्याच शतकाच्या उत्तरार्धात नागपूर नगरी शास्त्री, पंडित, वैदिक, वैय्याकरण व वैय्यायिक ह्यांनी गजबजून गेले. वैय्याकरण भट्टजी घाटे व भाऊजी घुले, वैय्यायिक गजाननशास्त्री वरवरे, महामहोपाध्याय बापूजी ताम्हण, प्रभाकरशास्त्री रोडे, प्रो. गो. के गर्दे, नानाजी वझे इत्यादी नामवंतांच्या सहवासाने नागपूरला दक्षिण काशी हे नामाभिधान प्राप्त झाले. २० व्या शतकाच्या पूर्वार्धात म. म. कृष्णशास्त्री घुले, वैय्याकरण पंढरीनाथशास्त्री घाटे, न्यायमूर्ती वाडेगावकर, महामहोपाध्याय वा. वि. मिराशी व स्वातंत्र्योत्तर काळात श्री. भा. वर्णेकर, ग. त्र्ये. देशपांडे, नी. र. वऱ्हाडपांडे प्रभूतींची पंडित परंपरेत गणना होते.)

संस्कृत अध्ययन, अध्यापन व ग्रंथरचना ह्याशिवाय नव्या युगाचे लोकशाही व प्रबोधन करण्याचे माध्यम म्हणून संस्कृत नियतकालिकही ह्या प्रदेशात उदयास आले. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात 'देशसेवक' हे मराठी दैनिक व २० व्या शतकाच्या प्रारंभी 'दैनिक महाराष्ट्र' ह्यांनी मराठी पत्रकारितेचा आदर्श नागपूर जिल्ह्यात प्रस्थापित केला होता. संस्कृत भाषा देखील ह्या नव्या युगाच्या नव्या प्रवाहात सामील झाली होती. केवळ महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण राष्ट्राला संस्कृत पत्रकारितेचा आदर्श घालून देणाऱ्या अप्पाशास्त्री राशिवडेकर ह्यांच्या वाईहून पूर्वी प्रकाशित होणाऱ्या 'सुनृतवादिनी' ह्या संस्कृत साप्ताहिकानंतर तशाच प्रकारचे वाङ्मयीन कर्तृत्व दाखविणारे व संस्कृत पत्रकारितेची खण्डित झालेली परंपरा पुन: प्रज्वलित करणारे 'गीर्वाण' नावाचे संस्कृत मासिकपत्र नागपूरात जानेवारी १९२३ मध्ये उदयास आले. भोसला वेदशास्त्र महाविद्यालयात

काव्यशास्त्राचे अध्यापन करणाऱ्या त्र्यंबक जागेश्वर जोशी ह्या तरुणाने संस्कृत-भोषेच्या उज्वल भवितव्याची आकांक्षा बाळगीत 'गीर्वाण' नावाच्या संस्कृत मासिकाचे प्रकाशन सुरू केले. 'गीर्वाण मासिकपत्र' केवळ दोन वर्षे चालले. प्रस्तुत मासिकपत्र रजिस्ट्रेशन ऑफ प्रेस अँड बुक ॲक्ट खाली पंजीयित झाले होते. आरंभीचे काही महिने हे मासिक पत्र फुलस्केप आकारात चार पृष्ठांचे प्रकाशित होत असे. त्यानंतर ते पुस्तिकेच्या आकारात प्रसिध्द होऊ लागले. शंकर जनार्दन खोत ह्यांच्या संकल्प प्रिटींग प्रेसमध्ये मुद्रित होऊन अयाचित रोडवरील गीर्वाण कार्यालयात त्याचे प्रकाशन होत असे. अंकाची वार्षिक वर्गणी रुपये दोन व फुटकळ अंकाची आठ आणे असे. प्रत्येक अंकाचे मुखपृष्ठावर शिरोभागी 'श्री शिव : शरणम्' हे अर्पणवचन असे, तसेच 'गीर्वाण' मासिकाचे ध्येय व धोरण व्यक्त करणारा श्लोक मुद्रित केला असे. तत्कालीन शासनाने शासकीय इतिवृत्तात 'गीर्वाण'ची दखल घेतली.

ह्या पत्राची भाषा प्रौढ व लालित्यपूर्ण होती. हे संस्कृत मासिकपत्र असले तरी आकार, विषयव्यवस्था व इतर सजावट ह्यांचा विचार करता ते साप्ताहिकच्या स्वरूपाला न्याय देणारे होते. तत्कालीन राजकीय, सामाजिक व धार्मिक स्वरूपाच्या बातम्या संस्कृत-भाषेच्या प्रसाराशिवाय सामाजिक विषयांवर लिहिलेले अग्रलेख, ग्रंथांची परिक्षणे, ललित लेख, काव्य तसेच पत्रकारितेची व्यावसायिक वृत्ती स्पष्ट करणाऱ्या जाहिरातीही मधून मधून 'गीर्वाण'च्या अंकात दृग्गोचर होतात. वृत्तपत्र चालविताना त्यातही संस्कृत-सारख्या भाषेत मासिकपत्र चालविताना येणाऱ्या अडचणींचे विवेचन, पत्रकाराचा ध्येयवाद, आशावाद व भावी स्वप्नांचे चित्रण ह्या सर्वांचे प्रतिबिंब 'गीर्वाण'मध्ये पडलेले दिसते. 'गीर्वाण'च्या अंकातून समकालीन संस्कृत लेखकांची परंपरा स्पष्ट होते. (गीर्वाणमधील लेखकांची नावे-

> महामहोपाध्याय केशवराव ताम्हण, प्रो. सदाशिवराय देहाडराय, रा. गो. मुळे, पं. बालचंद्रशास्त्री विद्यावाचस्पत्ति, पंढरीनाथशास्त्री घाटे, अनंत धूपकर (पणजी), गणेश दशपुत्र (पवनी), गोपीनाथ गणेश भावे, प्रभूती.) स्वातंत्र्यपूर्व संस्कृत साहित्यनिर्मितीच्या जुळवणीचे साधन म्हणून गीर्वाण चा गौरवपूर्ण उल्लेख करावा लागेल. विदर्भाच्या भूमीत व नागपूर नगरीत संस्कृत पत्रकारितेचा स्फुल्लिंग जागविणाऱ्या गीर्वाणकार त्र्यंबक जोशी ह्यांचे सन १९२४ मध्ये वयाच्या अवघ्या २३ व्या वर्षी क्षयाने दु:खद निधन झाले.

संस्कृत वृत्तपत्रसृष्टीच्या इतिहासाला अज्ञात असलेल्या गीर्वाणकारांच्या अल्पजीवी प्रयत्नानंतर बरोबर २५ वर्षांनी संस्कृत पत्रकारितेला स्थायी प्रतिष्ठा प्राप्त करून देणाऱ्या 'संस्कृत-भैवितव्यम्' साप्ताहिकाचा जन्म झाला. सन १९५० मध्ये संस्कृत-भाषा-प्रचारिणी सभेची नागपूर येथे स्थापना झाल्यानंतर संस्कृतच्या प्रसारासाठी एखादे वृत्तपत्र असावे अशी संस्कृतज्ञांच्या एका बैठकीत कल्पना मांडण्यात आली व पु. स. देशपांडे ह्यांचे बंद पडलेले मराठी 'भवितव्य' साप्ताहिक 'भवितव्यम्' ह्या नावाने संस्कृतमधून प्रकाशित करण्याचा ठराव झाला. (तरुण भारत (मराठी दैनिक), नागपूर, ५ मार्च १९५१.) संस्कृताचे विख्यात कवी श्री. भा.वर्णेकर, (श्री. भा. वर्णेकर, प्रज्ञाभारती) ह्यांच्या आद्य संपादकत्वाखाली ७ एप्रिल १९५१ रोजी गुढीपाडव्याचे शुभ मुहूर्तावार 'भवितव्यम्' चा प्रथमांक प्रकाशित झाला व गेले ४८ वर्षे अनेक परिस्थितींना तोंड देत हे पत्र प्रकाशित होत आहे. संस्कृत पत्रकारितेच्या इतिहासात एक यशस्वी व दीर्घकालीन उपक्रम म्हणून संस्कृत-'भवितव्याची' गौरवशाली नोंद आहे. (मिश्र, राम गोपाल **संस्कृत पत्रकारिता का इतिहास,** विवेक प्रकाशन, नई दिल्ली,पृ. ६३.)

संस्कृत-भाषा-प्रचारिणी सभेचे मुखपत्र असलेल्या ह्या संस्कृत साप्ताहिकाला गेल्या ४४ वर्षात संस्कृतज्ञ संपादकांची दीर्घ परंपरा लाभली आहे. त्यात आद्य संपादक श्री. भा. वर्णेकर, स. प. गानू, ना. भू. जवादीवार, स. ना. कुलकर्णी, दि. वि. वराडपांडे, के. रा. जोशी, गु. वा. पिंपळपुरे, श्रीधर घुशे, पंकज चांदे ह्यांनी आजवर संपादक म्हणून कार्य केले आहे. सन १९८५ पासून ह्या पत्राचे नी. र. वऱ्हाडपांडे मुख्य संपादक, व न. र. पत्तरकिने कार्यकारी संपादक आहेत. प्रस्तुत पत्र वृत्तपत्र पंजीयन कायद्याखाली पंजियित असून त्याला इतर भाषिक वृत्तपत्रांप्रमाणे दर्शनी व वर्गीकृत जाहिराती मिळतात. ह्या पत्राला केंद्र सरकारची मान्यता असून केंद्र सरकारकडून ५,०००/- रुपयांपर्यंत वार्षिक अनुदानही प्राप्त होते.

'संस्कृत-भवितव्यम्'ने प्रारंभापासून एक सुस्पष्ट संपादकीय निती संस्कृत भाषेच्या प्रचाराचे धोरण व त्याची कार्यान्वयन पध्दती ह्यावर आपले विचार व्यक्त केले आहेत. 'संस्कृत-भवितव्यम्' हे राजकीय वादापासून दूर राहणारे पक्षातील धोरणांचे पुरस्कार करणारे वृत्तपत्र आहे. संस्कृत-भाषा लोकाभिमुख करण्याचे ध्येय 'संस्कृत-भवितव्यम्ने' वाचकांपुढे मांडले आहे. त्यामुळे सन्धिविरहित शब्दरचनेचा अंगीकार व सामाजिक शब्दप्रयोगांचा हव्यास टाळण्याच्या प्रयत्नातून 'संस्कृत-भवितव्यम्' मधील लेखन वाचकांच्या पसंतीला उतरले आहे. 'संस्कृत-भवितव्यम्'च्या गेल्या ४८ वर्षांमधील अंकाचे अवलोकन केल्यास त्यातील अंतर्गत व बाह्य स्वरूपात झालेल्या अनेक स्थित्यंतराची जाणीव होते. दर्जेदार लेख व त्यांची आकर्षक मांडणी ह्यासाठी भारतातील संस्कृत वृत्तपत्रसृष्टीत 'संस्कृत-भवितव्यम्'चे वेगळे स्थान आहे. संस्कृत-भाषेचे सर्वविषयस्पर्शित्व व अभिव्यक्तिक्षमता दाखविणारे विविध विषयांवरील आजपर्यंत १०० विशेषांक प्रकाशित करण्यात आले आहेत. भाषिक पत्रकारितेमध्ये संस्कृत पत्रकारितेचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान प्रतिष्ठित करण्यात 'संस्कृत-भवितव्यम्'चा फार मोठा वाटा आहे. 'संस्कृत-भवितव्यम्' मध्ये आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक घडामोंडीवर अग्रलेखाच्या रूपाने भाष्य केले जाते. विश्वविख्यात संस्कृतज्ञ दिवंगत् राघवन् ह्यांनी 'भवितव्यम्'चा गौरवपुर्ण उल्लेख केला आहे.

वृत्तपत्रे व पत्रकारिता

(जोशी, श्रीपाद भालचंद्र (नागपूर) भूतपूर्व विभाग प्रमुख जनसंवाद विद्या नागपूर विद्यापीठ तथा अध्यक्ष, विदर्भ साहित्य संघ यांनी या भागाचे लेखन केले आहे.)

एकूणच मराठी वृत्तपत्रांच्या फायली मिळणे दुष्कर असते विदर्भातील वृत्तपत्रांच्या फायलीच उपलब्ध होत नसल्याने विदर्भातील पहिले वृत्तपत्र नेमके कोणते व ते नागपुरातील वा अन्यत्र सुरू झाले याबाबत विविध मतांतरे आढळतात. (लेले, रा. के. **मराठी वृत्तपत्रांचा इतिहास**, पुणे १९८४, पृ. २२६.) असे 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास' लिहिणारे रा. के. लेले यांनीही नमूद करून ठेवले आहे.

वृत्तपत्रे प्रत्यक्षात छापील स्वरूपात अवतरण्यापूर्वी नागपूर भागात एक आगळी-वेगळीच 'पत्रकारिता' अस्तित्वात होती. नागपूर भागातील वृत्तपत्रे वा नियतकालिकांचे आधुनिक काळातील ती आद्य वृत्तपत्रकारिता समजायाला हरकत नसावी. भिंतीवर पत्रके चिकटवून हे कार्य चालत असावे. जुन्या मध्यप्रदेश सरकारने प्रकाशित केलेल्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात अशा पत्रकांचा पुरावा आढळतो. नागपूर शहराला लागून असलेल्या जागृतेश्वराच्या

देवालयात भोसल्यांचे राज्य खालसा झाले. त्यावेळी अशी दोन पत्रके चिकटवण्यात आली असल्याचा उल्लेख त्यात सापडतो.

जागृतेश्वराच्या मंदिराच्या भिंतीवर चिकटविण्यात आलेल्या दुसऱ्या एका पत्रकात भोसल्यांचे राज्य बुडविण्यात इंग्रजांना मदत करणाऱ्या दादोबा शिर्के यांची निर्भर्त्सना करण्यात आली होती. पत्रक असे होते : "श्री महाराज दादोबा सीरके, आपन सरकारचे आप्त आसुन मऱ्हाठा मंडळीला डाग लावला. राजे बुडउन काये मीळणार आहे परन्तु तुम्हास लाज नाही तुम्ही मुलकावर नाव मिळवला की मऱ्हाठे नीमक हराम जाले परंतु आपन बाकाबाई बाहादराची आज्ञाय मोडून राजे बुडवले काही गादीची आशा गरीबा दुबळ्यास ते तुम्ही तुडवीता दादोबा तुम्हाला आंन गुरूची तुम्हाला आंन गउची तुम्हाला आंन कुळस्वामीच माहालात जाऊ नका येथु हद्द जली" (लेले, रा. के. **मराठी वृत्तपत्रांचा इतिहास**, पुणे १९८४, पृ. २२६.)

पुढे सामान्यत: वृत्तपत्रासारखे कार्य करणाऱ्या स्वरूपाचे म्हणून 'सेंट्रल प्रॉव्हिन्सिस न्यूज' (मध्यप्रदेश वृत्त) या सरकारी वृत्तपत्राला विदर्भातील पहिल्या वृत्तपत्राचा मान देणे योग्य ठरेल. (लेले, रा. के. **मराठी वृत्तपत्रांचा इतिहास**, पुणे १९८४, पृ. २२६.) १८६२ साली हे पत्र सुरू झाल्याचे अनुमान त्यात करण्यात आले आहे व असे अनुमान करण्याची कारणेही देण्यात आली आहेत.

'तरुण-भारत' (नागपूर) च्या २ जानेवारी १९५४ च्या अंकात एक ज्येष्ठ पत्रकार श्री. ए. श्री. पटवर्धन यांनी प्रसिध्द केलेल्या छायाचित्रात १ जून १८८७ या तारखेच्या उल्लेखाच्या या पत्रावर पुस्तक २५ अंक ६ अशी नोंद असल्याने (पुस्तक म्हणजे वर्षाऐवजी वापरलेला प्रतिशब्द समजून) त्या पत्राची सुरूवात १८६२ या वर्षीची गृहीत धरली गेली आहे. मासिक स्वरूपाचे हे पत्र सिंहाची मुद्रा असलेले व सरकारी असूनही गॅझेट नव्हते कारण त्यात शिक्षणविषयक बातम्या सरकारी अधिकाऱ्यांच्या रजा, बदल्या, नेमणूका इ. प्रमाणेच बातम्या त्यात देण्यात येत व खाजगीरित्या व्यक्तींना वर्गणी भरून ते विकत घेता येत असे. नागपूरच्या नॉर्मल स्कूलचे मुख्याध्यापक बळवंत विनायक गोखले हे काही काळ या मासिकाचे संपादक असल्याचा उल्लेख आढळतो.

हिंदी, उडिया व मराठी अशा तीन भाषात हे पत्र निघत असे. त्याचे कारण सध्याच्या ओरिसा राज्याचा संबळपूरकडील भाग मध्य प्रांतालाच जोडलेला होता.

नागपूरच्या 'लोकमत समाचार' या हिंदी दैनिकाच्या पहिल्या अंकात (१४ जानेवारी १९८९) हर्षवर्धन आर्य यांनी लिहिलेल्या एका लेखात नागपूरातील सर्वात पहिले मराठी साप्ताहिक म्हणून 'फणींद्रनाथ सागर' नावाच्या एका पत्राचा उल्लेख असून ते १८७७ मध्ये निघाल्याचे म्हटले आहे. मात्र विदर्भातील या पहिल्या वृत्तपत्राबाबत अधिकृत माहिती देणारा एकही दस्तावेज उपलब्ध नसल्याचेही म्हटले आहे. परंतु रा. के. लेले यांनी त्यांच्या 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास' या ग्रंथात त्याही अगोदर एका वर्षापूर्वी म्हणजे १८७६ साली नागपूर येथे लक्ष्मणराव कामाठी यांनी 'फणिंद्रपूर-मणिप्रकाश' नावाचे एक पत्र सुरू केल्याचे म्हटले आहे. (लेले, रा. के. पूर्वोक्त, पृ. २२९.) मात्र ते कोणत्या भाषेत याचा उल्लेख त्यात नाही.

जानोजी महाराजांचा एक विश्वासू स्नेही लक्ष्मण कामाठी यांनी प्रथम शिळा प्रेस सुरू केला (लांडगे, देविदास गोविंद, **नागपूरचा सांस्कृतिक इतिहास,** पृ. ८२.) असा एक उल्लेख 'नागपूरचा सांस्कृतिक इतिहास' या देविदास गोविंद लांडगे यांच्या ग्रंथात आला आहे. तर नागपूरात

पहिले मुद्रणालय १८८१ साली सुरू झाले असा एक उल्लेख ब्रिजलाल बियाणी संपादित श्री. शुक्ल अभिनंदन ग्रंथमध्ये सापडतो.

मुंबईच्या 'नेटिव ओपिनियन' या पत्राच्या १० फेब्रुवारी १८७८ च्या अंकात नागपूर बातमी पत्रात 'नागपूर समाचार' पत्र निघणार असल्याचा उल्लेख आढळतो. (लेले, रा. के. पूर्वोक्त, कित्ता, पृ. २२९.) हे पत्र १८८४ साली धोंडोपंत देव यांनी सुरू केले. ते १८९० साली अँग्लो-मराठी झाले व त्यात इंग्रजी मजकूर येऊ लागला, त्याचे नावही बदलून 'नागपूर अँड बेरार टाईम्स' करण्यात आले असे म्हटले आहे. या पत्राचा मराठी विभाग गोपाळराव रंगनाथ सांभाळीत तर इंग्रजी विभाग जे. बेली नावाचे अँग्लो-इंडियन गृहस्थ पहात असत. १८८५-८६ च्या सुमारास 'नागपूर न्यूज' नावाचे आणखी एक अँग्लो-मराठीपत्र निघत असे.

१८८२ साली धोंडोपंत देव यांनी नागपूर समाचार नावाचे मराठी साप्ताहिक सुरू केले. (लेले, रा. के. पूर्वोक्त, कित्ता, पृ. ६३७.) पुढे हे पत्र नागपूर अँड बेरार टाईम्स या नावाने अँग्लो-मराठी स्वरूपात निघू लागले असेही म्हटले आहे.

त्यानंतरचा उल्लेख सापडतो तो १८८७ व १८८८ या वर्षीचा. 'मराठी नियतकालिकांचा इतिहास' १८३२ ते १९३७ या रामचंद्र गोविंद कानडे यांच्या ग्रंथात नियतकालिकांच्या प्रगतीचे कालखंड सांगतांना त्यांनी १८६७ ते १८८९ हा पहिला कालखंड कल्पिला आहे. त्या कालखंडात मराठी भाषेत एकंदर १०९ नियतकालिके निघत असल्याची नोंद श्री. कानडे यांनी केली असून त्याचे वर्गीकरण करताना नागपूर येथून प्रकाशित होणाऱ्या कारागीर (१८८७) व काव्य सुमनांजली (१८८८) या पत्रांची नोंद घेतली गेली आहे.

त्या अगोदर म्हणजे १८७४ साली 'ज्ञानसंग्रह' नावाचे मासिक नागपूर येथे सुमारे २ वर्षे निघत होते अशीही नोंद या ग्रंथात घेतली गेलेली दिसते. (कानडे, रा. गो. **मराठी नियतकालिकांचा इतिहास.** पृ. २९.) मात्र १८७४ साली 'ज्ञानसंग्रह' नावाचे २ वर्षे चाललेले एक पत्र अकोला येथील असल्याचा देखील उल्लेख आहे. (बियाणी ब्रिजलाल संपा. **श्री. शुक्ल अभिनंदन ग्रंथ,** पृ. ७५.) तसेच 'कारीगर' हे नागपूरहून प्रकाशित मासिक पत्र १८८० मध्ये निघाल्याचा उल्लेख सापडतो.

'मराठी नियतकालिकांच्या इतिहासात' या ग्रंथात नागपूर येथून प्रकाशित होणाऱ्या ज्या 'कारागीर' या पत्राचा १८८७ चा उल्लेख रामचंद्र गोविंद कानडे करतात तेच हे पत्र असावे. केवळ श्री. शुक्ल अभिनंदन ग्रंथ हा हिंदी भाषेत असल्याने ते 'कारीगर' असे लिहिले गेले असल्याची शक्यता वाटते. हे पत्र 'कारागीर' की 'कारीगर' व ते १८८० सालचे की १८८७ सालाचे, दोनपैकी एखाद्या ग्रंथात १८८० वा १८८७ या वर्षीचे वेगवेगळे उल्लेख एखाद्या ठिकाणच्या मुद्रण दोषामुळे उद्‌भवलेत असावेत काय ? की १८८० चे 'कारीगर' हे हिंदी भाषेतले वेगळे पत्र असावे याबाबत स्पष्ट नोंद नाही.

'काव्यसुमनांजली' बाबत देखील 'मराठी नियतकालिकांचा इतिहास' १८८८ या वर्षीचा उल्लेख करून ते नागपूरहून प्रकाशित होणारे पत्र असल्याचे दर्शवितो, तर ब्रिजलाल

बियाणी संपादित श्री. शुक्ल अभिनंदन ग्रंथ 'काव्यसुमनांजली' हे अमरावतीहून प्रकाशित होणारे असल्याचे व ते १८८९ या वर्षी निघाल्याचाही उल्लेख मिळतो. (बियाणी, ब्रिजलाल पूर्वोक्त, पृ. ७५.)

नागपूरच्या न्यू इंग्लिश हायस्कूलचे संस्थापक श्रीधरपंत पारखी यांनी १८९२-९३ मध्ये 'टीकाकार' नावाचे पत्र काढले होते. त्यात कै. अच्युत सिताराम साठे यांनी सरकारी नोकरी पत्करल्यामुळे व्यंगचित्र काढून टीका केली होती. असा उल्लेख आहे. (लांडगे, देविदास गोविंद, पूर्वोक्त, पृ. ८२.) याच ग्रंथात कै. विनायकराव षंडगुळे यांनी १८९२ मध्ये काढलेले 'नीरजोल्लास' मासिक दोनेक वर्षे टिकले असे म्हटले आहे. परंतु हे अमरावतीहून निघत असल्याचा उल्लेख श्री. शुक्ल अभिनंदन ग्रंथात आढळतो.

डॉ. नि. आ. वक्काणी यांनी लिहिलेल्या 'आधुनिक विदर्भ का इतिहास १८५५-१९४७' या ग्रंथातून (वक्कानी, नि. आ. (संपा.) **आधुनिक विदर्भ का इतिहास,** पृ. ३३.) ५ प्रकाशित वृत्तपत्रांचा उल्लेख आढळतो. तो असा :-

नाव	भाषा	प्रकाशन वर्ष
१) सी. पी. न्यूज पेपर	इंग्रजी	१८८८
२) देशसेवक	मराठी	१८९१
३) गोरक्षा हिंदी	१८९१	
४) इंडिपेंडंट	इंग्रजी	१८९१
५) भोसला	मराठी	१८९२

'नागपूर न्यूज' या इंग्रजी पत्राचे प्रकाशन १८८५ च्या पूर्वीपासून सीतारामपंत करीत असल्याचा उल्लेख डॉ. नि. आ. वक्काणी यांनी आपल्या या ग्रंथात केलेला आहे.(वक्कानी, नि. आ. (संपा.) **आधुनिक विदर्भ का इतिहास,** पृ. ३२०.) तसेच हरदास सदाशिवराव पटवर्धन यांनी संपादित केलेले पत्र 'न्यायसुधा' या पत्राचाही उल्लेख त्यांनी केलेला आहे. हे 'न्यायसुधा' नावाचे पत्र सदाशिवराव पटवर्धन १८९० मध्ये हेरदा व नागपूर येथून काढू लागले. (लेले, रा. के. पूर्वोक्त, पृ. ६३७.) यातील हे हेरदा कदाचित चुकून पडले असावे ते वर्धा असावे अशी शक्यता नाकारता येत नाही. वरील सर्व पत्रे ही सामाजिक व राजकीय सुधारणांचा प्रचार करणारी होती.

कृष्णराव नारायणराव करमरकर यांचे याच काळात शिळा प्रेसवर 'मराठी' नावाचे पत्र नागपूरला प्रसिध्द होत असे व नागपूर कॉंग्रेसनंतर ते अस्तगंत झाले. (लेले, रा. के. पूर्वोक्त, पृ. ६२७.)

१८९२ सालाचे 'गोरक्षा' हे पाक्षिक गोरक्षिणी सभेच्या कार्याच्या प्रचार-प्रसारासाठी कार्य करीत असे. पं. शिवदयाळ शुक्ल व पं. शिवचरण शर्मा यांनी हे कार्य केले.

याचवेळी 'मित्र' नावाचेही एक पाक्षिक हिंदी भाषेतून कामठीहून प्रकाशित होत असे. त्याचे संपादन ज्ञासिराम शर्मा हे करीत. (वक्काणी, नि. आ. पूर्वोक्त, पृ. ३२०.)

१८९२ मध्येच सुरू झालेले 'देशसेवक' पुढे दोन वर्षे चालले. हरिपंत पंडित त्याचे संपादक होते. १८९२ ते १८९६ या काळात (विदर्भात) जो दुष्काळ पडला त्याचे भीषण स्वरूप 'देशसेवक' नेही पुढे आणले होते. स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी होण्यास लोकांना प्रेरित करण्यात या भागात ज्या पत्रांनी कार्य केले त्यात 'देशसेवक' ही एक होते. (वक्काणी, नि. आ. पूर्वोक्त, पृ. ३२१.)

याच सुमाराज केव्हातरी 'तर्जुमा-ए-नागपूर' नावाने इंग्रजी व उर्दूतून एक साप्ताहिक मोहम्मद उस्मान प्रकाशित करीत असत. (मिश्रा, डी. पी. (संपा.), **दि हिस्टरी ऑफ फ्रिडम मुव्हमेंट इन मध्यप्रदेश (१९५६)** पृ. १६४-६५.)

सन १८८९-९० मध्ये मध्यप्रदेश सरकार एक 'एज्युकेशन गॅझेट' प्रकाशित करीत असे. यात शिक्षणाव्यतिरिक्त काही वाङ्मयीन वा इतरही मनोरंजक स्वरूपाचा मजकूर देण्यात येई.

या अगोदर १८९० साली वामन दाजी ओक यांच्या कार्याचा एक महत्त्वाचा उल्लेख आढळतो. 'आधुनिक विदर्भ का इतिहास' या डॉ. नि. आ. वक्काणी यांच्या ग्रंथात त्यांनी तो दिलेला आहे. त्यानुसार वामन दाजी ओक हे प्राचीन काव्याचे अभ्यासक, संशोधक, मार्मिक समीक्षक व रसिक, निबंध लेखक इत्यादी म्हणून ख्याती पावलेले व्यक्तित्व होते. ते १८९० मध्ये 'काव्यसंग्रह' चे संपादक झाले.

१९०२ मध्ये एका 'मराठा दीनबंधू' नावाच्या पाक्षिकाचे संपादन किसन फागुजी बनसोडे यांनी केले. त्या अगोदर नागपूर जिल्ह्यातील मोहपा येथून किसन फागुजी बनसोडे यांनी 'निराश्रित हिंदू नागरिक' नावाचे पत्र प्रकाशित केल्याची नोंद डॉ. नि. आ. वक्काणी यांनी त्यांच्या ग्रंथात दिलेली आहे. अस्पृश्यांच्या समस्यांकडे त्या काळात ठामपणे लक्ष वेधण्याचे फार मोलाचे कार्य या पत्रातून त्यांनी केले.

विदर्भ हा मुंबई द्वैभाषिक राज्याचा भाग होण्यापूर्वी मध्यप्रांत बेरारचा भाग होता. हिंदी भाषिकांची संख्या या भागात भरपूर होती. हिंदी पत्रकारितादेखील त्यामुळे विदर्भात मोठ्या प्रमाणावर विकसित झाली आहे. विदर्भात हिंदी पत्रकारितेला जन्म देण्याचे व तिचा विकास घडवून आणण्याचे श्रेय पंडित माधवराव सप्रे या मराठी विद्वानाचेच आहे. (हर्षवर्धन आर्य, लोकमत समाचार, नागपूर (१४ जानेवारी १९८९) यांचा लेख.) जानेवारी १८९९ मध्ये रायपूरमधून त्यांनी 'छत्तीसगढी मित्र' नावाने एक हिंदी मासिक सुरू केले. ते केवळ नावालाच रायपूरहून निघत होते. १९०० पासून त्याची सारी छपाई नागपुरच्या 'देशसेवक' प्रेसमधूनच होत असे. ३२ पानांचे हे मासिक होते. पंडित माधवराव सप्रे यांच्याशिवाय श्री. वामनराव लाखे व श्री. रामराव चिंचोळकर हे दोन मराठी भाषिकच सप्रेंच्या सोबत संपादक होते. १९०२ मध्ये 'छत्तीसगढी-मित्र' चे प्रकाशन बंद झाले. माधवराव सप्रे त्यानंतर नागपूरच्या 'देशसेवक' चे मॅनेजर झाले. १९०५ मध्ये त्यांनी 'हिंदी ग्रंथ प्रकाशक मंडळी' ची स्थापना केली. १९०६ मध्ये त्यामार्फत 'हिंदी ग्रंथमाला' हे मासिक प्रकाशन त्यांनी सुरू केले. ३ रुपये मासिक मूल्य असलेले हे प्रकाशन देशोन्नती व देशभावनेच्या, जागृतीच्या कार्यास वाहिलेले होते. हिंदीतली नामवंत ठरलेली पं. कामताप्रसाद गुरु, पं. महावीर प्रसाद द्विवेदी, पं. श्रीधर पाठक, बाबू श्यामसुंदरदास गुप्त तसेच गोपाळ कृष्ण गोखले, सैय्यद अमीर

अली यांचा सक्रिय सहभाग या उपक्रमास लाभलेला होता, १९१० च्या प्रेस ॲक्टनंतर याचे प्रकाशन बंद झाले. वंगभंग आंदोलनाच्या वेळी सुरू झालेले हे पत्र होते. जून, १९०८ पासून यात प्रकाशित 'अंग्रेजी राज से हिंदुस्तान का सत्यानाश' या लेखाने फार खळबळ माजली असावी असे दिसते.

१९०९ मध्ये या मासिकाचे अनेकवेळा अंक जप्त करण्यात आले. माधवराव सप्रे यांचा ७० पानांचा एक 'स्वदेशी आंदोलन और बायकाट' नावाचा प्रसिध्द निबंध यातून प्रकाशित झालेला होता. (हर्षवर्धन आर्य. पूर्वोक्त.)

हिंदी ग्रंथमालेत सुमारे दहा पुस्तके प्रकाशित झाली. त्यात लेख, निबंध, कविता इत्यादी देखील प्रकाशित होत असत. संपूर्ण भारतभर इतर बोलींच्या ऐवजी 'खडी बोली' स्वीकारली जाण्यासाठी तिचा प्रचार करणे हे या ग्रंथमालेचे उद्दिष्ट होते. त्यानंतर पं. माधवराव सप्रे यांनी १९०७-१९०८ या काळात 'हिंदी केसरी' या साप्ताहिकाचे संपादन केले. हिंदी पत्रकारिता व हिंदी भाषेच्या क्षेत्रात पं. माधवराव सप्रे यांचे कार्यकर्तृत्व फार मोठे मानले जाते. ते हिंदीचे एक आधारस्तंभ व ओजस्वी हिंदीचे पितामह मानले जातात. पं. माधवराव सप्रे यांचे 'छत्तीसगढी मित्र' हेदेखील मध्य प्रदेशातील खऱ्या अर्थाने वाङ्मयीन स्वरूपाचे पहिले मासिक असल्याचे श्री. रामानुजलाल श्रीवास्तव सांगतात. **(शुक्ल अभिनंदन ग्रंथ,** मधील 'मध्यप्रदेश में हिंदी मासिक पत्र पत्रिकाएँ' हा लेख.) १९०८ ते १९११ या काळात हिंदी मासिकांचा अभाव दिसतो असेही त्यांनी म्हटले आहे.

पं. माधवराव सप्रे यांना ३१ ऑगस्ट १९०८ रोजी राजद्रोहाच्या आरोपाखाली अटक करण्यात आली होती. माधवराव सप्रे संचलित व पं. जगन्नाथ प्रसाद शुक्ल संपादित 'हिंदी केसरी' हे पहिले प्रभावशाली साप्ताहिक असल्याचे श्री. श्रीवास्तव यांनी म्हटले आहे. ३००० पासून खपास प्रारंभ झालेल्या 'हिंदी केसरी' चा त्या काळी खप ६००० पर्यंत पोहचलेला होता. **(शुक्ल अभिनंदन ग्रंथ,** मधील 'मध्यप्रदेश में हिंदी मासिक पत्र पत्रिकाएँ' हा लेख.) पं. प्रयागरत शुक्ल हेदेखील हिंदी केसरीच्या संपादकांमध्ये होते. (वक्कानी, नि. आ. पूर्वोक्त, पृ. ३२१.) १९१८ च्या रौलट कमिशनच्या अहवालात यासंबंधाने जनतेत व सैनिकांमध्ये त्यांनी राजद्रोहात्मक विचारधारेचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला. मध्यप्रदेशातील हिंदी पत्रकारितेस नियमितता शैली प्रदान करण्यात 'हिंदी केसरी' चे मोठे अविस्मरणीय योगदान आहे. (शुक्ल अभिनंदन ग्रंथामधील पं. रामानुजलाल श्रीवास्तव यांचा लेख.) 'हिंदी केसरी' ची प्रेरणा लोकमान्य टिळकांच्या मराठी केसरीपासूनच घेतलेली होती. लोकमान्यांच्याच विचारांचा प्रसारदेखील करण्याचे कार्य 'हिंदी केसरी' ने केले.

समाजसुधारणेची मुख्य प्रेरणा असलेले १९०८ चे पं. रुदरत्न शर्मा संपादित 'मारवाडी' नावाचे पत्र पुढे १० वर्षे अस्तित्वात होते. या काळातील सर्वाधिक यशस्वी पत्र म्हणून त्याची गणना केली जाते. हिंदीतील अनेक प्रमुख पत्रकारांचा त्याचेशी संबंध होता. १९२२ मध्ये हे बंद झाल्याची एक नोंद डॉ. वक्काणी यांच्या ग्रंथात आली आहे. (वक्कानी, नि. आ. पूर्वोक्त, पृ. ३२२.)

याच काळात नागपूरहून १९०७ यावर्षी निघालेले 'शालावृत्त' हे मासिक प्रकाशित होत असे. यासुमारास नागपूर वऱ्हाड प्रांतात १९०५-०६ मध्ये हिंदी, मराठी व इंग्रजी मिळून २० पत्रे चालू होती. १९०६-०७ मध्ये ही संख्या १८ वर आली पण पुन्हा १९०७-०८ मध्ये एकूण पत्रे २८ झाली. (लेले, रा. के. पूर्वोक्त, पृ. ६३८.)

१९०७ मध्येच कै. माधवराव पाध्ये वकील यांनी 'देशसेवक' काढला व 'नागपूर समाचार' पत्र बंद पडले असे देविदास लांडगे यांनी त्यांच्या 'नागपूरच्या सांस्कृतिक इतिहास' मध्ये म्हटले आहे.

'दि हिस्टरी ऑफ फ्रीडम मुव्हमेंट इन मध्यप्रदेश' या श्री. डी. पी. मिश्रा संपादित ग्रंथानुसार प्रख्यात क्रांतीकारक अरविंद घोष यांनी सुरतला जातांना एक दिवस नागपूरला २२ डिसेंबर १९०७ रोजी मुक्काम केला. रघुवीर थिएटरमध्ये त्यांनी भाषण केले. जानेवारी १९०८ मध्ये काही अधिक दिवस त्यांनी सभा घेतल्या. स्वदेशीचा पुरस्कार करणारे त्यांचे भाषण 'देशसेवक' मध्ये पूर्ण छापून आले. अच्युतराव कोल्हटकर यांचेवर त्यामुळे राजद्रोहाचा खटला भरला गेला. १८ महिने सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. (मिश्रा, डि. पी. पूर्वोक्त, पृ. २१९.)

रामलाल बाजपेयी यांच्यावरदेखील 'देशसेवक' मधील लेखाबद्दल खटला भरण्यात आला होता. पुरुषोत्तम दास टंडन यांनी तो चालविला व त्यांची सुटका करविली.

एका उल्लेखानुसार 'देशसेवक' च्या ३० जून १९०६ च्या अंकात ३०० व्यापाऱ्यांनी परकीय मालाचा व्यापार न करण्याच्या शपथा घेतल्याची बातमी छापून आली होती. कोल्हटकरांची वकिलीची सनदही २६ मार्च १९१० रोजी ब्रिटिश शासनाने रद्द केली.

१९०७ साली सर्व्हटस् ऑफ इंडिया सोसायटीचा 'हितवाद' जन्मास आला. मराठी साप्ताहिक असलेल्या 'हितवाद' चे संपादन प्रभाकर पाध्ये यांनी केले होते. (शुक्ल अभिनंदन ग्रंथ, पृ. १२०.) पुढे १९११ मध्ये ते इंग्रजीतून प्रकाशित होऊ लागले. नरेश आप्पाजी द्रविड हे त्याचे संपादक होते. १९१६ मध्ये त्याचे द्विसाप्ताहिकात रुपांतर झाले. १९३६ पासून ते त्रिसाप्ताहिक झाले. त्यावेळी श्री. ए. डी. मणी हे हितवादचे संपादक होते. १९४३ सालापासून 'हितवाद' हे आजचे इंग्रजी दैनिक, दैनिकाच्या स्वरूपात प्रकाशित होऊ लागले. आज 'हितवाद' हे नागपूर येथून प्रकाशित होणारे मध्य भारतातील सर्वाधिक खपाचे इंग्रजी दैनिक म्हणून प्रकाशित होते. हितवाद नाव कायम असले तरी सर्व्हटस् ऑफ इंडिया सोसायटीच्या कॉंग्रेसमधील नेमस्तांच्या विचारसणीची परंपरा असलेले ते हितवाद दैनिक आज उरलेले नाही. ए. डी. मणी यांची 'हितवाद' ची कारकीर्द ही या भागात आधुनिक काळात बरीच संस्मरणीय कारकीर्द ठरली. त्यांच्यानंतर जी. टी. परांडे, मेघनाद बोधमकर आणि विजय फणशीकर हे संपादक हितवादला लाभले.

मध्य भारतातील पत्रकारितेच्या विशेषत: पत्रकारितेच्या इतिहासात या पत्राचे स्थान अतिशय प्रतिष्ठेचे समजले जाते.

ओगल्यांचा 'महाराष्ट्र' १९१४ साली नागपूरात साप्ताहिक रूपात सुरू झाला. याच वर्षी 'खादी हितकरो' नावाचे एक मासिकही नागपूरहून निघत असे. (वक्कानी, नि. आ., पूर्वोक्त, पृ. ३२३.) 'राष्ट्रीय मंडळा' चे संघटक डॉ. हेडगेवार यांनी १९१९ मध्ये होमदलचा प्रचार करणारे 'संकल्प' नावाचे पत्र काढले ते १ वर्षच चालले. याचे संपादन पं. प्रयागदत्त शुक्ल करीत असत. 'आधुनिक विदर्भ का इतिहास' या ग्रंथात डॉ. वक्काणी म्हणतात, परंतु श्री. शुक्ल अभिनंदन ग्रंथातील 'मध्यप्रदेश में हिंदी पत्रकारिता का विकास' या श्यामसुंदर वर्मा यांच्या लेखामध्ये **(शुक्ल अभिनंदन ग्रंथ,** पृ. १३५.) हे संकल्प नावाचे मराठी पत्र मुंजे यांच्या प्रेरणेने प्रयागदत्त शुक्ल संपादित करीत होते असाही उल्लेख आढळतो. याचे प्रकाशन सुरू होताच काही दिवसातच त्यांच्याकडून एक हजार रुपयाची जमानत मागितली गेली होती. याचा अर्थ ते तत्कालीन ब्रिटिश शासनाच्या डोळ्यात खुपले असावे.

डॉ. वक्कानी यांच्या 'आधुनिक विदर्भ का इतिहास' या ग्रंथातून प्राप्त माहितीनुसार या भागातील प्रख्यात आद्य दलितोध्दारक श्री. किसन फागुजी बनसोडे यांनी अस्पृश्यतेचे विदारक दर्शन घडविणारे व त्या विरुध्दचा प्रचार-प्रसार करणारी एकूण चार मराठी पत्रे प्रकाशित केल्याची माहिती मिळते. त्यात (१) १९१० चे मोहपा येथून प्रकाशित 'निराश्रित हिंदू नागरिक' (२) १९१३ चे गोंदिया येथून प्रकाशित 'विटाळ विध्वंसक' व पुढे १९१८ मध्ये नागपूरहून प्रकाशित 'मजूर-पत्रिका' व १९३१ ते १९३६ मधील साप्ताहिक 'चोखामेळा' यांचा समावेश आहे. (वक्कानी, नि. आ., पूर्वोक्त, पृ. २६२.)

१९२३ ते १९२५ या काळात भैयालाल मुंदडा यांनी प्रकाशित केलेले साप्ताहिक 'प्रणवीर' तर १९२३-२४ या काळात पं. नारायणदत्त शर्मा संपादित 'विजय' हे दैनिक, १९२२ मध्ये 'सत्याग्रही' तर १९२३ मधील 'श्रमजीवी' ही दोन साप्ताहिके होत. याच काळातील मारवाडी समाजाच्या विकासार्थ चालविली जाणारे साप्ताहिक 'समाजसेवक', यांचा उल्लेख करावा लागतो. याशिवाय १९१८ मध्ये विश्वनाथ सारस्वत यांनी (यवतमाळहून प्रकाशित केलेले साप्ताहिक) 'राष्ट्रसेवक' नागपूरहून प्रकाशित केलेले मासिक 'मारवाडी हितैषी' अशी हिंदी भाषी पत्रेही प्रकाशित होत होती. (वक्कानी, नि. आ., पूर्वोक्त, पृ. ३२२.) या संदर्भात अजून एक उल्लेख 'विजय' या पत्राबाबत (बियाणी, ब्रिजलाल, पूर्वोक्त, पृ. ३४७.) श्री. शुक्ल अभिनंदन ग्रंथात सापडतो. श्री. श्यामसुंदर वर्मा यांच्या 'मध्यप्रदेश में हिंदी पत्रकारिता का विकास' या लेखात तो केला गेला आहे. त्यानुसार 'विजय' या श्री. घोरपडे द्वारा संपादित पत्राकडून एक हजार रुपयांची जमानत मागितली गेल्याचे दिसते. 'विजय' चा हा उल्लेख १९२१ सालचा असल्याने 'विजय' चे संपादक डॉ. वक्काणींनी म्हटल्याप्रमाणे पं. नारायणदत्त शर्मा होते की श्री. श्यामसुंदर वर्मा यांनी म्हटल्याप्रमाणे श्री. घोरपडे होते हा प्रश्न पडतो.

१९१८ मध्येच नागपूरातून एक पूर्णपणे वेगळ्या विषयांना वाहिलेले 'उद्यम' नावाचे मासिक सुरू झाले. उद्योग, धंदे, व्यापार, व्यवसाय इत्यादी बाबतची व्यावहारिक व नित्योपयोगी माहिती व शिक्षण देणारे हे नियतकालिक मराठीतील याप्रकारचे पहिलेच व लोकप्रिय असे एकमेव नियतकालिक राहिले आहे. १९१३ ला खांडवा येथून सुरू झालेले 'प्रभा' हे हिंदी पत्र दोन वर्षानंतर नागपूरहून प्रकाशित होऊ लागले. काही दिवसातच ते बंद पडले. त्यावर प्रधान संपादक म्हणून श्री. काळूरामजी गंगराडे यांचे नाव असे. मात्र त्याचे सर्व कर्ते, धर्ते, विधाता हिंदीचे पुढे विख्यात साहित्यिक ठरलेले पं. माखनवालाल चतुर्वेदी हे होते. 'प्रभा' अतिशय देखण्या स्वरूपात प्रकाशित होणारे नियतकालिक म्हणूनही ख्याती पावलेले होते. (बियाणी, ब्रिजलाल, पूर्वोक्त, पृ. ३४७.) नागपूरचे हे 'उद्यम' मासिक महाराष्ट्रातील दुसरे आणि बृहन्महाराष्ट्रातील प्रसिध्दी झालेले दुसरे महत्त्वाचे मासिक होय असे श्री. रामचंद्र गोविंद कानडे यांनी मराठी नियतकालिकांच्या इतिहासात म्हटले आहे. (कानडे, रा. गो. **मराठी नियतकालिकांचा इतिहास,** मुंबई, १९३८, पृ. २४ ते २९.)

१९२५ साली केवळ गोरक्षण विषयाला वाहिलेले 'गोवर्धन' हे मासिकदेखील नागपूरहून निघत असे त्यांच्या या ग्रंथातील नोंदीवरून दिसते. (कानडे, रा. गो. **मराठी नियतकालिकांचा इतिहास,** मुंबई, १९३८, पृ. २४ ते २९.) रामचंद्र गोविंद कानडे (कानडे, रा. गो. **मराठी नियतकालिकांचा इतिहास,** मुंबई, १९३८, पृ. २४ ते २९.) यांनी जी १९१४-१५ सालातील नियतकालिके दिली आहेत, त्यात नागपूरहून प्रकाशित होणाऱ्या 'वकील' या एका नियतकालिकाचा देखील उल्लेख आढळतो. सिनेमाविषयक जिज्ञासा वाढविण्याकरिता जी नियतकालिके निघाल्याचा उल्लेख आला आहे. त्यात मुंबईचा 'प्रेक्षक' व कोल्हापुरच्या 'सिनेमासृष्टी' सोबतच नागपूर येथून प्रकाशित होणाऱ्या 'चलत्सृष्टी' नामक नियतकालिकाचा देखील उल्लेख आलेला आहे. (कानडे, रा. गो. **मराठी नियतकालिकांचा इतिहास,** मुंबई, १९३८, पृ. २४ ते २९.) ते पुढे बंद पडले.

श्री. शुक्ल अभिनंदन ग्रंथातील श्यामसुंदर वर्मा यांच्या 'मध्यप्रदेश में हिंदी पत्रकारिता का विकास' या त्यांच्या लेखात नागपूरहून प्रकाशित होणाऱ्या 'महाकोशल' या एका (हिंदी) साप्ताहिकाची माहिती दिली आहे. त्यावरून (मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री) रविशंकर शुक्ला यांच्या प्रयत्नांनी १९२६ पासून हे साप्ताहिक सुरू झाल्याचे दिसते, दोन वर्षात ते बंद पडले. त्याचे संपादन सीताचरण दीक्षित व सुंदरलाल त्रिपाठी हे करीत असत.

धर्मविषयक निर्भीड चर्चा करणारे 'नरकेसरी' हे एक पत्र नागपूर येथे नोव्हेंबर १९२९ मध्ये निघाल्याचा उल्लेख आहे. (लेले, रा. के. पूर्वोक्त, पृ. ८८४.) १९२३ मध्ये विदर्भात प्रकाशित वृत्तपत्राची जी माहिती 'रिपोर्ट ऑन इंडिया पेपर्स कॉन्फिडेंशियल' च्या आधारे डॉ. वक्काणी यांनी त्यांच्या 'आधुनिक विदर्भ का इतिहास' या ग्रंथात दिली आहे. (वक्कानी, नि. आ. पूर्वोक्त, पृ. ३२४.) त्यानुसार पुढील इंग्रजी, हिंदी व मराठी नियतकालिके प्रकाशित होत असल्याची जी माहिती प्राप्त होते, ती खाली तक्त्याच्या स्वरूपात मांडली आहे.

१९२३ मध्ये नागपुरात प्रकाशित इंग्रजी व हिंदी वृत्तपत्रांची माहिती

भाषा	यादीतील क्रमांक	नाव	स्थान	कालावधी	प्रकाशक	वितरण
(१) इंग्रजी	१	ऑल इंडिया रिपोर्टर	नागपूर	मासिक	व्ही.व्ही. चितळे	--
(२) इंग्रजी	२	हितवाद	नागपूर	साप्ताहिक	एन. एन. निवस्कार	८००
(३) इंग्रजी	४	Nagpur Dioloson Magazine	नागपूर	त्रैमासिक	रेव्हरेंड इ.आर.के. चॅपलेन	६००
(४) इंग्रजी	५	Salesiam	नागपूर	मासिक	रे. फादर सी.सी. फर्नांडिस	३५०
(५) हिंदी	१३	Gohoi Vaidhya Pataka	नागपूर	मासिक	राजाराम कडूराम निखारे	--
(६) हिंदी	१९	मारवाडी	नागपूर	साप्ताहिक	नारायण दत्त शर्मा	७००
(७) हिंदी	२०	प्रणवीर	नागपूर	पाक्षिक	हिरालाल रामचंद्र चनक	५००
(८) मराठी	३३	बहिष्कृत भारत	नागपूर	साप्ताहिक	गणेश आक्काजी गवई	५००
भाषा	यादीतील क्रमांक	नाव	स्थान	कालावधी	प्रकाशक	वितरण
(९) मराठी	३७	महाराष्ट्र	नागपूर	साप्ताहिक	गोपाळ अनंत ओगले	२१००
(१०) मराठी	३९	मजूर पत्रिका	नागपूर	मासिक	किसन फागुजी बनसोडे	--
(११) मराठी	४७	उद्यम	नागपूर	मासिक	म. कृ. पाध्ये	१०००

ऑक्टोबर १९२२ मध्ये 'स्वातंत्र्य' नावाचे एक दैनिक नागपुरात सुरू झाले. १९२४ मध्ये ते बंद पडले. त्याच्या प्रमुख संचालकांमध्ये ॲड. बळवंतराव रामचंद्र मंडलेकर हे होते. १९२३ मध्ये 'स्वांतत्र्य' चे संपादक होते विश्वनाथ लक्ष्मीकांत उपाख्य बाबुराव उळीभाजे. पुढे त्यांनी ४० वर्षे पत्रकारिता केली. १९२४ साली 'स्वातंत्र्य' बंद पडले तेव्हा त्याचे शेवटचे संपादक अच्युत बळवंत कोल्हटकर हे होते. (वक्कानी, नि. आ. पूर्वोक्त, पृ. ३२६)

कोष्टी समाजातील प्रबोधनाच्या उद्देशाने 'कोष्टी ज्ञानोदय' मासिक महादेव सखाजी

डेकाटेंनी सुरू केले. आगरकरी सुधारणावादी विचारांनी प्रभावित होऊन कोष्टी समाजातील हुंडा पध्दती, मद्यपान, निरक्षरता, व्यावसायिक पीछेहाट, राजकीय अज्ञान यावर त्यांनी हल्ले चढवले. ते 'रणसंग्राम' या अच्युत बळवंत कोल्हटकरांच्या मासिकात संपादक मंडळात होते. 'कोष्टी ज्ञानोदय' मधून प्रचार करून त्यांनी 'कोष्टी समाजोन्नती शिक्षण परिषद' व 'कोष्टी समाजोन्नती पंचायत परिषद' या संस्था स्थापल्या. 'कोष्टी ज्ञानोदय' १९२० ते १९२४ एवढा काळ चालले. १९२६ साली 'तरुण भारत' साप्ताहिक रुपात नागपुरात सुरू झाले. १९४४ साली त्याचे दैनिकात रुपांतर झाले. (वक्कानी, नि. आ. पूर्वोक्त, पृ. ३२६)

१९२० ते १९३७ या कालखंडातील मासिकांची संख्या 'मराठी नियतकालिकांचा इतिहास' (कानडे, रामचंद्र गोविंद, **मराठी नियतकालिकांचा इतिहास**, मुंबई, १९३८, पृ. २२-२३) या ग्रंथात ८१ एवढी नोंदविली आहे. १९३५-३६ सालातील नियतकालिकांमध्ये नागपुरातून प्रकाशित होणाऱ्या उद्यम, ग्रामणी, वागीश्वरी व विहंगम या अनुक्रमे उद्योजकता, ग्रामीण विकास व वाङ्मयीन विषयांना वाहिलेल्या ४ मासिकांचा समावेश आहे. केवळ मुलांच्याकरता म्हणून नागपूरहून एक 'मुलांचे मासिक' निघत असे. १९२७ साली ते सुरु झाले. १९२९ ला वागीश्वरी, १९३२ ला ग्रामणी, १९३३ ला विश्ववाणी व १९३४ ला विहंगम सुरू झाले. (कानडे, रामचंद्र गोविंद, उपरोक्त पृ. क्र. १०, १८, ७९ व ८४.) नागपूरचे 'विहंगम मासिक तर काही काळ महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणेच्या नागपूर शाखेचे मुखपत्र म्हणूनही प्रसिध्द होत असे.(कानडे, रामचंद्र गोविंद, उपरोक्त पृ. क्र. १०, १८, ७९ व ८४. पृ. २९)

नि:स्पृह नावाचे एक मराठी साप्ताहिक १३ मे १९३४ रोजी माधवराव कानेटकर (मा.ज. कानेटकर) यांनी सुरू केले. आर्थिक कारणांनी तेव्हा 'तरुण भारत' बंद पडलेला होता. १९३९ अखेर 'नि:स्पृह'एक महिनाभर दैनिक स्वरूपात काढण्यात आले होते. कानेटकर यांनी नागपूर टाईम्स या इंग्रजी दैनिकाचे संपादक म्हणूनही काही काळ काम केले. पुढे कानेटकरांनी 'नि:स्पृह' चे १९४८ साली पुनरुज्जीवन केले. पाच वर्षात चारवेळा ते बंद करावे लागले. कानेटकर हे गांधीवादी विचारांचे होते. त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतलेला होता. ५ सप्टेंबर १९८३ रोजी त्यांचे निधन झाले. 'नागपूर टाईम्स' या इंग्रजी दैनिकाचे मराठी भावंड 'राष्ट्रदूत' याचेही माधवराव कानेटकरांनी काही काळ संपादन केले.

विनायकराव उपाख्य भाऊसाहेब हंबर्डे यांनी १९३५ ते १९४४ या काळात राष्ट्रीय विचारांनी प्रेरित होऊन नागपुरात 'राष्ट्र संदेश' व 'दीनबंधू' ही पत्रे चालविली. त्यांच्या रामचंद्र प्रिंटींग प्रेस (बजेरिया) मध्ये ती छापली जात. 'दीनबंधू' मधून चिमूर आष्टी प्रकारणाची माहिती दिली गेली आहे.

मराठीचे प्रख्यात कादंबरीकार व विचारवंत पु. य. देशपांडे आणि त्यांच्या पत्नी सौ. विमलाबाई देशपांडे यांनी चालविलेले 'भवितव्य' हे १९३० ते १९४० या दशकातील गाजलेले नियतकालिक होते. दुसऱ्या महायुध्दाच्या सुरूवातीच्या काळात 'भवितव्य' मधील 'संजय' च्या युध्दविषयक लेखांनी या पत्राला चांगलाच नावलौकिक मिळवून दिला होता. महायुध्दानंतर ते बंद पडले. हेच पत्र पुढे 'भवितव्यम्' या नावाने आज 'प्रज्ञाभारती' म्हणून ओळखले जाणारे संस्कृत पंडित व कवी डॉ. वर्णेकर यांनी संस्कृत भाषेत चालविले.

प्रख्यात कामगार नेते फॉरवर्ड ब्लॉकचे कॉ. रामभाऊ रुईकर यांचे 'स्वतंत्र भारत' हे पत्र याच काळातील. ते काही महिनेच चालले.

वर्णाश्रम स्वराज्य संस्थेतर्फे विश्वनाथराव नवाथे यांनी 'धर्मवीर' नावाचे एक साप्ताहिक याच काळात काढले होते.

'श्यामसुंदर' व 'स्वच्छंद' ही साप्ताहिके १९३५ च्या सुमारास नागपुरातून निघाली होती.

सुप्रसिध्द झेंडा सत्याग्रहाच्या काळात वर्ध्याहून नागपूरला आणण्यात आलेले 'तरुण महाराष्ट्र' हे पत्रदेखील या काळात गाजले. वामनराव घोरपडे यांच्या संपादकत्वाखाली नव्या गांधीवादी राजकारणाचा पुरस्कार करण्यासाठी निघालेले हे पत्र होते. नागपुरातील टिळकांच्या प्रतिसहकारवादी 'महाराष्ट्र' या वृत्तपत्राचा सामना करणारे पत्र म्हणून त्या काळी हे पत्र ज्ञात होते. झेंडा सत्याग्रहात सरदार पटेल यांच्या मध्यस्थीने तडजोड झाली व झेंडा सत्याग्रह थांबविण्यात आला त्या कारणाने हे पत्रही बंद करण्यात आले. (लेले, रा. के. पूर्वोक्त, पृ. ८८३.)

वामनराव घोरपडे यांनी 'प्रकाश' या ब्रिजलाल बियाणी यांनी काढलेल्या साप्ताहिकाचे तसेच पुढे १९४६ साली मध्य प्रदेशचे त्यावेळचे मुख्यमंत्री रवीशंकर शुक्ल यांनी काढलेल्या 'राष्ट्रदूत' दैनिकाचे संपादक म्हणूनही वर्षभर काम केले व हे दैनिक सरकारी असल्याचा व त्यामुळे त्याला लोकप्रियता न लाभल्याचाही उल्लेख मराठी वृत्तपत्रांच्या इतिहासात रा. के. लेले यांनी केला आहे.

याच दशकात सर्वाधिक महत्त्वाची घडामोड म्हणून ज्यांचा उल्लेख करावा लागेल व नागपूर-विदर्भच नव्हे तर साऱ्या महाराष्ट्रभर गाजलेली व नियतकालिकांच्या इतिहासात महत्त्वाची ठरलेली दोन पत्रे नागपुरातून निघाली. त्यातले एक 'सावधान' व दुसरे 'आदेश' कडव्या आक्रमक हिंदुत्वनिष्ठेची व सावरकर भक्तीने भारलेली ही पत्रे होती. त्यामुळे त्यांना प्रसिध्दीही भरपूर लाभली.

हिंदुत्वाचा केवळ प्रखर अभिमान एवढेच त्यांचे वैशिष्ट्य नव्हते तर त्यांची उत्कृष्ट भाषाशैली हे त्यांचे प्रमुख वैशिष्ट्य ठरले. प्रख्यात मराठी कथाकार पु. भा. भावे यांच्या त्यातील लेखनाचे वर्णन 'अग्निबाणाप्रमाणे सणाणत जाऊन वेध घेणारे' अशा शब्दांत होत असे. त्यांच्याच लेखांनी 'सावधान' चे नाव सर्वतोमुखी झाले. रामचंद्र बालाजी मावकर यांनी १९३५ साली 'सावधान' नागपुरात सुरू केले होते. 'सावधान' बंद पडल्यावर पु. भा. भावे यांनीच 'आदेश' हे पत्र चालविले.

'आदेश' चा गाजावाजा भावे यांच्या लेखामुळेतर झालाच परंतु आचार्य अत्रे यांनी 'आदेश' वर केलेल्या फिर्यादीत आचार्य अत्रे यांची भंबेरी पु. भा. भावे यांनी उडविली. त्यामुळेही 'आदेश' आणि भावे ही नावे सर्वदूर पसरली. 'सावधान' साप्ताहिकात मावकरांनी हिंदुत्वनिष्ठ व फर्डे लेखन करणाऱ्या लेखकांचा गोतावळा जमा केला. त्यात अग्रलेखांचे लेखन व इतर संपादकीय लेखन शेवटपर्यंत वासुदेवराव फडणीस यांनी केले. व्यवसायाने फडणीस शिक्षक होते. त्यांनी 'स्वातंत्र्य', साप्ताहिक 'पॅट्रियट' व 'साप्ताहिक नागपूर ॲडव्हरटायझर' या पत्रांमधूनही लेखन केले होते. वागीश्वरी मासिकातही फडणीस लिहित असत. त्यांनी लिहिलेल्या 'अक्षर पुरुष बच्छराज अँड को' या लेखामुळे जमनालाल बजाज यांनी 'सावधान' पत्रावर बेअब्रुचा खटला दाखल केला होता. मध्यप्रांत सरकारने जामीन मागितल्यावर क्षुब्ध होऊन फडणीसांनी 'सतीचे वाण' या मथळ्याचा एक जळजळीत लेख

लिहिला होता. 'सावधान' चे नंतर मुंबईला स्थलांतर झाले. तोवर फडणीसांचे लेखन 'सावधान' मध्ये चालूच होते. रा.वि. (रामजी) काळे या नावाचे देखील एक गणमान्य लेखक यात लिहित.

१९३५ साली नागपुरात पु. भा. भावे यांचे एक स्नेही वि. ध. देशपांडे यांनी 'स्वच्छंद' नावाचे साप्ताहिक चालविले. त्यात 'मॉरिस कॉलेजात मुलींचा नाच' व 'अखेर पोरी नाचल्या' असे जे दोन लेख पु. भा. भावे यांनी लिहिले त्याने खुप खळबळ उडवून दिल्याचे रा. के. लेले यांनी म्हटले आहे. त्यानंतरच मावकरांनी पु. भा. भावे यांना 'सावधान' साठी लिहिते केले.

पु. भा. भावे यांनी 'सावधान' मध्ये व अन्यत्रही 'वीरभद्र', 'इंद्र', 'विद्यापती' इत्यादी टोपण नावांनी चित्रपटापासून राजकारणापर्यंत विविध विषयांवर लेखन केले. कित्येकदा सारा अंक भावे एकटाकी लिहून काढीत. फडणीसांना वेळ नसला की त्यांच्या शैलीतच पल्लेदार अग्रलेख भावे लिहीत. रामजी काळे यांच्या शैलीचेही अनुकरण भावे मोठ्या सफाईने करीत असत. हे सारे लेखन विना मोबदला असे, कारण 'सावधान' हे ध्येयवादी साप्ताहिक ते मानीत. प्रख्यात चित्रकार, कलासमीक्षक द. ग. गोडसे यांची उत्तमोत्तम व्यंगचित्रेही तेव्हा 'सावधान' मध्ये प्रसिध्द होत असत. 'सावधान' ची लोकप्रियता त्यामुळे वाढत होती. 'सावधान' ची उपेक्षा करणे भल्या भल्यांनाही अशक्य झाले. मात्र त्याबरोबर सरकारी वक्रदृष्टी देखील 'सावधान' कडे वळली व त्यावेळी मध्यप्रांतात प्रथमच सत्ताधारी झालेल्या काँग्रेस मंत्रिमंडळाने 'सावधान' कडे चार हजार रुपयांचा जामीन मागितला व तो भरण्यात आला असेही लेले सांगतात.

पु. भा. भावे यांचा 'आदेश' चा पहिला अंक २८ मार्च १९४१ रोजी प्रसिध्द झाला. 'सावधान' च्या २७ डिसेंबर १९३६ च्या अंकात भावे यांनी जो 'तिलांजली व प्रतिज्ञा' या मथळ्याचा लेख लिहिला त्यातच त्यांची भूमिका त्यांनी मांडली होती. आचार्य अत्रे यांचा सावरकरांवर टीका करणाऱ्या लेखाचा 'आदेश' मधून भाव्यांनी 'फाल्गुन' या टोपणनावाने लिहून घणाघाती पध्दतीने समाचार घेतला होता. अत्रेंनी 'आदेश' वर खटला भरला पण तो त्यांना मागे घ्यावा लागला. 'आदेश' चे नाव त्यावेळी चौफेर गाजले. ३१ जानेवारी १९४८ ला 'आदेश' बंद पडला. वृत्तपत्रसृष्टीत आपल्या वेगळेपणाचा ठसा उमटवूनच 'आदेश' चे अवतारकार्य संपले.

'आधुनिक विदर्भ का इतिहास' या ग्रंथानुसार प्रामुख्याने दलितोध्दाराच्या निष्ठेने चालविल्या गेलेल्या व अन्य विषयांवरीलही पत्रांमध्ये अगोदर नमूद केलेल्या काळातील पत्रांव्यतिरिक्त नागपूरला अगदी लागून असलेल्या कामठी येथून बाबू हरदास एल. एन. यांनी १९३३ साली चालविलेले साप्ताहिक 'महारठ्ठा' ('जय भीम' हा शब्दप्रयोग ही याच बाबू हरदासांची निर्मिती असल्याचे डॉ. ज्योती लांजेवार यांनी 'युगवाणी' तील एका लेखात म्हटले आहे.) नाशिकराव तिरपुडे यांचे १९४७ सालचे साप्ताहिक 'अरुण', दि. मा. खैरकराचे १९४७ चे पाक्षिक 'सिध्दार्थ', आणि ना. रा. शेंडे यांच्या १९४७ सालच्या 'पुजा' या मासिकाचा समावेश आहे.

नागपुरात १९३० च्या सुमारास निघालेले व साधारणपणे १९३५ पर्यंत चाललेले मराठी मासिक 'वागीश्वरी' तसेच १९३५ चे 'विहंगम' या दोन्ही मासिकांनी वाङ्मयीन विश्वात आपले एक महत्त्वपूर्ण व दर्जेदार असे स्थान निर्माण केले होते. 'वागीश्वरी' चे संपादन ब. बो. गर्गे यांचे होते. त्यांनीच पुढे 'वागीश्वरी' बंद पडल्यावर 'विश्ववाणी' नावाचे मासिक काढले होते. वासुदेवराव फडणीस व वा. रा. मोडक यांचे संपादन करीत. तर 'विहंगम' हे प्रो. बनहट्टी यांच्या भारतीय साहित्य परिषदेचे प्रकाशन होते. प्रख्यात कवी या. मु. पाठक हे त्यांचे संपादन करीत. १९३८ च्या सुमारास ते बंद पडले. परंतु या तीनही मासिकांचे साहित्य क्षेत्रातील योगदान फार महत्त्वाचे मानले गेले आहे.

१९३२ ला निघालेल्या वा. रा. मोडक यांच्या 'मुलांचे मासिक' या मासिकाने पुढील काळातील अनेक थोर साहित्यीकांचे लेखन त्या काळात प्रकाशित करून त्यांना नावारुपास आणलेले आहे. अद्यापही हे मासिक वा. रा. मोडकांचे सुपुत्र शरद मोडक यांनी सुरू ठेवलेले आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी सुरू केलेले 'गुरुदेव' हे मासिकही धर्म, नीतीमत्ता व सामाजिक संस्कार घडविण्याच्या संबंधातील एक महत्त्वपूर्ण दस्तावेज ठरलेला आहे.

'वागीश्वरी', 'विहंगम' व 'विश्ववाणी' या तीनही साहित्यिकदृष्ट्या महत्त्वाचे योगदान देणाऱ्या मासिकानंतरचे या क्षेत्रातील पुढील महत्त्वाचे पाऊल म्हणून १९४७ साली सुरू झालेल्या कुंदनराय मोहेकर यांच्या 'सुषमा' मासिकाचा उल्लेख करावा लागतो. तसेच १९४८ साली सुरू झालेल्या 'पुजा' व 'उन्मेष' या दोन मासिकांची देखील नोंद यासंदर्भात घेतली जाते.

विदर्भ साहित्य संघ या आज विदर्भातील सर्वच जिल्ह्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या प्रादेशिक साहित्य संस्थेची स्थापना १९२३ साली झाली. १९४९ साली या संस्थेच्या मुखपत्र प्रकाशनाची सुरूवात झाली. प्रख्यात कवी, मुक्तछंदाचे उद्‌गाते समीक्षक वा.ना. देशपांडे यांचे प्रथम संपादन लाभलेले 'युगवाणी'स पन्नास वर्षे पूर्ण झाली आहेत. 'युगवाणी'च्या जन्मानंतर नागपूरहून प्रकाशित होणाऱ्या या मासिकाच्या निमित्ताने विदर्भाला एक प्रातिनिधिक स्वरूपाचे दर्जेदार असे नियतकालिक लाभले. केवळ विदर्भच नव्हे तर कविवर्य ग्रेस यांच्या संपादन कार्यकाळापासून त्यांच्या कर्तृत्वामुळे 'युगवाणी' हे विदर्भाच्या सीमा ओलांडून एकूणच मराठी वाङ्मयविश्वातील एक अभिरुचीसंपन्न दर्जेदार नियतकालिक म्हणून प्रसिध्दी पावले. अनेक ख्यातनाम मराठी लेखकांचे संपादन 'युगवाणी'स वेळोवेळी लाभले. अलीकडील काळात म्हणजे १९८६ पासून पुढे डॉ. आशा सावदेकर यांचे तर या नितकालिकांच्या इतिहासातील सर्वाधिक काळ म्हणजे नऊ वर्षे प्रख्यात कवी डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांचे संपादन या नियतकालिकास लाभले. त्या अगोदरच्या काळात या नितकालिकास प्रख्यात लेखक श्री. वामनराव चोरघडे, डॉ. वि. भि. कोलते, डॉ. मधुकर आष्टीकर, डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, श्री. प्रकाश देशपांडे, डॉ. वसंत वऱ्हाडपांडे इत्यादी मान्यवराचे संपादन लाभले होते. सध्या वामन तेलंग याचे संपादक आहेत.

नागपूर शहरात प्रारंभिक पत्रकारिता ही भिंती पत्रकांच्या स्वरूपात सुरु झाली याविषयीची नोंद वर दिली आहे. (लेले, रा. के. पूर्वोक्त, पृ. २२६, २२७.) पुढील काळात राष्ट्रवादी भावनेने प्रेरित झालेले वार्तापत्रे निघत होती.

१९५७ साली नागपूरच्या 'तरुण भारत' दैनिकाच्या पुणे आवृत्तीचे संपादक पद स्वीकारुन ग. वि. केतकरांनी 'केसरी' संस्थेचा निरोप घेतला. त्या पदावर १९६४ पर्यंत केतकर राहिले. (१९४७ साली ते 'केसरी' चे संपादक झाले होते.)

डिसेंबर १९०७ मध्ये सुरत काँग्रेसचे महाभारत घडल्यानंतर टिळकांनी 'केसरी' मधून व नागपूरचा 'देशसेवक' यासारख्या जहाल पत्रांनी सरकार व मवाळांविरुध्द टीकेची झ ोड उठवली. (लेले, रा. के. पूर्वोक्त, पृ. २२६, २२७.)

'देशसेवक' मूळ नेमस्तांच्या हाती असलेले हे पत्र गाजले ते जहालांच्या हाती गेल्यावरच. विशेषत: पत्राच्या संपादकावर सरकारी रोष झाल्याने त्याचा विशेष बोलबाला झाला. मराठी वृत्तपत्रसृष्टीत वैशिष्ट्यपूर्ण स्थान असलेले 'संदेश' कार अच्युत बळवंत कोल्हटकर यांनी आपल्या वृत्तपत्रीय जीवनाचा श्रीगणेशा एक प्रकारे या नागपूरच्या पत्रातच गिरविला आहे. पुढे नागपूरलाच 'महाराष्ट्र' पत्र काढून ख्यातनाम झालेले गोपाळराव ओगले यांचाही या पत्राशी संबंध आला होता. त्याच्याही संपादकीय कर्तृत्वाची सुरूवात 'देशसेवकातच झाली. या पत्राने नागपूर गाजविले आणि महाराष्ट्र हालविला असा त्याचा लौकिक आहे.' (लेले, रा. के. **मराठी वृत्तपत्रांचा इतिहास,** पुणे १९८४, पृ. ४८७.) १८९१ साली नागपूरचे एक ख्यातनाम सुधारक हरी माधव पंडित यांनी हे साप्ताहिक सुरू केले. पंडित हे काही काळ मुंबईच्या 'विविधज्ञानविस्तार' या नामवंत मासिकाचेही संपादक होते. 'देशसेवक' चा पहिला अंक नेमक्या कोणत्या तारखेस प्रकाशित झाला याची नोंद उपलब्ध नाही. मात्र 'सालाची ४ रुपये' अशी याची किंमत, तसेच 'सर्व व्यवस्था जुळल्यावर इंग्रजीची एक पुरवणी जोडण्यात येणार आहे' अशी माहिती ३० जानेवारी १८९२ च्या 'कामगार' या मुंबईच्या पत्रावरून दिसते. 'देशसेवक' साप्ताहिकाची मालकी व संपादकपद पुढे महादेव कृष्ण (माधवराव) पाध्ये यांच्याकडे आली. ते अग्रगण्य वकील होते व नागपुरातील नावाजलेले कार्यकर्ते होते.

'नागपूर-वऱ्हाडच्या जीवनातही सरकारी नोकरी, वकीली करून सार्वजनिक कार्य करणाऱ्या लोकांचे प्राबल्य राहिले. त्याच लोकांनी वृत्तपत्र हे जनसंवादाचे आधुनिक माध्यम अस्तित्वात आणले. पंडित काय किंवा माधवराव पाध्ये काय, हे नेमस्त असल्याने 'देशसेवक' पत्र तशाच धोरणाचे होते'. लेले यांनी दिलेल्या माहितीनुसार काँग्रेसचे अधिवेशन नागपूरला १९०६ नंतर भरण्याचे ठरत असल्याने 'देशसेवक' चे वाढणारे काम लक्षात घेता लागणाऱ्या मदतनीसाच्या पार्श्वभूमीवर लो. टिळकांनी त्यांना करण्यात आलेल्या मागणीवरून गोपाळराव ओगले यांना पाठवून दिले. १९०६ च्या नोव्हेंबरमध्ये ते नागपूरला आले. अच्युत बळवंत कोल्हटकरदेखील वकिली करण्यासाठी त्यावेळी नागपुरात आलेले होते. त्याचे वडील रा. ब. वामनराव कोल्हटकर यांनी त्यांची लेखनाची हौस बघता 'देशसेवक'मध्ये लेखन करण्याची सूचना केली. दादासाहेब ओगले यांनी गोरक्षण संस्थेत नोकरी धरली व

'देशसेवक' च्या कामात ते अच्युतरावांना मदत करू लागले. त्यांच्यासोबत शंभुराव गाडगीळही होते.(लेले, रा. के. **मराठी वृत्तपत्रांचा इतिहास,** पुणे १९८४, पृ. ४८९.)

अच्युतरावांची मते टिळकांकडे झुकणारी होती. नेमस्त मताचा त्यांना तिटकारा होता. डेक्कन कॉलेजात शिकत असतानाच टिळकांच्या मनांचा त्यांना परिचय घडला होता. अच्युतराव व गोपाळराव ओगले यांच्यामुळे टिळकांची चळवळ, वंगभंग, इत्यादीमुळे झालेल्या खळबळीचे पडसाद नागपूर-वऱ्हाडच्या स्तब्ध राजकारणात प्रथमच उमटू लागले. नव्या चळवळीचा व विचारांचा नागपूरच्या लोकांना प्रथम परिचय घडला तो 'देशसेवक' मुळेच. नागपूरला भरावयाच्या काँग्रेसचे अध्यक्षपद लो. टिळकांकडे जावे असा प्रचार 'देशसेवक' ने केला. माधवराव पाध्ये हे नेमस्त असल्याने त्यांना 'देशसेवक' चे हे स्वरूप पसंत नव्हतेच. त्यांनी 'देशसेवक' आपल्या छापखान्यात छापून देणे बंद केले, वामनराव कोल्हटकरांनीदेखील अच्युतराव या आपल्या मुलाला घरातून काढून स्वतंत्र बिऱ्हाड करायला लावले. अच्युतरावांनी मात्र 'देशसेवक' वर पूर्ण ताबा मिळविला होता.

नागपुरात डॉ. मुंजे व इतर जहाल तरुणांनी 'राष्ट्रीय मंडळ' नावाची एक संस्था काढली. 'देशसेवक' हे त्यांना उत्तम साधन मिळाले होते. नागपूरच्या या जहाल-मवाळ वादाची परिणती नागपूरचे नियोजित काँग्रेस अधिवेशन सुरतेस नेण्यात झाली. सुरत काँग्रेसला जातांना अरविंद घोष यांनी नागपुरात राष्ट्रीय पक्षाचे ध्येय व धोरण यावर केलेली भाषणे 'देशसेवक' ने छापली. त्यामुळे अच्युतरावांना अटक करण्यात आली. 'देशसेवक' छापले जाई त्याच 'प्रबोध' छापखान्यात अरविंद घोष यांच्या भाषणांची पुस्तके छापली गेली. अच्युतराव त्याचे मुद्रक, प्रकाशक नव्हते. तरीही त्यांना त्याबद्दल खटल्यात अडकविण्यात आले. अडीच वर्षे सक्त मजुरीची शिक्षा त्यांना ठोठावण्यात आली. 'देशसेवक' ची सुत्रे गोपाळराव ओगले यांच्याकडे आली. त्यांच्यावरही खटला भरला गेला. १८ जानेवारी १९०९ च्या अंकातील अच्युतरावांच्या खटल्याबाबतचा त्यांचा आक्षेपार्ह लेख नागपूरच्या महाराज बागेतील राणीच्या पुतळ्यासंबंधी झालेल्या खटल्याबाबतचा होता. गोपाळराव ओगले यांनी वकील न नेमता स्वत:च आपला बचाव केला. त्यांचे बचावाचे भाषण एवढे जळजळीत होते की, त्यांचा बचाव त्यांच्या लेखापेक्षा अधिक राजद्रोही असल्याचे न्यायमूर्तीनी उद्‌गार काढले. ओगले तुरुंगात गेल्यावर शंभुराव गाडगीळ हे 'देशसेवक' चे संपादक झाले. त्यांनाही त्यांच्या 'पदव्यांचा पोकळपणा' या लेखाबद्दल तो आक्षेपार्ह ठरविण्यात येऊन एक हजार रुपये दंडाची शिक्षा सरकारने ठोठावली. गाडगीळांनंतर कुलकर्णी संपादक झाले. त्यांच्याकडूनही जबर जामीन मागीतला गेला. अखेर हे पत्र बंद पडले.

जानेवारी १९१० नंतर 'देशसेवक' पुन्हा निघू लागला, पण जामीन मागण्याचे सत्र सुरुच राहिले व अखेर ते पत्र बंद पडले असे रा. के. लेले म्हणतात. त्यांनी सांगितल्याप्रमाणे पत्र बंद करण्याचा निश्चय करून सरकारने ते बंद पाडले ; पण नागपुरला जहाल राजकारणाचा श्रीगणेशा लिहिण्याचा मान या पत्राने मिळविला. अच्युतराव कोल्हटकर, गोपाळराव ओगले अशा पुढे नामवंत ठरलेल्या संपादकांनी हे पत्र गाजविले. पत्रकारितेचे पहिले धडे त्यांनी या पत्रातच गिरविले हेही या पत्राचे वैशिष्ट्य होय.

हिंदी केसरी : मध्यप्रदेशातील रायपूरचे माधवराव सप्रे यांनी 'हिंदी केसरी' काढण्यात पुढाकार घेतला. त्यास नागपूरचे डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे यांनीही हातभार लावला होता. मराठी केसरीची ही हिंदी आवृत्ती होती. माधवराव सप्रे यांना हिंदी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा बहुमान मिळाला होता.

महाराष्ट्र : नागपूर हा जिल्हा मुळातला मध्यप्रांत-वऱ्हाडचा भाग. हा भाग हिंदी-मराठी असा द्विभाषिकच राहिलेला आहे. या द्विभाषी प्रांतात 'देशसेवक' नंतरचे गाजलेले महत्त्वाचे पत्र म्हणून गोपाळराव ओगले यांच्या 'महाराष्ट्र' चे नाव घेतले जाते. 'केसरी' च्या परंपरेतले म्हणून हे पत्र ओळखले गेले. लोकमान्य टिळकांच्याच विचारांनी प्रभावित व त्याच राजकारणाचा पुरस्कार करणारे गोपाळराव ओगले यांनी हे पत्र सुरु करून ते अतिशय लोकप्रिय केले. रा. के. लेले यांनी मराठी वृत्तपत्रांच्या इतिहासात ॲड. माधव श्रीहरी अणे यांची एक आठवण नोंदविली आहे. त्यानुसार सरकारला विरोध न करणारी नेमस्त वृत्तपत्रे लोकमत बनविण्याच्या दृष्टीने फारसे कार्य करू शकली नाहीत. फारकतीच्या वा पोटगीच्या नोटिसींच्या उत्पन्नावरच ही पत्रे तगत असत. अशा पत्रातून ना नवे विचार, ना नव्या बातम्या. जे असे ते सर्व शिळे असे अणे सांगतात. १८९७ साली टिळकांना शिक्षा झाल्यानंतर नागपुरात टिळक पक्षीय एक गट तयार होऊ लागला होता. बंगालच्या फाळणीनंतर चळवळ झाली. त्याचे लोण सर्वत्र पसरू लागले. त्यामुळे वृत्तपत्रांची आवड वाढीस लागून देशी भाषांमध्ये वृत्तपत्रांची बरीच वाढ झाली असे. (लेले, रा. के. पूर्वोक्त, पृ. ५२१.)

'देशसेवक' पत्र हातचे गेल्यानंतर नागपूरला माधवराव पाध्ये 'हितवाद' पत्र चालवित असत. हे साप्ताहिक १९१३ साली ना. गोखले यांच्या भारतसेवक समाजाने आपल्याकडे घेतले व नरेश आप्पाजी द्रविड यांच्या संपादकत्वाखाली ते इंग्रजीतून सुरू करण्यात आले. (लेले, रा. के. पूर्वोक्त, पृ. ५२१.) पण राष्ट्रीय पक्षाचे असे एकही पत्र नागपुरात नव्हते. राष्ट्रीय पक्षाचा गट वाढत होता, पण त्यांच्या हाती वृत्तपत्राचे साधन नव्हते व कोणत्याही वृत्तपत्रातून त्याचा मतप्रचार होण्याची शक्यता नव्हती. 'केसरी' नागपूर-वऱ्हाडात येत होता व त्याच्याद्वारे लोक शिक्षणाचे जे काही कार्य व्हावयास हवे ; ते होतही होते. पण ते प्रामुख्याने समाजाच्या वरच्या थरात होते. शिवाय केसरीत स्थानिक चळवळीची माहिती व प्रांतातील सरकारवर टीका येणे शक्य नव्हते. 'केसरी' ची भाषाही सर्वसामान्य माणसाला पेलणारी नव्हती. यामुळे राष्ट्रीय विचारांच्या मंडळींना नागपुरात आपले एखादे वर्तमानपत्र असावे असे तीव्रतेने वाटत होते. (लेले, रा. के. पूर्वोक्त, पृ. ५२१.) 'देशसेवक' चे संपादकपद भूषवून तुरुंगवास भोगलेले अच्युतराव कोल्हटकर तुरुंगातून सुटल्यावर बंद पडलेले पत्र पुन्हा सुरू करू शकले नव्हते. त्यांची वकिलीची सनदही रद्द करण्यात आली होती. अशा स्थितीत नागपूरला राहण्याऐवजी मुंबईला स्थलांतर करण्याचा निर्णय अच्युतरावांनी घेतला. डॉ. मुंजे प्रभृतींना 'देशसेवक'चे पुनरुज्जीवन करावे असे वाटत होते, पण अच्युतराव पुन्हा नागपूरला येण्यास तयार झाले नाहीत. म्हणून डॉ. मुंजे यांनी नागपूरला स्थिर राहून वृत्तपत्राची जबाबदारी घेईल अशा व्यक्तीचे नाव सुचविण्याची अच्युतरावाना गळ घातली. अच्युतरावांनी आपले मित्र गोपाळ अनंत ओगले यांचे नाव सुचविले. (लेले, रा. के. पूर्वोक्त,

पृ. ५२२.) १९१२ च्या अखेरीस त्याबाबत मुंबईत बोलणी होऊन पत्राचा विचार नक्की झाला. नव्या पत्राचे नाव काय ठेवावे हाही चर्चेचा विषय होता. डॉ. मुंजे यांनी 'हंस' व 'गरुड' अशी दोन नावे सुचविली होती, पण अच्युतरावांना ती पसंत पडली नाहीत. त्यांनी 'विहंगम', 'महाराष्ट्र' व 'मध्यवर्ती' अशी नावे सुचविली होती, शेवटी 'महाराष्ट्र' हे नाव निश्चित करण्यात आले. अच्युतरावांच्या सहीने जाहिरातीचाही नमुना २२ सप्टेंबर १९१३ च्या पत्राने मुंजे यांच्याकडे आला. जाहिरातीत म्हटले होते--'नागपूर महाराष्ट्रात आहे काय ? नागपूर महाराष्ट्रात असो किंवा नसो 'महाराष्ट्र' मात्र नागपूरात आहे'. शिवाय पुढील काव्य पंक्तीही जाहिरातीत असत.

"कसें बोलतें हालतें नागपूर,
वऱ्हाडांत गरजे कसें होमरूल
जरी पाहिले अल्प वृत्तांत याचा
महाराष्ट्र वाचा, महाराष्ट्र वाचा"! (लेले, रा. के. पूर्वोक्त, पृ. ५२३.)

सुरूवातीला 'महाराष्ट्र' पत्र एक खांबी तंबूसारखेच होते, प्रसंगी पत्राच्या घड्या घालण्याचे कामही करण्याची पाळी ओगले यांच्यावर येत असे. ओगले यांना सुरूवातीला भाड्याने जागा द्यावयालाही कोणी धजत नव्हते. (लेले, रा. के. पूर्वोक्त, पृ. ५२३.)

'महाराष्ट्र' हे राष्ट्रीय पक्षाच्या राजकारणाचा पुरस्कार व प्रचार करणारे जहाल पत्र होते. ते टिळक सांप्रदायाचे होते. 'केसरी' मंगळवारी प्रकाशित होत असे, तर 'महाराष्ट्र' बुधवारी. रा. के. लेले म्हणतात की, "केसरीतील मंगळवारचा अग्रलेख व 'महाराष्ट्राचा' बुधवारचा अग्रलेख हे सामान्यत: एकाच विषयावर व एकाच धोरणाने लिहिलेले आढळत.... लो. टिळकांच्या विचाराशी व चळवळीशी ओगले यांचे तादात्म्य साधलेले असल्यानेच हा कमालीच्या साम्याचा चमत्कार दिसून येई".

टिळकांच्या मृत्यूनंतर मात्र हे साम्य फार काळ टिकले नाही. लो. टिळकांच्या मृत्यूनंतर ओगले यांनी कोणत्याही एका पक्षाला बांधून घेतले नाही. परंतु त्यांचा कल मात्र नेहमीच प्रगत अशा राजकीय पक्षाकडे राहिला. त्यामुळे राष्ट्रीय चळवळीचा परिपोष 'महाराष्ट्र' ने सतत केला. प्रत्येक प्रश्नावर स्वतंत्र वृत्तीने साधकबाधक विचार करून त्यानुसार 'महाराष्ट्रां'मध्ये मत मांडण्यात येई.

'केसरी'शी देखील या पत्राचे मतभेद झाले होते. थोडक्यात, 'महाराष्ट्र' ची भूमिका स्वतंत्र होती. त्यामुळे काँग्रेसच्या काही कार्यक्रमांना त्याचा पाठिंबा होता. हिंदू महासभेला देखील या पत्रात स्थान मिळत असे.

काँग्रेसचे पत्र म्हणून 'महाराष्ट्र' दैनिक स्वरूपात चालविण्याची व त्याकरता आवश्यक भांडवल देण्याची सूचना गोपाळराव ओगले यांनी नाकारली होती. महाराष्ट्राच्या 'ट्रस्ट डीड' मध्ये पुढे या पत्राचे जे धोरण स्पष्ट करण्यात आले. "जनतेला स्वातंत्र्य संपादनार्थ समर्थ करण्याला शक्य ते उत्तेजन द्यावे आणि राष्ट्राच्या प्रगतीचे मार्ग प्रतिपादन करीत असतांना कोणाचीही भीडमुर्वत न राखता निर्भयपणे योग्य मार्गदर्शन करावे" असे ओगले यांनी नोंदून ठेवले होते.

'महाराष्ट्र' या पत्राला नागपूर जिल्ह्यातच नव्हे तर एकूणच विदर्भ, मध्य-प्रांतातील पत्रकारितेच्या संबंधात फार मोठे महत्त्व आहे. याचे कारण पत्रकारितेचे वर स्पष्ट केलेले आदर्श असे धोरण, तात्विक बैठक असूनही वृत्तपत्र म्हणून त्याचे असलेले व्यापक स्वरूप व राजकारण हा मुख्य विषय असला तरी इतर सर्वच घडामोंडींची दक्षतेने दखल घेणारी 'प्रोफेशनॅलिझम' अथवा व्यावसायिक शिस्त संबोधता येईल अशी दृष्टी पत्रकारितेच्या संबंधात प्रथमच या पत्राने दिली.

पुढे 'तरुण भारत' हे पत्र काढणारे मराठीचे प्रख्यात लेखक, साहित्यिक, कादंबरीकार ग. त्र्यं. माडखोलकर यांना ओगले यांनी मदतीला घेतले. 'महाराष्ट्र' चे वाङ्मय परीक्षणाचे, साहित्य विषयक चर्चेचे सदर ग. त्र्यं. माडखोलकरांमुळे महाराष्ट्रभर गाजले. माडखोलकर १९२४ साली 'महाराष्ट्र' पत्रात रुजू झाले. मार्च १९३० पर्यंत ते सहसंपादक होते, तर पुढे १३ जून १९४० पर्यंत कार्यकारी संपादक (एडिटर-इन-चार्ज) होते. (लेले, रा. के. पूर्वोक्त, पृ. ५२६.)

माडखोलकरांच्या सदरामुळे 'महाराष्ट्र' हे पत्र केवळ नागपूर-विदर्भातच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रात गाजले. केवळ राजकारण वा मतप्रचार एवढेच वर्तमानपत्राचे कार्य मानल्या गेलेल्या त्या दिवसात वृत्तपत्राबाबतची ही चौकट बदलवून वृत्तपत्राचा प्रसार करून दाखवण्याचा ओगले यांचा हा प्रयोग वृत्तपत्रांच्या इतिहासात महत्त्वाचा मानला जातो. वृत्तपत्रांना ही नवी दृष्टी दादासाहेब ओगले यांनी दिली. वृत्तपत्रांच्या नव्या वळणाला ती पोषक ठरली.

'अवशेष' या ग्रंथातील माडखोलकरांची एक आठवण रा. के. लेले यांनी मराठी वृत्तपत्रांच्या इतिहासात मांडली आहे ती अशी की, 'महाराष्ट्र'मध्ये सिनेमाचे पान सुरू करण्याची सूचना माडखोलकरांनी केली तेव्हा सिनेमाचे पान सुरू करायचे तर मग 'महाराष्ट्र'मधून भविष्य का देऊ नये अशी विचारणा ओगले यांनी केली. त्यात उघडच खोच होती. खपाच्या किंवा जाहिरातीच्या लोभाने सिनेमाचे सचित्र पेज 'महाराष्ट्रा'त घालण्यात किंवा भविष्याचे सदर सुरू करण्यात आपल्या वर्तमानपत्राची अवनती आहे असा त्यांचा अभिप्राय होता असे माडखोलकरांनी सांगितले आहे. (लेले, रा. के. पूर्वोक्त, पृ. ५२६-२७.) नागपुरात देखील वृत्तपत्र चालविण्यामागच्या भूमिकेत कसा बदल होत गेला हे जाणून घेण्याच्या दृष्टीने हे उदाहरण ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे आहे. याच ठिकाणी दादासाहेब ओगल्यांनी वर्तमानपत्रविषयक भूमिकेबाबत आपले मत मांडले ते असे की, "वर्तमानपत्रांनीच लोकांना हरएक बाबतीत गुणग्राहक बुध्दीने उत्तेजन दिले पाहिजे". त्याचे कारण ते सांगतात की, "आपल्या या परतंत्र देशात कोणत्याही नवीन उपक्रमाला राजाश्रय मिळण्याची आशा नाही. दोष अशा खुबीने दाखवावेत, की माणसाला त्याचे वैगुण्य तर कळावे, पण तो नाउमेद मात्र होऊ नये. महाराष्ट्रातील सगळ्या लोकोपयोगी उपक्रमांना वर्तमानपत्र हाच एक काय तो सद्य:स्थितीत आधार आहे".

ज्या व्यक्तिंनी महाराष्ट्रात काही लोकोपयोगी कार्य करून समाजाच्या प्रगतीला हातभार लावला असेल त्यांच्यावर अमर्याद टीका करणे किंवा कोणाची खाजगी बिंगे बाहेर काढणे अशा बाबींना 'महाराष्ट्रा'मध्ये स्थान मिळत नसे, (लेले, रा. के. पूर्वोक्त, पृ. ५२६-२७.)

वैचारिक औदार्याचे धोरण असल्याने 'महाराष्ट्र'चा दृष्टिकोन व्यापक व प्रगमनशील राहिला. सामाजिक, राजकीय अशा सर्व बाबतीत 'महाराष्ट्र'ने आपली भूमिका कधी सोडली नाही. 'महाराष्ट्र' मध्ये विविध विचारसरणींना स्थान मिळाले नाही असे सहसा कधी झाले नाही. (लेले, रा. के. पूर्वोक्त, पृ. ५२६-२७.)

स्वदेशीचा प्रचार व लोकसंग्राहक वृत्ती हे दादासाहेब ओगल्यांच्या काळातील 'महाराष्ट्र' चे वैशिष्ट्य सांगितले जाते. सामान्य माणसांच्या वास्तविक गाऱ्हाण्यांचा पाठपुरावा करणारा 'महाराष्ट्र' संशोधकांनाही जवळचा वाटे. म. म. वा. वि. मिराशी या थोर संशोधकाने याबाबत ग्वाही दिली होती (लेले, रा. के. पूर्वोक्त, पृ. ५२६-२७.).

महाराष्ट्र व नागपूर-वऱ्हाड यांच्यामध्ये कायम संबंध दाखविणाऱ्या दुव्यासारखी कामगिरी 'महाराष्ट्र'ने दीर्घकाळ केली. 'महाराष्ट्र' पत्राची मध्यप्रांताच्या राजकारणातील कामगिरी म्हणजे महाराष्ट्रातील 'केसरी' किंवा संयुक्त प्रांतातील 'लीडर' पत्राच्या कामगिरीसारखी अतुलनीय असल्याचे 'ज्ञानप्रकाश' चे ख्यातनाम संपादक काकासाहेब लिमये यांनी म्हटले होते. (लेले, रा. के. पूर्वोक्त, पृ. ५२९.)

मध्यप्रांतात मराठी भाषा, महाराष्ट्रीय संस्कृती आणि महाराष्ट्रातील राजकारण यांचा कोमेजून चाललेला अभिमान 'महाराष्ट्र' पत्राद्वारे ओगले यांनी वाढविला व जोपासला. 'महाराष्ट्र' बोले आणि मध्यप्रांत हले, अशी प्रतिष्ठा या पत्राने एकेकाळी संपादन केली होती. 'महाराष्ट्र' चे वजन केवळ मराठी भाषिकांतच नव्हे, तर हिंदी भाषिक जनतेतही बरेच होते. (लेले, रा. के. पूर्वोक्त, पृ. ५२९.)

ओगले यांच्या लेखणीत सौजन्य व उपरोध असे परस्पर विरोधी वाटणारे गुण होते. (लेले, रा. के. पूर्वोक्त, पृ. ५२९.)

'महाराष्ट्र' पहिली सतरा वर्षे साप्ताहिक स्वरूपातच निघे. १९३० च्या मार्च महिन्यात ते द्विसाप्ताहिक झाले. दैनिकात त्याचे रुपांतर १९४७ साली झाले. ओगले यांना पैसे देऊन हे काँग्रेसचे पत्र करण्याची आलेली सूचना त्यांनी नाकारली होती. पण त्यांच्या मृत्यूनंतर काही वर्षातच 'महाराष्ट्र' वर आपले स्वातंत्र्य गमावून पक्षीय साखळीला बांधले जाण्याची आपत्ती कोसळली. एकांगी स्वरूपामुळे खप व प्रतिष्ठा कमी झाली. काँग्रेसचा आर्थिक पाठिंबा राहूनही पत्र सावरले नाही. ओगले मंडळींनी पुढे दैनिक 'महाराष्ट्र' चे पब्लिक लिमिटेड कंपनीत, श्री शिवराज प्रकाशन या नावाने रुपांतर केले. १९५१ साली हा बदल झाला. १९६० पर्यंत पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांनी संपादकाची सुत्रे स्वीकारली. त्यांच्यानंतर मधुकर राजाभाऊ डांगे हे संपादक झाले. (लेले, रा. के. पूर्वोक्त, पृ. ५३०-३१.)

१४ मार्च १९७५ रोजी ही कंपनी नादारीत काढण्याचा ठराव संचालकांनी केला. हे पत्र बंद होऊ नये व बेकारीचीही आपत्ती कोसळू नये म्हणून कर्मचाऱ्यांनी सहकारी तत्वावर हे पत्र चालू ठेवण्याचे धाडस करून पाहिले. प्रत्येकाने केवळ १०० रुपये महिना पगार घेऊन सहकारी तत्त्वावर हे पत्र चालू ठेवण्याचा प्रयत्न केला. चपराशापासून संपादकांपर्यंत सर्वांना समान वेतन असा हा प्रयोग होता. त्रिंबक गोपाळ देशमुख यांनी संपादनाची

जबाबदारी स्वीकारली. या प्रयोगाचे श्रेय दैनिक महाराष्ट्र श्रमीक संघाचे अध्यक्ष डी. के. गोखले यांच्याकडे जाते. पण हा प्रयोग फार दिवस चालू शकला नाही. १९७७ साली हे पत्र शेवटी बंद करावे लागले. (लेले, रा. के. पूर्वोक्त, पृ. ५३०-३१.)

'महाराष्ट्र' पत्राने स्वत:ची अशी एक परंपरा निर्माण केली होती. 'महाराष्ट्र' पत्र अस्तंगत झाले तरी मराठी वृत्तपत्रांच्या इतिहासातील एक मैलाचा, खुणेचा स्तंभ हे त्याचे स्थान मात्र कायम राहणार आहे. (लेले, रा. के. पूर्वोक्त, पृ. ५३०-३१.)

नागपूर जिल्ह्यात दै. तरुण भारत, दै. लोकमत, बरोबरच दै. सकाळ, दै. लोकसत्ता, दै. नवराष्ट्र, दै. नवभारत यांच्या विशेष प्रादेशिक आवृत्ती निघतात, त्यांचे या क्षेत्रातील योगदान उल्लेखनीय आहे. जिल्ह्यातील एकूण प्रकाशित होणाऱ्या दैनिकांची यादी शेवटी दिली आहे.

आता नव्याने संगणक युगात पत्रकारितेच्या क्षेत्रात परिवर्तन होत असून सिटी केबल (यूसीएन), इन केबल आणि प्रमुख वाहिन्या या क्षेत्रात उतरल्या आहेत. सध्या पाच डॉट-कॉम बुलेटिन नेटवर्क उपलब्ध आहेत. उपग्रह बातमीपत्र आणि डॉट-कॉम बातमीपत्रे नागपुरात सुरू आहेत.

संगीत

पंडित, सुलभा, सर विश्वेश्वर अभियांत्रीक महाविद्यालयात प्रोफेसर (नागपूर) यांनी या भागाचे लेखन केले आहे.

नागपूर शहराची संगीत परंपरा जुनीच आहे. राजाश्रय आणि रसिकांचा आश्रय यामुळे नागपुरात सांगीतिक वातावरण चांगले तयार झालेले आहे. देशाच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या नागपूर शहराला पूर्वीपासूनच महत्त्व प्राप्त झालेले आहे. विदर्भातील वेदाध्ययनाची परंपरा, मंदिरातील संगीत-परंपरा, राजघराण्यातून रसिकतेने जोपासलेली संगीत-परंपरा, त्याचप्रमाणे लोकसंगीताची आणि संत कवींनी जोपासलेली भक्ती संगीताची परंपराही लक्षणीय आहे.

श्रीमंत जानोजीराजे भोसले व त्यांचे पुत्र रघुजीराज व लक्ष्मणराजे भोसले यांना संगीताच्या दृष्टीने महत्त्व आहे. पं. अनंतशास्त्री काशीकर यांनी अभिजात संगीताची परंपरा सुरू केली. बाबाजी घुले शास्त्रींनी शिष्य संप्रदाय निर्माण केला. बापूजी जोशी यांनी गायनाच्या जाहीर बैठकींचा प्रारंभ केला, तर बापूजी बेदरकर यांनी पहिली गायनशाळा स्थापन केली. याखेरीज साधू, पाठक या घराण्यांनी कीर्तन परंपरा चालविली अशी नोंद नागपूरमधील एक संगीत समीक्षक नारायण मंगरुळकर यांनी केली आहे.

हा काळ पाहू जाता साधारण १) १८५० ते १९०० हा पहिला कालखंड, २) १९०० ते १९४७ हा दुसरा कालखंड ३) १९४७ ते १९९७ हा तिसरा कालखंड गृहित धरला आहे. उपलब्ध माहितीनुसार हे कालखंड मानले आहेत.

नागपूर शहरातील संगीत परंपरेचा स्रोत पाहू जाता थेट वैदिक शास्त्री पंडितांच्या संगीतोपासनेपर्यंत जावे लागते. वेदाध्ययन करीत असतानाच त्यांनी संगीतोपासनाही केली. वेदपठण, अध्यापन, ज्योतिषशास्त्र, भिक्षुकी असा उपजीविकेचा व्यवसाय करीत असतानाच त्यांनी साहित्य संगीतादी कलांचाही उत्तम व्यासंग केल्याचे निदर्शनास येते. भजन, कीर्तन, गंगालहरी, प्रवचन, नाट्य, गायन, वादन इत्यादी सर्व शास्त्रादी कलांचा आनंद घेऊन तो

लोकांपर्यंत पोहोचविण्याचे त्यांचे कार्य उल्लेखनीय होय. नागपूर शहर हे राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक उन्नतीचे केंद्रच होते. भोसले राजांच्या कलाश्रयामुळे बऱ्याच वैदिक पंडितांची घराणी नागपुरात तयार झाली. पहिले रघुजीराजे भोसले यांच्यापासून ते चौथ्या रघुजीपर्यंत सर्वांनीच विद्वान पंडितांना उदार आश्रय दिला. या पंडितांनी संगीताचीही उपासना केल्याचे दिसते. भोसले राजे लोकसंग्रही, वेदशास्त्राभिमानी होते. पंडित परंपरा, संगीतशास्त्र आणि कला यांना त्यांनी उदार आश्रय दिला. संगीताच्या दृष्टीने ग्वाल्हेर घराणेच नागपुरात प्रथम रुजले असे लक्षात येते.

१) **पंडित अनंतशास्त्री काशीकर :** अंदाजे दीडशे वर्षापूर्वी हद्दखां व हस्सूखां साहेबांच्या परंपरेतील हे गायक प्रचार दौऱ्यासाठी नागपूरला येऊन इथेच स्थायिक झाले. ते वेदविद्येत तर पारंगत होतेच, परंतु कुशल संगीतज्ञ देखील होते. त्यांनीच नागपूर शहरात प्रथम संगीताची परंपरा सुरू केली. बाबाजी घुले शास्त्री यांना त्यांनी संगीत विद्येत पारंगत केले व शिष्य परंपरा सुरू करण्याचा प्रथम मान मिळविला. त्यांचेच आणखी एक शिष्य होते गडीबा घाटे. परंतु त्यांची परंपरा ठळकपणे दिसत नाही.

२) **बाबाजी घुले शास्त्री** (१८३५-१८९२) : अनंत शास्त्री काशीकरांचे हे शिष्य. अनंतशास्त्रींकडून संगीतविद्या घेऊन त्यांनी बापूजी जोशी, बापूजी बेदरकर इत्यादी शिष्य तयार केले. हे प्रवचनकार तर होतेच, त्याशिवाय उत्तम भजनेही म्हणत. गंगालहरी सुरेल आवाजात रागदारीत म्हणत अशी त्यांची प्रसिध्दी होती.

३) **बापूजी जोशी :** नागपूरच्या इतिहासात एक अग्रगण्य संगीतकार म्हणून मार्तंड बापूजी जोशींचा क्रम लागतो. राजदरबारात व रसिकांसमोर गायनाचे कार्यक्रम करण्याचे प्रथम श्रेय त्यांनाच द्यावे लागते. त्यांचे एक चिरंजीव रामभाऊ गात असत, शिवाय ते नाटक कंपनीतही होते. द्वितीय चिरंजीव विनायक भटजी उत्तम गायक म्हणून प्रसिध्द होते, परंतु त्यांचे अकाली निधन झाले. तिसरे चिरंजीव कामठीस असत. बापूजी जोशी मंदिरात पंचपदी व भजने म्हणत. रंगपंचमी व वसंत पंचमीला त्यांची नागपुरात बैठक ठरलेली असे. एका बैठकीत तर पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर उपस्थित होते. बापूजी उत्तम वाग्गेयेकार होते. बऱ्याच चिजा, तराणे, भजने त्यांनी रचली होती. 'हा पापी घे शंकरा । जगी मज कोणी न तुजवीणा' हे त्यांचे आवडीचे पद होते असे जुने जाणकार सांगतात. नागोराव बोबडे हे त्यांचे खास शिष्य होते.

४) **बापूजी बेदरकर :** भिक्षुकी व संगीतविद्येचा मेळ असलेले हे घराणे या क्षेत्रात प्रसिध्द होते. बाबाजी घुले शास्त्री यांचे ते शिष्य. त्यांची दोन्ही मुले म्हणजे थोरले चिंतामणराव व मोरेश्वरराव अनुक्रमे हार्मोनियम व गायनात तरबेज होते. बापूजींनी १९१० ते १९२६ पर्यंत 'शारदा संगीत विद्यालय' चालविले. उत्तम संगीत अध्यापक म्हणूनही त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. 'संगीत कलादर्श' नावाचे पुस्तक त्यांनी प्रकाशित केले होते.

५) **हरीभाऊ ताम्हणकर** (जन्म १८९०) : व्यवसायानिमित्त नागपूरला स्थायिक झाले. बळीरामपंत पंडे यांच्याकडून त्यांनी तबला शिक्षण घेतले होते. तळ्याच्या पाळीवरील गणपती मंदिराचा त्यांनी जीर्णोध्दार केला.

६) **बाबूराव जोशी** उर्फ **बाळकृष्ण नारायण जोशी** (जन्म १८९४) : हार्मोनियम, ऑर्गन, तबलावादनात अत्यंत निष्णात. त्यांनी बळीरामपंत पंडे यांच्याकडून तबला वादनाचे

धडे घेतले. पंडित तानाजी पंडित यांच्याकडून हार्मोनियमचे धडे घेतले. तसेच सख्याहरी देशपांडे यांच्याकडून ऑर्गनचे धडे घेतले. सवाई गंधर्व, रामभाऊ गुळवणी, मा. कृष्णराव इत्यादी मातब्बर मंडळी नागपूरला आली असता त्यांना हार्मोनियम, तबल्याची साथ देत. दादाबुवा देवरस यांना कीर्तनात पेटीसंगत करीत. त्यांची कन्या व नातू पंडित अजय पोहनकर यांनी ही परंपरा पुढे चालविली आहे.

७) **बाळासाहेब बक्षी** (१८९६-१९६९) : यांच्या गायनाची सुरूवात विनायक भटजी जोशींकडे झाली. केशवराव भोसले व मा. कृष्णराव यांच्याकडूनही त्यांनी मार्गदर्शन घेतले. राजाभैया पूछवाले यांच्याकडूनही मार्गदर्शन मिळण्याची संधी त्यांना मिळाली होती. त्यानंतर अखेरपर्यंत भास्करबुवा बखले यांचे शिष्यत्व पत्करले. १९२३ मध्ये नागपूरला स्थायिक झाले. १९२३ ते ३४ पर्यंत 'भारत गायन समाज' ही गायनसंस्था त्यांनी चालविली. अब्दुल करीमखाँ यांच्याकडून देखील काही मार्गदर्शन त्यांना लाभले होते. त्यांचे बंधु आप्पासाहेब बक्षी हे उत्तम गायक-नट म्हणून प्रसिध्द होते.

८) **नाना जोग** (जन्म १८९८) : साहित्य, संगीत नाटकांची विशेष आवड. संगीत नाटकांसाठी धनवटे रंगमंदिराची निर्मिती केली. ते सारंगी उत्तम वाजवित. संगीत, नाटक, बैठकी यात पारंगत होते.

९) **पंढरीनाथ शास्त्री घाटे :** गायन, नाट्य, नृत्य, तबला यात प्राविण्य व संस्कृतचा व्यासंग असलेले प्रवचनकार होते. वेदवेदांग, वाङ्मय, संगीत, भाषण यात त्यांनी कौशल्य मिळविले होते. त्यांचे शिष्य शंकरराव चट्टे संस्कृतज्ञ म्हणून ख्यातनाम झाले.

१०) **नागोरावजी बोबडे :** बापूजी जोशींचे शिष्य असून एक विद्वान संगीततज्ञ, शास्त्रकार, चोखंदळ व उत्तम ख्यालगायक म्हणूनही प्रसिध्द होते. पोद्दारेश्वर राममंदिरात ते रोज गायनाची हजेरी लावीत. चतुर संगीत महाविद्यालयात शिक्षक म्हणून बरीच वर्षे त्यांनी काम केले. त्यांचा नातू राजेश्वर सदाशिव बोबडे दर्जेदार कलावंत म्हणून प्रसिध्द आहे.

११) **गुणवंतराव वाकेकर :** नागपूरमधील एक ख्यातनाम हार्मोनियम सम्राट व गुणी वादक म्हणून ज्ञात आहेत. साथसंगत व सोलोवादनात ते कुशल होते. विदर्भातील 'गोविंदराव टेंबे' म्हणून त्यांची प्रसिध्दी होती. 'सरस्वती संगीत विद्यालय' ही संस्था स्थापन करून चालविली. त्यांचे चिरंजीव बाबासाहेब उत्तम बेलावादक होते. त्याचप्रमाणे बंधु श्री. श्रीधरराव वाकेकर उत्तम तबलापटू म्हणून विख्यात होते. ते व्हायोलीनही उत्तम वाजवीत असत. एकंदरीत त्यांचे घराणे एक कलावंत घराणे म्हणून ज्ञात होते.

१२) **भैय्याजी चौरीकर :** गोविंदराज विलायची यांचे शिष्य. हार्मोनियम, सोलो व साथसंगतीत ख्यातकीर्त होते. पूर्ण भारतभर दौरा करून अनेक थोर कलावंतांना साथसंगत केली होती. 'सिध्देश्वर संगीत विद्यालय' ही संस्था त्यांनी काही वर्षे चालविली.

१३) **प्रभाकरराव उर्फ भटू जोशी :** निसर्गदत्त गोड आवाज असलेले गायक म्हणून ज्ञात होते. १९२३ मध्ये 'भारत गायक समाजात' गायन शिक्षण सुरू केले. त्यानंतर प्रभाकरराव प्रवर्तकांकडे गाणे शिकले. यादवराव जोशी व प्रभाकरराव जोशी ही जोडी त्यावेळी प्रसिध्द होती. राजाभैय्या पूछवालेंच्या परीक्षेत ते उतरले होते. १९२९ मध्ये

व्यंकटेश थियटरमध्ये प्रथम गायनाचा जलसा केला होता. पंजाबी ढंगाच्या ठुमरीचा प्रारंभ नागपुरात प्रथम त्यांनीच केला होता. रामभाऊ गुळवणी, सवाई गंधर्व, बाल गंधर्व यांच्या गायनाची छाप त्यांच्यावर होती. त्यांचा आवाज सुरेल खडा होता. भिंगरीसारखी चमत्कारीक तान, ढंगदार, ठसकेबाज गायन अशा शैलीसाठी ते प्रसिध्द होते. ख्याल, ठुमरी, दादरा, नाट्यपद, भावगीत सर्व गान प्रकारावर त्यांचे प्रभुत्व होते.

१४) **तबलापटू बाळासाहेब आठवले** (जन्म १९१५) : हिंगणे गावाजवळ खेड्यात जन्म झाला. १९२५ मध्ये नागपूरला स्थायिक झाले. पानसे घराण्याचे घरंदाज तबला वादक बळीरामपंत पंडे यांच्याकडून शिक्षण घेतले. हिराबाई बडोदेकर यांच्या नाटक कंपनीत तबलावादक होते. पुढे मुंबईला जुगनखाँ उस्ताद यांच्याकडे गंडाबंद शागीर्द म्हणून शिक्षण घेतले. याखेरीज इंदोरचे धूलजीखाँ, मीरतचे हबीबुद्दीनखाँ, थिरकवा, अमीर हुसेन यांच्याकडूनही मार्गदर्शन घेतले. प्रभाकरराव जोशी व बाळासाहेब आठवले ही जोडी त्याकाळी प्रसिध्दच होती. उत्तम साथसंगतकार म्हणून त्यांची ख्याती होती. जराडा, दिल्ली पूरब किनार व चाटीचा बाज या सर्वात तरबेज होते. डाव्या उजव्याचे संतुलन, अनवट बोल प्रकार, लयीचा साधेपणा, स्पष्टबोल, गोड मुलायम हात ही त्यांची वैशिष्ट्ये होती. नागपूर आकाशवाणीवरील पहिले तबलावादक स्टाफ आर्टिस्ट म्हणून नेमणूक झाली होती.

१५) **मनोहरराव बर्वे** (जन्म १९१९) : जन्म चंद्रपूरला, परंतु सर्व शिक्षण व नंतरचे वास्तव्य नागपुरात झाले. विनायकराव पटवर्धन यांच्याकडे रीतसर शिक्षण घेऊन त्यांनी ग्वाल्हेरी गायकी आत्मसात केली. ठुमरी व भजनेही ते उत्तम म्हणत. अवघड तानबाजी, जबड्यांच्या ताना ही त्यांची विशेषता होती.

१६) **दत्तात्रय बोधनकर** (जन्म १९२३) : लखनौ घराण्याचे जहांगीरसाहेब यांच्याकडे त्यांचे संगीत शिक्षण झाले. डी. व्ही. पलुस्कर, राजाभाऊ कोगजे यांना साथसंगत केली आहे. आकाशवाणीवर 'अ' कलाकाराचा मान त्यांना मिळाला होता. ते सोलो व साथसंगत करण्याकरिता प्रसिध्द होते. दिल्ली व पूरब घराण्याचीही शैली त्यांनी कमावली होती.

१७) **भैय्याजी वडसमुद्रकर** (जन्म १९३०) : प्रथम घरी वडिलांकडून व नंतर बळीरामपंत पंडे यांच्याकडून मार्गदर्शन घेतले. याखेरीज कोलबाजी पिंपळघरे यांच्याकडून तबला, पखवाजचे मार्गदर्शन त्यांना मिळाले होते. त्यांचा गळाही गोड असल्यामुळे त्यांनी गायनाचेही शिक्षण घेतले होते. अमृतराव निस्ताने, श्रीधरराव ढगे, भास्करराव मोराणे, शंकरराव सप्रे यांच्याकडून मार्गदर्शन घेतले. चतुरस्त्र कलाकार म्हणून ते ख्यात होते. भास्कर वाशीमकर हे शिष्य त्यांनी तयार केले.

१८) **गोविंदराव विलायची :** १८७८ मध्ये नागपूर येथे जन्म. वडील शिवरामपंत यांचेकडून तबला वादनाचे प्राथमिक धडे त्यांनी घेतले. श्रीमंत रसिकग्रणी राजे लक्ष्मणराव भोसले यांचा आश्रय मिळाला. राजाश्रयामुळे संगीताची त्यांना जोपासना करता आली. राजदरबारातील तबला उस्ताद मेहबूबखान यांच्याकडून त्यांनी शिक्षण घेतले. त्याचबरोबर त्यांनी मृदंगाचार्य रास्तेबुवांकडून मृदंगाचाही सराव केला. लाल साहेबांकडून शिकलेल्या संतूर, हार्मोनियमवर त्यांचा हातखंडा होताच. जलतरंग, सारंगी इत्यादी वाद्यांवरही त्यांचे

प्रभुत्व होते. म्हणूनच त्यांना वादनाचार्य म्हणून ओळखत. केशवराव भोसले, पं. मोतीराम (पं. जसराजांचे वडील) यांच्याशी त्यांचे घनिष्ट संबंध होते. त्यांच्या शिष्यांमध्ये जनार्दनपंत दारव्हेकर, माणिकचंद्र आगरकर, भैय्याजी चौरीकर, पुत्र श्यामराव विलायची इत्यादी गायनक्षेत्रातील मंडळींचा समावेश होतो. गायनाचा प्रसार आणि अध्यापन या क्षेत्रातील त्यांचे कर्तृत्व लक्षणीय होते. श्रीगुरु गायन वादनालयाचे संस्थापक म्हणून केलेले कार्य मोलाचे आहे.

१९) **बळीरामपंत पंडे** (१८८५-१९४५) : नागपूर जिल्ह्यातील मोहपा गावी जन्म. वडील मालगुजार व श्रीमंती थाटातले होते. त्यांना वादनाची आवड असल्यामुळे त्यांनी मुलाला या क्षेत्रात संधी दिली. पानसे घराण्याचे वादन व शुध्द बाज आत्मसात करून नागपुरात आणण्याचे व प्रसार करण्याचे श्रेय बळीरामपंतानाच द्यावे लागते. पं. शंकरराव आलकुटकर हे त्यांचे पानसे घराण्याचे गुरू होते. त्यानंतर त्यांनी सखारामपंत आगले, कुदौसिंग घराण्याचे संभुप्रसाद पखवाजी यांच्याकडून शिक्षण घेऊन मृदंग, ताल, लय व गणित शास्त्रात नैपुण्य प्राप्त केले. रघुजीराजे भोसले यांनी त्यांना राजदरबारात नेले. तालांचे विशिष्ट बंधन, हातावर टाळ्या देऊन मात्रा व बोल मुखोद्गत करणे, लयकारी अंगी बांधणे, गणित पक्के करणे हे त्यांच्या पानसे घराण्याचे वैशिष्ट्य ते सांभाळत असत. निळकंठराव मूर्ते आपल्या गुरुंचा स्मृतिदिन साजरा करतात. १९४५ मध्ये बळीरामपंतांचे देहावसान झाले.

२०) **पं. शंकरराव प्रवर्तक :** यांचा जन्म १८९० मध्ये अमरावती जिल्ह्यात झाला असला तरी त्यांची कर्मभूमी नागपूर हीच होती. त्यांनी अत्यंत कष्टाने गानसाधना केली. अन्नछत्रात भोजन करून पं. विष्णुबुवा फलटणकर यांचेकडे त्यांनी गानसाधनेची सुरूवात केली. १९१२ मध्ये बनारसला प्रयाण करून पं. गोपाळ शास्त्री नेते, पं. भालचंद्रजी तेलंग यांच्याकडे संस्कृतचा अभ्यास केला. पं. बाळकृष्णबुवा बादल यांच्याकडे धृपद गायन शैलीचा अभ्यास केला. अब्दुल करीम खाँ, भास्करबुबा बखले यांच्याही मार्गदर्शनाचा लाभ त्यांना झाला होता. पुढे मात्र त्यांनी अध्यापन हेच क्षेत्र निवडले. नागपूरमधील चार संस्थांचे संस्थापक व प्राचार्य म्हणून त्यांनी काम केले. कठोर शिक्षक, तापट स्वभाव याबद्दल ते प्रसिध्द होते. परंतु त्यांनी चांगले शिष्य तयार केले. प्रभाकरराव जोशी, यादवराव जोशी, व्यंकटेश भालेराव, सावळाराम मास्तर यांच्यासारखे कितीतरी शिष्य त्यांनी तयार केले. त्यांनी 'चतुर संगीत महाविद्यालय' (१९२२), 'अभिनव संगीत विद्यालय' (१९२४), 'हिंदुस्थानी शिक्षण प्रसारक मंडळ' (१९२६), 'भातखंडे म्युझिक कॉलेज' इत्यादी संस्था महाल भागात स्थापन केल्या.

२१) **रावसाहेब वामनराव वाडेगावकर :** जन्म १८९७ मध्ये नागपूर येथे झाला. वामनराव वाडेगावकर व त्यांचे भाचे स्व. सावळाराम हे अंध विद्यालयाचे सहसंस्थापक होते. १९१३ साली केशवराव शिरवळकर नागपूरला आले असता वामनरावांच्या वडिलांनी त्यांना घरी ठेवून घेतले. ते अंध असूनही त्यांना इंग्रजी व मराठी साहित्याची जाण होती. तसेच त्यांना ब्रेल लिपीही अवगत होती. त्यांच्याकडे वामनराव व सावळाराम (खर्डे नवीस) यांचे शिक्षण सुरू झाले. पुढे वामनराव समाजकार्याकडे वळले तर सावळाराम संगीततज्ञ झाले. सन १९२८ मध्ये वामनरावांनी अंध विद्यालयाची स्थापना केली. १९६६ मध्ये वामनरावाचा मृत्यू झाला. परंतु संस्था आजही सुरू आहे.

अनुक्रमणिका

२२) **पं. शंकरराव सप्रे :** जन्म १९०१ मध्ये रत्नागिरीला झाला असला तरी कर्मभूमी नागपूरच ठरली. वडील नोकरीनिमित्त बडोदा येथे गेले असता शंकररावांचे संगीत शिक्षण तेथेच सुरू झाले. खाँसाहेब मौलाबदा आणि फैजमहंमदखाँ यांच्याकडे अध्ययन केले. पं. भास्करबुवा बखल्यांची तबलासंगतही ते अधून मधून करीत असत. त्यानंतर मुंबईत आल्यावर गांधर्व संगीत महाविद्यालयात प्रवेश करून श्रध्दापूर्वक विष्णु दिगंबरांना गुरुस्थानी मानले. भाटेबुवांच्या नाटक कंपनीत हार्मोनियम संगत करीत असता पं. भाटेबुवा व पं. मिराशीबुवा यांच्याकडून त्यांनी मार्गदर्शन घेतले. त्यानंतर नागपूर येथे पं. विष्णु दिगंबर पलुस्करजी यांच्या शुभहस्ते श्रीराम संगीत महाविद्यालय ही संस्था १९२६ साली सुरू केली. पं. विष्णु दिगंबर यांना पेटीवर साथसंगत करण्याची संधी त्यांना दोन वेळा मिळाली होती. त्यांच्या शिष्यशाखेत कै. डॉ. वसंतराव देशपांडे, रामचंद्र चितळकर (सी. रामचंद्र), तारापिल्ले अशा अनेकजनांचा समावेश होतो. त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव हार्मोनियम वादक म्हणून प्रसिध्दीस आले.

२३) **नारायणराव पाठक** (१९०५-१९७०) : यांचा जन्म ग्वाल्हेर येथे झाला असला तरी कर्मभूमी नागपूरच राहिली. शंकरराव प्रवर्तकांनी सुरू केलेल्या 'अभिनव संगीत विद्यालय' या गायनशाळेची सुत्रे त्यांनी प्राचार्य म्हणून सांभाळली. ख्याल, धृपद, धमार, तराणे, चीजा, रागविवेचन यावर त्यांचा भर होता. अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी विनामूल्य शिकविले. एक प्रेमळ शिक्षक म्हणून ते प्रसिध्द होते. त्यांच्या शिष्यांमध्ये दादाजी तुळणकर, भैय्यासाहेब सराफ, विद्याधर वझलवार, कृष्णराव कुर्वे इत्यादींचा समावेश होतो. त्यानंतर त्यांनी खैरागड येथेही अध्यापन केले. डोंगरगड येथे त्यांचे अखेरचे वास्तव्य होते.

२४) **अमृतराव निस्ताने** (जन्म १९०९) : राधोजी मुठाळ यांच्याकडे गायनाचा अभ्यास सुरू व नंतर पाठक गुरुजींकडून मार्गदर्शन मिळविले. भाटेबुवांची नाटक कंपनी नागपूर येथे आली असता 'दोन बायका' या संगीत नाटकाला त्यांनी संगीत दिले. भास्करराव मोरोणे यांच्या 'नाथ गायन वादनालयात' संगीत शिक्षकाचे कार्य केले. त्यांचा शिष्यवर्ग मोठा होता.

२५) **निळकंठराव मूर्ते** (जन्म १९१०) : पानसे घराण्याचे सुप्रसिध्द तबलापटू बळीरामपंत पंडे यांच्याकडे तबला शिक्षण घेतले. पोद्दारेश्वर राम मंदिरात ते सेवा करीत. १९३२ साली अंध विद्यालयातील अंधांना शिक्षण देण्याचे कार्य सुरू केले. ते अनेक वर्षे सुरू होते. डॉ. सुमती मुटाटकर यांना बरीच वर्षे तबला संगत केली. सावळाराम मास्तरांनाही खूप साथसंगत केली. प्रा. गोविंदराव बापट यांनीही त्यांना उदार आश्रय दिला होता. एच. एम. व्ही. ने सावळाराम मास्तरांची बासरी ध्वनिमुद्रिका काढली त्यावेळी त्यांना साथसंगत केली. बलवंत वादनालयात त्यांनी अनेक वर्षे अध्यापन केले.

२६) **नानाजी नाशीरकर** (जन्म १९१३) : त्यांचे वडील व काका संगीत क्षेत्राशी संबंधित होते. वडील तानबाजी उत्तम तबला वादक होते व काका विठ्ठलराव निष्णात हार्मोनियमवादक होते. त्यामुळे घरीच तबला व हार्मोनियम वादनाबरोबरच बेलावादनातही त्यांनी प्राविण्य मिळविले. १९३९ साली नागपूर येथे 'श्रीदत्त संगीत विद्यालयाची' त्यांनी स्थापना केली.

२७) **श्यामराव विलायची :** वादनाचार्य गोविंदराव विलायची यांचे एकुलते एक चिरंजीव.

त्यांनी १९३७ पासून श्रीगुरु वादनालयाचे प्राचार्यपद भूषवून सुत्रे सांभाळली. त्यांचा जन्म १९१६ मध्ये नागपुरात झाला. घरी वडिलांकडून त्यांनी गायन वादनाचे शिक्षण घेतले. हार्मोनियम, तबला, जलतरंग, सतार, बेला, दिलरुबा इत्यादी अनेक वाद्यांवर त्यांनी प्रभुत्व मिळविले होते. १९५२ पासून प्रयाग संगीत समितीचे परीक्षा केंद्र नागपूरला सुरू करून विद्यार्थ्यांना या परीक्षेला बसण्याची सुसंधी उपलब्ध करून दिली. त्यांचे अंगुलीचापल्य व स्वरलयींवरील प्रभुत्व अप्रतिम होते.

२८) **भैय्याजी वझलवार :** जन्म १९१६ मध्ये नागपूर येथे झाला. चतुर संगीत विद्यालयात सुरूवातीचे शिक्षण घेतल्यानंतर प्रवर्तक यांच्या 'अभिनव संगीत विद्यालया'तून पुढील शिक्षण मिळविले. १९३९ मध्ये मुर्शद खाँसाहेब अजीमबक्ष यांची भेट झाली. ते फकिरी वृत्तीचे संगीतकार होते. त्यांच्याकडे दर्ग्यात ताजबागेत जाऊन मार्गदर्शन घेतले. त्यांच्याकडून उत्तमोत्तम चीजा, अनवट बंदिशी मिळविल्या. १९३५ मध्येच त्यांनी 'श्री शारदा गायन वादनालयाची' स्थापना केली.

२९) **केशवराव ठोमरी** (जन्म १९१९) : अंध विद्यालयातील शिक्षक सावळाराम मास्तर यांच्याकडे त्यांचे प्रथम संगीताध्यापन झाले. व्हायोलीनची विशेष आवड असल्यामुळे दादासाहेब इंगळे व आप्पासाहेब सप्रे यांच्याकडून त्यातील तालीम घेतली. त्यांनी तयार केलेले शिष्य म्हणजे भगवानदास सोलंकी, रामभाऊ राऊत, सुधाकर देशकर इत्यादी होते.

३०) **प्रभाकरराव खर्डेनवीस :** जन्म १९२० मध्ये नागपूरजवळ पाटणसावंगी येथे झाला. १९२८ पासून पं. शंकरराव प्रवर्तक यांच्या अभिनव संगीत विद्यालयात त्यांचे गायन शिक्षण सुरू झाले. गुरुसमवेत मुंबईला जाऊन स्व. सवाई गंधर्व यांच्या निवासस्थानी त्यांनी आपले जाहीर गाणे सादर केले. त्यावेळी पं. भातखंडे यांनी त्यांचे कौतुक केले होते. लहान वयातच ग्वाल्हेरलाही बैठक गाजविली. १९४५ मध्ये प्रज्ञा विशारद उत्तीर्ण होऊन आकाशवाणीवर पहिला कार्यक्रम केला. हार्मोनियम, सारंगी, दिलरुबा इत्यादी वाद्यांवर त्यांचे प्रभुत्व आहे.

३१) **सावळाराम मास्तर** (जन्म १९०६) : सुरूवातीला हार्मोनियमचे शिक्षण गणपतराव दीक्षित यांच्याकडून घेतले. त्यानंतर गायनाचे रीतसर शिक्षण पं. शंकरराव प्रवर्तक यांच्या 'चतुर संगीत महाविद्यालया'त घेतले. त्यानंतर स्वत: अंध विद्यालयातील संगीत विभागात अनेक वर्षे अध्यापन केले. १९३३ मध्ये स्वत:चे 'सावळाराम संगीत विद्यालय' काढले. गायन व बासरीचे वर्ग सुरू केले. स्वत: बासरी उत्तम वाजवित. मुंबई व नागपूर आकाशवाणीवरून कित्येक बासरी वादनाचे कार्यक्रम केले आहेत. त्यांच्या बासरी वादनाच्या ध्वनिमुद्रिका एच.एम.व्ही कंपनीने मुंबईला तयार केल्या. बासरीच्या ध्वनिमुद्रणाचा पहिला मान बहुधा मास्तरांनाच मिळाला. हार्मोनियम व बासरी दोहोंवर त्यांचे प्रभुत्व होते. त्यांच्या शिष्य शाखेत डॉ. सौ. सुमती मुटाटकर, डॉ. सौ. उषा नंदनपवार, सौ. यमुना शेवडे यांचा समावेश होतो.

३२) **सुमती मुटाटकर** (जन्म १९१६) : माहेरचे अंबर्डेकर घराणे कलाप्रिय व रसिक. संगीताचे प्रारंभिक शिक्षण त्यांनी स्व. सावळाराम मास्तर यांच्याकडून घेतले. नंतर नथ्थुबुवा व वामनबुवा यांच्याकडून तालीम घेतली. लखनौच्या वास्तव्यात डॉ. श्रीकृष्ण रातंजनकर

यांच्याकडून त्यांना मार्गदर्शन मिळाले. ग्वाल्हेरच्या पं. राजाभैय्या पूछवाले यांच्याकडून ख्याल, टप्पा, धृपद, धमर, गीतगोविंद प्रबंधाचा सविस्तर अभ्यास केला. आग्रा घराण्याच्या विलायत हुसेन खॉ यांच्याकडून आग्रा घराण्याची तालीम मिळाली. रसुलनबाई यांच्याकडून ठुमरीचे मार्गदर्शन मिळाले. गजानन रावट जोशी, उस्ताद मुश्ताक हुसेन खाँ यांच्याकडून दुर्मिळ चीजा हस्तगत केल्या. प्रसिध्द पखवाजवादक गोविंदराव बऱ्हाणपूरकर यांची साथसंगत व सहकार्य मिळाले. चिकाटी व ज्ञान- लालसा व अर्थातच चांगल्या गुरुंचे मार्गदर्शन असा सुयोग यांच्या बाबतीत जुळून आला. १९४९ मध्ये संगीताचार्य पदवी मिळविली. लेखनाची आवड असल्यामुळे संगीतावर अनेक शोध निबंध लिहिले. लखनौ विद्यापीठाची 'आचार्य' पदवी मिळविली. १९४३ मध्ये आकाशवाणीवर कार्यक्रम केला. संगीतावरील संशोधनपर लेखन ही त्यांची फार मोठी जमेची बाजू आहे. दिल्लीला डायरेक्टर ऑफ म्युझिक या पदावर दिल्ली विद्यापीठात विभाग प्रमुख व डीन म्हणून कुशलतेने कार्यभार सांभाळला.

३३) **श्रीधर ढगे** : 'अ' श्रेणीचे आकाशवाणी गायक. जन्म १९२० मध्ये झाला. वडिलांकडून संगीत कलेचा वारसा मिळाला. वडील अमरावतीच्या नामदेव बुवांकडून तालीम घेत असत. मौलाबक्ष (बडोदे) यांच्या दुर्मिळ चीजा त्यांना नागदेव बुवांकडून मिळाल्या. श्रीधररावांना 'मनोहर संगीत नाटक मंडळीत' वास्तव्य व गंधर्वांच्या गायनाचे संस्कार मिळाले. तुकडोजी महाराजांच्या भजन मंडळीतही ते काही वर्षे रमले होते. त्यानंतर त्यांच्या सल्ल्याने नागपूरला स्थायिक होऊन गोविंदराव विलायची यांचे शिष्य बनले. मोहनलाल मिश्र यांच्याकडून प्रथम मार्गदर्शन घेतले. त्यानंतर नानाजी नाशीरकर यांच्याकडून त्यांच्याच श्रीदत्त संगीत विद्यालयात मार्गदर्शन घेण्याचा योग जुळून आला. याच सुमारास नानाजींच्या सहवासात असताना पं. जगन्नाथबुवा पंढरपूरकर यांच्याकडून मोलाचे मागदर्शन मिळाले. पुढे त्यांनी चंपाकली नायक रागाची निर्मिती केली. एच.एम.व्ही. कंपनीने त्यांच्या मधुवंती, खमाज ठुमरी व भावगीते यांच्या ध्वनिमुद्रिका काढल्या आहेत. स्वरचित रचना सादर करण्याकडे त्यांचा कल होता. ख्याल, ठुमरी, दादरा, भजने इत्यादी अप्रतिम सादर करीत. ताल व लयीवर त्यांचे विशेष प्रभुत्व होते.

३४) **धनंजय पुजारी** (जन्म १९२१-६९) : यांचे मूळगाव वरणगाव, परंतु मंदिरातील पुजारीपणामुळे 'पुजारी' हेच आडनाव रूढ झाले. वडील स्व. हरिभाऊ वरणगावकर विख्यात सतार वादक होते. उत्तम गायकही होते. वडिलांकडून रीतसर मार्गदर्शन घेतले. १९४९ मध्ये नागपूर आकाशवाणीवर स्टाफ आर्टिस्ट म्हणून रुजू झाले. त्यांच्या वादनात किराणा घराण्याच्या बंदे अलीखाँ, मुरादखाँ अशा परंपरागत संगीतकारांच्या वादनाची छाप दिसत असे. स्वरलालित्य आणि उत्तम लयकारी हे त्यांचे वैशिष्ट्य होते. त्यांच्या शिष्य शाखेत श्याम नायडू, रामदास सराफ, यशवंत देव इत्यादींचा समावेश होतो. विदर्भाचे रविशंकर म्हणून त्यांना ओळखले जाई.

३५) **कोलबाजी पिंपळघरे** (जन्म १९२४) : पानसे घराण्याचे अधिकारी कलावंत बळीरामपंत पंडे, शंकरराव अलकुटकर यांचे मार्गदर्शन लाभले. पुढे सखारामपंतांकडून लखनौला मार्गदर्शन घेतले. सुमती मुटाटकर, पं. राजाभैय्या पूछवाले यांना भरपूर साथसंगत

केली. चतुर संगीत महाविद्यालय, हिंदू मुलांची शाळा व बिंझाणी महाविद्यालयात संगीत अध्यापन केले. गजानन ताडे, बाळ तुळणकर, भैय्याजी वडसमुद्रकर, राजाभाऊ बहिरट, दिगंबर पिंपळघरे इत्यादींना शिष्य म्हणून त्यांनी तयार केले.

३६) **राजाभाऊ कोगजे** : जन्म १९२६ मध्ये पुणे येथे झाला. परंतु कार्यक्षेत्र नागपूर ठरले. नागपूर आकाशवाणीवर स्टाफ आर्टिस्ट व त्यानंतर नागपूर महाविद्यालयात कार्यरत होते. शास्त्रीय, उपशास्त्रीय संगीत, विशेषत: ठुमरी, भजन, अभंग अत्यंत प्रभावीपणे सादर करीत. गायनाव्यतिरिक्त प्रात्यक्षिकासह भाषणे, संशोधन इत्यादी केले. अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळापासून अनेक संगीत संस्थांशी संबंध होता. रसुलनबाईच्या बनारसी ठुमरीचा ते उत्तम आविष्कार करीत. ठुमरीचे बादशहा म्हणून त्यांना संबोधत असत. त्यांनी तयार केलेल्या शिष्य शाखेत राजेश्वर बोबडे, पंढरीनाथ कदम, कुमार पांडे यांचा समावेश होतो.

३७) **उषा नंदनपवार :** जन्म नागपूर येथे १९२६ मध्ये मंगलमूर्ती कुटुंबात झाला. मंगलमूर्ती घराणे संगीतप्रिय होते. त्यामुळे त्यांचे रीतसर शिक्षण अगदी बालवयात सुरू झाले. १९५८ मध्ये कंठसंगीतामधील 'डॉक्टर ऑफ म्युझिक' पदवी घेतली. ख्याल व ठुमरीगायन त्या प्रभावीपणे सादर करतात. ग्वाल्हेर व किराणा घराण्याची मिश्र गायकी ही त्यांची विशेषता आहे.

३८) **व्ही. व्ही. देशपांडे** (जन्म १९२७) : संगीत शिक्षणाचा प्रारंभ विष्णू दिगंबर पलुस्कर परंपरेतील गणपतराव परांजपे यांच्याकडे झाला. स. भ. देशपांडे यांच्या सल्ल्यावरून दिलरुबा वादनास सुरूवात केली. गांधर्व संगीत महाविद्यालयाची 'डॉक्टर' ही पदवी ग्रहण केली. दिलरुबा वाद्याला स्पीकर जोडून नाविन्य निर्माण केले व दिलरुबासारख्या वाद्यातून शहनाईसारखे सुमधूर सूरही काढले. बघता बघता त्यांची प्रसिध्दी झाली. संगीतावरील संशोधनपर लेखन व भरपूर मैफिली करून त्यांनी या क्षेत्रात आपले स्थान निर्माण केले आहे.

३९) **वसंतराव शिवणकर** : जन्म १९२८ मध्ये हिंगणघाटला झाला. कार्यक्षेत्र मात्र नागपूर ठरले. प्रथम संत तुकडोजी महाराजांच्या भजनी मंडळात ते सामील झाले. पुढे हैद्राबाद येथील प्रसिध्द शुक्ला गुरुजींची भेट झाली व नृत्याभ्यास सुरू केला. त्यानंतर गांधर्व संगीत महाविद्यालयाची 'संगीत अलंकार' ही परीक्षा उत्तीर्ण केली. अनेक नृत्यनाट्यातून भूमिका केल्या. काही नाटकांना दिग्दर्शनही केले. त्यांनी तयार केलेल्या शिष्यगणात ज्योती वरखेडकर, शोभा वकील, मृणालिनी दामले इत्यादींचा समावेश होतो. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या नृत्यनाट्य संगीत महोत्सवामध्ये नृत्य पेश करीत असतानाच रंगमंचावर त्यांचा अंत झाला.

४०) **कृष्णराव जाधव** : जन्म १९२९ ला सप्टेंबर महिन्यात झाला. वयाच्या सहाव्या वर्षीच त्यांचे गायन शिक्षण सुरू झाले. आग्रा घराण्याचे गायक फैय्याज खाँ, गुलाम रसूल खाँ यासारख्या गायकांच्या गायनाचा त्यांच्यावर खूप प्रभाव होता. धृपद धमाराची रीतसर तालीम फैय्याज खाँ यांचे भाचे गुलाम रसूल खाँ यांच्याकडून घेतली. कृष्णरावांमुळे धृपद धमार गायनाचा रसास्वाद वैद्यर्भिय रसिकांना घेता आला हे नमूद केले पाहिजे.

४१) **पं. संपतलाल** (जन्म १९३३) : संगीतकला त्यांच्या घरातच होती. त्यांचे वडील पं. बद्रीप्रसाद एक निष्णात गायक, वादक व नर्तक होते. रायगडाच्या दरबारात ते दरबारी गायक होते. पं. संपतलाल यांचे कार्यक्षेत्र मात्र नागपूर ठरले. वडील योग्य तालीम देत. त्यामुळे संपतलाल लहान वयात तबला, हार्मोनियम व गायन इत्यादी कलांत तरबेज झाले. पंजाब घराण्याचे तबला नवाज फकीराबक्ष यांची परंपरा त्यांच्या वडिलांकडून संपतलाल यांच्याकडे आली. १९३१ मध्ये ते नागपूर आकाशवाणीवर स्टाफ आर्टिस्ट म्हणून रुजू झाले. पंजाब बरोबरच दिल्ली, पूरब, फरुकाबाज त्यांनी आत्मसात केला. सतारअंग, गायकीअंग, नृत्यांग व स्वतंत्र वादनातही त्यांची चौफेर हुकुमत आहे. गायन नर्तन वादनातील एक कुशल कलावंत म्हणून त्यांची ख्याती झाली.

४२) **बाबूराव दंडे** (जन्म १९१५) : घरी संगीताचे वातावरण होते. नागपूर येथील वास्तव्यात पं. शंकरराव प्रवर्तकांकडून मार्गदर्शन घेतले. नागपूर आकाशवाणीचे ते कलाकार आहेत. ख्याल, ठुमरी, भजन सुरेल म्हणतात.

४३) **शंकरराव कोल्हटकर** (जन्म १२ नोव्हेंबर, १९१८) : काका कोल्हटकर म्हणून ते ओळखले जातात. नागपूर आकाशवाणीचे ते कलावंत होते.

४४) **पद्माकर बर्वे** (जन्म १९१८) : यांचे वडील मूळचे नागपूरचेच. संगीताचे प्राथमिक धडे त्यांनी कृष्णराव इंगळे यांच्याकडून घेतले. विविध ढंगाच्या ३०० चीजा त्यांनी संगीतबध्द केल्या आहेत. त्यांच्या शिष्यांमध्ये तरुण गोस्वामी, विद्याधर पंडित, पत्नी मालती बर्वे यांचा समावेश होतो.

४५) **बबनराव आठल्ये** (जन्म १९२१) : व्यासंगी विद्वान म्हणून ख्यातनाम आहेत. संगीताची आवड त्यांच्या घराण्यातच आहे. त्यांनी अनेक दिग्गजांची साथसंगत केली आहे. लय आणि सुरांची उपजत जाण व त्यांचे कलावंत म्हणून असलेले वैशिष्ट्य आजही लक्षात येते.

४६) **रमेशकुमार गडकरी** : जन्म नागपूरला १९२६ मध्ये झाला. सुरूवातीला शंकरराव सप्रे यांच्याकडून हार्मोनियम व गायनाचे मार्गदर्शन घेतले. धनंजय पुजारी यांच्या सतार वादनाने प्रभावित होऊन सतारीकडे वळले. भास्करराव मोरोणे यांच्याकडून सतारीचे सुरूवातीचे धडे गिरविले. नागपूर आकाशवाणीचे मान्यवर कलावंत असून त्यांनी अनेक कार्यक्रम केले. सतार अध्यापनात नागपूरमध्ये अग्रगण्य आहेत.

४७) **वसंतराव अंधारे** (जन्म १९२८) : थोरले बंधू बाबूराव यांच्याकडून त्यांनी गायनाचा श्रीगणेशा गिरविला. त्यानंतर मनोहरराव बर्वे यांच्याकडून सात वर्षे तालीम घेतली. १९५६ मध्ये नागपूर आकाशवाणीवर कार्यरत झाले. तेथे अनेक कलावंतांचा परिचय झाला. १९५६ ते ५९ पर्यंत बसवराज राजगुरु व नारायणराव पटवर्धन यांच्याकडूनही मार्गदर्शन घेतले. ख्याल, ठुमरी, भजन, नाट्यसंगीत, तराना व सुगम संगीत उत्तम सादर करतात. ते उत्कृष्ट रचनाकार व संगीत दिग्दर्शकही आहेत. 'फुरुखा उर्वशी' या नाटकास त्यांनी संगीत

दिग्दर्शन देऊन पारितोषिकही मिळविले आहे. ते 'सूरमणी' किताबाने मंडित आहेत.

४८) **शंकरराव पोपटकर** (जन्म १९२९) : घरी व मातुलगृही संगीताची आवड होती. सोलो व साथसंगत करण्यात पटाईत होते. १९४८ पासून आकाशवाणी नागपूरवर कार्यरत होते. पं. सामताप्रसाद यांच्याकडून काही बोल घेतले. ते दिल्लीबाज उत्तम वाजवितात. वादन, नृत्य व गायनास अनुरुप साथसंगत करण्यात तरबेज होते. आकाशवाणी संमेलन, तानसेन समारोह, महाराष्ट्र राज्य संगीत महोत्सव, सूरसिंगार, स्वरसंगम इत्यादी महोत्सवात अनेक थोर कलावंतांना साथसंगत केली आहे.

४९) **प्रल्हाद भजनी** (जन्म १९२९) : नागपूर, विदर्भातील प्रख्यात तबला संगतकार म्हणून त्यांचा उल्लेख करावा लागतो. त्यांचे वडील मृदंग व तबला वादक होते. त्यांचे लय, लयकारी, मात्राभरणा, मुखडे, लग्गीदौड प्रकार आकर्षक आहेत.

५०) **पंढरीनाथ कदम** (जन्म १९२९) : पंढरीनाथांचे वडीलबंधू बाबाराव व दादाराव भजन व हार्मोनियमचे शौकीन होते. आपल्या काकांकडून त्यांनी गायनाचे सुरूवातीचे धडे गिरविले. नागपूर येथील गुरु वादनालयात श्यामराव विलायची यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी गायनाचे व हार्मोनियमचे शिक्षण घेतले. स्वरसाधना, संगीत संमेलन, रेडिओ संगीत संमेलनातून त्यांचे कार्यक्रम झाले आहेत. राजाभाऊप्रमाणे श्रीधरराव ढगे यांचाही सहवास त्यांना मिळाला आहे. त्या उभयतांची छाप त्यांच्या गाण्यात दिसते. हार्मोनियम ते उत्तम वाजवितात.

५१) **विष्णूपंत कावळे** (जन्म १९२९) : आपल्या वडील बंधूच्या प्रेरणेमुळे श्रीनाथ गायन वादनालयात भास्करराव मोरोणे यांच्याकडे १९४२ पासून त्यांनी व्हायोलीनचे शिक्षण घेतले. अभ्यास व रियाज करून त्यांनी गायकी ढंग, लयकारी व छान कल्पकतापूर्ण शैली तयार केली.

५२) **प्रभाकरराव देसाई** (जन्म १९२९) : बाळासाहेब आठवले यांची तालीम त्यांना अठरा वर्षे मिळाली. सोलो व साथसंगत तंत्राचा त्यांनी चांगला अभ्यास केला. त्यानंतरही बाबूराव कऱ्हाडे, शनायतखाँ, अमीर हुसेन खाँ, शेख दाऊद नियाजू खाँ, अब्दूलकरीम, गुलाम रसूल, दाजीबा इंगळे, वसंत लघाटे, रणजितसिंह ठाकूर इत्यादींकडून त्यांनी मार्गदर्शन घेतले. नागपूर महाविद्यालय व बुटी संगीत महाविद्यालयात त्यांनी अध्यापनाचे कार्य केले. एम. एन. मोहरन, दीपक खिरवडकर इत्यादी शिष्य त्यांनी तयार केले.

५३) **मालती बर्वे-पांडे** (जन्म १९३०) : अखिल भारतीय कीर्तिच्या या गायिका मूळ विदर्भातीलच आहेत. त्यांच्या आईवडिलांना संगीताची आवड होती. संगीताचे धडे भास्करराव घोडके यांच्याकडून घेण्यास सुरूवात केली. ख्याल, ठुमरी, तराणा, भजने, पदे, भावगीते उत्तम गात. पार्श्वगायिका म्हणूनही चित्रपटसृष्टीत कीर्ती मिळविली. अनेक ध्वनिमुद्रिका निघाल्या आहेत. दिल्ली मुक्कामी पद्माकर बर्वे यांच्याशी विवाह झाल्यानंतर त्यांच्याच मार्गदर्शनाखाली 'संगीत प्रवीण' झाल्या. बर्वे कुटुंब नागपूरला आल्यावर त्यांचेही वास्तव्य नागपूरला झाले.

५४) **निर्मला केळकर** (जन्म १९३०) : यांच्यावर संगीताचे संस्कार आजोळी झाले. संगीताचे सुरूवातीचे मार्गदर्शन शंकरराव सप्रे यांचेकडून मिळाले. त्यानंतर पुणे मुक्कामी

ना. द. तांबे यांच्याकडून मागदर्शन घेतले. शंकरराव प्रवर्तक, प्रभाकरराव खर्डेनविस आणि प्रभाकरराव देशकर यांच्याकडूनही त्यांना तालीम मिळाली. त्या संगीत प्रवीण असून नागपूर आकाशवाणीवरून गात असतात.

५५) **मधुसूदन ताम्हनकर** (जन्म १९३०) : वडील हरीभाऊ तबला वाजवीत. प्रारंभी पाच वर्षे देवीदासपंत देवधरे त्यांना शिकवित असत. त्यानंतर नथ्थुबुवा अमरावतीकर यांची तालीम त्यांना मिळाली. पं. भीमसेन जोशी नागपूरला असताना त्यांच्या सहवासात त्यांना थोडेफार मार्गदर्शन मिळाले. ख्याल, ठुमरी, भजन, पदे, सुगम संगीत उंच गोड सुरेल आवाजात गातात. नागपूर आकाशवाणीचे मान्यवर कलावंत आहेत.

५६) **मधुकर रामभाऊ गुळवणी** (जन्म १९३०) : जयपूर गायकीचे ते एक सुरिले गायक आहेत. विशेषत: तालीम मिळालेले गायक आहेत. लयकारी, गुंतागुंतीची तानक्रिया, टप्पा अंगाने ख्याल गायन आणि पारंपरिक नाट्यगीते उत्तम सादर करतात. प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या अनेक संगीत महोत्सवातून म्हणजे बखलेबुवा जन्मशताब्दी, सवाई गंधर्व स्मृती महोत्सव, महाराष्ट्र राज्य संगीत महोत्सव यात ते सहभागी होत. सूरसिंगारतर्फे १९७४ मध्येच त्यांना सूरमणी किताब मिळाला.

५७) **कमलाकरराव जाधव** (जन्म १९३०) : संगीतविषयक कारकीर्द नागपूरमध्येच घडली. वडील नाटक कंपनीत नट व तबलावादक असल्यामुळे सर्व भावंडांवर संगीताचे संस्कार झाले. १९५० ते ५९ पर्यंत 'मराठी रंगभूमी' या जयराम शिलेदार व आपल्या भगिनी जयमाला शिलेदार यांच्या नाटक कंपनीत त्यांनी तबलावादनाची जबाबदारी बरीच वर्षे सांभाळली. १९५४ पासून पी. आर. जोशी यांच्या सौजन्याने हडस हायस्कूलमध्ये तबला अध्यापन केले. सोलो व साथसंगत या दोहोतही ते तरबेज आहेत. दिल्लीबाज ते विशेष अधिकाराने सादर करतात. ढोलक, ढोलकी, ट्रंपेल, खंजिरी, सेक्सोफोन इत्यादी वाद्ये वाजविण्यात ते वाकबगार आहेत. हात वजनदार आणि स्वच्छ असून अवघड बोलप्रकार ते सहज सादर करतात.

५८) **प्रभाकर देशकर** (जन्म १९३१) : हे १९५९ मध्ये 'संगीत अलंकार' झाले. भास्करराव मोरोणे यांच्या 'बुटी महाविद्यालया'ची प्राचार्य पदाची जबाबदारी अत्यंत खंबीरपणे सांभाळली. रंगभूमीवर संगीत नट म्हणूनही वावरले आहेत. वसंतराव देशपांडे यांच्या अखेरच्या काळात प्रभाकररावांना त्यांचा अल्प का होईना, परंतु सहवास व मार्गदर्शनही मिळाले आहे. ख्याल, ठुमरी, नाट्यसंगीत व भजने उत्तम म्हणतात. संगीत अध्यापन क्षेत्रात त्यांनी उत्तम कामगिरी केली आहे.

५९) **अरुणकुमार भट्टाचार्य** (जन्म १९३२) : बालवयात त्यांना बासरी वादनाची आवड होती. १९५० मध्ये मुंबईतील वास्तव्यात स्व. पन्नालाल घोष यांच्याकडून मार्गदर्शन घेतले. प्रसिध्द सतार वादक पं. रविशंकर यांच्या सतारवादनाने प्रेरित होऊन सतार वादनाकडे लक्ष केंद्रित केले. त्यांची वादनशैली धृपद पध्दतीची व गायकी अंगाची होती. लयकारी व स्वरप्रभुत्वही, उत्तम होते. विजय खरे, तुलसीदास ताजपूरिया, अरुण वर्मा यांना चांगले मार्गदर्शन केले.

६०) **भास्करराव वाडेगावकर** (जन्म १९३२) : अत्यंत बुध्दिमान, चोखंदळ, फटकळ, स्पष्ट वक्ते हाते. गायन, वादन (व्हायोलीन) व तबला अशा तिन्ही क्षेत्रात चांगले प्रभुत्व मिळविले होते. रावसाहेब वाडेगावकर यांचे हे ज्येष्ठ चिरंजीव होते. त्यांनी प्रभाकरराव खर्डेनवीस यांच्याकडून गायन, केशवराव ठोमरे यांच्याकडून व्हायोलीन आणि निळकंठराव मूर्ते यांच्याकडून तबला वादनाचे धडे घेतले. ते आकाशवाणी कलाकार होते. मुंबईला श्रीधरराव पार्सेकर यांच्याकडून व्हायोलीनचे शिक्षण उत्तमप्रकारे घेतले व त्यांचा ढंग आत्मसात केला. काही काळ अध्यापनही केले. त्यांनी मार्गदर्शन केलेल्या शिष्यांमध्ये सतीश प्रधान, बाळासाहेब बुटी, पुरुषोत्तम दारव्हेकर इत्यादींचा समावेश होतो. गायकी अंगाचे वादन करण्याबद्दल त्यांची प्रसिध्दी होती.

६१) **बाळासाहेब पुरोहित** (जन्म १९३२) : गायनाचे प्राथमिक धडे वडिलांकडून घेतले. त्यानंतर 'चतुर संगीत विद्यालयात' अमृतराव निस्ताने यांच्या मार्गदर्शनाखाली गायनाभ्यास करून 'संगीत विशारद' उत्तीर्ण झाले. त्याचप्रमाणे गांधर्व संगीत महाविद्यालयाची 'संगीत अलंकार' ही परीक्षा उत्तीर्ण झाले. 'डॉक्टर ऑफ म्युझिक' ही उच्च पदवीही त्यांनी प्राप्त केली. 'सूरसिंगार' च्या 'सूरमणी' पदवीचे ते मानकरी आहेत. मामेबंधु श्रीकांत बाकरे यांचेही मार्गदर्शन त्यांना लाभले. अमीरखाँ साहेबांचा आदर्श त्यांनी ठेवला. विदर्भ साहित्य संघातर्फे 'स्वरमंडळ' संस्था काढली. काही नवीन रचना व लेख लिहिले आहेत. नागपूर आकाशवाणीचे कलावंत असून नागपूर महाविद्यालयात त्यांनी संगीत अध्यापन केले.

६२) **प्रभाकरराव पिल्ले** (जन्म १९३३) : यांचे वडील मामा पिल्ले विविध वाद्य वादनपटू होते. त्यामुळे त्यांची सर्व मुले संगीत क्षेत्रात रस घेऊ लागली. प्रभाकररावांनी वडिलांकडून तबला, ज्येष्ठ बंधू जयराम यांच्याकडून व्हायोलीन व दिलरुबा इत्यादी वाद्यांचे शिक्षण घेतले. 'श्रीराम संगीत विद्यालयात' शंकरराव सप्रे व राजाभाऊ भूमकर (भूमकर) यांच्याकडून तबलावादनाचे मार्गदर्शन घेतले. नथ्थुबुवा अमरावतीकर यांच्याकडूनही गायनाची तालीम घेतली. नागपूर येथील मॉरिस कॉलेजमध्ये अध्यापन केले. त्यांनी दिल्लीबाज विशेष आत्मसात केला. स्पष्ट, स्वच्छ वादन, दाया बायाचे संतुलन, डग्ग्याचा घुमारा, विविध बोलसंग्रह त्यांनी चांगले आत्मसात केले आहेत. त्यांच्या शिष्यांमध्ये के. टी. गुरुमुखी, सदानंद रामटेक, मकरंद, भागवत इत्यादींचा समावेश होतो.

६३) **उषा पारखी** (जन्म १९३४) : घरी आई-वडिलांना गायनाची आवड असल्यामुळे गायनाचे संस्कार झाले. भैय्याजी वझलवार यांच्याकडून रीतसर मार्गदर्शन व तालीम घेतली आहे. सुरेल आवाजाच्या गायिका म्हणून विख्यात आहेत. 'संगीत प्रवीण' पर्यंत शिक्षण झालेले आहे. 'बिंझाणी महिला महाविद्यालयात' संगीताच्या प्राध्यापिका म्हणून काम केले. ख्याल, ठुमरी, तराणा, नाट्यपदे, भजने व गीतगोविंद रचना गाण्यात विशेषता आहे. 'कलके कलाकार', 'साई गंधर्व महोत्सव' अशा प्रतिष्ठेच्या गायन सभांमधून त्यांचे गायन झाले आहे. पं. जगन्नाथबुवा पुरोहित यांचे अल्पकाळ मार्गदर्शन लाभले. आकाशवाणी व दूरदर्शनच्या मान्यताप्राप्त कलाकार म्हणून ख्यातनाम आहेत.

६४) **कुसुम चाफले** (जन्म १९३४) : वडिलांना संगीताची आवड असल्यामुळे घरी

संस्कार झाले. भैय्याजी वझलवार यांच्याकडून त्यांनी उत्तम तालीम घेतली. त्यानंतर 'श्रीराम संगीत विद्यालयात' पं. शंकरराव सप्रे यांच्या मार्गदर्शनाखाली 'संगीत अलंकार' परीक्षा उत्तीर्ण. यशवंत देव यांच्याकडून सुगम संगीताचे मार्गदर्शन घेतले. त्या नागपूर आकाशवाणीच्या शास्त्रीय संगीत आणि सुगम संगीताच्या मान्यताप्राप्त कलाकार आहेत. नागपूर महाविद्यालयातून एम.ए. संगीताची परीक्षा त्यांनी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केली आहे. ख्याल, ठुमरी, सुगम संगीत व भक्तीगीते त्या उत्तम गातात.

६५) **अण्णाजी गिल्लरकर** (जन्म १९३४) : मूर्ते गुरुजींकडून त्यांनी तबलावादनाचे धडे गिरविले. सोलो व साथसंगत तंत्र आत्मसात केले. पूरब, अजराडा वाजविण्यात त्यांची विशेषता असून हात अतिशय तयार आहे. त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

६६) **शरद सुतवणे** (जन्म १९३५) : शरदरावांचा आवाज मूलत:च मधूर व बारीक आहे. अंबादासपंत देवधरे यांच्याकडून त्यांनी सुरूवातीचे शिक्षण घेतले. त्यानंतर भैय्याजी वझलवार यांच्याकडून त्यांना मार्गदर्शन मिळाले. सुगम संगीतामध्ये विशेष प्राविण्य मिळविले. नागपूर आकाशवाणीवरून अनेक कार्यक्रम सादर केले. 'संगीत अलंकार' ही परीक्षा उत्तीर्ण केली. सूरसिंगार तर्फे 'सूरमणी' ही पदवी त्यांना मिळाली. शास्त्रीय संगीत, सुगम संगीत, गीतरामायण, नाट्यगीते, दादरा, लावणी इत्यादी सर्व प्रकार सादर करतात. अनवट राग व स्वत:च्या बंदीशीही सादर करतात.

६७) **शांता हेमाडी** (जन्म १९३५) : पती अशोककुमार हेमाडी यांच्या व्यवसायानिमित्त त्या नागपूरला आल्या. घरी बालपणीच संगीताचे संस्कार झाले. त्यांचे मामा मोहन नाडकर्णी संगीत समीक्षक व दर्दी आहेत. त्या पूर्वाश्रमीच्या बसरुकर होत. मामांच्या प्रेरणेने त्यांनी संगीताध्ययन केले. प्रसिध्द संगीततज्ञ पं. विनयचंद्र मौदभल्य यांच्याकडे त्यांनी रीतसर संगीताध्ययन केले. ग्वाल्हेर गायकीबरोबरच किराणा घराण्याचाही त्यांनी अभ्यास केला आहे. अलाप, तानप्रकार, लयकारी ही सर्व अंगे त्या कौशल्याने मांडतात. अनेक बैठकी त्यांनी गाजविल्या आहेत. आकाशवाणी कलाकार आहेत. पं. रविशंकर संचलित 'मेलोडी और रिदम' या कार्यक्रमात त्या सहभागी झाल्या होत्या. १९७२ मध्ये त्यांना सूरसिंगारचा 'सूरमणी' किताब मिळाला आहे.

६८) **हमीदखाँ** (जन्म १९३९) : यांचे वडील प्यारेखाँ ग्वाल्हेरच्या श्रीमंत जीवाजीराव महाराजांच्या दरबारी कलावंत व उत्कृष्ट सारंगी वादक होते. बालवयातच हमीदखाँ यांनी वडिलांकडून सारंगी वादनाचे धडे घेतले. वडिलांच्या निधनानंतर त्यांनी बडोदा येथे वास्तव्य करून खाँ फैय्याजखाँ आणि खयासीन खाँ यांच्याकडून तालीम घेतली. प्रथम इंदोर आकाशवाणीवरून त्यांचे कार्यक्रम झाले. त्यानंतर ते नागपूर आकाशवाणीवर आर्टिस्ट म्हणून रुजू झाले. आपल्या कला नैपुण्यामुळे त्यांनी 'अ' श्रेणीचे अखिल भारतीय सारंगीवादक म्हणून सन्मान मिळविला. त्यांची वादनशैली ग्वाल्हेर घराण्याची आहे. अचूक स्वरफेक, मींड, गमक, बारकावे, सफाईदार ताना, ताल, लयीचा हिशेब यामध्ये ते पारंगत आहेत. सोलो व साथसंगत दोन्ही प्रकारात ते तरबेज आहेत. अनेक संगीत महोत्सवातून

त्यांनी वादन सादर केले आहे. १९७५ मध्ये आकाशवाणीवरून त्यांचा पहिला अखिल भारतीय कार्यक्रम झाला.

६९) **शुभदा पेंढारकर** (जन्म १९३७) : घरी वडिलांना संगीताची आवड असल्यामुळे बालवयात संगीताध्ययन सुरू झाले. वयाच्या दहाव्या वर्षी श्यामराव विलायची यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी प्रथम गायनाचे धडे घेतले. त्यानंतर त्या योगायोगाने दिलरुबा वादनाकडे वळल्या. याखेरीज सारंगी, व्हायोलीन, हार्मोनियम इत्यादी वाद्यांवरही त्यांनी प्रभुत्व मिळविले. 'संगीत प्रभाकर', 'संगीत प्रवीण' या बरोबरच संगीत विषय घेऊन एम.ए. होणाऱ्या त्या प्रथम मानकरी होत. गायकी अंगाचे वादन हे त्यांचे वैशिष्ट्य आहे.

७०) **तुलसीदास ताजपुरीया** (जन्म १९४५) : नागपूर येथील अंध विद्यालयात त्यांच्या संगीताध्ययनाचा प्रारंभ झाला. ब्रेल लिपीचा अभ्यास करून त्यांनी विशेष प्रगती केली. अंधपणावर मात करून त्यांनी साधलेले कौशल्य वाखाणण्यासारखे आहे. सतारवादनाची आवड असल्यामुळे त्यांनी अरुणकुमार भट्टाचार्य यांच्याकडून मार्गदर्शन घेतले. १९६४ मध्ये ते संगीत अलंकार परीक्षा उत्तीर्ण झाले. संगीत प्रसाराच्या दृष्टीने त्यांनी संगीत विद्यालयाची स्थापना केली. 'स्वरसाधना संगीत विद्यालय' स्थापून अनेक कलावंताना मार्गदर्शन करण्यात ते यशस्वी झाले. कामठी भागात त्यांनी सुरू केलेले हे कार्य लक्षणीय आहे.

७१) **मीना देशपांडे** (जन्म १९४७) : त्या पूर्वाश्रमीच्या वैद्य होत. घरी नाटक व संगीत यांची आवड असल्यामुळे त्यांना बालवयातच या कलांची गोडी लागली. नृत्यकलेकडे वळून त्यांनी चांगली प्रगती केली. 'मनोहर' नृत्य मंदिरात मनोहरराव पाध्ये यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी दहा वर्षे नृत्याभ्यास केला. जयपूर येथील कुंदनलाल गांगाणी यांचेही मार्गदर्शन त्यांना लाभले. जयपूर घराण्याच्या कथ्थक नृत्यशैलीत त्या पारंगत आहेत. राजस्थानी व लावणी नृत्यशैली ही त्यांची विशेषता आहे. भावदर्शन, पदन्यास, मुद्राभिनय, हावभाव, पात्रविशेष प्रसंगानुरुप सादर करणे हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. सपेरानृत्य, कोळी, राधाकृष्ण, माडिया, आदिवासी, भांगडा, इराणी इ. नृत्य प्रकारात त्यांची विशेष तयारी आहे. वसंतराव शिवणकरांचेही मार्गदर्शन त्यांना लाभले आहे. 'नटेश्वर नृत्यमंदिर' संस्था स्थापन करून मार्गदर्शन करण्याचा व नृत्याचे विविध कार्यक्रम सादर करण्याचा उपक्रमही त्यांनी केला आहे.

७२) **प्रभाकर धाकडे** (जन्म १९४९) : बालवयात अंधत्व आल्यामुळे ते संगीताकडे वळले. वडील नट, संगीततज्ज्ञ व दिग्दर्शक होते. त्यांनी मुलाला अंधविद्यालयामध्ये संगीत कलेसाठी पाठविले. वादनाची आवड असल्यामुळे ते व्हायोलीन वादनाकडे वळले. बबनराव कान्हेरकर, केशवराव ठोमरे यांच्याकडून त्यांनी तबला वादनाचे शिक्षण घेतले. कंठसंगीत व सुगम संगीतातही प्राविण्य प्राप्त करून त्यांनी पारितोषिके मिळविली आहेत. पं. जगदीश प्रसाद यांचेही मार्गदर्शन त्यांना मिळाले आहे. कंठसंगीत, वाद्यसंगीत, तबलासंगीत व लेहरा या सर्वांमध्ये ते कुशल आहेत. अनिल खोब्रागडे, हेमलता खोब्रागडे, शांतिकुमार गजभिये आदिंना त्यांनी मार्गदर्शन केले आहे.

७३) **नारायणराव अपराजित** (जन्म १९२१) : अभिनव संगीत विद्यालयात शंकरराव प्रवर्तक यांच्याकडे त्यांचे संगीताध्ययन सुरू झाले. प्रभाकरराव व यादवराव जोशी या गुरुबंधुंचेही त्यांना मार्गदर्शन लाभले. पुढे 'नाथ गायन विद्यालयात' त्यांनी अध्यापनही केले. 'वागीश्वरी कलाविहार' संस्थेचे ते प्रमुख कार्यकर्ते आहेत. त्यांचा आवाज उंच, पल्लेदार, भरदार आहे. बोल, आलाप, लयकारी, पेचदार वक्रताना यात ते वाकबगार आहेत.

७४) **आप्पासाहेब इंदूलकर :** जन्म १९२० मध्ये झाला. नागपूर येथील दत्तोपंत बोधनकर यांच्याकडून त्यांनी तबला अध्ययन केले. हार्मोनियमवरही त्यांनी उत्तम प्रभुत्व मिळविले आहे. खाँअमीर खाँ यांना 'श्रवणगुरु' मानून त्यांनी साधना केली. शास्त्रीय, उपशास्त्रीय, भक्तिगीत, सुगम संगीतही ते उत्तम गातात. तबला, सोलोतही त्यांची खूप तयारी आहे. अवघड दुर्मिळ बोल ते वाजवितात. नाटके बसविणे, नाट्यसंगीत व भावगीत यांच्या स्वररचना करणे ही त्यांची विशेषता आहे. नागपूर बाहेर कार्यरत राहून प्रसिध्द झालेले हे मूळ नागपूर येथील कलावंत आहेत.

७५) **विद्याधर वझलवार** (जन्म १९१५) : चतुर संगीत महाविद्यालयात नारायणराव पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली १९२५ ते ३७ पर्यंत संगीताध्ययन केले. १९३७-३८ मध्ये ते सिलोन येथील 'श्रीपल्ली' या संस्थेत संगीताध्यापक होते. जुलै १९३९ पासून अनेक वर्षे पश्चिम बंगालमध्ये रविंद्रनाथ टागोरांच्या 'विश्वभारती विद्यालया'तील संगीत भवनात संगीताध्यापक म्हणून कार्यरत होते. ते ख्याल, भजन या हिंदुस्थानी गायनपध्दती समवेतच रवींद्र संगीतही गातात. विश्वभारतीच्या अनेक समित्यांवर सन्मानपदे, चतुर्दंडी प्रकाशिका या पं. व्यंकटमखींच्या दाक्षिणात्य ग्रंथावरील सटीक विवेचनासह हिंदी भाषेत ग्रंथ लिहिला असून तो विश्वभारतीने प्रकाशित केला आहे. कलकत्ता आकाशवाणीवरून कार्यक्रम प्रसारित.

७६) **वसंतराव देशपांडे** (जन्म १९२०) : त्यांच्या मातोश्री राधाबाई भजने व ओव्या उत्तम गात. पं. शंकरराव सप्रे यांच्याकडून प्रथम गायनाचे धडे गिरविले. सुरेशबाबू माने, अमानअलीखाँ साहेब यांच्याही मार्गदर्शनाचा लाभ त्यांना झाला. बलवंत नाटक कंपनीचा मुक्काम ज्या ज्या वेळी नागपूरला असे त्या त्या वेळी मा. दीनानाथांनी मोठ्या जिव्हाळ्याने त्यांना आपली पदे शिकविली आहेत. विशेष म्हणजे दीनानाथ व बालगंधर्व या दोघांच्याही शैलीतून ते पदे गात असत. वेदकालीन संगीतापासून ते आजच्या संगीतापर्यंतची वाटचाल या विषयावर प्रबंध लिहिला. ख्याल, ठुमरी, नाट्यगीते, भावगीते, चित्रपटगीते अशा अनेक ध्वनिमुद्रिका आजही लोकप्रिय आहेत. रंगभूमीवर अनेक भूमिका विशेषत: संगीत नाटकातील भूमिकांवर त्यांचाच ठसा उमटला आहे. विशेषत: 'कट्यार काळजात घुसली' या नाटकातील खाँसाहेब म्हटल्यावर आजही डोळ्यासमोर वसंतरावच येतात. त्यांच्या शिष्य शाखेत पद्माकर कुलकर्णी, मधुसूदन नाडकर्णी, विलास इनामदार, वसुंधरा पंडित इत्यादींचा समावेश होतो. त्यांची गायकी बहुरंगी, बहुढंगी आणि स्वरावरील हुकूमत, लयकारी जबरदस्त होती. नाट्यसंगीत विषयावर त्यांचा विशेष अभ्यास होता.

७७) **विमल चोरघडे** (जन्म १९२०) : गायनाचे प्राथमिक धडे विठ्ठलराव हेडाक यांच्याकडून घेतले. तसेच चंद्रशेखरबुवा, शंकरराव सरनाईक यांच्याकडूनही त्यांना मार्गदर्शन

मिळाले. दिनकरराव पटवर्धन यांचीही तालीम मिळाली. पं. विनायकबुवा पटवर्धन यांच्याकडेही त्यांचे संगीताध्ययन झाले आहे. 'महाविदर्भातील लोकगीतांचे संगीत' या विषयावर प्रबंध लिहिला. नागपूर बिंझाणी महाविद्यालयात त्यांनी मराठी व संगीत विषयाच्या प्राध्यापिका म्हणून काम केले.

७८) **सुशीला पोहनकर** (जन्म १९२४) : यांचे घराणे संगीतकारांचेच आहे. त्यांचे आजोबा नारायणराव जोशी तत्कालीन प्रख्यात हार्मोनियमपटू होते, तर चुलतआजोबा बापूजी जोशी हे रहिमतखाँ आणि विष्णूपंत छत्रे यांचे समकालीन कलावंत होते. वडील बाबूराव जोशी उत्कृष्ट गायक व हार्मोनियमवादक होते. सुशीलाबाईंनी घरच्या संस्कारांसमवेत अमृतराव निस्ताने यांच्याकडून मार्गदर्शन घेतले. 'संगीत विशारद' परीक्षा त्या १९४३ मध्ये लखनौहून प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या. त्यानंतर संगीत निपुण या परीक्षेतही त्यांनी यश मिळविले. खैरागड येथून 'छत्तीसगढी लोकसंगीत' या विषयावर शोधनिबंध सादर केला. ख्याल, ठुमरी, भजन, नाट्यसंगीतादी गायन शैलींवर त्यांचे विशेष प्रभुत्व आहे. त्यांचे चिरंजीव अजय पोहनकर हे संगीत अलंकार असून 'सूरमणी' पदवी प्राप्त व ख्यातनाम गायक आहेत. सुशीलाबाई स्वतंत्र स्वररचना करण्यात निष्णात आहेत. ख्याल व तराणे बांधण्यात कुशल आहेत. जबलपूर येथे कविवर्य भा. रा. तांबे यांच्या गीतांचा दोन तासांचा उत्तम कार्यक्रम त्यांनी केला होता. आकाशवाणीच्या त्या मान्यताप्राप्त कलावंत होत.

७९) **श्रीकांत बाकरे** (जन्म १९३७-९७) : नागपूरच्या 'श्रीराम संगीत विद्यालया'त गायनाचा प्रारंभ झाला. त्यानंतर शंकरराव प्रवर्तकांचे शिष्य बाबूराव पाठक यांच्याकडे भातखंडे म्युझिक कॉलेजमध्ये पुढील शिक्षण घेतले. त्यानंतर मनोहरराव बर्वे यांच्याकडे त्यांनी गायनाचा अभ्यास केला. नागपूरला विनायकराव कुलकर्णी यांच्या घरी अमीरखाँ यांचा त्यांनी रीतसर गंडा बांधून गीतसाधना चालू ठेवली. त्यानंतर कलकत्ता येथे जाऊन त्यांच्याकडून मार्गदर्शन मिळविले. बडे गुलाम अली खाँ यांचेही मार्गदर्शन त्यांना लाभले. त्यांच्या ठुमऱ्या व बंदिशी ते गातात. ख्याल, ठुमरी, दादरा, तराणा, भजने, पदे, रवींद्र संगीत, गीत गोविंद, सुगम संगीत प्रकारात ते तरबेज होते. पल्लेदार व वजनदार आवाज ही त्यांची जमेची बाजू होती. 'सूरमणी', 'अलंकार' या पदव्यांनीही ते मंडित होते. त्यांनी खाँसाहेब अमीरखाँ कलाकेंद्र स्थापून अनेक कार्यक्रम केले.

८०) **भास्करराव तिवसकर** : मूळातच तबला वादनाची आवड त्यांना होती. त्यामुळे बेलोना येथील बाबा गणपतदास यांच्याकडून त्यांनी तबलावादनाचे सुरूवातीचे शिक्षण घेतले. १९४९ पासून नागपूर आकाशवाणी वरून त्यांचे सोलो, तबला वादनाचे कार्यक्रम झाले. पं. भीष्मदेव वेदी यांच्याकडूनही त्यांनी मार्गदर्शन घेतले. कानपूर येथील बाबूखाँ यांचे आणि रामपूर येथील खाँसाहेब तिरकवा यांचेही त्यांना मार्गदर्शन लाभले. उस्ताद अल्लारखाँ व त्यांचे सुपुत्र झाकीर हुसेन यांच्याकडूनही त्यांना मार्गदर्शन व साथसंगतीचे तंत्र मिळाले. प्रभुदेव सरदार यांनी भास्करराव तिवसकर यांना मुंबईत प्रथम आणण्यात इतर अनेकांप्रमाणे पुढाकार घेतला. परबीन सुलताना, पं. जसराज, हमीम जाफरखान अशा अनेक नामवंतांना त्यांनी साथसंगत केली आहे.

८१) **वसंत रानडे** (जन्म १९३५) : यांचे वडील चिंतामणबुवा हे पं. मिराशीबुवांचे शिष्य

व उत्तम गायक होते. वसंतरावांच्या बालपणीच मातापित्यांचे छत्र हरवले. त्यामुळे त्यांचे चुलते बाबुकाकांनी लालन पालन करून त्यांना संगीताचे शिक्षणही दिले. तबला व व्हायोलीनची तालीम दिली. बाबुकाका उर्फ भालचंद्र रानडे यांच्या प्रमाणेच भातखंडे संगीत महाविद्यालयाचे प्राचार्य स. भा. देशपांडे यांच्याकडून मार्गदर्शन घेऊन त्यांनी व्हायोलीन वादनात नैपुण्य मिळविले. १९५१ पासून त्यांचे नागपूर आकाशवाणीवरून कार्यक्रम झाले आहेत. 'अ' श्रेणीचे कलावंत म्हणून त्यांना मान्यता मिळाली आहे. खैरागड येथील महाविद्यालयामध्ये त्यांनी संगीत अध्यापनाचेही काम केले आहे. साथसंगत व स्वतंत्र वादनात त्यांची तयारी प्रशंसनीय आहे. गायकी व तंतकारी यांचा सुंदर समन्वय त्यांच्या वादनात दिसतो. अचूक स्वरस्थाने, सुरेल स्वरफेक, अंगुली 'बो'चे नियंत्रण, अवघड लयकारी, स्वच्छ व सफाईदार ताना ही त्यांची वैशिष्ट्ये आहेत. ते 'सूरमणी' पदवी प्राप्त कलावंत आहेत.

८२) **दिवाकर कठाळे** (जन्म १९३७) : आजोबा पांडूरंगपंत आणि वडील यादवराव यांच्याकडून तबला वादनाचे धडे त्यांना मिळाले. श्यामराव विलायची यांच्याकडूनही त्यांनी संगीताचे शिक्षण घेतले. उस्ताद विलायतखाँ यांचे पट्टशिष्य पं. गिरिराज यांच्याकडून त्यांनी सतारवादनाचे धडे घेतले.

८३) **अरुण वकील** (जन्म १९३७) : 'श्रीनाथ गायन वादनालयात' भास्करराव मोरोणे यांच्याकडून त्यांनी व्हायोलीन वादनाचे प्राथमिक धडे घेतले. वसंत रानडे यांची प्रेरणा घेऊन बाळुकाका रानडे व स. भ. देशपांडे यांच्याकडूनही तालीम घेतली. गायकी व तंतकारी पध्दतीचे उत्तम वादन करतात. वाद्यवृंद रचना, स्वरचित गीते व गझलांचे अनेक कार्यक्रम केले आहेत. 'सूरमणी' पदवी प्राप्त कलावंत आहेत. जबलपूर येथे त्यांनी अनेक वर्षे अध्यापन केले.

८४) **दामोदरराव वाडेगावकर** (जन्म १९३७) : संगीत व कायदा दोन्हींचा अभ्यास केला. सुरूवातीला शंकरराव प्रवर्तक व त्यानंतर प्रभाकरराव खर्डेनवीस यांच्याकडून तबलावादनाचे धडे गिरविले. १९५२ नंतर मुंबई मुक्कामी प्रा. बी. आर. देवधर यांच्याकडून गायनाची आणि खाँसाहेब अमीर हुसेन खाँ यांच्याकडून तबलावादनाची तालीम घेतली. त्यांनी दिल्ली व फारखाबादी बाज आत्मसात केला. तबला व गायन अलंकार या दोन्ही परीक्षांत प्रथम क्रमांक मिळवून उत्तम यश संपादन केले. सोलो व स्वतंत्र वादनात प्राविण्य मिळविले. इंग्लंडला प्रयाण करून उच्च शिक्षणही संपादले. बार ॲट लॉ व रिसर्च करून त्याही क्षेत्रात आपला ठसा उमटविला.

८५) **गोपाळराव वाडेगावकर** (जन्म १९४२) : घरी संगीताचे संस्कार झाले. दोघेही वडीलबंधु उत्तम कलाकार असल्यामुळे गायन, तबला, व्हायोलीनचा सराव बालवयातच इ ाला. मुंबईत पं. विहनेजर शास्त्रींकडून व्हायोलीन वादनाचा अभ्यास केला. फरुखाबाद बाज त्यांनी विशेष आत्मसात केला. अवघड व दुर्मिळ बोलसंग्रह ही त्यांची वैशिष्ट्ये आहेत. विलंबित पक्की लय आणि द्रुत लय व लग्गी दौडही तेज आहे. सोलो व साथसंगत दोन्हीकरिता ते प्रसिध्द आहेत.

८६) **राजेश्वर बोबडे** (जन्म १९४३) : अमृतराव निस्ताने, प्रभाकरराव खर्डेनवीस, पं. राजाभाऊ कोगजे, पं. बसवराज राजगुरु इत्यादींचे मार्गदर्शन लाभले. उत्तम गायक म्हणून लौकिक मिळविला.

८७) **गिरीश वझलवार** (जन्म १९४७) : सुरूवातीला अण्णाजी क्षीरसागर यांचे मार्गदर्शन मिळाले. त्यानंतर प्रभाकरराव खर्डेनवीस यांच्याकडून तालीम घेतली. त्यानंतर पं. जसराज यांचे शिष्यत्व स्वीकारून गान साधना केली. गुरुशिष्य परंपरेत शिक्षण घेता आले. पार्श्वगायन व ध्वनिफित यामुळे त्यांचे नाव झाले आहे.

८८) **कशाळकर बंधू** : नव्या पिढीतील अरुण, सुभाष व उल्हास हे कशाळकर बंधू आज ख्यातनाम आहेत.

८९) **राजेंद्र भावे** : आघाडीचे व्हायोलीन वादक आहेत. स्वत: व्यवसायाने सिव्हिल इंजिनियर असूनही संगीताचा पाठपुरावा त्यांनी केला आहे. सुरूवातीचे शिक्षण त्यांनी बाबासाहेब वाकेकर, श्यामराव विलायची, राजाभाऊ कोगजे यांच्याकडून घेतले. पं. राजाभाऊ कोगजे यांच्याकडून ते राजाभाऊंच्या अखेरच्या काळापर्यंत शिक्षण घेत होते. १९८९ मध्ये त्यांनी 'सूरसिंगार संसद मुंबईची' तर्फे सूरमणी पदवी ग्रहण केली आहे. आकाशवाणीवरून त्यांचे नियमित कार्यक्रम होत असतात. 'सप्तक' आयोजित नागपूर संगीत समारोहात उस्ताद झाकीर हुसेन आणि पं. स्वपन चौधरी यांच्या तबला वादनाला लहरा-संगत केली.

९०) **सरिता भावे** : राजेंद्र भावे यांच्या पत्नी असून उभयता संगीत क्षेत्रात विख्यात आहेत. त्या स्वत: हिंदुस्थानी कंठ संगीतामध्ये एम.एस. आहेत. त्यांनी सुरूवातीचे गायनाचे शिक्षण बाबासाहेब कवठेकर, खंडवा (मध्य प्रदेश) यांच्याकडून घेतले. १९९० मध्ये मुंबईच्या 'सूरसिंगार' तर्फे सूरमणी पदवी मिळविली. आकाशवाणी व दूरदर्शनच्या या मान्यवर कलाकार आहेत. नागपूर, अकोला, जबलपूर, झांसी, आग्रा या ठिकाणी मैफिलीतून गायन सादर केले आहे. आकाशवाणी सुगमसंगीत श्रेणी व शास्त्रीय संगीतात श्रेणी मिळाली आहे. 'समर्पण' आणि 'बंदगी' या भक्तिसंगीताच्या ध्वनीफितीसाठी गायन केले आहे.

९१) **कल्याणी देशमुख** (जन्म १९४९) : आकाशवाणी व दूरदर्शनच्या या मान्यवर कलावंत असून आकाशवाणीवरून स्थानिक व अखिल भारतीय पातळीवर कार्यक्रम प्रसारित झाले आहेत. नागपूर, जबलपूर, रायपूर, मुंबई, कुंदगोळ, यादगिरीकुट्टी याठिकाणी शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम केले आहेत. नाट्यसंगीतही कुशलतेने सादर करतात. दूरदर्शनवरून 'आरोही', 'मुलखावेगळी माणसे', 'भक्तिसंगीत', 'गडकरी दर्शन', 'नाट्यदर्पण' या कार्यक्रमांतून भक्तिसंगीत, नाट्यसंगीत सादर केले आहे. पोर्ट ब्लेअर येथेही कार्यक्रम केले आहेत. अमेरिकेच्या दौऱ्यात ॲटलांटा, शिकागो, बोस्टन याठिकाणी स्वतंत्र कार्यक्रम केले आहेत. 'नयन तुझे जादुगार', 'संगीत संशय कल्लोळ', 'संगीत मानापमान' या नाटकांतून प्रमुख भूमिका केल्या आहेत. 'सूरमणी' पदवी ग्रहण केली आहे. एच.एम.व्ही. ने त्यांच्या 'प्रीतीसुधा', 'कलके कलाकार' या नाट्यसंगीत व शास्त्रीय संगीताच्या ध्वनीफिती काढल्या आहेत.

९२) **अनिरुद्ध देशपांडे** (जन्म १९५९) : कृषी विज्ञान पदवीधारक. नागपूरच्या अनेक नावाजलेल्या संगीत समारंभात हजेरी लावली आहे. संगीत रंगभूमीवर अनेक नाटकांतून प्रमुख भूमिका केल्या आहेत. 'संगीत सौभद्र', 'संगीत मानापमान', 'संगीत कान्होपात्रा', 'संगीत संशय कल्लोळ', 'कट्यार काळजात घुसली' यातील त्यांच्या भूमिका गाजल्या आहेत. शास्त्रीय संगीताबरोबर भजन, ठुमरी, गझल, टप्पा, नाट्यगीत, भावगीत इत्यादी सर्व गानप्रकारांवर त्यांचे प्रभुत्व आहे. आकाशवाणी सुगम संगीत स्पर्धेत पारितोषिक मिळविले आहे.

९३) **चित्रा मोडक** : लहानपणापासून संगीताची आवड आहे. नागपूर विद्यापीठातून एम. ए. व संगीत अलंकारही झाल्या आहेत. 'सूरमणी' पदवीनेही त्या भूषित आहेत. आकाशवाणी व दूरदर्शनच्या त्या मान्यताप्राप्त कलावंत आहेत. इंदोर, जबलपूर, भिलाई, रायपूर, पाटणा, अलाहाबाद, अकोला, झांसी, विदिशा, वाराणशी याठिकाणी त्यांचे संगीताचे कार्यक्रम झाले आहेत. आकाशवाणीच्या बी हाय श्रेणीच्या त्या कलावंत असून रंगभूमीवरही भूमिका सादर केल्या आहेत. 'मखमली हे स्वप्न माझे', 'वऱ्हाडी माणसं', 'संगीत छात्र भैरवी', 'कट्यार काळजात घुसली', आवतं, 'कांचनरंग', 'अस्मिता' इत्यादी नाटकांतून भूमिका केल्या आहेत. त्या संगीताच्या प्राध्यापिका आहेत.

९४) **विनायक वाल धुलकर** (जन्म १९४९) : वयाच्या सहाव्या वर्षापासून संवादिनी वादन करीत आहेत. श्यामराव विलायची, अण्णाजी क्षीरसागर, प्रभाकर देशकर यांच्याकडून मार्गदर्शन घेतले आहे. आकाशवाणी आणि दूरदर्शनचे मान्यताप्राप्त संवादिनी वादक आहेत. स्वतंत्र स्वररचना करतात. दक्षिणेमध्ये क्षेत्र सांस्कृतिक केंद्रातर्फे आयोजित अनेक कार्यक्रमांत संगीत दिग्दर्शक भास्कर चंदावरकर यांच्या समवेत काम केले आहे. १९७४ पासून साथसंगत करीत आहेत. अखिल भारतीय कीर्तीच्या गायकांबरोबर उदा. पं. जसराज, गंगूबाई हनगल, पं. जितेंद्र अभिषेकी, माणिक वर्मा, आशा खाडिलकर, पं. सी. आर. व्यास, पं. यशवंत बुवा, पं. राजन साजन मिश्रा, धोंडूताई कुलकर्णी, पं. अजय पोहनकर, पं. राजाभाऊ कोगजे यांची साथसंगत केली आहे. आज नागपूरमधील आघाडीचे संवादिनी साथसंगतकार म्हणून विख्यात आहेत.

९५) **राम देशपांडे** (जन्म १९६८) : लहानपणापासून संगीताची आवड. नागपूर विद्यापीठातून बी. ए. उत्तीर्ण म्युझिकमध्ये सुवर्णपदक मिळाले आहे. एम. ए. ची म्युझिक आणि संगीत अलंकार परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण आहेत. संगीत अध्ययनासाठी भारत सरकारची शिष्यवृत्ती मिळाली होती. कलकत्ता संगीत रिसर्च ॲकॅडमीचे स्कॉलर म्हणून निवड झाली आहे. अनेक स्पर्धांतून पारितोषिके व प्राविण्य मिळविले आहे. कित्येक ठिकाणी संगीत मैफिलींतून प्रभावीपणे हजेरी लावली आहे. आकाशवाणीचे 'बी हाय' श्रेणीचे कलावंत व दूरदर्शनचे मान्यताप्राप्त कलावंत आहेत.

९६) **नारायण मंगरुळकर** (जन्म १९३८) : वयाच्या बाराव्या वर्षापासून संगीताचे शिक्षण सुरू केले. सुरूवातीला सावळाराम खर्डेनवीस यांच्याकडून मार्गदर्शन घेतले. त्यानंतर शंकरराव सप्रे आणि पं. राजाभाऊ कोगजे यांच्याकडून पुढील तालीम घेतली. एम. ए.

संगीत नंतर डॉ. सुमती मुटाटकर यांच्या मार्गदर्शनाखाली संगीतातील पी.एच.डी. पदवी मिळविली. 'विदर्भातील संगीताच्या परंपरा' हा त्यांचा संशोधनाचा विषय होता. पी.एच.डी. साठी अनेक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. नागपूर आकाशवाणीचे ते मान्यताप्राप्त कलावंत आहेत. 'स्वरसंपदा' केंद्राची स्थापना करून संगीतविषयक लेखन चळवळीत प्रमुख सहभाग असतो. 'वैदर्भीय कलोपासक भाग-१, २' याशिवाय 'संगीतशास्त्र विजीयनी', 'संगीतातील घराणी आणि चरित्रे' या पुस्तकांचे लेखन केले आहे. त्यांच्या शिष्यवर्गात श्रीमती समुद्र, हरकरे, लीला दातार, सरोज देव, अनुराधा परांडे इत्यादींचा समावेश होतो. ख्याल, नाट्यसंगीत, टप्पा, ठुमरी हे सर्व प्रकार सादर करतात. अनेक ठिकाणी कार्यक्रम केले आहेत.

संगीत अध्यापनाच्या क्षेत्रात केशवराव राजहंस यांच्या गांधर्व संगीत महाविद्यालयाचाही अंतर्भाव होतो. ग्वाल्हेर घराण्याचे हे गायक असून अध्यापन सुरू आहे. नागोराव पाटणकर हेही ख्यातनाम गायक. नागपूरच्या उदयोन्मुख कलाकारांमध्ये गायक व वादक (साथसंगतकार) म्हणून राजू गुजर, सचिन बक्षी (तबला), लाखे बंधू (हार्मोनियम व तबला), अरुण भाकरे (हार्मोनियम), तात्या इंदूरकर (हार्मोनियम), शिरीष भालेराव (व्हायोलीन-एन. राजम यांचे मार्गदर्शन), प्रकाश पाटणकर, किरण पाटणकर, अनिरूध्द शेवाळे यांचा समावेश होतो. पातुरकर हेही एक ज्येष्ठ हार्मोनियम वादक आहेत. भैय्याजी सामक उत्तम दर्जाचे संगीत दिग्दर्शक म्हणून ख्यात आहेत. लोकांच्या मनात त्यांच्या उत्तम संगीत रचना नेहमीच घोळत असतात. स्नेहा पाळधीकर, प्रमोदिनी क्षत्रीय, ललिता पाटणकर, विद्या खांडवे यांचीही नावे गायनाच्या संदर्भात घ्यावी लागतात.

लोकसंगीत

या संदर्भात श्यामसुंदरबुवा भुजाडे यांचा अग्रक्रम लागतो. ते आकाशवाणी केंद्राचे मान्यताप्राप्त गायक होते. टप्पा, ठुमरी, भजने गात असत. वारकरी पंथाचे भजन ही त्यांची खासीयत होती. जुन्या नाटकांतून स्त्री भूमिकाही केल्या आहेत. उत्तम कीर्तनकार म्हणून त्यांची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस्मध्ये नोंद आहे. १९९३ मध्ये त्यांचे निधन झाले.

लोकसंगीतकारांमध्ये नीचकवडे तुंबडीवाले यांचे नावही विख्यात आहे.

बाबुराव देशमुख यांच्या नामोल्लेखाखेरीज नागपूर नगरीच्या सांगीतिक इतिहासाची पूर्तता होणार नाही. जुन्या जमान्यात देशमुखांचा वाडा म्हणजे सर्व संगीतकारांचे आणि नाटक मंडळींचे माहेरघरच होते. बालगंधर्व, हिराबाई, ज्योत्स्नाबाई, भीमसेन जोशी, कुमार गंधर्व, वसंतराव देशपांडे इत्यादी सर्वच नामवंतांची वाड्यावर वर्दळ असे. अनेक मैफिली वाड्यावर होत. मेजवान्या झडत. औदार्याला शोभेलसे आहेर भेटवस्तूंदाखल कलावंतांना केले जात, त्यामुळे रसिक आणि उदार अशा बाबुराव देशमुखांचे नाव नागपूरमध्ये आलेल्या प्रत्येक कलावंताच्या तोंडी येते ते अगदी सार्थ आहे.

जिल्ह्यातील रंगभूमी आणि चित्रपट

इंदूरकर, विनोद, पदव्युत्तर फाईन आर्ट विभाग, नागपूर विद्यापीठातील प्रोफेसर (नागपूर) यांनी या भागाचे लेखन केले आहे.

पार्श्वभूमी : नागपूर जिल्ह्याचे सांस्कृतिक केंद्र नागपूरलाच राहात आले आहे. नागपूरात साधारणत: आधुनिक शिक्षणास १८७० पासून सुरुवात झाली. मुंबई-पुण्याकडील मंडळींनी इथे दोन विचार प्रवाह आणले. त्यापैकी एक राजकीय विचार व दुसरा सामाजिक विचार. सामाजिक सुधारणेच्या बाबतीत इथल्या लोकांना विशेष रुची नव्हती. १८८० पासून नाटक किंवा रंगभूमी नावाची एखादी वेगळी कला असते हे लोकांना कळू लागले. तत्पूर्वी नर्तकीचे नाच, वझीरखाँचे गायन व त्यानंतर बापूजी जोशी यांची गाण्याची बैठक एवढ्याचेच लोकांना विशेष आकर्षण असे.

> 'तेव्हा हरिकथेच्या रूपाने लोकांची गायन व कथा-कादंबरीची तहान भागविण्यात येई. ज्यांना तेवढेही प्राथमिक स्वरूपाचे संस्कार नव्हते ते आपली तहान दंढारीने भागवीत. या बाजूला तमाशे नव्हते. असलाच तर एखादा नाच्या पोर असायचा. तो खालच्या थरातील लोकांचे रंजन करावयाचा, तेव्हा वरच्या थरांची रसिकता नागपूरचे दादाजी सारखे कथाकार भागवीत असत व त्यासाठी लोकांचे थवेच्या थवे लोटत.' (गोमकाळे, द. रा. 'विदर्भातील मराठी नाटककार', **युगवाणी,** १९५९, पृ. १५.)

तेव्हा बर्डी व शहर असे दोन तट पडत. लोखंडी पुलाच्या पलीकडचे म्हणजेच शहर किंवा महाल भागातले म्हणजे पुराणमतवादी, तर लोखंडी पुलाच्या अलीकडेच म्हणजे बर्डी, धरमपेठ व सिव्हिल लाईन्स् कडचे म्हणजे पश्चिम नागपुरातले नवमतवादी लोक. बर्डी भागाचे पुढारीपण तेव्हा पारधी मंडळींकडे असे.

त्यावेळी श्रीमंत बाळासाहेब काळीकर न्यायाधिशाची नोकरी सोडून परत आले होते. त्यांना विनायकराव षंडांगुळे सारखे सनातनी लेखक लाभले होते. त्यांनी 'नलदमयंती आख्यान' हा विषय निवडून त्यावर नाटक लिहिले होते. गायक वाद्यवृंद त्यांच्या भोवती असायचाच. त्यांच्यापैकी काहींना ते स्त्री-पुरुषांचे झगझगीत कपडे चढवीत असत आणि त्यांच्या सोबतीने मारोतराव वंजारी, नारायणराव संगीत, शंकरराव बापट, बाळाजीपंत बेलखोडे प्रभृती अशी नाटके करू लागली. याच मंडळींचे नेतृत्व पुढे पंढरीनाथ शास्त्री घाटे ह्यांच्याकडे आले. व्युत्पत्तीची सामग्री शास्त्रीबुवांकडे पुरेशी होती. तिला त्यांच्या रसिकतेची जोड मिळाली. त्यांचे वडील संस्कृतचे सुविख्यात पंडित होते. असे असले तरी तेव्हा नाट्यकलेस सामाजिक प्रतिष्ठा नव्हती. नारायणराव पेंटर व सुप्रसिध्द हार्मोनियम वादक मुरलीधर मुळे यांची या मंडळीस सहानुभूती असल्याने पंढरीनाथ शास्त्रींनी नाटके लिहिली व करविली.

नागपुरात प्रथमत: हार्मोनियम हे वाद्य १८९६-९७ मध्ये आले. तत्पूर्वी उत्कृष्ट गायक ब्रम्हचारीबुवा तंबोऱ्याच्या साथीने नाटके करीत. त्यांची समाधी रामटेक येथे आहे.

त्यावेळी महाविद्यालयातून संमेलने होत. शाळांमधून त्यामानाने कमी होत. महाविद्यालयाच्या

अनुक्रमणिका

संमेलनात विद्यार्थ्यांचा ओढा शेक्सपियरची नाटके करण्याकडे होता. तेव्हा हिस्लॉप व मॉरिस ही दोन महत्त्वाची महाविद्यालये असत. विज्ञान महाविद्यालयात मंडळी थोडी असे. ही स्थिती अगदी १९३४ पर्यंत होती. नागपूर विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर चित्र थोडेफार बदलले. हिस्लॉप कॉलेजात गोपाळराव देव, श्रीरामपंत वैद्य ही मंडळी कामे करीत. १९१० मध्ये सिनेमा आला पण तो बोलका नव्हता. त्यामुळे त्याचा परिणाम रंगभूमीवर फारसा झाला नाही. तेव्हा या काळात नारायणराव वैद्य, डॉ. ल. वा. परांजपे, बंडूनाना पळणीटकर, पुरुषोत्तमराव गोडबोले ही मंडळी 'महाल अॅच्युअर क्लब' या नावाने पुढे आली. यांच्यात देशभक्तीची भावना जागृत असल्याकारणाने त्यांची नाटकांची निवडही अभिजात असे. या काळात काही लेखक पुढे आले. त्यात बळवंत हरी पंडित आणि कवी आनंदराव टेकाडे यांची नावे प्रामुख्याने घेतली जात असत.

नागपुरातील जुन्या पिढीपुढे भाऊराव कोल्हटकर ह्यांची गायकी तसेच नारायणराव राजहंस, केशवराव भोसले किंवा मास्टर दीनानाथ यांची गायकी डोळ्यासमोर होती. तेव्हा पाटणकर संगीत मंडळीची सहज-सुलभ अशी गायकी सामान्यांना चाले. पण खऱ्या रसिकांना उच्च संगाताची आवड असे. तिचे चाहते जेव्हा नाट्यक्षेत्रातून कमी होऊ लागले तेव्हा गद्य नाटकाला प्रतिष्ठा मिळाली. भाऊसाहेब गोडबोले यांच्यासारख्या दणदणीतपणे यावज्जी व पुरुष भूमिका करणाऱ्या व बर्वे यांच्यासारख्या स्त्री भूमिका करणाऱ्या नटांची वाहवा होऊ लागली.

मराठी नाटककारांची परंपरा

नागपूर जिल्ह्यात आजसुध्दा प्रकाशित नाटकांपेक्षा अप्रकाशित नाट्यसंहितांचे प्रमाण अधिक आहे. एकेकाळी गाजलेले प्रथितयश कादंबरीकार बाळकृष्ण संथुराम गडकरी यांचे 'पत्रिकाहरण', 'मधुमाधव' व 'दाहोरकन्या' अथवा 'सिंधुग्राम' यापैकी केवळ पहिलेच नाटक १९०५-०६ मध्ये 'महाराष्ट्रवाग्विलास' या मासिकात क्रमशः प्रसिध्द झाले. पंढरीनाथ शास्त्री घाटे आणि बळवंतराव पंडित यांचीही नाटके प्रकाशित आहेत. मुंबई-पुण्याकडील प्रोत्साहित नाटककारांमध्ये पूर्वी महाजनी व तात्यासाहेब कोल्हटकर यांची गणना होत असे. पुढे अशा नाटककारांची एक परंपराच निर्माण झाली. त्यात नाना जोग, पुरुषोत्तम दारव्हेकर, महेश एलकुंचवार यांचे नाव अग्रस्थानी घ्यावे लागते. भारतीय रंगभूमीवरील पहिली त्रिनाट्यधारा लिहिण्याचा मान त्यांनी मिळविला.

१८१८ मध्ये घंड्या नायडू यांनी 'केशरी मंदिल' या नावाने बुवाबाजी या विषयावर नाटक लिहिले होते. ते पौराणिक किंवा ऐतिहासिक नव्हते. ती संपूर्णतः स्वतंत्र काल्पनिक सामाजिक नाट्यकृती होती व त्यामुळे ते प्रसिध्द झाले. १८९० च्या सुमारास दत्तोपंत गोखले यांनी 'संगती विपाक' नावाचे नाटक लिहून त्याचे प्रयोग नागपुरात केले होते. त्याच सुमारात कविवर्य ना. वा. टिळक यांनीही 'गोदावरी' अथवा 'दुर्दैवी सन' (१८९०) नावाचे नाटक लिहिले होते असा उल्लेख सापडतो. पारखी व विनायकराव षडांगुळे वकील १८९४ च्या सुमारात 'निरजोल्लास' मासिक चालवित असत. त्यांनीही आपल्या नाटकाचे प्रयोग नागपूरात केले. परंतु प्रयोगाचा इतिहास अगर ती नाटके आज काळजीपूर्वक लिहून

ठेवल्याचे आढळत नाही. नागपुरात अशा प्रकारे नाट्यविषयक कार्य चालू होण्यापूर्वीच अकोला व अमरावती या भागात नाट्यविषयक प्रयत्नांना सुरूवात झाली होती.

विष्णु मोरश्वर महाजनी, बजबा रामचंद्र प्रधान आणि डेप्युटी इन्स्पेक्टरच्या हुद्यावर असलेले श्रीराम भिकाजी जठार या मूळच्या नागपूरकर मंडळींनी अकोला व अमरावतीत राहून नाट्यकलेच्या विकासासाठी प्रयत्न केले. प्रधान व जठार यांनी शेक्सपिअरच्या 'कॉमेडी ऑफ एरर्स ' या नाटकाचे भाषांतर करून 'भ्रांतिकृत-चमत्कार' हे नाटक लिहिले. महाजनींनी 'सिबेलाईन, 'विटर्स, रेल' आणि 'इज वेल टॅट एन्डस बेल' या नाटकांची अनुक्रमे **'तारा,** 'मोहविलसित' आणि 'वल्लभनुनय' या नावांनी भाषांतरे लिहिली ; पण केवळ ही नाटके लिहून ही मंडळी थांबली नाहीत, तर जठार, प्रधान यांनी इचलकरंजीकर मंडळीला ही नाटके बसवून दिली आणि त्यांचे प्रयोग रंगभूमीवर करून दाखविले. १८७९-८० मध्ये 'इचलकरंजीकर नाटक मंडळी' ला या नाटकांच्या प्रयोगाद्वारे खूप पैसा मिळाला. तत्कालीन विद्वानांना या प्रयोगाची इतकी महती पटली की, विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी त्याची दखल घेतली. 'महाजनींची **तारा** म्हणजे भाषांतर नव्हेच ; ते समांतर होते. आजपर्यंत जेवढी शेक्सपिअरची नाटके मराठीत झाली आहेत तेवढी सर्व भाषांतरादाखलच असल्यामुळे एतद्देशीय वाचकास प्राय: दुर्लभ झाली आहेत. यास्तव त्यास आकलनीय व श्रवणीय अशा पध्दतीचे भाषांतर मराठीत करण्याचा हा प्रथमच प्रयत्न होय' अशी या नाटकाची सार्थ व योग्य प्रशंसा चिपळूणकरांनी केली आहे.

इंग्रजी नाटकांची उत्कृष्ट भाषांतरे व रंगभूमीचा विकास या दृष्टीने वरील मंडळींचे प्रयत्न महत्त्वाचे होते. तो नाट्यकलेतील विकासाचा एका परीने पहिलाच टप्पा होता. एका बाजूने ऐतिहासिक, पौराणिक नाटके, तर दुसऱ्या बाजूने इंग्रजी-संस्कृत नाटकांची भाषांतरे व तिसऱ्या बाजूने अवस्थाविष्कारांकित तत्कालीन परिस्थितीवर आधारलेली, पण कलाहीन वाङ्मयकृती असेच त्यावेळचे नागपूर जिल्ह्यातील व एकूणच विदर्भातील मराठी रंगभूमीचे त्रिविध स्वरूप होते.

तात्यासाहेब कोल्हटकरांच्या 'गुप्तमंजुषा' नाटकानंतर धुंडिराज रंगनाथ शेबेकर यांचे 'संगीत धुतविपाक' अथवा 'दमयंती' हे नाटक प्रसिध्द झाले व १९१५ च्या अखेरीस त्याचेच वलपालन हे एकादशीवरील नाटक 'ललितकलादर्श नाटक मंडळी' ने रंगभूमीवर आणले होते, परंतु ते यशस्वी होऊ शकले नाही. शेबेकरांची आणखीही काही अप्रकाशित नाटके त्यांच्या चिरंजिवांच्या संग्रही होती. परंतु ती नाटके मिळू शकली नाहीत. त्यानंतर बामणगावकरांचे 'धनुर्याग' अथवा 'सीतास्वयंवर' नाटक १९१७ मध्ये प्रसिध्द झाले. या नाटकाचे प्रयोग आनंदविलास नाटक मंडळी करीत असे.

खाडिकरांच्या 'दौपदी' (१९२०) नाटकानंतर बामणगावकरांनी त्याच कथानकावर 'आत्मतेज' (१९२०) नाटक लिहिले व ते सवाई गंधर्वाच्या नूतन संगीत नाटक मंडळीने रंगभूमीवर आणले. या नाटकातील सवाई गंधर्वांची रामभाऊ कुंदगोळकर यांची द्रौपदीची भूमिका विख्यात होती.

१९१६ मध्ये ना. के. बेहरे यांचे 'पिझारो' हे नाटक प्रसिध्द झाले. याच सुमारास बा.

ह. पंडितांनी 'कृष्णकुमारी' व 'भ्रमनिराश' ही नाटके लिहिली. पण ती प्रकाशित झाली नाहीत. त्याचप्रमाणे पंढरीनाथ शास्त्री यांनीही याच काळात 'भवानी सुंदर', 'कर्मसंन्यास' आणि 'राशिरक्त' ही नाटके लिहिली. परंतु ही नाटके प्रकाशित नाहीत. याच काळात नानासाहेब केदार यांनीही 'एकलव्य' व 'गुरुदक्षिणा' या नाटुकल्या (संक्षिप्त नाट्य) लिहिल्या होत्या असा उल्लेख आढळतो. १९२२ मध्ये कवी आनंदराव टेकाडे यांचे 'मथुरा' हे संगीत नाटक प्रसिध्द झाले. त्याचे प्रयोग 'दक्षिणी सुबोध नाटक मंडळी' करीत असे. 'मधुर मीलन' ही त्यांची दुसरी नाट्यकृती. 'राक्षसी महत्त्वाकांक्षा' या वामनराव जोशीच्या नाटकानंतर वरील नाटककारांनी १९२२-२३ पर्यंत नाटके लिहिली, परंतु ती प्रभावी ठरली नाहीत. १९२१-२२ पर्यंतचा काळ मराठी रंगभूमीच्या उत्कर्षाचा काळ होता. या काळात विदर्भात तात्यासाहेब कोल्हटकर, वीर वामनराव जोशी व त्यांच्या मागोमाग बामणगावकर या वैदर्भीय नाटककारांची नाटके प्रभावी ठरली. या वेळपर्यंतची नाटके सामान्यत: इंग्रजीत शेक्सपिअर, शेरीउन, मोलिअर अथवा संस्कृत साहित्यातील परंपरांवरच आधारलेली होती व त्याच परंपरांना धरून त्यावेळी नाट्यलेखन होत असे.

१९२१ नंतर मराठी नाट्यक्षेत्रात विधायक असा बदल घडून आला. संगीत रंगभूमी इतकीच महाराष्ट्र नाटक मंडळीतील नटवर्गाच्या कर्तबगारीमुळे गद्य परंपराही १९०७-०८ पासून नावलौकिकास येऊ लागली होती. एक बालगंधर्वांच्या गायनाची मोहिनी सोडली, तर खरे नाट्य गद्यातच बसत असल्याची जाणीव महाराष्ट्रातील सुज्ञ प्रेक्षकास या काळात निश्चितपणे पडू लागली. शेक्सपिअर, शेरीउन, मोलिअर या नाटककारांची जादू कमी होऊन आधुनिक पाश्चात्य नाटकांकडे, नाट्य-प्रचाराकडे, रचनातंत्राकडे सुज्ञ व चिकित्सक नाट्यरसिकांचे लक्ष गेले. अशा वेळी नागपूर- विदर्भाच्या रंगभूमीवर वा. वा. भोळे या नव्याने उदयास आलेल्या नाटककाराने प्रभावी व्यक्तिरेखेद्वारे नाटके रेखाटण्याचे कसब प्रथम दाखविले.

१९२८ मध्ये विश्वनाथ चिंतामण बेडेकरांनी लिहिलेले 'ब्रह्मकुमारी' नाटक १९३३ मध्ये प्रसिध्द झाले. या नाटकाचे प्रयोग 'बलवंत नाटक मंडळी' करीत असे. नाटकास पौराणिक कथानकाच्या पार्श्वभूमीवर स्वत:च्या हक्काच्या जागरूकतेमुळे सावध झालेल्या स्त्रीविषयक प्रश्नाला अहिल्या व तारा या दोन पात्रांद्वारे त्यांनी चालना दिली. बेडेकरांच्या या नाटकाने त्यांचे यशस्वी नाटककार म्हणून स्थान निश्चित केले. परंतु या नाटकाची कोणी फारशी दखल घेतली नाही. १९३० नंतर चार-पाच वर्षात व्यावसायिक नाटक कंपन्यांची वाताहत झाली आणि मराठी रंगभूमीला अवकळा आली. तरीही १९३० ते १९४० च्या दरम्यान मराठीत पुष्कळ नाटके लिहिली गेली.

शं. ना. सहस्त्रबुध्दे यांचे 'खरा प्रेमसंन्यास' हे नाटक १९३१ मध्ये प्रसिध्द झाले. त्याचे प्रयोग 'नूतन महाराष्ट्र नाटक मंडळी' करीत असे. गडकऱ्यांच्या प्रेमसंन्यासातील पात्रे व विषय घेऊन याच नाटकाचा उत्तरार्ध त्यांनी रंगविला आहे. 'राणी चंद्रावती' हे त्यांचे दुसरे नाटक फारसे गाजले नाही. कृ. बा. भोसले यांनीही विपुल नाट्यरचना केली. त्यांचे 'रक्तांगण' हे ऐतिहासिक नाटक 'समर्थ नाटक मंडळी'च्या रंगभूमीवर काही दिवस बरेच गाजले. त्याशिवाय 'पुत्रलालसा' व 'कादंबरी' ही सामाजिक नाटके 'रमेश संगीत नाटक मंडळी' ने रंगभूमीवर आणली. तसेच त्यांची 'जरीपटका', 'झाशीची राणी' व 'बेलभंडार'

ही नाटके रंगभूमीवर आली. त्यांची न झालेली नाटके म्हणजे 'जित्याची खोड', 'अण्णासाहेब', 'शिवभिल्लीण', 'घातवार' व 'भूक' ही होत. हंबर्डे यांनी 'भोळा शेतकरी' (१९३४), 'समाज कंटक' (१९३४), 'स्वातंत्र्य देवता' (१९३५), 'जावई बापू' (१९३७), 'इ ाशीची राणी' (१९३७), 'बिगारीचा बैल' (१९३८-३९), 'अकलेचे खंदक' (१९३८-३९), 'अग्निज्वाला' (१९४७), 'दख्खनची जननी' (१९४७), 'बाजीराव मस्तानी' (१९५५), 'कमळाच्या पाकळ्या' (१९५६) व 'अठरा अक्षौहिणी' (१९५६) ही नाटके लिहिली. त्यापैकी 'बिगारीचा बैल' हे नाटक १९३९ मध्ये 'नाट्यकला प्रवर्तक नाटक मंडळी' ने नागपूर येथे रंगभूमीवर आणले. तसेच 'बाजीराव मस्तानी', 'अठरा अक्षौहिणी' व 'कमळाच्या पाकळ्या' ही तीन नाटके शिलेदारांची मराठी रंगभूमी ही नाट्यसंस्था करीत असे. नाटककार अनंत माधव ओक यांनी जेम्स बेरीच्या 'अलाईस सीट बाय दि फाईव्ह' या नाटकाचे मराठी रुपांतर 'बायकी कावा' या नावाने १९३४ मध्ये प्रसिध्द केले व त्याचा प्रयोग त्यांच्या 'साहित्य संपादन मंडळाने' करून दाखविला. सूर्यकांत पंडित यांचे 'सीमोल्लंघन' हे एकमेव नाटक १९३५ मध्ये प्रसिध्द झाले. १९३३-३४ च्या सुमारास शं. बा. नेरकर यांनी साम्यवादावर लिहिलेल्या 'संजीवनी' या नाटकाचा प्रयोग नागपूर येथील 'साहित्य चर्चा मंडळाने' सादर केला. १९३७ मध्ये ना. कृ. दिवाणजी यांनी 'सुनेचा सापळा' व 'राजकन्या पद्मावती' या दोन नाटिका लिहिल्या. १९३९ मध्ये डॉ. वि. भि. कोलते यांनी 'सोडचिठ्ठी' ही काहीशी उपहासगर्भ विडंबनात्मक नाटिका लिहिली. व्यंकटेश वकील यांच्या 'खरा न्याय', 'गावकाकू' व 'वायलचे पातळ' या एकांकिका 'नव्या ज्योती' या नावाने १९३९ मध्ये प्रसिध्द झाल्या. त्यांच्या जन्माचे सोबती (१९४३) या चार पात्रांवर आधारलेल्या मराठी नाटकाला मराठी रंगभूमीच्या शताब्दी महोत्सवात पारितोषिक मिळाले. त्यांचे तिसरे नाटक 'सारेच सज्जन' १९५४ मध्ये प्रसिध्द झाले. जे. बी. रोस्टले या इंग्रजी नाटककारांच्या 'ॲन इन्स्पेक्टर कॉल्स' या नाटकाचा तो स्वैर अनुवाद आहे. हे नाटक फारच अल्पकाळ रंगभूमीवर होते. या नाटकाद्वारे मराठी वाङ्मयाला एका प्रयोगक्षम नवीन नाट्यतंत्राचा लाभ व परिचय करून दिला. या नाटकाचे काही प्रयोग मुंबईला झाले.

१९४० नंतरच्या काळात मधूकर आष्टीकर यांनी 'क्षणाची सून जग माझे आहे', 'माझ ा ज्ञानियाचा राजा', 'एक इसम तेरा आणे', 'प्रत्येकाला जोडा चावतो', 'वैरी', 'अमृतघट' 'तुझ्या घरी', 'माझा रघू बोलला', 'तो झोपला डाराडूर', 'अमर ही माझी झाशी' इत्यादी नाटके लिहिली. स्वत:ची नाट्यसंस्था काढून त्यांनी 'सावळा गोंधळ' नाटकाचे प्रयोग अमरावती, मुंबई आणि नागपूरला केले. आष्टीकरांनी 'डॉक्टर सलामत तो रोग पचास', 'जेव्हा मला विंचु चावला', 'हौस माझी पुरवा', 'माझ्या शोधात मीच', 'बलिदान', 'च्याऊ म्याऊ पत्रावळीचे पाणी पिऊ' या एकांकिका लिहिल्या. दिनकर देशपांडे यांनी अनेक बालनाटके लिहून येथील बालरंगभूमी जिवंत ठेवली आहे. 'बालरंजन' या संस्थेने त्यांची नाटके सादर केली. व. शा. वरखेडकर यांची 'ध्येयाचा ध्यास' (१९४२) व 'पूर्वग्रह' (१९४३) ही नाटके प्रसिध्द झाली, तर 'जनार्दनाचे घर' (१९४९), 'जागोबाच्या राईत' (१९५२), 'राजपुत्र' (१९५२) व 'तोतया' (१९५६) ही नाटके हस्तलिखित स्वरूपात राहिली. 'पूर्वग्रह' नाटकाचे शताब्दी महोत्सवात १९४३ मध्ये नागपूर व सांगली येथे 'अभिनव नाट्य मंदिरा'ने प्रयोग केले.

अनुक्रमणिका

पु. भा. भावे यांचे 'विषकन्या' नाटक १९४४ मध्ये प्रसिध्द झाले असले तरी त्याचे लेखन त्यापूर्वीच झाले होते. नागपूरच्या कोणत्याही नाट्यमंडळाला त्यांचे 'विषकन्या' रंगभूमीवर आणण्याची हिंमत झाली नाही. त्यांचे दुसरे नाटक 'स्वामिनी' मार्च १९५६ मध्ये ललितकलादर्श तर्फे मुंबई येथे रंगभूमीवर आले. नाना जोग या नाटककाराचे कार्यच वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांनी 'चित्रशाळा' (१९४८), 'सोन्याचा देव' (१९४९) व 'भारती' (१९५२) ही तीन नाटके लिहिली. सोन्याचा देव व भारती या नाटकांचे प्रयोग 'नागपूर नाट्यमंडळाने' केले. नाना जोगांनी पुढे शेक्सपिअरच्या 'हॅम्लेट' या नाटकाचा स्वैर अनुवाद केला. ते केवळ नाटककार नव्हते, तर कुशल दिग्दर्शक व संगीततज्ञही होते. अनेक नाटकांचे दिग्दर्शन करून मराठी रंगभूमी संपन्न व समृध्द कशी करता येईल याचे मार्गदर्शन त्यांनी केले. त्यांच्या **हॅम्लेट** या नाटकास मुंबई राज्य सरकारच्या नाट्यस्पर्धेत पारितोषिक मिळाले. सन १९५४ मध्ये त्यांनी विदर्भ साहित्य संघाची इमारत उभी केली आणि रंगमंदिराचे काम हाती घेतले. परंतु त्यांचे हे काम पूर्ण होऊ शकले नाही.

शंकरराव कुलकर्णी यांच्या नाट्यलेखनाचा विचार करणे आवश्यक आहे. त्यांनी 'नावात काय आहे' (१९५४), 'प्रेयसी की माता' (१९४८), 'माझी ही' (१९५३), 'हिरवा मळा' (१९५६), 'संस्कार' (१९५६) ही नाटके, तर 'पुष्पांजली' हे दोन अंकी नाटक लिहिले. १९५४ मध्ये त्यांनी 'कनककांता' हे हिंदी नाटकही लिहिले. १९५४ मध्ये यापैकी केवळ 'प्रेयसी की माता' हेच नाटक प्रसिध्द झाले. त्यांच्या 'हिरवा मळा' नाटकाला १९५९ मध्ये पुण्याच्या महाराष्ट्रीय कलोपासक संस्थेचे द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. नित्यानंद मोहिते यांनी 'रुक्मिणी स्वयंवर' हे नाटक लिहिले. मुंगशीकर यांनीही 'मराठ्यांचे सिंहासन' हे नाटक लिहिले. 'ललिताभिनय' या नाटक मंडळीने ते १९५३ मध्ये रंगभूमीवर आणले. केशवराव केळकर यांनी 'राजलक्ष्मी' हे नाटक लिहिले. तसेच त्यांनी नभोवाणीसाठीही विपुल लिखाण केले.

नागपूर जिल्ह्यात जे मोजके मोठे नाटककार झाले त्यात पुरुषोत्तम व्यंकटेश दारव्हेकर यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. 'कलेचा काळा बाजार' हे नाटक त्यांनी १९५१ मध्ये लिहिले व त्याचा प्रयोग विदर्भ साहित्य संघाच्या चंद्रपूर येथील अधिवेशनात केला. सॉमरसेट मॉम यांच्या 'कान्स्टंट वाईफ' या प्रसिध्द नाटकाचा सप्तपदी या नावाने त्यांनी स्वैर अनुवाद केला. १९५४ च्या नागपूर येथील विदर्भ साहित्य संघाच्या संमेलनात त्यांनी त्यांच्याच संस्थेमार्फत या नाटकाचा प्रयोग केला. नंतर त्यांनी 'तीन पावले', 'आकाशाचे झाड', 'कल्पनेचा खेळ', 'जगा तुझी तऱ्हा', 'कोण तो' या एकांकिका लिहिल्या. 'कल्पनेचा खेळ' या नावाने या एकांकिकांचा संग्रह १९५६ मध्ये प्रसिध्द झाला. शासनाचा साहित्य परिषद पुरस्कारही त्यांना मिळाला.

नवनवीन प्रयोगांची वाटचाल करणारे नाट्य लेखक म्हणून पुरुषोत्तम दारव्हेकरांचे नाव घ्यावे लागेल. अल्बर्ट कामच्या 'कॅलिगुला' या नाटकावरून त्यांनी 'चंद्र नभीचा ढळला' हे नाटक रंगभूमीवर आणले. 'नयन तुझे जादूगर' मधील प्रयोगशील दृष्टिकोनातून दारव्हेकर यांनी संगीत आणि नाट्य यांचा समन्वय शोधण्याचा प्रयत्न केला. त्यांचे गाजलेले नाटक म्हणजे 'कट्यार काळजात घुसली' हे होय. त्यांच्या नाटकाचे वैशिष्ट्य म्हणजे १९६५

नंतर संगीताच्या पार्श्वभूमीवर सतत कोणत्या ना कोणत्या दुखाच्या कट्यारीला आपल्या हृदयात वागवणारी माणसे हि होय. परंतु एकीकडे वास्तवाचा आभास निर्माण करण्याचा प्रयत्न, तर दुसरीकडे कृत्रिम पेचप्रसंग रंगवणारे कथानक यातून रंजनाचे मूल्यच प्रभावी ठरले आणि नाटक योगायोग व अपघात यांच्या आहारी गेले.

१९४८ मध्ये नागपूरला आकाशवाणी केंद्र स्थापन झाले आणि येथील रंगभूमीला थोडी चालना मिळाली. दारव्हेकर आकाशवाणीत रुजू झाल्यानंतर आपल्या 'रंजन कला मंदिर' या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी नाट्यविषयक चळवळींना चालना देऊन नाट्यविषयक भरीव कार्य केले. तत्पूर्वी नागपुरातील गणेशोत्सवातून त्यांनी बालकलाकारांच्या सहाय्याने सादर केलेले 'मेळे' लोकप्रिय झाले होते. नागपूर नाट्य मंडळाच्या 'उद्याचा संसार' मधील त्यांनी केलेली शेखरची भूमिका (१९४६) गाजली. त्यापूर्वी म्हणजे १९३९-४० च्या सुमारास नील सीटी हायस्कूलच्या स्नेहसंमेलनातील 'साष्टांग नमस्कार' च्या प्रयोगात चंदूची भूमिका करून ते रंगमंचावर उभे राहिले होते. नट, नाटककार आणि दिग्दर्शक या तिहेरी नात्यांनी ते रंगभूमीशी निगडित राहिले आहेत. १९६० साली त्यांनी लिहिलेल्या व दिग्दर्शित केलेल्या 'चंद्र नभीचा ढळला' या नाट्यप्रयोगास महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सवात मुंबई येथे अंतिम स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळाले. तेव्हापासून तर ते नागपूरहून मुंबईला स्थायीक होईपर्यंत त्यांनी नागपूरची रंगभूमी सतत गाजत ठेवली. पुढे मुंबईला स्थायिक झाल्यावर त्यांनी 'नटसम्राट', 'बेईमान', 'अश्रूंची झाली फुले' या सारख्या एकापेक्षा एक सरस आणि लोकप्रिय व्यावसायिक नाटकांचे यशस्वी दिग्दर्शन केले. १९८७ ते १९९० या तीन वर्षात नागपूर विद्यापीठाच्या ललित कला विभागात 'प्रोफेसर एमिरेटस' म्हणून असतांना त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना नाट्य प्रशिक्षण दिले. त्यांच्या या कार्यात त्याच विभागातील नाट्यशास्त्राचे प्राध्यापक विनोद इंदूरकर यांनी मदत केली. सध्या नागपूर आकाशवाणी केंद्रात ते 'प्रोड्युसर एमिरेटस' म्हणून काम पहात आहेत.

विजय तेंडुलकर यांच्या नंतर प्रायोगिक रंगभूमीच्या संदर्भात महेश एलकुंचवार यांचे नाव आवर्जून घेतले जाते. त्यांनी 'वासनाकांड', 'गार्बी', 'रुद्रवर्षा', 'पार्टी', 'रक्तपुष्प', 'आत्मकथा', 'वाडा चिरेबंदी', 'मग्न तळ्याकाठी', 'युगांत' यासारखी नाटके तसेच 'होळी', 'कैफियत', 'यातनाघर', 'सुलतान' या एकांकिका लिहिल्या. जागतिक रंगभूमीवर सर्वप्रथम सुप्रसिध्द ग्रीक नाटककार इस्किलस याने त्रिनाट्यधारा (ट्रीलॉजी) लिहिली होती. भारतीय रंगभूमीवर मात्र 'वाडा चिरेबंदी', 'मग्न तळ्याकाठी' आणि **युगांत** या रुपाने सर्वप्रथम एलकुंचवार यांनी त्रिनाट्यधारा लिहिली आहे. या अर्थाने एलकुंचवार हे भारतीय रंगभूमीवरील 'इस्किलस' आहेत असे म्हणता येईल. त्यांच्या नाट्य कर्तृत्वाबद्दल त्यांना संगीत नाटक अकादमीने पारितोषिक देऊन गौरविले. तसेच अखिल भारतीय नाट्य परिषद, मुंबई तर्फे नाटककार देवल स्मृती व प्र. के. अत्रे गौरव पारितोषिक देऊनही सन्मानित करण्यात आले. याशिवाय 'अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद' नागपूर शाखेतर्फे वैदर्भिय नाट्य लेखक श. ग. गडकरी स्मृती पुरस्कारही त्यांना मिळाला आहे. त्यांच्या बहुतेक नाटकांची हिन्दीत भाषांतरे झालेली आहेत. रक्तपुष्पाचे इंग्रजीत भाषांतर झाले आहे. भारतीय प्रायोगिक रंगभूमीच्या संदर्भात त्यांचे नाव आदरपूर्वक घेतले जाते. अर्थपूर्ण आणि

समर्पक शब्दांचा वापर करून संवाद लिहिण्याची त्यांची शैली वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांच्या त्रिनाट्यधारेत वास्तववाद, अतीवास्तववाद आणि अभिव्यक्तीवाद आढळतो. काटोलचे अविनाश वरोकर यांचे 'कथा ही मुक्या पाखराची' हे नाटक अनेक पुरस्कारप्राप्त नाटक असून त्याचे अनेक प्रयोग झाले आहेत.

याशिवाय जिल्ह्यातील सुधाकर गायधनी, दादाकांत धनविजय, सुमती धनवटे, कमलाकर डहाट, प्रभाकर दुपारे, संजय जीवने, इ. मो. नारनवरे, रमेशचंद्र निकोसे, जॉनी मेश्राम, अमर रामटेके, पराग घोंगे, दिनकर बेडेकर, सुधीर शिनखेडे, ज. शं. फणसाळकर या नाटककारांनी नाटके लिहिली आहेत. पैकी ज. शं. फणसाळकरांच्या 'पोहा चालला महादेवा' आणि पराग घोंगे ह्यांच्या 'वाळुचे घर' ह्या नाटकांना महाराष्ट्र राज्य नाट्यमहोत्सवात पारितोषिक प्राप्त झाले.

रंगभूमी संबंधात नाट्यसंस्थांचे योगदान

नागपुरातील मराठी रंगभूमीच्या वाटचालीचा मागोवा घेतल्यास ती जवळजवळ शंभर वर्षापासून सुरू असल्याचे दिसून येते. विष्णुदास भावेंचे नाव येथील लोकांना माहीत होण्यापूर्वीच येथे पौराणिक नाटकांचे प्रयोग होत असत. विष्णुदास भावेंच्या नाटक मंडळीला आख्याने व पदे तयार करून देणारे नाना सोहनीही याच भागातले. त्यामुळे नाटक ही गोष्ट एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस नागपूरकरांना मोठी अपूर्वाईची नव्हती. तथापि अशी नाटके स्वत: नाटक मंडळी काढून रंगमंचावर आणावी असा विचार नागपूरकर मंडळींच्या मनात सुरूवातीला तरी नव्हता. इ.स. १८८०-८५ च्या सुमारास वाशीमकर, शाहूनगरवासी, किर्लोस्कर इत्यादी प्रसिध्द नाटक मंडळांचे प्रयोग पाहून असे विचार येथील सुशिक्षितांच्या मनात आले. त्यानुसार न्यू इंग्लिश हायस्कूलचे संस्थापक श्रीधरपंत पारखी यांनी नटांची जुळवाजुळव करून १८९० मध्ये एका नाटक मंडळीची स्थापना केली. त्या मंडळीसाठी पारखींनी सुसंबध्द कथानक असलेले 'सत्यवान-सावित्री' हे संगीत नाटक लिहून त्याचे अनेक प्रयोग केले. रेल्वेत सिग्नलमन असलेल्या दत्तोपंत गोखले यांनी १८९० मध्ये 'विपाक' हे संगीत नाटक लिहून त्याचे प्रयोग नागपुरात करून दाखविल्याचे ह. ना. नेने यांनी नमूद केले आहे.

पारखींची संस्था दोन वर्षातच बंद पडली. याच सुमारास नागपूरच्या सरदार घराण्यांतील तरुण श्रीमंत विठ्ठलराव तथा बाळासाहेब काळीकर यांनी मुन्सफाची सरकारी नोकरी सोडून नागपूरला वास्तव्य केले. ते तत्कालीन सुशिक्षितांचे एक आकर्षण केंद्र होते. त्यांनी 'नीरजोल्लास' मासिकाचे संपादक विनायकराव षडांगुळे यांच्यासारख्या उत्साही तरुणांना हाताशी धरून एक नाटक मंडळी काढली. या मंडळीसाठी षडांगुळे यांनी 'नल-दमयंती' हे संगीत नाटक लिहिले. नटांना अभिनयाच्या व गाण्याच्या तालमी श्रीमंत काळीकर देत. 'नल-दमयंती', 'सौभद्र', 'रामराज्यवियोग' इत्यादी नाटकांचे प्रयोगही ही मंडळी करीत असे.

नागपूरच्या नाट्य चळवळीशी अशाप्रकारे घरंदाज व सुशिक्षित लोकांचा संबंध असला तरी नाटक हा प्रकारच हीन दर्जाचा असल्याची समजूत येथील सनातनी मनात दृढमूल होती. (वऱ्हाडपांडे, वसंत 'नागपुरातील रंगभूमीची वाटचाल', ६५ वे अखिल भारतीय नाट्यसंमेलन,

स्मरणिका पृ. १६.) त्यामुळेच नागपूरचे एक प्रकांड पंडित, महामहोपाध्याय भट्टजी शास्त्री घाटे यांचे चिरंजीव पंढरीनाथ शास्त्री घाटे यांनी 'सदय हृदयाल्हादक नागपूरकर संगीत नाटक मंडळी' ची १८९८ मध्ये स्थापना केली तेव्हा अनेकांना धक्का बसला. तथापि कोणत्याही टिकेची पर्वा न करता पंढरीनाथ शास्त्रींनी स्वत: नाटके लिहून रंगमंचावर आणली. त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी साथीला हार्मोनियम आणली. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात साथीला हार्मोनियम (पेटी) आली असे द. गो. लांडगे यांनी नमूद करून ठेवले आहे. तत्पूर्वी नाटके तंबोऱ्याच्या साथीने होत असत.

सरदार कान्होजीराव मोहिते यांनी 'ताजरात' ही नाट्यसंस्था काढून 'भक्तिप्रभाव' हे नाटक सादर केले. पुढे १९०१ मध्ये या संस्थेचे नाव वसंत विहार मंडळ करण्यात आले. 'दंढार गिरणीवाला' (१९३६), 'चांदगडचा ताबा' (१९३७), 'माझी जमीन' (१९४७), 'राम-रहिम' (१९५०) इत्यादी नाटके संस्थेने सादर केली. सरदार मोहिते यांच्या निधनानंतर या संस्थेचे रुपांतर राजे रघोजीनगर संगठन मंडळात झाले. नागपुरातील सुशिक्षित नाट्यप्रेमी मंडळीनी १९०२ मध्ये 'नागपूर अॅच्युअर क्लब'ची स्थापना केली. याच संस्थेचे रुपांतर कालांतराने 'महाल अॅच्युअर क्लब' मध्ये झाले. नारायणराव वैद्य, डॉ. ल. वा. परांजपे, वामनराव जोशी, नटवर्य सखारामपंत जोशी यांचे वडील यांच्यासारखी नावाजलेली मंडळी या संस्थेत काम करीत होती. 'त्राटिका', 'तोतयाचे बंड', 'करीन ती पूर्व' इत्यादी अनेक नाटके या संस्थेने सादर केली. या संस्था प्रामुख्याने नागपूरच्या महाल विभागात कार्य करीत होत्या. कारण महाल हेच तेव्हा नागपूरच्या सर्व चळवळींचे केंद्रस्थान होते. त्यावेळची प्रमुख नाट्यगृहे महाल विभागातच होती. व्यंकटेश थिएटर, सध्याची शाम टॉकीज; बादशाही थिएटर, आताचे चित्रा टॉकीज; तुळशीराम थिएटर, गांधीबागेतील डागा हॉस्पिटल समोरची जागा व रघूवीर थिएटर सध्याच्या नरसिंग टॉकीजमध्ये होते. या थिएटरमध्येच प्रामुख्याने नाट्यप्रयोग होत व त्या प्रयोगांसाठी सीताबर्डीवरून रसिक मंडळी जात असत. सीताबर्डीवरील त्यावेळचे एकमेव थिएटर म्हणजे आजचे व्हरायटी चित्रपटगृह.

मराठी रंगभूमीची सेवा करणाऱ्या संस्था म्हणून नागपूरचे हिस्लॉप आणि मॉरिस महाविद्यालय यांचा मुद्दाम उल्लेख केला पाहिजे. सामान्यत: शेक्सपिअरची नाटके त्या काळात विद्यार्थीवर्गात पाठ्यपुस्तके म्हणून परिचित होती. स्नेहसंमेलनात विद्यार्थी व प्राध्यापक ही नाटके करीत असत. न्यायमूर्ती भवानी शंकर नियोगी हे बी.ए. च्या वर्गात शिकत असतांना त्यांनी स्नेहसंमेलनप्रसंगी सादर करण्यात आलेल्या कॉलेजच्या 'ऑथेल्लो झुंजारराव' या नाटकात डेस्डिमोनाचे महत्त्वपूर्ण काम केले होते व ते अत्यंत उत्कृष्ट झ ाले होते. याच संदर्भात नागपूरच्या 'साहित्य संपादक मंडळ' व 'साहित्य चर्चा मंडळ' या दोन मंडळांचाही आवर्जून उल्लेख केला पाहिजे. या मंडळांच्या नावात साहित्य या शब्दाचा समावेश असला तरी नाट्यप्रयोगांमध्ये या मंडळांना विशेष रुची होती. साहित्य संपादक मंडळाने प्रामुख्याने गद्य नाटके रंगभूमीवर आणली. नटश्रेष्ठ केशवराव दाते यांना गुरुस्थानी मानणारे नटवर्य सखारामपंत जोशी, मनोहरपंत परांजपे, अनंतराव ओक, प्रा. ग. म. सुंभ, दि. ब. तथा भाऊ पंडित इत्यादींची अभिनयसंपन्न नाटके पाहणे हा दुग्धशर्करा योगच असे. प्रसिध्द कवी राजा बढे, गो. रा. दोडके, अनंत वामन ओक यांच्यासारखे साहित्यिक

व नट अशा उभयान्वयी नात्याने संबंधित होते. 'नाट्यमन्वंतर' या प्रसिध्द मंडळीचा मुक्काम नागपूरला असताना त्यांचेच सामान वापरून ओकांचे 'बायकी कावा' हे नाटक रंगभूमीवर आले. या नाटकातील सखारामपंत जोशी व ओक यांचे काम पाहून केशवराव दातेंनी त्या दोघांना 'नाट्यमन्वतरांत' प्रवेश दिला होता. अर्थात नाट्यमन्वंतर अल्पायुषी ठरल्याने या दोघांनाही नागपूरला परतावे लागले. 'साहित्य चर्चा मंडळाने' शं. बा. नेरकर यांच्या 'संजीवनी' या नाटकाचा प्रयोग १९३३-३४ च्या सुमारास करून दाखविला होता. या मंडळाच्या यशस्वी वाटचालीचे श्रेय मुख्यत: द. रा. गोमकाळे यांनाच द्यावे लागेल.

नागपुरातील हौशी नाट्यसंस्थांपैकी संगीत नाटके रंगभूमीवर उत्कृष्टपणे सादर करणारी संस्था म्हणून 'मित्र समाज' (१९२१) चा उल्लेख करणे आवश्यक आहे. श्रीमंत रघोजीराव भोसले या संस्थेचे आश्रयदाते होते. या संस्थेचे संगीत दिग्दर्शक बाळासाहेब बक्षी, राघोबा मुठाळ व अमृतराव निस्ताने तसेच नाट्य दिग्दर्शक यादवराव देशमुख व सदाशिवराव जाजुर्ले होते. नेपथ्याची जबाबदारी महादेवराव जोगी यांच्याकडे असे. एकदा महाराष्ट्र कोकीळ शंकरराव सरनाईक यांच्या यशवंत संगीत मंडळाचा मुक्काम नागपुरात असताना त्यांच्याच रंगमंचावर तुळशीराम थिएटरमध्ये मित्रसमाजाने 'मानापमानचा' प्रयोग केला असताना तो विलक्षण रंगला होता. त्यावेळेस प्रेक्षकात शंकरराव सरनाईक व त्यांचे गायक बंधू उपस्थित होते व त्यांनी या प्रयोगाची तारीफ केली होती अशी आठवण अमृतराव निस्ताने यांनी सांगितली आहे. या मित्र समाजाची 'विद्याहरण', 'संशय कल्लोळ', 'विषारी विळखा' ही अन्य संगीत नाटकेही गाजली होती. नागपूरच्या गोविंदराव नागुलवार या रसिकानेही नाट्यप्रयोगापायी एक नाटक कंपनी काढली व वि. रा. हंबर्डे यांची 'तारेवरचा नाच', 'इ ाशीची राणी' ही नाटके सादर केली असेही निस्ताने सांगतात.

१९३९ मध्ये नागपुरात तिसावे नाट्य संमेलन त्र्यं. सी. कारखानीस यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यात ज्या संस्थेने पुढाकार घेतला होता त्या नागपूरच्या 'अभिनव नाट्यमंदिर' ने (स्थापना १९३५) रंगभूमीवर महत्त्वपूर्ण कामगिरी केली. आतापावेतो स्त्रियांच्या भूमिका पुरुषांनीच करण्याची परंपरा होती. ती या संस्थेने मोडली. स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनी करण्याची व प्रेक्षकात अभिनव मंडळाची प्रथा सर्वप्रथम या मंडळानेच पाडली. तत्पूर्वी न्यायमूर्ती नियोगी, ह. ना. नेने, प्रा. गणपतराव सुंभ, जनुभाऊ गोडबोले, छकू लखोट, दि. बा. पंडित इत्यादी मंडळींनी आपापल्या स्त्रीभूमिका गाजवल्या होत्या. हरिभाऊ नेन्यांची 'कीचकवधा'तील सैरंध्रीची, छकु लेखोटे यांची 'भावबंधना'तील लतिकेची व पंडितांची मालतीची भूमिका अप्रतिम होत असे. अभिनव नाट्यमंदिराने 'राणीची बाग', 'दुरचे दिवे', 'छापील संसार' इत्यादी नाटके रंगमंचावर आणली. त्याचप्रमाणे सवंत वरखेडकर, शंकरराव कुलकर्णी हे नाटककारही या संस्थेने पुढे आणले. प्रा. श्री. ना. बनहट्टी यांची प्रेरणा या नाट्यसंस्थेच्या उभारणीमागे होती.

नागपूरच्या नाट्यविषयक चळवळीत नाना जोग यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. नाना हे त्यावेळी विदर्भ साहित्य संघाच्या नाट्यसमितीचे आमंत्रक होते. ते स्वत: उत्कृष्ट नाटककार होते. त्यांच्या सहकार्याने बाबुराव चिमोटे, मा. वि. गलगलीकर, सखारामपंत जोशी आणि सहकारी यांनी 'नागपूर नाट्यमंडळी' ची १९४७ मध्ये स्थापना केली. श्रीमंत

बाबूराव देशमुख यांच्या बंगल्यात 'नागपूर नाट्यमंडळा'च्या नाटकांच्या तालमी सुरू झाल्या. 'सरलादेवी' या नाटकाचे कर्ते वा. वा. भोळे यांच्या दिग्दर्शनाखाली पु. ल. देशपांडे यांच्या रुपांतरित 'अंमलदार' नाटकाचा प्रयोग तर एवढा विलक्षण गाजला की त्याने १९५६ मध्ये दिल्लीकरांवरही आपली छाप पाडली. नंतर नानांच्या दिग्दर्शनाखाली पु. ल. देशपांडे यांच्या 'तुझे आहे तुजपाशी' नाटकाचे प्रयोगही मंडळाने अत्यंत प्रभावीपणे सादर केले. त्या प्रयोगातील सखारामपंतांची काकाजीची भूमीका तर खूपच गाजली. 'वेड्याचे घर उन्हात', 'उसना नवरा' हेही या संस्थेचे असेच गाजलेले काही प्रयोग. नाना जोगांनी लिहिलेल्या 'सोन्याचे देव' (१९४९) व 'भारती' (१९५२) या नाटकांचे यशस्वी प्रयोगसुध्दा या संस्थेची जमेची बाजू. नाना जोगांच्या मृत्यूनंतर 'विदर्भ साहित्य संघा'च्या नाट्यसमितीचे कार्यवाही म्हणून ज्या बाळासाहेब अण्णागिरीची नेमणूक झाली त्या बाळासाहेबांच्या 'यशवंत कला केंद्रा'चीही कामगिरी रंगभूमीच्या वाटचालीत उल्लेखनीय आहे. नागपूरच्या एम्प्रेस मिलमध्ये उच्च पदाधिकारी असलेल्या बाळासाहेबांनी मिलमधील कर्मचाऱ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळण्यासाठी या कलाकेंद्राची निर्मिती १९५५ मध्ये केली. 'नागपूर नाट्यमंडळ'च्या सहकार्याने या संस्थेने अनेक नाटके सादर केली. एम्प्रेस मिलच्याच एका शिक्षण संस्थेत मुख्याध्यापक असलेले सखारामपंत जोशी यांनी 'संशयकल्लोळ', 'मानापमान' ही सादर केलेली संगीत नाटके अविस्मरणीय ठरली. विशेषत: त्यातील नायिका कुसुम मोहनी व फाल्गुनराव झालेल्या सखारामपंतांचे काम अजूनही कित्येकांच्या स्मरणात आहे.

मा. श. पेंडसे व पु. ब. मराठे यांचे प्रवर्तनाखाली नागपूरच्या 'सहकारी संस्थेने' (स्थापना डिसेंबर १९१७) 'हाच मुलाचा बाप', 'एकच प्याला', 'कीचकवध', 'सावकार', 'तोतयाचे बंड', 'खडाष्टक', 'आगऱ्याहून सुटका', 'भाग्यवान' ही नाटके केली. संस्थेने नाट्यप्रयोगातून जमविलेल्या सुमारे सव्वीस हजार रुपयांचे अर्थसहाय्य विविध शिक्षण संस्थांना दिले हे विशेष. १९५८ मध्ये अमरावतीस झालेल्या मुंबई राज्य विभागीय नाट्य महोत्सवात 'खडाष्टक' नाटकास द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. पी. किसनसिंह यांनी स्थापन केलेल्या 'सुभाष मंडळ' (स्थापना १९४६) या संस्थेने 'आषाढ का एक दिन' (१९६२), 'रोटी और बेटी' (१९६४), 'प्रेमकहाणी', 'जयकंतु', 'मायावी सरोवर', 'बुटपॉलिश', 'भूक अमर आहे', 'सायलेंस खटला चालू आहे', 'अंधारवाडा', 'प्लॅटफार्म', 'अगोचर' इत्यादी नाटके सादर करून डावरे एकांकिका स्पर्धेत व महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सवात अनेक पारितोषिके मिळविली. ही नाटके विश्राम अतसिंगकर व प्रकाश पातूरकर यांनी दिग्दर्शित केली.

संस्थापक व अध्यक्ष असलेल्या गोविंद भिडे यांची 'नाट्यवलय' (स्थापना १ मे १९७१) ही संगीत रंगभूमीचा वारसा चालवणारी नागपुरातील एकमेव संस्था. या संस्थेने शैक्षणिक ध्येय पुढे ठेऊन 'धीर वीर पुरुषा' हा समग्र खाडीलकर दर्शन असणारा कार्यक्रम एकेकाळी परिणामकारकरित्या सादर केला. 'कीचक वध', 'भाऊबंदकी', 'सवाई माधवरावांचा मृत्यू', 'मानापमान' आणि 'स्वयंवर' या नाटकातील छोट्या-छोट्या प्रवेशांद्वारे खाडीलकर कसे धीर वीर पुरूष होते, हे दाखविले होते. संस्थेने 'आजचे नाटक एक व्यथा' हा परिसंवाद 'स्वरात स्वागत' व खाडीलकरांच्या 'पंचनायिका' या कार्यक्रमांचे आयोजन केले होते. तसेच 'तत:प्रविश्तीस सूत्रधार' या कार्यक्रमात किर्लोस्कर, देवल इत्यादी नाटककारांच्या नाटकातील

सूत्रधार व नटी सूत्रधार यांच्या विविध पैलूंचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. गडकऱ्यांच्या जन्मशताब्दी निमित्त त्यांच्या नाटकावर आधारित 'अखंड मुरली वाजे' बालगंधर्व जन्मशताब्दी चार नाटकांचे व 'संगिता शिवाय मानापमान' या विविध वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन संस्थेने केले. नाट्यवलयच्या बहुतांश नाट्यप्रयोगांचे दिग्दर्शन डॉ. राम म्हैसाळकर यांनीच केले आहे. १९७१ ते १९९२ दरम्यान 'राणीचा बाग', 'अंमलदार', 'शांतता कोर्ट चालू आहे', 'सवाई माधवरावांचा मृत्यू', 'अशी पाखरे येती', 'खडाष्टक', 'एका घरात होती', 'राजा नावाचा गुलाम', 'माणूस नावाचं बेड्', 'अखेरचा सवाल', 'प्रेमा तुझा रंग कसा', 'आषाढ धन अंबरी', 'थँक्यू मिस्टर ग्लॅड', 'सूर्याची पिल्ले', 'अत्तर व अल्बम कोमा' ही नाटके आणि 'सौभद्र', 'मानापमान', 'संशय कल्लोळ' व 'शारदा' यासारखी श्रेष्ठ संगीत नाटके या संस्थेने सादर केली. दिल्लीस संगीत नाट्यस्पर्धेत 'शारदा' या संगीत नाटकाच्या प्रयोगास दहा पारितोषिके मिळाली. अखिल भारतीय नाट्य परिषदेतर्फे आयोजित स्पर्धेत 'सवाई माधवरावांचा मृत्यू' या नाटकाच्या दिग्दर्शनाचे प्रथम पारितोषिक डॉ. राम म्हैसाळकरांना मिळाले. सप्तक या संस्थेने रसिक प्रेक्षक आणि अभिजात नाटके यातील दुवा साधण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे. दरवर्षी ही संस्था नाट्यमहोत्सव आयोजित करून नाटके व संगीताचे कार्यक्रम सादर करते. १९७९-९४ दरम्यान सप्तकने 'वेटिंग फॉर गोदो', 'सौजन्याची ऐशी तैशी', 'आत्मकथा', 'हसवा फसवी', 'किरवंत', 'अकस्मात', 'चिरंजीव सौभाग्य कांक्षिणी', 'रंग माझा वेगळा', 'रंग उमलत्या मनाचे', 'रमले मी', 'रात्र उद्याची', 'चार चौघी', 'ध्यानीमनी', 'तिची कथाच वेगळी', 'ती फुलराणी', 'लेकुरे उदंड झाली', 'पाऊल न वाजवता' व 'आम्ही बिघडलो' ही नाटके आयोजित केली.

'रसिक रंजन' (स्थापना १९७२) या संस्थेने प्रायोगिक नाटके आणि लोकनाट्याची विदर्भाची परंपरा कायम ठेवली. संस्थेचे संस्थापक मदन गडकरी यांनी बहुतेक नाटके दिग्दर्शित केली. संस्थेने सादर केलेले 'घोडा चालला महादेवा' हे नाटक संपूर्ण महाराष्ट्रात गाजले. तसेच मुंबई व नागपूर दुरदर्शनवर त्याचे प्रयोगही सादर करण्यात आले. रसिक रंजनने आतापर्यंत 'अहो मला जगायचय', 'काळी बेबी', 'मातृवेणा', 'आम्ही श्रीचे चाकर', 'तीन चोक तेरा', 'घेतलं शिंगावर', 'काका किशाचा', 'पै. पै.' आणि 'पै', 'प्रॉटिटींग', 'अभिहत', 'काळोख देत हुंकार', 'अरे माणसा माणसा', 'छुमंतर', 'निष्पाप', 'आद्यंत इतिहास' ही नाटके सादर केली. महाराष्ट्र राज्य प्रादेशिक नाट्य स्पर्धेत 'पै पै' आणि 'प्रॉटिटींग', 'काळी बेबी' या नाटकांना निर्मितीचे अनुक्रमे तृतीय, द्वितीय व प्रथम पारितोषिक मिळाले. तर अभिनयाचे रौप्यपदक शिरोष बिळेकर यांना 'काळोख देत हुंकार' साठी व प्रभाकर आंबोणे यांना 'काळी बेबी' साठी मिळाले. तसेच अखिल भारतीय नाट्य परिषदेने 'काळी बेबी' या नाटकाच्या दिग्दर्शनाचे प्रथम पारितोषिक मदन गडकरी यांना मिळाले. रसिक रंजनने सर्वात जास्त गाजलेले नाटक म्हणजे 'घोडा चालला महादेवा' या नाटकास १९८१ मध्ये प्रादेशिक स्पर्धेत प्रथम तर अंतिम स्पर्धेत सर्वोत्कृष्ट निर्मितीचे द्वितीय तसेच अखिल भारतीय नाट्य परिषदेचे कै. भार्गवराव पांगे पुरस्कृत उत्कृष्ट निर्मितीचे नटवर्य बाबुराव पेंढारकर स्मृती पारितोषिक मिळाले. नाटकाचे दिग्दर्शक मदन गडकरी यांना प्रादेशिक व अंतिम स्पर्धेत दिग्दर्शनाचे प्रथम तर नाट्यदर्पण आणि नाट्य परिषदेचं

सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाचे पारितोषिक मिळाले. वत्सला पोलकमवार या अभिनेत्रीस प्रादेशिक व अंतिम स्पर्धेत अभिनयासाठी रौप्यपदक, नाट्य परिषदेचे आणि नाट्यदर्पणचे सर्वोत्कृष्ट स्त्री कलावंताचे पारितोषिक व नटवर्य चिं. गो. व. मामा पेंडसे पुरस्कृत गणपतराव भागवत सुवर्णपदकही मिळाले. ज्ञानेश्वर धुमाळ या कलावंतास अंतिम स्पर्धेत रौप्यपदक मिळाले तर सर्वोत्कृष्ट कलावंत म्हणून नाट्यदर्पणचेही पारितोषिक त्याला मिळाले. ज. रा. फणसाळकर यांना अंतिम स्पर्धेत उत्कृष्ट लेखनाचे पारितोषिक तर याच स्पर्धेत मगरकर यांना प्रकाश योजनेचे प्रथम पारितोषिक मिळाले. हिन्दी नाटकांमध्ये 'याचा जिंदाबाद', 'कंजुसी हटाव', 'अंधेरी आंधी' आणि 'गुमनाम रिश्ते' ही नाटके रसिक रंजनने सादर केली. त्यातील 'गुमनाम रिश्ते' या नाटकास निर्मितीचे व दिग्दर्शनाचे प्रथम संजीव कोलते या नटास अभिनयाचे रौप्यपदक व अशोक मगरकर यास नैपथ्याचे प्रथम पारितोषिक मिळाले. तसेच 'अंधेरी आँधी' या नाटकास निर्मिती व दिग्दर्शनाचे प्रथम आणि वत्सला पोलकमवार यांना अभिनयाचे रौप्यपदक मिळाले रसिक रंजनने 'एक राजा तीन चक्रम', 'बम बम भोलाराम', 'टारझन आला रे आला' आणि 'अलीबाबाचे खेचर' आणि '३९ वा चोर' ही बाल नाटकेही सादर केली. संस्थेने सादर केलेल्या एकांकिकेत 'राजांचा खेळ', 'चक', 'द वॉल', 'डॉक्टर सलामत तो रोग पचास' या एकांकिका विशेष गाजल्या.

पुरुषोत्तम दारव्हेकरांच्या 'रंजन कला मंदिर' (स्थापना १९५०) या संस्थेने रंगभूमी क्षेत्रात बरेच कार्य करून नागपुरात एक सांस्कृतिक वातावरण तयार केले. दारव्हेकरांनी 'काळी माती खारे पाणी', 'चार कथा एक व्यथा', 'नयन तुझे जादूगर', 'वऱ्हाडी माणसं' आणि 'मेरु मंधार धाकुटे' ही नाटके लिहून दिग्दर्शित केली. बालकांमध्ये गायनाची आवड निर्माण व्हावी व त्याच्यातील कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने संस्थेने त्रिवेणी गायन स्पर्धा अनेक वर्षे राबविली. दारव्हेकर मुंबईला गेल्यावर संस्थेची धुरा प्रभाकर चांदेकर यांनी सांभाळली. पुढे केशव जोशी, अनुराधा जोशी, रमेश अंभईकर, अजित दिवाडकर, मनोहर म्हैसाळकर, गणेश नायडू इत्यादींनी रंजनच्या सांस्कृतिक चळवळीत स्वत:ला झोकून दिले. रमेश अंभईकर यांनी संस्थेसाठी 'चेतना चितामणीचे गाव', 'होती एक शारदा', 'ग्रॅज्युएट, तो वेडा कुंभार', 'बखर एका गावाची', 'काव काव', 'बाजे पाऊल आपुले', 'सभ्य गृहस्थहो', 'जेव्हा वेदनेचा वेध होतो' ही नाटके दिग्दर्शित केली, श्रीकांत टिपणीस यांनी संस्थेसाठी 'कालाय तस्मै नम:' आणि घेतलं शिंगावर ही नाटके दिग्दर्शित केली. गणेश नायडू यांनी 'जादूगर ३, २, १' हे बालनाटक दिग्दर्शित केले. पुढील पिढीत संजय पेंडसे या दिग्दर्शकाने उदमन ब्रह्म यांची लिखित 'पोळी म्हणली पोळा वाटाल', 'गुडबाय मिसेस होम', 'हनीमून योजना', 'टोपीकर प्रेमवीर', 'अल्लाउद्दीनची बहीण', 'टू इन वन', 'जावई येता घरा', या एकांकिका आणि महिलांसाठी त्यांनीच लिहिलेल्या 'त्या दोघी', 'सुनंदा वाडेगावकर', 'म्हैस आणि महिला मंडळ', 'सासू संमेलन', 'जान्हवी' आणि 'वावटळ' या एकांकिका दिग्दर्शित केल्या, या संस्थेने 'रुदवर्णा', 'कथा कुणाची व्यथा कुणा' व 'वल्लभसूरची दंतकथा' या नाटकांचे प्रयोग सादर केले. तसेच 'सदू आणि दादू', 'वाघनख', 'नाटक वसते' आहे. 'दोन यमाचा फार्स', 'झुलता पूल', 'सफाई' या एकांकिकाही विशेष प्रसंगी सादर केल्या. महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सवात संस्थेने 'काळी माती खारे पाणी', 'वऱ्हाडी माणसं', 'चार कथा एक व्यथा', 'नयन तुझे जादूगर', 'मेरु

मंधार धाकुटे', 'उगी पप्पा उगी', 'चंद्र नभीचा ढळला', 'ग्रॅज्युएट', 'होती एक शारदा', 'चेतना' 'चिंतामणीचा गाव' ही नाटके सादर केली. त्यापैकी 'वऱ्हाडी माणसं' (१९६३-६४) या नाटकाचे लेखन व दिग्दर्शनाचे पारितोषिक पुरुषोत्तम दारव्हेकरांना अनुक्रमे प्रथम व द्वितीय आणि अभिनयाचे पारितोषिक राजापाठक (प्रथम) व गणेश सोळंकी यांना मिळाले. रौप्य महोत्सवात 'चार कथा एक व्यथा' (१९६४-६५) या नाटकास लेखण व दिग्दर्शनाचे पारितोषिक, पुरुषोत्तम दारव्हेकरांना (द्वितीय) तर अभिनयाचे पारितोषिक धनंजय भावे ज्योत्सना पोद्दार यांना मिळाले. 'नयन तुझे जादूगर' (१९६९-७०) या नाटकास दिग्दर्शनाचे पारितोषिक पुरुषोत्तम दारव्हेकरांना (प्रथम) व अभिनयाचे पारितोषिक गणेश नायडू, उषा राजे व सुमन मार्कंड यांना मिळाले. तर संगीत व प्रकाश योजनेचे पारितोषिक अनुक्रमे नीलांबरी बर्वे व गणेश नायडू यांना मिळाले. 'मेरु मंधार धाकुटे' (१९६०-७०) व 'उगी पप्पा उगी' या नाटकातील अभिनयासाठी अजित दिवाडकर यांना रौप्य पदके मिळाली. 'चंद्र नभीचा ढळला', 'वऱ्हाडी माणसं', 'सबसे बडा रुपया' या नाटकांतील अभिनयाचे राजाभाऊ पाठक यांना सलग तीन वर्षे पदक मिळाले. प्रादेशिक स्पर्धेत 'चार कथा एक व्यथा' या नाटकातील अभिनयाचे पारितोषिक विनय डांगरे या नटास मिळाले. बहुभाषीय नाट्य स्पर्धेत सादर केलेले 'घेतलं शिंगावर' या नाटकातील अभिनयाचे दिलीप वाईकर व अनुराधा जोशी यांना तर दिग्दर्शनाचे श्रीकांत टिपणीस यांना पुरस्कार मिळाले.

'सुरूची निकेतन' या संस्थेची स्थापना (१९५०) चंद्रकांत जोशी, वसंत ठाकरे व रमण गडकरी यांनी केली. मोरुदादा कोठीवान, नागेश देशमुख यांनी संस्थेची नाटके दिग्दर्शित केली, तर जयकुमार भुसारी यांनी लेखन केले. 'वेड्याचं घर उन्हात', 'धूल के कण', 'तुझे आहे तुजपाशी', 'जेव्हा देवाचा खून होतो', 'येगं ये गं विठाबाई', 'स्वप्न रंगले रात्री' इत्यादी संस्थेची गाजलेली नाटके, डॉ. धो. म. पालकर यांचे प्रवर्तनाखाली 'धरमपेठ नाट्य संस्थेने' (स्थापना १९५८) 'तोतयाचे बंड', 'एखाद्याचे नशीब', 'भाऊबंदकी', 'मधल्या भिंती' इत्यादी नाटके सादर केलीत. 'रंगरेखा' (स्थापना १९६५) या डॉ. मा. गो. देशमुख यांच्या संस्थेची 'ससा आणि कासव', 'कांचनरंग', 'आकाश माझे निळे', 'रजनी कृष्ण सजनी' इत्यादी गाजलेली नाटके होत. प्रा. ज. रा. फणसळकर यांनी संस्थेसाठी नाटके लिहिली. तर प्रा. प्र. ना. परांजपे यांच्या 'पुरुवा आणि उर्वशी' या संगीत नाटकाला लेखनाचे पारितोषिक मिळाले होते. या संस्थेसाठी बाळ गवळी आणि अरविंद जहागीरदार यांनी बरेच कार्य केले. मधुसूदन वेलणकर या नाट्य दिग्दर्शकाने 'नवरंग' (स्थापना १९६६) या संस्थेची स्थापना केली. 'मोहनिया तुज संगे', 'मन धुंवाधार', 'घरोघरी मातीच्या चुली', 'भावबंधन', 'मदनाची मंजिरी', 'वासना चक्र', 'आधे अधुरे', 'ओझ्याविना प्रवासी', इत्यादी पंचवीसहून जास्त नाटके सादर केलीत. संस्थेने बालगंधर्व नाट्य स्पर्धेचेही आयोजन केले.

'रंगस्वानंद' या संस्थेचा (स्थापना १९६९) 'बहुरुपी' या नाटकापासून नाट्य सृष्टीतील प्रवास सुरू झाला. गद्य नाटके, संगीत नाटके, लावणी प्रधान नाटके, पथ नाट्ये, बाल नाट्ये, प्रायोजिक नाटके अशा जवळ-जवळ सर्व प्रकारची नाटके करणे हे 'रंगस्वानंद' चे वैशिष्ट्य. या संस्थेने रौप्य महोत्सवी वर्षात (१९९४) पु. ल. देशपांडेंचे 'तुज आहे तुझपाशी' चंद्रशेखर वऱ्हाडपांडेंचे 'बहुरुपी' आणि द. मा. मिरासदारांचे 'मी लाडाची मैना' ही नाटके व पद्मश्री. तिज्जनबाई यांचे पंडवानी गायन सादर केले. १९८५ मध्ये

नवी दिल्ली व मुंबई येथे झालेल्या 'अपना उत्सव' या कार्यक्रमात संस्थेच्या किशोर आयलवार, जैमिनी कडू, सरस्वती राव गिरधर गोंधळी या कलावंतानी भाग घेतला. 'पेंटो माईम' हा एक आगळा-वेगळा कार्यक्रम संस्थेने १९९० मध्ये केला. 'अरे माणसा-माणसा' आणि 'निर्धार' या दोन व्हिडिओ पटाचींही निर्मिती संस्थेने केली.

पथ नाट्य माध्यमातून सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनाची जाणीव ठेऊन 'बाजारपेठ', 'कुजक', 'क्षितीज' आणि 'रेला चला रे' ही पथ नाट्ये शहरातील मुख्य रस्त्यांवर व मोक्याच्या ठिकाणी केली. संस्थेतर्फे नृत्य, अभिनय आणि चित्रकला शिबिराचे आयोजन करण्यात येते.

रंगस्वानंदने 'बहुरुपी', 'माणूस नसावा साधा', 'श्रीमान भविष्यवादी', 'जागा आमची संसार तुमचे', 'बेबीचं लग्न', 'मोरुच लग्न', 'तीन इसम तेरा आणे', 'मुंबईची माणसं', 'एखाद्याचे नशीब', 'मी लाडाची मैना तुमची' यासारखी अनेक नाटके सादर केली होती. 'एक बहन्नडा' या नाटकाला महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सवात निर्मिती व दिग्दर्शनाचे द्वितीय पारितोषिक व प्रकाश योजनेचे तृतीय पारितोषिक मिळाले, तसेच मुक्तिपथ या नाटकाला निर्मिती व दिग्दर्शनाचे द्वितीय पारितोषिक तर अभिनयाचे रौप्य पदक मंजुषा पाचपोर या नटीस व नेपथ्याचे द्वितीय पारितोषिक बाबा घुळघुळे यांना मिळाले. रंगस्वानंदने 'दाणादाण', 'बाजारपेठ', 'कोंडी', 'यमाचा दरबार', 'एक होता औरंगजेब', 'सरहद्द', 'रक्ताभिषेक', 'हे दोन चेहरे', 'सांगाती', 'आमच्या दरबारी आमीच कारभारी', 'विहीणबाई रुसली नवरा नवरी बिनसली', 'ती तर नाहीना' इत्यादी एकांकिका सादर केल्या. तसेच संस्थेने 'कृष्ण गोकुळी येती', 'झुक झुक भाऊ इंजिनवाले', 'गाढव विकणे आहे', 'अटक-मटक चवळी चटक', 'चिकी चिकी बोम बोम', 'लाटणे काकू बालन्यायालयात', 'चिमणा बांधतो बंगला', 'चिरी मिरी', 'धुमधडाका', 'कुजकं क्षितीज', 'देखो खेल मदारीका' आणि 'हम कौन है' ही बालनाटके सादर केली.

'राम गणेश गडकरी स्मृती प्रतिष्ठानतर्फे' अनेक सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले जातात. गडकरी जन्मशताब्दीनिमित्त रवींद्र नाट्य मंदिर, मुंबई येथे सतीश पावडे लिखित व दिग्दर्शित 'मराठी नाट्य संसार' हा कार्यक्रम २३ जानेवारी १९९३ रोजी सादर केला. दरवर्षी सावनेर येथे याच दिवशी संस्थेतर्फे कार्यक्रम होत असतात. सावनेरला एक ओपन एअर थिएटर आणि ग्रंथालय बांधण्यात आले असून हे प्रतिष्ठान नाट्य क्षेत्रातील विविध कार्यक्रम व पुस्तक प्रकाशन इत्यादीसाठी आर्थिक मदतही करीत असते. अरविंद पाठक यांच्या प्रवर्तनाखाली ए. जी. रेफिग्एशन क्लबची स्थापना १९६९ मध्ये झाली. या संस्थेला तेथील नाट्य प्रेमींनी नावारुपास आणले. संस्थेने महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सवात चांगल्या नाटकांचे प्रदर्शन केले. या संस्थेची नाटके दिग्दर्शित करणाऱ्यामध्ये अरविंद पाठक मुकुल खोत, मदन गडकरी आणि गणेश नायडू यांचे नाव सन्मानाने घेतले जाते. प्रभाकर आंबोणे, मेघा सावजी, जयमाला नायडू या कलावंतानी संस्थेच्या विविध नाटकातून भूमिका केल्या. राष्ट्रीय पातळीवरील एकांकिका स्पर्धामध्ये या संस्थेचे नाट्य कलावंत सातत्याने भाग घेत असतात.

'दलित रंगभूमी' या संस्थेची स्थापना समताधिष्ठित समाजनिर्मितीच्या दृष्टीने सर्वंकष

परिर्वतनाच्या व्यापक भूमिकेतून सर्व प्रकारच्या विषमतेविरुध्द विद्रोहाचे ध्येय समोर ठेऊन करण्यात आली. प्रेक्षकांचे केवळ मनोरंजन करणे हा दलित रंगभूमीचा उद्देश नसून आंबेडकरी व परिवर्तनीय विचारांचा प्रसार आणि मानवतेच्या दृष्टिकोनातून समताधिष्ठित नवसमाज निर्माण करण्याची आकांक्षा या दलित रंगभूमीच्या मूळ प्रेरणा आहेत. यासाठी दलित रंगभूमीने पथनाट्याचा उपयोग केला आणि अनेक पथ नाट्ये सादर केली. सुरूवातीला अमर रामटेके आणि रोशन सोमकुंवर यांनी नाटकांचे दिग्दर्शन केले. आदिवासींच्या जीवनावरील मुक्तता, बांधकाम मजुरांवरील स्लॅब, दलित-कवी कार्यकर्त्याच्या जीवनावरील 'संगर', ब्राह्मणी नेतृत्वामुळे भरकटत गेलेल्या चळवळीच्या दयनीय स्थितीवरील 'श्रीपाद रमाकांत दळवी', 'आंडेल', 'पैदागीर', 'तिच्या हाती फाशीची दोरी', 'कॉमरेड जोशी' इत्यादी नाटके रंगमंचावर सादर केली. दलित रंगभूमीने महाराष्ट्र व मध्य प्रदेशात 'शहर आंदोलन', 'पार्टी', 'पाखंड', 'विस्फोट', 'बगावत', 'चक्रांत', 'युध्द' ही पथनाट्ये सादर केली. या पथनाट्यांना जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. संजय जीवने व त्यांच्या पत्नी वंदना कोटावे यांनी या नाटकांचे प्रयोग ग्रामीण भागात करून दलित 'रंगभूमीस' आदराचे स्थान मिळवून दिले.

नवनाट्याचे वारे नागपुरात येऊ लागले असताना १९८७ मध्ये 'अॅमच्युअर आर्टिस्ट कम्बाईन' या संस्थेची स्थापना विवेक खेर यांनी केली. महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सवात भाग घेण्याव्यतिरिक्त 'दहातून एक गेला', 'शून्य आणि जादूगर गारुडी' यासारखी पथ नाट्येही संस्थेने सादर केली. परंतु याही अगोदर बंगाली असोसिएशनच्या देवाशीष रॉय यांनी ही नाटके रंगमंचावर आणली होती. जुजबी साहित्याचा उपयोग करून संस्थेने 'टेरेस शो' हा अभिनव प्रकार सुरू केला. प्रेक्षक रंगमंदिरात येत नाहीत म्हणून कलावंतांनीच कॉलनीत जाऊन नाटके सादर केली. त्याला एके काळी चांगला प्रतिसाद मिळाला. पंरतु पुढे ही चळवळ विशेष प्रयत्न करून कुणी चालवली नाही. महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सवात संस्थेने 'मृत्यूवार्ता' (१९७८), 'आणि म्हणून पुन्हा' (१९७९), 'कॅप्टन तिरसिंगराव फ्लाईज', 'धिस इज फॉर रिअल', 'कॉल मी कॅप्टन रॉबर्ट', 'बोनसाय' आणि 'डायबिफोर डेथ' ही नाटके सादर केली. 'डायबिफोर डेथ'चे दिग्दर्शन अयज घाटे यांचे तर इतर सर्व नाटकांचे दिग्दर्शन गजानन पांडे यांनी केले. या स्पर्धेत पुढील प्रमाणे पारितोषिके मिळाली. त्यात गजानन पांडे यांना 'मृत्यूवार्ता', (प्रादेशिक प्रथम) 'आणि म्हणून पुन्हा' (प्रादेशिक द्वितीय), 'कॅप्टन तिरसिंगराव' (प्रादेशिक द्वितीय), 'फ्लाईज' (प्रादेशिक तृतीय), 'धिस इज फॉर रिअल' (अंतिम, द्वितीय) 'कॉल मी कॅप्टन रॉबर्ट' (प्रादेशिक तृतीय) यांच्या दिग्दर्शनासाठी पारितोषिके मिळालीत. शिवाय त्यांना 'बोनसाय' नाटकात अभिनयाचे रौप्यपदक, 'तिरसिंगराव' नाटकास अंतिम फेरीत अभिनयाचे सुवर्ण पदक तसेच अखिल भारतीय नाट्य परिषदेचे शंकर घाणेकर स्मृती पारितोषिकही मिळाले. संस्थेची कलावंत रंजना पाठक हिला 'आणि म्हणून पुन्हा' या नाटकात, तर सजिणी खेडकर हिला 'फ्लाईज' या नाटकास अभिनयाचे रौप्यपदक मिळाले. अनिल कुळकर्णी यांच्या आणि शैलजा कामत यांना 'धिस इज फॉर रिअल' या नाटकासाठी अभिनयाचे रौप्यपदक मिळाले. संस्थेच्या कलावंतापैकी संजय सुरकर या कलावंताने 'चौकट राजा, आपली माणसं' यासारखे मराठी चित्रपट दिग्दर्शित करून मराठी चित्रपटसृष्टीत आपले वेगळे स्थान निर्माण केले. 'वेश'

या नाटकास अंतिम फेरीत दिग्दर्शनाचे प्रथम पारितोषिक मिळविले.

नागपुरातील नाट्य संस्थांची प्रातिनिधीक संस्था म्हणून अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, नागपूर (स्थापना १९८३) शाखेने सुरूवातीलाच ६५ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे यशस्वी आयोजन केले. ही परिषद वैदर्भीय नाट्य कलावंतांचा मेळावा, स्क्रिप्ट बँक योजना, रंगभूमी विकास प्रकल्प, नाट्याभिनय व तत्सम कार्यशाळा तसेच नाटकांशी संबंधित रंगचर्चाचे आयोजन करीत असते. अनेक प्रासंगिक कार्यक्रमांचे आयोजन करून नवीन कलावंतांना प्रोत्साहन आणि मार्गदर्शन करण्याचेही कार्य परिषद सातत्याने करीत असते. स्थानिक लोककलांचे संवर्धन आणि विविध दर्जेदार नाट्य प्रयोगांचे आयोजन हा सुध्दा परिषदेच्या कार्याचा एक भाग आहे.

नागपुरातील दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र (मध्य दक्षिणी) (स्थापना १९८६) देशातील सात विविध केंद्रापैकी एक आहे. त्यात आंध्र प्रदेश, कर्नाटक, मध्यप्रदेश, महाराष्ट्र या राज्यांचा समावेश आहे.

आतापर्यंत केंद्रातर्फे युवा संगीतनृत्य महोत्सव, लोककला यात्रा, दृककला महोत्सव, पारंपारिक लोकनाट्य महोत्सव स्मृतिनाट्य समारोह, नृत्यनाटिका महोत्सव, कठपुतली समारोह, नाट्य महोत्सव, विविध कला महोत्सव, उपेक्षित नाट्य समारोह, बालगंधर्व स्मृती संगीत नाट्य समारोह, सिने नाट्य नवमी या महोत्सवांचे आयोजन करण्यात आले. हे आयोजन केंद्राच्या कार्यकक्षेतील चारही राज्यातील विविध ठिकाणी करण्यात आले. केंद्रातर्फे राष्ट्रीय पातळीवर आयोजित करण्यात आलेल्या समारंभात केंद्राने आतापर्यंत नागपूर जिल्ह्यातील आणि आसपास राहणाऱ्या कलावंतांसाठी बालनाट्य शिबीर, तरुणांसाठी अभिनय शिबीर, मुखवटे शिबीर, विकल्पेत्र मुलांसाठी नाट्य प्रशिक्षण, सर्वांगीण नाट्य प्रशिक्षण कार्यशाळा, पथनाट्य स्पर्धा उत्सव, नाट्य-लेखन स्पर्धा, नाट्य-संहिता शिबीर, नाट्याभ्यास कार्यशाला अशा उपयुक्त कार्यशाळांचे आणि स्पर्धांचे आयोजन करून स्थानिक कलावंताना राष्ट्रीय सांस्कृतिक चळवळीत आणण्याचे कार्य केले आहे.

नागपुरातील नाट्य रसिकांची अभिरुची वाढावी या दृष्टीने मध्य दक्षिणी तर्फे केवळ बहुभाषी नाट्यस्पर्धा आयोजित करण्यात येतात. मध्य दक्षिणी तर्फे नागपूरला संस्कृत नाट्य महोत्सवात संस्कृत नाटके सादर करण्यात आली. नागपूर विद्यापीठाच्या ललित कला विभागातील नाट्य विभाग १९८१ साली सुरू झाला. यात नाट्य, नृत्य, संगीत, चित्रकला आणि उपयोजित कला यांचे ज्ञान दिले जाते.

विदर्भ साहित्य संघ (स्थापना १९२३) ही तर नागपुरातील आघाडीची संस्था, ही संस्था व्यावसायिक व हौशी नाटक मंडळींच्या नाटकांचे प्रयोग नागपूरला आयोजित करीत असते. हौशी कलाकारांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी संस्था गेल्या तीस वर्षापासून 'डावरे एकांकिका' स्पर्धांचे आयोजन करीत आहे. यातून नागपुरातील आजचे अनेक आघाडीचे नट, नाटककार आणि दिग्दर्शक तयार झाले आहेत. आता हीच स्पर्धा 'मोहन कोठीवान डावरे एकांकिका स्पर्धा' या नावाने ओळखली जाते. याशिवाय रघुनाथराव आष्टीकर विनोदी एकांकिका स्पर्धा आणि महिला एकांकिका स्पर्धांचेही आयोजन संघातर्फे होत असते. याशिवाय घर आंगण, कवी संम्मेलन, पुस्तक प्रकाशन, व्याख्यानमाला, नाट्यशोध, नाट्य

शिबीर, नाट्यविषयक कार्यशाळा, शास्त्रीय गायन व नृत्य तसेच वाद्यवृंद कार्यक्रम यांचे आयोजनही केले जाते. नाट्य चळवळीला गती मिळावी आणि त्यास एक व्यावसायिक दर्जा प्राप्त व्हावा म्हणून विदर्भ साहित्य संघाने 'सांस्कृतिक संकुल' उभारण्याची योजना हाती घेतली आहे.

बंगाली असोसिएशन (स्थापना १९२२) ही बंगाली लोकांची संस्था असून देखील मराठी नाटकात विशेष रुची असलेली ही संस्था आहे. 'नाव नाही नाटकाला' या नाटकामुळे या संस्थेचे १९६९ पासून रंगभूमीवर पदार्पण झाले. बंगाली रंगभूमीहून अनेक सुंदर नाटकांचे मराठी रुपांतर करून संस्थेने बंगाली रंगभूमीचा परिचय नागपुरकरांना करून दिला.

बाल कलावंतांसाठी विशेष प्रयत्न करणाऱ्या संस्थेत प्रामुख्याने 'बालरंजन' या संस्थेचे नाव घ्यावे लागते. या संस्थेने आतापर्यंत 'माझा ज्ञानियाचा राजा', 'दुर्गा झाली गौरी', 'आम्ही शाळेत जाणार नाही' इत्यादी अनेक बालनाटके सादर केली आहेत.

प्रा. प्रभाकर चांदेकर यांच्या मार्गदर्शनाखाली 'गंधर्व कला मंदिर' या संस्थेची स्थापना झाली. या संस्थेने 'असा ही एक मी', 'कलप', 'प्रयोगांत', 'जन्मठेप' इत्यादी नाटके सादर केलीत. सुधाकर बक्षी यांनी प्रामुख्याने संस्थेकरिता नाटके लिहिलीत. प्रभाकर पुराणिक यांनी स्थापन केलेल्या 'अंकर रंगभूमी' (स्थापना १९७१) या संस्थेने त्यांचेच लिहिलेले व दिग्दर्शित केलेले 'मानवी' हे नाटक रंगभूमीवर आणले. त्यानंतर त्यांचेच 'कमला' हे प्रकाश लुंगे दिग्दर्शित नाटक गाजले. या शिवाय संस्थेने 'ए डाल्स', 'कन्यादान' इत्यादी नाटके केली.

अनिल चनाखेकर यांनी स्थापन केलेल्या 'नवप्रभात कला मंदिरे' (स्थापना १९७८) या संस्थेने बहुतेक प्रायोगिक स्वरूपाचीच नाटके करून आपले एक वेगळे स्थान निर्माण केले. 'मी घोडा हुसेनच्या चित्रातला', 'द कन्स्ट्रक्शन', 'एक होती राणी', 'काचेची खेळणी', 'निर्वेद', 'बेकेट वाडी', 'सती ८७' इत्यादी नाटके सादर केलीत. सुधीर शिनखेडे यांनी संस्थेसाठी प्रयोगिक स्वरूपाची नाटके लिहिलीत. याशिवाय नितीन फडणीस यांनी देखील काही एकांकिका लिहिल्या, राज्य नाट्य स्पर्धा, अखिल भारतीय सर्वभाषिक स्पर्धा, दिल्ली, आणि संस्कृत नाट्य स्पर्धेत संस्थेने नाट्य प्रयोग सादर करून पारितोषिके मिळविली. प्रभाकर अंबोने या नटाने स्वत:च्या 'शेफाली युनिट' या संस्थेच्या (स्थापना १९८२) माध्यमातून बरीच नाटके सादर केली.

'देवबाप्पा' (स्थापना १९८३) या संस्थेची स्थापना डॉ. रंजन दारव्हेकर यांनी करून स्वत:च संस्थेकरिता नाटके लिहिली व दिग्दर्शित केलीत. 'सागरा अगस्ती आला', 'पंख लाभले आज स्वरांना', 'अस्मिता आत्महत्या विजयम', 'असं झालच कसं', 'सारंगा' या नाटकांचा यात समावेश होतो.

'अजिंक्य' या देवेद बोंद्रे यांनी स्थापन केलेल्या संस्थेने त्यांच्याच दिग्दर्शनाखाली बरीच नाटके सादर केली. यातील काही नाटकांना विविध स्पर्धांमध्ये पारितोषिके मिळाली. नवीन कलावंताना घेऊन शेखर साठे या दिग्दर्शकाने 'नाट्यश्री' ही संस्था स्थापन केली. त्यांनी अनेक प्रयोगात्मक नाटके सादर करून काही काळपर्यंत नागपूर रंगभूमी कार्यशील ठेवली.

या संस्थेनंतर नागपूरच्या रंगभूमीवर विशेष कार्य केले ते 'थिअटर मूव्हमेंट ग्रुप' (स्थापना १९८४) या संस्थेने. प्रा. विनोद इंदुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेने मराठी, हिन्दी, संस्कृत आणि इंग्रजी नाटके व जवळ जवळ वीस एकांकिका सादर केल्या. सातत्याने नाटके करणे हे या संस्थेचे वैशिष्ट्य आहे. जुन्या पिढीतील अजून एक संस्था म्हणजे 'कलातरंग' गजानन सगदेव, लक्ष्मीकांत देशपांडे यांनी या संस्थेसाठी बरेच काम केले. 'विदूषक', 'कालचक्र', 'बाळचं घर' इत्यादी नाटके संस्थेने सादर केली. वाळूचं घर या पराग घोत्री लिखित नाटकास महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सवात अंतिम फेरीत एकूण आठ बक्षिसे मिळालीत. याशिवाय जिल्ह्यातील 'धनवटे नाट्य संस्था', 'प्रतिमा कला केंद्र', 'नाट्यकला केंद्र', 'चित्तपावन ब्राह्मण संघ', 'नाट्यनरेश', 'सिध्दराज रंगभूमी', 'पैंजणे', 'नाट्यपारिजात', 'प्रगती थिएटर्स', 'हौशी कलावंत', 'रंगकर्मी', 'कलावैभव', 'तेजस थियटर्स', 'तन्मय', 'संवेदना', 'कलाछंछ', 'भारतीय कलारंजन केंद्र', 'विद्यार्थी सांस्कृतिक संघ', 'अभिनव कलानिकेतन', 'महाबँक स्पोर्टर्स', 'रिक्रिअेशन क्लब', 'नाट्यायन' 'स्नेही अर्चना नाट्य मंडळ', 'सांस्कृतिक मंच', 'शारदा मंडळ', 'डॉ. आंबेडकर कला संस्थान', 'पंचशील स्पोर्टिंग क्लब', 'राष्ट्रभाषा प्रचार समिती' या मंडळांचाही नाट्य संस्था म्हणून उल्लेख करता येतो.

पथनाट्य चळवळ : नागपूर विदर्भातील पथनाट्य चळवळ ही मराठी रंगभूमीवरील एक अद्ययावत आंदोलन ठरलेली व आधुनिक नाट्येतिहासात विदर्भात जन्मून पश्चिम महाराष्ट्रात पसरलेली व स्वीकारली गेलेली एकमेव 'नाट्यघटना' आहे.

'मुक्तांगण' या शिर्षकाने 'ललित कला भारती' काही तरुण कवींना घेऊन रस्त्यावर काव्य वाचनाचे प्रयोग करीत. ही पथनाट्याची पूर्वतयारी होती. त्याचबरोबर जीवनाकडे समकालीन नजरेने बघण्याचीही ती चळवळ होती. काव्य वाचनाचे हे लोण सर्वत्र पसरल्यावर ललित कला भारतीने सर्वत्र ललित कलांची समांतर चळवळ म्हणून नाट्य, लोकनृत्य, चित्रकला रस्त्यावर सादर करण्याची कल्पना मांडली. अर्थातच तिला जोरदार विरोध कलावंतांच्याच क्षेत्रातून अधिक झाला.

'मुक्तांगण' उपक्रमांत त्यानंतर नाट्य दर्शनाच्या दीपक ढोणे यांनी स्वत:चेच लेखन व दिग्दर्शन असलेले 'शेंगदाणा' रस्त्यावर आणले. प्रसिध्दी माध्यमांनी या प्रकाराला बरीच प्रसिध्दी दिली. ॲमच्युअर ऑर्टिस्ट कम्बाईन या संस्थेने त्यानंतर केलेले 'जादूगर', 'गारुडी' व 'दहातून एक गेला शून्य' या नाटकांनी या चळवळीला खरा आकार आणला. नागपुरातील सर्वच प्रमुख चौक या नाटकांनी पिंजून काढले. तोवर वृत्तपत्रांतून, आकाशवाणीवरून ही चळवळ विदर्भात व महाराष्ट्रात पसरु लागली होती. अकोल्यातील पहिला स्ट्रीट प्ले, 'प्रयोग' या संस्थेने केला. पुढे ही चळवळ अकोला व जवळपासच्या भागात पसरली. त्यातूनच अरविंद विश्वनाथ यांच्या पथनाट्य लेखनाचा पाया घातला गेला. दरम्यान 'प्रयोग' चे 'सम्मेलनाला चला' हे पथनाट्य बरेच गाजले.

याच काळात नागपुरात दलित वस्त्यांतून, झोपडपट्ट्यातून नाटक करणाऱ्या कमलाकर दहाट, 'पँथर्स थिएटर' चे प्रभाकर दुपारे व 'दलित' रंगभूमीचे अमर रामटेके यांनी पथनाट्याचे स्वतंत्रपणे प्रयोग सुरू केले होते. प्रा. श्रीकांत तिडके व डॉ. मधुकर वाकोडे यांच्या परिश्रमाने ग्रामीण विदर्भाला या चळवळीचे दर्शन घडविले.

अनुक्रमणिका

मधल्या काळात डॉ. रुपा कुलकर्णी यांच्या हुंडा विरोधी कार्याकरिता 'ललित कला भारती' ने तीन एकांकिका सादर केल्या होत्या. त्यावरून पुढे हुंडा विरोधी आघाडीने प्रेरणा घेऊन स्वत:च पथनाट्य सादर करणे सुरू केले. नंतर वर्धा येथील गांधी लेप्रसी फाउंडेशननेही आपल्या कार्याच्या प्रचारार्थ हे माध्यम स्वीकारले. गाजलेल्या पथनाट्यांमध्ये 'दलित रंगभूमी'च्या 'शहर', 'स्लॅब', 'विस्फोट', 'पाखंड' व 'पार्टी' या पथनाट्यांचा समावेश होतो. पथनाट्याचे नाट्यशास्त्रीय व समाजशास्त्रीय भान कलावंतांना आणून 'ललित कला भारती' ने पथनाट्य-शिबिरांची सुरूवात केली. या शिबिरातून नाट्य शिक्षणासोबतच पथनाट्याचा आशय शोधण्याची दृष्टी देण्याच्या अभ्यासावरही भर असे.

नागपुरातील हिन्दी कला विश्वानेदेखील या चळवळीचा स्वीकार केला. 'लोककला केंद्र' या संस्थेने डॉ. शंकर शेष यांचे 'पोस्टर' व स्थानिक लेखकांची अनेक नाटके रस्त्यावर सादर केली. 'कलासागर' या संस्थेने उमेश चौबे यांचे महानगरपालिकेच्या भ्रष्टाचारावरील 'हम सब चोर है' चे प्रयोग केले.

दलित नाट्य चळवळ : नागपूर विदर्भातील दलित नाट्य चळवळ खऱ्या अर्थाने १९७८ पासून सुरू झाली. आंबेडकरी विचाराने जागृत झालेल्या तरुण मंडळींनी एका सांस्कृतिक ध्येयासाठी या चळवळीला जन्म दिला. मुख्य म्हणजे पथनाट्याच्या माध्यमाने ही चळवळ पसरली आणि तिने आपले स्वतंत्र अस्तित्व सिध्द केले. दलित रंगभूमीचा परिचय 'सामाजिक प्रबोधनाची नाट्य चळवळ' या संज्ञेने होईल. ही एक जनजागृतीची चळवळ आहे. नागपूर-विदर्भात दलित नाट्य चळवळीची सुरूवात कोणी केली हा वादाचा मुद्दा असला तरी कमलाकर दहाट या लेखकाला हा मान बहुधा देण्यात येतो. मात्र त्यात मतभेद आहेत. त्याच्या पूर्वी किंबहुना १९६० च्या जवळपास किसन फागोजी बनसोड यांनी काही नाटुकल्यांच्या माध्यमातून आंबेडकरी जाणिवेची नाटके केली होती. त्यानंतर प्रभाकर जीवने आणि त्यांचे सहकारी यांनी दलित नाटके केल्याची नोंद सापडते. विशेष म्हणजे त्यावेळी कुठल्याही नाट्य साधनांचा उपयोग न करता नाटके करण्यात आली व जनतेने या नाटकांना प्रचंड प्रतिसाद दिला.

नागपूर-विदर्भातील प्रमुख दलित नाट्य लेखकांत कमलाकर दहाट, सुरेश मेश्राम, प्रभाकर दुपारे, अमर रामटेके, इ. मो. नारनवरे, वि. रु. गोडबोले, सिध्दार्थ गायधने, दादाकांत धनविजय, बी. रंगराव, जॉनी मेश्राम, हेमंत खोब्रागडे, संजय जीवने, प्रेमानंद गोरकर, नरेश तिरपुडे, बाजीराव रामटेके, धर्मेश सोनटक्के, रमेश निकोसे इत्यादींचा समावेश होता. या मंडळींनी सांस्कृतिक परिवर्तनाच्या उद्देशाने प्रेरित होऊन नाटके लिहिली.

दलित नाट्य दिग्दर्शकांमध्ये डॉ. नीलकांत कुलसंगे, रोशन सोमकुंवर, चंद्रशेखर रामटेके, अमर रामटेके, जॉनी मेश्राम, सिध्दार्थ गायधने, संजय जीवने, सुरेश मेश्राम, अनुपमा नगरकर, विलास भवरे, बी. रंगराव इत्यादींचा समावेश होता. नागपूरच्या दलित रंगभूमीने राजा करवाडे, वंदना कोटबे, वंदना भगत, मीनाक्षी बोरकर, प्रेमकुमार उके यासारखे कलावंत रंगभूमीला दिले.

अनेक दलित नाटकांनी आपले स्वतंत्र अस्तित्व सिध्द केले आहे. दोन अंकी नाटकांमध्ये 'सूर्यास्त', 'कॉमरेड जोशी', 'नरबळी', 'हत्याकांड', 'झुंबर', 'इथे माणसाला स्थान नाही', 'विकल्प', 'दयागा', 'पैदागीर', 'जयभीम', 'बुध्दे शरणम् गच्छामी', 'वेश्यागार' ही नाटके बरीच गाजली तर एकांकिकांमध्ये 'मुक्तता', 'विद्रोहाचे पाणी पेटले आहे', 'संगर', 'पडद्यामागील पडदा', 'छेदबिंदु', 'चक्रांत', 'जयक्रांती', 'श्रीपाद', 'रमाकांत दळवी', 'शोकांतिका', 'शिदोरी', 'स्त्री १९८०', 'आधार', 'आग्यावेताळ', 'बेंडवा' इत्यादी एकांकिकांनी आपला वेगळा ठसा उमटवला.

जिल्ह्यात प्रामुख्याने काम करणाऱ्या संस्थांमध्ये अभिनव कला निकेतन दलित रंगभूमी, दलित थिएटर्स, आनंद कला निकेतन, प्रेरणा नाट्यवलय, यंग क्रिअेटर्स, नागपूर; कलाछंद कन्हान व दलित रंगभूमी, उमरेड इत्यादी संस्थांचा समावेश आहे.

डॉ. भालचंद्र फडके यांनी 'दलित रंगभूमी' हे पुस्तक लिहिले आहे.

व्यावसायिक रंगभूमीचे स्वरूप

नागपुरातील व्यावसायिक रंगभूमी अजून तरी पूर्णार्थाने व्यवसायिक नाही. तिला अर्ध व्यावसायिक म्हणता येईल. या दृष्टीने येथील नामवंत दिग्दर्शक रमेश अंभईकर, गजानन पांडे, प्रा. विनोद इंदुरकर, लक्ष्मीकांत देशपांडे यांचे प्रयत्न मोलाचे आहेत. अंभईकरांच्या 'रंगकर्मी' या संस्थेने 'रक्तपुष्प', 'घर तिघांचे हवे', तर लक्ष्मीकांत देशपांडे यांच्या 'संवेदना' या संस्थेने 'नातीगोती' आणि 'सविता दामोधर परांजपे' ही नाटके व्यावसायिक दृष्ट्या चालविण्याचा प्रयत्न केला. गजानन पांडे यांच्या 'तन्मय' आणि प्रा. विनोद इंदुरकरांच्या 'तेजस थिएटर्स' ने सदस्य योजना सुरू केली. सदस्यांकडून काही अग्रिम राशी घेऊन त्यांनी वर्षभरात अशी नाटके सादर केलीत. त्याला प्रेक्षकांचा आणि सदस्यांचा भरघोष प्रतिसाद मिळाला. या योजनेअंतर्गत 'तन्मय'तर्फे 'आई रिटायर होतेय', 'शेजारी', 'डबल गेम', 'डॉ. तुम्ही सुध्दा', 'आईचे घर उन्हाच', 'मला काही सांगायच' ही नाटके, तर 'तेजस थिएटर्स' तर्फे 'लग्नाची बेडी', 'ती वेळच तशी होती', 'असं का व्हावे' ही नाटके चांगला व्यवसाय करुन गेली. या निमित्ताने व्यावसायिक रंगभूमीवरील पहिली महिला लेखिका व दिग्दर्शिका म्हणून जयश्री निलाटकर 'असं का व्हावं' चे लेखन व दिग्दर्शन यांचे नाव आदराने घेतले जाते. दिनकर बेडेकर लिखित 'शेजारी' या नाटकात सुलभा देशपांडे यांच्या सोबत गजानन पांडे यांनी काम केले.

नाट्य दिग्दर्शकांचे योगदान

पुरुषोत्तम दारव्हेकरांचे नाव महाराष्ट्रात सर्वांनाच सर्वश्रुत आहे. रमेश अंभईकर यांनी 'ग्रॅज्युएट', 'रायबाई भुलाबाई', 'रक्तपुष्प', 'वऱ्हाडी माणसं' इत्यादी नाटके यशस्वी करून दाखविली. जुन्यातील चांगले आणि नवीन तंत्र आत्मसात करण्याच्या प्रवृत्तीमुळे ते आजही नागपूरच्या रंगभूमीवर कार्यरत आहेत. डॉ. राम म्हैसाळकर यांनी इथली संगीत रंगभूमी जिवंत ठेवली. त्यांनी खाडीलकरांच्या 'पंचनायिका', 'अखंड मुरली वाजे', 'सौभद्र', 'मानापमान', 'संशय कल्लोळ', 'शारदा' ही नाटके सादर करून संगीत रंगभूमीची सेवा

अनुक्रमणिका

केली. गजानन पांडे या दिग्दर्शकाचे वैशिष्ट्ये म्हणजे नवनाट्याचे वारे इथे आणण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. 'मृत्युवार्ता', 'फ्लाईज', 'धिस इज फॉर रियल', 'कॉल मी कॅप्टन रॉबर्ट' इत्यादी नाटके दिग्दर्शित करून त्यांनी प्रायोगिक रंगभूमी जिवंत ठेवली. डॉ. नीलकांत कुलसंगे या दिग्दर्शकाने 'राजरक्त', 'देशद्रोह' इत्यादी नाटके दिग्दर्शित करून १९८० ते १९८५ दरम्यान कामगार कल्याण स्पर्धा गाजवली. पाश्चात्य नाटककारांची नाटके इथल्या रंगभूमीवर आणण्याचे श्रेय प्रा. विनोद इंदुरकर यांना दिले जाते. त्यांनी वासनाचक्र (A STREET CAR NAMED DESIRE), काचेची खेळणी (THE GLASS MANEGERIES), ओझ्याविना प्रवासी (TRAVELLER WITHOUT LUGGAGE) 'नो एक्शीट एण्ड गेम', 'ए डेंजरस मॅन', 'मॅन कॅन नॉट लिव्ह बाम ब्रेड अलोन', 'न्यू हॅगमन' इत्यादी नाटके येथील रंगभूमीवर करून पाश्चात्य नाटकांची ओळख प्रेक्षकांना करून दिली. मदन गडकरी यांचे 'पोहा चालला महादेवा' हे नाटक महाराष्ट्रात गाजले. 'वाळूचं घर' या नाटकात अंतिम स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाल्याने प्रकाश लुंगे हे महाराष्ट्रात परिचित झाले, डॉ. रंजन दारव्हेकर या दिग्दर्शकाने स्वत:ची अन्य काही नाटके लिहून त्याचे अनेक प्रयोग केले. 'अस्तिता', 'असं झालच कसं', 'आत्महत्या', 'विजयम' ही त्यांची गाजलेली नाटके. पथ नाट्य आणि दलित नाट्याची चळवळ ज्या दिग्दर्शकाने जिवंत ठेवली आहे त्यात प्रामुख्याने संजय जीवने या दिग्दर्शकाचे नाव घ्यावे लागते. जुन्या पिढीतील दिग्दर्शकात नागेश देशमुख, अरविंद पाठक, किशोर कुलकर्णी, शाम बंड, मधुसुदन वेलणकर, प्रकाश पातुरकर, देवाशिष रॉय यांची नावे घेतली जातात.

चित्रपट निर्मिती

जे प्रभाकर यांनी 'भादवा माता' हा चित्रपट अनेक वर्षापूर्वी निर्माण केला होता. पुढे शंकर भाके यांनी 'माणुसकी' हा चित्रपट निर्माण केला तो बऱ्यापैकी चालला. त्यानंतर 'हलाहल' आणि 'आस्था' हे चित्रपट निर्माण झाले. मराठी चित्रपटांना अर्थसाहाय्य देऊन डॉ. बाबासाहेब इंदापवार यांनी आतापर्यंत गोविंद कुळकर्णी दिग्दर्शित पाच चित्रपटांची निर्मिती केली. शाम धर्माधिकारी या दिग्दर्शकाने काही व्हिडिओ फिल्म काढल्या आहेत.

विदर्भातील बोलीभाषा

'दर बारा कोसावर भाषा बदलते' अशी एक जुनी म्हण आहे. आणि त्यात तथ्यही आहे. कारण विदर्भातील नऊही जिल्ह्यांची आपापली पारंपारिक वैशिष्ट्ये, लोककला, बोली आणि लोकगीते आहेत.

बोली : चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली या भागातील बोलीला झाडीपट्टीतील बोली म्हणून सन्मान आहे. तर अमरावती, अकोला, यवतमाळ या भागात 'वऱ्हाडी ढंगाची' बोली बोलली जाते, तर यवतमाळ कडील काही भागात 'वऱ्हाडी' तर काही भागात 'लभानी' आणि मराठवाड्याकडील उच्चारांसारखी बोली बोलली जाते. बुलढाण्याकडील बोलीत वैदर्भीय आणि खानदेशी बोलीचा (सीमाभागात) संयोग झालेला दिसतो. नागपूरी मराठी बोलीवर हिंदीचा स्पष्ट प्रभाव आहे. वर्धाकडील बोलीत वऱ्हाडी आणि नागपूरी बोलीचे संमिश्रण

आढळते. नागपूर नंतर वर्धा जिल्ह्यामध्ये 'ळ' चा उच्चार 'य' असा होतो. याच उच्चार समृध्द बोलींचा त्या त्या बोली भाषेतील संवाद लोक साहित्य आणि गीतांमध्ये पूर्ण प्रयोग झालेला आहे.

लोककला, लोकसाहित्य आणि लोकगीते

लोककलांचा कोणी एक असा निर्माता नसतो. लोकजीवनातील समुहाकडून समुहाकडे ही लोककला-संस्कृती आणि लोकसाहित्य पारंपारिक आणि मौखिक पध्दतीने मार्गक्रमण करीत असते. प्रमाणभाषेचा विदग्ध वाङ्मयकार आणि वर्गीय कलावंताच्या निर्मिती आस्वाद मार्ग जनसामान्य अशा अनागरी जनांपासून दूर राहिल्यामुळे त्यांनी आपआपला लोकसंज्ञापनाचा मार्ग शोधला आणि प्रसंगी उपजिविकेचे साधन म्हणूनही लोककलांचा उदय झाला. उदा. डोंबाऱ्यांचे खेळ मदारी, बांबूचे नक्षीकाम हातविणाई, गोंदण खडीगंमत, तमाशा, पोतराज, डहाका, वाघ्यामुरळी, वासुदेव-दानपावल्या इत्यादी महाराष्ट्रीय लोककलांचा उल्लेख उपयोजित कलांप्रमाणे करता येईल.

परंतु या सर्व कलांचे जतन हे उपजिविकेबरोबरच किंबहुना त्यापेक्षाही जास्त श्रमपरिहारासाठी अधिक आहे.

लोककला : यात चित्रकला, गीत, संगीत, ग्रामदेवतेचे शिल्प, लोकरुढी, संकेत, चालिरिती, श्रध्दा इत्यादी बाबींचा स्वतंत्रपणे अभ्यास करणे शक्य असले तरी येथे रूढ असलेल्या विविध लोक कलाकारांचा परिचय दिला आहे.

महाविदर्भातील लोकगीतांचे संगीत

लोक संगीताच्या संदर्भात डॉ. विमल चोरघडे यांनी दोन विभाग केलेले आहेत, (१) संगीताला फारसे प्राधान्य नाही पंरतु स्वतंत्रपणे गायली जातात. अशी लोकगीते आणि (२) संगीतावर विशेष भर दिला आहे अशी गीते. यापैकी पहिल्या विभागात ओव्या महादेवाची गाणी, मोटेवरील गाणी, पोळा सखरोबा, स्त्रियांची गाणी यांचा समावेश होतो. तर दुसऱ्या भागात पोवाडे लावण्या, भजने, अभंग इत्यादी गायनाचे स्वतंत्र तंत्र असलेली संस्कारित उन्नत स्वरलय व प्रधान संगीत असलेली गीते येतात. हे दोन्ही प्रकार स्वर आणि लय यावर आधारित आहेत. लोकगीते आणि गायन यांचा अन्योन्य संबंध आहे. शब्द आणि स्वर हे एकमेकांच्या सहवासाने टिकून राहतात.

विविध लोककला प्रकार

नागपूर जिल्ह्यात भुलाबाई, दंढार, डहाका, महादेवाची गाणी, बारी, गोवारी, खापरी नृत्य, तंट्याभिल्ल, मातामाय, मारबतीची झडती, पावडीनृत्य, खडीगंमत, तुंबडी गीत, मंडई, वाद्यनृत्य, गोंडीनृत्य, किंगरी, पोवाडा या प्रमुख लोककला आहेत. नागपूर शहरात आंध्र, कर्नाटक, महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश या प्रांतांकरिता असलेले दक्षिणमध्य सांस्कृतिक केंद्र कार्यालय असल्यामुळे वैदर्भिय लोककलांचे जतन करायला फार मदत झाली आहे.

भुलाबाई (भोंडले-माड्या) : 'भुलाबाईचे भोंडले' हा लोकगीत कलाप्रकार महाराष्ट्राच्या सर्व भागात आपआपल्या खास वैशिष्ट्यांसह आजतागायत अस्तित्वात आहे. विदर्भ प्रदेशातही 'भुलाबाई-रायबाईची' कथा गाणी म्हणून विशेषत: ग्रामीण भागात हा कलाप्रकार थोडाफार शिल्लक आहे. थोडाफार यासाठी म्हणावे लागते कारणे ही रायबाईची कथा कवन करणाऱ्या बायांची पिढी आता राहिलेली नाही. नव्या पिढीच्या लोकांना तर हा इतका सुंदर कलाप्रकार विदर्भाच्या सांस्कृतिक भूमीत गेली कित्येक शतके प्रचलित होता हे आज कदाचित खरे वाटणार नाही इतका तो पुसट होत चालला आहे.

विदर्भ-वऱ्हाडात 'माडी पुनव' म्हणजे कोजागिरी, रात्रीच्या वेळी दुधाळ अशा संपूर्ण चंद्र प्रकाशात ग्रामीण भागात स्त्रिया वेटाळा वेटाळात एकत्र जमून उत्तर रात्रीपर्यंत समूहाने सासूरवासीन राईची कथा कधी आनंद विभोर तर कधी हुंदके देत गात असतात. कथा साधारणत: गद्यातच असते. कथा कवन करणारी बाई मात्र उत्स्फुर्त यमके साधीत कथा गात जाते व तिला उर्वरित बाया 'रायबाईजी रायबाईजी' या धृवपदाने साथ देतात. या कवनात अशा एक दोनच प्रमुख चाली असतात. कथाकथन करणाऱ्या बाया अधूनमधून बदलत असतात. कधी ही तर कधी ती या प्रकारे कवन पुढे पुढे सरकते.

रायबाईची कथा ही मागील व काही प्रमाणात आजच्याही काळातील सासूरवासाच्या कारावासात तडफडत असणाऱ्या सूनवायरीची कथा आहे. त्यामुळे आयाबाया आपआपली व्यथा राईच्या प्रतिनिधित्वाने अभिव्यक्त करून जातात इतका जिवंतपणा या कथा कवनाचे वेळी दिसून येतो. त्यास हुंड्यापायी झालेला छळ, असह्य सासूरवास, माहेरच्या भरून आलेल्या आठवणी इत्यादी वैविध्याने हे कवन भरभरून प्रवाहागत सरकत जाते. कुठे राईला विहिरीत ढकलून मारले, तर कुठे विषारी सापाचे जेवन घालून, तर कुठे तिचा प्रत्यक्ष वध करून मारले अशा प्रकारे सांगितली जाते. रायबाईची कवन कथा हा लोककला प्रकार फक्त विदर्भातच आढळून येतो. या लोककथेवर आधारीत रायबाई भुलाबाई हे वैदर्भिय बोली आणि लोकसंगीताचे नाटक, आंध्र, मध्य प्रदेश, कर्नाटक आणि तामीळनाडूतही गाजले आहे.

दंडार : दुसरा वैदर्भिय कला प्रकार म्हणजे दंडार. हा नृत्यनाट्य प्रकार असून काहीसा गुजराथी रास गरबासारखा वाटतो. तरीही वैदर्भिय शैली वेगळीच आहे. दंडारीचे नाते जोडायचेच झाल्यास ते भारतीय दशावतारी कला प्रकाराशी जोडता येईल. 'गजानन तू गणेश्वरा रे । गौरीच्या नंदना' असे स्तवन होताच पुढील कवनात ते आपल्या वस्तादाची म्हणजे गुरुची आठवन करून देतात. मग कथाभाग सुरू होतो. दंडारीचे मध्येच नृत्य गायन थांबवून मध्येच विदूषकी सोंगे इत्यादी दशावतारी पध्दतीच्या पात्राचे रंगमंचावर प्रवेश होतात. पात्रे काही वेळ जनतेचे रंजन करून विंगेत जातात व पुन: दंडारीला सुरूवात होते आणि ढोलक्या एकाच ठेक्यात हबके घेतल्यागत शाई न भरलेला ढोल वाजवीत पुढील नृत्यगायनात रंग भरायला सुरूवात करतो व मागचे टाळ, तुनतुनवाले त्याला साथ देतात. दंडारीचा हा प्रकार फार जुना असल्याचे आढळून येते. अगदी विष्णुदास भाव्यांच्याही कितीतरी आधीचा. भाव्यांनी सांगली परिसरात त्याकाळी नाटक बांधण्याचा जो यशस्वी

प्रयत्न केला त्याचप्रमाणे त्या आधीपासूनही विदर्भातल्या दंडारीत नाटक निर्माण होऊन गेल्याचे आढळून येते. फक्त ही संहिता लिखित नव्हती तर मौखिक होती. झाडीपट्टीतील तसेच नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर आणि खाप्याच्या दंडारी फार प्रसिध्द होत्या आणि काही प्रमाणात आजही आहेत.

डहाका : या प्रकारात प्रामुख्याने जे तालवाद्य वापरले जाते त्याचे नाव 'डहाका' आहे. 'डहाका' या गायन वाद्य कला प्रकाराचे पश्चिम महाराष्ट्रातील गोंधळ प्रकाराशी फार साम्य आहे.

डहाकामध्ये रुंद डमरुच्या आकाराचे दोन्ही बाजूंनी चामड्यांनी मढविलेले व दोरीने ताणलेले वाद्य असते ते उभे राहून व बहुतेक पायात धरून वाजविले जाते. पायातील बोटांनी दोराचा ताण कमी जास्त करून वाद्यांचा घुमारा कमी अधिक केला जातो.

विदर्भात बहुजन समाजात लग्नाचे आदल्या दिवशी (सीमांत पूजन) म्हणजेच देवादेवीला आपले कवन कसब दाखवित डाहाकावाले एकसूर एकतालात संबळाच्या ठेक्यावर कर्णमधुर डहाका गातात. डहाकात तुणतुणे नसते. ह्या डहाकाचे कथाकथन पहाटेपर्यंत चालते. कित्येकदा पितर स्मरणाचे वेळी यजमानाकडील रक्तसंबंधाचे लोक गहिवरून येतात. इतक्या भावपूर्ण पध्दतीने डहाका कथन गायन रंगात यते. उदा.

गणपती देवा गा उमा महादेवा गा
या काजाले येजा गा
आसिर्वादे देजा गा पितर देवा गा
लाडाचे लेकीले तारुण नेजा गा.

महादेवाची गाणी : साधारणत: फेब्रुवारी महिन्यात महाशिवरात्रीचे पंधरा दिवस आधीपासून महादेवाच्या यात्रेचे भाविकात वातावरण निर्माण होते. मध्य प्रदेशातील पंचमढीजवळील चौरागड उंच पर्वतराशीत शिवाचे निवासस्थान आहे अशी इकडील भाविकांची श्रध्दा आहे. पार्वतीपिता दक्षाने अपमान केल्यावर भगवान शंकर रुसून या घनदाट जंगल खोऱ्यातील उंच पर्वतराशीत येऊन बसले. पुढे शोध घेत भिल्लीणीच्या रूपात पार्वती इथे आली अशी एक कथा भक्तगण गात असतात. विशेषत: ही महादेव भक्ती इकडील ग्रामीण लोकात मोठ्या प्रमाणावर दिसून येते. हातात त्रिशूल, भाळी शेंदराचा टिळा, कुणाजवळ दिवटी, गळ्यात पुष्पमाला व मुखी महादेवाची गाणी असे दृश्य महाशिवरात्रीपर्यंत विदर्भाच्या बहुतेक भागात बघायला मिळते. या महादेवाच्या लोकगाण्यात शंकराविषयीच्या विविध पौराणिक कथा आख्याने दिसून येतात. नागभक्तीचाही त्यात अंतर्भाव असतो. गाण्याचे एक चरण गाऊन होताच गाणाऱ्या बरोबर इतर भक्तगण 'हर बोला हर-हर महादेव' अशा मोठ्याने गजर करतात.

अनुक्रमणिका

पूर्वी प्रवासाची फारशी साधने नव्हती तेव्हा तीर्थक्षेत्रांना पायी जावे लागे त्या संदर्भात हे एक लोकगाणे पहा

सहा का मयन्याची काशी बरी--
दो का मयन्याची पंढरपुरी--
पंधरा दिवाचा महादेव आहे--
दु:खाच्या डोंगरी--
हर बोला हर-हर महादेव

जे लोक महादेवाला परिस्थितीमुळे जाऊ शकत नाहीत ते घरीच पाच पावली म्हणजे पाच पावलं गाणी गात चालून आपली पूजा अर्पण करतात.

बारी (नागबारी) : विदर्भात नागपंचमीच्या दरम्यान गावोगावी नागबारी म्हणण्याचा प्रघात आहे. विषारी नागाचे वर्णन तसेच सापांचे विष उतरविण्याच्या मांत्रिकाची सापाप्रति असलेली भक्ती या संबंधीची ही गाणी असतात. इथे आपणास मांत्रिक स्वरांचे शिस्तबध्द तारतम्य ठेवून जो मंत्रोच्चार करतात, म्हणण्यापेक्षा मंत्र गातात ते वातावरण भारावून टाकणारेच असते. जवळपास ६-७ मांत्रिक हे मंत्र गातात त्यास 'बारी' असे म्हणतात.

उदा. अस्सल नागा येशील आंगा
नाहीतर डोबीतली डोम्यारे
चकाचका बैल बडा
बैलं पोहणं घरी
पोहणं घरची आणली माती रे
त्यानं घडवले दोन नागमोती रे

अशा एका तालासुरात मांत्रिक गातात हेही एक वैदर्भिय परंपरेचे लोकसंस्कृतीचे दृश्य आहे.

गोवारी : साधारणत: दिवाळी पर्वावर गुराखी लोक आपल्या धन्याकडे वार्षिक देणगी 'बोजारा' प्राप्त व्हावा म्हणून वाद्यांच्या तालावर नाचत जातात. गळ्यात कवड्यांच्या माळा, अंगात कवड्यांची 'बनियान', डोक्यावर मोरपिसे ते परिधान करतात. ढोलकीच्या आकाराचे वाद्य काड्यांनी गतीने वादक वाजवीत असतात. नाचणाऱ्या गुराख्यापैकी एखादा बासरी वाजविण्यात दंग असतो. 'हो' असे मोठ्याने ओरडून वाद्ये व नाच थांबविला जातो व मग ठेक्यावर ही झडती म्हटली जाते.

भाटभिकारी येते दादा
मूठमूठ दाणे नेते
बारा मयन्याचा गोवारी येते
धगधग काळज होते--

अशा प्रकारे आपल्या धन्याचे अधिक काही द्यावे अशी सूचनाही ते करून जातात. त्रिपुरी पौर्णिमेपर्यंत ते आपला हा उत्सव साजरा करतात.

खापरी नृत्य : चैत्र मासाच्या सुमारास देवी भवानी म्हणजे मातामायसमोर संध्याकाळचे सुमारास हे खापरी नृत्य सादर केले जाते. हे एक समूह नृत्य आहे. या नृत्यात हातात खापर (म्हणजे अर्धवर्तुळाकार आकाराचे) घेऊन लयबध्द फेर धरून नृत्य सादर केले जाते. खापरात तेलमिश्रित रुई पेटत असते. बाजूला कधी कधी अधिक उजेडासाठी टेंभा प्रज्वलीत केला जातो. यात सनई व इतर ताश्यासारखे वाद्ये वाजविली जातात. ही नृत्ये फक्त मातामाय देवी भवानीसमोरच सादर केली जातात. नागपूर जिल्ह्यातील काही भागात ही धार्मिक लोकप्रथा आजही तग धरून आहे.

तंट्या भिल्ल : हा लोक कलाप्रकार फक्त नागपूर भागात विशेष दिसून येतो. दुर्गोत्सव तथा विशेष गणेशोत्सवाचे वेळी तंट्या भिल्लाचे सोंग घेऊन गावात ते वाजत गाजत (रणवाद्यासारखे) फिरवले जाते. तंट्या भिल्ल हा एक उमाजी नाईकासारखाच (मध्य प्रदेश व महाराष्ट्राच्या सीमारेषेवर येणाऱ्या प्रदेशात) एक महायोध्दा होऊन गेला. तो अखेरपर्यंत गोरगरीबांसाठी झटला व श्रीमंत आणि इंग्रजाविरुध्द लढला. अशा या थोर भिल्ल सुपुत्राची आठवण म्हणून नागपूरकडे अखाडेबाज पहेलवान लोक तंट्याची सोंगे काढतात. सोबत दांडपट्टा असतो. तंट्याच्या दंडाला (सोंबात) सुरा व पोटाला (आरपार दर्शविणारी खंडित तलवार) तलवार बांधलेली असते. सोंगधारक फक्त जांग्यावर असतो. पिळदार शरीरयष्टी असलेला इसम बहुधा तंट्या होतो. तंट्या आपल्या मारेकऱ्यांनी लढत पुढे-पुढे जात आहे असे दृश्य दाखविले जाते. खापा (जिल्हा नागपूर) येथील स्वा. सं. स. भुऱ्या पहेलवान यांनी रंगविलेला तंट्या भिल्ल आजपर्यंत चर्चेत आहे.

मातामाय : पूर्वी देवीच्या रोगाचा फार प्रादुर्भाव होता. त्यापासून बचाव करण्यासाठी ग्रामीण लोक देवीला साकडे घालीत. यातूनच मातामायच्या गाण्यांची निर्मिती झाली हे उघड आहे. ही गाणी विशेषत: बाया गातात. रोगी बरा होईस्तो रोज डोक्यावर पाण्याची घागर (त्यास कडूलिंबाचा पाला) घेऊन रस्त्याने गात गात देवीच्या देवळापर्यंत जातात.

गाण्याचे एक उदा :--

माताई माय आली ऽऽ
आली तं. येवू देनं ऽऽ
विचे चौरंगी पाय धूनं वो माय
वो माझे मातामाय

अशी गाणी बाया ३-४ चालींवर तालासुरात गात असतात.

मारबतीची झडती : पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी नागपूर भागात मारबत काढली जाते. हा एक आगळा वेगळा नागपुरी लोकोत्सव आहे. या मारबतीचा लोकजीवनावर एवढा प्रभाव पडला आहे की, लोक कधी कधी चिडून 'त्याची-त-लेकाची हमेशासाठी मारबतच हाकलाले पायजे' असे बोलून जातात. मारबत हाकलणे म्हणजे त्या व्यक्तीला गावातून बाहेर काढणे किंवा त्याची भरपूर बदनामी होईल इतके बदलून टाकणे.

मारबत ही बांबूच्या कांबीपासून बनविली जाते. नंतर कागदी नक्षिकामाने ती सजविली जाते.

मारबतीचा हा पुतळा साधारणत: १५-१६ फुट तर कधी २०-२५ फूटही उंच केला जातो. नागपुरात पिवळी मारबत नावाचा एक वेटाळच आहे इतके हिचे इथे वैशिष्ट्य आहे. भ्रष्टाचाराची मारबत दरवर्षी बघायला मिळते. तसेच काळी-पिवळी मारबतही निघत असते. गावातील जे-जे म्हणून अभद्र, अप्रिय ते-ते 'घेऊन जागे मारबत' म्हणून लोक तिला म्हणत असतात. याचा अर्थ या ठिकाणी मारबत ही एखाद्या देवतेस्वरुपातही मानली जाते हे सिध्द होते. म्हणूनच लोक 'खांसी खोकला हैजा घेऊन जागे मारबत' असा जोरात ओरडा करतात.

मारबत जाताना तिच्यासमोर दांडपट्टा व लेझिम नृत्यही होत असते. मारबतीप्रमाणेच तिचा बडग्याही काढला जातो. बडग्या म्हणजे तिचा नवरा.

बैलाच्या पोळ्यात व मारबतीच्या वेळी ही झडत्या (म्हणजे जवाब सवालासारखे) दिल्या जातात.

उदा. जो करन कुरकूर
त्याले खाईन मशासूर
न त्याले घेऊन जागे मारबत.

पावडी नृत्य (मैदानी) : उंच उंच काठ्यांना दोन-तीन फुट उंच पावड्या जोडून त्यावर उभे राहून बासरी व ढोलाच्या तालासुरात हे नृत्य केले जाते. नृत्यकार, मोरपिसे कवड्यांच्या माळा व धोतर, बंडी परिधान कलेले असतात. कसरत बध्द वाटणारा हा नृत्य प्रकार अतिशय आकर्षक असा असतो. विशेषत: खापा परिसरात हा पावडी नृत्य प्रकार अधिक रुढ दिसतो. आदिवासीपासून या नृत्याची उपज दिसते. खाप्याचे धन:शाम खुबाळकर गुरुजी आणि त्याचे सहकारी या नृत्य कलेबद्दल पुरस्कृत झालेले आहेत.

खडी गंमत : हा विदर्भाच्या सर्व ग्रामीण भागात लोकप्रिय असलेला कला प्रकार आहे. अनेक ग्रामीण उत्सवात खडी गंमत सादर होत असते. लावण्या-पोवाड्यासारख्या समूहाने सादर होणारा हा कला प्रकार वाटत असला तरी याची गंमत काही न्यारीच आहे. पश्चिम महाराष्ट्रातील तमाशात बाया नाचतात. इथे 'बाप्पा' नाचतो. त्या बाया नीटनेटक्या नाचतात. हा 'बाप्पा' कसाबसा नाचतो. विशेषत: हातवारे, पाय खाली वर करीत मागेपुढे सरकत 'बाप्पा' म्हणजे नाच्या नाचत असतो. सोबत तुणतुणे ढोलकी असते. मागे शाहीर कवनं गात सवांद साधीत रंग भरीत असतो. खडी गंगत हे एक ग्रामीण नृत्यनाट्यच आहे. यात

जबाब-सवाल कथानाट्य असते. पण इथे कुठलीही बंदीश संहिता नसते. जसजसे वेळेला शोभेल त्या त्या प्रमाणे शाहीर 'नाच्या' पोऱ्यासह नाट्य निर्माण करत असतो. त्या पौराणिक कथापासून ते अलिकडील सामाजिक घडामोडीपर्यंतचे चित्रण दिसते. ग्रामीण लोक खडी गंमतीचा दिवस निघेस्तो आस्वाद घेतात. पंधराव्या शतकात तमाशात कलगी आणि तुरा हे दोन भेद पडले. कलगी म्हणजे ब्रम्ह आणि तुरा म्हणजे माया. जीवनाचे हे दोन भेद सांगणारी शाहिरी गाणी भेदीक म्हणून सुरू झाली. या भेदीकासोबत पुढे संतांची भारुडेही रंजनाकरीता सादर होऊ लागली. पश्चिम महाराष्ट्रातील तामाश्यात बाया उपलब्ध होत्या. वैदर्भिय शौकिनांनी हाच तमाशा खडी गंमतीच्या रूपात घडवून नाच्याद्वारे दुधाची तहान ताकावर निभवली. खडी गंमतीचा खरा अर्थ खडीबोली प्रमाणेच आहे. अगदी सहजगत्या उभ्या उभ्या जलसा रंगवणे याचाच अर्थ खडी गंमत उभी करणे. या खडी गंमतीतील गायक हा (प्रमुख) शाहीर असतो. तो धार्मिक कथा कवनांपासून आधुनिक घडामोडीपर्यंत शाहीरी गात जातो. नाच्या नायिकेची भुमिका वठवित ग्रामीण ढंगाचे संवाद फेकीत नाचत असतो. यातही सवाल जवाब असतात. गुरुशिष्य परंपरा आणि फडही असतात. नागपुरकडे खडी गंमतवाल्यांची, काही घराणीही आता प्रसिध्दीस आली आहे. उदा. नन्हकन्या, गरीब्या, कलंगीतुरा, खरात इत्यादी यात प्रामुख्याने डफ, ढोलकी, तुणतुणे ही वाद्ये असतात आणि सर्व मिळून चार पाच पात्रे असतात.

खडी गंमतीची शाहीरी थाटाची गाणी कधी-कधी सिनेमा चालीच्या मोहात पडतात. खडी गंमत सर्व कलावंत उभे राहूनच सादर करतात. मनोरंजन व्हावे, गंमत यावी, मौज वाटावी म्हणूनच हा कला प्रकार इकडे खडी गंमतीच्या नावाने सर्वत्र लोकप्रिय आहे. विदर्भातील नन्न्या, कन्न्या, गरीब्या शाहीर, भंडाऱ्याकडील बोरकर, खाप्याचे बुरडे, झाडे इत्यादी फडकर्ते प्रख्यात राहिले आहेत. खडी गंमतीची सुरूवात 'गौरीगणेशा विघ्नविनाशी तू जगदिशा गजवंदना हो', या गाण्यापासून येते. पुढे कथानकात कृष्ण पेंद्याचाही येतो.

तुंबडी गीत : 'लख लख तुंबडी भर देना' या पदाने ठेक्यावर ताल धरुन गायिले जाणारे हे लोकगीत विदर्भाच्या सर्व भागात फार लोकप्रिय आहे. डमरु आकाराच्या वाळलेल्या दुधी भोपळ्यात खडे घालून भोवती घुंगराची माळ बांधून तुंबडी तयार केली जाते. हे वाद्य मागेपुढे हलवीत राहिल्याने 'छक्क छक्क' असा ध्वनी निर्माण होतो व त्या ठेक्याच्या तालावर गायक तुंबडीगीत सादर करतो. पश्चिम महाराष्ट्रातील धनगरी पध्दतीप्रमाणे विदर्भातही ही तुंबडी गायक मंडळी पेहराव धारण करायची असा आधार आढळतो. अलिकडेच या पेहरावाचे गायकात दर्शन होत नाही. आखुडसे धोतर, डोक्याला कसेबसे गुंडाळलेले मुंडासे, खांद्यावर घोंगडे व एका हातात काठी व दुसऱ्या हातात तुंबडी वाद्य असे तुंबडी गीताच्या विविधतेचे अध्ययन करतांना आढळून येते. ही तुंबडी गीते कधी वीरश्रीने तर कधी तारुण्याने बहरत असतात. तुंबडी गाणारा गाता गाता पदन्यास घेत नृत्यही करीत असतो. लोकगीत गायक श्री हरीभाऊ हिंगणकर आणि सुधाकर निचकवडे या वैदर्भिय तुंबडी गायकांनी ही कला सांभाळून ठेवली आहे.

मंडई : हा विदर्भातील ग्रामीण लोकांचा वार्षिकोत्सव आहे. दिवाळी सणाचे निमित्ताने नागपूर भागात मंडईचा जलसा साजरा होत असतो. यात खडी गंमत, मौखिक संवादधारी नाटके, सोंगे, गमती सादर होतात. यात वेटाळावेटाळाची स्पर्धाही दिसून येते. खापा,

वाकोडा, कोथुळणा, धापेवाडा, सावनेर, पांढुर्णा, इत्यादी भागात मंडईचे जलसे होत असतात.

याप्रमाणे विदर्भ कला प्रकारांच्या वैशिष्ट्यांचा आढावा असून महाराष्ट्राच्या उर्वरित भागात आढळणारे वासूदेव, (म्हणजे इकडे दान पावले) भारुड, गोंधळ, पोवाडा, खेळ हेही प्रकार कमी अधिक विदर्भातही आढळतात. पंरतु ते दानपावल्या सोडल्यास अस्सल वैदर्भिय म्हणता येणार नाही. दानपावले पितरांच्या नावानं धान्याचं दान मागत फिरतात. आताशा हा प्रकार नागपूरकडे फारसा अस्तित्वात दिसत नाही.

वाघ नृत्य (शेर बननी) : हा कलाप्रकार विशेषत: मोहरम, गणेशोत्सव आणि पोळ्यात नागपूर भागात अलिकडे अधून मधून बघावयास मिळतो. उघड्या अंगावर वाघाच्या रंगाचे पट्टे चितारलेले हातात केसाळ मोजे, गळ्यात लांबते केसाळ कातडे, डोक्यावरही केसाळ टोप व तोंडात लवलवती लाल रंगाची पांढरे दात बाहेर आलेली जीभ असा या वाघ्याचा अवतार असतो. संपूर्ण अंग वाघाप्रमाणे रंगवून केवळ लंगोट (जांग्या) किंवा तत्सम वस्त्रात हा कलावंत असतो व वाद्यांच्या तालावर वाघाचे डावपेच, चालणे, पाहणे, झडपणे इ. नजाकती पेश करीत प्रेक्षकांचे रंजन करतो. याबद्दल त्याला बिदागी देवून संबंधित खूष करतात. कुणी नवसाचे (मन्नत) तर कुणी स्वखुषीने वाघ नाचतात असे आढळून आले. साधारणत: वाघ पीळदार शरीरयष्टीची माणसे झाली की रंगत औरच वाढते पण तसे बंधनमात्र नाही.

गोंडी नृत्य : विदर्भाच्या सर्व आदिवासी भिल्ल, गोंड, माडीया, कोरकु इत्यादी जनजातीत नृत्य हा प्रकार अविभाज्य अंग आहे. या वनवासी जमातीत नृत्य हे उत्सवाचे प्रमुख आकर्षण आहे. 'गोटूल' संस्कृतीत नृत्य व नैतिकता अद्यापही शाबूत आहे. रेला या नृत्यात तरुण-तरुणी फेर धरुन बांसरी व ढोलाच्या तालावर लयबध्द हातचाली करीत नाचतात. यात कधी संथपणा तर कधी जल्लोषही असतो. नृत्याबरोबर गाण्याचेही मिश्रण असते. आदिवासींची नृत्यकलाही शिस्तबध्द असते. यांची रूप व वेशभूषाही आकर्षक असते. नृत्यकार मात्र मातीपासून तयार केलेल्या रंगरंगोटीद्वारे ते चेहरे सुंदर रंगवतात व त्यावर ठिपक्यांचे गोंदण देतात. गळ्यात मणी व कवड्यांच्या माळा व डोक्याला मोराची वा अन्य पक्षांची आकर्षक पिसे शोभवितात. आदिवासी पुरुष आजही काही प्रमाणात अर्ध वस्त्रातच आढळत असले तरी स्त्रिया मात्र चोळ्यांचा वापर करू लागल्या आहेत. गावात किंवा शहरात येवून स्थानिक झालेल्या आदिवासींच्या दैनंदिन पेहरावात व राहणीमानातही सुधार झालेला दिसतो. परंतु त्यांनी आपल्या पारंपारिक नृत्य वा अन्य कला व संस्कृतीचे अद्यापही जतन केले आहे. भामरागड, गडचिरोली, चंद्रपूर या वन्य भागातील आदीवासी नृत्ये प्रसिध्द आहेत.

किंगरी : कींऽऽ कींऽऽ अशा स्वरांमुळे या वाद्याला 'किंगरी' असे नाव पडले असावे. हे वाद्ये एका बाजूने अर्ध नारळाच्या आकाराचे व सव्वा ते दीड फुट लांबीचे असते. अर्धवर्तुळाकार भाग चामड्याने मढवलेला असतो. त्यावरून एकतारी वा व्हायलीन प्रमाणे स्वरतार ताणलेली असते. धनुष्याकृती सहसाधनाने हे वाद्य वाजवीत वादक तालासूरात गात रस्त्याने फिरतो. विशेष म्हणजे हे वाद्यधारी नाथजोगी संप्रदायातील असून ते दारावर न जाता रस्त्यातच भिक्षा स्वीकारतात व नवनाथांची गोपीचंद राजाची कथा गात फिरतात.

हे लोक गोसाई असल्यामुळे ते नाथजोग्या प्रमाणे भगवे वस्त्र व गळ्यात रुद्राक्षांच्या माळा धारण करतात. यांची संख्या यवतमाळ, अमरावती भागात पंचवीस तीसचे आसपासच (कुटुंबे) आता राहिलेली आहेत.

पोवाडा : इसवी सन १२९० मध्ये रचलेल्या ज्ञानेश्वरीत 'पवडा' हा शब्द ज्ञानदेव माऊलीने किर्ती या अर्थाने वापरलेला आहे. शिवछत्रपतींच्या काळात तर या कलेला वीर रसाच्या प्रेरणेचे महत्त्व होते. शिव दरबारातील कवी भूषणाची वीररसाची शाहीरी कवने ऐकतांना योध्याचे बाहु स्फुरायचे अशी नोंद आहे.

पोवाडा हा नृत्यप्रकार नसून शूरविरांच्या पराक्रमांचे वर्णन करणारा गीतप्रकार आहे. पोवाडे किर्तीचेच गायिले जातात हे त्यांचेच द्योतक आहे.

डफ, तुणतुणे आणि झांज ही पोवाड्याची वाद्ये असून शाहीरासोबत जी रे जीऽ जीऽ जीऽ जीऽ म्हणणारे दोन तीन गडीही असतात. पोवाडा पारंपारिक वेशभूषेत अर्थात चुडीदार पायजामा फेटा आणि बंगाली कुडता अशा पेहरावात शाहीर सादर करतात. गातांना कधी कधी शाहीर तल्लीन होवून जातात.

विदर्भातील पोवाडा शाहीरी परंपरा पश्चिम महाराष्ट्राप्रमाणेच आहे. नागपूर जिल्ह्यातील कै. गंगाराम झाडे यांना पोवाडा सम्राट संबोधले गेले आहे. यातही गुरुशिष्य परंपरा असून कलगी आणि तुरा हेही भेद आहेत. पोवाड्याचा शाहीर हा खुद कवन रचित असतो आणि हाती डफ घेवून 'रामा हरीऽ' असा सूर लावित गणेश वंदन सुरू करतो. खड्या आवाजात वीर रसाचा पोवाडा ऐकणे हा एक रोमांचक अनुभव असतो. विदर्भात आजही शाहीरांचे जलसे ग्रामीण भागात दिपोत्सव पर्वात भरत असतात. या कलाप्रकारातही जटील धार्मिक कथाधारीत प्रश्नांचे सवाल जबाब दुय्यम सामनेही भरतात आणि जवळपासच्या गावांचे लोक या कार्यक्रमाला प्रचंड गर्दी करतात. अलिकडे याद्वारे समाज प्रबोधन विषयक कार्यक्रम पण राबविले जातात.

आधुनिक चित्रकला व मूर्तिकला

पाटील, मनिषा, प्रोफेसर शासकीय चित्रकला महाविद्यालय, नागपूर (नागपूर) यांनी या भागाचे लेखन केले आहे.

आधुनिक चित्रकला व शिल्पकला या क्षेत्रांमध्ये नागपूरच्या कलावंतांनी आपला ठसा उमटवला आहे. स्वातंत्र्योत्तर काळाच्या सुमारास जेव्हा भारतातील प्रमुख शहरांतून नवनवीन कलाप्रवाह आले आणि कलाश्रय देणारा वर्ग निर्माण झाला तेव्हा नागपूरसारख्या शहरातही याचा अंशत: परिणाम झाला व येथे कलेचे वातावरण तयार होत गेले.

बापूसाहेब आठवले : नागपुरात १९३० च्या दशकात चित्रकलेचे शिक्षण देणारी पहिली संस्था एम. एस. उर्फ बापूसाहेब आठवले यांची होय. बापूसाहेबांचे बालपण व प्रारंभिक शिक्षणाचा काळ खानदेशातील जळगाव येथे गेला. १९१९ साली मुंबईच्या सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट मध्ये ते दाखल झाले व तिथून पेंटींग, क्ले मॉडेलिंग व डी. टी. सी. असा अभ्यासक्रम पूर्ण केला. तद्नंतर काही काळ बापूसाहेबांनी अमळनेर येथे घालवला व एक उत्तम व्यक्तिचित्रणकार म्हणून ते नावारुपाला आले. नागपूरमध्ये नागपूर आर्ट

सर्कलतर्फे भरलेल्या चॅटरटन कला प्रदर्शनात त्यांच्या कलाकृतीला सुवर्णपदक प्राप्त झाले व येथूनच बापूसाहेबांचा नागपूरशी संबंध आला.

सन १९३१ मध्ये आठवले यांनी धनवटेनगर विद्यालयातील ड्रॉईंग शिक्षक व नागपूर नाट्य मंडळाचे एक नट बापूसाहेब चोरघडे यांच्या समवेत 'नागपूर स्कूल ऑफ आर्ट' ची स्थापना केली. या संस्थेला माननीय जस्टिस. एम. बी. नियोगीसारख्या नागपुरातील मान्यवर व्यक्तींचे कृपाछत्र लाभले. संस्थेची जबाबदारी सांभाळून बापूसाहेब आठवले यांनी व्यक्तिचित्रणकार म्हणून नावलौकिक मिळवला. नागपूर विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरु सर बिपिन कृष्ण बोस यांचे व्यक्तिचित्र त्यांनी रेखाटले व त्यानंतर अनेक कुलगुंरुची व्यक्तिचित्रे त्यांचेकडे सोपविण्यात आली.

नागपूर स्कूल ऑफ आर्ट मध्ये मुंबईच्या सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टच्या धरतीवरचे पाश्चिमात्य 'ॲकेडेमिक' पध्दतीचे शिक्षण दिले जात असे. बापूसाहेबांव्यतिरिक्त त्यांचे लहान बंधू वसंतराव आठवलेही विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन करीत. तसेच वसंत टिकेकर व मुरलीधर बाजीराव नगरकर हेही विद्यार्थ्यांना शिकवीत. संस्थेतील विविध विषयांची जबाबदारी स्वत: बापूसाहेबांकडे असे तर 'आऊटडोर लँडस्केप' अर्थात बाह्य स्थळी निसर्गचित्रण याचे मार्गदर्शन वसंतराव आठवले व नगरकर करीत. आठवलेंच्या काळात नागपूर शहरात विविध कला विषयक उपक्रम होत असत. त्यातील एक म्हणजे 'म्युझियम सप्ताह' या दरम्यान नागपूरच्या मध्यवर्ती संग्रहालयात चित्रप्रदर्शन व चित्रकारांची प्रात्यक्षिके आयोजित केली जात. कलावीथींच्या (आर्ट गॅलरी) अभावीही बापूसाहेब विद्यार्थ्यांच्या कलाकृतींची प्रदर्शने बॉम्बे गॅरेज, रॉबर्टसन हॉल, वाय. एम. सी. ए. अशा ठिकाणी भरवत. घाटरोड स्थित धनवटे गॅरेज व चिणॉय हाऊस येथे आठवलेंनी अखिल भारतीय कला प्रदर्शनांचे आयोजन केले. तसचे स्वातंत्र्यदिनाप्रित्यर्थ भव्य चित्र प्रदर्शन भरविले. आठवले यांच्या संस्थेत इंदुरचे ज्येष्ठ चित्रकार डी. डी. देवळालीकर व नागपूरचे जी. के. जोशराव यांची प्रात्यक्षिके आयोजित करण्यात आली. सन १९५७ मध्ये नागपूर स्कूल ऑफ आर्ट तर्फे मुंबईच्या सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टच्या शताब्दिप्रित्यर्थ समारोहाचे आयोजन झाले.

आठवले यांच्या संस्थेतील वातावरण खेळीमेळीचे व मैत्रिपूर्ण असून तेथील अनेक विद्यार्थ्यांनी कलाक्षेत्रात स्वत:चे स्थान मिळविले आहे. त्यापैकी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ख्यातिप्राप्त सैयद हैदर रझा हे एक आहेत. मूळचे मध्य प्रदेशातील बाबरिया या गावचे असलेले रझा यांनी आठवलेच्या नागपूर स्कूल ऑफ आर्ट मध्ये कलेचा श्रीणेशा केला. नागपूरच्या परिसरातील तसेच मध्य प्रदेशातील जबलपूर-बेडाघाट येथील अनेक निसर्गचित्रे रझांनी रंगविली. पुढे रझा यांनी मुंबईच्या सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट मधून शिक्षण पूर्ण केले व मुंबईत सन १९४८ साली प्रस्थापित 'प्रोग्रेसिव्ह आर्टिस्ट्स ग्रुप' चे ते सक्रीय सभासद राहिले. पाश्चात्य कला व भारतीय कला यांचा मेळ साधून आधुनिक भारतीय कलेत स्वतंत्र अशी शैली स्थापित करणारे रझा गेली अनेक वर्षे फ्रांस येथे स्थायिक आहेत.

नागपूरचे हरी अंबादास गाडे हे ज्येष्ठ चित्रकार यांनीही आठवलेंच्या नागपूर स्कूल ऑफ आर्ट येथे काही कालावधीतपर्यंत कलाशिक्षण घेतले. १९४० च्या दशकातील गाडे यांची निसर्गचित्रे लक्षणीय असून त्यात सूक्ष्म वास्तवदर्शनापेक्षा दोन अथवा तीन प्राथमिक रंगात,

ठसठशीत घनाकारांवर भर देऊन जोमदार शैलीत त्यांनी काम केले व निसर्गचित्रणात नाविन्यता आणली. पुढे गाडे मुंबईला गेले व तिथे सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट येथून कलाशिक्षण पूर्ण करून ते प्रोग्रेसिव्ह आर्टिस्ट्स ग्रुपचे संस्थापक सभासद म्हणून कार्यरत राहिले. भारतीय जनजीवन व पाश्चिमात्य कलाप्रणालींपासून प्रेरित गाडे यांच्या शैलीत सशक्त रेखांकन व सुलभीकृत ठळक आकृतीबंध ही वैशिष्ट्ये दिसतात.

मुंबईतल्या स्त्री चित्रकारांपैकी एक अग्रणीय नाव चित्रकर्ती श्रीमती बी. प्रभा यांचे आहे. बी. प्रभा (पूर्वाश्रमीच्या प्रभा आग्गे) या मूळच्या नागपूरच्या. त्यांनी आपल्या कलाशिक्षणाचा प्रारंभ बापूसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली केला. पुढील शिक्षण सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट मुंबई मधून पूर्ण केले. बी. प्रभा यांनी आपल्या वेधक आकृतीप्रधान शैलीत भारतीय ग्रामीण जीवनावर आधारलेली तैलरंगातील चित्र वैशिष्ट्यपूर्ण आहेत. नागपूर स्कूल ऑफ ऑर्ट मध्ये शिक्षण घेणाऱ्यापैकी नागपुरातील ज्येष्ठ चित्रकार शेख याकूब मलक, ना. ब. डिखोळे, भानजीभाई पाटणकर यांचा समावेश असून दादासाहेब उत्तरवार, पोफळी, संगवई, कणिरे, कोथळे, श्रीमती कुसुम धवेसे, इंदुमती शेवडे, इंदुमती गोखले अशा अनेकांना बापूसाहेबांचे मार्गदर्शन लाभले. आज बापूसाहेब हयात नाहीत व नागपूर स्कूल ऑफ आर्टही बंद पडले आहे. तरी त्यांचे अनेक विद्यार्थी नागपुरातील कलाक्षेत्रात आज कार्यरत आहेत. दीनदयाल शोध संस्थानच्या 'बाल जगत' तर्फे स्वर्गीय बापूसाहेब आठवलेंच्या स्मृतिप्रीत्यर्थ एक भव्य बालचित्रकला स्पर्धा नागपुरात दरवर्षी आयोजित करण्यात येते.

विनायक मसोजी : नागपूर शहरातील एक ज्येष्ठ प्रतिभाशाली चित्रकार म्हणजे विनायक मसोजी. मसोजींच्या जन्म कोल्हापूर येथे सन १८९७ मध्ये एका ख्रिस्ती कुटुंबात झाला. त्यांचे वडील रेव्हरंड शिवराम मसोजी कोल्हापुरातील अमेरिकन प्रेसबिटेरियन या ख्रिश्चन प्रोटेस्टंट समाज्याच्या संस्थानाचे पालक होते. बालपणापासूनच क्रीडा व चित्रकला या क्षेत्रात प्रवीण असलेल्या मजोजींनी कलाशिक्षण घेण्यासाठी मुंबईच्या सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट मध्ये सन १९१९ साली प्रवेश घेतला. त्यावेळेस ग्लॅडस्टोन सॉलोमन हे संस्थेचे प्राचार्य होते. मसोजींनी येथे रावबहादुर धुरंधर, ट्रिनिडॅड, मिस्त्री, अगास्कर अशा उत्तमोत्तम कलाविदांच्या मार्गदर्शनाचा लाभ मिळाला. मसोजींनी जे. जे.त तैलरंगमाध्यम, शिल्पकला, फ्रेस्कोतंत्र इत्यादी कलेच्या विविध अंगांचे ज्ञान अर्जित केले.

सन १९२० च्या सुमारास ब्रिटिशांविरुध्द असहकार चळवळीचा आरंभ झाला व मसोजींचा संपर्क या दरम्यान कॅनन व सॅम्युअल या जोशी बंधुंशी आला, व त्यांचेकडून मसोजींना रविंद्रनाथ टागोरांनी नव्याने प्रारंभ केलेल्या शांतिनिकेतन विषयी माहिती मिळाली. जोशींच्या संग्रही असलेली मुगल, राजपुत इत्यादी शैलीची चित्रे पाहिल्यावर चित्रकलेतही काही भारतीय 'स्व' देशी आहे हे मसोजींना पटले. जे. जे. स्कूल ऑफ आर्ट मध्ये पाश्चिमात्य ॲकेडेमिक पध्दत असून वास्तवपूर्ण चित्रण करण्याला महत्त्व दिले जात असे. मसोजी यास कंटाळून शांतिनिकेतनला रवाना झाले. परंतु जे. जे. च्या वातावरणाचा मजोसींवर प्रभाव पडला हे नक्की. मसोजी शांतिनिकेतनला गेल्यावर स्वत:च्या कलाविषयक मूळ वृत्तविशेषांना शांतिनिकेतनच्या सर्वमान्य भूमिकेची व शैलीची जोड देऊन स्वत:चा असा विशेष कलाविष्कार सिध्द करणे त्यांना यामुळेच शक्य झाले. पुढे अनेक वर्षे शांतिनिकेतन येथे उपप्राचार्य पदावर कार्यरत असलेले मसोजी सन १९५१ साली नागपुरला आले व

तेव्हापासून त्यांचा मृत्यू होईपर्यंत (२९ एप्रिल १९७७) त्यांनी नागपूर आपली कर्मभूमी बनविली व सर्व आयुष्य कलेला वाहिले.

विनायक मसोजींनी तैलरंग, जलरंग, वॉश, शाई, वुडकट अशा विविध माध्यमात कलाकृती साकारल्या. महात्मा गांधीजींवर आधारित त्यांचे १९२९ सालचे 'मध्यरात्रीची अटक' हे चित्र जगभर गाजले व यानंतरही गांधीजींवर आधारित रेखाचित्र व वुडकट मसोजींनी बनविलीत. वुडकट अर्थात लगुड छेद ही कलाभुवन, शांतिनिकेतनीची देणगी असून या माध्यमावर मसोजींचे विशेष प्रभुत्व होते. गांधीजींवर तयार केलेल्या लगुड छेद पध्दतीच्या मजोजींच्या हातच्या प्रती तर सन १९४२-४५ च्या काळात घरोघरी ठेवण्याचा प्रघात होता. अशाच पध्दतीचे मसोजींचे विनोबाजी भावे यांचे वुडकट ही प्रसिध्द आहे. नागपूर स्थित ऑल सेंट्स कॅथिड्रल मध्ये मसोजींचे येशुचे अंतिम भोजन या विषयावरील एक भव्य तैलचित्र आहे.

मसोजींच्या निसर्गचित्रात बंगाल वॉश शैलीची मृदूता व जपानी ब्रश पध्दती यांचा समन्वय झालेला दिसतो. उदा. खैबरखिंड, कैलास पर्वत, दक्षिण दर्शन व बद्रिनाथ आणि त्रिकूट पर्वत, याव्यतिरिक्त बुध्दाच्या जीवनावर मसोजींची अनेक चित्रे आहेत. त्यांचे भारतभर गाजलेले एक महत्त्वाचे चित्रे म्हणजे राष्ट्रध्वजाचा जन्म. येशूवर अपरंपार श्रध्दा असलेल्या मसोजींची बरीच चित्र देशविदेशात नागपूर, दिल्ली, लंडन, न्यूयॉर्क, टोकियो, पश्चिम जर्मनी, रशिया इत्यादी ठिकाणच्या प्रार्थनामंदिरात आहेत. त्यांची चित्रे भारतातील प्रसिध्द मासिक 'ईलस्ट्रेटेड वीकली ऑफ इंडिया' व विदेशातील 'एन्काऊन्टर' या मासिकांच्या मुखपृष्ठावर छापल्या गेल्या आहेत. राष्ट्रीय ललित कला अकादमी, नवी दिल्ली यांच्या संग्रही मसोजींची अनेक चित्रे आहेत.

शेख याकूब मलक : नागपुरातील ज्येष्ठ प्रतिभाशाली चित्रकारांपैकी एक आदरणीय नाव म्हणजे शेख याकूब भाई मलक यांचे आहे. मलक यांचा जन्म १५ जुलै १८९९ मध्ये नागपूर येथील मेहदीबाग परिसरात झाला. बालपणापासूनच धार्मिक वातावरणात वाढलेल्या मलकनी मुंबईच्या सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट मधून प्रसिध्द चित्रकार रावबहादुर धुरंधर व अहिवासी यांच्या मार्गदर्शनाखाली १९३४ साली कलाशिक्षण पूर्ण केले. तद्नंतर वडिलोपार्जित व्यवसाय सांभाळण्यासाठी मलक नागपूरला आले. कामकाजाचा व्याप सांभाळूनही त्यांनी आपले संबंध आयुष्य कला साधनेला वाहिले. आपले कलाक्षितीज अधिक विस्तीर्ण करण्यासाठी मलक यांनी अजिंठा, वेरूळ, राजस्थानात वानस्थली, तसेच चीन व अन्य आग्नेय देशांना भेट दिली. याबरोबरच मुंबईतील प्रा. देवधर यांचेकडून संगीताचे शिक्षण तर मध्य प्रदेशातील शिल्पकार यावलकर यांचेकडून शिल्पकलेचे मार्गदर्शन घेतले.

मलक बहुगुणी चित्रकार असून तैलरंग, जलरंग, पेस्टल, शाई, चारकोल अशा विविध माध्यमात त्यांनी चित्रे रंगविली. विशिष्ट विषयांपुरतीच आपली कला मर्यादित न ठेवता निसर्गचित्रे, व्यक्तिचित्रे, रचनाचित्रे, स्थिरवस्तु चित्रे, लघुचित्रे, शिल्परचना या सर्वांवर त्यांनी प्राविण्य मिळवले. मलक यांच्या शैलीतही एकसूरीपणा नसून पाश्चिमात्य ॲकेडेमिक शैली, मुगल व रजपुत शैली, बंगालची पुनरुत्थानवादातील 'वॉश' शैली अशा विविध शैलीत ते काम करीत.

अनुक्रमणिका

मुळातच धार्मिक संस्कारांचा पगडा असलेल्या मलकांना ईस्लाम विषयी तर निस्सीम श्रध्दा होतीच पण तेवढाच त्यांना ख्रिस्ती, हिंदू व इतर धर्माबद्दलही अपरंपार आदर होता. विविध धार्मिक ग्रंथांचे मलकांचे वाचन दांडगे असून त्यांच्या कलाकृतीत याचे प्रतिबिंब दिसते. सन १९३४-३५ मध्ये इंग्लंडमध्ये भरविण्यात आलेल्या भारतीय चित्रकार प्रदर्शनात मलकांच्या चित्रांचा समावेश करण्यात आला. सन १९५९ मध्ये स्कॉटलंडच्या नॅशनल बायबल सोसायटीतर्फे आयोजित एडिनबर्ग येथील आंतरराष्ट्रीय कलाप्रदर्शनात मलकांच्या 'येशू ख्रिस्त आपल्या धर्मप्रचारकांसमक्ष येतो' या चित्राकरिता प्रथम पारितोषिकाचा बहुमान प्राप्त झाला. नंतर हे चित्र व त्यांच्या अन्य काही चित्रकृती युरोप व अमेरिकेतील अनेक शहरात प्रदर्शित करण्यात आले. अमेरिकेत या चित्रांचे युनायटेड प्रेस बायटेरियन चर्चच्या सौजन्याने चित्रीकरण करण्यात आले असून रेकॉर्डच्या स्वरूपात चित्रांचे समालोचन ध्वनिमुद्रित करण्यात आले. प्रोफेसर लेहमॅन या जर्मन प्राध्यापकाने "ख्रिश्चन आर्ट इन एशिया अँड आफ्रिका" या ग्रंथात मलकांच्या चित्रांना समाविष्ट केले आहे.

मलक यांच्या चित्रसंपदेतील उल्लेखनीय चित्रांपैकी महात्मा गांधीची स्वाक्षरी असलेली दोन चित्रे आहेत. त्यापैकी एक भव्य तैलचित्र असून त्यात गांधीजींच्या आदर्श जीवनशैलीचे प्रतीकात्मक दर्शन आहे. दुसरे कोळश्याने काढलेले गांधीजींचे व्यक्तिचित्र आहे. निसर्गचित्रण या विषयावर मलकांचे विशेष प्रभुत्व असून जलरंग माध्यमातील, एलिफंटा लेणी, नागपूरचा रमणीय मेहदीबाग परिसर, उमरेड, बीना, छिंदवाडा स्थित मलक कोठी, लखनऊ, देवप्रयाग इत्यादी अनेक ठिकाणची निसर्गचित्रे उल्लेखनीय आहेत.

हैद्राबादचे विख्यात सालारंजग म्युझियम, नागपूरचे मध्यवर्ती संग्रहालय, तसेच भारतात व विदेशात अनेक संग्रही याकूबभाई मलकांची चित्रे आहेत. नागपूर शहरात त्यांच्या कलाकृतींचे एक भव्य प्रदर्शनाचे आयोजन सन १९७८ मध्ये नागपूर विद्यापीठाच्या बूटी सभागृहात करण्यात आले होते.

नागपूर शहरात सन १९५० पासून कलेच्या क्षेत्रात अनेक ज्येष्ठ चित्रकारांचे मोलाचे योगदान राहीले आहे. व्यक्तिचित्रण, निसर्गचित्रण, रचनाचित्रे, रेखाचित्रे अशा विविध क्षेत्रात आपला ठसा उमटवणारे अनेक कलावंत शहरात आजही कलासाधना करीत आहेत.

ना. ब. डिखोळे : नागपुरातील ज्येष्ठ चित्रकार व कलाशिक्षक म्हणून नामांकित असलेल्या डिखोळे यांचा जन्म यावली येथे सन १९२३ मध्ये झाला. सन १९४१ मध्ये त्यांनी बापूसाहेब आठवलेंच्या नागपूर स्कूल ऑफ आर्ट या संस्थेत प्रवेश घेतला. बापूसाहेबांव्यतिरिक्त त्यांचे बंधू वसंतराव यांचे मार्गदर्शन व रझा, गाडे, बी. प्रभा इत्यादी विद्यार्थ्यांसह शिक्षण घेण्याची संधी डिखोळे यांना मिळाली. तेथून डी.टी.सी. परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर डिखोळे यांनी कृषी शाखेतील एन्टॉमोलॉजिकल विभागात व पुढे पुणे सेवासदन द्वारा संचलित नागपूर येथील कन्या शाळेत नोकरी केली. नागपुरात सन १९४७ मध्ये अनंत गोपाळ शेवडे, शंकर बालाजी शास्त्री आणि पतीतपावन राजाराम देशपांडे यांच्या प्रोत्साहनामुळे "डिखोळे आर्ट क्सासेस" चा प्रारंभ झाला. याच दरम्यान इंदूरचे सुप्रसिध्द चित्रकार डी. डी. देवळालीकर शिवराज लिथो प्रेसच्या कामानिमित्त नागपूरला आले असताना डिखोळेंना त्यांचेकडून प्रेरणा मिळाली व डिखोळे व त्यांची पत्नी त्रिवेणी हे उभयता

सन १९५१ मध्ये कलेचे उच्चशिक्षण घ्यावयास मुंबईच्या सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट मध्ये दाखल झाले. तेथे हळदणकर, अहिवासी, पळशीकर इत्यादी गुरुंचे मार्गदर्शन लाभल्यामुळे डिखोळेंची कला अधिक समृध्द झाली.

नागपूरला परत आल्यावर डिखोळेंनी सीताबर्डी येथे नव्यानेच उभारण्यात आलेल्या पंचशील बिल्डिंगमध्ये सन १९५६ मध्ये कलावर्गाचे स्थलांतर केले. हे वर्ग अत्यंत लोकप्रिय झाले व सन १९६३ मध्ये महाराष्ट्र कला विद्यालय या नावाने संस्थेची नोंदणी करण्यात आली. नागपुरातील सुतारिया, डागा, धनवटे, बलराज, माहेश्वरी इत्यादी प्रतिष्ठित परिवारांच्या तसेच डॉ. कोलवडकर, विलास काळे या मान्यवरांच्या कृपाछत्रामुळे महाराष्ट्र कला विद्यालय दिवसेंदिवस अधिक बहरले. या विद्यालयातून ड्रॉईंगच्या ग्रेड परीक्षा व तसेच हौशी कलावंतासाठी वर्ग चालविले जात असून पुढे सुतारियाच्या सौजन्याने रामनगर कलाकुंज येथेही विद्यालयाची शाखा उघडण्यात आली. सन १९७८ पासून विद्यालयांनी राष्ट्रीय कला मेळा, नवी दिल्ली या वार्षिक कला सोहळयात सातत्याने सहभाग घ्यावयास प्रारंभ केला. डिखोळेंचे मार्गदर्शन लाभलेल्या चित्रकारांपैकी ज्येष्ठ चित्रकार भैय्याजी गोस्वामी व शकुंतला सातपुते हे महत्त्वाचे आहेत.

कलेचे शिक्षण प्रदान करण्याबरोबरच डिखोळे यांचा व्यक्तिगत कलाप्रवासही अविरत सुरू राहिला. तैलरंग व जलरंग या दोन्ही माध्यमांवर त्यांचे प्रभुत्व असून व्यक्तिचित्रण, निसर्गचित्रण, रचनाचित्रे, रेखांकने हे विविध विषय त्यांनी समर्थपणे हाताळले आहेत. नागपूरला त्यांची सर्वात मोलाची देणगी म्हणजे त्यांची निसर्गचित्रे होत. अनेक प्रेक्षणीय स्थळांची जलरंग व तैलरंग दोन्ही माध्यमातील वेधक निसर्गचित्रे आहेत. वास्तूकलेत विशेष अभिरूची असलेल्या डिखोळे यांच्या निसर्गचित्रात लेणी, मंदिरे, किल्ले इत्यादी वास्तूविशेषांना प्राधान्य दिले असून यथार्थ व प्रकाश-छाया भेदाचा अभ्यास या चित्रातील वैशिष्ट्ये आहेत. जैसलमेरचा किल्ला, कैलास मंदिर, वेरूळ व अजिंठा लेणी ही पुरातनकालीन वास्तूंवर आधारित त्यांची चित्रे गाजलेली आहेत. हैद्राबाद येथील ४१ व्या अखिल भारतीय कला प्रदर्शनीच्या पारितोषिकाचे ते मानकरी आहेत. 'रीडर्स डायजेस्ट' या इंग्रजी मासिकाच्या मुखपृष्ठावर त्यांचे निसर्गाचित्र प्रसिध्द झाले आहे. सन १९५० पासून नागपूर शहरात भरलेल्या सर्व महत्त्वपूर्ण प्रदर्शनांमध्ये त्यांचा सहभाग राहिला आहे. विदर्भ आर्ट सोसायटीचे सचिव या भूमिकेतून कलाक्षेत्रात त्यांचे महत्त्वाचे योगदान आहे.

भैय्याजी गोस्वामी : नागपूरनजीक कोदेगाव येथे २४ फेब्रुवारी १९२८ रोजी भैय्याजी गोस्वामी यांचा जन्म एका शेतकरी कुटुंबात झाला. बालपणापासूनच चित्रकलेत अभिरुची असलेल्या भैय्याजींनी वयाच्या चौदाव्या वर्षी सन १९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनात सहभाग घेतला. नागपूर स्कूल ऑफ आर्टचे बापूसाहेब आठवले व महाराष्ट्र कला विद्यालयाचे ना. ब. डिखोळे यांच्याकडे भैय्याजींनी दोन वर्षे कलाशिक्षण घेतले व पुढील कलासाधना स्वतंत्रपणे सुरू केली. मुंबईच्या सुप्रसिध्द प्रोग्रेसिव्ह आर्टिस्टस् ग्रुपचे रझा, आरा, गाडे या चित्रकारांशी भैय्याजींचा संबंध आल्यामुळे तत्कालीन कलाप्रवाहांचा, विशेषत: पाश्चात्य कलावादांचा प्रभाव भैय्याजींच्या शैलीवर पडला.

नागपूर जिल्ह्यातील सावनेर तालुक्यात असलेल्या कोदेगाव या गावालाच भैय्याजींनी आपली कर्मभूमी केली. त्यांची अनेक कलाप्रदर्शने झाली असून मुंबईच्या जहांगीर आर्ट गॅलरी व ताज आर्ट तसेच नागपूरच्या विदर्भ साहित्य संघ दालनात त्यांची प्रदर्शने भरली आहेत. खापा येथील साहित्यसंमेलनाचे ते प्रदर्शन प्रमुख होते. सन १९७६ च्या खापा साहित्य संमेलनात कलारसिकांकडून भैय्याजी गोस्वामींना 'चित्राचार्य' या सन्मानाने गौरविण्यात आले. सन १९६२ च्या बॉम्बे आर्ट सोसायटीच्या वार्षिक कलाप्रदर्शनात भैय्याजींच्या चित्राला रौप्यपदक व पुरस्कार प्रदान करण्यात आले. सन १९८९ मध्ये नागपूर येथे महाराष्ट्र शासनातर्फे भैय्याजी गोस्वामींचा सत्कार करण्यात आला.

भैय्याजी गोस्वामींच्या चित्रात ग्रामीण जीवनाचा पगडा असणे स्वाभाविकच आहे. धार्मिक व पारंपरिक विषय, खेड्यापाड्यातील जीवन व चालिरीती, निसर्ग, पशुपक्षी, झोपड्या या विषयांना प्राधान्य दिसते. शिव, गणेश, ब्रम्हांड,सागर, त्रिशूळ, अवकाश अशा भिन्न विषयांवरचे प्रतीकात्मक चित्रण त्यांच्या कलाकृतीत दिसते.

विविध माध्यमात चित्रण करण्यात भैय्याजींचे तैलरंगात विशेष प्रभुत्व दिसते. त्यांच्या चित्रातील सर्वांत प्रमुख घटक म्हणजे रंग होय. मोजक्याच रेषांचा वापर असलेल्या त्यांच्या चित्रात भैय्याजी रंगलेपन व पोतनिर्मिती यावर विशेष भर देत असून जाड थरांचे रंगलेपन हे त्यांच्या चित्रातील वैशिष्ट्य आहे. 'दिंडी', 'खेडे', 'स्पेस नं. १', 'स्पेस नं. २', 'निवारा' ही त्यांची गाजलेली चित्रे होत, तसेच भैय्याजींनी साकारलेले विश्वविख्यात चित्रकार रइ ाा यांचे सन १९८८ चे एक व्यक्तिचित्रही उल्लेखनीय आहे.

डॉ. भानजीभाई पाटणकर : नागपूरचे एक ज्येष्ठ चित्रकार भानजीभाई पाटणकर यांचा जन्म मोवाड येथे झाला. शालेय शिक्षण पांढुरणा व नागपूर येथे झाले. शालेय शिक्षणाच्या काळातच नागपूरनजीक रामटेक परिसरात फिरताना त्यांनी निसर्गचित्रे रंगविणे प्रारंभ केले. पुढे पाटणकरांनी बापूसाहेब आठवलेंच्या संस्थेत प्रवेश घेतला व तिथे असताना कलाशिक्षक नगरकर यांच्या मार्गदर्शनामुळे त्यांच्यात बाह्य स्थळांची निसर्गचित्रे रंगविण्यामध्ये अभिरूची निर्माण झाली. प्रत्येक रविवारी निसर्गचित्रण करण्याचा त्यांनी श्रीगणेशा याच वेळेस केला असून तेव्हापासून आजतागायत गेली पन्नास वर्षे त्यांनी निरंतर रविवारचा वेळ निसर्गचित्रणाला दिला आहे.

आठवलेंकडे कलाशिक्षण पूर्ण केल्यानंतर काही वर्षे पाटणकरांनी नागपूरच्या एस. एफ. एस. शाळेत शिक्षक म्हणून कार्य केले व त्या काळात अनेक शालेय विद्यार्थ्यांना निसर्गचित्रणाची गोडी लावली. पुढे अनेक वर्षे 'तरुण भारत', 'नवभारत' इत्यादी वृत्तपत्रांशी ते संबंधित असून बाळासाहेब देवरस, ग. त्र्यं. माडखोलकर, एस. बी. देव, जस्टिस नियोगी इत्यादी विविध क्षेत्रातील मान्यवरांपासून त्यांनी प्रेरणा घेतली आहे. नागपुरात त्यांच्या पहिल्या निसर्गचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन मिराशी यांच्या हस्ते इ ाले असून पाटणकर यांना 'एकात्मता' विषयावरील प्रतीकात्मक चित्राकरिता पंडित नेहरुंच्या हस्ते पुरस्कारही प्राप्त झाला आहे.

भाऊ समर्थ : नागपुरातील कलाविश्वात व सांस्कृतिक प्रांतात भाऊ समर्थ यांचे स्वत:चे असे वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. भंडारा जिल्ह्यातील लाखानी या गावी सन १९२८ मध्ये

भाऊंचा जन्म झाला. त्यांनी सन १९५६ मध्ये मुंबई च्या सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट येथील जी. डी. आर्ट ही पदविका पूर्ण केली व त्यानंतर नागपूरला येऊन कलेला आपले जीवन वाहिले.

भाऊ समर्थ प्रयोगशील चित्रकार होते. आशय अथवा माध्यमाविषयी त्यांचा आग्रह नव्हता, तसेच कुठल्याही तंत्रात ते गुरफटलेले नव्हते. परंतु उद्देश व नाविन्याविषयी मात्र ते जागरुक होते. जलरंग, तैलरंग, पेस्टल तसेच रद्दी, कागद, चुना, लाकूड, टरफले या संमिश्र सामग्रीचा वापर करून भाऊ कलाकृती निर्माण करीत. व्यक्तिचित्रण, निसर्गचित्रण, स्थिरवस्तुचित्रण, 'न्यूड' अर्थात नग्नाकृती चित्रण या भिन्न विषयांना त्यांनी हाताळले असून भाऊंची चित्रे आकृतीप्रधान व अमूर्त दोन्ही शैलीत आहेत. भाऊंच्या मतानुसार रंग हे त्यांचे माध्यम असून रंगाचे माध्यम बोलके करणे हे त्यांचे ध्येय होते. सन १९६८ मध्ये नागपुरात आलेल्या मिल्ड्रेड चेनिंग्स उर्फ मिस्सी व भाऊ समर्थ या दोघांच्या संयुक्त रंगाविष्कार असलेले नागपूरच्या मध्यवर्ती संग्रहालयात भरविलेले प्रदर्शन अत्यंत गाजले. युगवाणी या नागपुरातील विदर्भ साहित्य संघाच्या वाङ्मयीन मुखपत्राशी भाऊंचे अभिन्न नाते असून यातील अनेक अंकांसाठी भाऊंनी रेखाटने केलीत. या ज्येष्ठ चित्रकाराचे निधन सन १९९१ मध्ये झाले.

मधुकर पारळकर : पारळकर यांचा जन्म सन १९२९ मध्ये नागपूर येथे झाला. त्यांचे कलाशिक्षण नागपूरच्या ज्येष्ठ चित्रकार जी. के. जोशीराव यांच्या मार्गदर्शनखाली सन १९५२ मध्ये पूर्ण झाले. यांनी आपल्या कलाजीवनाची सुरूवात छायाचित्रण क्षेत्रात केली व सातत्याने कलानिर्मितीकडेही लक्ष दिले. मुंबईच्या जहांगीर आर्ट गॅलरी तसेच नागपूरच्या कलाविधीमध्ये त्यांची कलाप्रदर्शने झाली असून नवी दिल्लीच्या राष्ट्रीय कला मेळ्यातही सहभाग राहिला आहे. महाराष्ट्र व मध्य प्रदेश शासनाने त्यांना राज्य पुरस्काराने गौरविले आहे. पारळकर ह्यांची चित्रे राष्ट्रीय आधुनिक कला संग्रहालय, नवी दिल्ली, मध्यवर्ती संग्रहालय, नागपूर व खासगी संग्रही आहेत. नागपूर महानगर- पालिकेतर्फे पारळकरांना कलाक्षेत्रातील त्यांच्या योगदानाप्रित्यर्थ सुवर्णपदकाने सन्मानित केले आहे. पारळकरांच्या कलाकृतींपैकी 'लावण्य', स्ट्रीट सिंगर, उभारणी ही रचनाचित्रे तसेच पंडित नेहरु व लेनिनचे व्यक्तिचित्र प्रसिध्द आहे.

शकुंतला सातपुते : नागपुरातील ज्येष्ठ चित्रकारांमध्ये एक महत्त्वपूर्ण नाव शकुंतला सातपुते यांचे आहे. यांनी कलेचे शिक्षण ना. ब. डिखोळे यांच्या डिखोळे आर्ट इन्स्टिट्यूट या संस्थेत घेतले. डिखोळे व्यतिरिक्त त्यांना श्रीकृष्ण साऊरकर यांचे रचनाचित्र या विषयाला मार्गदर्शन लाभले. निसर्गचित्रे व रचनाचित्रे या दोन्हींचे रितसर शिक्षण घेतलेल्या सातपुते यांच्या कलाकृतीपैकी नागपूर विद्यापीठ सुवर्ण महोत्सवानिमित्त रंगविलेले राजा शिवाजीच्या जीवनावरील चित्र उल्लेखनीय आहे.

सर्वश्री आठवले, मसोजी व मलक या त्रिकुटांच्या नंतरच्या पिढीने कलाप्रांतात सतत कलानिर्मितीत जीवन वाहून दिल्याची अनेक उदाहरणे आहेत. वरील उल्लेखलेल्या चित्रकारांव्यतिरिक्त अनेक व्यक्तींचे या क्षेत्रातील योगदान वाखाणण्याजोगे आहे. शरच्चंद्र बोक्षे हे त्यापैकी एक प्रमुख नाव आहे. रजपुत शैलीत साकारलेली त्यांची चित्रे लक्षणीय

असून भारतीय संस्कृती व साहित्य सामाजिक व राजकीय घटना अशा विषयांना त्यांनी चित्ररुप दिले. गौतमबुध्दाच्या राजत्याग, झाशीची राणी लक्ष्मीबाई, अमर भुपाळी व गांधीजींच्या जीवनावरील चित्रे लक्षणीय आहेत.

बोक्षेंच्या समकालीन नागपूर शहराच्या चित्रकारांपैकी अरुण मोरघडे हे नाव सर्वपरिचित आहे. १९६० च्या दशकातील विदर्भ कलाकार संघाचे मोरघडे अध्यक्ष या पदावर कार्यरत असून कला प्रदर्शने, प्रात्यक्षिके या माध्यमांतून मोरघडेंचे महत्त्वाचे योगदान राहिले आहे. त्यांची शैली आकृतिप्रधान असून चित्रातील विषयात भारतीय जनजीवन विशेषत: ग्रामीण व आदिवासींचे जीवन यास मध्यवर्ती स्थान आहे. त्यांची 'एक हाट बस्तर' गाजलेली चित्रप्रदर्शनी होय. 'रंगधून' या कलावंत गटाच्या माध्यमाने ते आजही कलाक्षेत्रात मोलाची कामगिरी करीत आहेत.

नागपूर नगरीत कलेच्या प्रांतातील आणखी एक महत्त्वाचे नाव विजय काकडे ह्यांचे आहे. मानसशास्त्र या विषयावरील उच्च शिक्षण ग्रहण केलेल्या काकडे ह्यांच्या कलाकृतींपैकी ग्रामीण जीवनापासून प्रेरित कॅनव्हॉसवरील तैलचित्रे तसेच 'बाटिक' या माध्यमातील वस्त्रावरील कलाकृती लक्षणीय आहेत. काकडे ह्यांनी रेखांकनावर विशेष प्राविण्य मिळविले असून नागपुरातील वृत्तपत्रे, नियतकालिके तसेच विभिन्न ग्रंथाकरिता त्यांनी सुयोग्य रेखाटने व मुखपृष्ठे केली आहेत.

डी. के. मनोहर : हे या क्षेत्रातील आणखी एक नावाजलेले चित्रकार आहेत. त्यांच्या शैलीचे वैशिष्ट्य 'कोलाज' अर्थात चिक्कणित चित्रण हे माध्यम असून 'आकल्प' या नावाने त्यांच्या कलाकृती प्रसिध्द आहेत. नागपूर नगरीत काही व्यक्तींनी चित्रकार व कलाशिक्षक या दुहेरी भूमिकेत मौलिक कार्य केले आहे. महाविद्यालयीन पातळीवर कलेच्या विद्यार्थ्यांना मागदर्शन करण्याबरोबरच त्यांचा व्यक्तिगत कलाप्रवासही सुरू राहिला व कलाक्षेत्रातील समकालीन घडामोडींशी ज्यांनी संबंध ठेवला अशापैकी एक महत्त्वाचे नाव प्रा. वसंत देहाडराय यांचे आहे. चित्रकला महाविद्यालय या संस्थेत ज्येष्ठ प्राध्यापक व रंगकला विभाग प्रमुख म्हणून देहाडराय यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. देहाडराय यांच्या कलाकृतीत निसर्गचित्रे व रचनाचित्रे यांचा प्रामुख्याने समावेश आहे. तैलरंग व जलरंग माध्यमातील जयपूर, माऊंट आबू, बनारस इत्यादी स्थळांची त्यांची निसर्गचित्रे लक्षणीय आहेत. पाश्चिमात्य आधुनिक कलावादांचा त्यांच्यावर पगडा असून अमूर्त शैलीतील रचनाचित्रे बहुसंख्येने रंगविलेली दिसतात.

प्रा. जी. के. देशपांडे : हे कलाक्षेत्रातील महत्त्वपूर्ण नाव आहे. सन १९२५ मध्ये अमरावती येथे जन्म झालेल्या प्रा. देशपांडे यांचे उपयोजित कला शाखेचे शिक्षण सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट मुंबई येथून सन १९४७ मध्ये झाले. याच शाखेतील उच्च शिक्षण त्यांनी सन १९६० मध्ये अमेरिकेत लॉस एन्जेल्स येथून घेतले. त्यांच्या कलाजीवनाची सुरूवात नागपूर येथे प्रा. जी. के. जोशीरावांच्या कलाविभागात झाली. त्यांच्या भित्तीचित्रा (पोस्टर) ला 'ऑल इंडिया आर्ट' इन इंडस्ट्री या कलाप्रदर्शनात सन १९४५ व १९४६ असे मुंबई व कलकत्ता येथे अनुक्रमे दोन पुरस्कार प्राप्त झाले. सन १९६१ च्या महाराष्ट्र राज्य कलाप्रदर्शनात प्रा. देशपांडे प्रथम पुरस्कार व ताम्रपटाचे मानकरी ठरले.

नागपूर शहरातील ज्येष्ठ चित्रकारांपैकी प्रा. पी. एन. पेंढारकर हे नाव महत्त्वाचे आहे. पेंढारकर यांच्या शैलीचा विशेष म्हणजे जलरंगावरचे प्रभुत्व लक्षणीय आहेत.

श्रीकृष्ण साऊरकर : नागपूर मधील महत्त्वाचे चित्रकार आहेत. त्यांचा जन्म सन १९३७ मध्ये नागपूर येथे झाला. एक उत्कृष्ट रेखाटनकार व रचनाकार म्हणून साऊरकर यांची ख्याती असून पारंपारिक अलंकारप्रधान शैलीपासून प्रेरित साकारलेली त्यांची रचनाचित्रे लक्षणीय आहेत. म्यूरल (भित्तीचित्र) या क्षेत्रातही साऊरकरांचे विशेष योगदान आहे.

धनंजय वर्मा : हे नागपुरातील कलाजगताला परिचित असे एक नाव आहे. धनंजय वर्मा यांनी एक उत्कृष्ट व्यक्तिचित्रणकार म्हणून नागपुरातच नव्हे तर राष्ट्रीय कीर्ती प्राप्त केली आहे. सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट च्या पाश्चात्य ॲकेडेमिक शैलीची कलामूल्ये जतन करूनही वर्मा यांनी सुलभ ठसठशीत आकार व आल्हाददायक रंगछटा असलेली स्वत:ची शैली विकसित केली आहे. वर्मा यांच्या कलाकृतीपैकी मुंबईच्या नवीन विधानभवन येथील व्यक्तिचित्रे, नागपूर विद्यापीठातील कुलगुरुंची व्यक्तीचित्रे व शहरातील अनेक मान्यवरांची व्यक्तिचित्रे महत्त्वाची आहेत. त्यांचे महाराष्ट्र राज्य द्वारा पुरस्कृत एका आफ्रिकन युवतीचे व्यक्तिचित्र विशेष उल्लेखनीय आहे.

अरविंद मोरे : नागपुरातील चित्रकारांमध्ये अरविंद मोरे यांचा समावेश आहे. मोरे यांचा जन्म सन १९४८ मध्ये विदर्भात झाला असून कलेचे शिक्षण सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट मुंबई येथून पूर्ण झाले. व्यक्तिचित्रण, रचनाचित्र व निसर्गचित्र या तिन्ही शाखांमध्ये त्यांचे प्राविण्य आहे. मुंबई, हैद्राबाद, नागपूर, ग्वालिअर, गुलबर्गा, रायपूर अशा अनेक प्रदर्शनातून त्यांचा सहभाग राहिला.

प्रकाश कावळे : नागपुरातील प्रमुख चित्रकारांपैकी प्रकाश कावळे हे सर्वपरिचित आहेत. सन १९२८ मध्ये चंद्रपूर येथे जन्म झाला. शहरातील ज्येष्ठ ग्राफिक डिझायनर व निसर्गचित्रकार म्हणून कावळे यांची ख्याती असून नागपूर येथे अमूर्त चित्रांचे प्रदर्शन, बडोदा चित्रप्रदर्शन, औरंगाबाद येथे छायाचित्रण प्रदर्शन व नागपूरला निसर्गचित्रांचे प्रदर्शन अशी अनेक एकल प्रदर्शने त्यांनी भरविली आहेत. तसेच 'ग्रुप ८५' या कलागटाचे ते सभासद.

प्रमोद बापू रामटेके : चित्रकारांमध्ये प्रमोद बाबू रामटेके यांना महत्त्वाचे स्थान आहे. रामटेके यांचा जन्म सन १९४४ मध्ये नागपूर येथे झाला. रचनाचित्र व व्यक्तिचित्रण दोन्ही शाखात रामटेके यांचे प्रभुत्व आहे. आकृतिमूल्य व अमूर्त शैलीतील त्यांच्या चित्रात पोतनिर्मितीकडे विशेष लक्ष पुरविलेले दिसते.

अरुण मेंदुले : अरुण मेंदुले हे १९७० च्या दशकातील नागपूरच्या कलाक्षेत्रातील सर्वपरिचित नाव होय. नागपूर येथे सन १९४२ मध्ये जन्म. मेंदुले हे श्रेष्ठ रचनाकार, रेखाटनकार व ग्राफिक चित्रकार म्हणून प्रसिध्द असून सशक्त रेखाटन सामर्थ्य व अर्थपूर्ण आकृतिबंधांचा आविष्कार त्यांच्या चित्रशैलीचे वैशिष्ट्य आहे.

चित्रकलेच्या क्षेत्रात योगदान देणाऱ्यापैकी जलरंग व तैलरंग माध्यमावर प्रभुत्व असलेल्या

करंजकरांची शैली आकृतीप्रधान असून भारतीय संस्कृति व पारंपरिक कला त्यांचे प्रेरणास्त्रोत आहे.

१९८० च्या दशकात व त्यानंतर नागपूर नगरीतील तरुण चित्रकार पिढीने येथील कलाक्षेत्रात बऱ्याच अंशात कायापालट केल्याचे दिसते. शहरापुरती आपली कला मर्यादित न ठेवता भिन्न भिन्न क्षेत्रात नागपूरच्या बाहेरही त्यांनी आपले कार्यक्षेत्र विस्तारित केल्याचे दिसते. हे चित्रकार अधिकतम शासकीय चित्रकला महाविद्यालय, नागपूर येथील विद्यार्थी आहेत.

प्रभाकर पाटील : आजच्या पिढीतील चित्रकारांमध्ये नागपूरचे युवा चित्रकार प्रभाकर पाटील यांना महत्त्वाचे स्थान आहे. सन १९५५ मध्ये दर्यापूर येथे जन्म. प्रारंभिक काळात आसमंत, डोंगर, दऱ्या, सरोवर, वृक्ष इत्यादी निसर्गघटकांवर आधारित त्यांच्या रचना स्वप्नमय वाटतात. तद्नंतर जुन्या काळातील वाडे, जीर्ण झालेले दरवाजे, तुळशीवृंदावन व इतर पारंपरिक प्रतीकांवर त्यांनी वेधक चित्रे साकारलीत. परंपरागत व आधुनिक यांचा सहजसुंदर मेळ पाटील यांच्या शैलीचे विशेष आहे. नागपुरात तरुण चित्रकारांना प्रेरणा देऊन त्यांना महानगरातून व्यासपीठ मिळवून देण्यात पाटील ह्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. नागपुरातील चित्रकारांमध्ये दिपक जोशी, हरिहर पेंदे, रघू नेवरे, पुंडलिक देशमुख तर युवा पिढीतील स्त्री चित्रकारांपैकी प्रतिमा सिन्हा, प्रज्ञा बेसेकर, मनिषा पाटील या चित्रकर्ती प्रमुख आहेत. या व्यतिरिक्त नागपुरातील मनोहर आकरे, उमेश पवनकर, प्रकाश पाटील, रवींद्र सावरकर, गुणवंत देवघरे, धनंजय पाठक, जयंत मैराळ, सुधीर तलमले, बबन बेसेकर इत्यादींनी कलेच्या क्षेत्रात स्वत:चे स्थान प्राप्त केले असून १९९० च्या दशकातील युवा चित्रकारांपैकी गोपाल बेतावार, यशवंत पाध्ये, श्रीकांत गडकरी, विजय जैस्वाल, बीरबल चंद्रपाल, श्रीमती भक्ती पणीकर प्रमुख आहेत.

नागपूर शहरातील शिल्पकला

नागपुरात शिल्पकलेचा प्रथम परिचय होतो तो शहरातील चितार ओळ या भागातील शिल्पकार बाबूराव इंगळे, माधवराव इंगळे, मूलचंद गौर, भैय्याजी सूर्यवंशी, माधवराव बिंड इत्यादीपासून. या कुटुंबीयांचा प्रमुख व्यवसाय मूर्तीकाराचा असून गणेशमूर्ती, देवीच्या प्रतिमा, महालक्ष्मीचे व राक्षसांचे मुखवटे इत्यादी पारंपरिक मृण्मयमूर्ती तयार करणे हा होता. नागपूरच्या रघुजी राजे भोसले घराण्याचा या मंडळींना भक्कम आश्रय होता. शहरातील स्वातंत्र्योत्तर काळातील महात्मा गांधी, पंडित नेहरु, सुभाषचंद्र बोस, भारतमाता इत्यादी सिमेंट शिल्प या मूर्तीकारांच्या हस्तेच साकारलेली आहेत. मूलचंद गौर यांची विदर्भ चंडिका-महिषासुरमर्दिनी व लहान बालकाचा नग्न पुतळा सर्वपरिचित आहेत.

हिराचंद विकमसी : १९७० च्या दशकात शिल्पकलेचे शास्त्रोक्त शिक्षण घेवून या क्षेत्रात कार्य करणाऱ्यांपैकी शिल्पकार हिराचंद विकमसी प्रमुख आहेत. विकमसी यांचा जन्म खामगाव येथे झाला असून त्यांचे कला शिक्षण विदर्भातील विख्यात शिल्पकार पंधे गुरुजी यांच्या खामगावस्थित राष्ट्रीय विद्यालयात झाले. नागपुरातील आपल्या व्यावसायिक कलाजीवनातील त्यांचे पहिले शिल्प म्हणजे मातृसेवा संघ नागपूर येथील 'मातृदेवता' नावाचे आई व मूल विषयावरील शिल्प होय. याच स्थळी विकमसींनी साकारलेले मातृसेवा संघाच्या

संचालक व समाजसेविका कमलताई होस्पेट यांचे एक सजीव धातूशिल्प आहे. नागपुरात अनेक ठिकाणी विकमसींची भव्य शिल्पे असून त्यापैकी अग्रसेन महाराज, सरदार पटेल, बॅरिस्टर शेषराव वानखेडे, डॉ. राजेंद्र प्रसाद महत्त्वाचे आहेत. तसेच बाबासाहेब कन्नमवार, कवि निराला, पंजाबराव देशमुख, बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यसेनानी झुरे ह्यांच्या अर्धपुतळ्यात विकमसींनी प्रत्येकाच्या व्यक्तिमत्वातील सूक्ष्म छटांना योग्य प्रकारे साकारले आहे. विकमसींनी साकारलेल्या सातशे किलो वजनाचा व सात फूट उंच कृष्ण वल्लभाचार्य स्वामीनारायण या भरीव धातूशिल्पाची प्रतिष्ठापना गुजराथमध्ये राजकोट येथे करण्यात आली आहे पवनार आश्रम वर्धा येथील विनोबा भावे यांचे भव्य अंतिम स्मारक हे धातूशिल्प व प्लॅस्टर माध्यमातील गोळवलकर गुरुजी, हेडगेवार व स्वामी विवेकानंद या प्रभूतींचे उत्थित शिल्प लक्षणीय आहेत. सन १९९८ सालच्या महत्त्वाच्या कलाकृतींपैकी इंदूर येथील भारतीय वेशभूषेतील स्वातंत्र्यवीर भगतसिंगचे शिल्प उल्लेखनीय आहे. प्रामुख्याने पाश्चिमात्य ॲकेडेमिक पठडीत काम करणाऱ्या विकमसींनी वास्तवपूर्ण शैलीव्यतिरिक्त पाश्चिमात्य आधुनिक कलावादांपासून प्रेरणा घेवून काही शिल्परचना केल्या, त्यापैकी प्लॅस्टर माध्यमातील युगुल व संगीत विषयावरील मालिका आहेत. विकमसींच्या जीवनातील महत्त्वाच्या कलाकृतींपैकी मुंबई येथील रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया येथे साकारलेल्या ३० फूट x १० फूट आकाराच्या म्यूरल (भित्तीचित्र) यात त्यांचा सहयोग असून हे म्यूरल सिरॅमिक माध्यमातले आहे. तसेच राष्ट्रीय विद्यालय खामगाव तर्फे सरदार वल्लभभाई पटेल यांची ८० ब्रा माध्यमातील व्यक्तिशिल्प, गुजराथमधील खेडा जिल्ह्यातील गावोगावी बसविण्यासाठी निर्माण करण्यात आली त्यात विकमसी व शिल्पकार सुधाकर अजबे यांचे मौलिक योगदान राहिले.

श्रीराम इंगळे : नागपुरातील ज्येष्ठ शिल्पकार श्रीराम इंगळे हे विदर्भातील नामांकित शिल्पकारांपैकी आहेत. श्रीराम इंगळे यांचा जन्म २० ऑक्टोबर १९३१ मध्ये खामगाव येथे झाला असून त्यांनी शिल्पकलेचे शिक्षण पंधेगुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय विद्यालय, खामगाव येथे पूर्ण केले. आपल्या गुरुंकडून वास्तववादी शैलीचा वारसा लाभलेल्या इंगळे यांनी स्वामी विवेकानंद, शिवछत्रपती, महात्मा गांधी, कमलताई होस्पेट अशा अनेक मान्यवरांची शिल्पे साकारली आहेत. त्यांच्या महत्त्वाच्या कला प्रदर्शनांपैकी सन १९६९ मध्ये भरविलेले भोपाळ येथील शिल्पप्रदर्शन व धीरन कन्या विद्यालय, नागपूर येथील प्रदर्शने आहेत. बॉंबे आर्ट सोसायटी, मुंबई येथील वार्षिक कलाप्रदर्शनात इंगळे यांचा सहभाग असून १९५७ साली येथील प्रदर्शनात इंगळे यांच्या लोकनृत्य या शिल्पकृतीस प्रथम पारितोषिक प्राप्त झाले.

सुधाकर बेलेकर : नागपुरातील ज्येष्ठ शिल्पकारांमध्ये सुधाकर बेलेकर यांना महत्त्वपूर्ण स्थान आहे. बेलेकर प्रतिभाशाली शिल्पकार असून या व्यतिरिक्त चित्रकला व मुद्रणकला यातही त्यांना अभिरुची आहे. ब्रॉंझ, लाकूड, दगड इत्यादी माध्यमात वास्तवपूर्ण ॲकेडेमिक शैलीत तसेच आधुनिक कलावादांपासून प्रेरणा घेवून त्यांनी काम केले असून त्यांच्या पुतळ्यांपैकी वीर सावरकर यांचा पुतळा व बाबू आवळे यांचे व्यक्तिशिल्प महत्त्वाची आहेत. बेलेकर यांचेवर सुसान लॅंगर, क्लाईव बेल या पाश्चिमात्य सौंदर्शशास्त्रांचा तसेच भारतीय विचारवंत मर्ढेकर यांचा सखोल प्रभाव आहे.

बाराव्या महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शनात प्रथम पुरस्कार, सन १९६८, १९७० व १९७१

या वर्षात गुजरात राज्यकला प्रदर्शनातील पारितोषिके त्यांना मिळाली आहेत.

मोहन घिसाड : नागपूर निवासी मोहन घिसाड यांनी शिवाजी, महात्मा गांधी इत्यादी प्रभूतींची व्यक्तिशिल्प, तसेच चित्रकार हळदणकर व एम. एफ हुसेन, उद्योगपती आरदशेर गोदरेज, इंग्लिश युवतीचे शिर्ष ही व्यक्तिशिल्पे प्रसिध्द आहेत. घिसाडांच्या शैलीचे वैशिष्ट्य म्हणजे मोबाईल अर्थात तरंगती शिल्परचना असून विविध सुलभ आकारात ॲल्युमिनियम पत्रा वापरून केलेली ही शिल्प लक्षणीय आहेत. या व्यतिरिक्त प्रसिध्द चित्रपट निर्माता व निर्देशक चेतन आनंदकृत 'आखरी खत' चित्रपटासाठी घडवलेली स्त्री प्रतिमा, आळंदी येथील विष्णू दशावतार, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च, मुंबई करिता केलेली मूलभूत आकारातील शिल्परचना इत्यादी उल्लेखनीय आहेत. नागपुरात केशवभवन येथे सिमेंट व टाईल्सचा उपयोग करून घिसाड यांनी कारंजे रचले आहेत. तसेच ॲकेडमी ऑफ मेडिकल सायन्सेसच्या रौप्य महोत्सवाप्रित्यर्थ साकारलेले सिरॅमिक माध्यमातले हिप्पोक्रिटेसचे व्यक्तिशिल्प महत्त्वाचे आहे. घिसाड यांच्या शिल्पाकृती भारतात तसेच विदेशात अनेकांच्या संग्रही आहेत.

रवि मूर्ती : रवि मूर्ती हे नागपुरातील आणखी एक शिल्पकार आहेत. त्यांच्या शिल्पाकृतींपैकी भव्य बसलेली बुध्दमूर्ती--टाकळघाट, श्रीमती इंदिरा गांधी, बल्लारपूरस्थित घोड्यावर स्वार शिवाजी महाराज तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची अनेक शिल्प आहेत.

गोपाळ नायडू : नायडू यांच्या दगड, टेराकोट, प्लॅस्टर या विविध माध्यमांचा उपयोग या शिल्पात दिसतो. त्यांच्या महत्त्वाच्या शिल्पांपैकी 'हेन्री मूर', 'की 'लेटी हुई औरत नही', 'उद्रेक', 'साहाब जरा रुकना' ही शिल्पे आहेत. याशिवाय दलित स्त्रीचे जीवन साकारणारे 'होक्टीबाई' शिल्प लक्षणीय आहे. अमरावती येथे संपन्न झालेल्या दलित साहित्य संमेलनात नायडूंनी शिल्पप्रदर्शन भरविले होते. याव्यतिरिक्त वामनराव घुमे, देवराम चावडा, चंद्रशेखर जोशी हे शिल्पकार नागपूर शहरात कार्यरत आहेत.

नागपूर शहरातील प्रमुख स्थळी व चौकात इत्यादी ठिकाणी काही भारतातील नामवंत शिल्पकारांच्या कलाकृती आहेत. प्रख्यात शिल्पकार सोनवडेकर यांनी विधान भवनातील महात्मा गांधी व ऑल इंडिया रिपोर्टर येथील श्री. चितळे ही शिल्पे साकारली आहेत. याशिवाय धार निवासी शिल्पकार फडके यांचा टिळकांचा पुतळा, शिरगावकर यांच्या हातचा प्रसिध्द झांशीच्या राणीचा पुतळा, साठे यांचे शिवराज लिथो वर्कर्ससाठी निर्मिलेले शिवाजींचे शिल्प, पंधे गुरुजी यांचा महालस्थित अभ्यंकर पुतळा व साने गुरुजींचे शिल्प, खानविलकर यांचे विधान भवनातील वसंतराव नाईकांचे शिल्प व श्याम सारंग यांनी साकारलेले नेताजी सुभाषचंद्र बोस ह्यांचे शिल्प या शिल्परचना महत्त्वपूर्ण आहेत.

नागपुरमधील कलाशिक्षण

नागपूर शहरात कलाशिक्षणाचा पाया सन १९४७ मध्ये जी. के. उर्फ दादासाहेब जोशीराव यांनी रोवला. त्याकाळच्या गव्हर्मेंट इंजिनिअरिंग स्कूल (हल्लीचे पॉलिटेक्निक) येथे जोशीराव यांनी पेंटींग, फोटोग्राफी व कमर्शियल आर्ट या विषयांचा तीन वर्षांचा पदविका अभ्यासक्रम आरंभ केला. नागपूर त्या काळी वऱ्हाडची राजधानी असून मध्यप्रदेश वऱ्हाडचे

मुख्यमंत्री रविशंकर शुक्ला, मंडलोई, दीनदयालजी गुप्ता यांच्या मदतीने व सातत्याने प्रयत्न करण्याने हा कला विभाग सुरू करणे शक्य झाले. नागपूर विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरु कुंजीलाल दुबे व गव्हर्मेंट इंजिनिअरिंग स्कूलचे प्राचार्य चॅटर्जी ह्यांच्या कृपाक्षत्राखाली पुढे या अभ्यासक्रमाची वाढ झाली. पुढील काळात कलाविभागातील फोटोग्राफी व कमर्शियल आर्ट या विभागाची जबाबदारी वसंतराव देहाडराय व जी. के. देशपांडे यांनी सांभाळली.

सन १९५५ मध्ये नागपूर शहरात मोठ्या प्रमाणावर साजरा झालेल्या गणराज्य महोत्सवाच्या निमित्ताने एका भव्य प्रदर्शनाचे आयोजन झाले. यात कलाविभागाचे प्रतिनिधित्व जोशीरावांकडे असून प्रदर्शनामध्ये वीसएक विद्यार्थी व तीन प्राध्यापक यांचा सहभाग होता. जोशीरावांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेल्या अनेक विद्यार्थ्यांनी स्वत:चे स्थान मिळविले. त्यापैकी शरच्चंद्र बोक्षे, श्रीकृष्ण साऊरकर प्रमुख आहेत.

सन १९६७ मध्ये पॉलिटेक्निकमधील या कलाविभागाला स्वतंत्र रूप प्राप्त झाले व चित्रकला महाविद्यालय ही शासकीय कलासंस्था स्थापित झाली. ही शासकीय कला संस्था असून कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबईच्या अखत्यारित आहे.

नागपूर येथे लक्ष्मीनगर स्थित शासकीय चित्रकला महाविद्यालय नागपूर विद्यापीठाशी संलग्नित आहे. येथे पाच वर्षे कालावधीचे बॅचलर ऑफ फाईन आर्ट (रेखा व रंगकला) आणि बॅचलर ऑफ फाईन आर्ट (उपयोजित कला) असे अभ्यासक्रम राबविले जातात. याव्यतिरिक्त सन १९७२ पासून संस्थेत कलाशिक्षक प्रशिक्षण विभागाची सुरूवात झाली असून प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील कलाप्रशिक्षण मिळालेल्या कला शिक्षकांना रितसर शिक्षण देणे हा या विभागाचा मुख्य उद्देश होता. सन १९७८ पासून चित्रकला महाविद्यालयात कलेचा व्यावसायिक पैलू लक्षात घेवून फोटोग्राफी व जाळीमुद्रण या विषयाचे अल्पमुदत अभ्यासक्रम आरंभ करण्यात आले.

नागपूर विद्यापीठाने सन १९७९ मध्ये कलेचे उच्च शिक्षण देण्याच्या हेतूने ललित कलेचा स्नातकोत्तर विभाग आरंभ केला असून या विभागात रेखा व रंगकला, उपयोजित कला, नाट्यकला, संगीत या विषयांच्या विविध शाखा आहेत.

कलाविषयक उपक्रम व संस्था

नागपूर नगरीतील कलेला उत्तेजन व आश्रय मिळविण्याकरिता बापूसाहेब आठवलेंच्या काळापासून ते आजपर्यंत विविध कलाप्रदर्शने, व्याख्यानमाला, प्रात्यक्षिके, संमेलन असे अनेक उपक्रम झाले. कलावंतांना एकत्र येता यावे व कलारसिकांना आस्वाद घेणे शक्य व्हावे याकरिता १९५० च्या दशकात सुसज्ज अशा कलावीथी शहरात नसूनही कलाविषयक कार्यक्रमांचे आयोजन सातत्याने होत असे. या दशकातील सर्व कलाप्रदर्शने व सांस्कृतिक कार्यक्रम सीताबर्डी स्थित राजाराम वाचनालयात होत असत. उदा. सर्वश्री शरच्चंद्र बोक्षे, ना. ब. डिखोळे, भाऊ समर्थ या चित्रकारांचे कलाकृतींचे प्रदर्शन व कलावंताचे सत्कारही येथेच झाले.

सन १९७० च्या सुमारास विदर्भ साहित्य संघातील लोकमान्य टिळक सभागृह हे कलावंत

मंडळींचे केंद्र झाले. त्या काळात या दालनामध्ये अनेक लहान मोठी प्रदर्शने भरविण्यात आलीत. त्यातील एक गाजलेले प्रदर्शन म्हणजे विदर्भ कलाप्रदर्शन होय. सन १९७१ मध्ये विदर्भ कला समिती द्वारा आयोजित या भव्य प्रदर्शनात नागपूरच्या ९४ तर नागपूरबाहेरील ६ अशा एकूण शंभर कलावंतांचा सहभाग राहिला. नागपूरच्या बापूसाहेब आठवले, मसोजी व शेख याकूबभाई मलक या त्रिकूटांचा सन्मान या प्रसंगी करण्यात आला असून यांच्या चित्रांसह ज्येष्ठ चित्रकार शंकर पळशीकर यांचीही कलाकृती प्रदर्शनात होती. यात अनेकांचा सहभाग होता.

या सभागृहात झालेल्या अन्य प्रमुख प्रदर्शनांपैकी प्रा. धनंजय वर्मा यांच्या तैलचित्रांचे प्रदर्शन, प्रा. प्रकाश कावळे यांच्या अमूर्त चित्रांची प्रदर्शनी, मेजर एस. के. जोशीराव यांच्या वृक्षचित्रांचे प्रदर्शन, प्रा. अरुण मेंदुले, कुमारी सुषमा बुचे व प्रा. वर्मा यांचे सामुहिक चित्रप्रदर्शन अशी काही उल्लेखनीय नावे आहेत.

पुढील काळात नगरसेवक अटलबहादुरसिंह व काही इतर कलाप्रेमी व्यक्तिंच्या प्रयत्नांमुळे नागपूर महानगरपालिकेकडून नव्यानेच उभारण्यात आलेल्या यशवंत स्टेडियममध्ये कलावीथीकरिता भव्य जागा उपलब्ध झाली. या कलावीथीला थोर चित्रकार विनायक मसोजी यांच्या स्मृतिप्रित्यर्थ 'मसोजी आर्ट गॅलरी' हे नाव प्रदान करण्यात आले. नागपूरच्या विदर्भ आर्ट सोसायटीची वार्षिक कलाप्रदर्शने या कलावीथीत आयोजित करण्यात आली. तसेच नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर विभागातील युवा विद्यार्थी कलाकारांचे चित्रप्रदर्शन येथे भरविण्यात आले. नागपुरातील प्रसिध्द छायाचित्रणकार प्रकाश बिसने यांच्या भव्य छायाचित्रांचे एक वेधक प्रदर्शन मसोजी आर्ट गॅलरीमध्ये झाले. या ठिकाणी हौसी चित्रकारांनीही काही वर्षे रेखाचित्रणाचा 'स्केचक्लब' ही चालवला. सन १९७८ ला सुरू झालेली ही अत्यंत मध्यवस्तीत असलेली कलावीथी मात्र काही वर्षे चालून शेवटी बंद पडली.

आज नागपूर महाराष्ट्राची दुसऱ्या क्रमांकाची राजधानी असा दर्जा प्राप्त असलेले शहर असूनही येथे योग्य कलावीथींचा तुटवडा आहे. गेल्या अनेक वर्षांपासून शासकीय माहिती केंद्र, राष्ट्रभाषा प्रचार समिती इत्यादी सभागृहांमध्ये प्रदर्शनांचे आयोजन होते. काही तुरळक प्रदर्शन दक्षिण-मध्य सांस्कृतिक केंद्र कलादालनात भरविण्यात येतात. 'लोकमत' वृत्तपत्राचे जवाहरलालजी दर्डा यांच्या स्मृतिप्रित्यर्थ कलावीथीकाचे निर्माण लोकमत भवन येथे सुरू असून नागपूरला अशा प्रकारच्या कलावीथींची मुळ शहराची मोठी गरज पूर्ण होत आहे.

विदर्भ कलाकार संघ : नागपुरात १९६० च्या दशकात कलाक्षेत्रात कार्यरत असलेल्या संस्थांपैकी विदर्भ कलाकार संघ याचे विशेष स्थान आहे.

विदर्भ आर्ट सोसायटी : नागपूर शहरात कलेला प्रेरणा देण्यासाठी प्रस्थापित झालेल्या संस्थांपैकी विदर्भ आर्ट सोसायटीस महत्त्वपूर्ण स्थान आहे. राष्ट्रीय ललित कला अकादमी, नवी दिल्ली तर्फे मान्यताप्राप्त नागपुरातील ही एकमेव संस्था आहे. चित्रप्रदर्शने व कलावंतांची प्रात्यक्षिके आयोजित करणे व कलाकारांचा समाजात दर्जा उंचावणे या बहुउद्देशांनी विदर्भ आर्ट सोसायटीची स्थापना १६ फेब्रुवारी १९७३ रोजी प्रख्यात पत्रकार ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या हस्ते झाली. नागपूर शहरात कलाक्षेत्रात लक्षणीय कार्य करणाऱ्या अन्य संस्थांपैकी 'कलाश्रित', 'वैदर्भीय कला अकादमी', तसेच 'ग्रुप ८५' व अन्य कलागटांचा समावेश आहे.

दक्षिण-मध्य सांस्कृतिक केंद्र : भारतातील कलापंरपरांचे जतन करण्यासाठी व कलावंतांना प्रेरणा देण्यासाठी देशात कार्यरत असलेल्या सात क्षेत्रीय सांस्कृतिक केंद्रापैकी दक्षिण-मध्य सांस्कृतिक केंद्र हे नागपुरात आहे. या केंद्रात महाराष्ट्र, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश व कर्नाटक ही चार राज्ये समाविष्ट असून सन १९८६ मध्ये नागपूर शहरात केंद्राची स्थापना झाली. भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयांतर्गत असलेल्या सांस्कृतिक विभागाच्या सहकार्याने हे केंद्र त्याच्या अखत्यारीत येणाऱ्या चार राज्यातील कला व तसेच राष्ट्रीय कला परंपरांना प्रेरणा देऊन त्यांचा विकास घडविण्यासाठी क्रियाशील राहिले आहे. आधुनिक कलाप्रवाह तसेच आदिवासी व लोककलेचा प्रसार करण्यात व यांना आश्रय मिळवून देण्यात केंद्राने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. दृककला, संगीत, नाट्य, नृत्य, साहित्य या सर्वच क्षेत्रांच्या विकासाकडे केंद्राने आपले लक्ष पुरविले असून विभिन्न सांस्कृतिक कार्यक्रम, कार्यशाळा, प्रदर्शने या माध्यमांतून या कलांचा सुगंध जनमानसापर्यंत पोहचवला आहे. केंद्राची स्वत:ची कलावीथी असून त्यांच्याकडे आदिवासी लोक, पारंपारिक व समकालीन अशा १००० हून अधिक कलाकृतींचा संग्रह आहे. दृककलांच्या प्रसाराकरिता केंद्रातर्फे दरवर्षी अखिल भारतीय पातळीवरील कला प्रदर्शनाचे आयोजन केले जात असून यातील सर्वश्रेष्ठ कलाकृतींना पुरस्कार व प्रशस्तीपत्रे प्रदान केली जातात. नागपूर व तसेच केंद्राच्या कक्षात येणाऱ्या चार राज्यात चित्रकला, शिल्पकला, मुद्रणकला, पाषाणशिल्प कला, सिरॅमिक, मृण्मयकला इ. विविध विषयांवरील कार्यशाळांचे आयोजन सातत्याने केंद्रातर्फे होत असते. दक्षिण-मध्य सांस्कृतिक केंद्राच्या आवारात एक भव्य खुले नाट्यगृहाची सोय तसेच विविध लुप्त पावत जाणाऱ्या कलांना जतन करण्यासाठी संशोधन विभाग आहे. अलीकडेच मध्य प्रदेशातील सुप्रसिध्द खजुराहो येथे केंद्रानी कलावंतांना प्रोत्साहन देण्याकरिता शिल्पग्राम प्रारंभ केले असून भारतातील व परदेशातील कलारसिकांकडून या उपक्रमास प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. प्रारंभिक काळात केंद्राचे माजी संचालक प्रा. श्री. कमलाकर सोनटक्केंच्या कारकीर्दीत व नंतरही या केंद्राने कलेच्या प्रांतात यशस्वी वाटचाल केली आहे.

मध्यवर्ती वस्तुसंग्रहालय : नागपूर शहरातील मध्यवर्ती वस्तुसंग्रहालयास कलाक्षेत्रात महत्त्वाचे स्थान आहे. नागपूर तसेच इतर प्रांतातील श्रेष्ठ दर्जाच्या व दुर्मिळ कलाकृती असलेल्या या वस्तुसंग्रहालयाची स्थापना सन १८६३ मध्ये झाली. पुरातनकालीन शिल्पकला, चित्रकला, शिलालेख, नाणी इत्यादी अनेक मौल्यवान वस्तूंचा संग्रह येथे आहे. तसेच आधुनिक चित्रकलेतील अनेक नावाजलेल्या कलावंताच्या कलाकृतींकरिता येथे एक विशेष दालन आहे. विसाव्या शतकाच्या प्रारंभीपासून आधुनिक काळापर्यंत अशा अनेक पिढीतील चित्रकारांचे येथे प्रतिनिधीत्त्व झाले असून नागपूर शहरातील नामांकित चित्रकार बापूसाहेब आठवले, विनायक मसोजी, याकूब मलक, ना. ब. डिखोळे, भैय्याजी गोस्वामी, भाऊ समर्थ, तसेच मुंबईतील आधुनिक कलाप्रवाहातले प्रमुख कलावंत माधव सातवळेकर, गायतोंडे, हळदणकर, रावबहादूर धुरंधर, के. के. हेब्बर, अलमेलकर, धोंड, पॉलराज, चावडा, आचरेकर, तासकर, गुर्जर, बाबूराव पेंटर, श्रीमती प्रफुल्ला हडाणूकर, प्रा. वॉल्टर लँगहॅमर यांची चित्रे संग्रही आहेत.

वैदर्भीय कला अकादमी

वैदर्भीय कला अकादमीच्यावतीने विदर्भातील एक चळवळ सुरू असून गेल्या दशकात यांच्यावतीने राजकीय एकात्मता, धर्मनिरपेक्षता, सामाजिक जनजागृती यासंदर्भामध्ये विविध प्रकारचे कार्यक्रम हाती घेतले जातात. हिंगणघाट (१९९३) येथे प्रेक्षकांच्या समोर वरील विषयावर उत्स्फूर्तपणे चित्र रंगवली गेली. मुंबई बॉम्बस्फोटानंतर किंवा गोवारी हत्याकांड, गुजरात भूकंप अशा विविध प्रसंगी कलेच्या माध्यमातून जनजागृती व आर्थिक सहकार्य करण्याचे प्रयोग केले गेले. शहरातील ज्येष्ठ कलावंतांचा सत्कार व प्रदर्शन यासारख्या कामात अकादमीतील हरिहर पेंदे, नानू नेवरे, सुधीर तलमले व सहकारी चित्रकार कार्यरत असतात.

जिल्ह्यातील वृत्तपत्रांची यादी

जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, नागपूर, महाराष्ट्र शासन, यांचेकडून प्राप्त नोंदी आधारे.

क्रमांक	वृत्तपत्राचे नाव	वृत्तपत्राचा पत्ता
१	दै. हितवाद	श्री. विजय फणशीकर, पं. जवाहरलाल मार्ग, नागपूर-१२.
२	दै. नवभारत	श्री. विनोद माहेश्वरी, नवभारत भवन, छत्रपती चौक, वर्धा रोड, नागपूर.
३	दै. तरूणभारत	श्री. अनिल दांडेकर, २८, फार्मलँड, रामदासपेठ, नागपूर-१०.
४	दै. लोकमत	श्री. विजय दर्डा, लोकमत भवन, पं. जवाहरलाल नेहरू मार्ग, नागपूर-१२.
५	दै. राष्ट्रदूत	श्री. गजानन अग्रवाल, रविनगर चौक, नागूपर.
६	दै. लोकसत्ता	श्री. कुमार केतकर, १, आशिर्वाद, चिटनविस लेआऊट, बैरमजी टाऊन, छिंदवाडा रोड, नागपूर.
७	दै. लोकमत समाचार पं.	श्री. विजय दर्डा, लोकमत भवन, जवाहरलाल नेहरू मार्ग, नागपूर.
८	दै. नवप्रभात	श्री. नंदकिशोर चोरसिया, प्रभात चेंबर्स, २७ रामदास पेठ, नागपूर.
९	दै. नवराष्ट्र	श्री. विनोद माहेश्वरी, अजनी चौक, वर्धा रोड, नागपूर-१५.
१०	दै. सकाळ	श्री. महेश म्हात्रे, बी-३२/३३, एमआयडीसी, हिंगणा, नागपूर-१६.

११	दै. भास्कर	श्री. मनमोहन अग्रवाल, १७-ए, विशम्बर भवन गेट नाग रोड, नागपूर.
१२	दै. लोकसेवा	श्री. दिपककुमार चौरसिया, रामदासपेठ, नागपूर.
१३	दै. संध्याकिरण	श्री. एन. एन. कांबळे, ४२९, राणी दुर्गावती चौक, एन. आय. टी., नागपूर-१७.
१४	दै. रेखा	श्री. बबलू रणदिवे, तुलशीबाग रोड, महाल, नागपूर.
१५	दै. सफलक्रांती	श्री. शंकर चांदेकर, प्रियदर्शनी कॉलनी, आर. टी. ओ. ऑफीसजवळ, नागपूर-१.
१६	दै. नया खून	श्री. उमेश चौबे, कॉटन मार्केट, नागपूर.
१७	दै. उद्‌घोष	श्री. सुभाष बोचर, महाल, नागपूर-२.
१८	दै. इंडियन एक्सप्रेस	श्री. विवेक गोयंका, १, आशिर्वाद, चिटनविस लेआऊट, बैरमजी टाऊन, छिंदवाडा रोड, नागपूर.
१९	दै. संदेश आनंद	श्री. मिलिंद पवनीपगार, ४२, स्टेट बँक कॉलनी, हिंगणा रोड, नागपूर.
२०	दै. श्रमिक संघर्ष	श्याम पाटील, सद्‌भावना भवन, बॅचलर रोड, नागपूर.
२१	दै. विदर्भ पुकार	श्री. अरुण जोशी, ८५-हनुमान नगर, नागपूर-९.
२२	दै. प्रतापगडचे वारे	श्री. अनिल मेघे, ३४, लक्ष्मीनगर, नागपूर-१८.
२३	दै. लहुतसंग	श्री. वसंतराव देशपांडे, तरंग कार्यालय, बैल बाजार, कामठी, जि. नागपूर.
२४	दै. आर्वी टाईम्स	श्री. मोतीलाल राठी, सदोदय बिल्डिंग, पहिला माळा, गांधी पुतळ्याजवळ, सी. ए. रोड, नागपूर.

अनुक्रमणिका

२५	दै. कलम की आँखे	श्री. मंसूर खान, रुईकर रोड, नागपूर.
२६	दै. देश	श्री. अरुण जोशी, ८५, हनुमान नगर, नागपूर.
२७	दै. दोपहर पब्लीक पार्लियामेन्ट	श्री. एम. पी. त्रिपाठी, लोकमान्य अपार्टमेंट, तिलकनगर, नागपूर-१०.
२८	दै. युगधर्म	श्री. एन. कुमार, पूनम चेंबर्स नागपूर.
२९	दै. महाविदर्भ (सकाळ)	श्री. क्रांती नालमवार, कामगार भवन, बैधनाथ चौक, नागपूर.
३०	दै. महाविदर्भ (सांध्य)	श्री. कुणाल नालमवार, कामगार भवन, बैधनाथ चौक, नागपूर.
३१	दै. महासागर	श्री. श्रीकृष्ण चांडक, कॉटन मार्केट, नागपूर.
३२	दै. गौरव गरिमा	श्री. मोहनकुमार भगत, नमकगंज इतवारी, नागपूर.
३३	दै. खबर	श्री. एन. कुमार, पूनम चेंबर्स, छिंदवाड रोड, नागपूर.
३४	दै. रूद्रअवतार	श्री. सिध्दांत अग्रवाल, धरमपेठ, नागपूर.
३५	दै. लोकमत टाईम्स	श्री. विजय दर्डा, लोकमत भवन, पं.जवाहरलाल नेहरू मार्ग, नागपूर.
३६	दै. विदर्भ की बात	ॲड. अरूण कोटेचा, पंचशील चौक, वर्धा रोड, नागपूर.
३७	दै. नागपूर पोस्ट	श्री. कृष्ण चांडक, कॉटन मार्केट, नागपूर.
३८	सा. जनहित टाईम्स	श्री. हरिकिसन राठी, सदोदय, बिल्डींग, पहिला माळा, गांधी पुतळ्याजवळ, सी. ए. रोड, नागपूर.
३९	सा. ब्लॉस्ट	श्री. राजू मिश्रा, १८ अ, न्यू उर्वेला कॉलनी, अत्रे लेआऊट, नागपूर.
४०	सा. विदर्भ चंडिका	श्री. महेश पुरोहित, सक्करदरा चौक, नागपूर.
४१	सा. पब्लीक पार्लियामेंट	श्री. एम. पी. त्रिपाठी, लोकमान्य अपार्टमेंट, तिलकनगर, नागपूर.

४२	सा. दलित भारत	श्री. राजू पवार, बुध्दनगर, डॉ. आंबेडकर मार्ग, नागपूर.
४३	सा. अमरसंजय	श्री. शंकर चांदेकर, प्रियदर्शनी कॉलनी, आर. टी. ओ. ऑफिसजवळ, नागपूर.
४४	सा. समाजवाद संग्राम (हि)	श्री. उन्मेश पवार, बुध्दनगर, डॉ. आंबेडकर मार्ग, नागपूर.
४५	सा. विज्ञापन की दुनिया	श्री. कृष्ण नागपाल, रतनदीप कॉम्प्लेक्स, हंसापूरी रोड, नालसाहेब चौक, नागपूर.
४६	सा. उपराजधानी	श्री. संजय सेवकराम देशमुख, उद्‌घोष भवन, महाल, नागपूर.
४७	सा. विदर्भ टाईम्स	श्री. निर्मल रणदिवे, ८०४, तुलसीबाग, महाल, नागपूर.
४८	सा. विदर्भ गंगा	डॉ. सुधाकर मोगलेवार, केशवराव बुटी रोड, सिताबर्डी, नागपूर.
४९	सा. विदर्भ भूषण	श्री. मोतीलाल राठी, सदोदय, बिल्डींग, पहिला माळा, गांधी पुतळ्याजवळ, सी. ए. रोड, नागपूर.
५०	सा. आदिवासी गर्जना	श्री. राजू जुमळे, डॉ. आंबेडकर मार्ग, लष्कळी बाग, नागपूर.
५१	सा. नागपूर डायरी न्यू सोमवारी	श्री. पी. व. संगरवार, पेठ, नागपूर.
५२	सा. अराऊंड	श्री. ज्ञानेश्वर चांदेकर, लालगंग, मेहंदीबाग रोड, नागपूर.
५३	सा. अभय राज्य	श्री. मधुकर बावने, मॉडल मिल गेट समोर, गणेशपेठ, नागपूर.
५४	सा. नागपूर स्टार	श्री. लक्ष्मीबाई महानंद पानतावणे, बुध्दनगर, डॉ. आंबेडकर मार्ग, नागपूर.
५५	सा. जनाधार	श्री. मुकुंद इन्दुरकर, हिल रोड, गांधीनगर, नागपूर.
५६	सा. कामठी का सीआयडी	श्री. सहदेव चव्हाण, भीमनगर, कामठी, जि. नागपूर.
५७	सा. संस्कृत भवित्यम	डॉ. नी. र. वऱ्हाडपाण्डे, जवाहरवस्ती गृहाजवळ, उच्च न्यायालय मार्ग, सिव्हील लाईन, नागपूर.

अनुक्रमणिका

५८	सा. ट्रायबल वेलफेअर	डॉ. टि. यु. नंदनवार, गोलछा मार्ग, शांती भवनजवळ, सदर बाजार, नागपूर.
५९	सा. प्रिशिसन टाईम्स	श्री. शरद बोरकर, ६, प्रगती कॉलनी, एअर पोर्ट रोड, साईमंदिर जवळ, नागपूर.
६०	सा. संदेश आनंद	श्री. मिलिंद पवनीपगार, ४२, स्टेट बँक कॉलनी, हिंगणा रोड, नागपूर.
६१	सा. बहुमान	श्री. रमेश येडके, प्रकाश प्रिंटींग प्रेस, रामटेक, नागपूर.
६२	सा. नागपूर दृष्टी	श्रीमती लताबाई बोचर, महाल, नागपूर.
६३	सा. दोपहार संदेश	श्री. सत्यजीत मेश्राम, डॉ. आंबेडकर मार्ग, नागपूर.
६४	सा. विश्वदिप्ती	श्री. रतन शर्मा, विजय ओगानियाभवन, गणेशपेठ, नागपूर.
६५	सा. डिव्हीजनल सुपर इंटरनॅशनल	सौ. निर्मला चेटुले, गुलमोहर, सुंदरबन (रिंगरोड), नागपूर.
६६	सा. ग्रामीण समाचार	श्री. महादेव मारोती चेटुले, ४७१, गुलमोहर, श्रीनगर सुंदरबन (रिंगरोड), नागपूर.
६७	सा. कलम का गौरव	श्रीमती शोभा जयपूरकर, काशीबाई देऊळ, डॉ. पाटील हॉस्पिटल समोर, नागपूर.
६८	सा. चर्चा	श्री. वसंत उबगडे, ६२, राहतेकरवाडी, तुळशीबाग, नागपूर.
६९	सा. जयमृत्यूंजय	श्री. रणजीत जोशी, ८५, हनुमान नगर, नागपूर.
७०	सा. एकता की मशाल	श्री. नागनाथ कांबळे, ४२९, राणी दुर्गावती चौक, एन. आय. टी., नागपूर.
७१	सा. बाबासाहेबाचा आंबेडकरवाद	श्री. के. आर. कांबळे, डॉ. जामदाडे कंपाऊंड, इमामवाडा पोलीस चौकी, गेट नाग रोड, नागपूर.

७२	सा. मयूर समाचार	श्री. प. म. पिंगळे, उद्‌घोष मुद्रण, महाल, नागपूर.
७३	सा. आजचे प्रबोधन	प्रा. वामन निंबाळकर, १/१०, एम. आय. जी. कॉलनी, रामबाग, नागपूर.
७४	सा. आर्वी वृत्त	श्री. विजय अजमिरे, पुंडलिकराव शिरभाते, जुने नंदनवन लेआऊट, प्लॉट नं. २०५, तिरंगा चौक, नागपूर.
७५	सा. नागपूरी फटका	श्री. प्रदीप बागडे, राजगृह, सिरसपेठ, नागपूर-९.
७६	सा. विदर्भ पूकार	श्री. अरूण जोशी, ८५, हनुमान नगर, नागपूर.
७७	सा. जनसंग्राम	श्री. निरज त्रिपाठी, ९, स्वप्नलोक अपार्टमेंट, हिवरीनगर चौक, वर्धमान नगर, नागपूर.
७८	सा. द. नागपूर ग्रीन सीटी	श्री. शहिद शरीफ, सुपर क्लीनर्स, सिताबर्डी, नागपूर.

प्रकरण १२

प्रेक्षणीय स्थळे

(पाठक, अ. शं. यांनी जिल्ह्यातील सर्व **महापाषाणयुगीन उत्खनीत स्थळे** तसेच **अडम, मांढळ, पारशिवनी**व **रामटेक** या स्थळांचे तर **प्रभाकर गद्रे यांनी नागपूर शहर** विषयी लेखन केले आहे.)

विदर्भामध्ये एकूणच संस्कृतीच्या संदर्भात आजपर्यंत इतिहासाला ज्ञात नसलेल्या अनेक बाबी गेल्या काही दशकात झालेल्या पुरातत्वीय अन्वेषन आणि उत्खननामुळे स्पष्ट झाल्या आहेत. यातील बहुतांश घटना नागपूर जिल्ह्याशी संबंधीत आहेत. अडम येथे ताम्रपाषाणयुगीन संस्कृतिचे अवशेष सापडले. त्यातही या स्थानाच्या स्थानिय वैशिष्ट्यामुळे "विदर्भ संस्कृति" म्हणून ही ताम्रपाषाण युगीन वसाहत संबोधली गेली. याशिवाय प्रारंभिक ऐतिहासिक काळाशी या स्थानाचा असलेला संपर्क स्पष्ट करणारी नाणी विशेषत: रोमन नाणी येथे मिळाली. "असक जनपदस्य" अशी नोंद असलेली मृणमुद्रा येथे मिळाली हे विशेष. त्यामुळे विदर्भातील जनपदाची नोंद प्रथमच स्पष्टपणे करता आली. स्तुपाचे अवशेष येथे केलेल्या उत्खननात स्पष्ट झाले.

विदर्भाचे वैशिष्ट्य महाराष्ट्राच्या संदर्भात सांगता येते ते येथील महापाषाणयुगीन संस्कृति. या संस्कृतिचे अवशेष मोठ्या प्रमाणामध्ये उत्खननात मिळाले. विशेषत: माहुरझरी, टाकळघाट खापा, नैकुंड, बोरगाव, थारसा या व अशा अनेक स्थानावर झालेल्या गवेषण व उत्खननातून या संस्कृतीची वैशिष्ट्ये स्पष्ट झाली. यामध्ये उपलब्ध स्थानिक खाणीतील अशुध्द लोखंडापासून शुध्द लोखंड तयार करणारी भट्टी नैकुंड येथे मिळाली ही उल्लेखनीय बाब मानावी लागते. कृषिविषयक ज्ञान त्यांना होते व त्यातून ते मासेमारी बरोबरच ज्वारी, गहू, तांदुळ, उडीद, मसूर, वाटाणा यासारखी एकदल व द्विदल धान्ये उत्पादन करू शकत होते. इ. स. पूर्व ६ व्या शतकापासून तर ४ थ्या शतकापर्यंत असा ह्या वसाहतींचा काळ निश्चित करण्यात आला आहे या वसाहतीच्या स्थानामध्ये १) केवळ दफणभूमी उपलब्ध होणे २) वसाहत व दफणभूमी उपलब्ध होणे ३) केवळ संस्कृति निदर्शक खापरे व लोखंडी वस्तू मिळणे अशा प्रकारची स्थळे नागपूर जिल्ह्यात मिळाली आहेत. या जिल्ह्यात झालेल्या गवेषणात कोलीतमारा येथे बौध्द मूर्तीचा शीर्ष भाग उपलब्ध झाला. या स्थानाचा गांधार शिल्पकलेशी असणारा संपर्क स्पष्ट करणारा हा पुरावा होय. या स्थानावर असलेले अन्य पुरातत्वीय अवशेष लक्षात घेता कोलीतमारा येथे वाकाटकांची राजधानी असावी असे वेलस्टे या पाश्चात्य अभ्यासकाने नोंदविले आहे. सेलडोह येथेही बौध्द स्तुपाचे अवशेष उपलब्ध झाले.

या जिल्ह्यातील अभिलेखीय संपदा विशेष आहे. नागपूर मध्यवर्ती संग्रहालयात बॉबीलोनीयन वृत्तचित्ती मुद्रा लेख उपलब्ध असून हा लेख इ. स. पू. १००० वर्ष इतका प्राचिन असल्याचे मानले जाते. तर पुलर लेणीतील ब्राह्मी लेख इ. स. पू. २०० ते १०० वर्षे पूर्वीचा आहे.

अडम येथील मुद्रा लेख इ. स. १०० ते २०० वर्षे असावा, असे मत नोंदविले गेले आहे.

रामटेक, नगरधन अशा ठिकाणी असलेल्या वाकाटक कालीन वास्तु नव्याने स्पष्ट झाल्या आहेत. मनसर, रामटेक, नगरधन ही वाकाटककालीन महत्त्वाची स्थाने असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. महाराष्ट्राच्या स्थापत्य इतिहासात ही एक मौलीक देन आहे. या कामी वा. वि. मिराशी, अजयमित्र शास्त्री, अ. प्र. जामखेडकर यांसारख्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. मनसर येथील शिवमूर्ती दिल्ली येथील राष्ट्रीय संग्रहालयात तिच्या विशेष वैशिष्ट्यामुळे प्रदर्शित करण्यात आली आहे. धोग्रा, काटोल, केळवद, पारशिवनी, सावनेर ही स्थाने मुस्लिमपूर्व कालखंडापासून महत्त्वाची होती.

उत्तर-मध्ययुगीन काळामध्ये नागपूर जिल्ह्यात झालेल्या पेंढारी लोकांच्या उठावाची नोंद मिळते. वस्तुत: पेंढाऱ्याचे आक्रमण आणि या काळाची गरज म्हणून गोंड आणि भोसले राजवटीत उदयाला आलेल्या सरंजामदारांनी किल्ले व गढ्या बांधल्या, हे किल्ले उमरखेड, जलालखेडा, सावनेर, भिवगड, धोग्रा येथे उभारण्यात आले. या व अशा स्थानांची नोंद या प्रकरणात देण्यात आली आहे.

अडम

अडम : [ता. कुही, २०°५५' उ., ७९°२५' पू.] अडम हे लहानसे गाव नागपूरच्या आग्नेयेला सुमारे ५५ कि. मी. अंतरावर वाघोर नदीच्या काठावर वसले आहे. नागपूर जिल्ह्यात येथे ताम्रपाषाण संस्कृतीचे अवशेष मोठ्या प्रमाणावर मिळाले. इ. स. पू. १५०० पासून १००० वर्षे असा त्यांचा काळ मानला जातो. या सांस्कृतिक कालखंडामध्ये तांबे व दगड यांच्यामध्ये बनवलेली हत्यारे व अवजारे उपलब्ध झाली. कृषि व पशुपालन यांच्यासाठी उपयुक्त ठरू शकतील अशा बाबींबरोबर सुक्ष्म हत्यारे, चमकदार कुऱ्हाडी, हाडांची अवजारे आणि मृद भांडी उपलब्ध झाली. भारतात इतरत्र मिळणाऱ्या मृद भांड्यापेक्षा येथील मृद भांडी सर्वस्वी वेगळी असल्यामुळे या संस्कृतीला 'विदर्भ ताम्रपाषाणयुगीन संस्कृती' असे नाव देण्यात आले आहे. येथे अग्नीवेदिकेजवळच चमकदार अशी दगडाची कुऱ्हाड मिळाली, याचा उपयोग काही धार्मिक विधी करण्यासाठी होत असावा असा अंदाज आहे (**अमरेंद्रनाथ अडम ॲण्ड इंडेक्स टू विदर्भ आर्किऑलॉजी,** न्यू ट्रेड इन इंडियन आर्ट ॲण्ड आर्किऑलॉजी [एस. आर. राव गौरवग्रंथ] नवी दिल्ली १९९१ पृ. ६९-७९; याच ग्रंथातील इतिहास प्रकरणातील डॉ. अजयमित्र शास्त्री यांचे लेखन.) १९६९ मध्ये येथे ११ रोमन सुवर्ण नाण्यांचा संचय मिळाला. १९८८ मध्ये भारत सरकार पुरातत्व सर्वेक्षण विभागातर्फे डॉ. अमरेंद्रनाथ यांच्या निर्देशनाखाली येथे उत्खनन सुरू झाले. पुढे ते चार वर्षे चालले. या उत्खननात एका मोठ्या संपूर्ण विकसित आणि अतिशय सुसंपन्न अशा शहराचे अवशेष हाती लागले. "असक जनपदस्य" अशी ब्राह्मी लिपीत लेख असलेली मुद्रा मिळाली, त्यामुळे इसवी सन पूर्व ६ व्या शतकातील गौतम बुध्दाच्या काळात भारतात जी १६ जनपदे होती त्यात "असक" जनपदाचे जे नाव आढळते त्याची राजधानी आसिक नगर म्हणजेच सध्याचे अडम असावे असे मत व्यक्त केले गेले. तर या मुद्रेचा काळ इ.स. १०० ते २०० असल्याचे एपिग्राफिया इंडिकात नोंदवले आहे. (**एपिग्राफिया इंडिका,** खंड ४२, पृ. ७२; ठोसर हरिहर, *नागपूर जिल्ह्याचा प्राचीन ऐतिहासिक व सांस्कृतीक भूगोल, या कार्यालयातील हस्तलिखितावरून)

येथील किल्ल्याच्या बाहेर पूर्वेस सुमारे ५०० मीटर अंतरावर रस्त्याच्या डाव्या बाजूस एक उंचसे टेकाड असून विशिष्ट आकारामुळे ते सहजच लक्ष आकृष्ट करून घेते. स्थानीय लोक या परिसरास "देवी हुडकी" म्हणून ओळखतात. याच्या आजूबाजूस सध्या वृक्ष व

नांगरटी खाली आलेली शेती आहे. टेकाडावर एक पदचिन्ह युक्त शिला ठेवली होती. हे विशिष्ट अर्धगोलाकार आकाराचे टेकाड म्हणजेच स्तूप होय. पुरातत्व विभागाने येथे केलेल्या उत्खननामुळे हे स्पष्ट झाले. स्तूप युक्त टेकाडाची उंची ५.६० मीटर व परिघ ३४ मीटर आहे. प्रस्तुत स्तूपाची बांधणी कशा प्रकारे केली होती हे जाणून घेण्याच्या हेतूने स्तूपाच्या दक्षिण भागाचे आयताकार (Horizontal) पध्दतीने उत्खनन केले गेले. या उत्खननाने काही नवीन माहिती प्रकाशात आली आहे. स्तूपाच्या भूपृष्ठ भागावरील मातीच्या १० से.मी. खालील स्तरापासून तर एक मीटरपर्यंत पंचमार्क नाणी, तसेच तांबे व जस्त या धातूंची अनेक नाणी इथे मिळाली. नाण्यावर उज्जैन चिन्ह, धम्मचक्र, बोधिवृक्ष, तीन पर्वत आणि वर अर्धचंद्र यासारखी चिन्हे आढळली. स्तूपाच्या ठीक मध्यभागी ३.५० मीटर व्यासाची हर्मिका होती. त्यात यष्टी आणि त्यावर छत्रावली असल्याचे पुरावे प्राप्त झाले. हर्मिकेच्या पार्श्वभागात तळापर्यंत खोल खणती घेऊन उत्खनन केले असता हा स्तूप माती आणि मुरुम यांनी बनविला होता असे निदर्शनास आले. या करिता एका अभिनव पध्दतीचा वापर करण्यात आला होता. माती आणि मुरमास पाण्याने भिजवून त्याला आधी चांगल्या प्रकारे चोपून तो मजबूत केला गेला. या करता जी विशिष्ट पिवळसर रंगाची माती वापरली आहे ती अडम पासून तीन कि. मी. दूर भिवकुंड परिसरात पहायला मिळते. याच परिसरात काही बौध्द लेणी आहेत. या स्तूपाचा दर्शनी (दक्षिण) भाग विशेष महत्त्वाचा असल्याने या वेगळ्या मातीचा वापर करून तो बनविला होता. स्तूपाच्या मागील भागात मात्र या प्रकारचे काम आढळले नाही.

स्तूपाच्या दक्षिण बाजूस दोन भिंती बांधलेल्या आढळल्या. दोन भिंतीमधील अंतर ४.९० मीटर असून भिंतीचा आकार इंग्रजी "एल" प्रमाणे काटकोनात आहे. यापैकी पहिली भिंत एकेरी दगडाची बांधलेली असून तिचे आकारमान ९.८० x ०.४० मीटर आहे. ही भिंत मौर्योत्तर काळातील असावी. सातवाहन काळात अशीच भाजलेल्या विटांची दुसरी भिंत बांधली गेली ती २२.२० मीटर लांब व १.२० मीटर रुंद आहे. या विटांचा आकार ३५x१८x ६ सें. मी. आहे. दोन्ही भिंती बांधण्यास जुडाई करिता मातीच्या गिलाव्याचा वापर केला गेला. प्रस्तुत स्तूपाच्या काही अंतरावरच एक नाला आहे. दक्षिणेकडे उतार भाग असल्याने पावसाळ्यात येणाऱ्या मुसळधार पावसामुळे जेव्हा नाला दोन्ही थडीने ओथंबून वाहत असेल तेव्हा त्याचे पाणी स्तूपापर्यंत येत असावे. स्तूप मातीचा बनला असल्यामुळे केवळ याच भागात पुराच्या पाण्यामुळे स्तूपाची क्षती होत असावी. स्तूप निर्मितीच्या अनेक वर्षानंतर या बाबीकडे लक्ष वेधले गेले आणि त्यामुळे पुराच्या पाण्यापासून प्रतिबंधक उपाय म्हणून सुरक्षिततेसाठी या भिंती बांधल्या गेल्या असाव्यात.

अडम येथील स्तूपाच्या उत्खननात एक अतिशय सुंदर असा गळ्यात घालण्याचा माळेतील मणी मिळाला. तो कार्नेलियन दगडाचा आकाराने लांब षटकोनी असून त्यावर रासायनिक पध्दतीने शिल्पांकन केले आहे. ते हीनयान बौध्द धर्माशी संबंधित आहे. या मण्यावर उजवीकडे कठड्यामध्ये बोधिवृक्ष दाखविला असून डाव्या बाजूस एक सांड त्यावर वेगाने चाल करून जात आहे असे दृश्य चित्रीत केले आहे.

या स्तूपाजवळच काळ्या दगडात बनविलेली पदचिन्हे युक्त शिला ठेवली होती. प्राचीन काळापासून गौतम बुध्दाच्या चरण प्रतिकृतींची पूजा करण्याची प्रथा अस्तित्वात होती ही बाब यातून स्पष्ट होते.

किल्ल्याच्या आतील भागातील उत्खननात मिळालेल्या अनेक मृदभांड्यावर विविध प्रकारच्या अलंकृत त्रिरत्नाचे व पिंपळाच्या पानांचे सुरेख अंकन आढळून येते. (मेश्राम प्रदिप, विदर्भात अलिकडे मिळालेले काही बौध्द पुरावशेष, **विदर्भ संशोधन मंडळ,** वार्षिक १९९५, पृ. १५६-५९.)

अदासा

अदासा : [ता. कळमेश्वर २५° १५' उ., ७८° ५५' पू.] नागपूरच्या वायव्येस ३७ कि. मी. आहे. हे स्थान धापेवाडा पासून ५ कि. मी. तर कळमेश्वर पासून १४ कि. मी. अंतरावर आहे. गावामध्ये पाच प्राचीन देवळे असून गणपती मंदिरातील मूर्ती ही एकाच अखंड पाषाणात कोरलेली आहे. जवळील टेकडीवर महादेवाचे मंदिर असून मंदिरातील शिवलिंग हे स्वयंभू असल्याचे मानले जाते. या स्थानाविषयी अनेक आख्यायिका प्रचलित असून पूर्वी हे गाव गोसाव्यांच्या मालकीचे होते. गावातील मंदिरांची व्यवस्था तेच पहात.

गणपती मंदिर : गणपती मंदिर प्राचीन असून गावालगत असलेल्या टेकडीच्या माथ्यावर आहे. मंदिरापर्यंत पोहचण्यासाठी बऱ्याच पायऱ्या चढून जावे लागते. हा परिसर रमणीय आहे. या स्थानांविषयी ज्या कथा प्रचलित आहेत त्यानुसार गणेश-पुराणात नोंदविण्यात आलेल्या बारा गणपती स्थानांपैकी हे एक स्थान आहे. राम रावण युध्दामध्ये इंद्रजित याने लक्ष्मणावर केलेल्या आघातानंतर औषधोपचारासाठी वनस्पतीसह द्रोणागिरी पर्वत हनुमानाने आणला या पर्वतांचा एक मोठा भाग खाली निखळला तो भाग म्हणजेच आदासा होय अशी दंतकथा आहे. अन्य एका कथनकाप्रमाणे कृत युगात वामनाने अवतार घेतल्यावर शमी विघ्नेशाची आराधना केली व बळीराजाच्या यज्ञांचा नाश केला. यावेळी वामनाने गणेशाची स्थापना केली तेव्हापासून हे क्षेत्र "वामनवरद वक्रतुंड" नावाने ज्ञात आहे. या क्षेत्रावर गौतम ऋषींनी तप केले म्हणून "गौतमीक्षेत्र" म्हणूनही ओळखले जाते. मुदगल यांनी गणेशाची स्थापना केली तेव्हा हे क्षेत्र "शमीमूलपूर" अथवा "अदोषक्षेत्र" म्हणूनही संबोधतात. श्री शम्मी विघ्ने वक्रतुंडाची मूर्ती एक संघ पाषाणात आहे. खाली भारवाहक इंद्रादी अष्टदिक्पाल दाखविले आहेत. पौष वद्य-चतुर्थी आणि माघ शुध्द चतुर्थी या दोन दिवशी मोठी यात्रा भरते. (या कार्यालयाने केलेल्या सर्वेक्षणाआधारे जून २००२ व श्री गणपती देवस्थान ट्रस्ट अदासा यांनी कार्यालयास पुरविलेल्या नोंदीआधारे.)

एका उंच टेकडीवर असलेले हे मंदिर गर्भगृह त्यापुढील आयताकार मंडप आणि त्यानंतर स्वतंत्रपणे असलेला मुखमंडप अशी याची रचना असून प्रशस्त प्राकारयुक्त मंदिर आहे. मंदिरात प्रवेश करण्यापूर्वी स्वाभाविकपणे तिथपर्यंत पायऱ्या चढून जावे लागते. प्रवेशद्वाराजवळ असलेला मुखमंडप हा सरूदार आकाराच्या दगडी स्तंभावर उभा असलेला तीन महीरपीनी युक्त आहे. या महीरपी (कमानी) वर सुंदर अशी लतावेलीचे शिल्पांकन आहे. मुखमंडपापासून आत प्रवेश केल्यावर मोकळ्या चौकामधून आपण गर्भगृहाकडे जाणाऱ्या सभामंडपात प्रवेश करतो. आयताकार सभामंडप भक्कम अशा दगडी कमानीवर उभा आहे. गर्भगृहाचे

प्रवेशद्वाराजवळ असलेली महिरप ही अनेकविध नक्षींनी चित्रित केली आहे. गाभाऱ्यात उंच अधिष्ठानावर उभी असलेली नृत्य गणेशाची भव्य मूर्ती शमीविघ्नेश्वर (सिध्दिविनायक) ३.३५ मीटर उंच आणि २.१२ मीटर रुंदीची आहे. ही द्वादशभुजा मूर्ती सेंदूरचर्चित आहे. हा नृत्य गणेश प्रसन्नतेची अनुभूती देतो. मुर्तीच्या मागे पितळी प्रभावळ आहे. मंदिराच्या गर्भगृहावर शुकनाशासह नागरशैलीतील शिखर आहे. शिखराच्या पुढील बाजूस आणखी एक पिऱ्यामिड आकाराचे शिखर आहे. मुळ प्राचिन स्थानावर मंदिराचे बांधकाम व शिखर यांची निर्मिती साधारणपणे १८ व्या शतकात झाली असावी. मंदिराच्या बांधकामाबाबत कझिन्स नोंदवतात की, पहिला रघुजी भोसले यांची मुले साबाजी व बिंबाजी यांनी फसली ११८१ (इ. स. १७७१) मध्ये मंदिराचे बांधकाम केले. या संस्थानासाठी इनामे व आर्थिक मदत दिली. मंदिराचा ताबा मालगुजार यांच्याकडे होता.

समाधी समूह : गणेशमंदिराच्या बाजूला काहीसा उंचवटा असलेले प्रशस्त मैदान असून येथे १६ व्या आणि १७ व्या शतकात होऊन गेलेल्या दशनाम पंथी गोसाव्यांच्या अनेक समाध्या आहेत. समाध्यांमध्ये वृंदावनासारखे चौथरे आहेत. तसेच एकगर्भ मंदिर आणि त्यावर घुमटाकार शिखर किंवा चौथऱ्यावरील एक मंडप अशा स्वरुपातपण काही समाध्या आहेत. एकगर्भ लहान मंदिरावर महिरपीयुक्त कमानी व त्यावर वेगवेगळ्या आकाराची लहानमोठी शिखरे येथे पहावयास मिळतात. यातील काही वास्तू गोंडवंशीय स्थापत्याचा नमुना आहेत. अन्य भोसले कालीन आहेत. याच परिसरात भव्य अशा खंडित मूर्तीचे अवशेष विखुरलेल्या स्थितीत आढळतात. या अवशेषांमध्ये भैरवशिल्प तसेच महिषासूरमर्दिनीच्या मूर्तीशिल्पांचे अवशेष उल्लेखनीय आहेत.

मंदिरे : महिषासूरमर्दिनीची मूर्ती एकगर्भी मंदिरात ठेवली असून ती चतूर्भूज आहे. तिला सेंदूर लावलेला आहे. या मूर्तीच्या हातात प्रदक्षिणाक्रमाने शक्ति, खड्ग, डमरु आणि नरमुंड आहे. साधारणपणे १.५० मीटर उंचीची ही मूर्ती आहे. या मंदिरालगत दुसरे काळभैरवाचे एक मंदिर असून भैरवमूर्ती १.५० मीटर उंचीची त्रिभंगात उभी असलेली मुर्ती अष्टभुजा आहे. याच आवारात एक शिव मंदिर व हनुमान मंदिर आहे.

हनुमान मंदिर : मंदिरातील मूर्ती शेंदूर लावलेली आहे. रुद्राचा एक अंश म्हणून दाखविताना नेहमी असतो तशा उड्डान स्थितीत हनुमान दाखविला आहे. हनुमानाने आपला डावा पाय दानवाच्या मर्दनासाठी उचलला असून एक दानव त्याच्या पायाखाली दबला आहे. दानवाच्या नरड्यावर हनुमानाने पाय दिल्यामुळे चेहरा मागे गेला आहे व पाठमोऱ्या स्थितीत बसलेला दानव दाखविला आहे. मूर्ती २ मीटर उंचीची असून वैशिष्ट्यपूर्ण आहे. नमस्कार मारुतीप्रमाणे विदर्भात आढळणारे भोसलेकाळातील हे हनुमान शिल्प लक्षणीय ठरते.

महादेव मंदिर : पाताळलिंगी गर्भगृह असून गाभारा, त्यापुढील अंतराळ, सभामंडप व सभामंडपाच्या तिन्ही बाजूस असलेले अर्धमंडप अशी या मंदिराची रचना आहे. अधिष्ठानावर उभारण्यात आलेले हे मंदिर असून गाभाऱ्याचे प्रवेशद्वार द्विशाखीय आहे. यातील स्तंभशाखा उठावात असून खाली शैव द्वारपाल दाखविले आहेत. अंतराळ व अंतराळाच्या प्रवेशद्वारालगत दोन स्तंभ आहेत. पुढे सभामंडप असून सभामंडपाच्या तिन्ही बाजूंस तीन अर्धमंडप आहेत. मुळत: हा सभामंडप अर्धखुला मंडप होता. त्याच्या तिन्ही बाजूंस एक मीटर उंचीचा पारट

(ओटा) बांधण्यात आला होता. नंतर झालेल्या परिवर्तनामुळे हा मंडप बंदिस्त सभामंडप अशा स्वरूपात दिसतो. सभामंडपावर करोटक वितान आहे. एकात एक लहान होत जाणारी वर्तुळे असे वितानाचे स्वरूप आहे. येथील मुळ रंगशिलेवर नव्याने संगमरवरी फरशी बसवली आहे. अर्धमंडपाचे पुढील दोन पूर्ण स्तंभ असून स्तंभ माथ्यावर घंटा व साखळीची नक्षी आहे. तसेच वैशिष्ट्यपूर्ण भौमितीक नक्षी दाखविली आहे. मंदिराचे मुळ स्वरूप पाहता मुळात असलेल्या यादवकालीन मंदिराच्या भोसलेकाळात पुन्हा जिर्णोध्दार केल्याचे दिसते. मुळ मंदिरातील स्तंभ व स्तंभशीर्ष बांधकामात परत उपयोगात आणले गेले. मंदिराच्या बाह्यांगावर फारसे अलंकरण नसले तरी सलग जाणारे आडवे पट्टे दाखविले आहेत. मुळतः गर्भगृहाचा तलविण्यास पंचरथ असून यावरील शिखर नागर पध्दतीचे आहे. शिखरास शुकनास असून सभामंडपावर शंक्वाकृती शिखर आहे. उत्तर काळात निर्माण झालेल्या या शिखरात नागर शैलीचे अनुकरण असले तरी तत्कालीन शिल्पशैलीची वैशिष्ट्ये त्यात पाहावयास मिळतात. सभामंडपाच्या तिन्ही बाजूंस असलेल्या अर्ध मंडपावर तीन घुमुटाकार शिखरे आहेत. मुळात यादवकालीन असलेले मंदिर व त्याचा भोसले काळात झालेला जीर्णोध्दार. नागर आणि शंक्वाकृती शैलीचे शिखराचे काम व भोसलेकाळात रूढ झालेल्या इस्लामिक कला स्थापत्यांचा येथे प्रभाव दिसतो. येथील अर्धमंडपावरील असलेले घुमुटाकार शिखर आणि गर्भगृहावरील शिखरांच्या टोकावर चारही बाजूंनी उभारण्यात आलेल्या लहान महिरपींच्या प्रतिकृती व कलश यातून ही बाब जाणवते. पारंपारिक शिल्पशैली आणि मध्ययुगीन स्थापत्यांचे एकत्रित अनुकरण आपणास येथे पाहावयास मिळते.

गणेशकुंड : चारी बाजूंने प्रवेश असलेले आणि चार टप्प्यात पूर्ण करण्यात आलेले हे गणेशकुंड म्हणजे एक प्रशस्त अशी बारव आहे. या बारवेचे वैशिष्ट्य असे की, दक्षिण बाजूस मुख्य कुंडाच्या वर २.५० मीटर उंचीचा एक चौथरा बांधण्यात आला आहे. या चौथऱ्यावर मुळात पूर्वी एक मंडप असावा तो आज अस्तित्वात नाही. एकूण मुख्य कुंडासह २५ पायऱ्या आणि वरील बाजूस असलेल्या काहीशा अरुंद अशा २० पायऱ्या आहेत. एकूण ४५ पायऱ्या नंतर आपण सर्वात खाली असलेल्या कुंडापर्यंत पोहचू शकतो. साधारणतः १३ व्या शतकात निर्माण करण्यात आलेली ही एक उत्कृष्ट बारव आहे. तिला कुंपण घालून संरक्षित केले आहे.

पुष्करणी : या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी गणेश कुंडापासून जवळच एक विस्तीर्ण अशी पुष्करणी निर्माण करण्यात आली. साधारणपणे २०० x २०० मीटर अशा चौरस आकाराची पुष्करणी चारही बाजूने व्यवस्थित बांधलेली आहे. मध्ये विस्तीर्ण असा समतल पृष्ठभाग असून एकूण बांधकाम ४.५० मीटर उंचीपर्यंत आहे. वेगवेगळ्या पातळीवर आत उतरण्यासाठी दगडी पायऱ्या बांधण्यात आल्या असून चौथरे ठेवले आहेत. चारी कोपऱ्यात अर्धवर्तुळाकार बुरूजासारखे बांधकाम आहे. येथून मोटेची व्यवस्था करण्याचा प्रयत्न झाला आहे. चारी कोपऱ्यावर प्रत्येकी एक लहान मंदिर उभारण्यात आले होते आज ते पडलेल्या स्थितीत आहे. कायम स्वरुपाचा जलस्त्रोत उपलब्ध न झाल्यामुळे येथे पाणी दिसत नाही. निसर्गतः उपलब्ध होणारे पाणी या पुष्करणीत साठवता यावे यादृष्टीने पुष्करणीच्या तीन्ही बाजूने कृत्रिम टेकडी तयार केली आहे. भोसले काळामध्ये हे काम झाले असावे.

विहीर : गावात एक विहीर दगडी चिऱ्यांमध्ये बांधण्यात आली असून विहीर दुमजली आहे. पूर्व बाजूने विहिरीच्या तळापर्यंत जाण्यासाठी २०० पायऱ्या आहेत. दुसऱ्या माळ्यावर जाण्यासाठी याच प्रवेशमार्गाच्या मध्यभागातून आणखी वेगळा प्रवेशमार्ग पायऱ्या, दुसऱ्या माळ्यावरून पहिल्या माळ्यावर जाण्यासाठी ठेवला आहे. मुख्य विहीर अर्धवर्तुळाकार असून लाल कुरुंदाच्या दगडात बांधली आहे. विहिरीचा व्यास २.५० मीटर असून विहिरीवर मोट बसविण्यासाठी व्यवस्था केली आहे. प्रवेशद्वारावर एकूण तीन कमानी असून प्रत्येक कमानीच्या प्रवेशालगत ३० से.मी. (एक फूट) उंचीचा कठडा ठेवला आहे. या विहिरीचे बांधकाम उत्तर मध्ययुगात प्रारंभिक भोसले काळात झाले असावे.

एकूण अदासा या क्षेत्राच्या ठिकाणी यादवपूर्व काळापासूनचे वास्तू अवशेष पाहावयास मिळतात. या स्थानाचा मोठ्या प्रमाणात विकास १६ व्या १७ व्या शतकात झाला आहे. (कार्यालयाने केलेल्या सर्वेक्षणाआधारे जून २००२ मध्ये.)

अदासा या स्थानालगत असलेल्या पर्वतातील गुहेमध्ये १९ व्या शतकाच्या प्रारंभिक दशकात बगाजी गुरे हा एक सिध्द पुरुष येथे होऊन गेला. बगाजींनी येथील तीर्थस्थानांची नावे निश्चित केली असून चेरूण तीर्थ, (शहरातील विहीर) ओंकार तीर्थ (विस्तीर्ण पुष्करणिका) मुश्क तीर्थ, (पाय-यायुक्त बारव) इष्कू सागर, (लहान जलाशय) बिंदु तीर्थ, (पर्वतावरील खंदक, चर) मधुसुधा तीर्थ, (हे धापेवाड्यालगत आहे) पापविमोचन तीर्थ, (खापारोड लगत असलेला ओहळ) अशी नावे आहेत. पहिल्या रघुजीच्या मुलाने मुळात असलेल्या ओंकार तीर्थाचे दगडी बांधकाम करून घेतले. तथापि उत्तर-दक्षिण बाजूच्या पायऱ्या ढासळल्यावर दुसरा रघुजी भोसल्याची राणी बकाबाई हिने त्याची पुन्हा दुरूस्ती करून घेतली. आज मुळातील बांधकाम ढासळलेल्या स्थितीत आहे. गणेशतीर्थ हे या परिसरात असलेल्या अष्टतीर्थापैकी एक आहे. रघुजी भोसले याच्या काळात जनीबाईची नाटकशाळा सिमा भिंतीसह बांधली होती. (कझिन्स, हेन्री **"ॲन्टीक्वेरीयन रिमेन्स इन द सेंट्रल प्रोव्हिन्सेस ॲण्ड बेरार"** (पुनर्मुद्रित प्रत) १९७१, पृ. १, व २.)

अंभोरा

अंभोरा : (ता. कुही, २१°००' उ., ७८°३०' पू.) क्षेत्र अंभोरा हे नागपूरच्या आग्नेयेस ५६ कि. मी. तर कुहीच्या पूर्वेस ८० कि. मी. अंतरावर वैनगंगा, कन्हान व आम या तिन्ही नद्यांच्या संगमावर मध्यभागी वसले असून ते तीर्थस्थान आहे.

मराठीचे आद्य कवि मुकुंदराज यांनी याच तीर्थक्षेत्री, श्री स्वामी हरिहरनाथ शिष्य रामचंद्र उर्फ रघुनाथ महाराज यांच्या समाधी समोर "विवेक सिंधु" हा ग्रंथ लिहिला अशी मान्यता आहे. श्री क्षेत्र आंभोरा तीर्थक्षेत्री श्री स्वामी हरिहरनाथ महाराज व त्यांचे शिष्य रामचंद्र उर्फ रघुनाथ महाराज या गुरु शिष्यांची संजीवन समाधी आहे. श्री. स्वामी हरिहरनाथ महाराजांनी याच ठिकाणी १८ वर्षे "पशुपत", व्रत करून मोठे यज्ञ केले होते. त्यातूनच श्री "चैतन्यश्वर" प्रभू प्रगटले. यांचे मंदिर येथील सर्वांत उंच टेकडीवर आहे. चैतन्यश्वराची लिंगपिंड ही रुद्राक्षरुपी आहे. याच तीर्थक्षेत्री गणपती, गंगा, मारुती, विठ्ठल रुक्मिणी व श्री स्वामी पं. रंगलालजी नागदा गुरु महाराजांचे मंदिर आहे. त्याला लागूनच सतीमाता,

उरकुडा महाराज, इतवारपूरी महाराज व नेपाळ नरेशाच्या मुलाची समाधी बांधलेली आहे. वैनगंगा, कन्हान व आम या नद्यांच्या संगमाच्या लगत हे स्थान असून त्रिवेणी संगम म्हणून ओळखतात. याच स्थानावर नद्यांच्या प्रवाहामुळे वैशिष्ट्यपूर्ण आकार प्राप्त झाला असून येथे कार्तिक अमावस्या व महाशिवरात्रीला मोठी यात्रा भरते. (**नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९६६, पृ. ६९७ व श्रीक्षेत्र अंभोरा देवस्थान व्यवस्थापक मंडळाकडून प्राप्त नोंदीआधारे.)

अंभोरा येथे हरिनाथ स्वामीमंदिर, चैत्यन्यश्वर समाधी याबरोबर राम व गणेश ही मंदीरे आहेत. हरिहर स्वामी समाधी लगत असलेल्या सभामंडपाचे बांधकाम नागपूर येथील भोसले यांनी केले असून या वास्तुच्या सभोवताली असलेल्या सीमाभिंतीच्या दुरुस्तीचे काम नानासाहेब चिटणीस यांनी केले. येथील श्रध्दास्थानाच्या दुरुस्ती व जतनाविषयक कामामध्ये अंतोषा कालार यांचेही नाव कझिन्स यांनी नोंदविले आहे. (कझिन्स हेन्री, पूर्वोक्त, पृ. २.) गिरी महाराजांची समाधी, गंगेचे मंदिर तसेच अलीकडील काळात येथे रंगलाल महाराज मंदिर, विठ्ठल रुखमाई मंदिर व बौध्द विहारपण बांधला आहे. हे स्थान पर्यटनस्थळ म्हणून घोषित करण्यात आले आहे.

उमरेड

उमरेड : (ता. उमरेड, २०°५०' उ., ७९°१५' पू.) नागपूरच्या आग्नेयेला ४५ कि. मी. अंतरावर हे स्थान वसले असून "उमरेड" हे स्थळनाम उंबर या वृक्षराजीपासून प्राप्त झाले असावे. सन १८५० मध्ये उमरेड हे महसूल विभागाचे केंद्र म्हणून कार्यान्वित झाले.

किल्ला : नगरपरिषद कार्यालयाच्या मागील बाजूस किल्ला असून गोंड राजा करन शाह याच्या काळात याची निर्मिती झाली. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** महाराष्ट्र स्टेट, बॉम्बे, १९६६, पृ. ७७६.**)** तथापि, हा किल्ला १७८३ मध्ये बांधला असून तो दुसरा रघुजी भोसले याचा राजवाडा बांधणारा स्थपती करीमखान यानेच बांधला अशी नोंद नव्याने उपलब्ध झाली आहे. किल्ल्यास सहा बुरूज होते. त्यापैकी केवळ एक बुरूज आज अस्तित्वात आहे. किल्ल्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टिने किल्ल्याच्या दक्षिण बाजूलगत जलाशय निर्माण करण्यात आला होता. किल्याच्या तटबंदीच्या मध्ये एक शिवमंदिर व हनुमान मंदिर आहे. शिवमंदिर मध्ययुगीन काळातील असून त्यावर अनेक शिल्पांचे अंकन पाहावयास मिळते. किल्ला राज्य पुरातत्व विभागाचे संरक्षित स्मारक आहे. किल्ल्यामध्ये सध्या एक हायस्कूल कार्यान्वित असून नगरपरिषदेने येथे उद्यान विकसित केले आहे. किल्ल्यालगत असलेल्या जलाशयाच्या काठी विठ्ठल रखुमाई मंदिर, माता मंदिर तसेच लगतच अन्य एक मंदिर आहे. (अंधारे भा. रा., **'भोसलेकालीन नागपूर'** (नागपूर २००१) मध्ये रघुजी भोसले, यांच्याविषयीची नोंद मेणवली दप्तर पुणे आधारे केले आहे. पृ. १३९.) गावामध्ये आझाद चौकात सुभाषचंद्र बोस यांचा अर्धपुतळा उभा करण्यात आला आहे.

कळमेश्वर

कळमेश्वर : (ता. कळमेश्वर) नागपूरच्या पश्चिमेला १९.३१ कि. मी. अंतरावर आहे. नागपूर-काटोल मार्गावर असलेले हे लहानसे गाव आहे. कदंब वृक्षापासून कळमेश्वर-कळमेश्वर असे हे ग्रामनाम रूढ झाले असावे. या परिसरात कदंब, पिंपळ, वटवृक्ष

आढळतात. गावामध्ये श्री कदंबेश्वराचे स्वयंभू असे शिवमंदिर आहे. या स्थानावरून सुध्दा हे स्थलनाम रूढ झाल्याचे सांगतात. हे स्थान विणकामाच्या व्यवसायासाठी महत्त्वाचे मानले जाई. नागपूर-इटारसी या रेल्वेमार्गावर आहे. संत्रा उत्पादन करण्यासाठी हा परिसर प्रसिध्द असून या परिसरात संत्राच्या बागा मोठ्या प्रमाणात आढळतात. स्थानिक परंपरेनुसार मोगलकाळामध्ये जयसिंग राणा नावाच्या एका क्षत्रीयाने एक लहान सैन्य तुकडी घेऊन पारशिवनी येथे गोंडाचा पराभव केला व आपले मुख्य स्थान म्हणून कळमेश्वराची निवड केली. या स्थानाची देशमुखी जयसिंग राणाकडे पुढील काही पिढ्या कायम राहिली. कळमेश्वर नगरपालिकेची स्थापना १८६२ मध्ये करण्यात आली. गावाच्या मध्यभागी देवालय असून गर्भगृहामध्ये असलेल्या पीठावर राम-लक्ष्मण-सीता या मूर्ती आहेत. गर्भगृहास असलेला दरवाजा पितळाने मढवलेला आहे. प्रवेशद्वारालगत दोन ओटे असून येथील भिंतीवर विविध देवदेवतांच्या प्रतिमा कोरण्यात आल्या आहेत. गर्भगृहासमोर एक खुला मंडप असून मंडपाच्या परिसरामध्ये आबाजीमहाराज, नगाजीमहाराज, सावजीमहाराज आणि फकरीमहाराज यांच्या समाध्या आहेत. आबाजी महाराजांच्या नावाने हे देवालय ओळखले जाते. रामनवमी दिवशी येथे उत्सव साजरा होतो.

किल्ला : पेंढाऱ्यांच्या हल्ल्यापासून संरक्षण करण्याच्या दृष्टीने येथे मातीचा एक किल्ला बांधण्यात आला होता. किल्ल्याच्या आतमध्ये शिवमंदिर असून मंदिराचा गाभारा अष्टकोनी आकाराचा आहे. मंदिराखाली तळघर असल्याचे सांगतात. आता किल्ला मूळ स्वरुपात नसला तरी अवशेष स्वरुपात शिल्लक आहे. मंदिर व किल्ला भोसले काळात बांधला असावा. हेन्री कझिन्स याने आपल्या गवेषण अहवालात नोंदविले आहे की, गावाच्या मध्यभागी विस्तीर्ण मैदान असलेल्या तटबंदीची निर्मिती दिल्ली येथील हिंदू कुटुंबाकडून करण्यात आली असावी, देवगड येथील गोंड राजा बख्त बुलंदच्या वेळी येथे ४०० पायदळ व १०० घोडदळाचे पथक उपलब्ध करून देण्यात आले होते. (कझिन्स, हेन्री, पूर्वोक्त, पृ. ५.)

श्री हरीनाथमहाराज मठ : मठ चांगल्या स्थितीत असून तो भोसले काळात बांधण्यात आला. मठासाठी एक स्वतंत्र सीमाभिंत असून ती मातीची आहे. आतमध्ये चौथऱ्यावर उभारलेला सभामंडप आहे. उत्तरबाजूस असलेल्या सीमाभिंतीस एक नगारखाना आहे. गाभाऱ्यामध्ये विठ्ठल-रखुमाईची मूर्ती असून मठ संत दाजीबा पाठक उर्फ मुरहरनाथ यांच्या नावाशी संबंधित आहे. निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर, चुडामणीनाथ, नारायणनाथ आणि गुंडानाथ यांच्या परंपरेतील श्रीलिंगनाथ यांच्याकडून दाजीबा पाठक यांना आध्यत्मिक वारसा मिळाल्यानंतर त्यांचे मुरहरनाथ असे नामकरण करण्यात आले. पुढे हेच देवस्थानाचे व्यवस्थापन करीत. येथे प्रतिवर्षी चैत्र महिन्यात मोठा उत्सव साजरा केला जाई. रथयात्रा निघते. मुरहरनाथ यांनी आत्मज्ञानप्राप्तीनंतर मराठी व हिंदीमध्ये काव्यरचना केली. पुढे दाजीबांचे पुत्र श्रीहरीनाथ पाठक यांनी हा वारसा चालविला. त्यांच्या नावानेच हा मठ ओळखला जातो.

कळमेश्वराचे मंदिर : हेमाडपंती पध्दतीतील हे मंदिर असून फारसे शिल्पकाम नसलेले पण भक्कम अशा चिरेबंदी स्वरुपात बांधलेले आहे. येथील शिवलिंगावरूनच या गावास कळमेश्वर हे नाव प्राप्त झाल्याचे सांगतात.

अनुक्रमणिका

महादेव मंदिर : श्री हरीनाथ या मठापासून जवळच हेमाडपंती पध्दतीचे एक छोटे महादेव मंदिर आहे. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** महाराष्ट्र स्टेट, बॉम्बे, १९६६ पृ. ७०२-७०३.) एकगर्भी मंदिरास असलेल्या दगडी चौकटीस लाकडी दरवाजे बसविले आहेत. गर्भगृहातच शिवपंचायतन असून त्यामध्ये गणपती, नाग व अन्य मूर्ती आहेत. या मंदिराच्या लगतच हनुमानाचे एक मंदिर आहे. कळमेश्वरच्या नवीन विस्तारीत वसाहतीमध्ये एक जुने राममंदिर आहे. तसेच श्री दत्तमंदिर, सावतामंदिर व गजानन मंदिर आहे. येथे असलेल्या जलाशयाच्या किनाऱ्यावर ताजुद्दीन बाबाचा एक दर्गा आहे.

काटोल

काटोल : (ता. काटोल, २१°१५' उ. ७८°३५' पू.) नागपूरच्या वायव्येला ५७.९४ कि.मी. अंतरावर असून मद्रास-दिल्ली रेल्वे मार्गावर नरखेडपासून ३०.६० आणि मोवाडपासून ४२ कि. मी. अंतरावर आहे. खरंगणा-कोंढाली-काटोल या राज्य मार्गावर हे स्थान वसले आहे. येथे कापसाची मोठी व्यापारपेठ आहे. अलीकडील अर्धशतकामध्ये कापूस जीनींग मिल असलेल्या ईशान्येकडील उंचवट्याच्या भागात शहराचा विस्तार झाला आहे. महाभारतामध्ये या स्थानाचा उल्लेख कुंतलपूर असा आला आहे. कुंतल राजाच्या राजधानीचे ठिकाण असून त्याचे प्राचीन नाव कुंतलपूर व कालांतराने काटोल असे रूढ झाले. येथे दोन यादवकालिन मंदिरे असून गोंड काळात मातीत बांधण्यात आलेला एक किल्ला होता. धर्माजी भोसले यांच्या राजवटीमध्ये हे गाव पेंढाऱ्यांकडे होते. तो भोसल्यांना नियमित खंडणी देत असे. तसेच अन्य लुटारू टोळ्यांपासून या भागाचे रक्षण करीत असे. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** महाराष्ट्र स्टेट, बॉम्बे १९६६, पृ. ७१३)

शारदादेवी मंदिर : मंदिर एका चौथऱ्यावर बांधलेले आहे. मंदिरामध्ये असलेली मूर्ती स्वयंभू असल्याचे मानले जाते. येथे शारदादेवीच्या दोन मूर्ती दाखवतात. मंदिरासमोर एक चौरस आकाराचे कुंड असून ते साधारणपणे ६ x ६ मीटर आकाराचे आहे. त्यात कायमस्वरूपी पाणी असते. एक पवित्र तीर्थ म्हणून यास मान्यता आहे. स्थानालगत एक शिवकुंड असून गणपती व हनुमानाची मूर्ती आहे. परिसरामध्ये काही समाध्या आढळतात. शारदोत्सवाच्यावेळी आणि चैत्र शु. पौर्णिमेला येथे यात्रा भरते.

कर्पूरेश्वर मंदिर : येथील कर्पूरेश्वर मंदिर आणि चंडिकामाता मंदिर ही दोन्हीही मंदिरे लतीननागर मंदिराची उत्तम उदाहरणे आहेत. या मंदिरांचे राजूरा आणि मार्कण्डी येथील अशाच प्रकारच्या मंदिरांसी साम्य आहे. मंदिर पूर्वाभिमुख असून त्यात अंतराळ आणि गर्भगृह, त्यापुढील विटात बांधलेला मंडप अशी रचना आहे. दगडाने बांधलेल्या मंदिराचा तलविन्यास केवळ गर्भगृह व त्यापुढील अंतराल असा आहे. गर्भगृहाचा तलविन्यास पंचरथ आहे. शिखरावर चार मुख्य दिशांनी लता असून कोनावर भूमि-आमलक आहे. लतेच्या मध्यभागी शूरसेनक असून त्यावर चैत्य गवाक्षाचे अलंकरण आहे. प्रतिरथ साधे सपाट असून त्यावर कोणतेही अलंकरण नाही. तळाशी असलेल्या शूरसेनकात कोणतेही मूर्तिशिल्प नाहीत. गर्भगृहाच्या मंडोवरावर शिल्पकृतिंनी युक्त असे दोन जंघा भाग आहेत. या भागांवर

अष्टदिक्पाल आणि सूरसुंदरी दाखविली असून भद्रामधील देवकोष्ठामध्ये परिवार देवता आहेत. मार्कण्डी येथील मंदिराप्रमाणे याही मंदिराच्या सलितांतर भागात व्यालशिल्पे आहेत. या दोन जंघाभागाखाली असलेल्या वेदीबंधावर कुंभ, कलश, कपोल आणि मंची हे थर आहेत. शिखराचे मूळ आमलक आणि कळस आज शिल्लक नाहीत. त्या जागी सध्या विट आणि चुना यांच्या सहाय्याने कळस बांधण्यात आला आहे.

चंडिकामाता मंदिर : चंडिकामाता मंदिराचीही कमालीची पडझड झाली असून त्याची अगदी अलीकडच्याच काळात मोठ्या प्रमाणावर दुरूस्ती करण्यात आली आहे. त्यामुळे मंडप आणि अंतरालाच्या वरचे मजले आणि त्यांच्या भिंती नव्याने बांधण्यात आल्या आहेत. मुख्य शिखराचीही बरीच पडझड झालेली असून शिखराचा वरचा अर्धा भागही आधुनिक काळातील निर्मिती आहे. गर्भगृहाचा तलविन्यास त्रिरथ असून मुखमंडप, मंडप, अंतराळ आणि गर्भगृह अशी त्याची रचना आहे. मूळ मंडप अर्धखुला असून त्याच्या बाह्यांगावर वेदिका होती आणि वामनभिंतीवर आतील अंगास वामनस्तंभ होते. या अर्धखुल्या मंडपाच्या मध्यभागी चतुष्की असून या चतुष्कीवर उत्तरोत्तर लहान होत जाणाऱ्या दगडी वलयांनी युक्त असलेले घुमटाकार छत पेललेले आहे. चौरस तळखडा, तीन अष्टकोनी घटक आणि त्यांच्यामध्ये कणी, त्यावर कुंभी, कलश आणि हस्त असा घटकक्रम असलेले स्तंभ भटाळा भागातील मंदिरांच्या स्तंभांशी साधर्म्य दाखवतात. गर्भगृहाच्या बाह्यांगावर कर्पूरेश्वर मंदिराच्या गर्भगृहाच्या बाह्यांगाप्रमाणेच वेदीबंध आढळतो. आणि या वेदीबंधाच्या वरच्या भागात दोन जंघा आढळतात. या मंदिराचा जीर्णोध्दार शिल्पशास्त्रांचे सर्व संकेत डावलून झाल्याने मुळत: मंदिरावर लतिननागर प्रकारचे शिखर होते आणि कोनांवर भूमिआमलक होते एवढेच सांगता येईल. जंघा भागावरील शिल्पाकृतींचा केवळ अंदाजच बांधावा लागेल.

काटोल येथील या दोन मंदिरांवरील शिल्पाकृती, वास्तुशास्त्रीय शैली, तलविन्यास, मंडोवर आणि शिखर यावरील अलंकरण आणि राजुरा येथील मंदिराशी असणारे साधर्म्य लक्षात घेता ही दोन्ही मंदिरे इ. स. च्या तेराव्या शतकात बांधली गेली असे दिसते. **(राज्य गॅझेटिअर : स्थापत्य व कला, खंड १, भाग-२,** महाराष्ट्र शासन, मुंबई-२००२ पृष्ठ १५३-१५४.)

कान्होली

कान्होली : (ता. हिंगणा) नागपूरच्या नैऋत्येस ३७ कि. मी. वर अन्नपूर्णा नदीच्या किनाऱ्यावरील एक गाव. मालगुजारी पध्दतीखाली हे गाव दोन ब्राह्मण कुटुंबांच्या ताब्यात होते. दुसऱ्या बाजीरावाच्या काळात "कारभारी" पदासारखेच पद सांभाळणाऱ्या या कुटुंबाने या गावाचा ताबा मिळविला होता. सध्या या गावाच्या सभोवती जंगल नसले तरी पूर्वी येथे घनदाट जंगल होते. त्याबाबत एक कथा अशी की, एक मोगल बादशहा या जंगलातील एक वृक्ष तोडून त्याचे खोड गाडीत घालून नागपूरला घेऊन चालला होता. परंतु कान्होलीच्या ३.२१९ कि. मी. अंतरावरील सिंधारदीप या ठिकाणाच्या पुढे हे खोड त्यास पुढे नेता येईना. दैवी शक्ती खोड पुढे जाऊ देत नव्हती असे समजून ते खोड, त्याने त्याच ठिकाणी सोडून दिले. काही दिवसानी त्या खोडाचे तुकडे झाले. या अवशेषांची मायाळ देव म्हणून पूजा

करण्यात येऊ लागली. ज्याच्या जवळच मातोबा या ग्रामदेवतेचे एक छोटेसे मंदिर आहे. पेंढारी लोक कान्होली गावची लुट करण्यासाठी जंगलात आले असताना मातोबाच्या प्रभावामुळे अंध झाले अशी एक कथा आहे. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** महाराष्ट्र स्टेट, बॉम्बे, १९६६ पृ. ७१०)

कामठी

कामठी : (ता. पारशिवनी) जुनी कामठी या नावाने ओळखतात. नागपूरपासून १३ कि. मी. अंतरावर कन्हान नदीच्या काठावर वसले असून स्वतंत्र नगरपरिषद आहे. कन्हान, कोलार व पेंच या त्रिवेणी नदीच्या संगमावरील एका उंच टेकडीवर कामठेश्वराचे मंदिर आहे. मंदिरास एक सीमाभिंत बांधली असून सीमाभिंतीच्या आत उंच चौथऱ्यावर गर्भगृह त्यासमोर आयताकार मुखमंडप अशी या मंदिराची रचना आहे. गर्भगृहाच्या प्रदक्षिणापथावर तिन्ही बाजूंना सरदार स्तंभ व कमानीचा आधार असलेला सज्जा आहे. मुखमंडपाच्या समोरील नंदीमंडपात नंदीची मूर्ती आहे. गाभाऱ्यात शिवपिंड असून येथे शिवपंचायतन मूर्ती आहेत. यामध्ये गणेश, अन्नपूर्णादेवी, विष्णु आणि शिव यांच्या मुर्त्या आहेत. शिवमूर्ती कमळावर बसली असून तिच्या एका हातात पुष्प व दुसऱ्या हातामध्ये शंख दाखविला आहे. याशिवाय नागप्रतिमा आहे. भोसले काळात उभारलेले हे उत्कृष्ट मंदिर असून दगडी गर्भगृहाच्या वर वर्तुळाकार पध्दतीने कमी होत जाणारे छत आहे. यावर शिखर असून हे एकात एक कमी होत जाणारे, तीन टप्प्यात निर्माण झाले आहे. शिखराच्या प्रत्येक टप्प्यावर महिरपीयुक्त कमानी दाखाविल्या असून त्यावर लहान शिखर व कलश आहे. मंदिराच्या बाह्यभागावर चारही बाजूने पुढे आलेल्या सज्जाला आधार देणाऱ्या महिरपीयुक्त कमानी व शिल्पकाम या वास्तूशैलीचे वैशिष्ट्य स्पष्ट करतात. कामठेश्वर या नावावरून या स्थानाला कामठी हे नाव रूढ झाले. गावात एक गणेश मंदिर आहे. हे मंदिरही भोसले काळातील असले तरी आता अलीकडील काळात त्याचा नव्याने जीर्णोध्दार झाला आहे. टिपू पटेल यांची समाधी या परिसरात आहे. मंदिरातील गणेशाची मूर्ती ही सर्वसाधारणपणे दीड मीटर उंचीची असून या मंदिरालगत अन्य एक शिव मंदिर आहे. येथे भैरव व भवानी मातेच्या मूर्ती आहेत.

कामठी गाव

कामठी गाव : (ता. कामठी) नागपूर-जबलपूर राज्य महामार्ग क्र. ७ वर नागपूर पासून १६ कि. मी. अंतरावर कामठी आहे. मूलत: कामठी कॅन्टोनमेंटच्या निर्मितीनंतर या स्थानाचा विकास झाला असला तरी आज स्वतंत्र नगरपालिका असून कामठी हे तहसिल मुख्यालय आहे. श्री महालक्ष्मी, जगदंबा मंदिर तसेच ताजुद्दीनबाबा यांची जन्मभूमी असलेले स्थान आहे. महालक्ष्मी मंदिरातील देवी मूर्ती ३.६० मी. उंचीची आहे. हे कन्हान नदीच्या काठावर वसलेले असून येथे रंग व बिडी तयार करण्याचे उद्योगधंदे आहेत. मोमिन समाजाचे लोक मुख्यत: या क्षेत्रात असून ते कुशल विणकरही आहेत. जुलै १९२७ मध्ये कामठी नगरपालिकेची स्थापना झाली. कामठी येथे नगरपालिकेने निर्माण केलेली एक बाग असून तिला महात्मा गांधी उद्यान या नावाने ओळखतात.

कामठी नावाने ज्ञात असलेली जी गावे नागपूर जिल्ह्यात आहेत त्यामध्ये तेलकामठी, जामोदकामठी, जुनी कामठी या नावांची स्थाने असून ब्रिटिशांनी जुनी कामठी लगत कॅन्टोनमेंट क्षेत्र विकसित केल्यामुळे याला सदर कामठी म्हणूनही ओळखतात. गावात हुतात्मा स्मारक आहे.

दिगंबर जैन मंदिर : दिगंबर जैन मंदिर रामटेकच्या मार्गावर असून ते एक उत्कृष्ट मंदिर आहे. या मंदिराचे वैभव व स्थापत्य पाहता पूर्वी येथे जैन समाज मोठ्या प्रमाणात राहात असावा असे वाटते. आज मात्र जैन समाज अल्प संख्येने आहे. येथील जैन मंदिर भोसलेकाळात निर्माण झाले असे दिसते. मूर्ती मात्र त्या आधीच्या काळातील असाव्यात. हे मंदिर गावाच्या मध्यस्थानी पारावर ओलीमध्ये आहे. मंदिराचे एकूण क्षेत्रफळ ३६ x ३१ मीटर आहे. मंदिराची रचना एका जगतीवर उभे असलेले गर्भगृह व त्यापुढील मोठा सभामंडप १० x १८ मीटर त्यापुढील मुखमंडप अशा स्वरुपाचा असून मुख्य गर्भगृहाच्या खाली एक तळघर आहे. मंदिरावर एकूण सात शिखरे आहेत. मुलनायक सुपार्श्वनाथ, आदिनाथ, पार्श्वनाथ, मुनीसुवृत्तनाथ, आदिनाथ ह्या मुर्तीच्या गाभाऱ्यावर उंच दगडी शिखर आहे. तर पुष्पदंत व नेमीनाथ स्वामी यांच्या गाभाऱ्यावर चुना व विटात बांधलेले घुमटाकार कलश आहेत. यातील सर्वाधिक उंच शिखर हे १०.६० मी. चे आहे. त्रिशंकू आकाराचे वर निमुळते होत जाणारे शिखर चमत्कृतिजन्यच मानावे लागेल. शिखराची रचना करताना वेगवेगळ्या भूमी म्हणजे टप्पे न दर्शविता सरळ शंक्वाकृती निमुळते होत जाणारे शिखर आहे. चारही बाजूंला असलेल्या लतांच्या मध्यभागी देवकोष्ठ व त्यात तिर्थंकर मूर्तीची प्रतिष्ठापना केली आहे. दोन लतांच्या मध्ये असलेल्या एकावर एक चढत जाणारे वर्तुळाकार कलशांच्या तीन रांगा हे याचे वैशिष्ट्य मानावे लागते. मंदिराच्या बाह्यांगावर महिरपियुक्त दगडी स्तंभ असून या स्तंभावर उत्कृष्ट प्रकारचे काष्ठशिल्प असावे त्याप्रमाणे काम केले आहे. यामध्ये बाह्यांगावर वैविध्यपूर्ण शिल्पकृतीमध्ये जैन पद्मपुराण, हरीवंशपुराणात वर्णन केलेल्या रामायण व महाभारत या पौराणिक कथानकातील प्रसंग, पशु-पक्षी, व लतावेलींचे चित्रण केले आहे. १६ स्वप्ने उत्कृष्टपणे दर्शविली आहेत. विशेष म्हणजे हे मंदिर संपूर्ण पाषाणात असून उत्कीर्ण शिल्पकृती, भिंतीवरील नक्षीकाम, गर्भगृहातील प्रवेशद्वार काष्ठशिल्पाचा अभास करून देतो. मंदिराची निर्मिती मध्ययुगीन कालखंडात झाली आहे. मंदिरामध्ये एकूण लहान-मोठ्या अनेक प्रतिमा असून या प्रतिमा ग्रॅनाइट, संगमरवरी तसेच पितळी धातुच्याही आहेत. प्रतिमेमध्ये भगवान सुपार्श्वनाथ मूर्ती मूलनायक प्रतिमा प्रमुख आहे. मूर्ती संगमरवरात असून ती १२३ सें. मी. उंचीची आहे. ती उंच चौथऱ्यावर पद्मासनात आहे. सभागृहामध्ये भगवान आदिनाथ याची पाषाणात प्रतिमा असून ती ११७ सें. मी. ची आहे. मंदिराच्या खालील तळघरात भगवान महावीराची खडगानस्त प्रतिमा १३७ सें. मी. ची असून या मुर्तीस १९६५ मध्ये वज्रलेप चढविण्यात आला. या मूर्तीच्या संदर्भामध्ये काही समज प्रचलित असून अदृश्य देवलोकांच्याकडून याची पुजा होत असते अशी मान्यता आहे. याशिवाय मंदिरामध्ये नेमिनाथ, पुष्पदंत, आदिनाथ, मुनिसुवृतनाथ, चंद्रप्रभू याच्या बाळस्वरुप दर्शविणाऱ्या प्रतिमा आहेत. मंदिरामध्ये एकूण लहानमोठी नऊ देवकोष्ठे असून त्यामध्ये विविध मूर्ती आहेत. मंदिराच्यावतीने पयुषणपर्व, महावीर जयंती यासारखे उत्सव नियमितपणे साजरे होतात. १९५७ पासून या मंदिराची व्यवस्था नोंदणीकृत विश्वस्तांकडून पाहिली जाते. (कार्यालयाने केलेले सर्वेक्षण (जून २००२) व श्री दिगंबर जैन परवार मंदिर ट्रस्ट यांच्याकडून कार्यालयास प्राप्त नोंदीआधारे.)

ड्रॅगन पॅलेस टेम्पल : नागपूर पासून १५ कि. मी. अंतरावर कामठीजवळ ड्रॅगन पॅलेस टेम्पल निर्माण करण्यात आले आहे. जपानी महिला श्रीमती नोरीको ओगावा यांच्या मदतीने ॲड. सुलेखाताई कुंभारे यांनी परिनिर्वाणस्थ का इझेन सुझुकी व परिनिर्वाणस्थ ताइको सुझुकी यांच्या स्मृतिसाठी व दादासाहेब कुंभारे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ ही वास्तू उभारली आहे. दहा एकराच्या परिसरात विकसित करण्यात आलेल्या या स्मारकाच्या समोर नामु-म्योहो-रेन्गे-क्यो (नम:सध्दर्म पुण्डरिक सुत्राय) हा सिध्दमंत्र लिहिलेला एक चौरस स्तंभ उभारलेला आहे. विहाराच्या तळमजल्यावर सभागृह, ग्रंथालय, संग्रहालय याची निर्मिती करण्यात आली असून ९ मीटर उंचीच्या असलेल्या मुख्य विहारमंडपात जाण्यासाठी २७ पायऱ्या चढून जावे लागते. विहारमंडपात जाण्यासाठी चारही बाजूने प्रशस्त असा प्रवेशमार्ग निर्माण करण्यात आला आहे. या वास्तूच्या निर्मितीमध्ये देशविदेशातील ग्रॅनाइट, ग्लास, लाकडी सजावटीचे साहित्य, झुंबर उपयोगात आले आहेत. प्रथम मजल्यावर असलेल्या विशाल सभागृहात गौतम बुध्दाची आकर्षक मूर्ती असून ही अखंड चंदनाच्या लाकडातून तयार केलेली असून २.४० मीटर उंचीची व ८६४ किलो वजनाची आहे. ही मूर्ती कमलपुष्पावर पद्मासनात बसलेली ध्यानस्थ मूर्ती आहे. वेगवेगळ्या बाजूने पाहिल्यास त्यावर वेगळ्या भावमुद्रांचे दर्शन होते. ड्रॅगन पॅलेसच्या या वास्तूच्या भिंती श्वेतवर्णी असून येथे शांती, पावित्र्य आणि प्रसन्नतेचा अनुभव येतो. मूर्तीसमोर ठेवलेले चाटिंग (ड्रम) वाजवून पवित्र मंत्रघोषामध्ये येथे उपासना केली जाते. वास्तूत राजस्थानचा संगमरवरी दगड, आग्र्याचा लाल दगड, दक्षिण भारतातून कुशल कारागिरांनी तयार केलेले ग्रॅनाईटचे कठडे आणि गिलाव्याशिवाय निर्माण करण्यात आलेल्या केवळ काँक्रीटच्या भिंती हे या वास्तूचे वैशिष्ट्य आहे. २३ नोव्हेंबर १९९९ रोजी या वास्तूची निर्मिती पूर्ण होऊन ती सर्वांसाठी खुली करण्यात आली. इंडियन काँक्रीट असोसिएशनचा वर्ष २००० चा 'दि बेस्ट काँक्रीट कन्स्ट्रक्शन' हा पुरस्कार या बुध्दविहारासाठी घोषित करण्यात आला. विदर्भामध्ये नव्याने निर्माण झालेले हे एक प्रमुख पर्यटक क्षेत्र असून याचा परिसर योग्य पध्दतीने सुशोभित करण्यात आला आहे. (कार्यालयाने केलेले सर्वेक्षण जून, २००२)

कामठी कॅन्टोनमेंट : (ता. कामठी २१°१०' उत्तर, ७९°१२' पूर्व) नागपूरपासून १६ कि. मी. अंतरावर आहे. दक्षिण-पूर्व रेल्वेमार्गावरील हे स्थान कन्हान नदीच्या उजव्या किनाऱ्यावर दाट वनराई असलेल्या भागात वसले आहे. या स्थानाची समुद्र सपाटीपासून उंची ३०३.५८१ मीटर आहे. सन १८२१ मध्ये येथे ब्रिटिशांनी लष्करी छावणीची स्थापना केली, तेव्हापासून कन्हान नदीकाठच्या या लहान लष्करी वसाहतीला कामठी कॅन्टोनमेंट असे म्हटले जाऊ लागले. १८२१ पूर्वी तेथे एक-दोन कुटुंबे राहात होती. या लष्करी छावणीची जमीन अजनी, वारेगाव आणि एलखेडा या खेड्यातून संपादित करण्यात आली. छावणीचे मूळ क्षेत्र २०६५.२६२ हेक्टर होते. १९२७ मध्ये ते कामठी नगरपालिकेची स्थापना झाल्यानंतर ते कमी होऊन ५६७.३७ हेक्टर इतके ठेवण्यात आले. कामठी शहर व बागदुरा या नाल्यामुळे कामठी शहर व कामठी छावणी असे दोन भाग झाले आहेत. आता कॅन्टोनमेंटमध्ये सैन्यदल किंवा तोफा नाहीत. तर कॅन्टोनमेंटचा प्रशस्त मार्ग माल या नावाने ओळखला जातो. तो रेल्वे स्थानकाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत असून रस्त्याच्या

दोन्ही बाजूला हिरवेगार वृक्ष व त्याच्या मागे खाजगी बंगले आहेत. कॅन्टोनमेंटमध्ये न्यू गोडावून एरिया, मध्यभागी गोरा बाजारचा भाग आणि आग्नेयेला घोडदळ (केव्हलरी) बाजार आहे असे तीन मुलकी क्षेत्र आहेत. या तिन्ही क्षेत्रातील घरे सर्वसाधारण अशी आहेत. जुन्या गॅझेटिअरमध्ये नोंद असलेली सदर जागा आता कामठी नगरपालिकेच्या हद्दीत आहे. कॅन्टोनमेंट आणि नगरपालिकेला वेगळा करणारा बागदुरा हा नाला कामठी नगरपालिकेची सीमा दर्शवतो. कामठी कॅन्टोनमेंट संदर्भामध्ये १९०८ च्या गॅझेटिअरमध्ये नोंद उपलब्ध आहे. येथे १८२१ मध्ये गॅरिसन म्हणजे लष्कर खूप मोठे होते, त्याची निश्चित संख्या सांगता येत नसली तरी १८५८ मध्ये बनवलेल्या योजनेनुसार असे दिसते की, तोफखान्याचे मोठे दोन संच, ब्रिटिश पायदळाचे एक रेजिमेंट, एतद्देशीय घोडदळाचे दोन रेजिमेंट, याशिवाय हत्ती, उंट यासाठी वेगळे विभाग असावेत. सन १८८८ मध्ये हा लष्करी भाग मद्रास प्रांताच्या अधिकार क्षेत्रातून काढून मुंबई फौजेच्या सेनाप्रमुखाच्या अधिकाराखाली आला. १८८९ मध्ये येथील सैन्यामध्ये तोपखान्याचा एक संच. एतद्देशीय पायदळाचे दीड रेजिमेंट, एक ब्रिटिश पायदळाची रेजिमेंट व एक घोडदळाची रेजिमेंट यांचा समावेश होतो. वरील सर्व सरंजाम नागपूर जिल्ह्यासाठी तैनात करून एक ब्रिगेडिअर जनरलच्या अधिपत्याखाली देण्यात आला. १८९१ च्या अखेरीस एतद्देशीय घोडदळाची एक रेजिमेंट कामठी येथे हलविण्यात आली. तसेच एतद्देशीय पायदळाची अर्धा रेजिमेंट संबळपूरला हलविण्यात आली. जानेवारी १९०५ मध्ये लॉर्ड किचनेर याने पुनर्रचना योजनेप्रमाणे कामठी लष्करी ठाणे क्रमश: सोडून देण्याचे आदेश काढले व त्यामुळे नागपूरचे लष्करी महत्त्व कमी झाले. कारण नागपूरच्या सीमेवरील रायपूर व संबळपूर येथे सैन्यच राहिले नव्हते. लॉर्ड किचनेर याच्या पुनर्रचनेनुसार नागपूर जिल्ह्यातील सर्व कर्मचाऱ्यांची अहमदनगरला बदली करण्यात आली. कॉम्बॅटन्ट ऑफिसर एका चतुर्थश्रेणी स्टेशन स्टाफ ऑफिसरच्या मदतीने काम करी. १९०५ मध्ये तो पाचव्या डिव्हिजनच्या जनरल ऑफिसरच्या हाताखाली होता. पण १९०७ नंतर तो जबलपूर डिव्हिजनमध्ये आला. कामठीचे महत्त्व कमी होत असून कदाचित ते पूर्णपणे सोडून देण्यात येईल, पण जवळजवळ नव्वद वर्षे ते स्वच्छता व टापटीप या बाबतीत कामठी एक आदर्श लष्कर छावणी म्हणून नावाजली होती. १८५८ पासून छावणीमध्ये टॉप ऑफिसर असलेल्या जन. बर्टनने १८८८ मध्ये प्रकाशित झालेल्या आपल्या 'ॲन इंडिया ओलिओ' या पुस्तकात नोंदवले आहे की, भारतीय इतर कोणत्याही अनेक छावण्यांपेक्षा हे कॅन्टोनमेंट एक नियमित व सुव्यवस्थित आहे. १८५७ च्या स्वातंत्र्य युध्दात या कॅन्टोनमेंटने कमालीची निष्ठा दाखवली. नागपूर उठावाचा प्रयत्न कामठीच्या मद्रास सैनिकांच्या तुकडीने चिरडून टाकला. त्यानंतर युरोपीयन इन्फन्ट्रीची तिसरी रेजिमेंट आणि प्रसिध्द फर्स्ट मद्रास पायोनिअरसह संपूर्ण सैन्य बांदाला गेले व जनरल व्हाईट लॉक याच्या नेतृत्वाखाली शांतता प्रस्तापित होईपर्यंत या शिबंदीने काम केले. यात सहा मैदानीतळ आहेत. त्यांना सॅनेटरी कॅम्प म्हणून ओळखले जाते. त्यांची नावे यासुंबा, टेकरी, सेवरा, गडा, सुरादेवी आणि कुराडी अशी आहेत. यांची हद्द सीमास्तंभाने निर्देशित केली आहे. या सर्व स्थळांवर विहिरिही आहेत. अर्ध्या बटालियनच्या सैनिकांना कवायतीसाठी कुराडी हे उत्कृष्ट ठिकाण असून सुरादेवी टेकडीचा अंतर्भाव करून कामठी जवळचे हे एकच ठिकाण असे आहे की, ज्याठिकाणी तोफगोळा माऱ्याचा प्रात्यक्षिक अभ्यास सुरक्षितपणे करता येईल. भोसले राजवटीमध्ये व्यापारी लोक कामठी येथे आले कारण तेथे लष्करी

क्षेत्रामध्ये त्यांना करापासून काहीसे संरक्षण मिळत होते. शिवाय सैनिकांच्या वस्तीबरोबरच शेजारी एक व्यावसायिक शहर वाढत होतेच. नागपूरकडे जाणाऱ्या रस्त्यावर सोयीस्कर जागी हे स्थान असल्यामुळे कामठी येथे धंद्याची व्यावसायिक मक्तेदारी होती. परंतु रेल्वे वाहतुकीत वाढ झाल्यामुळे आणि जिल्ह्याच्या ठिकाणी लोकांनी केलेले स्थलांतर यामुळे येथील व्यापारावर मोठा परिणाम झाला.

कामठी येथे आज लष्कर छावणी नसली तरी येथे एन. सी. सी. ऑफिसर्स प्रशिक्षण केंद्र, आर्मी पोस्टल सर्व्हिस ट्रेनिंग सेंटर, पुरवठा डेपो, विद्युत यांत्रिक व अभियांत्रिक वर्कशॉप, स्टेशन स्टाफ, महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस दल हे या छावणीत रॅलिसन्स लाईन्स येथे आहेत. कामठी येथे कॅन्टोनमेंट क्षेत्रामध्ये बोराबाजार, काली फलटण या नावाने ओळखली जाणारी क्षेत्रे आहेत. आजही हा परिसर आणि येथे असलेले मंदिर, मसजीद, चर्च, गुरुद्वारा तसेच एक नियोजनबध्द वसाहत म्हणून या स्थानाचे वेगळे महत्त्व लक्षात येते. येथे हनुमानाची विशालकाय मूर्ती, १.८० मी. उंचीची आहे. येथे एक लष्करी दवाखाना आजही कार्यरत आहे. हे क्षेत्र आज भारतीय लष्कराच्या ताब्यात आहे.

मेजर पिअर्सने कामठीजवळ बृहदाश्मयुगीन शिलावर्तुळाचे उत्खनन केले. यावेळी त्याला दोन मानवी सांगाडे मिळाले. पुरुषाच्या छातीवर नांगराच्या फाळासारखी दोन अवजारे त्याला मिळाली. तर दुसऱ्या शवाच्या छातीजवळ ठेवलेल्या पक्षी, साप इत्यादी सारख्या वस्तू मिळाल्या, याच्या शेजारी लोखंडाच्या सुऱ्या/चमचे, दिव्यासारख्या वस्तू मिळाल्या. नांगराचा फाळ, अशुध्द सोन्याची बांगडी व तांब्याच्या झाकण्या उपलब्ध झाल्या.

कामठी तेलगाव

कामठी तेलगाव : (ता. सावनेर) नागपूरपासून ३८.६२ कि. मी. अंतरावर सावनेरच्या पश्चिमेस ६.४३७ कि. मी. वर हे स्थान वसले आहे. येथे पूर्वी मातीची एक मोठी गढी होती. आज पूर्णपणे उध्वस्त झाली आहे. गावात एक जुने ग्रंथालय आहे.

कुवारा भिवसेन

कुवारा भिवसेन : (ता. पारशिवनी) मनसरच्या आधी अमलाडी फाट्यावरून नवेगाव खैरीकडे जाणाऱ्या मार्गावर भिवसेन हे स्थान पारशिवनी पासून उत्तरेला २१ कि. मी. अंतरावर आहे. पेंच प्रकल्पाच्या जलाशयालगत नदीच्या काठावर आदिवासीचे श्रध्दास्थान असलेले ठिकाण आहे. या विषयीची दंतकथा अशी, महाभारत काळातील पांडवांचा पुत्र भीम याचे हे मंदिर आहे. कुवारा भिवसेन मंदिर पूर्वी या स्थानालगत असलेल्या उंच डोंगराच्या माथ्यावर होते. गोंड वंशीय राजाची राणी नेहमीच याच्या दर्शनास जाई. तिला गर्भावस्थेत असताना इतक्या वर चढून जाणे शक्य नव्हते अशावेळी तिने मनोमन केलेल्या प्रार्थनेमुळे डोंगर माथ्यावरून भिवसेनाने नदी काठावर आपले स्थलांतर केले. आजही या स्थानाविषयी परिसरात मोठी श्रध्दा असून महाराष्ट्र व मध्यप्रदेशातील आदिवासी मोठ्या प्रमाणामध्ये येथे दर्शनासाठी येतात. आदिवासींचे प्रमुख दैवत असून चैत्र पौर्णिमेला येथे मोठी यात्रा भरते. ती १५ दिवस असते. पुत्रप्राप्तीच्या भावनेतून येथे नवस केले जातात. जलाशयाच्या काठालगत असलेले हे स्थान प्राचीन असून साधारणपणे २ मीटर उंचीची ही मूर्ती मोठ्या प्रमाणात शेंदूर लावलेली आहे. एक प्रशस्त गाभारा, त्यापुढील मंडप असे

या मंदिराचे स्वरूप असून मंडपात असलेल्या स्तंभाच्या शीर्षभागात सिंहमुखाचे अंकण आहे. वितानालगत असलेल्या भागात भौमितिक नक्षी दर्शविली आहे. या स्थानापासून साधारणपणे एक फर्लांगवर गोंडवंशीय राणीचा दुमजली राजवाडा होता. राजवाड्याची ही वास्तू मजबूत अशा दगडी चिऱ्यात बांधलेली आहे. आता पेंच प्रकल्पाच्या जल क्षेत्रात बुडाली असून केवळ वरील काही भाग फक्त दिसतो. या स्थानाच्या लगतच एक लहानसा डोंगरमाथा असून त्याच्यावरील भागात बांधकामाचे काही अवशेष आढळतात. याला भिगवड किल्ला असे नोंदवले असले तरी प्रत्यक्षात किल्ला म्हणून दर्शविता येईल अशी वास्तू येथे दिसत नाही. (कार्यालयाने केलेल्या सर्वेक्षणाआधारे, जून २००२.)

कुही

कुही : हे तहसिल कार्यालयाचे मुख्य केंद्र असून नाग नदीच्या लगत वसले आहे. महसूली विभागाचे केंद्र असलेले हे स्थान आहे. सन १९४२ मध्ये कुही ग्रामपंचायतीची स्थापना झाली. याठिकाणी राममंदिर आहे. काळे यांचे एक मंदिर असून त्याठिकाणी शिव, हनुमान व विठ्ठल-रखुमाईचे मंदिर आहे. गावामध्ये एक मसजिद, बुध्दविहार व दुर्गा मंदिर आहे.

केलवध

केलवध : (ता. सावनेर २१°२७' उत्तर, ७८°५३' पूर्व) नागपूरच्या वायव्येस ४८ कि. मी. अंतरावर आहे. या स्थानाचा उल्लेख प्राचीन शिलालेखात असल्याची नोंद डॉ. ठोसर यांनी केली आहे. मुळात "कंदलीवाठक" नावाचे हे स्थान आज केलवध-केलोद या नावाने ओळखले जाते. या संदर्भामध्ये कदलीवाटक या प्रशासकीय विभागाची निश्चिती रामटेक तालुक्यातील अन्य केलापूर गावाशी करण्याचा प्रयत्न काही अभ्यासकांनी केला आहे. परंतु भाषिक साम्याच्या आणि भौगोलिक साम्याच्या दृष्टीने सावनेर तालुक्यातील केलोद-केळवध हा कदलीकठकाचा निश्चित पर्याय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. याशिवाय या स्थानालगत असलेल्या एका टेकडीवरून एक लहान नदीचा प्रपात या स्थानाखाली असलेल्या कुंडात पडतो व हे तीर्थस्थान मानले जाते. शिवाय या स्थानाच्या लगत भूगूसगड येथे प्राचीन तलावाचे अवशेष सापडले आहेत. वाकाटक कालीन सुदर्शन जलाशय याच्या स्थल निश्चितीच्या दृष्टीने याकडे पाहता येते. (ठोसर हरिहर, नागपूर जिल्ह्याचा प्राचीन, ऐतिहासिक व सांस्कृतिक भूगोल या कार्यालयात उपलब्ध हस्तलिखितावरून.)

या ठिकाणी एका मंदिराचे अवशेष उपलब्ध असून मूळ सभामंडपाचा काही भाग शिल्लक असल्याची नोंद हेन्री कझिन्स यांनी केली आहे. हे मंदिर यादवाचा पंतप्रधान हेमाद्री याने बांधलेल्या मंदिरांपैकी एक असावे. येथे एक लेख शिळाही उपलब्ध आहे. स्थानिक समजूतीप्रमाणे एका कलावंतीनीच्या दानातून उभारण्यात आलेली ही वास्तू होती तिला कलावंतीनीचे मंदिर असे संबोधले जाते. येथे उध्वस्त किल्ल्याचे अवशेष होते. (कझिन्स हेन्री, पुर्वोक्त, पृ. ५.)

हे आज एक कृषीप्रधान गाव असून कापसाच्या उत्पादनासाठी प्रसिध्द आहे. १९५१ पर्यंत याची गणना शहर अशी होई. १९६१ च्या जनगणनेनुसार अवर्गिकृत करून खेडे अशी नोंद केली आहे. परिसरात घनदाट जंगल असून जळाऊ तसेच इमारतीचे लाकूड येथे उपलब्ध होते. जरीकाठी पातळासाठीही हे स्थान प्रसिध्द होते. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** महाराष्ट्र स्टेट, बॉम्बे १९६६, पृ. ७१६ ते ७१८.)

कपिलेश्वर मंदिर : गावाच्या पश्चिमेस असलेल्या टेकडीवर कपिलेश्वराचे मंदिर आहे. मंदिरालगत असलेल्या एका ओढ्यावर नैसर्गिकरित्या खोल धबधबा निर्माण झाला आहे. साधारणपणे ६ मीटर खोलीच्या या धबधब्यामुळे पुढे एक मोठा जलाशय निर्माण झाला असून जलस्त्रोताच्या मागील बाजूस पोकळी निर्माण झाली आहे. मंदिराच्या प्रांगणात जाण्यासाठी पायऱ्या चढून वर जावे लागते. गर्भगृहात शिवपिंड व एक नंदी आहे. गाभाऱ्यामध्ये अनेक देवदेवतांच्या मूर्ती आहेत. गर्भगृहापुढे सभामंडप, त्यापुढील मैदानामध्ये पिंपळाचा प्राचीन वृक्ष आहे. मंदिराची बांधणी साधी असून उत्तर मध्ययुगात याची निर्मिती झाली. प्रतिवर्षी शिवरात्रीला येथे यज्ञ होतो. तर श्रावण महिन्यामध्ये भाविक मोठ्या संख्येने येथे येतात. धबधब्याच्या (जलस्त्रोताच्या) लगत असलेल्या नैसर्गिक गुहेसदृश्य पोकळीच्या संदर्भामध्ये काही आख्यायिका प्रचलित आहेत. येथे एक सिध्द साधु निवास करून होता त्याच्याकडे समोरील जलाशयातून गाईबरोबर आलेल्या गुराख्याला या साधुने धुणीतील काही निखारे दिले ते कोळसा समजून गुराख्याने फेकून दिले पण एक कोळशाचा तुकडा त्याच्या घोंगडीस चिकटून होता तो घरी गेल्यावर सोन्याचा असल्याचे लक्षात आले तेव्हा आपण केलेल्या कृत्याचा गुराख्यास पश्चाताप झाला. पुन्हा त्याने साधुचा शोध घेण्याचा प्रयत्न केला यासारखे कथानक सांगतात. गाईचे या परिसरात असणे यावरून या मंदिरास कपिलेश्वर मंदिर म्हणतात. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** महाराष्ट्र स्टेट, बॉम्बे १९६६, पृ. ७१६ ते ७१८.)

कोराडी

कोराडी : (ता. कामठी) कामठीच्या वायव्येस हे स्थान असून येथे औष्णिक विद्युत केंद्र उभारण्यात आल्यामुळे या स्थानाला महत्त्व प्राप्त झाले आहे. नागपूर, जबलपूर, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७ या मार्गावर महादूला या गावालगत कोराडी हे स्थान आहे.

महालक्ष्मी मंदिर : कोराडी येथे स्वयंभू महालक्ष्मी जगदंबा देवीचे मंदिर आहे. परिसरात असलेल्या लिंबांच्या वनराईत हे चिरेबंदी दगडात बांधलेले मंदिर आहे. मंदिरात शीवपार्वती, शीवपिंड, नंदी, गणेश, दक्षिणामुखी हनुमान यांच्या मूर्ती आहेत. मंदिर प्रांगणात औदुंबर वृक्ष असून तेथे एक धर्मशाळा आहे. हरिसिंग बाबांचा आश्रम व जलाशय असून त्यामध्ये कमलपुष्पे पाहावयास मिळतात. भोसले कालखंडामध्ये या स्थानाचा जीर्णोध्दार करण्यात आला आहे. अलीकडील काळात मंदिरात नव्याने काही परिवर्तन केल्याचे दिसते. या स्थानाविषयी जनमानसात श्रध्दा असून नवरात्र व चैत्र पौर्णिमेला यात्रा भरते. मंदिराची व्यवस्था नोंदणीकृत विश्वस्तांकडून पाहिली जाते.

कोलितमारा सुरेश

कोलितमारा सुरेश : (ता. पारशिवनी) पारशिवनीपासून ३६ कि. मी. अंतरावर असून ही जोडवस्ती आहे. येथून पूर्वेस अर्धा कि. मी. अंतरावर पेंच नदी आहे. याठिकाणी राज्य पुरातत्व विभागाच्यावतीने करण्यात आलेल्या गवेषणामध्ये लज्जागौरीच्या काही भग्न प्रतिमा उपलब्ध झाल्या. त्या पुरातत्व विभागाच्या ताब्यात आहेत. या लज्जागौरी प्रतिमा इ. स. पू. पहिल्या-दुसऱ्या शतकातील असल्याचे मत व्यक्त केले आहे. याच ठिकाणी एक गणेश मूर्ती उपलब्ध झाली असून ही वाकाटकपूर्वकालीन असावी. दोन हात असलेली ही स्थानक मूर्ती आहे ही पाचव्या शतकातील असावी असे म्हटले आहे. काळाच्या दृष्टीने विचार करता ही या क्षेत्रात सापडलेली मूर्ती तसेच शिव-पार्वतीची अन्य एक भग्न मूर्ती व लहान आकारातील २२ सें. मी. उंच व १५ सें. मी. रुंदीचे नागशिल्प मिळाले. तसेच वराहमुख असलेली एक मूर्ती व तिचे खंडीत अवशेष उपलब्ध झालेत. याची तुलना त्यांनी रामटेक व मांढळ येथील वाकाटककालीन शिल्पाशी दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे. (गजभिये, बा. स. संचालक, पुरातत्व विभाग, महाराष्ट्र शासन यांनी पुरविलेल्या टिपणाधारे.) या परिसरात उपलब्ध पुरातत्वीय अवशेष पाहता येथे वाकाटकांच्या नंदिवर्धन या राजधानीचे ठिकाण या क्षेत्रात असावे असे मत वेलस्टेड यांनी व्यक्त केले आहे. **(विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक अंक,** १९९५ पृ. १६२)

कोंढाळी

कोंढाळी : (ता. काटोल २२°०५ उ.', ७८°३५' पू.) काटोलच्या नैऋत्येस १७.७० कि. मी. वर नागपूर-अमरावती राष्ट्रीय महामार्गावर नागपूरपासून ५४.७२ कि. मी. वरील एक गाव. एकेकाळी कोंढाळी हे नागपूर व अमरावतीमधील व्यापारी केंद्र होते. परंतु रेल्वे वाहतूक सुरू झाल्यानंतर त्याचे महत्त्व कमी झाले. येथून बराच कापूस निर्यात केला जातो. हा व्यवसाय मुख्यत: तेली व व्यापाऱ्यांच्याकडे आहे. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** महाराष्ट्र स्टेट, बॉम्बे, १९६६, पृ. ७२३.)

खापा

खापा : (ता. सावनेर २१°२५' उ., ७९°०२' पू.) नागपूरच्या उत्तरेस २५ कि. मी. अंतरावर आहे. कन्हान नदीच्या किनाऱ्यावर वसलेले नागपूर जिल्ह्यातील हे एक समृध्द गाव आहे. पाटणसावंगी पासून ९.६५ कि. मी. अंतरावर छिंदवाडा रोडवर हे स्थान आहे. या क्षेत्रात १९०१ मध्ये आलेला दुष्काळ आणि प्लेगच्या साथीमुळे या स्थानाची फार मोठी हानी झाली. तसेच १८९१ नंतर व्यापाराची दिशाही बदलली. कन्हान नदीच्या काठावर असलेल्या शहराला पुराचा धोकाही संभवतो. विदर्भ गृहनिर्माण मंडळाने पूरग्रस्तांसाठी १९५७-५९ मध्ये एक स्वतंत्र वसाहत बांधली. राज्य शासनाने १९६१ मध्ये नदीवर पूल बांधला असून तेथे संत्र्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. प्रामुख्याने मॅग्नेज या खनिजाची निर्यात खापा येथून होते. विटा व कौले बनविणे हा येथील एक महत्त्वाचा उद्योग मानला जातो.

भवानीमाता मंदिर : हे मंदिर नगरपालिकेच्या कार्यालयानजिक असून मंदिरात देवीची

मूर्ती ९१४ सें. मी. उंचीची असून एका पादपीठावर बसवलेली आहे. देवीच्या दोन्ही बाजूस अंगरक्षक असावेत त्याप्रमाणे दोन पुरुष मूर्ती कोरलेल्या आहेत. देवीला पितळी मुखवटा असून मंदिराचा नव्याने जिर्णोध्दार केलेला आहे. मंदिराची रचना गर्भगृह व त्यापुढील सभामंडप अशी असून गर्भगृहावर शिखर आहे. सभामंडप ७ x ४.५ मीटर आकाराचे आहे. चार स्तंभांवर हा सभामंडप उभा आहे. सभामंडपाच्या समोर होमकुंड असून नवरात्रामध्ये येथे यज्ञ केला जातो. गणेशचतुर्थीचा उत्सव या मंदिरात साजरा केला जातो हे विशेष. चैत्रामध्ये भाविक मोठ्या प्रमाणामध्ये येथे येतात.

मुरलीधर मंदिर : शहरातील हे मुख्य मंदिर असून शहराच्या पश्चिमेस पतिराय महाराज वाडीत आहे. या मंदिराच्या निर्मितीबाबत एक कथानक सांगितले जाते. पतिराय महाराज हे एक ब्राह्मण कुटुंबातील सिध्द साधक होते. हे योगसिध्दीद्वारे पोटातील आतडी बाहेर काढून स्वच्छ करणे किंवा दोराशिवाय विहिरितून पाणी काढणे यासारख्या लीला करू शकत. ते खापाला एका ब्राह्मणाच्या घरी थांबत. त्यांच्या शिष्यांपैकी धोंडोबा बोरकर हा एक अत्यंत गरीब शिष्य असून पतिराय महाराजांच्या आज्ञेवरून नागपूरला आला. नागपूर येथे स्वत:चे घर बांधीत असताना त्याला मोत्यांची रास मिळाली. हे मोती त्याने पतिराय महाराजांना अर्पण करण्याचा प्रयत्न केला. तथापि, ते त्यांनी स्वीकारले नाही व याच द्रव्यातून धोंडोबाने मुरलीधराचे आज आहे ते मंदिर बांधले. या मंदिराच्या गर्भगृहामध्ये मुरलीधराची (श्रीकृष्णाची) एक मूर्ती आणि त्याच्या उजव्या व डाव्या बाजूस रूक्मीणी व राधाच्या मूर्ती आहेत. या मूर्ती संगमरवरी असून गाभाऱ्यासमोर असलेला सभामंडप हा बारा स्तंभांच्यावर उभा आहे. गाभाऱ्याच्या प्रवेशद्वारालगतच पतिराय महाराजांची वर्तुळाकृति समाधी बांधण्यात आली आहे. समाधीवर महाराजांच्या पादुका आहेत. गर्भगृहात त्यांच्या मुर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. या सिध्दसाधकाच्या या मुळ स्थानाविषयी जनमाणसात श्रध्दा असून लोक येथे येतात. मंदिरामध्ये रामनवमी, गोकुळाष्टमी, त्रिपुरी पौर्णिमा इत्यादी उत्सव साजरे होतात. विशेषत: आश्विनी पौर्णिमा ते त्रिपुरी पौर्णिमेपर्यंत संत पतिराय महाराजांच्या स्मरणार्थ काकडआरती होते. माघ महिन्यामध्ये प्रतिवर्षी येथे बाजार भरतो.

कृष्णाजीबुवांचा मठ : येथे कृष्णाजीबुवा व त्यांच्या पत्नी यांचा मठ आहे. धापेवाडा येथील संत कोलाबस्वामी महाराज यांचे हे शिष्य असून गावामध्ये प्लेगसारखी आपत्ती आली असताना त्यांनी निवारण केले अशी मान्यता आहे. कृष्णाजीबुवांनी समाधी घेण्याचा निश्चय केला त्यावेळी त्यांच्या पत्नीने त्यांना परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. तथापि, ते आपल्या निश्चयापासून ढळले नाहीत. त्यांच्याबरोबर त्यांच्या पत्नीनेही तत्क्षणी देहत्याग केला. या दोघा पती-पत्नींची वर्तुळाकृति समाधी येथे बांधली असून समाधीची उंची १.४२ मीटर असून त्यावर तुळशीवृंदावन आहे. समाधीच्या बाजूला देवदेवतांच्या मूर्ती असून समाधीपुढील सभामंडप हा ३.५० x २.५० मी. चा आहे. या मंडपामध्ये चार लाकडी स्तंभ असून सभामंडपाच्या भिंतीवर अनेक देवतांच्या आकृत्या कोरलेल्या आहेत. मंडपातील स्तंभ हे उत्कृष्ट काष्ठशिल्पाचा नमुना असून तळखडा त्यावर उभे असलेले सुरूदार स्तंभ, महिरपी कमानी भोसलेकालीन शिल्पाची साक्ष देतात. समाधी मंदिरापुढे विशाल पिंपळवृक्ष असून तो त्यांच्या मुलाची स्मृती म्हणून दाखवतात.

येथे स्वामी राघवानंद महाराज यांचा मठ आहे. हे एक थोर सिध्दपुरुष असून त्यांच्या विषयीची श्रध्दा या परिसरातील लोकांमध्ये आहे.

बाबा लष्कर शाह शहीद दर्गा : खापा शहराच्या वायव्येस असलेला हा दर्गा शाहवलीचा दर्गा म्हणून ज्ञात आहे. एका संकटसमयी झालेल्या युध्दामध्ये लढत असताना हे शहीद झाले. स्वत:चे शीर कापले गेले असतानाही त्वेषाने ते लढत होते असे सांगतात. त्यांची आठवण म्हणून ज्याठिकाणी त्यांचा देह पडला त्याच ठिकाणी हा दर्गा बांधलेला आहे. दर्ग्यास चिरेबंदी बांधकाम केलेले महाद्वार आहे. नदीकाठी एका टेकडीवर असलेली दर्ग्याची वास्तू चार बुरुज असलेल्या तटबंदीयुक्त प्राकारामध्ये आहे. महाद्वाराच्या डाव्या बाजूस असलेल्या भिंतीस ओवऱ्या आहेत. तेथे दर्शनार्थी लोक स्वयंपाक करतात. या स्थानाच्या बाजुलाच इदगा आहे. मध्यभागी १२.२० x ९.१५ x ३.०५ मी. आकाराच्या चौथऱ्यावर शहीद लष्कर शाहवली यांची कबर आहे. त्याच्यासोबत परिसरात धारातीर्थी पडलेल्या अन्य सैनिकांच्या कबरी आहेत. या क्षेत्रात एक वटवृक्ष असून प्रतिवर्षी येथे ऊरूस व मोहरम भरतो. यामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये मुस्लिम व हिंदु बांधव सहभागी होतात. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** महाराष्ट्र स्टेट, बॉम्बे, १९६६, पृ. ७१२ ते ७२३.)

खैरगाव

खैरगाव : (ता. नरखेड, २१°२५' उ., ७८°२५' पू.) काटोलच्या वायव्येस २४.१४ कि. मी. व मोवाडच्या दक्षिणेस ३.२२ कि. मी. वर्धा नदीच्या पूर्व किनाऱ्यावरील एक गाव. १९६१ मध्ये वर्धा नदीस आलेल्या पुरामुळे या गावाची बरीच हानी झाली होती. अनेक घरे पुरात वाहून गेली होती. बेघर झालेल्या लोकांचे पुनर्वसन शहराच्या उत्तरेकडे करण्यात आले आहे. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** महाराष्ट्र स्टेट, बॉम्बे, १९६६, पृ. ७१८.)

खैरी

खैरी : (ता. नागपूर, बुध्दभूमी) कामठी-नागपूर मार्गावरच खैरीच्याजवळ सन १९७८ मध्ये डॉ. भदंत आनंद कौशल्ययन (जन्म ५.१.१९०५ - मृत्यू २.६.१९८८) यांनी आपल्या जीवनाचे शेवटचे दिवस याठिकाणी व्यतीत केले. या स्थानावर ८ एकराच्या क्षेत्रात महाविहार उभारण्यात आला असून तिबेट येथील धर्मगुरु चौदावे दलाई लामा यांनी हे निर्माण केले. येथे कौशल्ययन यांचे ग्रंथालय आहे. सभागृह, धर्मशाळा, उद्यान या वास्तू आहेत. या उद्यानामध्ये श्रीलंकेतील बोधीवृक्ष लावण्यात आला आहे. कौशल्ययन यांची तसेच गौतमबुध्दाची मूर्ती येथे आहे. याच मार्गावर भिलगाव येथे बौध्द महासंघाचा विहार आहे.

गुमगाव

गुमगाव : (ता. हिंगणा २१°६०' उ., ७९°००' पू.) नागपूरच्या दक्षिणेस १७.७० कि. मी. वुन्ना नदीकिनाऱ्यावरील गाव. येथील बहुसंख्य लोक कोष्टी आणि तेली समाजाचे आहेत. सार्वजनिक विहिरी बांधण्यापूर्वी मुख्यत: वुन्ना नदीचे पाणी वापरीत होते. पूर्वी हे गाव हैद्राबाद संस्थानात होते. भोसले घराण्याच्या पूर्वी सिकंदराबादकडून उत्तरेकडे कूच करणारी निजामी सैन्यदल बहुतेक गुमगावला थांबायची. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** महाराष्ट्र स्टेट, बॉम्बे,

१९६६, पृ. ७०० ते ७०१.) पुढे निजामाकडून ते मराठ्याकडे आले असावे. इंग्रजी राजवटीच्या प्रारंभी भोसल्याची राणी बाकाबाई हिच्या नावे हे गाव असल्याची नोंद उपलब्ध आहे. येथे एक जूना किल्ला असून त्यात गणेश मंदिर असल्याची नोंद केली आहे. (कझिन्स हेन्री, पूर्वोक्त, पृ. ४.) हे गणेश मंदिर चिमाबाई यांनी (दुसरा रघुजी भोसले यांची आई) बांधल्याची नोंद उपलब्ध आहे.

घुघुसगड

घुघुसगड : सुरेश कोलितमारा या गावाच्या पंचक्रोशीत साधारणपणे या स्थानापासून ११ कि. मी. अंतरावर असलेल्या घनदाट अशा वनराईच्या परिसरात असलेल्या किल्ल्याच्या अवशेषांचा शोध घेण्याचा प्रयत्न राज्य पुरातत्व विभागाने केला असून येथे त्यांना एक मीटर रुंदीच्या दगडी भिंतीचे काही अवशेष तसेच विटातील उध्वस्त वास्तू काही प्रमाणामध्ये आढळून आल्या. या नैसर्गिक संरक्षण लाभलेल्या प्राचीन क्षेत्रात वनदुर्गाची निर्मिती झाली असावी असे मत या अहवालात व्यक्त केले आहे. (गजभिये, बा. स. संचालक, पुरातत्व विभाग, महाराष्ट्र शासन यांनी पुरविलेल्या टिपणाधारे.)

घोग्रा

घोग्रा : (ता. नरखेड २१°१५' उ., ७८°२५' पू.) नरखेडपासून ८ कि. मी. असून काटोलच्या पश्चिमेस २२.५३ कि. मी. लोहारी सावंगा गावाजवळ आहे. बारासिंगी पासून लोहारी सावंगाकडे जाणारा बसमार्ग या गावावरून जातो. गावाच्या नैऋत्य दिशेला ३.२१९ कि. मी. अंतरावर असलेली टेकडी मन्नथ या नावाने ओळखली जाते. या टेकडीवर हेमाडपंती शैलीतील वास्तूंचे अवशेष असून या वास्तूंचे मध्यवर्ती छत, द्वारमंडपाचा काही भाग आणि बाजूची दोन गृहे निखळलेल्या स्थितीत उभी आहेत. वास्तूचे अधिष्ठान आणि परिसरातील अवशेषांचे महत्व लक्षात घेऊन महादेव मंदिर म्हणून केंद्रिय पुरातत्व विभागाने संरक्षित केले आहे. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** महाराष्ट्र स्टेट, बॉम्बे, १९६६, पृ. ७००.)

घोराड

घोराड : (ता. कळमेश्वर २१°२०' उ., ७८°२०' पू.) नवीन काटोल मार्गावर जाम नदीच्या काठी हे स्थान आहे. नागपूरच्या वायव्येस २४.१४ कि. मी. अंतरावर आहे. घोराड आणि कोहली या स्थानाच्या दरम्यान बृहदश्मयुगीन शिलावर्तुळे आहेत. ही शिलावर्तुळे केंद्रीय पुरातत्व विभागाने पुरातत्वगर्भक्षेत्र म्हणून घोषीत केली आहेत.

छोटी देवरी शैलाश्रय

छोटी देवरी शैलाश्रय (भिवसेन गुहा समूह) : (ता. कूही) कूही या तालुका स्थानापासून २२ कि. मी. अंतरावर छोटी देवरी हे स्थान वेणगंगेच्या परिसरात आहे. या स्थानास भीवसेन असेही संबोधतात. याठिकाणी हे शैलाश्रय असून नागपूर जिल्ह्यातील उपलब्ध शैलाश्रयामध्ये चांगल्या स्थितीत आहे. यांच्या भिंती, स्तंभ, छत, सज्जा, आसन, बैठक, कलात्मकपणे कोरले आहेत. येथे एकूण चार शैलाश्रये असून तीन शैलाश्रये साधारणपणे ३० चौ. मीटरची

आहेत. प्रामुख्याने पावसाचे पाणी आत येवू नये म्हणून त्याची दक्षता बाळगण्यात आली आहे. एका शैलाश्रयामध्ये एक अर्धस्तंभ दर्शविला आहे. छतावर ब्राह्मी लिपितील काही अक्षरे आढळतात. क्रमांक २ चे शैलाश्रय हे या समूहातील सर्वोत्कृष्ट आहे. यात एक मोठा स्तंभ स्तूपाकार छतास कोरलेला असून त्याखालील बाजूस दोन चौरस खोल्या असून एका कोरीव पडवीमुळे त्या वेगळ्या केल्या आहेत. या संपूर्ण भागास १.५० x ३ मीटर लांब व २ सेंटी मीटर जाडीचा सज्जा ठेवला आहे. यामुळे पावसाचे पाणी तर आत येत नाहीच शिवाय उन्हाचाही त्रास होत नाही. उजव्या बाजुस उतरण्यासाठी सोपानमार्ग असून डाव्या बाजुस एक गवाक्ष आहे. या शैलाश्रयालगत एक झरा असून शैलाश्रयात असलेल्या व्हरांड्यामध्ये उत्तर काळात काही कोरीव काम केल्याचे दिसते. याच स्थानापासून ३ मीटर अंतरावर दुसरे एक लहान शैलाश्रय असून त्यामध्ये ब्राह्मी लिपितील शिलाक्षरे कोरली आहेत. या शैलाश्रयाचा काळ इसवीसनाचे ५ वे शतक असल्याचे मत श्री. कुलकर्णी व श्रीपाद चितळे यांनी व्यक्त केले आहे. (चितळे, श्रीपाद, 'नागपूर जिल्ह्यातील कृत्रिम शैलाश्रये', **विदर्भ संशोधन मंडळ** नागपूर, वार्षिक १९८७ पृ. १६७-१६९.)

जलालखेडा

जलालखेडा : (ता. नरखेड, २१°२०' उ., ७८°२५' पू.) काटोलच्या वायव्येस २२.५३१ कि. मी. व नागपूरपासून ८५.२९ कि. मी. अंतरावर आहे. वर्धा नदीच्या तीरावर हे स्थान असून नागपूरवरून इथपर्यंत पोहचण्यासाठी पक्की सडक उपलब्ध आहे. गोलखेडा आणि मुंडमलीपुरा या दोन वसाहतीच्यासह ही तीन स्थाने होती. नदीपलीकडच्या तीरावर अमनेर ही वसाहत होती. आता अमनेर ही उजाड वसाहत आहे. ही स्थाने म्हणजे लहानशी वस्ती असलेले खेडे आहे. वर्धा नदीच्या काठी असलेल्या जलालखेडा येथे नदीच्या वळणावरील खडकाळ भूपृष्ठावर किल्ला आहे. मध्ययुगीन कालखंडामध्ये असलेल्या वैशिष्ट्यपूर्ण किल्ल्याच्या सारखा किल्ला येथे उभारण्याची एक महत्वाकांक्षी योजना असावी. मराठा कालखंडामध्ये उभारण्यात आलेला हा किल्ला असून याची रचना वैशिष्ट्यपूर्ण आहे. नदीच्या पात्रलगत असलेल्या वळणाचा उपयोग करून खडकावर तीनही बाजूंनी उंच तट उभारण्यात आले. चौथ्या बाजूस प्रवेशद्वार असून या प्रवेशद्वारालगत दोन बुरूज बांधण्यात आले आहेत. प्रवेश-द्वाराकडे येणारा मार्ग हा खडक तासून निर्माण करण्यात आला आहे. प्रवेश द्वारालगत असलेल्या बुरूजांच्यावरून प्रवेश मार्ग तसेच नदीच्या पात्रातून होणारी वाहतूक, तत्कालीन हैदराबाद संस्थानातील लगतची स्थाने आणि वऱ्हाडच्या बाजूने (मध्यप्रदेश) येणाऱ्या मार्गावर नियंत्रण ठेवणे हा किल्ला निर्मितीमागील प्रमुख उद्देश होता. सध्या या किल्ल्याची वास्तू भग्न अवशेषांच्या स्वरूपात उभी आहे. सन १९६१ मध्ये नदीला आलेल्या पुरामुळे परिसरातील वसाहतीचे मोठे नुकसान झाले आणि येथील ग्रामस्थांचे पुराच्या टप्प्यापासून सुरक्षित अंतरावर पुनर्वसन करण्यात आले आहे. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** महाराष्ट्र स्टेट, बॉम्बे, १९६६, पृ. ७०१.)

जुनापानी

जुनापानी : (ता. नागपूर २१°०५' उ., ७८°२०' पू.) नागपूरपासून ११.२६ किलोमीटर वायव्येस जुनापानी आहे. याठिकाणी फक्त शिळावर्तुळ प्रकारची दफने अस्तित्वात असून तेथे सुमारे तीनशे वर्तुळे आहेत. यांची पहिली नोंद १८६७ साली केली गेली आणि १९६१-६२ मध्ये तीन शिळावर्तुळांचे उत्खनन करण्यात आले. या वर्तुळांचा व्यास १० ते २१ मीटर होता आणि मृताचे अवशेष पुरून त्यावर जवळजवळ एक मीटरपर्यंत माती आणि दगडगोटे टाकलेले होते. उत्खननामध्ये संपूर्ण मानवी सांगाडे नाहीत, परंतु मानवी हाडे, दात याचबरोबर काळी आणि तांबडी, पूर्णपणे काळी, अभ्रकयुक्त तांबडी आणि साधी तांबडी खापरे सापडली परंतु ही सगळी अत्यंत तुटक्याफुटक्या अवस्थेत सापडल्याने यांचे आकार संपूर्णपणे जाणता आले नाहीत. यामध्ये एक तांबड्या रंगाचा मातीचा वाडगा उल्लेखनीय आहे. या वाडग्याला तोटी असून वाडग्याच्या काठावर काळ्या रंगात रेघा काढल्या आहेत. आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण पुरावा म्हणजे मृताबरोबर ठेवलेल्या विविध प्रकारच्या कट्यारी, भाले, कुऱ्हाडी, छिन्न्या व पळ्या इत्यादी वस्तू. याशिवाय तांब्याचे वाळे, लोखंडाचा लोलक असलेल्या तांब्याच्या घंटा, सोन्याचे चकतीच्या आकाराचे मणी, बांगड्या आणि वळी, त्याचप्रमाणे पांढऱ्या रंगात नक्षीकाम केलेले कार्नेलियनचे मणी सापडले. शिवाय वालुकाश्माचा बत्ताही सापडला. मृताबरोबर घोड्याचे अवशेषही पुरलेले आढळले. मात्र मानवाचे आणि घोड्याचे अवशेष अत्यंत जीर्ण स्वरूपात सापडल्याने त्यातून काहीही निष्कर्ष काढणे शक्य झाले नाही. **("इंडियन आर्किऑलॉजी-अ रिव्हिव",** आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, न्यू दिल्ली, १९६९-७० च्या आधारे.)

टाकळघाट खापा

टाकळघाट खापा : (ता. हिंगणा २०°५०' उ., ७८°५५' पू.) टाकळघाट हे स्थान नागपूरच्या नैऋत्येस ३०.५८ कि. मी. वर आहे. वेणा नदीच्या काठावर वसलेले हे स्थान बोरी रेल्वे स्टेशनपासून ६.४३ कि. मी. अंतरावर आहे. याच्या लगतच खापा ही स्वतंत्र वसाहत वेणा नदीच्या दुसऱ्या तीरावर वसली आहे. या दोन्ही ठिकाणी असलेल्या महापाषाणीय संस्कृतीचे वैशिष्ट्यपूर्ण अवशेष लक्षात घेता येथे यांची एकत्रितपणे नोंद केली आहे. टाकळघाट येथे महापाषाणीय लोकांच्या वस्तीचे पांढरीचे टेकाड असून, खापा त्याचप्रमाणे त्याच्या शेजारील गंगापूर येथे शिळावर्तुळ प्रकाराची दफने आहेत. ताम्रपाषाणयुगामध्ये मृतांना घरामध्येच पुरले जात असे. परंतु महापाषाणयुगामध्ये मृतांना घरामध्ये पुरण्याची पध्दत नव्हती. मृताशी निगडित असलेली दफनरचना एका विशिष्ट तऱ्हेने दफन करण्याची पध्दत असल्याने त्यासाठी जागाही बरीच लागत असे. त्यामुळे अशी दफने टाकळघाट येथील वस्तीच्या जागेमध्ये न सापडता ती नदीपलीकडील मोठ्या मोकळ्या जागेत योजिली गेली. यांचे उत्खनन १९६८-६९ साली करण्यात आले. टाकळघाट येथील पांढरीचा विस्तार २२,५०० चौरस मीटर येवढ्या मोठ्या प्रदेशामध्ये पसरलेला असला तरी त्यातील बराचसा भाग सध्याच्या वस्तीखाली दबला गेला आहे.

पांढरीच्या उत्खननामध्ये कुडाच्या घरांचे अवशेष मिळाले. मात्र उत्खननाचे स्वरूप

मर्यादित असल्याने संपूर्ण घराची कल्पना येऊ शकली नाही. अशा घरातील जमीन माती चोपून व त्यावर चुन्याचे सारवण करून बनविली जाई. असे सारवण वारंवार केल्याचे दिसून येते. जमिनीत पुरलेल्या लाकडी वाशांच्या आधारावर घराचे छप्पर पेलले जाई. घराच्या भिंतीही मातीच्या असून, त्यातल्या काही जास्तीत जास्त अर्ध्या मीटर जाड होत्या. घरामध्ये विविध प्रकारची मडकी वापरात होती. यातील काळ्या आणि तांबड्या रंगाच्या मडक्यात प्रामुख्याने वाडगे, थाळ्या आणि झाकण्या हे आकार प्रचलित होते. दुसऱ्या वर्गाची खापरे अभ्रकयुक्त मातीपासून बनविलेली अत्यंत ठिसूळ होती. या प्रकारात कळश्या, पराती, लोटे, घडे आणि पसरट तोंडाची आणि गोल आकाराची मडकी बनविली जात. आणखी एक प्रकार म्हणजे विटक्या लाल रंगाची मडकी. यावर काळ्या रंगामध्ये साधे रंगकाम केलेले होते. मात्र अशी रंगीत मडकी फार मोठ्या संख्येने वापरात नव्हती. या प्रकारात प्रामुख्याने घडे आणि थाळ्या बनविल्या जात. हे लोक लोखंडी कुऱ्हाडी, भाले, खंजीर, कट्यारी, सुऱ्या, बाणाग्रे त्याचप्रमाणे राप्या वापरीत असत. तांब्याचा वापर प्रामुख्याने बांगड्या, कडी व भांडी करण्याकडे होत होता. रंगीबेरंगी उत्तम पोताचे अकीक, कार्नेलियन इत्यादी दगड वापरून विविध आकाराचे मणी अलंकार म्हणून वापरात होते. यातील काही कार्नेलियन मण्यांवर पांढऱ्या रेषांची नक्षी एका विशिष्ट तंत्राने काढली जाई. या लोकांनी गायी, बैल, बकरे व घोडे पाळलेले होते, असे उत्खननात सापडलेल्या या प्राण्यांच्या हाडांवरून स्पष्ट होते.

खापा येथील शिळावर्तुळांच्या उत्खननामध्ये, टाकळघाट येथील वस्तीच्या थरात सापडलेल्या खापरासारखीच खापरे मृताबरोबर पुरलेली आढळल्याने खापा आणि टाकळघाट यांचा एकमेकांशी असलेला संबंध स्पष्ट झाला, म्हणजेच वस्ती आणि दफने यांचा मेळ घालता आला. बहुसंख्य शिळावर्तुळे १२ ते १५ मीटर व्यासाची असली तरी, उत्खनन केलेल्या एका शिळावर्तुळाचा व्यास २३ मीटर होता. वर्तुळाच्या मध्यभागी काही मानवी हाडे त्याचप्रमाणे घोड्याची काही हाडे व दात सापडले. या अवशेषांबरोबर विविध प्रकारचे मणी, काळी आणि तांबडी मडकी व अभ्रकयुक्त तांबडी मडकी फुटलेल्या अवस्थेत सापडली. मृताबरोबर तांब्याच्या बांगड्या त्याप्रमाणे थाळ्या आणि त्यावरील झाकण्या ठेवलेल्या होत्या. या व्यतिरिक्त लोखंडाचे भाले, तलवारी, चपट्या कुऱ्हाडी व कढ्या, कान कोरणे, नखण्या, दाभणे आणि राप्या अशा विविध वस्तू ठेवलेल्या होत्या. यातील कुऱ्हाडी काटकोन चौकोनी व चपट्या असून यांची माथ्याकडची बाजू सरळ-सपाट तर धारेकडील बाजू बहिर्गोल आहे. अशा कुऱ्हाडींच्या माथ्यावर फुलीसारख्या दोन पट्ट्या, माथ्याला संपूर्ण वेढून टाकतील अशा पध्दतीने बसविल्या होत्या. यामुळे त्या लाकडी दांड्यावर चढविता येत. दफनातील दोन वस्तू अतिशय कलात्मक होत्या. यातील एक तांब्याची झाकणी असून ती माथ्याकडे निमुळती होत गेली आहे. झाकणीच्या माथ्यावर एकमेकांसमोर एक असे बसलेल्या दोन पक्ष्यांच्या दोन जोड्या आहेत. पक्षी अत्यंत डौलदार असून ते आकाराने लहान असले तरी वास्तव आहेत. दुसरी अप्रतिम वस्तू म्हणजे घोड्याच्या चेहऱ्यावर बसविण्यासाठी केलेला तांब्याच्या पत्र्याचा अलंकार. तांब्याचा पत्रा, घोड्याच्या चेहऱ्यावर चेहऱ्यानुरूप बसेल असा कापलेला असून त्यावर तांब्याचे कोन बारक्या लोखंडी पिनांच्या साहाय्याने बसविले आहेत. या दागिन्याच्या कडेवर बारीक भोके पाडली असून हा अलंकार चामड्यावर अथवा जीन कापडासारखा

जाड व मऊ कापडावर बसवून तो घोड्याच्या चेहऱ्यावर ठाकठीक बसविला जात असावा. अशा तऱ्हेचे घोड्याचे अलंकार विदर्भाव्यतिरिक्त इतर कोठेही अद्याप सापडले नाहीत. सध्याच्या काळात वरातीत वापरल्या जाणाऱ्या अलंकृत घोड्याची आठवण अशा अलंकारावरून येते.

टाकळघाट-खापा येथील उत्खननामुळे दोन उद्दिष्टे साध्य झाली. त्यातील पहिले आणि महत्त्वाचे असे की दफने आणि वस्ती यांचा एकमेकांशी असणारा संबंध स्पष्ट झाला आणि दुसरे म्हणजे टाकळघाट येथील वस्तीचा मध्यकाळ कार्बन-१४ पध्दतीनुसार (इसवीपूर्व ६ वे शतक) निश्चित करण्यात आला. (देव, एस. बी. **एक्सकॅव्हेशन ॲट टाकळघाट ॲण्ड खापा,** (१९६८-६९) नागपूर, १९७० च्या आधारे, देव शां. भा. यांचा 'टाकळघाट खापा उत्खनन', **विदर्भ संशोधन मंडळ** नागपूर वार्षिक १९६८ पृ. ११९ ते १२८.)

तारणा

तारणा : (ता. कुही २०°५५' उ., ७९°२०' पू.) उमरखेडच्या आग्नेय दिशेस ९.६६ कि. मी. अंतरावर देहू नाल्याजवळ वसले आहे. नाल्यावर शासनाने ३.४५ लक्ष रुपये खर्च करून तलाव बांधला असून या स्थानाजवळ असलेल्या सती घाट नावाने ओळखल्या जाणाऱ्या टेकडीवरून त्यात सती घाट प्रकल्प असे नाव देण्यात आले आहे. या स्थानाजवळ असलेल्या टेकडीवर लेणी आहेत. त्यात शिवाच्या विविध प्रकारच्या मूर्ती आढळतात. शिवरात्रीस येथे मोठी यात्रा भरते. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** महाराष्ट्र स्टेट, बॉम्बे, १९६६, पृ. ७७२.) या स्थानालगत निर्माण करण्यात आलेला सती घाट प्रकल्प आणि सभोवतालचे नैसर्गिक सौंदर्य यामुळे हे स्थान पर्यटनासाठी एक चांगले ठिकाण मानले जाते.

थारसा

थारसा : (ता. मौदा) नागपूरपासून ईशान्येस ४२ किलोमीटर अंतरावर, नदीच्या काठी थारसा हे छोटेसे गाव आहे. याठिकाणी १९८५-८६ मध्ये मर्यादित स्वरूपात उत्खनन केले गेले. उत्खननामध्ये काळी आणि तांबडी, अभ्रकयुक्त तांबडी, काळ्या रंगात चित्रकाम केलेली, अशी विविध तऱ्हेची खापरे सापडली. या बरोबरच लोखंडी खिळे व लोखंडी चपट्या कुऱ्हाडी दांड्यावर घट बसविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या लंबगोल लोखंडी पट्या सापडल्या. सर्वात खालच्या थरामध्ये वर उल्लेखिल्याप्रमाणेच खापरे सापडली. या वस्तीचे वैशिष्ट्य असे की, यामध्ये दोन मडक्यामध्ये केलेली दफने सापडली. ही दफने ताम्रपाषाणयुगाची निदर्शक असावीत आणि ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीच्या उत्तरकालात लोहयुगीन महापाषाणीय संस्कृतीशी संपर्क आलेला असावा, असे सुचविले जाते. **("इंडियन आर्किऑलॉजी-अ रिव्हिव"** : (१९८४-८५) आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, न्यू दिल्लीच्या माहितीच्या आधारे.)

इसवी सनपूर्व ८-७ व्या शतकाच्या सुमारास महाराष्ट्रामध्ये एका नवीन संस्कृतीचा उदय झाल्याचे दिसून येते. ही संस्कृती पाषाणयुगापेक्षा भिन्न आणि पूर्णत: लोहयुगीन होती. अर्थात याचा अर्थ तांब्याचा वापर या लोकांनी इतका केला की, तो महाराष्ट्रातील या आधीच्या ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीपेक्षाही जास्त असल्याचे जाणवते. असे असूनही हे लोक नागरीकरण झालेले नव्हते. यांची ठळक वैशिष्ट्ये म्हणजे आगळीवेगळी दफने, लोखंडी आणि तांब्यांची

विविध हत्यारे, वैशिष्ट्यपूर्ण आकाराची काळी आणि तांबडी खापरे, दफनांच्या मानाने वस्त्यांच्या स्थलांची कमतरता (विदर्भात) आणि घोड्याचा वापर. ही वैशिष्ट्ये महाराष्ट्रात तरी जाणवतात.

या संस्कृतीला महाश्मीय अथवा महापाषाणीय संस्कृती असे नाव आता रूढ झालेले आहे. हे नाव इंग्रजीतील मेगॅलिथिक (Megalithic) या शब्दाचे रुपांतर आहे. (देव, शां. भा., **महाराष्ट्राचा इतिहास पहिला भाग-१, प्रागैतिहासिक महाराष्ट्र,** मुंबई, २००२, पृ. ९३-१०४.)

महापाषाण संस्कृतीच्या स्थलांचे विदर्भामध्ये सर्वसाधारणपणे तीन वर्ग करता येतात. पहिल्या वर्गात ज्याठिकाणी फक्त दफनेच आहेत अशा स्थळांचा समावेश करता येतो, दुसऱ्या वर्गामध्ये दफने आणि वस्ती अशी दोहोंचाही आढळ दिसून येतो. यातील पहिल्या वर्गामध्ये नागपूर, कामठी, रायपूर, बोरगाव, माहूरझरी व इतर कित्येक स्थळांचा समावेश करता येतो. दुसऱ्या वर्गात टाकळघाट, खैरवाडा, भागीमाहरी इत्यादी स्थळे समाविष्ट करता येतात. तिसऱ्या वर्गामध्ये या संस्कृतीची निदर्शके खापरे आणि लोखंडी वस्तू ज्या स्थळी सापडलेल्या आहेत त्यांचा अंतर्भाव करता येतो या संपर्क स्थळात थारसा येते.

दहेगाव

दहेगाव : (ता. नागपूर २१°१०' उ., ७८°५५' पू.) नागपूरच्या उत्तरेस १९.३१ कि.मी. असून येथे भोसल्यांची राणी बाकाबाई हिने बांधलेला एक सुरेख तलाव असून तो भोसले कुटुंबाच्या मालकीचा आहे. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** महाराष्ट्र स्टेट, बॉम्बे, १९६६, पृ. ६९९.) या बांधकामासाठी तिने रु. १०,००० खर्च केला तर याचा जलाशय निर्मिती विषयक समारंभ फसली १२४९ (इ. स. १८३९) मध्ये भोसले राजाने केल्याची नोंद उपलब्ध आहे. (कझिन्स, हेन्री ॲन्टीक्वेरीयन रिमेन्स इन द सेंट्रल प्रोव्हिन्सेस ॲण्ड बेरार (पुनर्मुद्रण) वाराणशी १९७१, पृ. ३.)

दिग्रज बु.

दिग्रज बु. : (ता. काटोल २१°२०' उ., ७८°३०' पू.) काटोल तालुक्यात आहे. सावरगावपासून ४.८३ कि. मी. अंतरावर आहे. दिग्रस आणि सावरगाव यांच्यामध्ये बृहदश्मयुगीन शिला वर्तुळे आढळतात. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** महाराष्ट्र स्टेट, बॉम्बे, १९६६, पृ. ७००.) ही शिलावर्तुळे साधारणपणे ४.८३ कि. मी. परिसरात विखुरलेली आहेत. (कझिन्स, हेन्री, ॲन्टीक्वेरीयन रिमेन्स इन द सेंट्रल प्रोव्हिन्सेस ॲण्ड बेरार (पुनर्मुद्रण) वाराणशी १९७१, पृ. ४.)

धापेवाडा

धापेवाडा : (ता. कळमेश्वर २१°१५' उ., ७८°५०' पू.) कळमेश्वरच्या उत्तरेस ८ कि. मी. अंतरावर चंद्रभागा नदीच्या किनारी वसले आहे. धापेवाडा हे 'धर्मनगरी' या नावाने स्थान महात्म्यामध्ये नोंदवले आहे. येथील बहुसंख्य लोक कोष्टी आहेत. येथे कोलबा स्वामी महाराज इ. स. १६५७ ते १७६१ मध्ये सिध्द पुरुष होवून गेले. त्यांचा मठ धापेवाडा येथे असून त्यासाठी विश्वस्त मंडळ कार्यरत आहे. कोष्टी समाजाचे हे एक पवित्र श्रध्दास्थान आहे. येथे संपूर्ण भारतातून भाविक येतात, देवस्थानातील गादी पुरुषांची व समाध्यांची पूजा

करतात. आता या मठातील गादीवर श्रीहरी महाराज वेळेकर कार्यरत आहेत. हे मूळ निवासस्थान ३०० वर्षापूर्वीचे असून मूळ स्थितीत कायम आहे. येथे कोलबा स्वामी महाराज व त्यांची पत्नी व त्यानंतर गादीवर आलेल्या वंशजांच्या समाध्या आहेत. वर्षभर येथे पुर्वजांच्या पुण्यतिथीचे कार्यक्रम होतात. कोलबा स्वामी महाराजांनी परमेश्वराच्या प्रेरणेने अनेक भक्तीरचना केल्या या रचना आजही रूढ आहेत. त्यांच्या प्रेरणेतून निर्माण झालेले विठ्ठल मंदिर विदर्भातील प्रमुख श्रध्दास्थान मानले जाते. कोलबा स्वामीचा जन्म वेला, ता. उमरेड येथे ज्येष्ठ शु. सप्तमी शके १५७८ (इ. स. १६५७) मध्ये झाला. पहिल्या रघुजी भोसल्याच्या काळात येथे एका किल्ल्याची निर्मिती करण्यात आली. त्याचे भग्नावशेष आज उपलब्ध आहेत. उत्तर-मध्ययुगीन काळात पेंढाऱ्यांनी हा गाव लुटला तेव्हा या किल्ल्याची उंच तटबंदी ग्रामस्थाना फारशी उपयोगी पडली नाही. ऑक्टोबर ते डिसेंबर १८१० दरम्यान पेंढाऱ्यांनी सुहागपूर, मोहपा, पारशिवनी, धापेवाडा, येथे हल्ले करून लुटालुट केली. (अंधारे, भा. रा., दूसरे रघुजी भोसले, पृ. ६९.)

विठ्ठल मंदिर : कुंतलपूरच्या चंद्रहास राजाने केलेल्या तपश्चर्येतून मेटपांजरा येथे प्रकट झालेली गंगा चंद्रभागा नावाने प्रवाहीत झाली अशी मान्यता आहे. चंद्रभागा नावाने ओळखल्या जाणाऱ्या नदीच्या डाव्या तीरावर, जेथे चंद्रभागा उत्तर वाहिनी आहे, तेथे विठ्ठल मंदिर आहे. येथील संत कोलबा स्वामी महाराज यांना विठ्ठल दर्शनाची तीव्र ओढ निर्माण झाल्यामुळे प्रत्यक्ष विठ्ठलाने त्यांना दृष्टांत देऊन मी स्वत: धापेवाडा येथे येतो असे सांगितले व त्याप्रमाणे चंद्रभागेच्या काठी बाहुली (पायऱ्यांची विहिर) मध्ये त्यांना व अन्य एक सत्पुरूष श्रीउमाजी बाबा खोलकुटे यांना विठ्ठल रखुमाईच्या मूर्ती प्राप्त झाल्या. शके १६६१ (इ. स. १७४०) आषाढी पौर्णिमेच्या सुमारास हा प्रसंग घडला. या स्थानालगतच एक मोठे मंदिर बांधून त्यांची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. विठ्ठल रुक्मिणी देवस्थानात प्रतिवर्षी एकादशी ते पंचमी पर्यंत उत्सव साजरा करण्यात येतो. तेव्हापासून हे स्थान विदर्भातील प्रतिपंढरपूर म्हणून ओळखले जाते. आषाढ वद्य प्रतिपदा व कार्तिक वद्य प्रतिपदेदिवशी पंढरपूरचा विठ्ठल भक्तांच्या दर्शनासाठी धापेवाडा येथे येतो अशी मान्यता आहे. पंढरपूर येथील प्रत्येक स्थान व वस्तू याही स्थानावर दाखविल्या जातात, नदीचे नावही चंद्रभागा असे रूढ झाले आहे. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** महाराष्ट्र स्टेट, बॉम्बे, १९६६, पृ. ६९९.) या नदीकाठी पूर्वी एक घाट बांधला होता. या स्थानासंबंधी अनेक कथानके रूढ आहेत. अगदी रामचंद्राच्या काळात श्रीरामाने येथे शिवलिंगाची स्थापना केली आहे (चैतन्येश्वर महादेव) अशी मान्यता आहे. कवि अष्टीकर यांनी "धर्मापुरी माहात्म्य" हे स्थलमाहात्म्य लिहिले आहे. यातील नोंदीप्रमाणे प्राचीन दंडकारण्याचाही प्रदेश राम व सीतेच्या पादस्पर्शाने पुनीत झाला आहे. त्याची स्मृती म्हणून रामझीरे हे स्थान दाखविले जाते. द्वापार युगात धर्मराजाने येथे वास्तव्य केले तेव्हापासून धर्मनगरी असे नाव या स्थानास पडले. नारदाचा वर प्राप्त झालेली ही भूमि आहे. यातूनच कोलबा स्वामी महाराज हे येथे ईश्वरभक्तिच्या ओढीतून आले त्यांना रंगारी बुवा व त्यांचे गुरुबंधु मकरंदपुरी महाराज यांचा अनुग्रह प्राप्त झाला. त्याच काळात जानोजी भोसले यांचे प्रधान देवाजी पंत यांचे कारभारी उमाजी बाबा खोलकुटे हेही येथे दर्शनासाठी येत. बाहुली विहिरीत प्राप्त झालेल्या विठ्ठल मूर्तीची स्थापना बुधवार, ज्येष्ठ शु. द्वादशी, शके १६६२, इ. स. १७४१ मध्ये झाली. मंदिराचा गाभारा खोलकुटे यांनी बांधला. रंगशाळा,

सभामंडप गोविंदसिंह मॅजिस्ट्रेट व भाऊ सितारामसिंह जमादार यांनी बांधला. यांच्या मूर्ती सभामंडपातील स्तंभावर कोरल्या आहेत. आजही या देवस्थानामध्ये नवीन बांधकाम सुरू आहे. या मूर्ती मूर्तीशास्त्राला अनुसरून असून आकर्षक आहेत. हे एक जागृत स्थान मानले आहे. भाविकाला दिवसाच्या वेगवेगळ्या वेळेत ब्रह्मा, विष्णू व महेश रुपात विठ्ठल दर्शन होते अशी श्रध्दा आहे. नदीकाठी घाटाची दुरूस्ती फसली १२५२ (इ. स. १८४२) मध्ये पुरणसिंह जमादार याने केली, तर फसली १२७५ (सन १८६५) मध्ये जुन्या सभामंडपाचा जीर्णोध्दार गोविंदसिंह यांनी केला अशी नोंद कझिन्स याने केली आहे. (कझिन्स, हेन्री, अहवाल- **ॲन्टीक्वेरीयन रिमेन्स इन द सेंट्रल प्रोव्हिन्सेस ॲण्ड बेरार**, दिल्ली, (पुनर्मुद्रण), वाराणसी, १९७१, पृ. ४.) एक विशालकाय रथ इ. स. १९०६ मध्ये श्रीमती भागीरथीबाई जमादार यांनी बनवून विठ्ठल चरणी अर्पण केला. प्रतिवर्षी कार्तिक वद्य द्वितीया व तृतीयेला गावातून मंदिरापर्यंत रथयात्रा निघते. मंदिराचे एकूण क्षेत्रफळ सुमारे ४२ x २६ मी. चे असून मंदिराच्या सीमा भिंतीस चार बाजूंस चार बुरुज आहेत. समोरील दोन बुरुजांवर लहान आकाराच्या दोन तोफा ठेवलेल्या आहेत. गाभारा २.४० x २.४० मी. चा असून त्यांची उंची ३.९० मी. आहे. गाभाऱ्यावरील शिखर हे उत्तर मध्ययुगीन शिखरशैलीचा उत्कृष्ट नमुना आहे. त्याची उंची १०.५० मी. आहे. हे शिखर तीन टप्प्यात पूर्ण केले असून एकात एक लहान होत जाणारे असे हे शिखर आहे. प्रत्येक टप्प्यावर देवकोष्ठ ठेवलेले असून माकडाचे पुतळे बसवलेले आहेत. प्राचिन शिखर शैलीपेक्षा वेगळे असलेले हे शिखर सहज लक्ष वेधून घेते. इतर प्रांतात न दिसणाऱ्या या शिखराची बाह्यरेषा कोनावर शंकुसारखी आहे, असे असले तरी हे काम तीन टप्प्यात मजल्या-मजल्याने झाले असे दिसते. रुद्रप्रतापसिंह पवार यांनी सन २००१ मध्ये धापेवाड्याचे महत्त्व स्पष्ट करणारा एक भव्य चित्रपट चित्रित केला असून यामुळे भाविकांना हे स्थान माहात्म्य स्पष्ट होते हे विशेष.

नगरधन

नगरधन : (ता. रामटेक २१°२०' उ., ७९°१५' पू.) रामटेकच्या दक्षिणेस ६.४४ कि. मी. अंतरावर आहे. येथे ताम्रपाषाणयुगीन अवशेष सापडल्याची नोंद पुरातत्वज्ञांनी केली आहे. साधारणपणे दीड हजार वर्षापूर्वी हे नगर नागपूर जिल्ह्यातील एक महत्त्वाचे स्थान होते. वाकाटकांच्या एका शाखेचे राजधानीचे हे ठिकाण होते. नंदिवर्धनच्या स्थलनिश्चिती विषयी प्रारंभी भिन्न मतप्रवाह दिसतात. काही संशोधकांच्या मते नागपूर जिल्ह्यातील पारशिवनी तालुक्यातील घुघुसगड हे प्राचीन नंदिवर्धन असावे. अर्थात वा. वि. मिराशी यांनी केलेल्या संशोधनानंतर रामटेक जवळील नगरधन हेच नंदिवर्धन असल्याचे स्पष्ट झाले आहे. या स्थानाची राजधानी म्हणून वाकाटकांनी निवड केली. त्याही आधीपासून एक नागरी केंद्र म्हणून या स्थानाचे महत्त्व असावे. नगरधन येथे सातवाहनकाळाचे अवशेष देखील प्राप्त झाले आहेत. स्थानिक आख्यायिकेनुसार या नगराची स्थापना नंदनामक राजाने केली तर हिरालाल यांनी या स्थानाचा बालेघाट परिसरातील नंदिवर्धननामक राजाशी संबंध दाखविला आहे. वाकाटक कालखंडामध्ये नंदिवर्धन प्रामुख्याने विकसित झाले. भौगोलिक दृष्ट्या सुरक्षित असलेल्या रामगिरी उर्फ रामटेक या स्थानानंतर त्यापासून जवळच असलेल्या नंदिवर्धनचा विकास करण्यात आला. वाकाटकांच्या काही शासकांनी या स्थानावरून दान दिल्याचा उल्लेख उपलब्ध आहे. (ठोसर, हरिहर, पूर्वोक्त.) विशेषत: प्रभावती गुप्तचा

प्रारंभिक ताम्रपट आणि प्रवरसेन द्वितीयाचा ताम्रपट या स्थानावरून दिला. (मिराशी, वा. वि. **वाकाटक नृपति आणि त्यांचा काळ,** नागपूर, १९५७, पृ. ५१, १८५.) वाकाटक काळामध्ये या स्थानावर राजप्रसाद दूर्ग आणि जलाशयाची निर्मिती झाली असावी. प्रवरसेन द्वितीय याच्या काळात व दुसरा प्रवरसेन व दुसरा पृथ्वीसेन याच्या काळात राजधानीचे स्थान अनुक्रमे प्रवरसेन आणि पृथ्वीपूर येथे स्थलांतरित झाले असावे. तथापि, वाकाटकांच्या नंतरही विदर्भाचे शासन करणारे नल आणि स्वामीराज यांची राजशासने नंदिवर्धनवरून दिलेली आहेत. त्यावरून नंदिवर्धन हीच वाकाटकांची प्रदिर्घकालीन राजधानी होती हे स्पष्ट होते. किंबहुना प्रवरपूर आणि पृथ्वीपूर ही नंदिवर्धनचीच विविध नावे. पृथ्वीसमुद्र हे प्राचीन तलावाचे नाव असावे. वाकाटक आणि नल राजवटीत शासनाचे प्रमुख केंद्र असलेल्या नंदिवर्धनाचे राजकीय महत्त्व त्या राजवटीच्या नंतर कमी होत गेल्याचे दिसते. राष्ट्रकूट काळामध्ये केवळ एक 'विषय' विभागाचे मुख्यालय म्हणून याविषयीचा उल्लेख मिळतो. या स्थानाचा उल्लेख नागपूर-नंदिवर्धन या जोड नावाने राष्ट्रकूट काळात मिळतो. राष्ट्रकूट नृपति स्वामीराज याचा कलचूरी संवत ३२२ (इ. स. ५७३) चा ताम्रपट नंदिवर्धनवरून दिला होता. (मिराशी, वा. वि. **कलचूरी नृपति आणि त्यांचा काळ,** नागपूर, १९५६, पृ. १२८ आणि **मेघदूतांतील रामगिरि अर्थात रामटेक,** विदर्भ संशोधन मंडळ ग्रंथमाला, क्र. ११, १९५८, पृ. २५.) राष्ट्रकूट राजा तिसरा कृष्ण याच्या देवळी ताम्रपटात असा उल्लेख करण्यात आला आहे. एकूण दहाव्या शतकापासून नंदिवर्धनचे राजकीय व प्रशासकीय महत्त्व कमी होत गेले असावे. वाकाटक काळामध्ये नंदिवर्धन नगराचा विस्तार झाला होता. आजही या स्थानाच्या परिसरात वाकाटककालीन वास्तूंचे अवशेष असलेले पुरातत्व गर्भक्षेत्र आढळते. आता स्वतंत्र असलेल्या हमलापूरी या स्थानाची नोंद तत्कालीन नंदिवर्धनचाच एक भाग म्हणून करता येईल असे येथे उपलब्ध होणाऱ्या पुरातत्व गर्भक्षेत्राकडे पाहता म्हणता येईल. येथे दोन गणांच्या वाकाटककालीन मूर्ती शेतात सापडल्या यापैकी कुंभोदर असलेली बसकी मूर्ती ही देवाच्या बागडणाऱ्या परिचारांची वास्तवाकार शिल्पाकृती असून ती त्यांचे यथातथ्य प्रतिनिधीत्व करते. तर दुसरा गण राजा प्रमाणे ऐसपैस बसला आहे. **(राज्य गॅझेटिअर : "स्थापत्य व कला",** (खंड १ भाग-२) मुंबई, २००२, पृ. २३७.)

भोसल्यांच्या काळात नंदिवर्धन शहरास पुन्हा महत्त्व प्राप्त झाले. रघुजी भोसले याच्या कारकिर्दीत त्याचा मंत्री देवाजीपंत चोरघडे याच्या आश्रयास असलेल्या कृष्णदत्त या पंडिताने 'पुरंजनरचित' हे संस्कृत नाटक लिहिले (मिराशी, वा. वि. **"मेघदूतांतील रामगिरि अर्थात रामटेक"** विदर्भ संशोधन मंडळ ग्रंथमाला, क्रमांक ११, १९५८, पृ. २४.) त्याच्या प्रस्तावनेत त्याने या स्थानाचा उल्लेख केला. एकून इ. स. च्या चौथ्या शतकापासून या स्थानाला विशेष ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले असे दिसते.

श्री कोटेश्वर मंदिर : नंदिवर्धन येथे कोटेश्वर या नावाने ओळखले जाणारे शिवमंदिर आहे. हेमाडपंती शैलीत बांधलेले हे मंदिर असून या स्थानाविषयी काही दंतकथा प्रचलित आहेत. येथील शिवलिंगास एक मोठी भेग असून त्याविषयी एक कथा प्रचलित आहे. या स्थानावर एक गवळीण अत्यंत निष्ठेने शिवआराधना करीत असे. त्यामुळे तिच्या दूधाला चांगला भाव मिळे. अर्थात तिच्या पतीस तिच्या चारित्र्याविषयी संशय निर्माण झाल्यामुळे ती शिवास स्वत:ला पोटात घेण्याविषयी प्रार्थना करते, परिणामत: ते शिवलिंग दुभंगले जाऊन

ती त्यात सामावली गेली असा या कथेचा आशय आहे. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** महाराष्ट्र स्टेट, बॉम्बे, १९६६, पृ. ७३२.) दर महाशिवरात्रीस येथे मोठी यात्रा भरते.

शंखतीर्थ तलाव : कोटेश्वर महादेव मंदिराच्या बाजूला असलेल्या जलाशयास शंखतीर्थ किंवा शुक्लतीर्थ म्हणून ओळखतात. वाकाटककालीन शासनातील पृथ्वीसमुद्र ही नोंद या स्थानाची असावी. या तीर्थाचा उल्लेख रामटेक येथील लक्ष्मण मंदिरात असलेल्या यादवकालीन शिलालेखातही आहे. हिरालाल याच्या मते शिलालेखात असलेल्या अन्य एका तीर्थाचा, हंसतीर्थ असा तो उल्लेख आला आहे. तो जलाशय सुध्दा नगरधन येथीलच असावा. एकूण या जलाशयाची प्राचीनता यादवपूर्व काळापर्यंत निश्चितच पोहोचते. (ठोसर, हरिहर, पूर्वोक्त.)

नगरधन किल्ला : नगरधन येथे असलेल्या किल्ल्याची प्राचीनता इ. स. चौथ्या-पाचव्या शतकापर्यंत म्हणजे वाकाटक काळापर्यंत जाऊ शकते. अर्थात तत्कालीन दूर्गाच्या अवशेषावर आज उभा असलेला किल्ला हा प्रामुख्याने भोसले काळात बांधला आहे. किल्ल्याचे प्रवेशद्वार व तटबंदी ही भोसल्यांची निर्मिती आहे. कदाचित जुन्या वाकाटककालीन स्थानाचाच पुन्हा नव्याने विकास या काळात झाला असावा. किल्ल्याच्या प्रवेशद्वारावर गणेशाचे शिल्प असून याच पट्टीवर कलश, कमळ आदि चिन्हांचे अलंकरण आहे. या स्थानावर वाकाटककालीन विटा तसेच राष्ट्रकूट स्वामीराज याचा ताम्रपट उपलब्ध झाला.

नरखेड

नरखेड : (ता. नरखेड) वर्धा नदीच्या एका उपनदीच्या काठी नरखेड हे स्थान वसले असून नागपूर-दिल्ली या रेल्वेमार्गालगत आहे. संत्रा उत्पादनासाठी हे एक प्रसिध्द केंद्रस्थान मानले जाते. कृषि उत्पन्न बाजार समितीच्यावतीने येथे मोठे संत्रा बाजार क्षेत्र तयार करण्यात आले आहे. समुद्रसपाटीपासून ४०८.६० मी. उंचीवर हे स्थान आहे. गावामध्ये असलेल्या नदीच्या किनाऱ्यालगत एक मशीद व मारूतीचे एक देवस्थान स्मशानभूमीलगत आहे. तसेच विठ्ठल मंदिर, राममंदिर व बुध्दविहार आहे. एक लहानसे उद्यान तयार करण्यात आलेले आहे. गावालगत असलेल्या टेकडीवर एक मंदिर असून तुकाराम महाराज जयंतीच्या दिवशी येथे यात्रा भरते. जवळच एक लहानसा जलाशय असून त्यात कमळाची फुले आढळतात. माना या लढाऊ जमातीच्या लोकांनी या गावाची स्थापना केली असे मानले जाते. पेंढाऱ्यांच्या लुटारू टोळ्यांना अनेकवेळा परतवून लावले. मध्ययुगीन काळातील काही वस्तू व मोगलकालीन नाणी येथे सापडली आहेत.

नागपूर शहर

नागपूर शहर : (२१°०५' उ., ७९°००' पूर्व) हे शहर मुंबईपासून ८३६.६८ कि. मी. अंतरावर आणि कलकत्त्यापासून ११२८.१५ कि. मी. अंतरावर आहे. या स्थानावरून मुंबई-हावरा, दिल्ली-मद्रास, नागपूर-रामटेक, तसेच नागपूर-छिंदवाडा आणि नागपूर-नागभीड हे रेल्वेमार्ग जातात. देशाच्या मध्यवर्ती असणारे हे एक महत्त्वाचे जंक्शन आहे. हे स्थान जबलपूरपासून रेल्वेने ३६२ कि. मी. अलाहाबादपासून ७१६ कि. मी. आणि कानपूरपासून ९०४.४६ कि. मी. अंतरावर आहे. हैद्राबाद-नागपूर रस्त्याचे अंतर ५११.६६ कि. मी. आहे.

शहराच्या उत्तरेला ४०.२३ कि. मी. सातपुडा पर्वतरांगाचा पायथा आहे. शहर सापेक्षत: मैदानी प्रदेशात असून नाग नदीच्या काठाशी आहे. या नदीवरून शहराचे नाव पडले. जमीन खोलगट असली तरी तिला उतार आहे अन् पश्चिमेस व उत्तरेला बेसाल्ट दगडाच्या रांगा आहेत. शहराचे क्षेत्र २७३.७०० चौ. कि. मी. पेक्षा जास्त विस्तृत झाले असून सतत त्याचा विस्तार होत आहे. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** महाराष्ट्र स्टेट, बॉम्बे, १९६६, पृ. ७३३.) नाग नदीकाठी वसलेले स्थान म्हणून नागपूर हे नाव प्राप्त झाले असावे. या भौगोलिक संज्ञेबरोबरच हे शहर नागवंशीय शासकाने वसवले असावे अशीही एक मान्यता आहे. या स्थानाच्या नावातील नाग या मुख्य पदावरून याविषयी अनुमान केले जाते. कुषाणांच्या राजवंशानंतर बुंदेलखंडामध्ये भारशीवनाग हा नागराजा झाला असा नामोल्लेख असणारा एक लेख पवनी येथे उपलब्ध झाला. इ. स. प्रथम शतकाच्या शेवटी नागवंशीयांनी या प्रदेशात वस्ती केल्याचे मानले जाते. (अंधारे, भा. रा. **भोसलेकालीन नागपूर,** २००१, पृ. १.) या परिसरात पंचमढी महादेव या स्थानापासून २२ कि.मी. अंतरावर नागद्वार या नावाने ओळखले जाणारे एक स्थान असून येथे यात्रा भरते. नागवर्धन, नंदीवर्धन यातूनच नागपूर असे नामाभिधान रूढ झाले.(अंधारे, भा. रा., **भोसलेकालीन नागपूर,** २००१, पृ. १.) नागपूरचा प्रथम अभिलेखीय उल्लेख राष्ट्रकूट राजा कृष्ण तिसरा याच्या देवळाली ताम्रपटात आला आहे. दहाव्या शतकात नागपूर-नंदीवर्धन अशा जोडनावाने या प्रशासकीय विभागाची नोंद उपलब्ध होते. **(एपिग्राफिया इंडिका खंड ५,** पृ. १८८.) यावरून असे दिसते की, येथे किमान राष्ट्रकूट पूर्वकाळापासून वसाहत असावी. राष्ट्रकूटांच्या शेवटच्या काळात नंदीवर्धनसाठी पर्याय म्हणून नागपूरचा विकास होत गेला. (ठोसर हरिहर, पूर्वोक्त.)

नाग नदीच्या काठावर उभारण्यात आलेल्या किल्ल्याच्या सभोवताली शहराची वस्ती झाली. गौंड राजा बख्तबुलंद याने 'राजापूर बारसा' या नावाच्या बारा वाड्या होत्या त्या एकत्र करून शहर वसवले. यामुळे त्यास नवनगरीचा निर्माता म्हटले जाते. ही घटना सन १७०२ च्या सुमारास घडली. (लांडगे, द. गो., **नागपूरच्या संस्कृतीचा इतिहास,** वर्ष १९५४, नागपूर, पृ. ३.) काही इतिहासकारांच्या मते त्याने याचवेळी देवगडची राजधानी राजापूरला आणली. (अंधारे, भा. रा. पूर्वोक्त पृ. ८.)

नागपूर शहराची स्थापना अठराव्या शतकाच्या प्रारंभी गोंड राजा बख्तबुलंद याने केली. पुढे भोसल्यांनी आपल्या विस्तृत राज्याची राजधानी म्हणून नागपूरची निवड केली. सन १७६५ मध्ये पेशव्यांनी नागपूर शहर जाळले व लुटले तसेच १८११ मध्ये पेंढाऱ्यांनी नागपूरची उपनगरे जाळली. तरीपण राजधानी असल्यामुळे नागपूरचा सतत विकास होत गेला. नागपूरकर भोसल्यांपैकी पहिल्या रघुजीने साताऱ्याचे अनुकरण करून येथे आठवड्याच्या नावांवर पेठा वसविल्या तर जानोजी आणि दुसऱ्या रघुजीच्या काळात पुण्याचे अनुकरण करून बेलबाग, तुळशीबाग आणि धरमपेठे सारख्या पेठा वसविण्यात आल्या. सन १८१७ मध्ये येथे सिताबर्डी आणि नागपूरच्या लढाया झाल्या त्यामुळे या प्रदेशात ब्रिटिशांचा प्रभाव स्थापन झाला. १८५३ साली नागपूर राज्य कंपनीच्या साम्राज्यास जोडून तेथे मुख्य आयुक्त

दर्जाचा अधिकारी नेमण्यात आला. १८५७ साली येथे फारसा उपद्रव झाला नाही. १८९६ मध्ये मात्र दुष्काळ पडल्याने मोठाच दंगा झाला. १८९९ मध्ये प्लेगविरोधी उपायाच्या निषेधार्थ दंगा झाला पण दोन्ही दंगे इंग्रजानी ताबडतोब दडपून टाकले. १८६७ मध्ये नागपुरास रेल्वे आली तेव्हा तिचे नाव ग्रेट इंडियन पेनिसुला रेल्वे होती (सध्या मध्य रेल्वे) या रेल्वेमुळे नागपूरचे महत्त्व आणि लोकसंख्या वेगाने वाढली. १९४७ साली स्वातंत्र्य मिळाल्यावर नागपूर शहर मध्यप्रदेशाची राजधानी झाली. १९५६ साली नव्या मध्यप्रदेश व द्वैभाषिक राज्याच्या निर्मितीनंतर नागपूर विदर्भासकट द्वैभाषिकात समाविष्ट करण्यात आले. नंतर नागपूर आणि अकोला कराराने नागपूरचे महत्त्व कायम ठेवण्यासाठी तिला उपराजधानीचा दर्जा देण्यात आला आणि तेथे विधानसभेचे हिवाळी अधिवेशन घेण्याचे ठरले.

सिताबर्डी टेकडीच्या पूर्वेकडून जाणाऱ्या रेल्वे मार्गाने नागपूरचे दोन भाग झाले आहेत. रेल्वेमार्गाच्या पूर्वेस जुने नागपूर व पश्चिमेस नवे नागपूर आहे. उत्तरेला सिव्हिल लाईन्स आहे तर दक्षिणेला खापरीपर्यंत विस्तार झाला आहे. रेल्वे स्टेशन मोठ्या प्रमाणावर उभारण्यात आले. नागपूरला प्रथमच येणारा प्रवाशी या स्टेशनचा दिमाख आणि उंची पाहून थक्कच होतो. रेल्वे स्टेशनच्या पुढे सिताबर्डीची टेकडी असून त्यावर सिताबर्डीचा किल्ला आणि संरक्षण विभागाचे कार्यालय आहे. रेल्वे स्टेशनसमोरचा रस्ता सदर, सिताबर्डी आणि हंसापुरी या तीन दिशेने जातो. रेल्वे स्टेशनच्या मागच्या बाजूला संत्रा मार्केट, कॉटन मार्केट व महात्मा फुले भाजीबाजार असून तो रस्ता थेट जुम्मा तलावाच्या काठाने टिळक पुतळ्याजवळून 'महाल' या मूळ नागपुरात येतो. जुम्मा तलाव चौकोनी असून पूर्वी तो संत्रा मार्केटपर्यंत होता. संत्रा मार्केट व एम्प्रेस मिलच्या विस्ताराने त्याचा आकार (अर्ध्याने) कमी झाला. या तलावाच्या मध्यभागी छोटेसे बेट व बेटावर छोटेसे सुंदर मंदिर आहे. जुम्मा तलावाच्या आग्नेय कोपऱ्यावर मुधोजी भोसल्याने १७८८ मध्ये स्थापन केलेले गणपतीचे मंदिर आहे. मंदिराच्या दक्षिण काठावर भगवान झुलेलाल याचे मंदिर असून पश्चिम काठावर रमण प्लॅनेटोरियम आहे. जुम्मा तलावाचे चारही बाजूने सौंदर्यीकरण झाले असून हा तलाव खोल करण्यात आला आहे.

तलावाच्या काठाचा रस्ता शुक्रवारी दरवाजा (गांधीद्वार) असून, शहराचा कोट आता नष्टप्राय झाला आहे. हा रस्ता सरळ नागपूरच्या मध्यभागी येतो. येथे असलेला भोसल्यांचा वाडा १८६४ मध्ये भस्मसात झाला. आता तेथे रघुजी भोसले यांच्या नावे नगर भवन आणि महापालिकेची कार्यालये आहेत. त्याच्या विरुध्द बाजूला कोतवाली हे पोलीस ठाणे आहे. दक्षिणेला सकरदरा बाग आहे. सकरदराकडे जाणाऱ्या रस्त्यावर उजव्या बाजुला महिला सायन्स कॉलेज आणि डाव्या बाजूला रेशीमबाग वसाहत आहे.

शहराचा मुख्य व्यावसायिक रस्ता पूर्वेकडून पश्चिमेकडे जाणारा हंसापुरी रस्ता आहे. याच्या पूर्व टोकाला भंडारा रोडजवळ इतवारी बाजार आहे. या रस्त्याने गांधीबागेत पोलीस वसाहत आहे. हा अत्यंत दाट लोकवस्तीचा भाग आहे. सुमारे सव्वाशे वर्षापूर्वी नागपूर म्हणजे अनेक लहान वसाहतीचा समूह होता. तेथे धड रूंद रस्ते नव्हते की, दिवाबत्तीची सोय नव्हती. लहान गल्ल्या, बोळी आणि पावसाळी चिखल, ठिकठिकाणी घाणीचे ढिगारे आणि जुनी पडलेली घरे असे नागपूरचे दृश्य होते, पण आज शहराचे स्वरूप पूर्णपणे

बदलले आहे. शहराचे रुंद आणि सुंदर रस्ते निरनिराळ्या भागांना जोडतात. रेल्वे स्टेशन सुध्दा मोठे बांधले असून त्याचे मुंबई-हावरा, दिल्ली-मद्रास हे मुख्य महामार्ग याच जंक्शनमधून जातात. १८७३ साली अंबाझरी तलावातून पाणीपुरवठा होत होता तो वाढत्या शहराला अपुरा पडत असल्यामुळे गोरेवाडा तलाव आणि कन्हान नदीचे पाणी शहरास पुरविले जाते. पेंच प्रकल्प योजनाही कार्यान्वित करण्यात आली आहे. १९५० साली सुरु झालेल्या खापरखेडा कर्ब विद्युत केंद्रातून शहराला वीज पुरविली जाते. शहरातील नाग नदी आणि तिला मिळणारे अन्य नाले यामधून मलनिस्सारणाची सोय होते. याशिवाय महापालिकेने भूमीगत मलनिस्सारणाची १५९ लाखाची नवी योजना हाती घेतली आहे.

आपण सिताबर्डी टेकडीसारख्या उंच ठिकाणाहून पाहिले असता गजबजलेल्या गल्ल्याबोळी आणि चाळी हिरव्या शालूसारख्या वृक्षराईमागे अदृश्य होतात आणि फक्त शुक्रवारी तलाव आणि गिरण्यांच्या चिमण्या तेवढ्या शहराची खूण दर्शवितात. रेल्वे स्टेशन आणि सिताबर्डी टेकडीच्या वायव्येला सिव्हिल लाईन्स आहे. भोसल्यांच्या काळात येथे बागबगीचे होते. १८९१ साली एका टेकडीवर गव्हर्नरचा बंगला बांधलेला असून त्या पलीकडे टेकडीवर रोमन कॅथॉलिक सेमिनरी आणि अन्य एक भव्य अन भक्कम इमारत आहे. या टेकडीच्या दक्षिणेला रूंद रस्ते व कुंपणे असून क्रिकेट व फुटबॉलची मैदाने, पोलोचे मैदान, रेसकोर्स आणि गोल्फ कोर्स आहे. जुन्या भागात वनराई असून तेथे फक्त रोमन कॅथॉलिक कॅथेड्रल इंग्लिश चर्च, अजायबघर (पुराणवस्तु संग्रहालय), क्लब हाऊस आणि सायन्स इन्स्टिट्यूट (जुनी व्हिक्टोरिया इन्स्टिट्यूट) या मोठ्या इमारती दिसतात. सेक्रेटरिएट बिल्डिंगच्या समोर लाल विटांनी बांधलेली जनरल पोस्ट ऑफिसची भव्य इमारत आहे. या परिसरात उच्च न्यायालय, सर्किट हाऊस, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आणि महानगरपालिकेची इमारत आहे. याच्या पलीकडे दक्षिणेला सरकारी अधिकाऱ्यांची वसाहत आहे. त्याच्या पश्चिमेला तेलंगखेडी तलाव असून त्याच्या काठाशी क्लबची इमारत आणि नवीन पोलो मैदान आहे. या मैदानावर बरेच वृक्षारोपण झाले असून त्यामुळे मैदानाचे सौंदर्य वाढले आहे. या मैदानाच्या उत्तरेला टाकळीची टेकडी, अनेक नवे बंगले आहेत. नागपूर येथे केंद्रीय कारागार असून तेथे गालिचा तयार करणे वेताच्या खुर्च्या विणणे तसेच भाजीपाला पिकविने असा उपक्रम चालतो. नागपूर येथे छिंदवाडा रोडवर मानसोपचार केंद्र व मनोविकृती आश्रम आहे.

जुन्या नागपुरात मनोरंजनाची फार थोडी ठिकाणे होती. तेलंगखेडी, महाराज बाग आणि सकरदरा या जुन्या बागासोबत आता नागपूर महानगरपालिकेच्या अंतर्गत गांधीबाग, अंबाझ ारी, शुक्रवारीबाग निर्माण झाले आहेत. राजभवन, रहीमबाग, धन्तोली मिडल प्रेसिंक्ट शांतीनगर उद्यान तसेच भगवाघर येथे ट्रफिक चिल्ड्रन पार्क आणि अम्युझमेंट पार्क उभारण्यात येत आहे. महाराजबागही नागपुरातील प्रमुख बाग आहे. नागपूर हे विद्येचे मोठे केंद्र मानले जाते. गोंड राज्यापासून येथे विद्वानांना आश्रय देण्याची परंपरा होती ती पुढे भोसले राज्यकर्त्यांनी चालविली. आता नागपूर येथे विज्ञान महाविद्यालये, कला महाविद्यालये, कृषि महाविद्यालय, वाणिज्य महाविद्यालय, एक सरकारी पोलिटेक्निक, विधी महाविद्यालय, पशुवैद्यक महाविद्यालय, लक्ष्मी नारायण इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आणि अनेक प्राथमिक, माध्यमिक आणि इतर शैक्षणिक संस्था आहेत. पूर्वी नागपूरची महाविद्यालये अलाहाबाद विद्यापीठाशी संलग्न होती पण १९२३ मध्ये नागपूर विद्यापीठ स्थापन झ ाल्यापासून सर्व महाविद्यालये या विद्यापीठाशी संलग्न आहेत. भोसल्यांची व जुन्या मध्यप्रदेशची राजधानी असल्याने व महाराष्ट्राची उपराजधानी असल्याने नागपूरला वैभवशाली

परंपरा आहे. ऐतिहासिक काळापासून नागपूर हे कला, संस्कृति, इतिहास आणि व्यापारी दृष्टीने महत्त्वाचे केंद्र आहे. नागपूरची लोकसंख्या १८२१ मध्ये ११,२३१ होती ती वाढून १९९१ च्या शिरगणतीनुसार १६,२४,७५२ आहे, **(सेन्सस ऑफ इंडिया** १९९१, सिरिज १४ महाराष्ट्र, पार्ट १२ अे बी प्रायमरी सेन्सस अॅबस्ट्रॅक्ट) तर २००१ च्या जनगणनेप्रमाणे या शहराची लोकसंख्या २०,५२,०६६ आहे.

मनोरंजन केंद्र : आजच्या बदलत्या काळात दिवसभराच्या परिश्रमानंतर माणसाला विश्रांती हवी असते. त्यामुळे मनोरंजन केंद्राचे महत्त्व वाढले आहे. त्यामुळे नागपूर महानगरपालिकेने वेगवेगळ्या ठिकाणी २० उद्याने उभारली आहेत. या सर्व बगीच्यात सिमेंटचे बेंच आहेत तर काही ठिकाणी पूर्वी रेडिओ सेट व ध्वनिक्षेपक असून तेथे सायंकाळी मधुर संगीत वाजविले जाई. आता हि जागा दूरदर्शन संचानी घेतली आहे. प्रत्येक उद्यानात मुलांसाठी पाळणा, घसरगुंडी व इतर मनोरंजनाची साधने आहेत. तर काही उद्यानात प्रचंड वृक्ष व फुलझाडे आहेत. अंबाझरी उद्यान सर्वात सुंदर असून तेथे झुलता पुल आहे. सर्व उद्यानात फवारे असून विविध रंगाची विजेची रोशनाई केली म्हणजे तेथे अतिशय सुंदर दृश्य दिसते. महानगरपालिकेने एकूण चार जलतरण ताल (तलाव) असून आणखी दोनचे बांधकाम चालू आहे. काही जलतरण ताल खाजगी आहेत.

महानगरपालिकेने पाच लाख रुपये खर्च करून चिटणीस पार्क स्टेडियम उभारले असून तेथे दीड हजार लोक बसू शकतात व क्रिडांगणातील क्रिडा पाहू शकतात. तसेच महानगरपालिकेने दीड लाख रुपये खर्चाचा टाऊन हॉल उभारला असून त्याला रघुजी भोसले यांचे नाव दिले आहे. महानगरपालिकेने प्राथमिक शाळा, आयसोलेशन इस्पितळ, सदर आणि शांतीनगर येथे सुतिकागृहे उभारली आहेत.

महाराष्ट्र राज्य प्रशासनाचे सेंट्रल म्युझियम (अजबघर) नागपूरचा मानबिंदू आहे. तर प्रादेशिक सेनेची १८ पायदळ बटालियन असलेला सिताबर्डीचा किल्ला ऐतिहासिक- दृष्ट्या महत्त्वाचा आहे.

सिताबर्डी किल्ला

नागपूर रेल्वे स्थानकाच्या मुख्य द्वाराने बाहेर निघताच सिताबर्डीच्या जुळ्या टेकडीवर असलेल्या या किल्ल्यावर तिरंगा ध्वज फडकताना दिसतो. रात्री विशेषत: पौर्णिमेच्या रात्री प्रादेशिक सेनेच्या अठराव्या इन्फट्री बटालियनच्या ऑफिसर्स मेस मागे किल्ल्याचा बुरुज नजरेत भरतो.

सिताबर्डीचे युध्द नागपूरकर भोसले आणि ईस्ट इंडिया कंपनी यांच्यात झाले. त्यात कंपनीचा विजय झाला. मराठा सैन्य विशेषत: अरब सैनिक शौर्याने लढले पण इंग्रजांचे युध्द नेतृत्व आणि दारूगोळ्याच्या शक्तीमुळे त्यांचा पराभव झाला. सिताबर्डीच्या टेकडीवरून नागपूरचे नियंत्रण करता येते. त्यामुळे सिताबर्डी येथे पराभव होताच नागपूर राज्याचा पराभव अटळ झाला. या ऐतिहासिक लढाईतील दोन निर्णायक प्रसंगाचे चित्रण करणारी तैलचित्रे नागपूरच्या राजभवनात आहेत. एका चित्रात अरबाच्या दारूगोळ्याच्या कोठ्यांचा स्फोट

होण्याचे दृश्य चित्रित आहे, तर दुसऱ्या चित्रात लेफ्ट. फिट झेराल्डच्या धाडसी हल्ल्याचे चित्रण आहे. याशिवाय ब्रिटिश रेसिडेन्ट मि. रिचर्ड जेकिन्स आणि ब्रिटिश सेनापती लेफ्ट, जे. एच. एस. स्कॉटचे चित्र राजभवनात आहे.

या युध्दानंतर झालेल्या करारानुसार सिताबर्डीच्या जुळ्या टेकड्यावर इंग्रजांनी १८२२ मध्ये नव्याने किल्ला बांधला (गोंड राजवटीतील हे स्थान असावे. सिताबर्डी हा शब्द 'चिंचेचे बन' या अर्थाने गोंडी भाषेत येतो.) व तेथे ९२७ इ. ॲण्ड एम. कंपनी ऑफ इंजिनियर्सची वस्ती केली. आता तेथे प्रादेशिक सैन्याच्या ११८ इन्फन्ट्री बटालियनच्या मुख्य बराकी आणि प्रशासकीय इमारत आहे. दुसऱ्या बाजूला गणेशाचे मंदिर आणि संरक्षण विभागाचे व स्टेट बँकेचे कार्यालय आहे. सिताबर्डीचा किल्ला आहे तेथे एक मजबूत व भव्य इमारत आहे. नागपूर शहर नियंत्रित ठेवण्यासाठी ती उभारण्यात आली त्याचसाठी ती उपयोगी आहे.

किल्ल्याच्या संरक्षणाची दोन क्षेत्रे आहेत. दोन लगतच्या टेकडीवर उभारलेल्या या किल्याची भिंत आणि कोटाला योग्य ठिकाणी बुरूज आहे. दक्षिण बाजुला उत्तुंग कडा असल्याने निसर्गत: संरक्षण लाभले आहे. उतारावर काही ठिकाणी काटेरी तारा लावल्या आहेत. किल्ल्यावर सतत २०० जवान राहण्याची सोय असली तरी आणीबाणीच्यावेळी एक हजार सैनिकांची छावणीमध्ये व्यवस्था होऊ शकते. किल्ल्यात पाण्यासाठी विहिरी आणि भुमिगत धान्य साठवणीची व्यवस्था आहे. संरक्षण व्यवस्थेसाठी तटबंदी आहे. बालेकिल्ल्यात पाच ठिकाणी आणि बाहेर दोन ठिकाणी पक्की नाकेबंदी आहे. प्रत्येक बुरुजावर एक तोफ ठेवण्याची सोय आहे. त्यामुळे खालची जागा रिकामी करावी लागली तरी बालेकिल्ल्यात ५०० दृढनिश्चयाची माणसे मदत येईपर्यंत शत्रुला रोखून धरू शकतात. मोठ्या टेकडीच्या शिखरावर सिताबर्डीच्या लढाईत मरण पावलेल्या वीरांचे स्मारक आहे. बालेकिल्ल्यास जाणाऱ्या बोगद्याच्या उजव्या उतारावर मि. साऊथनी आणि इंग्रज शिपायांच्या कबरी आहेत. पूर्व बाजूला शहराच्या दिशेने ब्रिटिश राजे पंचम जॉर्ज आणि राणी मेरी यांनी १९११ मध्ये जनतेला दर्शन दिल्याची आठवण म्हणून उभारलेले स्मारक आहे. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** महाराष्ट्र स्टेट, बॉम्बे, १९६६, पृ. ७४२.) बाले किल्ल्याची पूर्व भिंत आणि बराकीच्या दरम्यान नवगज अलीबाबा नावाने प्रसिध्द मोठी कबर आहे. ही कबर म्हैसूर प्रसिध्द टिपू सुलतानचा नातू नवाब कादर अली आणि त्याच्या आठ सहकाऱ्यांची आहे. १८५७ साली उठावाची तयारी करीत असल्यामुळे इंग्रजांनी त्यांना पकडून किल्ल्याच्या बुरुजावर फाशी दिले. त्यांना ९ यार्ड लांबीच्या एकाच कबरीत पुरण्यात आले. ही कबर पाहून स्वातंत्र्यासाठी शहीद झालेल्या ज्ञात-अज्ञात वीरांचे स्मरण होते. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** महाराष्ट्र स्टेट, बॉम्बे, १९६६, पृ. ७४२.)

गोंड राजवंश : गोंड राजाच्यावेळी किल्ल्यालगतच्या भागात भोसले पूर्वकालीन नागपूर होते. तथापि, दे. गो. लांडगे यांनी बुधवार पेठेतील जागृतेस्वराच्या देवळा-भोवताली जुने नागपूर असल्याचे मत नोंदवले आहे. (अंधारे, भा. रा. पूर्वोक्त, पृ. ६.) गोंड वंशाचा संस्थापक राजा जातबा याने नागपूर येथे किल्ला बांधला. त्याच्या नंतर कोकशहा गादीवर आला. त्याच्या काळात दिल्लीचा मोगल बादशहा शहाजहान याचा सरदार खान दौरान याने नागपूरवर हल्ला करून किल्ल्याचे तीन बुरूज सन १६३७ मध्ये पाडले. कोकशहा बख्तबुलंद गादीवर आला. त्याने १७०२ मध्ये नवीन नागपूर वसविले. यावेळी

राजापूर बरसा नावाने ज्ञात असलेल्या १२ टोळ्या वाड्या होत्या. या १२ वस्त्यांपैकी हिवरी हिरापूर, सक्करदरा, वाठोडे, अकारी, लेंढरा, फुटाळा, गाडगे, भानखेड, सिताबर्डी , धंतोली व जाटतरोडी ही नावे ज्ञात आहेत. (राजूरकर, अ. ज., **चंद्रपूरचा इतिहास** (१९५६), पृ. ३९ व देशपांडे य. खु., लांडगे दे. गो. (संपा.) **विदर्भातील ऐतिहासिक लेखसंग्रह ग्रंथात** गोंड राजांचे सक्करदऱ्याजवळील मोठीवाडी, किल्ल्यातील लहानवाडी व राजवाड्याजवळचा भाग येथे असलेल्या कबरीची यादी दिली आहे. त्या किल्ल्यातील खाशांच्या कबरीची नोंद आहे [खंड पहिला, नागपूर १९५९] पृ. २२२ ते २२४.) भोसले राजांच्या काळात खऱ्या अर्थाने नागपूरचा विकास झाला.

भोसलेकालीन नागपूर

पहिल्या रघुजीच्या पूर्वेकडील स्वाऱ्या आणि मराठ्यांच्या उत्तरेकडील अभियानामुळे ओरिसा, बंगाल, उत्तरप्रदेश, राजस्थान, माळवा येथील विविध सांस्कृतिक प्रवाह एकत्र येऊन त्यांचा उत्कृष्ट समन्वय भोसलेकालीन शिल्प शैलीवर झालेला जाणवतो. भोसल्याची सत्ता ओरिसावर अर्धशतक असल्यामुळे नागपूर येथील मंदिर शिखरावर ओरिसा, प्रभाव विशेष दिसून येतो. पहिल्या रघुजी भोसल्यानी छत्रपती शाहूच्या कल्पनांना स्थैर्य दिले. त्यांनी कारागिरांना, विणकरांना आणि सोनारांना आश्रय दिला. दुसऱ्या रघुजी भोसले यांच्या काळात नागपूर नगराचा आधुनिक दृष्टीने विकास होऊ लागला. त्याने नागपुरात अनेक उद्याने, तळी आणि मंदिरे निर्माण केली. ही सर्व विकासाची कामे करताना प्रसंगी सावकारांकडून कर्ज घेतले. दुसऱ्या रघुजीने नागपुरात विभिन्न ठिकाणात उद्याने आणि तळी निर्माण केल्यामुळे अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात नागपूर उद्याने आणि तळ्यांचे नगर म्हणून ओळखले जावू लागले, त्यामुळेच नागपूरच्या सौंदर्यात भर पडली. यादृष्टीने दुसऱ्या रघुजीला आधुनिक नागपूरचा शिल्पकार म्हणणे यथोचित होईल.

थॉमस कोलब्रुक : लॉर्ड वेलस्ली याने हेन्री थॉमस कोलब्रुक यास दुसऱ्या रघुजीशी तैनाती फौजेचा तह करण्याकरिता नागपूरला पाठविले. तो १८ मार्च १७९९ रोजी नागपुरास येऊन पोहचला. त्याने नागपूरविषयी पुढीलप्रमाणे वर्णन ८ जून १७९९ रोजी केले, "नागपूर शहर एका खोल जागी वसलेले असून त्याच्या सभोवताली लहान लहान टेकड्या आहेत. हिंदुस्थानातील बहुतेक शहरांप्रमाणे हे शहरही अरुंद व गलिच्छ रस्त्यांनी भरलेले आहे, परंतु राजवाड्याभोवतालची जागा मोकळी आहे. राजवाडा बराच मोठा असून भव्य आहे. त्यात सहा चौक असून प्रत्येक चौकाभोवती दोन अथवा तीन मजली उंच इमारती आहेत. बाहेरून सर्व वाड्याभोवती पक्का उंच परकोट आहे. मला फक्त बाहेरचा सर्वांना मोकळा असलेला भागच पाहावयास मिळाला. हा भाग मोठा व मोकळा आहे. दरबारचा दिवाणखाना विशेष चांगला असून हंड्या, झुंबरे व तसबिरी यांनी सुशोभित केलेला आहे. राजाला नक्षीच्या बांधकामाची गोडी असून ती त्याने स्वत:करिता बांधलेल्या महालामध्ये दिसून येते. राजाला बाग-बगिच्यांची बरीच आवड आहे. मला एका बगिच्यातील सुंदर वाड्यातच राहण्यास जागा दिली. या वाड्याभोवतालच्या बगिच्यात रेखीव रस्ते केले असून त्याच्या भोवती चांगले कुंपण आहे." (कोलग्रुथ टी. ई., **लाईफ ऑफ एच. टी. कोलग्रुथ** १८७३, पृ. १३१ ते १३३ व अंधारे, भा. रा., **आधुनिक नागपूर नगरीचे शिल्पकार दुसरे रघुजी भोसले,** (१७८८ ते १८१६) नागपूर, २००२ या ग्रंथातील नोंदी आधारे.) दुसऱ्या रघुजीला नक्षीदार बांधकामाची आणि योजनाबध्द रेखीव

उद्यानाची आवड होती, हे कोलब्रुकच्या वरील वर्णनानुसार स्पष्ट होते. रघुजीने सुंदर राजवाडा, एकापेक्षा एक सुंदर व सरस नक्षीदार मंदिरे आणि योजनाबध्द विलोभनीय उद्याने नागपूर नगरीत निर्माण केली.

भोसले राजवाडा : दुसऱ्या रघुजीने स्वत:करिता नक्षीदार राजवाडा बांधला. या राजवाड्यात चार चौक आणि सहा आरसे महाल होते. या वाड्याचा खालचा मजला अगोदर तयार झाला. १७९० मध्ये दुसरा मजला बांधला गेला. पूर्व-पश्चिम व उत्तर-दक्षिण अशी दोन दालने तयार केली आणि दोन सुंदर कारंजीही निर्माण केली. "नवा दिवाणखाना अडीच पावने तीन महिन्यात केला, पुण्याहून सालगुदस्त ऐने आणले ते लावून ऐनेयाचा दिवाणखाना करणार."आरसे पुण्याहून आणले, ते लावण्याचे काम १७९० मध्ये पूर्ण झाले. चार चौकांपैकी तीन चौक दुमजली केले. पूर्वेकडचा मजला अगोदर तयार झाला. १७९० मध्ये दुसरा मजला तयार झाला. वाड्याचे काम मजबूत होते. भोसले याच्या कागदपत्रांमधून आशा नोंदी मिळतात. १४ मे १७९० रोजी श्रीराम सदाशिव लिहितात, "दिवाणखान्याचे काम दुमजला होत आहे. ते पाहिले वाडा मोठा चारपांच चौक, काम पोख्त, पाच-सहा आरशे महाल आहेत. याप्रमाणे पुण्यातील श्रीमंताचा वाडा असा नाही बोलतात." (शेजवलकर त्र्यं. शं. संपा., **नागपूर अफेअर्स** (नागपूर भोसले यांचे पत्र) भाग १, नं. १५९ पृ. ७९ व नं. २८३ पृ. ३२३, पुणे १९५४.) पुण्याच्या पेशव्यांच्या शनिवारवाड्यापेक्षाही सुंदर व नक्षीकामांनी युक्त असा राजवाडा दुसऱ्या रघुजीने बांधला. लेकी २० ऑगस्ट १७९० रोजी या राजवाड्याविषयी लिहितो, "नागपुरातील एकमेव सुंदर इमारत म्हणजे राजाचा प्रासाद असून त्याचे बांधकाम मुधोजीने सुरू केले आणि आता मुलगा (दुसरा रघुजी) पूर्ण करीत आहे. हा राजवाडा निळ्या दगडांनी बांधला. हे दगड नागपूरच्या पश्चिमेकडील सीमेवरून खोदून आणतात, परंतु राजाने विटेचे बांधकाम त्यात आणल्यामुळे मूळच्या पाषाणाचा सौंदर्यप्रभाव नष्ट झाला." (डिस्कळकर, डी. बी., **अर्ली युरोपीयन ट्रॅव्हलर्स** (१८७४).) या राजवाड्याचा वास्तुशास्त्रज्ञ करीमखान होता. करीमखानाने तुळशी बागेतील देवळे, रामटेक येथील देऊळ आणि इंदुली बागेतील शिवमंदिर बांधले. वास्तविक पाहता राजवाड्याबरोबर त्याने सभोवतालीही बऱ्याच इमारती बांधल्या असा फॉर्स्टर इ. स. १७८८ मध्ये आपल्या अहवालात उल्लेख करतो. (विल्स सी. यु. ॲण्ड स्लॉकॉक, **अ स्केच ऑफ दि हिस्टरी ऑफ दि भोसला फॅमिली,** (१९२०) पृ. १०३ व अंधारे, भा. रा., **आधुनिक नागपूर नगरीचे शिल्पकार दुसरे रघुजी भोसले,** (१७८८ ते १८१६) नागपूर, २००२ या ग्रंथातील नोंदी आधारे.)

सोनेगाव उद्यानात दुसऱ्या रघुजीने १३.७० मी. दक्षिणोत्तर काळ्या दगडाचा छोटेखानी राजवाडा बांधला. तेथील पुष्करणीजवळ बंगला बांधला. १९.८० मी. दक्षिणोत्तर, २१ मी. पूर्व-पश्चिम काळ्या दगडाच्या ओट्यावर त्याने राजवाडा बांधला होता. आज या दोन्ही राजवाड्याचे फक्त ओटे अस्तित्वात आहे.

सक्करदरा येथील वास्तू : सक्करदरा परिसरात दुसऱ्या रघुजीने पुष्करणीच्या काठावर १८ मी. लांब, १८ मी. रुंद काळ्या दगडी ओट्यावर दोन मजली राजवाडा बांधला. दर्शनी

भागात कोरीव लाकडी खांबावर मेहरपयुक्त नक्षीदार कमानी असून समोर मोकळा वऱ्हांडा आहे. त्यावर कौलारू छत, नंतर मोठमोठ्या दालनावर गच्चीच्या दोन बाजूने कोपऱ्यावर दोन उंच टेहळणीसाठीच्या जागा होत्या. या टेहाळणी ठिकाणावरून सभोवतालच्या परिसरावर लक्ष ठेवता येत असे. पेंढारी आक्रमणाकरिता येत असताना येथून सहज पाहता येत असे. याशिवाय देवळाच्या मागे तीन छोटे राजवाडे होते. सक्करदराच्या सभोवताल दुसऱ्या रघुजीने तटबंदी बांधली. यास दोन मोठे प्रवेशद्वार काळ्या दगडांनी बांधले. या परिसरातील सर्वात मोठे प्रवेशद्वार गरुडेश्वराच्या देवळामागे १२ मी. अंतरावर, पूर्वेकडे सक्करदऱ्याच्या तळ्यासमोर उंच दगडांच्या तीन कमानीयुक्त आहे. याची बांधणी महालातील शुक्रवार दरवाजासारखी आहे. प्रवेशद्वाराच्या आत दोन्हीकडे ओटे असून दोन देवडी आहेत. या प्रवेशद्वारावर चढण्याकरिता दोन्ही बाजूंनी पायऱ्या आहेत. या प्रवेशद्वाराचे वैशिष्ट्य असे की, यावरून रामटेकचे देऊळ दिसते. इतकेच नव्हे तर कार्तिक महिन्यात त्रिपुरी पौर्णिमेला रात्री रामटेकच्या देवळातील त्रिपूर जळल्यावर ते पाहून नंतर लक्ष्मीनारायणाच्या देवळात त्रिपूर लावण्याची प्रथा होती.

दुसऱ्या रघुजीने निसर्गरम्य तेलंगखेडी उद्यानात तळ्यालाच (पुष्करणी) लागून बंगला बांधला. हा बंगला (रंगमहल) १७९० मध्ये पूर्ण झाला. या उद्यानात आणखी एक बंगला बांधला होता त्याचा ओटा अजूनही आहे. मुख्य बंगल्याच्या तळ्याकडील भागात पूर्वेकडे वऱ्हांड्याला तीन लाकडाच्या कोरीव कमानी, चार मोठ्या कोरीव स्तभांवर आहेत. एक चौरस दालन असून चारी बाजूंनी मधोमध चार दारे आणि प्रत्येक दाराच्या दोन्ही बाजूंस दोन-दोन खिडक्या आहेत. पूर्वेकडील वऱ्हांड्यातूनच पायऱ्यांनी तळ्यात उतरता येते. जणू हा बंगला तळ्यातच बांधला आहे असा भास होतो. याचे छत दगडी असून हा बंगला दुसऱ्या रघुजीचा रंगमहाल होता. जुन्या वाड्याचा काळा दरवाजा फक्त उभा आहे. त्यांचा हा राजवाडा दि. २५-१-१८६४ रोजी आगीच्या भक्ष्यस्थानी पडला. महलातील कार्पोरेशनचे कार्यालय, टाऊन हॉल, नर्सिंग सिनेमामध्ये बुधवार बाजारातून बाहेर पडणारा जो रस्ता (राजे लक्ष्मणरावच्या वाड्याकडे) आहे तो सर्व राजवाड्याचा परिसर होता. राजवाड्याला दगडी परकोट होता. एकच मोठे प्रवेशद्वार होते. दरबार हॉलपर्यंतची मोकळी जागा होती. या जागेस चांदणी चौक असे म्हणत. पाताळेश्वराच्या देवळाजवळ बिंझानी महिला महाविद्यालय आहे. तो चंदाजी भोसल्यांचा वाडा होय. धनवटेनगर विद्यालय (सिटी स्कूल) हे राणी बाकाबाईचा वाडा होता. तो मुळात पाचचौकी होता. आज दोन चौक उरले आहेत. केळीबाग हा महलचाच भाग होय. (अंधारे, भा. रा., **भोसलेकालीन नागपूर, २००१,** पृ. ५-६.)

भोसल्यांच्यावेळी नागपूर पश्चिमेस बुधवारी तलावापर्यंत होते. नागनदी ही नागपूरची दक्षिण सीमा, पूर्वेस नवाबपुरा व जुनी मंगळवारी आणि उत्तरेस हंसापुरी व लेंद्रा तळे, इतके नागपूर नगर पसरलेले होते. भोसले काळात चिमाबाई पेठ, बाकाबाईची पेठ, जरीपटका या वस्त्या निर्माण झाल्या, सीमेवर चारी दिशांना मारूतीचे देऊळ असे, राजा बक्षाचा मारूती (मेडिकल कॉलेज जवळचा) महत्त्वाचा आहे. इतवारी पेठ प्रसिध्द असून ती सावकार तिमाजी नाईक काळे यांनी स्थापन केली. भोसल्यांनी नागपूर नगरची रचना सातारा-पुण्याच्या धर्तीवर केली.

भोसलेकालीन मंदिरे : भोसल्यांची सत्ता ओरिसा प्रांतावर अर्धशतक असल्यामुळे नागपूर येथील मंदिर शिखरांवर ओरिसा शिल्पशैलीचा प्रभाव प्रकर्षाने दिसून येतो. भोसलेकाळ साधारणपणे शांततेचा असल्यामुळे अनेक सुंदर मंदिरांची निर्मिती झाली. दगडातून केलेली रचना "नागपूर शिल्प" या नावाने ओळखले जाते. दुसऱ्या रघुजीने निर्माण केलेल्या मंदिरांचे ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे होत. दगडी शिखरे असणे, वर कोपऱ्यात छोटी शिखरे, मुळाकडून वर निमुळती होत गेलेली शिखरे, सभामंडपाला सपाट छत व मंदिराची सिमाभिंत, शिखर रचनेवर ओरिसा शिल्पाचा प्रभाव, तर गरूड मंडपावर मध्यप्रदेश शिल्पशैलीचा प्रभाव, नागपुरातील शिव मंदिरातील गर्भगृहात महादेवाच्या पिंडी मागे नागदेवता, डाव्या बाजूला गणपती, तर उजव्या बाजूला अन्नपूर्णा यांचे शिल्प, मंदिराचा मोठा परिसर व त्या परिसरात फळा-फुलांचे उद्यान आणि पाण्याकरिता मोठ-मोठ्या विहिरी, तळी व निसर्ग सानिध्य असे सांगता येतात.

भोसले कालीन नागपुरात महादेवाची अनेक मंदिरे आहेत. दुसऱ्या रघुजीच्या वेळी १८१० मध्ये विनायकराव औरंगाबादकर याने नागपुरात ९८ देवळांचा उल्लेख केला आहे. इंग्रजी अंमलात नागपूर येथे रेसिडेन्ट मि. रिचर्ड जेंकिन्स (१८०८-१८२६) होता. त्याचे सहाय्यक मि. विल्किन्सन आणि विनायकराव औरंगाबादकर हे होते त्यांनी या महत्त्वपूर्ण नोंदी केल्या आहेत. त्यात ५४ महादेवाची, ४ लक्ष्मीनारायणाची, २ मुरलीधराची आणि हनुमानाची २४, विठ्ठलाची ६, श्रीभवानी १, नागोबा १, बालाजी १, श्रीखंडोबा आणि रघुजीची छत्री १ अशी ९८ होती.

सक्करदरा लक्ष्मीनारायण मंदिर : दुसऱ्या रघुजी भोसले याने हे मंदिर बांधले. सन १७८७ मध्ये सक्करदरा येथे मंदिरासाठी जागा निश्चित करण्यात आली. याचवेळी सप्टेंबर १७८७ मध्ये लक्ष्मीनारायण व गरुड यांच्या संगमरवरी मूर्ती पुण्याहून तयार करून नागपूरला आणण्यात आल्या. मंदिराचे बांधकाम तीन वर्षात पूर्ण झाले. हे मंदिर पूर्वाभिमुख असून आयताकार मंदिराची लांबी २३.७० मी. तर रुंदी ८.२० मी. आहे. मंदिराचा गाभारा चौरसाकृती असून गाभाऱ्यात पादपीठावर लक्ष्मीनारायण मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली आहे. येथेच कोनाड्यामध्ये गणेश व मारुतीची मूर्ती आहे. गाभाऱ्यात प्रकाश येण्यासाठी चारही बाजूंस झरोके ठेवलेले आहेत. गाभाऱ्याच्या दोन्ही बाजूस प्रत्येक एक-दोन कक्ष बांधलेले आहेत.त्यापैकी एकात पुजारी राहत असून दुसऱ्या कक्षाचे रुपांतर विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात झाले आहे. या तिन्ही कक्षांसाठी असलेल्या लाकडी दरवाजांना नक्षीदार जाळी आहे. गाभाऱ्याच्या पुढे असलेला मंडप हा दगडी स्तंभांच्या वर सुंदर महिरपी व त्यावर समतल छत असलेला आहे. मंडपास दोन्ही बाजूस दगडी जाळ्या बसविलेल्या आहेत. दुसऱ्या रघुजीने यापुढे एक स्वतंत्र सभामंडप ३२ लाकडी स्तंभांवर बांधला होता. याचे मूळ स्तंभ आज अस्तित्वात असून नव्याने सिमेंट कॉंक्रिटच्या बनवलेल्या स्तंभावर सभामंडप उभा आहे. मंदिरावर शिखर आणि उपशिखरे असून ओरिसाच्या अंगशिखराशी याचे साम्य आहे. मंदिराच्या बाह्य भागावर असलेले शिल्पांचे नियोजन खजूराहो येथील मंदिरातील शिल्पशैलीचे स्मरण करून देतात. नागपुरातील हे एक प्रसिध्द देऊळ आहे.

सक्करदरा येथील लक्ष्मीनारायणांच्या देवळातील सर्वात मोठा उत्सव हा वसंतपंचमीचा

उत्सव होय. दुसऱ्या रघुजीने जाणीवपूर्वक याची सुरूवात केली.

गरुडेश्वर मंदिर : लक्ष्मीनारायण मंदिराच्या सभामंडपापुढे छोटेसे गरुडेश्वराचे मंदिर आहे. मंदिराच्या दोन्ही बाजूंना नाजूक दगडी जाळी आहे. मंदिराच्या आत १ मी. उंचीची गरुडेश्वराची संगमरवराची मूर्ती आहे. मुकुटावर आणि दोन्ही दंडावर सर्पाच्या आकृत्या कोरलेल्या आहेत. तसेच गरुड सर्पावर आरुढ झालेला दाखविला आहे.

तेलंगखेडी येथील कल्याणेश्वर शिव मंदिर : हे महादेवाचे मंदिर दुसऱ्या रघुजीची आई आणि मुधोजीची पत्नी चिमाबाई हिने १७९४ मध्ये बांधले असून देऊळ काळ्या दगडांनी बांधले आहे. उत्तरेकडून व दक्षिणेकडून अशी दोन प्रवेशद्वारे हे या मंदिराचे वैशिष्ट्य आहे. गर्भगृहात प्रकाश येण्यासाठी चार झरोके आहेत व तीन बाजूंनी तीन कोनाडे आहेत. या देवळाच्या चारी बाजूंनी तटबंदी आहे. प्रवेशद्वार कमानीयुक्त आहे.

संगमेश्वर महादेवाचे देऊळ : बर्डीवर नागनदीचा आणि एक ओढ्याचा संगम झाला आहे. (बँक ऑफ महाराष्ट्राच्या मागच्या बाजूला.) दुसऱ्या रघुजीच्यावेळी नागनदीचे पाणी स्वच्छ आणि वाहते होते. या नदीच्या संगमावर १७८९ मध्ये दुसऱ्या रघुजीची आई चिमाबाई हिने महादेवाचे देऊळ बांधले. दुसरे रघुजी या महादेवास जात होता. इतकेच नव्हे तर या पर्वणीचे वेळी या संगमावर भोसले घराण्यातील व्यक्ती व इतर लोक स्नानाकरिता येत. या देवळाचे जोते १.५० मी. उंच असून भोवती ७.६० मी. x ७.६० मी. आकाराचा चबुतरा आहे. देवळाची उंची ९.१० मी. आहे.

इंदूबागेतील महादेव मंदिर : १७८८ च्या पूर्वी इंदुलीचे उद्यान तयार केल्यावर तेथे महादेवाचे मोठे मंदिर दुसऱ्या रघुजीचे पिता मुधोजीने बांधले. परंतु ३० मार्च १७८८ रोजी या देवळात महादेवाची स्थापना दुसऱ्या रघुजीने केली. या प्रसंगी माता चिमाबाई, बंधू खंडोजी, रघुजी हजर होते. या मंदिरातील गर्भगृहात पिंडीच्या मागे गणेश, अन्नपूर्णा आणि नागदेवतांच्या मूर्ती आहेत. तसेच पार्वतीचे शिल्प आहे. या देवळाचे सभागृह ५.१८ मी. x ५.१८ मी. असून गर्भगृह ३.१० मी. x ३.१० मी. आहे. या मंदिराच्या सभोवताल परकोट दुसऱ्या रघुजीने बांधला.

मोतीबागेतील महादेव मंदिर : मोतीबागेत शिवमंदिर दुसऱ्या रघुजीने बांधले. मंदिराचे बांधकाम १७९४ मध्ये पूर्ण झाले. २१ ऑगस्ट १७९४ रोजी या देवळात महादेवाची पिंड बसविली. यावेळी दुसरे रघुजी, व्यंकोजी, माता चिमाबाई आणि इतर मुत्सद्दी उपस्थित होते. बांधकाम काळ्या दगडाचे आहे. गाभाऱ्यामध्ये पिंड संगमरवराची असून पिंडीमागे गणेश, मध्यभागी नाग आणि उजवीकडे अन्नपूर्णा या मूर्ती बसविल्या आहेत. मंदिर साधे असून शिल्पकाम सामान्य प्रतिचे आहे.

गणेश पेठेतील शिवमंदिर : शुक्रवार तळ्याच्या दक्षिणेस दुसऱ्या रघुजीने छोटेसे पण लाल दगडाचे सुंदर शिवमंदिर १७९४ मध्ये बांधले. मंदिराच्या गर्भगृहावर अष्टकोनी घुमट आहे. गाभाऱ्यात महादेवाची पिंड संगमरवरी असून वैशिष्ट्यपूर्ण आहे. नंदीसुध्दा संगमरवरी (Marble) आहे. मंदिरावर नाजूक शिल्प आहे. हे मंदिर गणेश पेठेतील पोलीस लाईन क्वार्टरच्या आवारात आहे.

केळीबाग मंदिर परिसर : दुसऱ्या रघुजीच्या राजवाड्याला लागूनच केळीबाग मंदिर परिसर आहे. शहरातील सीटीकोतवालीला लागून ही मंदिरे आहेत. दुसऱ्या रघुजीच्या राजवाड्याच्या परिसरातच ही मंदिरे होती. याठिकाणी डावीकडे लक्ष्मीनारायणाचे देऊळ, तर उजवीकडे शिवमंदिर आहे. दोन्ही देवळांची शिखरे ओरिसा पध्दतीची असून त्यावरील शिल्प अत्यंत नाजूक आणि रेखीव आहे. शिखर १२.१५ मी. उंच आहे. मंदिरातील मूर्ती संगमरवरी आहेत. सभामंडप नक्षीदार कमानीयुक्त असून लाकडाचा आहे. लक्ष्मीनारायण मंदीरासमोर गरुडेश्वराचे छोटे देऊळ आहे. दोन्हीही देवळांकरिता लाल दगड वापरला आहे. डावीकडे गणेशमंदिर आहे. गणपती संगमरवरी असून उजव्या सोंडेचा आहे, आजूबाजूला रिध्दी-सिध्दीच्या मूर्ती आहेत. बाहेर गणपतीचे वाहन उंदीर मोठ्या आकाराचा असून काळ्या दगडाचा आहे. गणपतीची मूर्ती अतिशय रेखीव आहे. उजवीकडे हनुमानाचे देऊळ आहे. हनुमानाची मूर्ती काळ्या दगडाची असून प्रमाणबध्द आहे. ही देवळे रघुजीने बांधली असावीत.

तुळशीबागेतील वेणुगोपाळ : नाग नदीच्याकाठी तुळशीबागेत दुसऱ्या रघुजीने वेणुगोपाळाचे सुंदर, रेखीव आणि भव्य मंदिर १७९२ च्या सुमारास बांधले. मंदिरातील शिल्पकाम अतिशय सुंदर आहे. तेथील गरुड व मारुती मूर्ती संगमरवरी दगडाच्या आहेत. दुसऱ्या रघुजीने बेलबागेत हनुमंताचे व शंकराचे देऊळ बांधले.

विट्ठल-रुखुमाई मंदिर : महालात टिळक पुतळ्याकडून शुक्रवार दरवाजाकडे (गांधीद्वार) जाणाऱ्या मार्गावर डाव्या बाजूला राममंदिराच्या मागच्या बाजूला विट्ठल-रुखुमाईचे मंदिर आहे. या देवळाचा ३.८० चौ. मी. आकाराचा गाभारा आहे. गाभाऱ्यामध्ये प्रकाश येण्याकरिता दोन झरोके आहेत. सिंहासनाचा ओटा आहे. विट्ठल-रुखुमाईच्या संगमरवरी मूर्ती असून ०.६० मी. उंचीच्या आहेत. पुढे अंतराळ असून या अंतराळात दाराच्या दोन्ही बाजूला दोन नक्षीदार देवकोष्ठे आणि दोन साधे कोनाडे आहेत. चाळीस लाकडी कोरीव स्तंभावर कमानींनी जोडलेला ३.३५ मी. रुंद आणि ७.३० मी. लांब सभामंडप आहे. या देवळाचे छत समतल असून जोत्याचें बांधकाम काळ्या दगडाचे आहे. शिखर विटांचे आहे.

हे देऊळ तिसऱ्या रघुजीच्यावेळी हवेली खात्याचा मुख्य जगदेवराव यांनी बांधले असे मानले जाते. देऊळ दुसऱ्या रघुजीच्या राजवाड्याजवळच असल्यामुळे रघुजी विट्ठलाचे, तळ्याच्या पाळीवरील सिध्दी विनायकाचे दर्शन घेऊन जागृतेश्वराच्या दर्शनाला (इतवारीस) जात असे.

नागेश्वर मंदिर : महालात अभ्यंकर पुतळ्याच्यामागे नागेश्वर, हनुमान खिडकी अथवा मारुतीचे देऊळ आणि प्रसिध्द नागेश्वराचे देऊळ आहे. हे मारुतीचे देऊळ रघुजीच्या काळापासून आहे. जुन्या वाड्याच्या उत्तरेस भिंतीला एक दरवाजा पाडण्यात आला. हा दरवाजा लहान असल्यामुळे त्याला खिडकी म्हणू लागले. नागेश्वराचे देऊळ दुसऱ्या रघुजीची आई चिमाबाई हिने १७९१ मध्ये बांधले. तथापि, औरंगाबादकर यांनी हे देऊळ चिमणाबापूंनी १७७९ साली बांधले असे नोंदवले आहे. हे देऊळ काळ्या दगडांनी बांधले असून भक्कम आहे. देवळाच्या गाभाऱ्यात झरोके नाहीत. गाभाऱ्यातील अष्टकोनावर देवळाचा घुमट आहे, शिखरावर चार बाजूंनी चार सिंहाचे शिल्प आहे. प्रवेशद्वारासमोर तीन महिरपीयुक्त कमानी

आहेत. या देवळाचा नंदी भव्य काळ्या पाषाणाचा अलंकृत आहे.

पाताळेश्वर देऊळ : राजवाड्याच्या बांधकामामध्ये (नवीन वाड्यापुढे) पाया खोदताना महादेव निघाला, याचवेळी दुसऱ्या रघुजीने (नोव्हेंबर १७८८) या महादेवाचे देऊळ बांधले. महादेवाची पिंड खोलगट भागात असल्यामुळे या देवळाला पाताळेश्वराचे देऊळ म्हणू लागले. हे देऊळ राजवाड्याच्या मोठ्या प्रवेशद्वाराला लागून आहे.

तळ्याच्या पाळीवरील गणपती : तळ्याच्या पाळीवरील गणपती भोसलेकालीन असून मुधोजी भोसले यानी फेब्रुवारी १७८८ मध्ये गणपतीची नवीन मूर्ती तयार करून तिची प्रतिष्ठापना केली.

रुक्मीणी मंदिर परिसर : या परिसरात शुक्रवारी तलावाच्या रुक्मीणी मंदिर परिसर तिसऱ्या रघुजीनी १८१८ ते १८५३ या कालावधीत निर्माण केला. या परिसरात रघुराजेश्वर हे शिवमंदिर आणि लक्ष्मीनारायण मंदिर अशी दोन मंदिरे उभारली. या मंदिरावर असलेले दाक्षिणात्य पध्दतीचे शिखर आणि अत्यंत उत्कृष्ट असे शिल्पकाम यासाठी ही मंदिरे पाहावीत अशी आहेत. येथे करण्यात आलेला संगमरवरी दगडाचा विपूल वापर विशेष उल्लेखनीय आहे.

बालाजीचे देऊळ : हे मंदिर इतवारीतील लाडपुरा येथे असून सडकेपासून बऱ्याच उंचावर आहे. दहा दगडांच्या पायऱ्या चढल्यानंतर मंदिराचा परिसर व प्रवेशद्वार लागते. हे मंदिर भोसलेकालीन असून जानोजी भोसल्यांच्या कारकिर्दीत १७६१ ते १७६२ च्या दरम्यान मराठा साम्राज्यातील साडेतीन शहाण्यांपैकी एक असा लौकिक असलेल्या दिवाकरपंत (देवाजीपंत) चोरघडे यानी बांधले. चोरघडे कुलाचे उपास्य दैवत बालाजी असून त्यांनी चिमूरलाही बालाजीचे देऊळ बांधले. विनायकराव औरंगाबादकरांनी ९८ देवळांची यादी दिली आहे. तीत एका बालाजी देवळाचा उल्लेख आहे. तेच हे देऊळ होय.

जागृतेश्वराचे मंदिर : हे देऊळ भोसलेपूर्व काळातील आहे. बुधवार पेठेत तीन नळ चौकातून सरळ गेल्यानंतर हे मंदिर लागते. गोंडाच्या कालखंडात जागृतेश्वर ही ग्रामदेवता समजली जाई. औरंगाबादकर हे देऊळ १७६१ साली नारोजी नेगी यांनी बांधले असे म्हणतात. देवळासमोरील सभामंडप मात्र भोसल्यांनी बांधला. भोसले कालखंडात या देवळाला अनन्यसाधारण महत्त्व होते. भोसले राजे नियमित या महादेवाच्या दर्शनास येत असत. १७६९ मध्ये पाऊस न पडल्यामुळे या मंदिरात शे-दोनशे ब्राह्मण अनुष्ठानास बसविले अशी नोंद उपलब्ध आहे. (सरदेसाई, गो. स. (संपा.), **नागपूरकर भोसल्यांची कामगिरी,** वर्ष १९३०, पुणे, पृ. २०९.)

मोतीबागेतील महादेव : भोसले कालखंडात अनेक उद्याने निर्माण झाली. त्यामध्ये मोतीबाग ही एक मोठी बाग होती. आज त्या बागेत रेल्वे कॉलनी कार्यालय आणि वस्ती आहे. ही बाग देवाजीपंत चोरघडे यांनी बनविली होती. मोतीबागेतील शिवमंदिर दुसऱ्या रघुजीने बांधले.

जलाशय आणि उद्याने : दुसऱ्या रघुजीने अनेक विहिरी, तळी आणि उद्याने निर्माण करून नागपूरच्या सौंदर्यीकरणात मोलाची भर घातली. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात

नागपूर हे तळी आणि उद्यानाचे शहर म्हणून ओळखले जात असे. इंग्रज वकिलांनीसुध्दा नागपूरच्या उद्यानांची आणि कारंज्यांची प्रशंसा केली आहे. कोलब्रुकने उद्यानांची आणि कारंज्यांची प्रशंसा केली आहे. हेन्री थॉमस कोलब्रुक १८ मार्च १७८८ रोजी नागपूरला आला. त्याची निसर्गरम्य तेलंगखेडीच्या उद्यानातील बंगल्यात राहण्याची व्यवस्था केली. तो तेलंगखेडीच्या उद्यानाचे वर्णन करतो, "कुंपणाजवळची झाडे नीट कापून उद्यानातील रस्ते नीट आखलेले आहेत." त्याने दुसऱ्या उद्यानाचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे. "राजवाड्यातील उद्यान हे छोटे असले तरी त्यात अनेक सुंदर इमारती असून उत्तम सजावट केल्यामुळे शोभा वाढली आहे. मनावर होणारा परिणाम विशेषकरून संध्याकाळच्या वेळी आल्हाददायक असतो. त्यावेळी कारंजीचे फवारे थुई थुई करीत असतात आणि सर्व परिसर प्रकाशमय असतो."

तत्कालीन पत्र व्यवहारात पुढील उद्यानांचा वारंवार उल्लेख येतो. १) तेलंगखेडी, २) सक्करदरा, ३) जुन्या राजवाड्यातील नजरबाग, ४) तुळशीबाग, ५) बेलबाग, ६) महिपत बाग [महिपत दिनकर हा मुधोजीचा मुख्य दिवाण] ७) गणेशबाग, ८) चंदनबाईचा, मोठा बगीचा वकीलपेठ जवळ, ९) सोनेगाव बगीचा, १०) पारडी रोड वरील नाना शास्त्रीचा बाग, ११) नाबूत अलीचा बाग, १२) नवाब साहेबांचे बगीचे, १३) स्टेशनजवळ रामजी तात्याचा बगीचा, १४) खुशालपुरीचा बगीचा, १५) पिदडीचा बगीचा, १६) मोतीबाग, १७) इंदुलीबाग, १८) लष्करीबाग, १९) रामबाग, २०) केळीबाग. याशिवाय उमाजी महादेव, मन्नपा घाडगे आणि गुजाबा गुजरचे बगीचे होते.

यातील बहुतेक उद्याने दुसऱ्या रघुजीच्या काळात निर्माण झाली. उद्याने निर्माण करण्याकरिता दुसऱ्या रघुजीने प्रोत्साहन दिले. सुंदर नागपूरची सुरुवात दुसऱ्या रघुजीपासून झाली. सुंदर उद्याने निर्मितीकरिता तज्ज्ञ त्याने ओरिसा, कटकहून नागपूरला आणले आणि एकापेक्षा एक सुंदर उद्याने पुष्करणी, विहिरी आणि तळी निर्माण केली.

ही उद्याने नगराचे शोभावर्धन, धार्मिक उत्सव, विश्रांतीकरिता, शिकारीकरिता, बैठे खेळ मनोरंजन विशेषेकरून राजकुटुंबातील व्यक्तींच्या सहलीकरिता व कौटुंबिक समारंभाकरिता आणि दुसऱ्या राज्यातून आलेल्या परकीय वकिलांच्या स्वागत समारंभाकरिता निर्माण केली.

तुळशीबाग : नागनदीच्या काठी नगराबाहेर परंतु राजवाड्याजवळ तुळशीबागेची निर्मिती दुसऱ्या रघुजीने केली. बागेकरिता ऑगस्ट १७९१ मध्ये जागा निश्चित केली आणि बागेभोवती सीमा भिंती घालावयाचे काम सुरू केले. दीड एकर परिसरात हे उद्यान निर्माण केले. याकरिता कटकहून तज्ज्ञ आणून त्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि त्या उद्यानातील इमारती वास्तुशास्त्रज्ञ करीमखान यांच्या देखरेखीखाली तुळशीबाग उद्यान निर्माण केले. हे उद्यान मोगल शैलीचे होते. या उद्यानाची निर्मिती वैशिष्ट्यपूर्ण होती. चारबाग पध्दतीचे हे उद्यान होते. पूर्ण उद्यानाचे चार भागात विभाजन केले होते. या उद्यानाच्या चारी बाजूंनी १.८० मी. उंच सीमा भिंत होती. त्यापैकी खालची एक मी. दगडाची आणि वरची विटेची होती. या बागेत चार संगमरवर दगडाचे हौद होते आणि त्यात सुंदर कारंजी होती.

या बागेत तुळशीचे अनेक वाफे असल्यामुळेच याला तुळशीबाग म्हणू लागले. तुळशीबरोबर हिरवळही लावण्यात आली. "बेदाणे, हराळी आणि तुळशीच्या कापऱ्या (रोपे) लावण्यास सांगितले", (शेजवलकर, त्र्यं. शं. (संपा.), **नागपूर अफेअर्स,** पुणे १९५४, भाग १ नं. २९८, पृ. ३७५.) अशी नोंद आहे. तुळशीबाग फेब्रुवारी १७९२ मध्ये पूर्ण झाली. चार बंगले बांधून तयार झाले. मूदपाक घर केले. जनानखान्यासाठी घर आणि खोल्या बांधल्या. तुळशीबाग सुंदर झाली. शहराजवळ असल्यामुळे दुसरे रघुजी बहुतेक तेथेच जातात. या उद्यानाकरिता २ लाख रु. खर्च आला. (शेजवलकर, त्र्यं. शं. (संपा.), **नागपूर अफेअर्स,** पुणे १९५४, भाग १ नं. ३०२, पृ. ३९३.) या बागेत देवळाजवळच मोठी विहीर असून मोटेद्वारा या उद्यानाला पाणी पुरवठा होत असे. पूर्वेकडे संत्र्याची लागवड केली होती. या संत्र्याच्या बगिच्याला तेथे असलेल्या तीन विहिरींद्वारा पाणी देण्यात येत असे. दिवाळीत तुळशीबागेत सुंदर रोषणाई करण्यात येत असे. ही रोषणाई व आतषबाजी करण्याकरिता निपुण कारागीर कटकहून आणण्यात येत. ही रोषणाई पाहण्याकरिता तुळशीबाग सर्वसामान्य जनतेकरिता खुली ठेवण्यात येई.

सोनेगाव बाग : दुसऱ्या रघुजीची कारकीर्द नागपूरच्या भौतिक प्रगतीच्यादृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. सोनेगाव नागपूरच्या नैऋत्येस साधारणपणे पाच किलोमीटर असून नागपूर-वर्धा मार्गावर आहे. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात दुसऱ्या रघुजीने येथे ६० एकराच्या परिसरात बागेची निर्मिती केली. या उद्यानात सर्व तऱ्हेची फुलझाडे इतकेच नव्हे तर उद्यानाच्या काठावर बांबूची झाडेही लावण्यात आली. तसेच सभोवतीचे राखीव वन दुसऱ्या रघुजीच्या शिकारीकरिता ठेवण्यात आले होते.

तळे : दुसऱ्या रघुजीने उद्यानाला पाणी देण्याकरिता सोनेगावचे तळे खोदले. हे तळे दोन बाजूंनी दगडाने बांधले. या तळ्याच्या कठड्यास १० बुरूज निर्माण केले. एकीकडे पाच बुरूज तर दुसरीकडे पाच बुरूज यांच्या मध्यभागी तळ्यात उतरण्याकरिता १७ पायऱ्या दगडाच्या बांधण्यात आल्या. तळ्यातील सर्व बुरूज काळ्या दगडांनी बांधलेले आहेत. दुसऱ्या रघुजीने पूर्वेकडील पाळीजवळ खाली पाणी साठविण्याची सोय केली. त्यातूनच जवळच्या बगिच्यात पाणी पुरवठा केला जात असे. मुरलीधराच्या देवळाजवळ नैऋत्येस १०.६० मी. लांब-रुंद अशी चौरस विहीर बांधली. या ठिकाणाहून पूर्वेकडून तीन मोटा व दक्षिणेकडून दोन मोटांद्वारे बगिच्याच्या संपूर्ण परिसराला पाणी देण्यात येत असे. बागेतील विहिरीला आत एक दरवाजा असून तेथे राजाचा हत्ती पाणी पिण्यास येत असे. या बागेत एकूण सात विहिरी असून मोठ्या विहिरीच्या खेरीज आणखी एक विहीर आहे. तिला खजिन्याची विहीर म्हणतात.

दगडी दरवाजा : खामल्याच्या नाल्यावरून पूल ओलांडून सहकारनगरकडे जाताना डावीकडे विमानतळाचे फार मोठे कम्पाऊंड आहे. तेथे लोखंडाचे फाटक आहे. याच ठिकाणी सोनेगाव बागेला ६ मी. उंचीचा महिरप असलेला दगडी दरवाजा होता. त्याला लाकडी चौकट होती. त्या चौकटीवर खोदलेली गणपतीची मूर्ती होती.

या बागेत पाळीव प्राणी काळवीट, हत्ती, घोडे असत. भोसले राजघराण्यातील व्यक्ती सहलीकरिता, मनोरंजनाकरिता, कलावंतीणीचे नृत्य किंवा तमाशा बघण्याकरिता नेहमी जात असत.

अनुक्रमणिका

फुटाळा तळे : दुसऱ्या रघुजी भोसलेने सर्वप्रथम फुटाळा तळे खणून पायथ्याशी मातीचा बंधारा घातला. या तळ्याचे बांधकाम काळ्या दगडांनी केले आहे. एकूण १२ वर्तुळाकार बुरूज आणि दक्षिण उत्तर भिंत काळ्या दगडांनी बांधलेली आहे. आज फक्त सहा बुरूज शिल्लक आहेत. उत्तर दक्षिण एक मीटर उंचीची पाळ आहे. या भिंतीच्या मध्यभागी उघडझ ाप करणारे द्वार (निर्गम मार्ग) आहे आणि त्याला लागून पाण्याच्या प्रवाहाला नियंत्रित ठेवण्याकरिता मोठे टाके बांधण्यात आले आहे. तेथूनच दगडी पाईपने पाणी तेलंगखेडीतील पुष्करणीला, उद्यानाला व महाराजबागेला पुरविले जाते. तेलंगखेडीच्या पाण्याने जवळजवळ ८५ एकर जमिनीचे सिंचन होते. या तळ्याच्या बाजूंना नैसर्गिक संरक्षण लाभले आहे. दोन बाजूंनी उंच टेकड्या आहेत. उत्तरेकडे तळ्यात कमळाचे ताटवे आहेत, त्याला लागून देखणे सातपुडा वनस्पती उद्यान तयार होते आहे. दुसरा रघुजी आणि त्याचे बंधू पावसाळ्यात फुटाळा तळ्याचे पाणी पाहण्यास नेहमी येत असत. नौकाविहार करीत आणि तेथूनच तेलंगखेडी उद्यानात विश्रांतीकरिता जात.

तेलंगखेडी उद्यान (मन्याबापू उद्यान) **:** तेलंगखेडी उद्यान निसर्गरम्य फुटाळा तळ्याच्या पायथ्याशी नागपूरच्या पश्चिमेस असून भोसलेकालीन उद्यानात सर्वोत्तम आणि रमणीय उद्यान आजही आपल्या पूर्व-वैभवाची साक्ष देत दिमाखाने उभे आहे. या उद्यानात आल्यानंतर जणू काही आपण मोगलांच्या उद्यानात आहोत असा क्षणभर भास होतो. पश्चिमेकडे मातीचा बंधारा, नंतर दोन उंच टेकड्यांच्या कुशीत सुंदर निळे जलाशय, जलाशयात लाल कमळांच्या फुलांचे ताटवे, हिरवीगार पार्श्वभूमी आणि सायंकाळी मावळता सूर्य पाण्यात सर्वत्र केशरी रंग उधळत आहे, असा रम्य आणि अवर्णनीय परिसर तेलंगखेडी उद्यानाला लाभला आहे, इतर उद्याने व त्यातील इमारती काळाच्या प्रवाहात नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. दुसऱ्या रघुजीने फुटाळा तळ्याच्या पायथ्याशी १० एकराच्या परिसरात उद्यान तयार केले. या उद्यानाची सुरुवात १७८३ मध्ये झाली आणि ७ जून १७९० रोजी या बागेचे काम पूर्ण झाले. हे उद्यान निर्मितीकरिता ओरिसातील कटकहून तज्ज्ञ आणले होते. हे उद्यान योजनाबध्द व प्रमाणशीर आहे. हेन्री थॉमस कोलब्रुक नागपुरात आला त्यावेळी त्याची राहण्याची व्यवस्था तेलंगखेडी उद्यानात केली होती. तो तेलंगखेडीच्या उद्यानाचे वर्णन करतो, "कुंपणाजवळची झाडे नीट कापून उद्यानातील रस्ते नीट आखले आहेत. या उद्यानात सुंदर पुष्करिणी रंगमहल, कारंजी, फुलांचे ताटवे, पाण्याचे कालवे आणि दोन्ही बाजूला रस्ते रेखीव आहेत."

हे उद्यान निर्माण करण्यात सर्वात जास्त परिश्रम दुसऱ्या रघुजी भोसलेचे धाकटे बंधू व्यंकोजी उर्फ मन्याबापूने घेतल्यामुळे तेलंगखेडी उद्यान 'मन्याबापु उद्यान' नावाने ओळखले जात होते. या उद्यानाच्या चारी बाजूला १.८० मी. उंचीची आणि ०.६० मी. रुंदीची काळ्या दगडाची तटबंदी दुसऱ्या रघुजीने बांधली. या परकोटाच्या बाहेर मका आणि ज्वारीची शेती होती. उद्यानाची पूर्व-पश्चिम लांबी अंदाजे ४२ मी. आणि उत्तर-दक्षिण रुंदी १०६ मी. आहे. या उद्यानाचे मुख्य प्रवेशद्वार पूर्व बाजूस आहे. प्रवेशद्वाराचे दरवाजे लाकडी असून त्याला लोखंडाचे अणुकुचीदार खिळे लावलेले आहेत. या द्वाराला दोन्ही बाजूला दोन लहान ओटे काळ्या दगडांनी बांधलेले आहेत. या द्वारातून आत शिरल्यानंतर दारालगत दोन ओटे

आहेत. मधोमध पाण्याचा कालवा असून कालव्याच्या दोन्ही बाजूला दोन रस्ते आहेत. या ओट्याच्या उत्तरदक्षिणेकडेही पाण्याचे कालवे वाहतात. रस्ते कालव्याच्या बाजूने जातात व दुसरे रस्ते तटबंदीला लागून जातात. या ओट्यांच्या मधोमध पुन्हा कालवा आहे. नंतर आणखी एक मोठा काळ्या दगडाचा ओटा असून या ओट्यावर सुंदर इमारत होती. या ओट्यावर पश्चिमेकडे पुष्करणी आहे.

पुष्करणी : ही पुष्करणी समचतुष्कोनाकृती आहे. चारी बाजूंनी काळ्या दगडांनी बांधलेली आहे. दोन्ही बाजूंनी चौकोनी चार-चार ओटे असून, उतरण्याकरिता पायऱ्या आहेत आणि पश्चिमेकडून ओट्याच्या बाजूने उतरण्याकरिता १८ पायऱ्या आहेत. तळ्यालाच लागून दुसऱ्या रघुजीने रंगमहाल बांधला होता. या महालात नृत्य होत असे. या पुष्करणीत फुटाळ्याचे पाणी येते. संपूर्ण उद्यानाला कालव्याद्वारे पाणी पुरवठा होतो. मधल्या कालव्याच्या दुतर्फा ताडाच्या उंच उंच झाडांची रांग आपले मन वेधून घेते.

तेलंगखेडी उद्यान शहरातील मुख्य राजवाड्यापासून २०.९२ कि. मी. अंतरावरील फुटाळा तळ्याच्या पायथ्याशी असल्यामुळे १७८३ ते १८१६ पर्यंत दुसरा रघुजी आणि त्यांच्या कुटुंबियांचे विश्रांतीचे, सहलीचे, धार्मिक उत्सवाचे, पाहुण्यांना उतरविण्याचे व कौटुंबिक कार्यक्रमाचे स्थळ होते. या तेलंगखेडी उद्यानात फेब्रुवारी १७८९ मध्ये वसंतपंचमीचा उत्सव थाटाने साजरा करण्यात आला. या उत्सवात दुसरा रघुजी, मन्याबापू , इंग्रज वकील जॉर्ज फॉस्टर आणि मुत्सद्दी मंडळी उपस्थित होती. तेलंगखेडी उद्यानाचा निर्माता आणि ज्याच्या नावाने हे उद्यान ओळखले जाते, असा व्यंकोजी उर्फ मन्याबापू याचा गडंगनेर तेलंगखेडी उद्यानात फेब्रुवारी १७९१ रोजी झाले. या उद्यानात उजवीकडे फार मोठी विहीर बांधण्यात आली.

सक्करदरा : सक्करदरा येथील उद्यान, देऊळ, राजवाडा, १२ कोन असलेली विहीर-सुंदर पुष्करणी जवळच तळे आणि नंतर तोफांचा कारखाना असे बहुरंगी स्थान दुसऱ्या रघुजीच्या वैभवाचे मानदंड होते.

रघुजीतळे : लक्ष्मीनारायण देवळासमोरील मोठ्या प्रवेशद्वारानंतर पूर्वेकडे सडकेच्या पलीकडे मोठे तळे आहे. हे तळे दुसऱ्या रघुजीच्या काळात खोदण्यात आले. पूर्वेकडे मजबूत काळ्या दगडाचा घाट बांधलेला आहे. तीन बाजूंनी मातीचा बांध होता. या तळ्याला रघुजीतळे किंवा सक्करदऱ्याचे तळे म्हणतात. या तळ्याच्या पाळीवर बसून दुसरे रघुजी रात्रीच्या समयी आतषबाजी करीत असे.

वैशिष्ट्यपूर्ण विहीर : बारा बाजू असलेली सँडस्टोनने बांधलेली विहीर दुसऱ्या रघुजीने १७८७ मध्ये निर्माण केली. ही विहीर दक्षिणेकडे लक्ष्मीनारायण देवळाच्या डाव्या बाजूला आहे. या विहिरीचा परीघ ६.२० मी. आहे. या विहिरीचे प्रवेशद्वार दक्षिणेकडे आहे. विहिरीचे पाणी गोड असून येथून खापरी पाइपातून या परिसरातील राजवाड्याना पाण्याचा पुरवठा केला जात असे. या विहिरीतील पाणी उद्यानाला, पुष्करणी आणि कारंज्याला पुरविले जात असे. या विहिरीच्या पूर्व आणि दक्षिण बाजू मोठ्या दगडांनी झाकलेल्या आहेत. या विहिरीच्या तीनही बाजूला भिन्न आकाराची टाकी बांधलेली होती. या टाक्यांद्वारे संपूर्ण सक्करदरा

परिसराला पाण्याचा पुरवठा होत असे. एकाच वेळी १२ बैलाच्या मदतीने सहा मोटांनी विहिरीतून पाणी काढून टाक्यांद्वारा सर्वत्र खेळविले जात असे. विहिरीत दक्षिणेकडे तीन अर्धवर्तुळाकार कमानी युक्त मंडप उभारले होते. या परिसरात आणखी एक मोठी विहीर रघुजीने बांधली.

सक्करदरा प्राणी संग्रहालय : दुसरा रघुजी प्राणिमित्र होता. त्याला सर्व प्रकारचे प्राणी पाळण्याची आवड होती. लेकी २० ऑगस्ट १७९० रोजी आपल्या पत्रात लिहितो, "दुसऱ्या रघुजीला हत्ती, घोड्यांची बरीच आवड आहे. त्याच्याजवळ सुमारे दोनशे हत्ती आहेत व मी पाहिलेल्या सर्व हत्तीमध्ये ते उत्तम वाटले." (विल्स, सी. यु. ॲण्ड स्लोकॉक **अ स्केच ऑफ दि हिस्टरी ऑफ दि भोसला फॅमिली,** १९२०, पृ.१०१.) रघुजीने प्राणी संग्रहालय सक्करदऱ्याच्या परिसरात निर्माण केले होते. यात वाघ, चित्ते, हरणे, कुत्रे हे प्राणी त्याच्या संग्रहालयात होते. विजयादशमी आणि इतर सणांच्या दिवशी हत्तीचे मस्तक रंगवीत. त्याच्या पाठीवर भरजरी किंवा किनखापी झुली रुळत. गळ्यात घंट्या, चांदीच्या अंबाऱ्या किंवा हौदे, गंडस्थळावर लटकणारी सोन्याची किंवा चांदीची पिंपळ पाने असत.

पूर्वेकडे तळे व त्याचा सुंदर घाट, त्याच्या काठावर मोठे प्रवेशद्वार, चारी बाजूंनी तटबंदी, जवळच काळ्या पाषाणाचे भव्य व रेखीव लक्ष्मी नारायणाचे देऊळ, सभोवताली फळ फुलांचे उद्यान, सुंदर स्थळ असे "सक्करदरा" दुसऱ्या रघुजीने निर्माण केले.

दुसऱ्या रघुजीच्या काळात नागपूरचे वैभव सर्वच क्षेत्रात वृध्दिंगत झाले. रघुजीने नागपुरात नक्षीदार राजवाडे, इतर इमारती, कारंजी व पुष्करणी निर्माण केल्या. एकापेक्षा एक सरस, सुंदर व शैलीदार मंदिरे बांधली. प्राणिमित्र असल्यामुळे त्याने नागपुरातील पहिले प्राणिसंग्रहालय निर्माण केले. निसर्गप्रेमी असल्यामुळे महालातील राजवाड्यापासून दूर निसर्गाच्या सान्निध्यात तेलंगखेडी, सोनेगाव व सक्करदरासारखी देखणी उद्याने तयार केली. उद्यानात पुष्करणी, विहिरी बांधल्या. फळाफुलांची झाडे लावून नागपूरच्या सौंदर्यात भर घातली. दुसऱ्या प्रांतातून संत्र्याची रोपे आणून नागपूर येथे आणि सभोवताच्या प्रदेशात संत्र्याची लागवड केली. त्यामुळे नागपूरची ख्याती "संत्रानगरी" म्हणून भारतात झाली. भोसले कालखंडातील दुसऱ्या रघुजीच्या २८ वर्षाच्या कारकिर्दीला सुवर्णयुग म्हणता येईल. नागपूरच्या सौंदर्यीकरणांमुळे दुसऱ्या रघुजीला आधुनिक नागपूरचा शिल्पकार म्हणणे योग्य होईल. (अंधारे, भा. रा., **दुसरा आधुनिक नगरीचा शिल्पकार दुसरे रघुजी भोसले (१७८८-१८१६),** नागपूर, २००२ या ग्रंथाच्या नोंदी आणि या कार्यालयाने २००२ मध्ये केलेल्या प्रत्यक्ष सर्वेक्षणाआधारे.)

भोसले राजघराण्यांची समाधी मंदिरे

समाधीवर छत्र असल्यामुळे त्यांना छत्री असेही म्हणतात. नाग नदीच्या डाव्या तीरावर नवी शुक्रवारी विभागातील एका विस्तृत आवारात भोसले घराण्यातील व्यक्तींसाठी एक स्मशानभूमी राखून ठेवलेली आहे. भोसले काळात हा परिसर सक्करदरा परिसर या नावाने ओळखला जात असे. त्याच काळात लालगंजात व टिकेकर घाटाजवळ छोट्या छोट्या छत्र्या उभारलेल्या दिसतात. रचना आणि बांधकामाची पध्दती भोसले काळातील असून त्यातील वास्तू-शिल्प समान आहे. नव्या शुक्रवारीतील अन्त्यसंस्कार या नावाच्या ओट्याजवळील या स्मारकांना मंदिरे म्हणत असले तरी त्या राजपुतांच्या स्मारकांप्रमाणे

कलासंपन्न छत्र्याच आहेत. चिमाबाईची समाधी मात्र रामटेकला आहे.

आद्य रघुजीच्या काळात शुक्रवारीतील या परिसराला थडगा बाग असे नाव होते. पश्चिम महाराष्ट्रातील समकालीन ही स्मारके बांधकामाच्या दृष्टिने वेगळी आहेत. बाजीराव पेशव्यांप्रमाणेच तत्कालीन नागपूरचा राजा आद्य रघुजी हाही छत्रपती शाहूचा लाडका होता. त्याची स्वामिनिष्ठा, राजव्यवहार कौशल्य आणि युध्दातील आक्रमकता या गुणांमुळे शाहूच्या विश्वासाला तो पात्र झाला.

आद्य (पहिला) रघुजीची समाधी : स्मशानभूमीच्या प्रवेशद्वारातून शिरल्यानंतर उजव्या हाताकडे कोपऱ्यात आद्य रघुजीची सर्वात मोठी आणि उंच समाधी आहे. दि. १४-२-१७५५ रोजी शुक्रवारी आद्य रघुजीचे निधन झाले. त्याच्या १३ राण्यांपैकी सहा राण्या सती गेल्या आणि त्याठिकाणी समाधी उभारण्यात आली. ही समाधी किंवा छत्री ११.५० मी. लांब आणि ११.५० मी. रुंद आहे. प्रत्येक बाजूला पाच त्रिकोनी कमानी अशा एकूण २० कमानी आहेत. ही समाधी पूर्वाभिमुखी असून प्रथम टप्पा चढण्याकरिता पाच पायऱ्या आहेत. २.४० मी. बांधकाम प्रत्येक बाजूस आहे. एकंदर २८ खांब भिंतीत बसविलेले आहेत. मध्यावर मुख्य समाधी आहे. भिंतीच्या तीन बाजूस पूर्वी जाळ्या बसविल्या होत्या. सभोवती प्रदक्षिणामार्ग १.८० मी. रुंदीचा आहे. थडग्याच्या मध्यभागी १.१५ सें. मी. उंचीचा अष्टकोनी ओटा आहे. बाहेरच्या बाजूने १६ कोनाडे असून फक्त तीन कोनाड्यात मूर्ती आहेत. लाल रंगाच्या वालुकाप्रस्तराच्या जोत्यावर उत्कृष्ट शिल्प आहे. जोत्यावर उत्कृष्ट कोरीव काम आहे. सभोवर छोट्या छोट्या मनुष्याकृती काढलेल्या आहेत. मुख्य जोतेही जमिनीपासून ओट्याइतकेच उंचीचे आहे. गुळगुळीत काळा बेसॉल्ट व वालुका प्रस्तर वरच्या बांधकामात वापरला आहे. खांबाचा तळखडा ०.२५ चौ. सें. मी. आहे व त्यावर वरचे बांधकाम उभारले आहे. दोन खांबांमधील कमान आणि दरवाजांच्या चौकटीपर्यंतची जागा वालुकाप्रस्तराने भरून काढल्याने सुंदर दिसते. थडग्याच्या भोवतालचा मार्ग १.८० मी. रुंद व २.७० मी. उंच आहे. त्यावरील छत वालुकाप्रस्तराच्या तुकड्याचे असून त्यात सांध्यासाठी खोबणी केलेल्या आहेत. वालुकाप्रस्तराचाच छज्जा थडग्याभोवती पुढे आलेला आहे. त्याला ब्रॅकेटस्नी आधार दिलेला आहे. मंदिराचे छत सपाट असून थडग्यावर एक निमुळता घुमट आहे. छताच्या चारी बाजूंना आणि देवडीच्या शेंड्यावर छोट्या छत्र्या आहेत. या छत्र्या म्हणजे उघड्यावर खांबानी बनविलेले तंबूच असून त्यावर कोरीव कंगोरे असलेली घुमटाकार छते आहेत. बंगालकडे आढळणाऱ्या छत्र्यांच्या तुलनेत कंगोऱ्याची टोके जास्तच खाली आहेत. विशेष म्हणजे या इमारतीची सर्व बांधणी पूर्णपणे दगडाची आहे. दगड वेगवेगळ्या प्रकारचे असल्याने सौंदर्यात भर पडली आहे. मध्यवर्ती घुमटावर माकडांच्या शिल्पाकृती आहेत. हा प्रकार परकीय वास्तूबाबत आढळतो. या समाधीवर बंगालमधील मुस्लिम शिल्पकलेचे प्रतिबिंब पडलेले आहे. (जामखेडकर, अ. प्र., **रिलिजन अॅण्ड फ्युनरल मॉनुमेन्ट ऑफ नागपूर**, मार्ग पब्लिकेशन, वर्षे १९८२, मुंबई, पृ. २२१ ते २३०.)

काशीबाईची समाधी : दुसऱ्या रघुजीचा पुत्र परसोजी याचा मृत्यू १ फेब्रुवारी १८१७ रोजी झाला. त्याची पत्नी राणी काशीबाई सती गेली. तिच्या स्मृत्यर्थ मंदिर बांधले गेले.

त्यावरून सर्व स्मारकालाच नव्हे तर एकंदर परिसरालाही काशीबाईचे मंदिर म्हणू लागले. या समाधी मंदिराची रचना आद्य रघुजीच्या समाधीप्रमाणे आहे. हे मंदिर ६.७५ चौ. मी. आकाराचे आहे. मंदिराच्या चारही बाजूंना पुढे आलेल्या देवड्या आहेत. त्या जवळजवळ १.२० मी. रुंद आहेत. या बांधकामाला आधारभूत वालुका प्रस्तराचे २८ खांब आहेत. मंदिर पूर्व-पश्चिम असून त्या दिशानीच वर चढण्यासाठी पायऱ्या आहेत. जोत्यासाठी गुळगुळीत केलेला काळा बेसॉल्ट वापरला आहे. जोते एक मीटरपेक्षा जास्त उंच आहे. त्यावर २८ स्तंभ वालुका प्रस्तराने बनविलेले असून ते १.५० मी. उंचीचे व टोकदार कमानीनी जोडलेले आहेत. छताची उंची ही २.४५ मी. पेक्षा जास्त आहे. चारी बाजूंनी सजविलेल्या दगडी ब्रँकेटस्च्या आधारावर छज्जे बनविले आहेत. थडग्यासमोर १.४५ चौ. मी. आकाराचा एक मी. उंच ओटा आहे. समाधीवर घुमटाकार छतावर तेरा समकेंद्र वर्तुळे व उलट्या कमळाची नक्षी आहे. देवळाचे शिखर सतराव्या शतकातील उत्तरेकडिल नागर शैलीच्या उरोमंजरी शिखराप्रमाणे आहे.

दुसऱ्या रघुजीची समाधी : सर्वात सुंदर समाधी मंदिर दुसऱ्या रघुजीचे आहे. दुसऱ्या रघुजीचे निधन २२ मार्च १८१६ रोजी झाले. त्याचे समाधी मंदिर ७.६० चौ. मी. आकाराचे आहे. समाधीसमोर ९.७५ मी. लांब आणि ७.६० मी. रुंद प्रशस्त ओटा आहे. २० स्तंभांवर समाधी मंदिर उभारले आहे. या मंदिरास देवकोष्ठक नाही. बांधकाम ओरिसा पध्दतीचे आहे.

एकूण भोसले आपल्या कर्तृत्वाने मराठी राज्य विस्तारात सक्रियपणे सहभागी होते. यांच्या काळात नागपूर परिसरात ४४३ वास्तुंची निर्मिती झाली. भौगोलिक स्थितीनुसार भारताच्या विविध भागातील सांस्कृतिक प्रवाह यावेळी वेगाने नागपुरात प्रविष्ट झाले. येथे या प्रवाहांना गरजेनुसार स्वीकारले गेले. त्यांची अभिरुची व सौंदर्य वाढविण्याचा प्रयत्न झाला. या भागात रूढ झालेल्या विविध स्थापत्य शैलींमध्ये पूर्व भारतातून विशेषत: ओरिसातून आलेल्या स्थापत्य शैलीचा प्रभाव केवळ भोसल्यांच्या समाध्या किंवा छत्र्यांच्या शिखरांपुरता सीमीत नव्हता. हिंगण घाटातील मंदिर आणि सिताबर्डी किल्ल्याजवळील शिवमंदिराकरिता ही शैली उपयोगात आणली गेली. पुढे त्यामध्ये आश्चर्यकारक बदल करण्यात येऊन त्यातूनच शिखरावरील उभ्या किंवा सरळलता पट्टयांमध्ये कृष्णलीलांविषयक प्रसंगाचे रेखाटन होऊ लागले. शुक्रवारी तलावाच्या किनाऱ्यावरील शिवमंदिर रेखाशिखर प्रकारातील उत्तम उदाहरण ठरते. मंदिरास गाभारा, अंतराळ, सभामंडप असून स्वतंत्र सीमाभिंत आहे. समतल छतावरील शुकनास व त्यावरील तीन लहान शिखरे व कळस आहे. नागपूर परिसरात हा प्रकार सर्वत्र आढळतो. गर्भगृहाची बाह्य रचना ही सर्वसाधारणपणे पश्चिम भारतीय पारंपरिक वास्तू प्रकारातील आहे. मंडपातील छतास आधार देणाऱ्या महिरपी प्रकारच्या कमानी व त्यावरील भागावर विष्णु अवतार चितारलेले दिसतात.

भूमीज शैली जी मुळात माळव्यात उदयास आली व पुढे पश्चिम भारतात व दख्खनमध्ये विकसित झाली हिचा प्रभाव शिखर व त्यावरील लतापट्ट आणि कूट भागावरील स्तंभावर प्रकर्षाने जाणवतो. महाल भागातील शिवमंदिर, रूक्मिणी मंदिर आणि केळीबाग रस्त्यावरील

शिवमंदिर, बुधवारीमधील जगतेश्वर मंदिर ही या शैलीतील आहेत. रुक्मिणी मंदिर अशा प्रकारातील पूर्ण विकसित वास्तू होय.

ओरिसा, माळवा शिखरशैली बरोबरच बंगालशी भोसल्यांचा संपर्क होता. शुक्रवारीतील रघुजीचे स्मारक आणि बुधवारीतील जगन्नाथ मंदिरावर इंडो-इस्लामिक पध्दतीप्रमाणे लहान छत्र्या आहेत. ही शैली बंगालमध्ये मुस्लिम सत्ता काळात विकसित झाली. भोसल्यांच्या राज्यात राजस्थानातील स्थपती आणि सुत्रधार यांना राजाश्रय मिळाला. मंदिरातील जयपुरी मूर्ती हे राजस्थानी कलेचे पारंपरिक पण सशक्त वैशिष्ट्य होय. वरील सर्व वैशिष्ट्ये विचारात घेऊनही महाल भागातील गोपालकृष्ण मंदिर हे मराठा स्थापत्याचे उत्तम उदाहरण म्हणून दाखविता येईल. (जामखेडकर, अ. प्र., **रिलिजन ॲण्ड फ्युनरल मॉनुमेन्ट ऑफ नागपूर**, मार्ग पब्लिकेशन, वर्ष १९८२, मुंबई, पृ. २२१ ते २३०.)

राजभवन

१८९१ हे साल नागपूरच्या इतिहासामध्ये महत्त्वाचे होते. यावर्षी ऑल इंडिया काँग्रेस कौन्सिलरचे सातवे अधिवेशन आनंद चरलू यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. यावेळी अन्य मान्यवरांबरोबर श्री. एम. पी. मॅकडोनेल, मुख्य आयुक्त, केंद्रिय प्रांत हे उपस्थित होते. याचवर्षी नागपूरमधील मध्यवर्ती ठिकाणी सेमिनरी टेकड्याच्या पठारावर एक नवीन सार्वभौमत्वदर्शक शासकीय वास्तू उभारण्यात आली. या वास्तूचा आराखडा स्थपती ई पेनी याने तयार केला होता. तेव्हापासून भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाच्या वाटचालीची आणि या प्रांतिक विकासाची ही वास्तू एक मूक साक्षीदार म्हणून उभी आहे. १८५७ च्या उठावानंतर ब्रिटिशांनी आपल्या राज्यकारभाराच्या सोयीसाठी म्हणून काही गोष्टी केल्या त्यामध्ये परिणामकारकपणे प्रशासन करण्याच्या दृष्टीने भारत सरकार प्रदेश ठराव ९ च्या (दि. २.११.१८६१) अन्वये सेन्ट्रल प्रॉव्हिन्स असे नामाभिधान असणाऱ्या नवीन प्रांताची निर्मिती करण्यात आली. राज्यकाराभारासाठी दि. ११.१२.१८६१ रोजी पहिले चीफ कमिश्नर इ. के. इलिएट यांनी पदभार स्वीकारला. यावेळी या प्रदेशास गोंडवन असेही संबोधले जात होते. सेन्ट्रल प्रॉव्हिन्सबरोबर सलग्न असणारा वऱ्हाड प्रांत (हा प्रदेश पूर्वी निजामाच्या अधिसत्तेखाली होता) सुध्दा १८५३ साली ब्रिटिश सरकारकडे सोपविण्यात आला. तो इ. स. १९०२ मध्ये कायमस्वरुपी भाडे तत्वावर सरकारकडे आला. इ. स. १९०३ मध्ये सेन्ट्रल प्रॉव्हिन्स चीफ कमिश्नरच्या नियंत्रणाखाली आलेले हे जोडक्षेत्र सेन्ट्रल प्रॉव्हिन्स ॲण्ड बेरार असे संबोधले जाऊ लागले. अशाप्रकारे केंद्र सरकार कायदा विभाग ५८ जेव्हा अमलात आला त्यावेळी सेन्ट्रल प्रॉव्हिन्स हा भाग इतर आठ प्रांतासह चीफ कमिश्नरकडे सोपविला गेला. अन्य सात प्रांत आसाम, नॉर्थ वेस्ट फ्रन्टियरचा प्रदेश ब्रिटिश बलुचिस्तान, दिल्ली, अजमेर, मारवाड, कुर्ग, अंदमान-निकोबर बेटे ही होत. पुढे केंद्र सरकार कायदा १९१९ अन्वये यामध्ये काही सुधारणा करण्यात आल्या आणि युनायटेड प्रोव्हिन्सेस, (पंजाब, बिहार आणि ओरिसा) सेन्ट्रल प्रॉव्हिन्स आणि आसाम गव्हर्नर इन कौन्सिल यांच्या अधिपत्याखाली आले. दि. १७.१२.१९२० रोजी सेन्ट्रल प्रॉव्हिन्सचा पहिला राज्यपाल व मुख्य आयुक्त म्हणून सर एफ. स्लाय याची नियुक्ती करण्यात आली. ते २५-१-१९२५ पर्यंत कार्यरत होते.

नागपूर येथे अस्तित्वात असलेल्या राजभवनला ११० वर्षांचा इतिहास असून या कालावधीत होणाऱ्या परिवर्तनाची साक्ष देत ही वास्तू उभी आहे. इ.स. १८९१ मध्ये राजभवन हे मुख्य आयुक्त निवास, सेन्ट्रल प्रॉव्हिन्स म्हणून कार्यरत झाले, तर १९०३ मध्ये मुख्य आयुक्त निवास सेन्ट्रल प्रॉव्हिन्स ॲण्ड बेरार असे यांचे कार्यालय होते. इ.स. १९२० मध्ये गव्हर्नरचे शासकीय निवास म्हणून सेन्ट्रल प्रॉव्हिन्स या वास्तूकडे पाहिले जाऊ लागले, तर १९४७ मध्ये सरकारी राज्यपाल निवास, मध्यप्रदेश म्हणून याची नोंद झाली. यानंतर झालेल्या राजकीय परिवर्तनाचा परिणाम १९५६ पासून सरकारी राज्यपाल निवास, मुंबई व पुढे १९६० मध्ये सरकारी राज्यपाल निवास, महाराष्ट्र राज्य म्हणून या वास्तूकडे पाहिले जाऊ लागले. अकोला करारानंतर मुळात या स्थानाला राजधानीचे केंद्र म्हणून जो मूळ दर्जा होता तो जपण्याच्या दृष्टीने सन १९८८ पासून राजभवन महाराष्ट्र राज्य दुसऱ्या राजधानीचे केंद्र या अर्थाने कार्यान्वित आहे.

नागपूर येथील ब्रिटिशांचा अंमल एलफिन्स्टन याच्या आगमनाने १८०४ पासून सुरू होतो. पश्चिम घाटामध्ये सिताबर्डी किल्ल्यात तो राहत असे. नवीन वास्तू बांधून होईपर्यंत ती पर्यायी व्यवस्था होती. आताच्या राजभवनामध्ये प्रवेशद्वारापर्यंत द्वारमंडपातील पाटीवर (कोनशिलेवर) इ.स. १८९१ असे बांधकामाचे वर्ष नोंदविले आहे. ए. पी. मॅकडोनेल हे यावेळचे मुख्य आयुक्त होते. या वास्तूचे बांधकाम पूर्ण होण्यासाठी तीन-चार वर्षे लागली असावीत. बालबोध वळणाचे आणि वसाहतवादाच्या प्रभावाचे सुंदर मिश्रण असलेली ही इमारत उत्तर-दक्षिण आसावर खालील काटकोनी चौथऱ्याच्या अधिष्ठानावर उभी असून (चौथरा साधारणत: ७३x४५ मीटर) चक्राकार हिरवळीच्या पार्श्वभूमीवर वास्तू ऊठून दिसते.

प्रारंभीला दोन द्वारभूवने आहेत. मुख्य पूर्व बाजूचे द्वारभूवन, लोकसभागृह तसेच नृत्य सभामंडप व दिवाणखाना आणि भोजनगृह आहे व याच्याकडे जाणारा व्हरांडाचा मार्ग, उत्तरेकडील भागास छोटे द्वारभुवन, वसतिगृह आणि कार्यालयाकडे जाणारा मार्ग आहे. दोन मुख्य सभागृह आहेत. याचा पृष्ठभाग पूर्णपणे जाजमाने झाकलेला आहे. ही जाजमे विशेष प्रकारची (बहुधा पर्शियन बनावटीची आहे) आहेत आणि प्रथम या वास्तुचा उपयोग सुरू झाला तेव्हापासून आजपर्यंत अतिशय दक्षतेने जतन केलेली ही वास्तू सद्या अपवादाने वापरात असली तरी सांस्कृतिक इतिहासाच्या दृष्टीने याचे जतन योग्य पध्दतीने केले आहे.

सभागृहाचा दर्शनी भाग कोरीव असून भिंती विट आणि चुन्यात बांधलेल्या आहेत. उंच छत असलेल्या या सभागृहासाठी पूर्वी पंखे बसवलेले होते. १९१२ मध्ये नागपूरमध्ये प्रथम वीज पुरवली गेली तेव्हा या जुन्या पध्दतीच्या पंख्यांची आवश्यकता राहिली नाही. वऱ्हांडा आणि मुख्य इमारतीच्या उतरत्या छपरावर दोन रांगात अलाहाबादी लाद्या आहेत. प्रशस्त असणारे येथील व्हरांडे अभ्यागतांचे स्वागत करतात तसेच मुख्य इमारतीचे उन्हापासून संरक्षण करतात. त्यांच्यामुळे आतील हवामान थंड राखण्यास मदत होते. या वास्तुच्या प्रथम टप्प्यावर चार लक्ष रुपये खर्च केला गेला. वास्तुच्या लगत असलेले हत्तीचे तबेले या वास्तू संकुलात आहेत. परंतु मुंबईच्या राजभवनामध्ये असणारे स्वतंत्र असे अंगरक्षक व वाद्यवृंद याच्या निवासाचे संकुल येथे स्वतंत्रपणे आढळत नाहीत. १९३० मध्ये नागपूरमध्ये पहिली मोटर आली व यावेळी तबेल्याचे रुपांतर सर्वत्र होते तसे मोटरगॅरेजमध्ये करण्यात आले.

अनुक्रमणिका

वेळोवेळी केलेले नवीन बांधकाम व सुधारणा करताना इमारतीच्या मूळ आराखड्यात काही रचनात्मक बदल केल्याचे दिसते. १९९० मध्ये शासनाने नियुक्त केलेल्या पाटील समितीने टप्प्या टप्प्याने ५८ लक्ष रु. चे जतनविषयक कार्यक्रम सुचविला आहे. कलकत्ता येथे युरोपियन देखरेखीखाली फर्निचर बनविण्याच्या वखारी होत्या. तेथे मुद्दाम तयार केलेले लाकडी फर्निचर या वास्तूत दिसते. असीरगडवरून आणलेल्या उल्लेखनीय अशा दोन तोफा बाहेरच्या बागेत ठेवलेल्या आहेत. तोफा ब्रान्झच्या बनविलेल्या असून पर्शियन पध्दतीने घडविलेल्या आहेत. अत्यंत उत्कृष्ट असलेल्या या तोफांच्यावर काही नक्षीकाम आढळते. मोगल बादशहा औरंगजेबकडे असलेल्या या तोफावर हिजरी १०७४ म्हणजे इ. स. १६६३ असे वर्ष दिले आहे. दुसरी तोफ लोखंडी असून त्यावर असलेल्या शिल्पकामामध्ये हिंदीभाषेत कोरलेला सन १६५४ असे दिसते. त्यावर "कडुवा पद्म" असे कोरले आहे. एकोणिसाव्या शतकात या वास्तुच्या मागील बाजूस असलेल्या प्रांगणातील ध्वजस्तंभावर ब्रिटिश ध्वजही लागला होता. हा या क्षेत्रातील सर्वात उंच ध्वजस्तंभ आहे. नागपूरला महाराष्ट्र राज्याची दुसरी राजधानी हा दर्जा प्राप्त झाल्यानंतर स्वाभाविकपणे राजभवन हे महाराष्ट्रातील दुसऱ्या क्रमांकाचे राजभवन ठरते.

एकूण राजभवनाची वास्तू खऱ्या अर्थाने योग्य नैसर्गिक पार्श्वभूमीवर उभारण्यात आलेली ही वसाहतवादी प्रभाव स्पष्ट करणारी तसेच राजसत्तेची साक्ष देणारी एक सुंदर अशी वास्तू आहे. या वास्तूत सौंदर्य, भव्यता व सभोवतालच्या नैसर्गिक परिसराशी असलेली एकरुपता नजरेत भरते. या वास्तूस असलेल्या मंडपामध्ये बाराव्या शतकातील काही जैन मूर्तीशिल्पे ठेवली आहेत. तसेच आतमध्ये लहानशे शस्त्रागार, तत्कालीन महत्त्वपूर्ण प्रसंगाची स्मृती जागवणारी तैलचित्रे लावलेली आहेत. एक लहानसा संदर्भग्रंथ व अल्बमचा संग्रह उल्लेखनीय आहे. (गोरक्षकर, सदाशिव, **"राजभवन इन महाराष्ट्र",** डायरेक्टोरेट जनरल ऑफ इन्फॉर्मेशन ॲण्ड पब्लिक रिलेशन, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, वर्षे २००२, पृ. १५९ ते १६५.)

दीक्षाभूमी : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर (१४ एप्रिल १८९१ ते ६ डिसेंबर १९५६) यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपुरात बुध्द धम्माचा स्वीकार करून आपल्या अनुयायांना धम्मदीक्षा दिली. धम्मदीक्षेचा पवित्र सोहळा ज्या १४ एकर भूमीवर झाला ती भूमी दीक्षाभूमी म्हणून प्रसिध्द पावली. तेव्हापासून दरवर्षी अशोक दशमीच्या दिवशी तथागत भगवान बुध्द व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लक्षावधी अनुयायी या भूमीवर एकत्र येऊन आपली श्रध्दा व्यक्त करतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महानिर्वाणानंतर लगेचच डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीची स्थापना करण्यात आली. स्मारक समितीच्या अविरत प्रयत्नानंतर महाराष्ट्राचे तत्कालिन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी दीक्षाभूमीची जागा, बाबासाहेबांचे स्मारक उभारण्यासाठी स्मारक समितीला प्रदान केली. खासदार पद्मश्री दादासाहेब गायकवाड हे अध्यक्ष व खासदार ना. ह. कुंभारे हे उपाध्यक्ष असताना समितीने स्मारकांचे निर्माणकार्य सुरू केले. सध्या स्मारक समितीचे कार्याअध्यक्ष श्री. रा. सु. गवई व सचिव श्री. सदानंद फुलझेले यांचे कुशल मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

अनुक्रमणिका

६१ X ६१ चौ. मी. अशा विस्तृत पायावर हा स्तूप उभारण्यात आला असून त्याची चार प्रवेशद्वारे सांचीच्या स्तुपाचे अनुकरण करून निर्माण केली आहेत. स्तुपाच्या तळमजल्यावर तसेच पहिल्या मजल्यावर प्रत्येकी ५,००० लोक बसू शकतील अशी सभागृहे आहेत. तळमजला वर्तुळाकार आकाराचा असून तेथील चार दालनात प्रशासन, ग्रंथालय, संशोधन आणि संग्रहालय निर्माण केले आहे. या स्तुपाचा व्यास ३६.५० मी. आणि उंचीसुध्दा ३६.५० मी. असून घुमटाच्या सभोवती ३ मी. रुंदीचा व्हरांडा आहे. घुमट आणि छत्रीवर संगमरवरी टाईल्स लावल्या आहेत. या स्मारकापर्यंतचा पोच मार्ग तसेच येथील विद्युतीकरण, जलःनिस्सारण विषयक बाबी महानगरपालिकेच्या वतीने केल्या आहेत. तेथे भगवान गौतम बुध्द व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील घटनांची तैलचित्रे आहेत.

दीक्षाभूमीवर प्रतिवर्षी विजया दशमीच्या दिवशी मुख्य कार्यक्रम होतो. त्यात जातीधर्म, लिंग वगैरे भेदभाव न करता सर्वांना प्रवेश असतो. तेथे मोठ्या प्रमाणात जनसमुदाय स्वयंस्फूर्तीने गोळा होतो. तेथे पिण्याच्या पाण्याची, स्वच्छतेची व आरोग्य सेवेची अस्थायी व्यवस्था महानगरपरिषद करते. (डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमी, नागपूर यांचेकडून प्राप्त माहिती आधारे.)

हेडगेवार स्मारक : डॉ. केशव बळीराम हेडगेवार नागपूरच्या महत्त्वाच्या व्यक्तींपैकी एक होते. (१ एप्रिल १८८९ ते २१ जून १९४०) ते हिंदुत्त्वाचे प्रखर प्रचारक होते. त्यांच्यासाठी हिंदूत्त्व हेच राष्ट्रीयत्त्व होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेत त्यांनी पुढाकार घेतला. रेशीमबाग मध्ये जोधपूरच्या गुलाबी दगडाच्या छोट्याशा इमारतीत त्यांची समाधी व जीवनप्राय पुतळा आहे. खालील कक्षात समाधी असून त्यांच्यावर आठ पाकळ्यांच्या कमळीत ॐ हा शब्द कलात्मकदृष्ट्या कोरला आहे. जमिनीला राजस्थानातून आणलेला उत्कृष्ट संगमरवर लावला असून भिंतीसुध्दा संगमरवराने मढविल्या आहेत. याच कक्षाच्या पाच पायऱ्या चढून गेले की, कक्षांमध्ये डॉ. हेडगेवार यांचा पुतळा बसलेल्या अवस्थेतील आहे. पुतळा उत्कृष्ट कलात्मकतेचा प्रतिक आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांना ही जागा स्फूर्तीकेंद्र ठरली आहे. १९८९ मध्ये डॉ. हेडगेवार यांची जन्मशताब्दी होती. त्यावेळी स्मृतिमंदिराला लावलेल्या काळा पाषाणावर मद्रासहून तयार करून आणलेल्या चकचकीत फरशाचा थर जोडला आहे. मुख्य पुतळ्यावर उभारलेल्या उंच मेघडंबरीच्या दर्शनी भागावर ताणलेल्या प्रत्यंचा युक्त धनुष्याची प्रतिकृती कोरलेली आहे.

याठिकाणी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या तृतीय वर्षाच्या संघशिक्षा वर्गाकरिता संपूर्ण देश विदेशातून कार्यकर्ते येतात. त्यांच्या निवासादी व्यवस्थेसाठी स्मृतीभवन, पांडुरंग भवन आणि माधव भवन या वास्तू स्मृतिमंदिराच्या परिसरात आहेत, तसेच एक भव्य सभागृह बांधलेले आहे.

द्वितीय सरसंघचालक मा. स. गोळवलकर उपाख्य गुरुजी (१९ फेब्रुवारी १९०६ ते ५ जून १९७३) यांचे देहावसानानंतर स्मृतिमंदिराच्या परिसरातच त्यांच्या देहावर अग्निसंस्कार

झाला. तेथे गुरुजींचे स्मृती चिन्ह म्हणून नित्य प्रज्वलित असलेल्या यज्ञकुंडाचे दृश्य निर्माण करणारी अष्टकोनी यज्ञवेदी आहे. तांबड्या ग्रॅनाइट आणि संगमरवरी दगडाच्या या यज्ञवेदीत यज्ञज्वालेसारख्या दिसणाऱ्या काचेच्या (फायबर ग्लास) नलिका लावल्या आहेत. त्याखाली गोलाकार प्रज्वलित होणाऱ्या चलविद्युत दीप योजनेमुळे सायंकाळी व रात्री यज्ञवेदीतून ज्वाला निघत आहेत असे दृश्य दिसते.

या वेदीच्या पूर्व बाजूला गुरुजींनी स्वयंसेवकाना उद्देशून लिहिलेल्या पत्रातील संत तुकाराम महाराजांचा अभंग लिहिलेला आहे.

शेवटची विनवणी । संतजनी परिसावी ।। विसर तो न पडावा। माझा देवा तुम्हासी ।।

आता फार बोलो कायी। सर्व पायी विदीत।। तुका म्हणे पडतो पाया। करा छाया कृपेची।।

स्मृतिमंदिर आणि स्मृती चिन्ह यांच्या सभोवती एक लहानशी पुष्पवाटिका आहे.

डॉ. हेडगेवार भवन : नागपुरातील महाल विभागात असलेले संघाचे केंद्रीय कार्यालय डॉ. हेडगेवार भवन म्हणून ओळखले जाते. १९२५ मध्ये संघाचा प्रारंभ झाला त्यावेळी शुक्रवारी विभागातील डॉ. हेडगेवार यांचे घर हेच संघाचे कार्यालय होते. कार्यवाढीबरोबर कार्यकर्त्यांच्या निवासादी व्यवस्थेसाठी रुईकर मार्गावरील दशोत्तरांचा वाडा व त्यानंतर शेष यांचे घर भाड्याने घेतले, तेथेच संघाचे कार्यालय असे.

१९४० मध्ये हेडगेवार भवन (संघ कार्यालय) बांधण्याचे ठरले. १९४३-४६ या कालावधीत कार्यालयाचे बांधकाम पूर्ण झाले. "डॉ. हेडगेवार भवन" कार्यालयात मुख्य इमारतीच्या तळमजल्यावर आतापर्यंत झालेल्या सर्व सरसंघचालकांना भेट मिळालेल्या वस्तुंचे प्रदर्शन आहे. (हेडगेवार स्मारक समिती, नागपूर यांनी दिलेल्या माहिती आधारे.)

गांधी बाग आणि तरणताल : हा बगीचा २.८५५ हेक्टर (७.०५ एकर) असून त्यात सांस्कृतिक कक्ष आणि तरण तालचा समावेश आहे. महात्मा गांधी यांच्या स्मरणार्थ हा बाग निर्माण करण्यात आला. त्यावरून या वस्तीचे नाव गांधी बाग पडले.

बगिचाच्या दक्षिण बाजुला एक लाख रुपये खर्च करून सोख्ता भवन नावाची सांस्कृतिक (भवन) उभारले असून तत्कालीन आरोग्य मंत्री मा. सा. कन्नमवार यांनी त्याचे उद्घाटन केले. या कक्षात निरनिराळे सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम होत असतात. सांस्कृतिक कक्षाच्या मागे ३२.०० X ४.५७ X ३.५८ मीटर आकाराचा तरण ताल आहे. तरण ताल आधुनिक बनावटीचा असून त्याच्या तळाशी दिवे लावले आहेत. नागपूर महानगरपालिकेची एकूण ४० उद्याने असून गांधी बाग हे एक महत्त्वाचे उद्यान आहे. याचे क्षेत्र ५ एकराचे असून १९९६-९७ मध्ये याची नव्याने सुधारणा करण्यात आली. त्यामध्ये कृत्रिम समुद्रकिनारा या संकल्पनेवर एक बीच तसेच ध्वनी प्रकाशव्यवस्था याशिवाय काही लेडस्केच शिल्प व म्युरल्स बसविले आहेत.

राष्ट्रपिता महात्मा गांधी विहीर : इंदिरानगर वार्ड क्र. ५ मध्ये बोरकर नगरात पिण्याच्या पाण्याच्या विहिरीचे उद्घाटन राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी ८ नोव्हेंबर १९३३ साली केले. महानगरपालिकेने ४ लाख २५ हजार रुपये खर्च करून या परिसराचे सौंदर्यीकरण केले.

गीता मंदिर : शहराच्या मध्यभागी सुभाष रोडवर हे मंदिर आहे. स्वामी विद्यानंदजी यांनी गीता मंदिर बांधण्यासाठी औदार्यपूर्वक दान देण्याचे आवाहन केले. लोकसभेचे तत्कालीन सभापती श्री. मावळंकर यांनी मंदिराचे विमोचन केले. मंदिर १.१३ एकर क्षेत्रात पसरले असून ही जमीन नागपूर महानगरपालिकेने दान दिली आहे. हे मंदिर आधुनिक शिल्पशास्त्र व स्थापत्याचा एक प्रातिनिधीक नमुना आहे. गीता मंदिर गाभाऱ्यामध्ये कृष्णाची संगमरवरी मूर्ती आहे. गाभाऱ्यावर शिखर आहे. मंदिराचे सभागृह ३८.१० x १६.७६ मीटर असून त्याच्या टोकाला स्वामी विद्यानंदजी महाराजांचा पुतळा आहे. मंदिराची समोरची बाजू वर्तुळाकार असून तीन बाजुंला खुली गॅलरी आहे. मंदिराच्या लगत साधकासाठीची निवास व्यवस्था आहे. दक्षिणेला रस्त्याच्या बाजूने दुकानाच्या रांगा असून दुकानांपासून मंदिराला ठराविक मासिक उत्पन्न प्राप्त होते. सभामंदिर धार्मिक व सामाजिक कार्यासाठी नाममात्र भाड्याने मिळते. मंदिराची व्यवस्था एका न्यासाकडे आहे. या मंदिरात गीतेचे तत्वज्ञान व व्याख्याने व गीता जयंती, राम नवमी, जन्माष्टमी वगैरे महत्त्वाच्या सणांच्या दिवशी भजन, किर्तन वगैरे केले जातात. मंदिराच्या परिसरात एक आयुर्वेदिक औषधालय चालविले जाते. तेथे गरजू लोकांना विनामूल्य वैद्यकीय मदत मिळते.

महाराज बाग : हे नागपुरातील सर्वात जुने उद्यान असून नागपूर-अमरावती मार्गावर नागपूर विद्यापीठाजवळ आहे. या उद्यानाचे क्षेत्रफळ एकूण ६ हेक्टरचे आहे. प्राचीन वृक्षाच्या आसमंतात नागपूरकर भोसल्यांनी या उद्यानाची स्थापना केली त्यावेळी तेथे अनेक वन्य प्राणी ठेवले होते. पुढे याकडे दुर्लक्ष झाले, पण नंतर विसाव्या शतकात या बगिच्याचा पुनरुध्दार झाला. तेथे नवीन वन्य प्राणी ठेवण्यात आले आणि बगिच्यालाही सुव्यवस्थित रूप देण्यात आले. त्यामुळे तो एक मनोरंजनाचे स्थान झाले आहे. बगिच्याच्या मध्यभागी एक छोटासा कृत्रिम तलाव असून त्यात काळ्या दगडात कोरलेला एक हत्ती आहे. इतर उद्यानांप्रमाणे येथेही सुंदर वनराई, फुलांचे ताटवे आणि सुंदर हिरवळ आहे, महाराज बागेचे वैशिष्ट्य असे की, येथे एक प्राणिसंग्रहालय आहे. तेथे वाघ, सिंह, वेगवेगळ्या प्रकारचे बंदर, हरिणे, बारासिंगे, अस्वल, मोर, काकाकुवा आणि मोठे साप आहेत. बगिच्याच्या पश्चिमेला कृषि महाविद्यालयाची इमारत आहे. महाविद्यालयाची प्रायोगिक शेती आहे. जवळच कृषि प्रयोगशाळा असून तेथे निरनिराळ्या रोपट्याचे उत्पादन आणि विक्री होते. महाराज बाग हे नागपुरातील सर्वात महत्त्वाचे मनोरंजक स्थान असून त्याचा कारभार महाराष्ट्र शासनाच्या उद्यान अधीक्षकाकडे असतो.
(सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय यांनी पुरविलेल्या माहिती आधारे.)

शहरातील पुतळे

राणी लक्ष्मीबाईचा पुतळा : विदर्भ साहित्य संघाच्या इमारतीसमोर झाशीच्या राणीचा पूर्णाकृती मोठा पुतळा आहे. महाराणी एका घोड्यावर बसल्या असून तो घोडा पुढे झेप घेत आहे. हा पुतळा ४.५७ मी. उंच आणि काशाचा आहे. तो अतिशय डौलदार दिसतो. त्यासाठी ४५ हजार रुपये खर्च झाले. ११ नोव्हेंबर १९६२ रोजी त्याचे अनावरण झाले.

शहीद शंकर : १९४२ च्या चळवळीत या तरुण देशभक्ताने भाग घेतला. त्याला अटक करून १९४३ मध्ये फाशी देण्यात आले. त्याचा पुतळा नवाबपुऱ्याच्या झेंडा चौकात उभारण्यात आला. हा पुतळा मूळ शहीद शंकरच्या आकाराचा असून त्यासाठी १४,००० रु. खर्च आला. पंडित जवाहरलाल नेहरु यांनी १३ फेब्रुवारी १९४२ रोजी त्याचे अनावरण केले. ही प्रतिनिधीक नोंद असून शहरातील विविध पुतळे हे या शहराचे एक वैशिष्ट्य मानले जाते. यांची यादी याच प्रकरणाच्या परिशिष्टात दिली आहे.

केंद्रीय संग्रहालय

महाराष्ट्र शासनाचे केंद्रीय संग्रहालय उर्फ अजबघर हे विदर्भातील एकमेव संग्रहालय असून विदर्भाचा इतिहास आणि संस्कृतीवर प्रकाश टाकणारी सर्वात जुनी संस्था आहे. याची स्थापना १८६३ मध्ये झाली. त्यावेळी रिचर्ड टेंपल हे मध्यप्रांताचे मुख्य आयुक्त होते. मार्च १९६४ मध्ये या संग्रहालयास १०० वर्षे पूर्ण झाली या वास्तूची दुरुस्ती १९९६ मध्ये पूर्ण करण्यात आली.

या संग्रहालयातील संग्रह कला आणि उद्योग, पुरातत्व, मानववंशशास्त्र, शस्त्रसंग्रह, भूगर्भशास्त्र आणि नैसर्गिक इतिहास अशा सहा विभागात विभागला आहे.

कला आणि हस्त उद्योग : कला दालनात कला आणि उद्योगाचे प्रदर्शन आहे. समोरच "शेतावरून वापस" जाणाऱ्या शेतकरी कुटुंबाचे प्लास्टर मॉडेल आहे. या कक्षातील कला आणि कारागिरीत बनारस, सियालकोट, मुरादाबाद, नासिक, तंजोर, बिदर, चांदा, भंडारा, मंडला दमोह आणि देशातील इतर भागातील कलाकुसरीची तशीच साधी भांडी आहेत. त्यावरून त्याचे शिल्पकाराच्या सौंदर्याची जाणीव होते. तेथे रत्नागिरी, कटक आणि म्हैसूर येथील प्राण्यांच्या शिंगाचे व हस्तीदंती कामाचे नमुने आहेत. जयपूर आणि सिंधचे लेबर वर्क, आग्र्याचे इनलेस्टोन वर्क, पुरीच्या स्टोनच्या मूर्ती, बऱ्हाणपूरच्या सोन्याच्या धाग्याच्या साड्या, सरहानपूर, नागपूर आणि मुंबईचे लाकूडकाम, उत्तरप्रदेश, मद्रास आणि मुंबईच्या "स्कूल ऑफ आर्ट" मधील वस्तू सजावटी भांडी, बेळगावची फळे व भाजीपाल्याचे लाकडी नमुने प्रेक्षकांना आकर्षून घेतात. स्थानिक कलाकारांनी बनविलेले चांदीचे चक्र तसेच मातीचे हिंदुदेवताचा समूह लक्षवेधी आहे. तेथे भोसले संग्रहातील सचित्र हस्तलिखित पोथ्या आहेत. इंग्लंड, व्हेनिस, चीन, जपान मधील सजावटीची भांडी तसेच जपानमधील ग्रामोद्योगाची उत्पादने आहेत.

पुरातत्व : पश्चिमेकडच्या पाख्याच्या चार खोल्या पुरातत्व संग्रहासाठी राखीव आहेत. पुरातत्व संग्रह सहा विभागात विभागला आहे. १) प्रागैतिहासिक, २) मूर्तिशिल्प व

धातुप्रतिमा, ३) नाणी, ४) शिलालेख, ५) संकीर्ण वस्तू व ६) शस्त्र कक्ष. प्रागैतिहासिक कक्षात या प्रदेशात आणि बालाघाट येथे सापडलेल्या अश्मयुगीन व ताम्रयुगीन वस्तू व अवशेष प्रदर्शित आहे. मोहेंजोदारो आणि हडप्पा येथे सिंधुकालीन असंख्य अवशेष प्रदर्शनात ठेवले आहेत. त्यासोबत युरोपातील पुराश्मकालीन, ताम्रयुगीन, नवाश्मकालीन, आणि कास्ययुगीन अवशेष ठेवले आहेत.

शिल्प कक्ष : मूर्तिशिल्प हे या संग्रहालयाचे मुख्य आकर्षण केंद्र आहे. या संग्रहात इ. स. १०० पासून १६०० सालातील हिंदू, जैन, बुध्द शिल्प संग्रहित असून संग्रहालयाच्या द्वाराशी शककालीन शिल्प आहेत. येथील शिल्प प्रदेशानुसार विभागले असून हिंदू शिल्पात वराह, कूर्म, ब्रह्मा, चामुण्डा, इंद्र, शिव, लक्ष्मी-नारायण, गरुड, चंद्र, विष्णू यांचा समावेश आहे. जैन शिल्पात महावीर आणि सुपार्श्व महत्त्वाचे आहे. याशिवाय सुमंतीनाथ, अंबिका, सरस्वती आणि यक्ष दंपत्तीचे शिल्प आकर्षक आहे. बौध्द शिल्पात बुध्द बोधीसत्त्व आणि ताराच्या मूर्ती अकराव्या-बाराव्या शतकातील आहेत. बौध्द ब्रांझचाही यात समावेश आहे.

वाकाटक शिल्प : एक नवीन दालन येथे सुरू करण्यात आले असून त्यामध्ये मांढळ येथील लकुलीस, सदाशिव, अष्टमूर्ती शिव, पातूर येथील पार्वती, नगरधन येथील भारवाहक गण व आचार्य प्रतिमा, हमलापुरी येथील विष्णूशीर्ष, नागरा येथील भूतप्रणाल प्रदर्शित केले आहे.

अजबघराचा नाणेसंग्रह : पुरेसा प्रातिनिधीक असून तो केबिनमध्ये ठेवला आहे. या नाणेसंग्रहात आहत नाणी, सातवाहन गुप्त, नल, शरभपुरी, चंदी आणि दक्षिण कोसलचे कलचुरी, परमार, चालुक्य, यादव, दिल्लीचे सुलतान व त्याचे समकालीन देवगढचे गोंड राजे यांची नाणी आहेत. याशिवाय या कक्षात प्राचीन, मध्ययुगीन व मुस्लिम काळातील निवडक नाण्यांचे प्रतिकृती इलेक्टोप्लेटेड मेंडल आणि प्लास्टिक कास्ट प्रतिकृती आहे.

शिलालेख कक्ष : इ. स. तिसऱ्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंतचे शिलालेख व ताम्रपत्र प्रदर्शित आहेत. यापैकी सम्राट अशोकाचा देवटेक शिलालेख आणि पहिल्या रुद्रसेनाचा शिलालेख आहे. चेदी नरेशाचे करीतलाई आणि बिल्हारी शिलालेख, सहाव्या विक्रमादित्याच्या काळातील सिताबर्डी शिलालेख, माळव्याच्या राज्यकर्त्याचा नागपूर शिलालेख आणि बऱ्हाणपूर येथील मोगल हमामखान्यातील पर्शियन शिलालेख येथे आहे. ताम्रपत्राच्या संग्रहात वाकाटक, शरभपुरिया, परिव्राक, सोमवंशी, राष्ट्रकूट, कलचुरी, परमार आणि चंदेल यांची ताम्रपत्रे आहेत. संकीर्ण विभागात इ. स. पूर्व १००० काळातील बॅबिलोनियाचे मुद्रालेख असून ते एका केबिनमध्ये आहे. याशिवाय काही निसर्गचित्रे, राष्ट्रीय स्मारके तसेच विदर्भातील स्मारकाचे छायाचित्र आहेत. येथे गोंड-मराठा कालीन शिल्प स्थापत्याचा वेगळा उपविभाग आहे.

या विभागात प्राचीन शस्त्रास्त्राचा मोठा संग्रह प्रदर्शित आहे. त्यात वस्त्रे, प्रावरणे, शिरस्त्राणे, पादत्राणे, दागिने, वाद्ये, घरगुती वस्तू, शेतीची आणि शिकारिची अवजारे यांचा समावेश आहे. भौतिक संस्कृतीसोबत आदिवासी जीवनातील नृत्य व इतर दृश्य दाखविणारी रंगीत छायाचित्रे आहेत. याशिवाय शिकार व युध्दाची कोरीव चित्रे, संरक्षणाची, आक्रमणाची

हत्यारे येथे दिसतात. या शिवाय संकीर्ण विभागात लखनी येथील बचावात मिळालेली सिग्नलचा दांडा ठेवला आहे. महाराष्ट्रीय ब्राह्मणातील सोळा संस्कार मातीच्या लहानमूर्तीच्या मालिकेतून दाखविले आहेत.

चित्रकला : चित्रकला कक्षात निसर्गचित्रे, व्यक्तीचित्रे आणि इतर आधुनिक चित्रांचा संग्रह आहे. त्यात आधुनिक काळातील महान चित्रकारांच्या कलाकृतींचा समावेश आहे. जुन्या भारतीय चित्रात सर्व प्रकारच्या चित्रशैलींचा प्रातिनिधीक संग्रह आहे. त्यात मोगल, राजस्थानी, कांगडा आणि दख्खनी शैलीचा समावेश आहे. एका इटालियन कलाकाराने काढलेले महादजी शिंद्याचे चित्र आहे. तसेच दोन नेपाळी व भूतानी पताका आहे.

भूगर्भशास्त्र : भूगर्भशास्त्राच्या प्रदर्शनात दगडांचे प्रकार, खनिजांचे प्रकार, आर्थिक महत्त्वाची खजिने आणि फॉसिल्स आहेत. दगडांच्या प्रकारात मूळ प्रस्तर परिवर्तीत प्रस्तर आणि गाळाचे प्रस्तराचा समावेश आहे. खनिजे आम्ल क्रमाने आणि आधार क्रमाने लावली आहेत. आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या खनिजात कच्चे मॅगनीज, लोह आणि तांबे, कोळसा, बॉक्साईट, चुनखडीची माती, ग्रानाइट, अभ्रक ॲस्बेस्टास, गलेना, मीठ आणि जिप्सम आहेत. फॉसिल्स संग्रहात वनस्पती, सरपटणारे व न सरपटणाऱ्या प्राण्यांचा समावेश आहे.

नैसर्गिक इतिहास : संग्रहालयाच्या या विभागात पक्षी, सरपटणारे प्राणी, मासे, न सरपटणारे आणि सस्तन प्राण्यांचा समावेश आहे. पहिल्या कक्षात सारस आणि मोराचे घरटे आहे. बाकीच्या कक्षात सुमारे २०० पक्षांचे नमुने आहेत. हे पक्षी इतक्या आकर्षकपणे ठेवले आहेत की, जणू जिवंतच वाटतात. सरपटणाऱ्या प्राण्यात मासे आणि भारतीय मगराचे एक कुटुंब आहे. याशिवाय गायकी, जळू व पाल सरडा, अजगर व इतर प्रकारचे विषारी आणि साधे साप आहेत. मत्स्य संग्रहात ताज्या पाण्यातील बाम, सिंघाडा, निळा, महासिर, मरळ, फुलमरळ आणि काही मासे समुद्रातील आहेत. उभय निवासी प्राण्यात बेडूक, टॉड आहे. इनव्हर्टे कक्षात निरनिराळे सामुद्रिक शंख शिंपले आणि जंतू व त्यांचे संपूर्ण जीवनचक्र दाखविले आहे. तिसऱ्या कक्षात लहान मोठे सस्तन प्राणी आहेत. त्यात निलगाय, सांबर, कृष्णहरिण, बारसिंगे, चिंकारा आहेत. मांसभक्षक प्राण्यात अस्वल, वाघ, चित्ता, रानमांजर, लांडगा, कोल्हा आणि रानटी कुत्रा आहेत. एका मोठ्या शोकेसमध्ये योग्य त्या पार्श्वभूमीवर मोठे सस्तन प्राणी आहेत. हरिण व साधी खार, वटवाघुळ, मुंगूस, पॅगोलीन हे छोटे सस्तन प्राणी आहे. पण या कक्षाचे सर्वात मोठे आकर्षण भारतीय वाघ, चित्ता हे आहे.

हे संग्रहालय सकाळी ९.०० वा. पासून सायं. ५.३० वा. पर्यंत लोकांसाठी खुले राहते. सोमवार आणि राष्ट्रीय दिनाखेरीज सर्व दिवशी ते खुले असते. संग्रहालयासोबत एक छोटे ग्रंथालय आहे. शोधकर्त्याना तेथे प्रवेश असतो आणि संग्रहालयाचे अधिकारी शक्यतो सारी मदत करतात. (संचालक, पुरातत्व विभाग यांनी पुरविलेल्या माहिती व कार्यालयाचे प्रत्यक्ष सर्वेक्षण आधारे.)

अंधारे यांचा वस्तुसंग्रह : नागपूर येथे जसे राष्ट्रीय संग्रहालय हे एक मोठे संग्रहालय आहे तसे डॉ. भा. रा. अंधारे यांनी आपला व्यक्तिगत छंदाचा भाग म्हणून जोपासलेला एक लहान संग्रह आहे. सांस्कृतिक संशोधन केंद्र, पितृछाया, भरतनगर, नागपूर येथे

त्यांनी आपल्या घरीच हा संग्रह जतन केला आहे. यामध्ये अठराव्या-एकोणिसाव्या शतकातील अनेक ऐतिहासिक कागदपत्रे, ग्रंथ, मिनिचर पेंटिंग्ज, विविध प्रकारच्या दैनंदिन उपयोगाच्या वस्तू, तत्कालीन स्त्रियांचे बहुविध प्रकारचे दागदागिने जतन करून ठेवण्यात आले आहेत. एक छंद म्हणून जमा केलेल्या वस्तू गेल्या दोन शतकातील समाजजीवनाचा परिचय करून घेण्यासाठी उपयुक्त ठरतात.

याशिवाय प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती व पुरातत्व विभागाचे संग्रहालय असून नागपूर विद्यापीठात स्वतंत्र अशी वास्तू आहे. येथे या परिसरातील उत्खनित अवशेष, मांढळ येथील वाकाटककालीन मूर्तिशिल्प व अन्य वस्तू ठेवल्या आहेत. याव्यतिरिक्त अरविंद अंभईकर या एका हौशी संशोधकाने जमविलेला नाणेसंग्रह आणि किशोर दिवेकर यांचा छोटेखाणी वस्तूसंग्रह उल्लेखनिय आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया : नागपूर शहराच्या वैभवात भर घालणाऱ्या वास्तूंपैकी भारतीय रिझर्व बँक, उच्च न्यायालय, रेल्वे स्थानक, नागपूर विद्यापीठाची मुख्य इमारत या महत्त्वपूर्ण वास्तू कामठी येथील वालुकाश्मपासून उभारण्यात आल्या. या वालुकाश्मात लाल व पांढऱ्या पट्ट्या असलेले खडक मिळतात त्यांचा उपयोग वरील वास्तूंच्या बांधकामात करण्यात आला आहे. तर जुने सचिवालय व अन्य काही वास्तू बेसॉल्ट दगडात बांधले आहेत. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची भव्य इमारत कस्तुरचंद पार्कजवळ राघवेंद्रराव मार्गावर आहे. लाल व पांढऱ्या दगडाने बांधलेली ही इमारत आधुनिक स्थापत्य आणि शिल्प कलेचे सर्वोत्तम उदाहरण आहे. बँकेच्या या इमारतीचे उद्घाटन १० डिसेंबर १९५६ रोजी झाले या वास्तू निर्मीतीवर ७५ लाख रुपये खर्च झाले. ती अर्धवर्तुळाकार असून संपूर्ण वातानुकूलीत आहे. मुख्य इमारतीची प्रवेशाची बाजू काहीशी पुढे आली असून तेथे महाद्वार आहे. महाद्वारासमोर दोन प्रचंड स्तंभ असून ते संपूर्ण इमारतीच्या उंची एवढे आहे. इमारतीला दगडी भिंतीने वेढलेला प्राकार आहे. प्रांगणात सुंदर हिरवळ आहे. पोर्चवर खुल्या गच्चीची एक खोली आहे.

श्री. पोद्दारेश्वर राम मंदिर : हे राममंदिर नागपूर रेल्वे स्टेशनजवळ मेयो इस्पितळ मार्गावर आहे. मंदिर स्थापत्य आणि शिल्पाचे दृष्टीने सुंदर उदाहरण आहे. गाभाऱ्यात राम-लक्ष्मण, सीता यांच्या उत्तराभिमुख तीन मूर्ती आहेत. राम मंदिराच्या उजव्या बाजुला पूर्वाभिमुख शिवमंदिर आहे. तेथे भगवान शिवाची मोठ्या आकाराची मूर्ती आहे. शिवाय तेथे कार्तिकेय, गणेश, शेषनाग आणि देवी पार्वती यांच्या मूर्ती आहेत. आग्नेय बाजुला हनुमान मूर्ती आहे. मंदिरात सहा कोपरे असून त्यात हनुमान, गरूड, गायत्री, गंगा व इतर देवता आहेत. पोद्दारेश्वर मंदिराचा पाया श्रावण शुध्द पौर्णिमेस इ. स. १९१९ रोजी घालण्यात आला. मंदिर निर्मितीसाठी पाच लाख रुपये खर्च झाला. मंदिराचे वैशिष्ट्य असे की, मंदिराच्या चांदीच्या प्रवेशद्वारावर रामायण व शिवपुराणातील प्रसंग कोरले आहेत. मंदिराचे शिखर पांढऱ्या शुभ्र संगमरवराचे आहे. सभामंडप अष्टकोनी असून त्याच्या खांबावर रामाच्या मूर्ती कोरल्या आहेत. सभामंडपाच्या छताचे जाळीदार काम कलाकुसरपूर्ण असून प्रेक्षणीय आहे. सभामंडपाची फरशी संगमरवराची आहे. मंदिरात संगमरवरी पृष्ठभाग बहुरंगी

लतावेलीच्या आकृतीनी सजविला आहे. त्यामुळे मंदिराच्या सौंदर्यात भर पडली आहे. श्रावण महिन्यात तृतीयेपासून पौर्णिमेपर्यंत येथे होणाऱ्या समारंभासाठी मंदिर विद्युतदिपांनी सजविले जाते. तसेच शरद पौर्णिमा, रामनवमी, महाशिवरात्र, जन्माष्टमी सण साजरे होतात. मंदिराच्या परिसरात एक ग्रंथालय, वाचनालय आणि धर्मशाळा असून मंदिराची व्यवस्था न्यासाकडे आहे.

अंबाझरी तलाव आणि उद्यान : नागपूरच्या पश्चिमेला ६.४३७ कि. मी. वर अंबाझरी तलाव आणि उद्यान अत्यंत सुंदर प्रेक्षणीय स्थळ आहे. नागपूरकर व पर्यटक यांचे ते आकर्षणाचे केंद्र आहे. हा तलाव जुन्या प्रकारचा असून भोसल्यांच्या काळात बांधण्यात आला. नाग नदीला अडवून हा तलाव बांधला असून त्यातील पाणी शहरात नेण्यासाठी दगडाचे नळ घातले होते. ब्रिटिश काळात या तलावात सुधारणा करून सायफनच्या तत्वावर पाणीपुरवठा करण्यात आला. नगरपालिका व महानगरपालिका स्थापन झाल्यावर वेळोवेळी या तलावाच्या जलधारणा क्षमतेत वाढ करून पंपाने पाणी काढून पुरविण्यात येई.

अंबाझरी तलावाचे जलधारण क्षेत्र : १५.५४ कि. मी. असून त्यात १८३७ लाख गॅलन पाण्याचा साठा राहू शकतो. तलावाचा बंधारा ९६०.१२ मीटर लांब आणि ९८.७५५ मीटर उंच आहे. नागपूर महानगरपालिकेने या तलावाचे पाणी शुध्द करून वर्षभर पाणीपुरवठ्याची सोय केली आहे. उन्हाळ्याच्या दिवसात पाणीपुरवठा कमी होत असल्यामुळे इतरही योजना राबविण्यात आल्या आहेत. तलावाच्या उत्तरेला असलेल्या अंबाझरी उद्यानातून संपूर्ण तलावाचे विहंगावलोकन करता येते. येथे विविध प्रकारच्या रंगीबेरंगी पुष्पवाटिका लावल्या असून त्याच्यामध्ये असलेल्या हिरवळीच्या मैदानामुळे हरित गालिचा पसरल्यासारखे वाटते. गुलाबी, पिवळ्या, पांढऱ्या गुलाबाची फुले आणि तलावाच्या काठावरील विविध रंगांच्या वनस्पती यांनी या पर्यटन स्थळाचे सौंदर्य वृद्धिंगत केले आहे. छोट्याशा ओढ्यावर बांधलेला झुलता पूल उद्यानाचे आकर्षण वाढवितो. चांदण्या रात्री या उद्यानातील शतपावली रसिक माणसास एका वेगळ्याच सौंदर्यविश्वात नेते. नागपूर महानगरपालिकेने येथे आधुनिक सुखसोयीने सज्ज असे विश्रांतीगृह बांधले असून ते पर्यटकांना व महापालिकेच्या अतिथींना उपलब्ध असते. रविवारी व सुट्ट्यांच्या दिवशी प्रवाशांच्या वाहतुकीसाठी नगर बस सेवा आहे. अंबाझरी उद्यानामध्ये लहान मुलांसाठी मिनी ट्रेन, कोलंबस बोट, डायनॉसोर पियानो, म्युझिक फाऊंटन, चॅनल म्युझिकची व्यवस्था, रेन ट्री, (वर्षाव करणारी झाडी) नौकाविहार व उपहारगृह याच्या उपलब्धतेमुळे हे एक महत्त्वाचे पर्यटनस्थळ झाले आहे. (उपायुक्त, नागपूर महानगरपालिका यांनी दिलेल्या माहिती आधारे.)

शुक्रवार तलाव किंवा गांधीसागर : शहराच्या मध्यभागी चारही बाजूंने बांध घालून तयार केलेला हा तलाव गोंडकालीन आहे. हा तलाव चांद सुलतान (१७०९-१७३५) याने बांधला. तलावाच्या तीन बाजूंने वृक्षांच्या रांगा असून त्याला पश्चिमेकडे एक विस्तृत घाट आहे. तसेच आग्नेय कोपऱ्यात एक छोटा दगडी घाट आहे. नागपूर महानगरपालिकेने हा तलाव सुंदर करण्याच्या अनेक योजना राबविल्या असून त्याची खोली वाढविण्याचे काम केले. हा तलाव पूर्वी कॉटन मार्केटपर्यंत होता असे जुन्या गॅझेटिअरच्या (१९०८)

छायाचित्रावरून दिसते. पण एम्प्रेस मिल (आता बंद पडली आहे), म. फुले भाजीबाजार, गीतामंदिर आणि रमण प्लॅनेटोरियम यांनी मूळ तलावाची जागा व्यापल्यावर अर्ध्या जागेत पश्चिमेकडे घाट बांधल्यावर हा तलाव अर्धा उरला आहे. तलावाच्या मध्यभागी एक बेट असून ते ६०.९६ मीटर रुंद आहे. या बेटावर छोटेसे मंदिर आणि बगीचा आहे. तलावाच्या तीनही बाजुंला विजेच्या खांबाने रोषणाई केली असून दक्षिण बाजुला भगवान झुलेलाल मंदिर, बागेत कारंजे आणि मुलांच्या मनोरंजनाची साधने आहेत. तलावाच्या वाळूवर शिवमंदिर आणि गणपती मंदिर आहे. गणपती मंदिर मुधोजी भोसले याने बांधले आहे. पर्यटकांच्या व पादचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी तिन्ही बाजुला लोखंडी रेलिंग आहे. महानगरपालिकेने या तलावाच्या सौंदर्यीकरणावर बराच पैसा खर्च केला असून अधिक सुधारणेचे प्रयत्न जारी आहेत.

मशिदी : नागपूर शहरामध्ये अनेक मशीदी असून त्यापैकी किल्ला मशीद ही राजा तख्तबुलंद याच्या काळात बांधण्यात आली. या मशीदीचा इ. स. १९९३ मध्ये जीर्णोध्दार करण्यात आला आहे. तुळशीबागेतील मशीद ही नागपुरातील जुन्या मशीदीतील असून त्यावरील शिलालेखावरून ती १६९१ च्या सुमारास बांधल्याची दिसते. मशीदीला असलेला दगडी दरवाजा मात्र नंतरच्या शतकात बसविण्यात आला असावा असे त्यावरील नोंदीवरून वाटते. भालदार पुऱ्यातील मशीद ही शुक्रवारी तळ्याजवळील चौकात आहे. ही भोसले काळात निर्माण झाली असावी. जुम्मा मशीद ही गाडीखाना भागात उभी आहे. येथे ईदच्या दिवशी वर्षातून दोनवेळा नमाज पडण्याची प्रथा आहे. याशिवाय मोमिनपुऱ्यातील इदगा हा गोंड राजा महम्मद सुलेमानशहा याने बांधल्याविषयीची नोंद आहे. मोमिनपुऱ्यातील जामा मशीद ही तिसऱ्या रघुजी भोसले याच्या काळात बांधण्यात आली. ही मशीद १८६७ मध्ये हरियाणातून आलेल्या महम्मद सापुद्दिखान याने बांधली. याचे नव्याने जीर्णोध्दाराचे काम करण्यात आले असून नागपुरातील ही सर्वात मोठी व चांगल्याप्रकारची मशीद आहे. अहल-ए-हादीस ही जामा मशीद मोमिनपुरा भागातच असून नागपुरातील एक स्वतंत्र मशीद म्हणून याची नोंद करता येईल. याशिवाय ताजबाग येथील मशीद, जिल्हे कचेरी मशीद अशा वास्तू शहरात आहेत.

सुफी संत : नागपूरमध्ये बाबा ताजुद्दिन (१८६२ ते १९२५) हे प्रसिध्द सुफी संत होऊन गेले. याशिवाय शाहजलाल उद्दिन शाहहसन, शाह इसरत बदक शानी या सुफी संतांची नोंद घ्यायला हवी.

ताजबाद शरिफ : बाबा ताजुद्दिन ताजुल अवलीया हे एकोणीसाव्या शतकातील संत नागपूरच्या दक्षिणेला स्थायिक झाले. जुन्या नागपूरच्या नैऋत्येस सक्करदरा ओढ्याच्या काठी त्याच नावाच्या वस्तीत त्याचा दर्गा आहे. बाबा ताजुद्दिन मुस्लिम असले तरी हिंदू व मुस्लिम समाजातील लोक त्यांच्या मार्गदर्शनासाठी येत. त्यांची किर्ती पूर्ण विदर्भात पसरली आहे. दर्गा परंपरागत मुस्लिम पध्दतीने बांधला असून प्रशस्त आहे. त्याचा आकार लंबचौकोन असून एका बाजूला २० तर दुसऱ्या बाजूला ५ कमानी आहेत. त्याला चार प्रचंड स्तंभाचा आधार असून वरती चार मिनार आहेत व मध्यभागी

घुमुट आहे. या चार मिनाराखेरीज प्रत्येक बाजुला ४ छोटे मिनार आहेत. असे एकूण १६ मिनार आहेत. या मिनारांच्या उंचीचा घुमट आहे. ताजबाद शरिफच्या कारभारासाठी एक न्यास असून दरवर्षी होणाऱ्या उरुसाची तो व्यवस्था पाहतो.

नागपुरातील चर्च : नागपूर येथे साधारण १५० वर्षांची परंपरा असलेले अनेक महत्त्वपूर्ण चर्च आहेत.

१) **सेन्ट फ्रान्सिस डी सेल्स** किंवा एस. एफ. एस. (कॅथिड्रल) हे कॅथलिक चर्च कामठी रोडवर असून १८४२ मध्ये बांधण्यात आले. डॉ. रिकाज याने १८८७ ते १८९१ या काळात याचा विस्तार व सुशोभीकरण केले. त्यास फ्रान्समधून आणलेल्या ४ व ८ मण वजनाच्या चर्चबेल्स लावण्यात आल्या. सन १९८० मध्ये फादर जेरोम पिंटो यांनी येथील वेदिची पुनर्बांधणी केली. येथील चर्चचे बांधकाम उत्कृष्ट प्रकारचे आहे.

२) **ऑल सेन्स कॅथिड्रल** – १८६३ मध्ये या चर्चची इमारत बांधण्यात आली. पुढे इंडियन पेनिन्सुलर रेल्वेच्या कामानंतर याला स्टेशनचर्च या नावाने ओळखू लागले. दुसऱ्या टप्प्यात या चर्चचे सुशोभीकरण करण्याचे काम १९०५ पर्यंत सुरू होते. चर्चमधील मुख्य वेदि राजस्थानमधील संगमरवरी दगडातील आहे. तत्कालीन व्हाईसरॉय हर्डिंग व त्यांची पत्नी यांनी दिलेल्या देणगीतून ब्रह्मदेशमधून आणलेल्या उत्कृष्ट प्रकारच्या लागडापासून येथे बिशपसाठी व अन्य तीन आसने बनविण्यात आली. ही आसने काष्ठ कलाकृतीचे उत्कृष्ट नमुने म्हणून दाखवण्यात येतात. तिसऱ्या चरणामध्ये या चर्चच्या मुख्य वेदिला लागून उत्तरेकडील भागात १९२६ मध्ये लेडीज चॅपेल जोडण्यात आले. या चर्चमध्ये २९.११.१९७० मध्ये उत्तर भारतातील सहा प्रमुख चर्चचे विलिनीकरण होऊन चर्च ऑफ नॉर्थ इंडियाची स्थापना करण्यात आली व या दृष्टीने या चर्चला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

३) **१८४० चर्च** – याची निर्मिती १८४० मध्ये झाली. कस्तुरचंद पार्कच्या उत्तरेला किंग वे रोडवर हा चर्च असून तो सिताबर्डीच्या जवळ असल्यामुळे त्याला १९१७ पर्यंत सिताबर्डी चर्च म्हणत. पुढे याला १८४० चर्च असे नाव देण्यात आले. नागपुरातील हंसापुरी भागातील चर्च प्लेगच्या साथीनंतर बंद करण्यात येऊन येथील सभासद या चर्चमध्ये प्रार्थना करू लागले. या चर्चचा जीर्णोध्दार १९२६ मध्ये नव्याने करण्यात आला व चर्च भवनास ॲग्नेस हेंडरसरचे नाव देण्यात आले. आता या चर्चच्या आवारात एकूण दोन इमारती दिसतात.

४) **मेथॅडिस्ट चर्च**-या चर्चचे बांधकाम १८८९ मध्ये पूर्ण झाले. त्यावेळी त्यास ४५ हजार रुपये खर्च झाल्याची नोंद उपलब्ध आहे.

५) **सेन्ट थॉमस चर्च**-हे सदर चर्च मंगळवारी बाजाराच्या उत्तरेला आहे. याचे बांधकाम १९२८ मध्ये पूर्ण झाले व त्यास ३५ हजार रुपये खर्च आला.

६) **सेन्ट अँथनी चर्च**-अंजनी येथील भागात हा चर्च आहे. १९३५ मध्ये सेन्ट अँथनी चर्च नावाने हा चर्च भाविकांसाठी खुला करण्यात आला. या वास्तुचे काम ३०.११.१९९७ रोजी नव्याने पूर्ण झाले. यासारखी प्रार्थनास्थळे नागपूरमध्ये असून ते त्यांच्या स्थापत्य परंपरा व विशिष्ट विचारसरणीसाठी प्रसिध्द आहेत.

वनस्पती उद्यान : तेलंगखेडी तलावाच्या उत्तर पश्चिमेला फुटाळा टेकडीवर ५० एकराच्या विस्तीर्ण जमिनीवर वनस्पती उद्यान साकारत आहे. नागपूर या उपराजधानीच्या विकासासाठी शासनाने मंजूर केलेल्या विशेष अनुदानातून हे उद्यान तयार करण्यात येत

आहे. या नाविन्यपूर्ण प्रकल्पाची जबाबदारी डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाने स्वीकारली आहे.

या वैशिष्ट्यपूर्ण वनस्पती उद्यानाच्या नियोजनबध्द विकासासाठी लखनौच्या राष्ट्रीय वनस्पती अनुसंधान संस्थेचे सहकार्य घेण्यात येत आहे. यासाठी सुमारे ३ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. उद्यानाचे वैशिष्ट्य म्हणजे येथे प्रेक्षकांना व पर्यटकांना वनस्पतीचे वैविध्य एकत्र पाहता येईल त्याबरोबरच संशोधकांना एक पर्वणी उपलब्ध होईल. वनस्पतीच्या विविध प्रजातींची आकर्षक मांडणी तसेच रस्त्याच्या दुतर्फा सप्तपर्णी, कांचन, स्पॅथोडिया, गुलमोहर, पेष्टाफोरम, जॅकरांडा, सिता, ओका आणि कॅशीया यासारख्या प्रत्येक मोसमात विविध रंगाच्या छटा देणाऱ्या वृक्षांची लागवड असेल. जपानीज गार्डन, सेंटेड गार्डन (सुगंधी), हर्बल गार्डन, पामेंटस (पामच्या विविध प्रजाती), बांबुसेटम, आर्वीरेटम, लुप्त होणाऱ्या वनस्पतींचा संग्रह, रोपवाटिका, आंबा, चिकूची वंशावेळ, वन, फलवारी आणि विस्तीर्ण हिरवीगार हिरवळ या वनस्पती उद्यानात राहतील. कॉझर्वेटरी, प्लॉट हाऊस आणि प्रयोगशाळा या ठिकाणी पहायला मिळेल.

गोवारी शहीद स्मारक : दि. २३.११.१९९४ रोजी नागपूर विधीमंडळ अधिवेशन काळामध्ये आपल्या मागणीसाठी विधानसभेवर मोर्चा काढण्यात आला व यावेळी पोलीस लाठीमारामध्ये झालेल्या चेंगराचेंगरीत ११५ गोवारी मृत्यू पावले. त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ शासनाने सिताबर्डी येथे शून्य मैलजवळ गोवारी शहीद स्मारक उभारले असून या स्मृतीच्या घटनेची आठवण म्हणून हे स्मारक आधुनिक स्मारकतंत्राच्या दृष्टीने एक उल्लेखनीय स्मृतिस्मारक ठरते. नागपूर त्रिशतब्दी मोहत्सवानिमीत्ताने याचे नव्याने शुशोभीकरण केले आहे.

झीरो माईल स्तंभ : या माईल स्लोटची निर्मीती १९०७ मध्ये झाली. नागपूर शहराची विशेषता म्हणजे सीताबर्डी किल्ल्याच्या पायथ्याशी असलेला झीरो माईल दगड, हे स्थान भारताच्या उत्तर-दक्षिण रेषेच्या मध्यभागी आहे. तसेच हा झीरो माईल दगड पूर्व-पश्चिम रेषेच्या मध्यातही येतो.

रमण-विज्ञान केंद्र : नागपुरातील गांधीसागर तलावाच्या काठावर निर्माण केलेले रमण विज्ञान केंद्र हे तारामंडळाचे दर्शन करविणारे केंद्र आहे. विज्ञान हा क्लिष्ट विषय नसून तो एक मनोरंजक अनुभव आहे. रमत-गमत शिकण्याचा विषय आहे याची प्रचीती येथे येते. इथे असलेली विज्ञानाची उपकरणे कुणीही स्वत: हाताळू शकतो. सुमारे १ कोटी रुपये खर्चून मुख्य इमारतीच्या लगतच एक तारामंडळ उभारण्यात आले आहे. संगणक यंत्राच्या साहाय्याने संपूर्ण तारामंडळाची सहल एक तासात करता येते आणि एका अनोख्या विश्वाची सफर करून आल्याची आपल्याला अनुभूती येते.

मध्य-दक्षिण सांस्कृतिक केंद्र : नागपूर येथे केंद्र सरकारतर्फे मध्य-दक्षिण सांस्कृतिक केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. भारताच्या मध्य-दक्षिण भागातील लोककलावंतांना मंच मिळवून देऊन त्यांची पारंपारिक लोककला जिवंत ठेवण्याचा येथे कसून प्रयत्न केला जातो. विविध लोकसंगीत, नृत्य, लोककला तसेच सांस्कृतिक उत्सव येथे भरविले जातात. नागपूर शहरात कळमना बाजार, नागपूरी संत्री मार्केट, नोगा प्रकल्प, विणकर हस्तकला, पाचपावली पूल हे शहराच्या वैभवात भर टाकणारे असून पर्यटकांना आकर्षित करणारी केंद्रे आहेत.

अनुक्रमणिका

विदर्भ हेरिटेज सोसायटीच्या वतीने गोंड किल्ला, रोमन कॅथॉलिक चर्च, सेंट चार्लस् सेमिनरी, आकाशवाणी भवन, जे. एन. टाटा पारशी स्कूल, उच्च न्यायालय, गोंड किल्ला, कल्याणेश्वर मंदिर या सारख्या काही निवडक वास्तूंची नागपूर शहरातील सांस्कृतिक विरासत (वारसा) म्हणून नोंद करण्यात आलेली आहे.

नांदपूर

नांदपूर (ता. पारशिवनी) : सुरेश कोलितमारा याच स्थानाच्या पंचक्रोशीमध्ये उत्तर दिशेला दोन कि. मी. अंतरावर नांदपूरारिठा या नावाने ओळखला जाणारा एक भाग आहे. येथे असलेल्या वनक्षेत्रात सागवानी झाडांची लागवड करीत असताना येथील पुरातत्व गर्भक्षेत्रामध्ये विटा, खापरे, शाडूच्या मातीच्या वस्तुंचे तुकडे व अन्य काही अवशेष मिळाले. उपलबध झालेले अवशेष हे प्रारंभिक ऐतिहासिककालीन वास्तुचे असावेत तसेच या क्षेत्रात वसाहतीच्या निदर्शक अशा काही सीमाभिंती पण आढळल्या. याच क्षेत्रामध्ये किंरगीछर्रा या नावाने ओळखल्या जाणाऱ्या वसाहतीच्या लगत दक्षिण-पुर्वेस एक कि. मी. च्या अंतरावर विलावकोजी नाल्याजवळ काही प्राचीन वास्तूची साक्ष देणारे विटांचे अवशेष मिळाले आहेत. एकूण कोलितमारा सुरेश या स्थानाच्या पंचक्रोशीमध्ये असलेल्या पुरातत्वीय अवशेषावरून असे वाटते की, या क्षेत्रात वाकाटक व वाकाटकपूर्व काळापासून मानवी वसाहतीचे अस्तित्व होते. तसेच तत्कालीन वास्तूची पण निर्मिती झाली होती. (गजभिये, बा. स. संचालक, पुरातत्व विभाग, महाराष्ट्र शासन यांनी पुरविलेल्या माहिती आधारे.) नांदपूररिठा येथे इ. स. तिसऱ्या-चौथ्या शतकातील एक बौध्द प्रतिमेचा शिरोभाग उपलब्ध झाला. हा शाडूतील (stucco) असून गांधार कलाशैलीचा प्रभाव दर्शवितो. (मेश्राम प्रदिप, शालिग्राम, 'विदर्भात अलीकडे मिळालेले काही बौध्द पुरावशेष', **विदर्भ संशोधन मंडळ** वार्षिक अंक, १९९५, पृ. १६२-६४.)

नैकुंड

नैकुंड : (ता. पारशिवनी २१° २०'उ., ७९° १०'पू.) नागपूरपासून ईशान्येला ४२ किलोमीटर अंतरावर पेंच नदीच्या डाव्या तीरावर नैकुंड वसलेले आहे. या ठिकाणी वस्ती आणि दफने एकाच विभागामध्ये आहेत. टाकळघाटला अशी परिस्थिती नाही. नदीच्या एका तीरावर वस्ती आणि दुसऱ्या तीरावर दफने अशी मांडणी आहे. नैकुंड येथे मात्र वस्तीच्या जवळपास व भोवती दफने असली तरी ती वस्तीत नाहीत. या वस्तीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे वस्तीच्या पांढरीची दोन टेकाडे असून या दोन्ही ठिकाणी महापाषाण संस्कृतीच्या लोकांनी वस्ती केलेली होती. या ठिकाणची दफने शिळावर्तुळे या वर्गाची असून त्यांची संख्या सुमारे पाऊणशे इतकी आहे. दफने आणि वस्ती यांनी जवळजवळ १ लक्ष वर्ग मीटर एवढा प्रदेश व्यापलेला आहे. यापैकी काहींचे उत्खनन १९७८ ते ८० या कालात करण्यात आले. यातील सर्वात मोठ्या शिळावर्तुळाचा व्यास २१.५ मीटर व सर्वात लहान १२.८० मीटर इतका होता.

नैकुंड येथील उत्खननामध्ये महापाषाण संस्कृतीबद्दल अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण पुरावा उपलब्ध झाला. पहिले वैशिष्ट्य असे की दफनांचा आणि वस्तीचा समन्वय कार्बन-१४ पध्दतीनुसार केलेल्या कालमापनानुसार करता आला. वस्ती इसवी पूर्व ७ वे शतक ते इसवीपूर्व ४ थे

शतक या कालात झाली, काही दफनांचा काल इसवीपूर्व ६ वे शतक आहे. या तारखा टाकळघाट येथील याच संस्कृतीच्या तारखांशी मिळत्याजुळत्या आहेत. दुसरे असे की या ठिकाणी वस्तीच्या जवळच स्थानिक कच्च्या लोखंडाचे शुध्द लोखंडामध्ये रुपांतर केले जाई याचा पुरावा या कामाकरिता वापरलेल्या मातीच्या भट्टीसह उपलब्ध झाला. आणखी एक वैशिष्ट्य असे की, वस्तीच्या थरामध्ये वाटाणा, मसूर, उडीद, गहू अशी धान्ये सापडली. याशिवाय येथील लोक मासे आणि डुक्कर, मेंढ्या, सांबर आणि चितळ यांचेही मांस खात असले पाहिजेत असे वस्तीत सापडलेल्या या प्राण्यांच्या हाडांवरून सिध्द झाले.

या लोकांची वस्ती नैसर्गिक काळ्या मातीच्या थरावर झाली. उत्खननामध्ये एका गोल झोपडीचे अवशेष मिळाले. झोपडीचा व्यास ४.६० मीटर इतका असून घरातील जमीन काळ्या जमिनीवर २.५ सेंटीमीटर जाडीचा पक्क्या तपकिरी मातीचा थर घालून व तो चोपून बनविलेली होती. सर्व जमीन चुन्याने सारवलेली होती. झोपडीभोवती लाकडी वासे रोवून त्यावर बहुदा निमुळते व हलके छप्पर घातलेले असावे. झोपडीमध्ये मातीची, काहीशी लंबगोल आकाराची चूल होती. चुलीचा आतील भाग आगीमुळे लाल झालेला होता. चुलीमध्ये बरीचशी राख आणि तिच्या जवळपास अर्धवट जळालेली हरीण, डुक्कर, बोकड यांची हाडे मिळाली. याशिवाय चुलीजवळच गव्हाचे दाणे सापडले. शेजारीच लाल वालुकाश्माचे सुबकपणे बनविलेले बत्ते सापडले. घरातील जमीन वारंवार दुरुस्त करून त्यावर चुन्याचे सारवण देण्याचा प्रघात होता असे दिसते. उत्खननात सापडलेल्या विविध धान्यांचे प्रमाण, पाळीव जनावरांच्या सापडलेल्या हाडांची संख्या, गोल झोपडीचा सर्वसाधारण आकार, वस्तीच्या नजीक उपलब्ध असणारी शेतीयोग्य जमीन आणि अशाच प्रकारच्या झोपड्या बांधून सध्या तेथे राहणाऱ्या आदिवासींच्या कुटुंबातील व्यक्तींची सरासरी संख्या ध्यानात घेऊन नैकुंड येथे महापाषाण संस्कृतीचे सुमारे १००० ते १२०० लोक रहात असावेत, असा अंदाज केला गेला आहे.

या लोकांच्या अन्नपध्दतीबद्दल वर उल्लेख आलेलाच आहे. हे लोक शाकाहारी त्याचप्रमाणे मांसाहारी होते असेही वर नमूद केले आहे. जनावरांच्या काही हाडांवर तोडल्याच्या आणि जाळण्याच्या खुणांमुळे असे विधान करता येते. शेतीसाठी फरे पाडण्यास उपयुक्त ठरतील अशा यंत्रणेचा वापर होत असावा असा अंदाज करण्याजोगा पुरावा जड दगडी कड्यांच्या स्वरूपामध्ये मिळाला. ही कडी दणकट लाकडी काठीवर बसवून व ती काठी बैल अथवा दुसऱ्या मानवी सहाय्यकाच्या मदतीने ओढत नेऊन जमिनीवर फरे पाडले जात. अशा काठीचे टोक काहीसे अणकुचीदार करून ते टणक व्हावे यासाठी थोडेसे अग्नीच्या संपर्कात आनीत असावेत असे अनुमान करता येते. याशिवाय या संस्कृतीच्या लोकांना नांगराचे फाळ, कुदळी आणि लोखंडी खनित्रे (Hoe) माहित होती याचा पुरावा उपलब्ध आहे. खुद्द नैकुंड येथे लोखंडाची खनित्रे सापडली आहेत. आणखी एक बाब येथे नमूद करणे आवश्यक आहे. येथील महापाषाण संस्कृतीची पहिली वस्ती काळ्या जमिनीवर झाली. ही जमीन ऋतुतील हवामानाच्या बदलास एका विशिष्ट तऱ्हेने साथ देते. जमीन ओल जशी टिकवून धरते, तशीच उन्हाळ्यामध्ये फाटते. यामुळे जमिनीला वातावरणातील नायट्रोजनचा पुरवठा नैसर्गिकरित्या होतो. त्यामुळे ही जमीन थोडीशी जरी वरवर नांगरली तरी शेतीस उपयुक्त ठरते. वर उल्लेखिलेल्या बहुतेक पिकांची कापणी फेब्रुवारी-मार्च या उन्हाळ्याच्या सुरुवातीला होते हे

या संदर्भात लक्षात घेणे उचित ठरते. पीक कापणीसाठी वापरले जाणारे लोखंडी विळेही उत्खननात सापडले. हे सध्याच्या विळ्यासारखेच आहेत. बकऱ्या, मेंढ्या आणि म्हैस यांची हाडे सापडल्यामुळे या लोकांच्या आहारात दुधाचाही वापर असावा असे वाटते.

नैकुंड येथील भट्टी : नैकुंडचे महापाषाण संस्कृतीचे लोक लोखंड शुध्द करून त्याच्यापासून शुध्द लोखंडाच्या वस्तू बनवीत असत. याचा पुरावा कच्चे लोखंड शुध्द करण्यास वापरलेली मातीची भट्टी देते. ही भट्टी काहीशा बहिर्गोल विटांसारख्या दिसणाऱ्या मातीच्या वळ्यांनी बांधलेली होती. ही आकाराने गोल असून माथ्याकडे थोडीशी निमुळती होत गेली होती. या भट्टीचा व्यास ३० सेंटीमीटर आणि (सध्याची) उंची २५ सेंटीमीटर होती. चिखलाची वळी अशा प्रकारे एकावर एक ठेवली होती की खालच्या थरातील विटांचा माथा (खोलगट) आणि त्यावरील विटांचे बूड (बहिर्गोल) एकमेकात घट्ट बसावे. या विटा २ सेंटीमीटर जाड असून या भट्टीचा आतील भाग धूर आणि आगीमुळे काळा पडलेला तर बाहेरचा भाग विटकरी रंगाचा होता. भट्टीच्या बुडाला एक भोक होते ज्याच्यातून खंगार आणि जळलेले जळण बाहेर काढता येई. भट्टीच्या जवळ मातीच्या बनविलेल्या, ३.५ सेंटीमीटर व्यासाच्या दोन नळ्या सापडल्या. या नळ्या मातीमध्ये क्वार्ट्झ दगडाचे तुकडे मिसळून केलेल्या होत्या. असे करण्याने या नळ्यांची उष्णता सामावून घेण्याची क्षमता वाढत असे आणि त्या विकृत होत नसत. या नळ्या भात्याला जोडून त्यांच्याद्वारे भट्टीतला विस्तव फुलविला जाई. भट्टीजवळ खंगार आणि जळलेले जळण यांचा फार मोठा साठा सापडला. याशिवाय जवळच लोखंडाचे खनिज आणि लोखंडापासून बनविलेले सळ्यांचे तुकडे सापडले. या भट्टीचा शास्त्रज्ञांनी अभ्यास केल्यानंतर असे मत दिले आहे की, या भट्टीतून एक किलो लोह खनिजापासून सुमारे ३५० ग्रॅम शुध्द लोखंड मिळत होते. एकावेळी या भट्टीमध्ये १० ते १२ किलो लोह-खनिजापासून जवळजवळ ३ किलो शुध्द लोखंड मिळू शकते. ही भट्टी निवासी घरापासून जवळजवळ १२५ मीटर अंतरावर असलेल्या कार्यशाळेत सापडली. महाराष्ट्रामध्ये या संस्कृतीची अशी भट्टी दुसरीकडे अद्याप सापडली नाही. शिवाय वापरलेले लोह-खनीज या भागात आजही उपलब्ध असलेल्या लोह-खनिजाशी तंतोतंत जुळते असे याच्या पृथःकरणावरून दिसून आले. लोखंडाची शुध्दता आणि त्यापासून बनविलेल्या विविध वस्तू तत्कालीन तंत्र-कौशल्याची साक्ष देतात.

लोखंडापासून चपट्या, काटकोन चौकोनी कुऱ्हाडीचे फाळ, राप्या, विविध प्रकारची टोके असलेल्या लांब छिन्या त्याचप्रमाणे उत्खनक, चाकू, कट्यारी, लांब दांड्याचे शूळ, नखण्या, थाळ्या आणि घोड्याच्या तोंडात (लगामाला जोडून) बसविण्यासाठी केलेल्या आडव्या "व्हटाळ्या" बनविल्या जात. लोखंडाप्रमाणेच तांब्याच्या विविध वस्तुही वापरात होत्या. यामध्ये थाळ्या, खोल वाडगे, उचलण्यासाठी बाजूला अर्धगोलाकृती लावलेल्या आडव्या कड्यांचे वाडगे त्याचप्रमाणे लहानलहान तांब्याची बोळकी व बांगड्या यांचा समावेश होतो. याशिवाय घोड्याच्या अंगावर आणि मुखावर तांब्याच्या पत्र्यापासून बनविलेले विविध अलंकार आणि माथ्यावर पक्षी बसविलेल्या झाकण्या दफनामध्ये सापडल्या. अशाच तऱ्हेच्या वस्तू माहूरझरी आणि खापा येथील दफनामध्ये उपलब्ध झाल्या आहेत.

या लोकांची दफने विदर्भातील इतर दफनांप्रमाणेच आहेत. उत्खनित केलेले सर्वात मोठे

शिळावर्तुळ २९ मीटर व्यासाचे तर सर्वात लहान ६ मीटर व्यासाचे होते. दफनासाठी वर्तुळात मांडलेल्या काही शिळांवर गोल, उथळ खळग्यांच्या रांगा केलेल्या आढळल्या. अशा तऱ्हेच्या निशाण्या इतरत्रही सापडलेल्या असल्या तरी त्यांचे प्रयोजन काय असावे हे निश्चित सांगता येत नाही. दफनांमध्ये सापडलेल्या मानवी हाडांचा पुरावा अत्यंत तोकडा आहे, परंतु यातील एका शिळावर्तुळामध्ये सुमारे सात वर्षे वयाच्या एका मुलाच्या जबड्याचे अवशेष, काही दात आणि दाढा यांच्यासकट सापडले. अशा तऱ्हेच्या तोकड्या पुराव्यावरून या लोकांच्या शारीरिक वैशिष्ट्यांची नीटशी कल्पना येत नाही. या दफनांचे, माहूरझरी आणि खापा येथेही आढळून आलेले एक वैशिष्ट्य म्हणजे मृताबरोबर घोड्याची कत्तल करून तो पुरणे हे होय. सापडलेली घोड्यांची हाडे दणकट असली तरी ती संख्येने मात्र कमी आहेत. बळी दिलेले काही घोडे ४ ते ५ वर्षाचे होते. घोड्यांची उपलब्ध असणारी कमी संख्या आणि काही सधन व्यक्तींनाच घोडे बाळगणे वा त्यांचा बळी देणे शक्य असल्यामुळे या बाबतीतील पुरावा फारसा मिळाला नाही. घोड्याच्या अंगावर घालण्यात येणाऱ्या तांब्याच्या पत्र्याच्या दागिन्याचा उल्लेख या आधी आलेला आहे.

या लोकांच्या वापरात पाच वर्गाची मडकी होती. काळी आणि तांबडी, चमकदार काळी, अभ्रकयुक्त लाल, करडी आणि काळी व काळ्या रंगात रंगविलेली तांबडी खापरे हे ते प्रकार होत. आकारांच्या दृष्टीने यांच्यामध्ये फारसे नाविन्य आढळून येत नाही. यातील काळी आणि तांबडी खापरे ५४ टक्के असून ती वस्तीत आणि दफनात दोन्हीकडे सापडली. अभ्रकयुक्त मडकी ३२ टक्के असून ही बहुसंख्य दफनामध्ये सापडली. यांच्यापैकी काहीवर काळ्या रंगाने रेघा काढलेल्या आढळतात. फनेलसारखे तोंड असलेली गोल बुडाची मडकी त्यांचा आकार ताम्रपाषाणयुगीन लहान मुलाच्या दफनामध्ये वापरात असणाऱ्या राखी रंगाच्या मडक्याप्रमाणे आहे आणि परांती हे दोन आकार यामध्ये प्रामुख्याने आढळतात. ही मडकी दफनांमध्ये मोठ्या संख्येने एकत्र ठेवीत. काळ्या रंगात रंगविलेली लाल मडकी फक्त २ टक्के असली तरी त्यांची संख्या वस्तीच्या घरामध्ये मोठी होती. दफनांमध्ये मडकी ही नैकुंड येथे माहूरझरीप्रमाणे सापडली. यांचेवरील चित्रकाम रेघांच्या स्वरूपातले असून काही वेळा जाळीने भरलेले चौकोन, आडवे पट्टे, जाळी, छोट्या निशाणासारखी चित्रकारी, इत्यादी चित्रकाम आढळून येते. हे चित्रकाम बहुतांशी भांड्याच्या बाहेरील भागावर अथवा काठावर केलेले असून गोल लहान कळशा, वाडगे आणि पसरट तोंडाची भांडी हे आकार यामध्ये दिसून येतात.

नैकुंडच्या उत्खननामध्ये महापाषाण संस्कृतीच्या कालातील वस्ती आणि दफने यांचा कालदृष्ट्या त्याचप्रमाणे सांस्कृतिकदृष्ट्या समन्वय घालता आला. आधी उल्लेखिल्याप्रमाणे लोखंड शुध्द करण्याचे तंत्र आणि त्याची पध्दती यांचा अद्वितीय पुरावा येथे मिळाला. शेतीस उपयुक्त ठरणारी अवजारे आणि पिकविलेले धान्यप्रकार यांचाही पुरावा येथे मिळाला. याशिवाय येथे रंगविलेली खापरे मोठ्या प्रमाणावर वापरात होती असे दिसून आले. पेंचसारखी बारमाही नदी, शेतीस उपयुक्त काळी जमीन आणि कच्च्या लोखंडाची उपलब्धी या बाबी लक्षात घेऊन येथे मोठी वस्ती झाली असे स्पष्ट झाले. (देव, एस. बी; ॲण्ड जामखेडकर, अे. पी. **'नैकुंड एक्सकेव्हेशन** (१९७८-८०), आर्किऑलॉजिकल डिपार्टमेंट, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र ॲण्ड डेक्कन कॉलेज, पुणे १९९२ च्या अहवाला आधारे.)

पारडसिंगा

पारडसिंगा (ता. नरखेड) **:** नरखेडच्या दक्षिणेला काटोल-वरुड मार्गावर काटोल पासून १० कि. मी. अंतरावर पारडसिंगा गाव आहे. येथे संत्रा उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. गावामध्ये अनेक विहिरी असून फळबागा मोठ्या प्रमाणात विकसित करण्यात आल्या आहेत. येथे विदेही संत अनुसयामाता यांचे देवस्थान आहे. वीस एकरच्या क्षेत्रामध्ये हे स्थान विकसीत करण्यात आले असून शासनाने पर्यटन शहर म्हणून घोषित केले आहे. पारडसिंगा येथे अनुसयामातेचा जन्म ५ मे १९२७ रोजी झाला. अनुसयामाता ह्या लहानपणापासूनच संत म्हणून प्रसिध्दीस आल्या. त्यांचा विवाह जगलूराजाराम खंडाईत यांच्याशी झाला होता. त्यांच्याकडे संत्रा व्यापार होता. अनुसयामाता ह्या १९९२ पर्यंत गावातील एका मंदिरात निवास करून होत्या. अनुसयामाता १० जानेवारी १९९७ मध्ये परलोकवासी झाल्या. एक सिध्द संत म्हणून त्यांची ख्याती असून त्यांच्याविषयी जनमानसात श्रध्दा असून त्यामुळे या स्थानाचा मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे. येथील देवस्थानामध्ये स्नानगृह, साईदरबार, समाधीभूमी ही स्थळे असून अनुसयामातेची दीड मीटर उंचीची संगमरवरी मूर्ती बसविण्यात आली आहे. या परिसरातील वनश्रीचा विकास करण्यात आला आहे. या देवस्थानालगत संत चिंतामणी महाराज यांचे शिवालय आहे.

पारशिवनी

पारशिवनी (ता. पारशिवनी २१° २०' उ., ७०° ०५' पू.**) :** नागपूरपासून ६० कि. मी. अंतरावर तहसिल कार्यालयाचे प्रमुख मुख्यालय असलेले हे स्थान असून याठिकाणी त्र्यंबकेश्वर मंदिर व केशवस्वामी मंदिर ही दोन प्रमुख यादवकालीन मंदिरे आहेत.

त्र्यंबकेश्वर मंदिर : हे मंदिर पूर्वाभिमूख असून एका सीमाभिंतीच्या आतमध्ये बांधले आहे. मंदिर उंच अधिष्ठानावर उभे असून त्रिदल पध्दतीचे वितान असलेले आहे. गर्भगृह पाताळलिंगी असून गर्भगृहाचे प्रवेशद्वार तीन शाखांचे आहे. वाद्यवृंद शाखा, स्तंभ शाखा, आणि पुष्पलता शाखा असून त्यातील स्तंभ शाखा उठावात आहे. मंडोवरावर किर्तीमुख असून ललाटबिंबावर गणेशांकित आहे. उत्तरंग शिळेवर असलेल्या तीन देवकोष्ठामध्ये योगी व किर्तीमुख दाखविले आहेत. गाभाऱ्यात एक व त्यापुढील अंतराळात दोन देवकोष्ठ आहेत. अंतराळापुढे सभामंडप असून तो १२ स्तंभावर उभा आहे. चौरसाकार मंडपात वितानाच्या प्रारंभी अष्टकोनी आकार तयार करून त्यावर करोटक वितान उभारले आहे. सभामंडपाच्या डाव्या व उजव्या बाजूस अंतराळ व गर्भगृह अशी रचना करण्यात आली आहे. ही रचना मुख्य गर्भगृह व अंतराळासारखीच आहे. याच्या द्वारशाखेवर शैव द्वारपाल दाखविले आहेत. सभामंडपाच्या पुढे मुखमंडप आहे. दोन पीठावर उभारण्यात आलेले हे मंदिर आहे. जंघा भागावर भौमितिक नक्षी असून प्रत्येक गाभाऱ्यावर एक अशी तीन शिखरे आहेत. नागर शैलीतील शिखरांचे हे एक उत्तम उदाहरण आहे. प्रत्येक शिखरावर आमलक व कलश आहेत. जंघा भागावर असलेल्या भद्रांच्यामध्ये विष्णु, शिव, चामुंडा यांच्या प्रतिमा असून काही भद्र रिक्त आहेत. मंदिराचे स्तंभ हे नागबंध असलेले आहेत. स्तंभ मध्यावर भौमितिक नक्षी

आहे. सभामंडपातील मुख्य स्तंभ हे जोडस्तंभ असून एकूण हे मंदिर यादवकालीन असून साधारणपणे बाराव्या शतकातील आहे. भोसले काळात अठराव्या शतकाच्या प्रारंभी काही दशकात येथील एका शिखराची दुरुस्ती करण्यात आली असावी. तसेच येथे एक समाधी बांधण्यात आली असे दिसते. हे काम चुन्यात केलेले आहे. मंदिराच्या सभामंडपात विष्णुची एक उत्कृष्ट मूर्ती ठेवलेली आहे. ही मूर्ती दक्षिणकरक्रमाने पद्म, शंख, चक्र आणि गदाधारी आहे.

केशवस्वामी मंदिर : त्र्यंबकेश्वर मंदिरापासून जवळच केशवस्वामी मंदिर असून मंदिर एका सीमाभिंतीच्या आत उंच चौथऱ्यावर उभारलेले आहे. याची रचना काहीशी वेगळ्या पध्दतीची आहे. त्र्यंबकेश्वर मंदिराप्रमाणे हे त्रिदल पध्दतीचे नसून गर्भगृह त्यासमोरील अंतराळ, चौरसाकार गुढमंडप आणि त्यापुढील मुख्यमंडप अशी याची रचना आहे. गर्भगृहाचा बाह्यभाग वगळता पुढील जंघा भाग अत्यंत साधा आहे. एक भौमितिक पट्टाशिवाय अन्य कोरीव काम दिसत नाही. गर्भगृहाच्या अधिष्ठानास पाच थर असून हे थर गज, व्याल, भौमितीक पट्ट यासारखे आहेत. गर्भगृहाच्या जंघा भागावर दोन पट्ट असून त्यावर सूरसुंदरी व देवतांच्या मूर्ती आहेत. येथे असलेल्या भद्रावर एकावर एक दोन देवकोष्ठ दाखविले आहेत. मंदिरावर नागर शिखर हे शुकनासेसह आहे. सभामंडपाच्या पुढील भागावर फंसाना पध्दतीचे शिखर आहे. या मंदिराचे दुसरे एक वैशिष्ट्य म्हणजे आयताकार मुखमंडपावर शंक्वाकृती फंसाना पध्दतीची तीन लहान शिखरे आहेत. गाभाऱ्यामध्ये विष्णु मूर्ती असून दक्षिणकरक्रमाने गदा, चक्र, शंख व पद्म धारण केलेली समभंगात ही मूर्ती आहे. करंडक मुगुट असलेली ही मूर्ती मात्र उत्तरकालीन असावी. कदाचित मूळात पाताळलिंगी असलेला गाभारा भर घालून नंतर बंद करण्यात आला असावा असे दिसते. द्वारशाखा तीन शाखांनी युक्त असून त्यावर भौमितीक नक्षी दर्शविली आहे. येथे स्तंभशाखा नाही हे विशेष. उत्तरंगावर असलेले शिल्पपट आता सेंदुर लावल्यामुळे झाकले गेले आहेत. द्वारशाखेच्या दोन्ही बाजूस स्त्री-पुरुषांचे एक युगुल दाखविले आहे. मंडोरकावर कीर्तीमुख असून ललाटबिंबावर गणेश असावा. सभामंडप हा सोळा स्तंभानी युक्त असून त्यावर स्तंभ मध्यावर भौमितीक नक्षी आहे. तत्कालीन मंदिराच्या तुलनेत फारसे शिल्पांकन नसलेले साधे पण भक्कम मंदिर आहे. सभामंडपात एक विष्णु मूर्ती ठेवलेली असून प्रभावळयुक्त असलेली ही मूर्ती काहीशी खंडीत आहे. दशावतार आणि गंधर्व, यक्ष, अप्सरा, मगर, व्याल अशी शिल्पे प्रभावळीवर आहेत. मूर्तीच्या पायालगत चावरीधारीणी सेवक तसेच लक्ष्मी दाखवली आहे. वनमालायुक्त सालंकृत अशी ही मूर्ती असून ती निश्चितपणे यादवकालीन आहे. केशवस्वामी मंदिराची भोसले काळामध्ये पुन्हा एकदा दुरुस्ती झाली असावी असे दिसते. अर्थात ही मूळ मंदिरे यादवकालीन आहेत. (विभागाने केलेल्या सर्व्हेक्षण आधारे, जून २००२.)

पांढराबोडी

पांढराबोडी : पूर्वी हे गाव ओसाड होते. शासनाने या क्षेत्रात ११६१.२५ एकरामध्ये ३७.५ लाख रुपये खर्चून एक तलाव बांधला आहे. या तलावातून १२७२ हेक्टर जमीन ओलिताखाली आली आहे. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** महाराष्ट्र स्टेट, बॉम्बे, १९६६, पृ. ७६१.)

पाटणसावंगी

पाटणसावंगी (ता. सावनेर) : कोलार आणि चंद्रभागा नदीच्या संगमावर वसले असून नागपूर-छिंदवडा मार्गावरील एक मोठे खेडे आहे. नागपूरच्या वायव्येला २४.१४ कि. मी. अंतरावर आहे. येथे एका किल्ल्याचे अवशेष आहेत. गोंड राजा चांद सुलतान याचा दासीपुत्र वलीशहा व राणी रतनकुवर यांच्यात येथे झालेल्या लढाईत १२,००० लोक मारले गेले हा संघर्ष इ. स. १७४२ मध्ये झाला अशी नोंद आहे. रघुजीने गोंड दिवाण रघुनाथ सिंग याचे बंड मोडून काढले व भोसल्यांची पागा तेथे ठेवली. येथे हातमाग उद्योग प्रगत असून कोष्टी व रंगारी जातींच्या लोकांची वस्ती आहे. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** महाराष्ट्र स्टेट, बॉम्बे, १९६६, पृ. ७६२.)

पिंपरडोळ

पिंपरडोळ : (ता. उमरेड २०°५०' उ., ७०°१५' पू.) उमरेड-मकरधोकडा रस्त्यावर पिंपरडोळची टेकडी असून, टेकडी सर्वसाधारणपणे ६१ ते ७६ मीटर उंच असून घनदाट जंगलानी व्यापलेली आहे. येथे डोंगर उतारावर पाच शैलाश्रये आहेत. त्यातील एक नैसर्गिक, एक अर्ध नैसर्गिक व तिन पूर्ण कृत्रिम आहेत. यातील एक वैशिष्ट्य म्हणजे दोन शैलाश्रये गजपृष्ठाकार असून मध्यभागी उंच व दोन बाजूला ठेंगणी आहेत. छिन्नी हातोड्यांनी कोरल्याचे पुरावे स्पष्ट दिसतात. ही शैलाश्रये लोहयुगीन काळातील असावीत. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे चित्र अथवा शिलाअक्षरे नाहीत. परंतु हिंस्त्र श्वापदापासून संरक्षण मिळावे म्हणून समपातळीपासून सुमारे १.५ मीटर उंचीवर ठेवण असून एखाद्या कोनाड्यासारखी त्यांची रचना आहे. या व्यतिरिक्त बाकीच्या दोन शैलकृती मात्र ऐतिहासिक काळातील असाव्यात. यापैकी एका शैलाश्रयाचा व्हरांडा अतिभव्य असून एका बाजूने त्यास नैसर्गिक प्रवेशमार्ग आहे. तर आतील बाजूस सुमारे ७.४ चौ. मीटर क्षेत्रफळाचा चौरसाकार कक्ष आहे. दुसरे शैलाश्रय आकाराने लहान असून अत्यंत जीर्ण व पुसट अशी शिलाक्षरे तीन ओळीत कोरलेली तर तळभाग खडबडीत आहे. या समुहातील गुहा गजपृष्ठाकार आणि समतल वितान असलेल्या अशा दोन गटात मोडतात. (चितळे, श्रीपाद केशव, 'नागपूर जिल्ह्यातील कृत्रिम शैलाश्रेय', **विदर्भ संशोधन मंडळ**, नागपूर वार्षिक १९८७, पृ. १७०-७१ व चितळे श्रीपाद **विदर्भातील कोरीव गुंफा** नागपूर, २००२, पृ. ४७.)

पुलर लेणी

पुलर येथील लेणी (चांडाळागुंफा) : विदर्भात नागपूरपासून ५५ कि. मी. अंतरावर चंढाळ्याच्या जंगलात इतिहासकाळाच्या प्रारंभीची काही लेणी सापडली आहेत. दुसऱ्या लेण्यांमध्ये अगदी सुरुवातीच्या ब्राह्मी लिपीतील शिलालेख आहेत. या लिपीच्या आणि अक्षरखुदाईच्या पध्दतीवरून शां. भा. देव यांनी ही लेणी इ. स. पूर्व तिसऱ्या शतकातील असावीत असा निष्कर्ष काढला. ही लेणी आकाराने खूपच लहान आहेत. या लेण्यांजवळ कोणतीही वस्ती (गाव किंवा वाडी) नाही. लेण्यावर कोणतीही धार्मिक प्रयोजने कोरलेली नाहीत की स्तूप अथवा स्मृतिकरंडकासारखे अवशेषही येथे आढळून येत नाहीत. या

लेण्यांमध्ये हीनयान परिव्राजक राहत असावेत असा प्रा. देव यांचा होरा आहे. चंडाळा अरण्य भंडारा जिल्ह्यातील पवनीपासून फारसे लांब नाही. पवनी हे एक महत्त्वाचे बौध्द केंद्र होते. तेथे एक मोठ्या आकाराचा स्तूप असून त्याच्या सभोवताली भिक्षूंच्या वास्तव्याचे विटांनी बांधण्यात आलेले मोठे संकुल होते. आज या संकुलाचे अवशेष अत्यंत विखुरलेल्या स्थितीत आढळतात. त्यामुळे देव यांनी काढलेला निष्कर्ष योग्य वाटतो. इ. स. पूर्वीची अशी लेणी फारच अत्यल्प प्रमाणात असल्यामुळे या लेण्यांचा येथे उल्लेख केला आहे. या लेण्यांमुळे शैलगृहे ही केवळ पश्चिम महाराष्ट्राचीच मक्तेदारी नव्हती हे स्पष्ट होईल. **(राज्य गॅझेटिअर : स्थापत्य व कला,** (खंड १, भाग २) महाराष्ट्र शासन, मुंबई २००२, पृ. २६ आणि चितळे, श्रीपाद **विदर्भातील कोरीव गुंफा,** नागपूर २००२, पृ. ४३ ते ४५.)

जगनकोप शैलाशय : चांडाळा जंगलात हा गुंफासमूह असून वालुकाश्मात तो कोरला आहे. येथे प्रस्तर तासून एक चौरस जमीन तयार केली आहे. लगतच एक एकाश्म गुंफा कोरलेली असून तेथे शिवपंचायतन आहे.

किटाळीच्या सातभोकी गुंफा : पूलरच्यालगत पण किटाळीच्या जंगल क्षेत्रात ईशान्येस ४ कि. मी. अंतरावर असलेल्या टेकडीत दोन मुख्य भागात हा गुंफासमूह असून एकूण सात लहानलहान कक्षाप्रमाणे गुंफा कोरल्या आहेत. एका गुंफेवरून खाली उतरण्यासाठी एक गवाक्ष ठेवले आहे. एका अर्धवर्तुळाकार प्रस्तरामध्येच ह्या सात गुंफा कोरल्याने यांना सातभोकी गुंफा म्हणतात. नागपूर जिल्ह्यामध्ये चांडाळा, जगनकोप, किटाळीच्या सातभोकी गुंफा याशिवाय रामटेक, गडपायली, पिप्परडोल, गायडोंगरी, भिवकुंड आणि भुयारी या गुहांची माहिती नव्याने विदर्भातील कोरीव गुंफांच्या संदर्भात उपलब्ध होत आहे. (चितळे, श्रीपाद केशव, **विदर्भातील कोरीव गुंफा,** नागपूर, २००२, पृ. ४० ते ४५.)

बडेगाव

बडेगाव : (ता. सावनेर) नागपूरपासून ४०.२३ कि. मी. व खाप्यापासून उत्तरेला ८.०४ कि. मी. असलेल्या या गावात विठ्ठल रखुमाईचे एक सुरेख मंदिर आहे. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** महाराष्ट्र स्टेट, बॉम्बे, १९६६, पृ. ६९७.)

बुटीबोरी

बुटीबोरी : (ता. हिंगणा) हे गाव जबलपूर-मुंबई राष्ट्रीय महामार्ग क्र. ७, मुंबई-कलकत्ता रेल्वेमार्गालगत वसले आहे. हे स्थान भोसलेंच्या काळात विकसित झाले असून बुटी हे एक नामवंत सावकार होवून गेले. येथे यांची शेती होती यावरून या स्थानाला बुटीबोरी हे नाव पडले. या स्थानाला बावणे वकील यांची बोरी पण म्हणतात. जाटांची सत्ता येथे होती. जाटांच्या काही समाध्या येथे आहेत. येथे मुरलीधर व जैन मंदिर आहे. बोरी या स्थानालगत एका टेकडीवर असलेल्या किल्ल्यामध्ये प्राथमिक शाळा आहे. इंग्रजांच्या काळात उभारण्यात आलेल्या पोलीस स्टेशनची जुनी वास्तु आहे. या स्थानालगत नागपूर-वर्धा मार्गावर बुटीबोरी ही पंचतारांकित औद्योगिक वसाहत शासनाने जाणीवपूर्वक विकसित केली आहे. २३१२ हेक्टरचे या वसाहतीचे क्षेत्र असून २७० हेक्टर क्षेत्र औद्योगिकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे २२० के. व्ही. आणि ३३ के. व्ही. असे विद्युत उपकेंद्र येथे कार्यान्वित आहे. याशिवाय ४.५० कि. मी. ची पाईपलाईन टाकून

वढगाव आणि वेणा प्रकल्पातून येथे पाणी उपलब्ध करून देण्यात आले आहे. येथे एकूण २४ मोठे उद्योग आणि ७५ लघुउद्योग कार्यान्वित आहेत. येथील इन्डोरमा सिंथटिक वूडवर्क (इंडिया) लि. कंपनीचा कारखाना कार्यान्वित आहे.

बेला

बेला : (ता. उमरेड, २१°०५' उ., ७९°३५' पू.) मध्य रेल्वेच्या मार्गावरील बोरी या स्थानकापासून १७.७० कि. मी. वर असून वेणा नदी किनाऱ्यावर वसलेले आहे. येथील दत्तमंदिर हे ग्रामस्थांचे श्रध्दास्थान आहे. दत्तजयंती उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होतो. यावेळी दत्तात्रयाची मूर्ती व लाकडी घोडा रथातून मिरवतात. मिरवणूकीमध्ये विविध प्रकारची वाद्ये वाजवितात. यावेळी शोभेच्या दारूची रोषणाई असते. याच उत्सवाच्या वेळी भरणाऱ्या यात्रेत शेतीविषयक अवजारे, रेंगी, खेळणी विक्रीसाठी येतात. पूर्वी हे गाव नागवेलीचे पाणमळे, घोंगडी, नेवार टेप उत्पादनासाठी प्रसिध्द होते. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** महाराष्ट्र स्टेट, बॉम्बे, १९६६, पृ. ६९७.)

बोरगाव

बोरगाव : (ता. नागपूर मधील उजाडगाव) जुनापानी, माहूरझरीप्रमाणेच, नागपूरपासून पश्चिमेस ६.४३ किलोमीटरवर बोरगाव हे उजाड खेडे आहे. तथापि महापाषाण युगीन स्थळ म्हणून महत्त्वाचे आहे. या ठिकाणी आजुबाजूला फारशा टेकड्या नसल्या तरी सर्वसाधारणपणे कातळावर मातीचा निक्षेप फारसा नसल्याने ठिकठिकाणी खडक उघडे पडलेले आहेत. बोरगाव ही केवळ महापाषण संस्कृतीची दफनभूमीच आहे. या ठिकाणी जवळजवळ ५० शिळावर्तुळे आहेत. यापैकी काही शिळावर्तुळांचे उत्खनन १९८०-८१ साली करण्यात आले. सर्वात मोठे शिळावर्तुळ १६.५ मीटर व्यासाचे असून सर्वात लहान ५ मीटरचे आहे.

या दफनांच्या उत्खननामध्ये मानवी अवशेषांचा फारसा पुरावा मिळाला नाही. फक्त मानवी दात सापडले. मात्र मृताबरोबर पुरलेल्या विविध वस्तू सापडल्या. यामध्ये लोखंडी विळे, छिन्न्या, राप्या, कुऱ्हाडी, त्रिशूळ, बाणाग्रे, नखण्या इत्यादी बरोबरच मोराची आकृती माथ्यावर लावलेल्या व माथ्याकडे निमुळत्या होत जाणाऱ्या तांब्याच्या झाकण्या, थाळ्या आणि जाड कडी मिळाली. दफनात इतरत्र सापडलेली सर्व वर्गाची खापरे येथेही ठेवलेली आढळतात, मात्र काळ्या रंगात चित्रकारी केलेली खापरे सापडली नाहीत. अलंकारामध्ये सोन्याची कर्णभूषणे त्याचप्रमाणे कार्नेलियन दगडाचे शेकडो मणी सापडले. यापैकी काहींवर पांढऱ्या रंगात पक्की नक्षी केलेली होती. काही दफनात दगडी बत्तेही मृताच्या अवशेषाबरोबर ठेवलेले होते. यातील एका दफनामध्ये, एका प्रचंड अखंड शिळेतून कोरलेला काटकोन-चौकोनी हौद शिळावर्तुळात मधोमध ठेवलेला आढळला. हा छिन्न्यांच्या साहाय्याने घडविलेला होता हे यावरील खुणावरून स्पष्ट झाले. याची लांबी १५३ सेंटीमीटर, रुंदी ८२ सेंटीमीटर आणि खोली ७६ सेंटीमीटर असून त्याची जास्तीत जास्त जाडी २० सेंटीमीटर आहे. याच्या तळाच्या आतल्या पृष्ठभागावर तीन काहीसे गोल आणि उथळ खड्डे केलेले आहेत. मात्र ते आरपार नाहीत. याच्यावर कसलेही झाकण नव्हते. या हौदाचा नेमका उपयोग दफनाच्या संदर्भात काय होता हे सांगणे कठीण आहे. हौदामध्ये केवळ माती सापडली. मृताला किंवा मृताचे

अवशेष ठेवण्यासाठी याचा पेटिकेसारखा उपयोग केला जात असावा किंवा कसे हे स्पष्ट होत नाही.

या दफनांमध्ये चित्रकारी केलेली खापरे सापडली नाहीत व चार खुरांचा दगडी पाटा आणि त्याबरोबर गोल दंडाकृती वरवंटा सापडल्याने ही दफने विदर्भातील महापाषाण संस्कृतीच्या उत्तर कालातील असावीत असे दिसते. **(इंडियन आर्किऑलॉजी-अ रिव्हिव,** (१९८०-८१), आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, न्यू दिल्ली मधील नोंदी आधारे आणि देव, शां. भां. **महाराष्ट्राचा इतिहास, (खंड पहिला, भाग-एक,) प्रागैतिहासिक महाराष्ट्र**, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई २००२ मधील नोंदीद्वारे.)

बोरी

बोरी : (ता. नागपूर २०°५०' उ. ७९°००' पू.) नागपूरच्या नैऋत्येस ३२.१८ कि. मी. वर हे मध्य रेल्वे मार्गावरील एक रेल्वे स्थानक असून हे वुन्ना नदी किनाऱ्यावर वसलेले आहे. जवळपासची शेती सुपीक असूनसुध्दा दळणवळणाच्या अभावी या शहराची फारशी वाढ झालेली नाही. भोसले राजवटीच्या उत्तरार्धात लोधीखान नावाच्या पठाण सरदाराने हे वसविले. पेंढाऱ्यांनी या गावावर स्वारी केली त्यावेळी त्याने "गोऱ्हा" देव या ग्रामदेवतेला आपली तलवार अर्पन केली असता तलवारीच्या तेजाने गाव विजेच्या झोताप्रमाणे लकलकला त्यामुळे पेंढारी पळून गेले. अशी कथा सांगतात. आजूबाजूला विपूल प्रमाणात असलेल्या बोरांच्या झाडावरून या गावास "बोरी" हे नाव पडले. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** महाराष्ट्र स्टेट, बॉम्बे, १९६६, पृ. ६९८-९९.) येथून जवळच ९.६५६ कि. मी. वर ठाणा येथे एक रोमन कॅथलिक मिशन असून त्यामधून अनेक मुलामुलींना प्रशिक्षण दिले जाते.

भागीमाहरी

भागीमाहरी : (ता. पारशिवनी, २१°२०' उ., ७८°५०' पू.) नागपूरच्या उत्तरेस ४५ किलोमीटर अंतरावर कोलार नदीच्या काठी नागपूर जिल्ह्यात भागीमाहरी हे एक खेडे आहे. वळणे घेत जाणारी नदी हिरव्या-करड्या टेकड्या आणि सभोवार झाडी यामुळे हा परिसर देखणा वाटतो. नैकुंडप्रमाणेच येथेही दफने आणि वस्ती या दोहोंचे अवशेष उपलब्ध आहेत. भागीमाहरीला जवळजवळ ७० शिळावर्तुळे असून पांढरीची विस्तृत अशी दोन टेकाडे आहेत. वस्तीची टेकाडे नदीला लागूनच आहेत, परंतु दफने मात्र वस्तीपासून अलग आणि सपाट उंचवट्यावर योजलेली आहेत. या दोन्हींचे उत्खनन १९८२-८४ आणि त्या नंतरही १९९०-९१ व १९९१-९२ साली विस्तृत प्रमाणात करण्यात आले.

भागीमाहरी उत्खनन अनेक दृष्टीने उल्लेखनीय ठरलेले आहे. टाकळघाट, खैरवाडा आणि नैकुंडप्रमाणे येथेही दफने आणि वस्ती यांचा समन्वय असल्याचे स्पष्ट झाले. येथे उपलब्ध झालेल्या कार्बन-१४ तारखानुसार येथील वस्त्यांची कालमर्यादा इसवीपूर्व ८ वे शतक ते इसवीपूर्व ५ वे शतक अशी निश्चित करता आली.

इसवीपूर्व ८ व्या-७ व्या शतकात वस्तीचे स्वरूप भरभराटीचे होते असे स्पष्ट झाले. सर्वसाधारणपणे घरे गोल आकाराची असून त्यांचा व्यास सव्वातीन ते पावणेचार मीटर

या दरम्यान होता. झोपडीच्या कडेने लाकडी वासे रोवून त्यावर निमुळते छप्पर घातले जाई. ही घरे कुडाची होती आणि घरातील जमिनी पक्क्या काळ्या मातीच्या थरावर तपकिरी रंगाची माती घालून त्या चोपून आणि चुन्याने सारवून तयार केलेल्या होत्या. जमिनीची देखभाल आणि सारवण वारंवार केले जात असे. याकरिता लागणारा चुना तयार करण्यासाठी लागणारी मातीची आणि दगडाची भट्टी एका घराच्या अवशेषामध्ये सापडली. हा चुना नदीत सापडणाऱ्या शिंपल्यांपासून केला जात असे. ही घरे आगीमुळे अनेक वेळा नष्ट होत असत असे उत्खननात सापडलेल्या मातीच्या भिंतीच्या जळालेल्या डबरावरून स्पष्ट झाले. अशा घरामध्ये अर्धवर्तुळाकृती मातीच्या चुलींचा वापर होत होता. चुलीच्या शेजारी आणि घरातील जमिनीवर जळलेला तांदूळ, सातू, रानज्वारी, वाटाणे, मसूर, तृणधान्ये, हुलगे, वाल, उडीद, मूग इत्यादी धान्ये सापडली, त्याचप्रमाणे गायी, बैल, शेळ्या-मेंढ्या आणि डुकरे यांची हाडे मिळाली. यातील काही जळलेल्या अवस्थेमध्ये होती. येथील वस्तीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे वस्तीच्या सुरुवातीच्या काळात पक्ष्यांची हाडे मोठ्या संख्येने सापडली. यातील काही हाडांवर तासून आणि छिलून प्रक्रिया केल्याचे दिसून आले. यांचा सुई, दाभण अथवा टोचे असा वापर होत असावा, असा पुरावा या संस्कृतीच्या इतर स्थली विदर्भात मिळालेला नाही.

या लोकांच्या वापरामध्ये नैकुंड, टाकळघाट आणि खैरवाडा येथे प्रचलित असलेली विविध वर्गाची मडकी होती. याशिवाय तांबड्या पृष्ठभागावर काळ्या रंगात चित्रकारी केलेली मडकीही वापरली जात असत. येथे महापाषाण संस्कृतीच्या वस्तीच्या शेवटीशेवटी अशी रंगीत खापारे वापरातून कमी झाली, असे आढळून आले.

वस्तीमध्ये लोखंडाच्या आणि तांब्याच्या विविध वस्तू सापडल्या. यामध्ये चपट्या कुऱ्हाडी, सुऱ्या, कट्यारी बाणाग्रे व पळ्या सापडल्या. याशिवाय तांब्याच्या जाड बांगड्याही उपलब्ध झाल्या.

भागीमाहरी येथील दफने वरवर इतर शिळावर्तुळांप्रमाणे दिसत असली तरी प्रत्यक्ष उत्खननामध्ये वर्तुळात वेगवेगळ्या रचनांची निर्मिती केलेली दिसून आली, हे येथील दफनांचे वैशिष्ट्य समजावे लागेल. काही शिळावर्तुळांमध्ये मधोमध मध्यम आकाराच्या दगडांच्या सहाय्याने एक काटकोन चौकोन तयार करून, त्याच्या मधोमध अशाच दगडांनी दुभाजक करून दोन चौरस निर्माण केलेले होते. या चौरसाकडे जाण्यासाठी काळी माती आणि त्यात छोट्या आकाराचे गोटे मिसळून त्यांच्या सहाय्याने अर्धामीटर रुंदीचा मार्ग तयार केलेला होता. दुसऱ्या एका वर्तुळामध्ये, बरोबर केंद्रजागी मध्यम आकाराच्या गोट्यांच्या सहाय्याने एक अपूर्ण वर्तुळ योजले होते. हे वर्तुळ दक्षिणेकडे खुले होते. सर्व गोटे काळ्या मातीमध्ये बसविले होते. तिसऱ्या एका प्रकारात शिळावर्तुळाच्या मधोमध गोंडवन वर्गाची एक प्रचंड शिळा काहीशी कलत्या अवस्थेमध्ये बसविली होती. उत्खनित दफनामध्ये संपूर्ण सांगाड्याऐवजी काही मानवी लांब हाडे आणि दात एवढेच सापडले. काही दफनांमध्ये मृताबरोबर घोड्याचेही अवशेष पुरलेले होते. हा पुरावा टाकळघाट-खापा, माहूरझरी, नैकुंड, खैरवाडा येथील पुराव्याशी मिळताजुळता आहे. मृताबरोबर लोखंडी चपट्या कुऱ्हाडी, बाणाग्रे, कट्यारी त्याचप्रमाणे तांब्याच्या बांगड्या आणि अलंकृत केलेले तांब्याच्या झाकण्यांचे वरचे भाग

मिळाले. एका दफनात तर हाताच्या हाडाभोवती तांब्याच्या अठ्ठावीस जाड बांगड्या सापडल्या. याशिवाय वस्तीमध्ये सापडलेली विविध वर्गाची मडकीही दफनात मोठ्या संख्येने सापडली. यामध्ये काळी-आणि-तांबडी व अभ्रकयुक्त तांबडी मडकी संख्येने जास्त होती.

भागीमाहरी येथे दफनांच्या पध्दतीमध्ये नवनवीन रचना दिसून आल्या. हे लोक सधन शेतकरी असले पाहिजेत असे विविध धान्यावरून म्हणता येते. **(इंडियन आर्किऑलॉजी : अ रिव्हिव** : (१९८२-८३, १९८३-८४). आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, न्यू दिल्ली मधील नोंदी आधारे आणि देव, शां. भा. **महाराष्ट्राचा इतिहास, (खंड पहिला, भाग-१), प्रागैतिहासिक महाराष्ट्र**, मुंबई महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, २००२ मधील नोंदीद्वारे.)

भिवकुंड

भिवकुंड : (ता. कुही, २१°२०' उ., ७७°५५' पू.) कुहीपासून २२ कि. मी. वर असून उमरेडच्या ईशान्येस ३५.४० कि. मी. अंतरावर आहे. भिवकुंड हे नाव भिमकुंड या शब्दाचा अपभ्रंश आहे. या स्थानालगत तीन गुहांचा एक समूह असून त्यामध्ये ओबड-धोबड आकारातील सहा मूर्ती आहेत. स्थानिक समजुतीप्रमाणे पांडव वनवासात असताना येथे काही काळ वास्तव्य करून होते. या गुहा असलेल्या टेकडीच्या पायथ्यालगत एक जलाशय आहे. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** महाराष्ट्र स्टेट, बॉम्बे, १९६६, पृ. ६९७-९८.)

भिवगड

भिवगड : (ता. उमरेड) नागपूरच्या उत्तरेस २९ कि. मी. पेंच नदीच्या किनाऱ्यावर असून गावाजवळच्या एका टेकडीवर जून्या किल्ल्याचे अवशेष आहेत. टेकडीच्या माथ्यावर मोठमोठ्या दगडांच्या भिंती आहेत. टेकडीवर जाणाऱ्या वाटेवर संरक्षणाच्या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण कडे बांधलेले असून हे कठडे बांधण्याचे कौशल्य गवळी लोकांचे आहे असे लोक मानतात. येथे एक भिवसेनाचे मंदिर असून जवळच बारमाही पाणी असलेली ३.०४ मीटर खोल व ३.०४ मीटर रुंद विहिर आहे. येथे चैत्र महिन्यात कृष्ण पंचमीला यात्रा भरते. यात्रेत गोंड व आदिवासी लोक मोठ्या प्रमाणात येतात. देवीला पशू बळी देण्याची प्रथा आहे. यात्रेत खेळणी, पितळी व तांब्याची भांडी व विविध प्रकारचे दागदागिने विक्रीस आणतात. येथील किल्ला व टेकडी केंद्रिय पुरातत्व विभागाचे संरक्षित स्मारक आहे. हेन्री कझिन्सने आपल्या अहवालामध्ये या किल्ल्याच्या अवशेषांची नोंद केली आहे. (कझिन्स, हेन्री, पूर्वोक्त, पृ.३.)

भिवापूर

भिवापूर : (ता. भिवापूर, २१°००' उ., ७८°३०' पू.) नागपूर-चांदा मार्गावर उमरेडच्या आग्नेयेस २४.१४ कि. मी. वर मोर नदीच्या किनाऱ्यावरील एक गाव. ही गोंडांची प्रारंभिक वसाहत असून तिच्या रक्षणासाठी किल्ला उभारण्यात आला होता. हे गाव भिमाजी नावाच्या एका गवळ्याने वसविले असावे म्हणून या गावाचे नाव "भिमापूर" पडले असावे आणि त्याचे अपभ्रंशाने आता ते भिवापूर झाले आहे. येथे एका प्राचीन किल्ल्याचे भग्न अवशेष असून सुमारे ३५० वर्षापूर्वी देवगडच्या गोंड राजाने हा किल्ला बांधला असावा. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** महाराष्ट्र स्टेट, बॉम्बे, १९६६, पृ. ६९८.) हेन्री कझिन्स याने या ठिकाणी गावात व

जलाशयाच्या लगत असणाऱ्या सती शिळांची नोंद केली आहे. या सती शिळा विविध प्रकारच्या स्तंभ व दगडी शिळावर उत्कीर्ण केल्या असून येथे असलेल्या एकाश्म शिल्पाचीही नोंद घेतली आहे. (कझिन्स, हेन्री, पूर्वोक्त, पृ. ३.) गावात दर शुक्रवारी जनावरांचा मोठा बाजार भरतो. एक शासकीय विश्रामगृह येथे आहे. येथे मिरचीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते.

भूगाव

भूगाव : उमरेडच्या उत्तरेला २६ कि. मी. अंतरावर तर नागपूरच्या आग्नेयेस २२.५० कि. मी. अंतरावर आहे. याची प्राचीन नोंद भोगावती अशी असून कोरीव अभिलेखातील हे स्थान भूगाव म्हणून ओळखले जाते. (ठोसर, हरिहर पूर्वोक्त.) येथे यादवकालीन म्हणता येईल असे हेमाडपंती शैलीत बांधलेले महादेव मंदिर आहे. मंदिरालगत एक पुष्करणिकाही बांधलेली आहे. मंदिर गर्भगृह, अंतराळ, लहान सभामंडप अशा पध्दतीने उभारण्यात आले असून ते चांगल्या स्थितीत असले तरी या लगत असलेली पुष्करणि ढासळलेली आहे. (कझिन्स, हेन्री **'अँटीक्वेरीयन रिमेन्स इन द सेंट्रल प्रोव्हिन्सेस अॅण्ड बेरार',** पुनर्मुद्रन, १९७१, पृ. ३.)

भूयारी शैलाश्रय

भूयारी शैलाश्रय : (ता. नागपूर) नागपूर अमरावती रस्त्यावर ३१ कि. मी. वर वडधामना व्याहाडपेठ गावापासून उजवीकडे शिरपूर फाटा आहे. तेथून असलेल्या कच्या रस्त्यावर ५ कि. मी. अंतरावर भूयारी नावाचे खेडे आहे. या स्थानालगत असलेल्या गुहांना भूयारी शैलाश्रय म्हणून ओळखतात. या शैलाश्रयालगत वेणा ही लहान नदी आहे. हे शैलाश्रय अगदी तळपातळीवर असून शैलाश्रयात ५.५० मीटर उतरून आत शिरावे लागते. लाल मुरमाड पाषाणामध्ये हे शैलाश्रय कोरले आहे. त्याचे दोन भाग असून १२ चौ. मीटरची एक ओवरी व ३० चौ. मीटरचे क्षेत्रफळ असलेले शैलाश्रय अशी याची रचना असून मुख्य खोलीच्या मध्यभागी ओट्यासारखे शिलासन आहे. यावर कुठल्याही प्रकारची मूर्ती नाही. भूयारी शैलाश्रयाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे प्रवेशद्वारालगत निसर्गापासून संरक्षण प्राप्त व्हावे म्हणून चटई अडकविण्यासाठी म्हणून दोन खाचा ठेवल्या आहेत. डाव्या भागात ब्राह्मी लिपीतील काही अक्षरे कोरली आहेत. अर्थात ही अक्षरे झिजली आहेत. या शैलाश्रयाच्या संदर्भात ती इसवी सनाच्या ४ थ्या शतकातील असावी असे मत श्रीपाद चितळे यांनी व्यक्त केले आहे. (चितळे श्रीपाद, नागपूर जिल्ह्यातील कृत्रिम शैलाश्रये, **विदर्भ संशोधन मंडळ**, नागपूर, वार्षिक १९८७, पृ. १६९-७०.)

मकरधोकडा

मकरधोकडा : (ता. उमरेड, २०°५०' उ., ७९°१०' पू.) उमरेडच्या पश्चिमेस १२.८७ कि. मी. व बोरी रेल्वे स्टेशनपासून २५.७५ कि. मी. अंतरावर आंब नदीच्या किनाऱ्यावरील सुपीक व मैदानी भागावर वसलेल्या गावात कोष्टी लोकांची संख्या बरीच असून चटया विणणाऱ्या भटक्या-भामटा जातीचीही बरीच वस्ती आहे. यापूर्वी हे गाव भोसल्यांच्या मालमत्तेचा भाग होता. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** महाराष्ट्र स्टेट, बॉम्बे, १९६६, पृ. ७२५.)

मनसर

मनसर : (ता. रामटेक, २१°२०' उ., ७०°१५' पू.) रामटेकच्या पश्चिमेस हे स्थान असून एका जलाशयालगत उंचवट्यावर वसले आहे. मनसर गाव उत्तर महामार्गावर कामठीपासून उत्तरेस २४.१४ कि. मी. आणि रामटेकपासून ८.०४ कि. मी. अंतरावर आहे. उत्तर महामार्ग म्हणजे नागपूर-जबलपूर राष्ट्रीय महामार्ग होय. येथे बरेच प्राचीन अवशेष आढळतात. साधारणपणे वाकाटककालीन म्हणता येतील असे अवशेष येथे असून एका शिलाखंडावर शंक्वाकृती प्राचीन लिपित (Shell Characters) लेख कोरला आहे. रामटेक गडावरील लक्ष्मणाच्या देवळातील यादवकालीन लेखात "मणिकालकुंड" या तीर्थाचा उल्लेख येतो. (मिराशी वा. वि. **मेघदूतातील रामगिरी अर्थात रामटेक**, नागपूर, १९५८, पृ. २२.) 'सिंधुगिरि महात्म्यात' या स्थानाचा उल्लेख मिळतो. यात नोंदविल्याप्रमाणे मणिकाकुंडात स्नान करून हिडींबेची पुजा करावी. 'मणिसर' या शब्दापासून 'मनसर' हे नाव रूढ झाले असावे. येथील तीर्थास हिडींबातीर्थ असेही म्हणत. याच स्थानास महानुभवपंथ संस्थापक श्रीचक्रधरस्वामी यांनी भेट दिल्याची नोंद स्थानपोथीत उपलब्ध आहे. (कोलते वि. भि. **महानुभव स्थानपोथी,** मलकापूर, १९७६, दुसरी आवृत्ती, पृ. क्र. ५.) स्थानपोथीत या स्थानाची 'मणशीळ' अशी नोंद आहे. पंथीयांच्या दृष्टीने पूज्य असलेले हे स्थान असून उत्तर यादवकाळात मंदिर उभारले असून या वास्तूतील लाकडी काम चांगल्या प्रतीचे होते. आता नव्याने मंदिरात बांधकाम केले आहे.

नागपूर विद्यापीठाने या परिसरात केलेल्या उत्खननामध्ये सन १९८८-८९ मध्ये विटांच्या वास्तूचे काही अवशेष उपलब्ध झाले. तर केंद्रिय पुरातत्वीय विभागाने सन १९९४-९५ मध्ये येथे केलेल्या उत्खननाने विट बांधकामातील काही वास्तू अवशेष व अन्य काही वस्तू मिळाल्या. याच परिसरात शिवप्रतिमा उपलब्ध झाली असून ती सद्या नॅशनल म्युझियम, दिल्ली येथे सुरक्षित ठेवली आहे. इ. स. १९७२ मध्ये मिळालेल्या या मूर्तीला जांभालमूर्ती असेही संबोधण्यात आले. बटुक भैरवाची ही मूर्ती शिवप्रतिमा असल्याचे मानले जाते. मनसर येथे सापडलेली मूर्ती शिवाची रौद्र-सौम्य (Ambivalent) स्वरूपाची असून ती एक उत्कृष्ट देवता मूर्ती आहे. राजेशाही थाटात महाराज ललितासनात बसलेली ही ठेंगू आणि गुबगुबीत मूर्ती तत्कालीन वाकाटकांच्या सुबक कलेचे प्रतिक ठरते. नाजूक कोरीव काम चेहेऱ्याचे बारकावे, केसांच्या जटा, जटामध्ये माळलेली आणि हातात धरलेली फुले कलात्मक आहेत. या मूर्तीकरिता वालुकाश्म (Fine grained sandstone) वापरल्यामुळे आकाराचा साधेपणा आणि कोरीव कामातील नाजूकता याचा मिलाफ प्रभावीपणे अभिव्यक्त झाला आहे. **(राज्य गॅझेटिअर, स्थापत्य व कला (खंड १ भाग-२)** महाराष्ट्र शासन, मुंबई २००२, पृ. २३८.) या चार हात असलेल्या मूर्तीच्या गळ्यात कंठा, यज्ञोपवीत, कानात कुंडले आहेत. डोक्यावर मध्यभागी चंद्रकोर व डाव्या बाजूस नरमुंड असलेली पगडी दर्शविली आहे. सुटलेले उदर त्यावर बांधलेला उदरबंध असे या मूर्तीचे स्वरूप आहे. **(इंडियन आर्किऑलॉजी**, १९७२-७३, अ. रिव्हिव पृ. ५९, प्लेट ४२ 'ब'.) येथील जलाशय प्राचीन असून धानाच्या शेतीसाठी याच्या पाण्याचा उपयोग होतो. या जलाशयाचे प्राचीन नाव 'रत्नतलाव' किंवा 'मणिकालकुंड' असा आहे. बहुधा या जलाशयाच्या नावावरूनच येथील वसाहतीचे नाव रूढ झाले असावे. रामटेक परिसरातील अष्टतीर्थापैकी हे एक प्रमुख स्थल होय. येथे दरवर्षी चैत्र पौर्णिमेला मोठी यात्रा भरते. मनसर जवळच असलेल्या टेकाड्यात उंचवट्यावर मॅग्नीजची खाण आहे. येथील

कामठीलेणीनामक खाणीत 'नारंगी रंगाचे' विशेष प्रकारचे क्रिस्टल सापडतात. हा भाग विड्याच्या पानासाठी प्रसिध्द आहे. भोसलेंची राजमाता बाकाबाईना येथील पानांची आवड होती.

मनसर येथील राजप्रसाद व अन्य वास्तुअवशेष : येथील पुरातत्व गर्भक्षेत्र नदीच्या किनाऱ्यावर आणि नदीचा प्रवाह अडवून तयार करण्यात आलेल्या प्राचीन जलाशयाच्या परिसरात आहे. नैसर्गिकरित्या येथे दोन मोठ्या टेकड्या असून एक टेकडी हिडींबा टेकडी या नावाने ज्ञात आहे. या टेकडीजवळील खडकावर शंखलिपीचे अवशेष आहेत तर दुसरी टेकडी या स्थानापासून जवळच असून तिची नोंद महाविहार अशी करण्यात आली आहे. येथे वाकाटककालीन भव्य राजप्रासादाचे अवशेष प्राप्त झाले असून अलीकडील काही वर्षात केंद्रीय पुरातत्व विभाग आणि नागार्जुन बोधीसत्व शोध प्रतिष्ठानच्यावतीने उत्खनन कार्य हाती घेण्यात आले आहे. उत्खनक म्हणून केंद्रीय पुरातत्व विभागाचे निवृत्त झालेले ज्येष्ठ पुरातत्वज्ञ श्री. पी. एन. जोशी आणि श्री. ए. के. शर्मा हे सहभागी आहेत. यांनी या क्षेत्रात केलेले उत्खनन एकूणच महाराष्ट्राच्या संदर्भामध्ये महत्त्वपूर्ण आहेत.

हिडींबा टेकडी : मनसर परिसरात महापाषाणयुगीन मानवाच्या अस्तित्वाचे पुरावे मिळाले असून या क्षेत्रात उपलब्ध अन्य अवशेषांवरून येथील सातवाहनकालीन वसाहतीचे अस्तित्वही जाणवते. हिडींबा टेकडीवर पूर्वी 'बटूक भैरव' ही शिवप्रतिमा मिळाली. तेथेच मोठ्या प्रमाणात मंदिर संकुलाचे अवशेष प्राप्त झाले असून नैसर्गिक टेकड्यांचा मोठा कुशलतेने उपयोग करत भाजलेल्या पक्क्या विटात बांधलेले हे संकुल होते. जलाशयासमोर चढत्या क्रमाने वाढत जाणाऱ्या टप्प्यावर शिवलिंगांची प्रतिष्ठापना केली गेली. सर्वात वरील भागात 'बटूक भैरव' प्रतिमा मिळाली तेथे शिवमंदिर असावे. परिसरात अनेक वाकाटककालीन शिल्पावशेषही प्राप्त झालेत. उत्खनकांनी याला "प्रवरेश्वर देवकुलस्थानम" म्हटले आहे. येथे शिव व शक्तीची उपासना केंद्रे असावीत.

वाकाटककालीन भव्य राजप्रसाद : नदीच्या उजव्या किनाऱ्यावर असलेल्या टेकडीवर ज्याला 'महाविहार टेकडी' संबोधले जाते तेथे समोरील टेकडी व जलाशयाच्या दिशेने पूर्वाभिमूख राजप्रसाद बांधण्यात आला. या राजप्रसादास ७२० x ७२० मी. आकाराचा भव्य प्राकार असावा. मुख्य वास्तू ५६ x ४४ मी. आकाराच्या प्रशस्त व उंच अधिष्ठानावर उभी होती. हे वास्तूसंकुल दोन मजली होते. त्याच्या निर्मितीसाठी ४४ x २५ x ०६ सें. मी. आकाराच्या पक्क्या भाजणीच्या विटा उपयोगात आणल्या गेल्या. या प्रासादाच्या आकार ४३.८५ x २९.१० मी. चा होता. अधिष्ठान व त्यावरील भिंतीच्या बाह्य अंगावर देवकोष्ठ (कोनाडे) आणि अर्धस्तंभांची निर्मिती अलंकरणासाठी म्हणून करण्यात आली. या प्रासादास प्रतिक्षागृह, सज्जा, लहान दालने व मोठा हॉल होता. वरील मजल्यावर जाण्यासाठी म्हणून १७० सें. मी. रूंदीचे दोन जिने होते. लाकडी स्तंभांनी सुशोभित असलेली ही वास्तू चुन्याचा गिलावा असलेली होती. कमलदल व भिंतीस्तंभ यांचे अलंकरण असलेल्या वाकाटककालीन वास्तूवरील प्रतिकांशी साधर्म्य असलेल्या या प्रासादाची निर्मिती उत्खनकांच्या मते वाकाटक राजा प्रवरेश्वर द्वीतीय (इ. स. ४२० ते ४५५) याने आपल्या कारकीर्दीच्या अकराव्या ते सोळाव्या वर्षाच्या दरम्याने नंदीवर्धनवरून आपली राजधानी

प्रवरपूरला स्थलांतरीत केली. तेव्हा हा राजप्रसाद इ. स. ४३५ च्या दरम्यान उभारण्यात आला. यासंदर्भात अभिलेखीय नोंदीप्रमाणे "देवकुलस्थानम् प्रवरपूर" हे सद्याचे मनसर असावे. एकूण वाकाटककालीन या प्रासादाचे अस्तित्व स्पष्ट असून पुढे नल राजा भदत्तवर्मन याने हा प्रासाद इ. स. ५६३ च्या आसपास आक्रमणात पूर्णपणे जाळून टाकला असावा.

बौध्दस्तूप : राजप्रसादाच्या भग्नअवशेषाचे सहाव्या शतकात बौध्द महाविहार व स्तूपामध्ये परिवर्तन झाले. किंबहुना तेथे स्तूप उभारताना या वास्तुचा अधिष्ठानासारखा उपयोग करण्यात आला असावा. येथे तीन स्तरात उंचावत जाणारा प्रशस्त बौध्द स्तूप उभारण्यात आला. त्यासाठी ९० सें. मी. चा प्रदक्षिणा पथ ठेवण्यात आला. स्तूप निर्मितीसाठी ४३ x २३ x ०९ सें. मी. आकाराच्या पक्क्या भाजणीतील विटांचा उपयोग करण्यात आला. उत्खनकांना या भव्य स्तुपाचे वेदीका आणि अंडाशयांच्या भागासंदर्भात नोंद करता आली आहे. स्तुपाच्या सभोवताली प्रदक्षिणापथास लागून १६ लहान खोल्या (३.१० x १.५५ मी.) निर्माण करण्यात आल्या होत्या. यासाठी पूर्वीच्या मूळ वास्तू आराखड्यात आवश्यक ते परिवर्तन करण्यात आले होते. उत्खनकांना येथे तांबड्या रंगाची खापरे तसेच बोधीवृक्ष व धम्मचक्राचे अंकण असलेल्या प्रतिमा मिळाल्या. येथे उत्खनकात अनेक प्राचीन वस्तू ज्यामध्ये मृण्मय मूर्ती, मृदभांडी तसेच लोखंडी वस्तू मणी, कंगवे, तांब्याच्या वस्तू, मूरा व अन्य बाबी सापडल्या आहेत.

मनसर येथील शिल्प : येथील उत्खननामध्ये सातवाहन, उत्तर सातवाहन व विशेषत: वाकाटककालीन वस्तू व मूर्तिशिल्प मिळाले आहे. लाल वालुकाश्यामातील मूर्ती वाकाटककालीन असून प्रामुख्याने हिडींबा टेकडी व परिसरातील आहेत. येथील बटूक भैरवाची मूर्ती एक वैशिष्ट्यपूर्ण मूर्ती आहे. तसेच ठेंगू पण गुबगुबीत आकाराचा किचक, द्वारपाल, चूर्णकुंतनधारीणी, अन्य वैशिष्ट्यपूर्ण केसरचना असलेले द्वारपाल, शैवगण मालाधारीणी, शिवपार्वती व विशेषत: अजिंठा शिल्पात दिसणारा "किन्नर" या मूर्ती वैशिष्ट्यपूर्ण असून त्या रामटेक येथील मूर्तीशिल्पापेक्षा काहीशा प्रगत आहेत. येथेच एका वास्तूमध्ये उत्खननातील शिल्पावशेष प्रदर्शित करण्यात आले आहेत.

माहूरझरी

माहूरझरी : (ता. नागपूर) नागपूर-काटोल रस्त्यावर नागपूरच्या पश्चिमेस १५ किलोमीटर अंतरावर माहूरझरीची महापाषाण संस्कृतीची विस्तृत दफनभूमी आहे. वस्तुत: जुनापानी आणि माहूरझरी यांचे क्षेत्र सलग मानावयास हरकत नाही. येथे

टीप : मनसर येथील प्रत्यक्ष सर्वेक्षण आणि केंद्रीय पुरातत्वीय विभागाचा सर्वेक्षण अहवाल २००२-२००३, नवी दिल्ली व **पुरामंथन** (खंड २) **जगत्पती जोशी फॅलोस्टेशन व्हाल्यूम** २, 'आगमकला' प्रकाशन दिल्ली यातील ए. के. शर्मा यांचा लेख या आधारे वाकाटककालीन राजप्रसाद व अन्य नोंदी व स्तूप याविषयीची नोंद केली आहे.

फक्त शिळावर्तुळे प्रकारची दफने खूप संख्येने आढळून येतात. जुनापानीचा शोध रिव्हेट कारनॅक यांनी लावला आणि त्यावर १८७९ साली लेख लिहून तेथे मिळालेल्या लोखंडी कु-हाडी, घोड्याच्या तोंडात बसविली जाणारी लोखंडी व्हटाळी आणि इतर वस्तू यांचा

ऊहापोह केला. जुनापानी आणि माहूरझरी हे एकच क्षेत्र असल्याने या वस्तू माहूरझरीच्या संदर्भातही महत्त्वाच्या ठरतात. यानंतर १९३३ मध्ये, हंटर यांनी माहूरझरी येथे सापडलेल्या, प्रामुख्याने ऐतिहासिक काळातील, अवशेषांचा आढावा प्रसिध्द केला. यात मुख्यत्त्वे निर्मितीच्या निरनिराळ्या अवस्थांतील कार्नेलियनचे मणी, गुप्तकालीन विटा, मुद्रा, नागमुद्रा आणि लज्जागौरीचे शिल्प यांचा उल्लेख आढळून येतो. मात्र येथील शिळावर्तुळासंबंधी काहीही माहिती हंटर यांनी दिलेली नाही. यानंतर १९७०-७२ या काळात या शिळावर्तुळांचे मोठ्या प्रमाणावर उत्खनन करण्यात आले. त्यात सापडलेला पुरावा अत्यंत महत्त्वपूर्ण ठरलेला आहे.

माहूरझरी येथे शिळावर्तुळे चार विभागात केंद्रीत झाल्याचे आढळून येते. यातील काही टेकडीवर तर काही सपाट प्रदेशात असून जवळपास नदी, नाला नाही. जवळपासच्या टेकड्यात उपलब्ध असलेल्या शिळांचा वापर करून ही दफने रचण्यात आली. दफन पध्दतीची विविधता, वर्तुळांचे व्यास, त्यात सापडलेले मानवी सांगाडे, मृताबरोबर दागिन्यांसह केलेले घोड्याचे दफन आणि लोखंड, तांबे, सोने यापासून बनविलेल्या असंख्य वस्तू यामुळे माहूरझ ारीची शिळावर्तुळे महाराष्ट्रात अद्वितीय ठरली आहेत. इतकी समृध्द दफने दुसरीकडे अद्याप मिळालेली नाहीत. काही दफनात तर विविध प्रकारच्या दोनशेहून जास्त वस्तू मृतांबरोबर ठेवलेल्या आढळून आल्या. काही दफने सांकेतिक स्वरूपाची होती. दफनांची संख्या लक्षात घेता माहूरझरी-जुनापानी ही महापाषाण संस्कृतीच्या लोकांची बहुधा महत्त्वाची दफनभूमी असावी असे दिसते. मृतांबरोबर पुरलेल्या वस्तूंच्या संख्येवरून आणि स्वरूपावरून तत्कालीन लोकांमध्ये निरनिराळे आर्थिक स्तर होते असे स्पष्ट होते. धातूच्या वस्तूंची विविधता असली तरी मडक्यांचे वर्ग मात्र जुनापानी प्रमाणेच काळी आणि तांबडी, अर्भकयुक्त तांबडी, संपूर्ण काळी असे प्रचलित होते.

शिळावर्तुळातील दफनपध्दती जुनापानी प्रमाणे असली तरी मृताला पुरण्याच्या पध्दतीत विविधता होती. काहीत दोन प्रौढ व्यक्ती शेजारी-शेजारी एकाच वर्तुळात, काहीत वर्तुळात खड्डा करून एक व्यक्ती, काहीत मृताची केवळ काही हाडे, तर काहीमध्ये मृतांच्या सांगाड्यांचे वरचे भाग पुरल्याचे दिसून आले. मृताला बहुतांशी उत्तर-दक्षिण ठेवले असले तरी सर्वच बाबतीत असे करीत असत असे नाही. काही मोजक्या दफनामध्ये मृत व्यक्तीबरोबर घोड्याचा बळी देऊन तो किंवा त्याचा काही भाग दागिन्यासकट पुरलेला होता. काही दफनामध्ये मृताच्या छातीवर कट्यार (लोखंडी पाते आणि तांब्याची मुठ) ठेवल्याचे आढळून आले. ही व्यक्ती गावातील प्रमुख, सधन अथवा लढाऊ वर्गाची असावी असे अनुमान करता येते.

माहूरझरीच्या दफनामध्ये काही अप्रतिम कलाकुसरीच्या तांब्याच्या वस्तू उत्खननात सापडल्या. तांब्याच्या लहान आकाराच्या घंटा, जड आणि भरीव तांब्याच्या बांगड्या व कडी, तांब्याच्या थाळ्या आणि त्यावरील अप्रतिम बनावटीची झाकणे यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. घूमटाकार घंटा असून, तिचे लोलक लोखंडाचे आहेत. बांगड्या जाड तांब्याच्या सळ्यापासून ठोकून बनविलेल्या असून त्यांच्या तोंडाच्या दोन्ही बाजूला उत्कीर्ण केलेली नक्षी आहे. तांब्याच्या थाळ्या पातळ पत्र्याच्या असून त्यावरील झाकण्या निमुळत्या माथ्याच्या आणि

त्यावर सहा कळ्याचा एक वेगळा घटक बसविलेल्या अशा आहेत. लोखंडाच्या वस्तू विविध स्वरूपाच्या असून त्यातील चपट्या कुऱ्हाडी, भाले, शूल खनित्रे, पटाशा व छिन्न्या, राप्या, पळ्या किंवा दिवे आणि नांगरटीसाठी निमुळत्या टोकाचे छोटे फाळ मृताबरोबर पुरलेले आढळले. याशिवाय घोड्याच्या तोंडात बसविले जाणारे लोखंडी कडीचे व्हटाळे त्याचप्रमाणे घोड्याच्या मुखावर घालण्याकरिता केलेले तांब्याच्या पत्र्याचे दागिने (टाकळघाट-खापा येथे मिळालेल्याप्रमाणे) उल्लेखनीय आहेत. हार, वळी, पेंडेयुक्त कंठहार, कर्णफुले इत्यादी विविध प्रकारचे सोन्याचे दागिने काही दफनामध्ये मृताच्या अंगावर पुरताना तसेच राहू दिल्याचे आढळून आले. इतर अलंकारांमध्ये रंगीबेरंगी विविध आकाराचे दगडी मणी फार मोठ्या संख्येने सापडले. यातील काही कार्लेनियन या लाल दगडाचे असून त्यावर एका विशिष्ट तंत्राने पांढऱ्या रंगात पक्की नक्षी काढलेली आहे.

दफनामध्ये विविध प्रकारची मडकीही मृताबरोबर ठेवलेली आढळली. टाकळघाट-खापा येथे सापडलेल्या मडक्यांप्रमाणेच ही असून काही दफनामध्ये काळ्या रंगात तांबड्या पृष्ठभागावर चित्रकारी केलेली मडकीही आहेत. मात्र ही ताम्रपाषाणयुगीन रंगीत खापरांपेक्षा अगदी भिन्न आहेत. काळ्या वर्गाच्या खापरांमध्ये विविध आकार असले तरी त्यातील काही झाकण्या माथ्यावर जनावरांच्या आकृती बसवून अलंकृत केलेल्या आहेत. यातील बोकडाची आणि चार पक्षांची आकृती असलेली झाकण्यांची शीर्षे अप्रतिम आहेत. या आकृती केवळ अलंकरणाकरिता बसविल्या असतील असे मानणे बरोबर ठरणार नाही. यामागे काही धार्मिक श्रध्दा असाव्यात.

माहूरझरीच्या दफनामध्ये मानवी सांगाड्यांचे जे अवशेष मिळाले आहेत त्यावरून मानवी-शरीरविज्ञान-शास्त्रज्ञांनी काही महत्त्वाचे निष्कर्ष काढलेले आहेत. येथे उत्खनित दफनातून एकूण १७ ते २१ व्यक्तींचे अवशेष मिळालेले आहेत. बहुतांशी दफनामध्ये एकाच व्यक्तीचे अवशेष मिळत असले तरी एका दफनात दोन व्यक्तींचे आणि दुसऱ्या एका दफनात तीन व्यक्तींचे अवशेष पुरल्याचे आढळून आले. यामध्ये लहान मुलांचे अवशेष अजिबात नव्हते. यावरून लहान मृत बालकांची विल्हेवाट दुसऱ्या कोणत्यातरी पध्दतीने लावली जात असावी असे दिसते. १२ ते १५ वयोगटातील एक, १६ ते २२ वयोगटातील आठ आणि २२ ते ३२ वयोगटातील चार व्यक्ती, अशी विभागणी स्पष्ट झाली. अगदी लहान मुले त्याचप्रमाणे अगदी वृध्द व्यक्तींचे सांगाडे सापडले नाहीत. २२ ते ३२ वयोगटातील सर्व मृत पुरुष होते, तर १६ ते २२ या वयोगटात स्त्रियांची संख्या मोठी होती. पुरुषांपेक्षा स्त्रीयांच्या मृत्यूचे प्रमाण जास्त होते. मात्र या सांगाड्यावरून व्यक्तींची वांशिक ओळख पटू शकली नाही.

माहूरझरी इतकी समृध्द दफने महाराष्ट्रात दुसरीकडे नाहीत. या दफनामुळे या समाजातील सधन आणि मध्यम वर्गाच्या व्यक्तींची ओळख जशी पटते तशीच दफनात ठेवलेल्या असंख्य वस्तूंवरून त्या समाजामध्ये कुंभार, तांबट, लोहार, सोनार, सुतार यांच्यासारखे कारागीरही असले पाहिजेत हे उघड होते. दफनात ठेवलेल्या सर्व वस्तू दररोजच्या जीवनात वापरण्याच्या असून त्यांचा साठा दफनाचे वेळीही उपलब्ध राहत असला पाहिजे. ताम्रपाषाणयुगीन दफनापेक्षा महापाषाणीय संस्कृतीची दफने समृध्द आढळतात. (देव एस. बी., **माहुरझरी एक्सकेव्हेशन्स** नागपूर युनिव्हर्सिटी, नागपूर, १९७३ च्या अहवालाधारे.)

मांढळ

मांढळ : (ता. कुही, २०°५५' उ., ७९°२५' पू.) उमरेड पासून १७.७० कि. मी. व नागपूरच्या नैऋत्येस ७५ कि. मी. अंतरावर आहे. आंब नदी किनाऱ्यावर असलेल्या या गावात एक तलाव व त्याच्या काठावर मारोती महाराजांचे एक छोटेसे मंदिर आहे. या मंदिराबाबत अनेक दंतकथा सांगितल्या जातात. पूर्वी येथे कापड उद्योग मोठ्या प्रमाणात चालत असे. मिरची उत्पादनासाठी हे गाव तालुक्यामध्ये प्रसिध्द आहे. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** महाराष्ट्र स्टेट, बॉम्बे, १९६६ व १९०८, पृ. ३०२.)

नवाश्मयुगापासून गुप्त-वाकाटक काळापर्यंत आपले अस्तित्व कायम टिकविणारी जी प्राचीन नगरे नागपूर जिल्ह्यात आहेत, त्यापैकी मांढळ हे एक प्रमुख होय. कुही तालुक्यात आंब नदीच्या काठावर वसलेले मांढळ हे एक मोठे गाव आहे. येथे पुरातत्वीय उत्खननात अनेक प्राचीन मंदिराचे व वास्तूंचे अवशेष आणि शिल्पे मिळाली. शिल्पामध्ये प्रामुख्याने विष्णु किंवा वैष्णव देवतांच्या मूर्ती आहेत. येथील उत्खननात वाकाटक काळातील दोन ताम्रपट प्राप्त झाले असून त्यापैकी एकात तेथे असलेल्या मोंढस्वामी मंदिराचा उल्लेख आलेला आहे. हे मंदिर विष्णुचे असून त्याच्या व मांढळ गावाच्या नावातील साम्य यावरून 'मोंढ' हे मांढळचे वाकाटककालीन नाव असून ती तेथील ग्रामदेवता असावी असे वाटते. उत्खननातील वैष्णव पंथीय देवतांच्या शिल्पावरूनही यास पुष्टी मिळते. येथे झालेल्या उत्खननातील अवशेषांवरून मांढळ हे सातवाहन आणि वाकाटक काळात एक समृध्द नगर असल्याचा संकेत मिळतो. त्याचप्रमाणे आजच्या पेक्षा या नगराचा आकार देखील मोठा होता हे गावाच्या सभोवती चहूबाजूस दूरवर आढळणाऱ्या विटांच्या घरांच्या अवशेषांवरून स्पष्ट होते. (ठोसर हरीहर, पूर्वोक्त.)

मांढळ येथील विटांची मंदिरे : नागपूर विद्यापीठाच्या प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती आणि पुरातत्व विभागाने उत्खननात शोधलेले सर्व मंदिरांचे अवशेष महाराष्ट्रातील सर्वाधिक प्राचीन हिंदू मंदिरांचे आहेत. तेर (जिल्हा उस्मानाबाद) त्रिविक्रम मंदिर याला अपवाद आहे. ते या अवशेषांहून अधिक प्राचीन आहे. मांढळ गावाबाहेर एकूण तीन मंदिरे किंवा मंदिरांचे अवशेष सापडले आहेत. ही मंदिरे एकमेकांपासून फार दूर नाहीत. या जागा बोंगी हुडकी, भोला हुडकी आणि वऱ्हाडी तलाव म्हणून ओळखल्या जातात. यातील वऱ्हाडी तलाव ही जागा सोडली तर अन्य दोन ठिकाणी पीठ पातळीपर्यंतचे अवशेषही सापडत नाहीत. बोंगी हुडकीचे मंदिर मध्यम आकाराचे असून गर्भगृह व मुखमंडप अशी त्याची रचना आहे. भोलाहुडकी येथे एक आयताकृती कट्टा असून त्याच्या अरुंद बाजू दक्षिणोत्तर असून दक्षिण व उत्तरेकडे कट्ट्यावर जाण्यासाठी जिने आहेत. मधल्या भागात नंतरच्या काळातील मंदिरांचे अवशेष आहेत. या मंदिरापुढे एक पुरुषापेक्षाही अधिक खोलीचे एक कुंड आहे. या कुंडाच्या चारही बाजू आतल्या बाजूने उतरत्या आहेत. म्हणजेच जसजसे खाली जावे तसतसे हे कुंड अरुंद होत जाते. या मुख्य मंदिराजवळच बहुधा पुजाऱ्यांची घरे होती आणि या सर्व वास्तूंभोवती एक प्राकार होता. हे मंदिर एक महत्त्वाचे मंदिर असावे कारण हे मंदिर ज्याखाली दडले होते त्या टेकाडाचे उत्खनन करताना पहिल्याच स्तरात वाकाटक नृपति दुसरा प्रवरसेन (इ. स. ४२०-४५०) आणि दुसरा पृथ्वीषेण (इ. स. ४७०-४९०)

अनुक्रमणिका

यांचे ताम्रपट असलेला एक मृतकरंडक सापडला. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे येथे भग्नावस्थेत आढळलेल्या शैव आणि वैष्णव मूर्ती होत. या मूर्ती दगडी असून त्या आयताकार कट्ट्यांच्या आतच सापडल्या आहेत. या मूर्तीच्या आधारे ख्रिस्तोत्तर चौथ्या शतकाच्या उत्तरार्धात बोंगी हुडकी आणि भोला हुडकी येथील मंदिरे बांधण्यात आली असे म्हणता येईल. वऱ्हाडी तलावाच्या पश्चिम तीरावर गावाच्या हद्दीत असलेले मंदिर बऱ्यापैकी टिकून आहे. या मंदिराचे स्वरूप गर्भगृह आणि त्यात जाण्यासाठी पायऱ्या असे आहे. सोपानाला ४.४९ मीटर लांबीचा कठडा आहे. कट्ट्याच्या किंवा पीठाच्या उभ्या बाजूंना वालुकाश्म घडी व चिरे लावलेले आहेत. ही अशी नंतर लावलेल्या चिऱ्यांची भिंत प्रणालकाच्या पातळीपर्यंत आहे. महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाने येथे पुनश्च केलेल्या उत्खननात एका प्रतिहारीची व सिंहाची मूर्ती सापडली आहे. याच ठिकाणी या आधी केलेल्या उत्खननात परिपक्व वाकाटक शैलीतील अल्पशा उठावातील शिल्प सापडले आहे. मंदिराच्या गर्भगृहात काहीसे स्तंभासारखे दिसणारे शिवलिंग आहे. या शिवलिंगाचा खालचा भाग चौकोणी असून वरचा भाग गोलाकार आहे. हे शिवलिंग, उत्खननात सापडलेले केश उठावातील शिल्प या पुराव्यांवरून या मंदिराचा अदमासे काळ इ. स. च्या चौथ्या शतकाचे शेवटचे चतुर्थक आणि इ. स. च्या पाचव्या शतकातील पहिले चतुर्थक असा ठरतो. **(राज्य गॅझेटिअर : स्थापत्य व कला** (खंड १, भाग-२) महाराष्ट्र शासन, मुंबई, २००२, पृ. १२१-१२२.)

वाकाटक शिल्पाचे उत्कृष्ट नमुने मांढळ येथे सापडले आहेत. या ठिकाणी टेकडीच्या उतारावर वृक्षारोपणाचे काम चालू असता चार मूर्ती सापडल्या. ह्या मूर्तींचे महत्त्व लक्षात घेऊन तेथे उत्खनन करण्यात आले तेव्हा अनेक शैव व वैष्णव मूर्ती उजेडात आल्या. त्यामध्ये ब्रह्मा, दुर्गा, विष्णू बलराम, नैगमेष, महासदाशीव, लाकुलिश, चतुर्मुखी शिव यापैकी अष्टमुखी शिवमुर्ती दोन बाहु, आठ शिरे असलेली २५ x १७ x ९ सें. मी. ची आहे. काही आयुधपुरुष इत्यादी सुंदर मूर्तिशिल्पांचा समावेश आहे. ही मूर्तिशिल्पे या भागातील हिंदू संप्रदायाची सर्वाधिक प्राचीन शिल्पे असण्याची दाट शक्यता आहे. ह्या शिल्पाकृती घडविणाऱ्या शिल्पीने गंगेच्या खोऱ्यात उत्क्रांत होत असलेल्या अभिजात कलेचे संकेत निश्चितच पाळले आहेत पण त्याचवेळी त्याने स्वत:च्या कल्पना आणि देवत्वाची संकल्पना त्यात साकार करण्याचे स्वातंत्र्य घेतले आहे. शिल्पकाराने त्याच्या कल्पनाशक्तीला पूर्ण मोकळीक दिली आणि त्यामुळेच अशा चार, आठ किंवा बारा तोंडांच्या शिवमूर्ती बनविण्याची आणि अनेकमुखी देवतांची मुखे अशाप्रकारे दाखविण्याची पध्दत जी नंतरच्या काळात वापरण्यात आली नाही. अशाच कल्पनेच्या उर्मीतून उद्‌भवलेल्या शिवाच्या विलक्षण मूर्तीचे रायपूर जिल्ह्यातील जेठाणी मंदिरातील मूर्तीशी खूपच साम्य आहे. मांढळ येथील मूर्तींचे वैशिष्ट्य म्हणजे त्या ठेंगण्या किंवा यक्षाच्या मूर्तीप्रमाणे कोरलेल्या आहेत. या संदर्भात मांढळ येथे आढळलेल्या धेनुक दैत्याचा वध करणाऱ्या बलरामाच्या मूर्तीचे उदाहरण देता येईल. विष्णूच्या मूर्तीचा फक्त डोक्याचाच भाग शिल्लक असला तरी मुखभागावरील नाक, कान, भुवया इत्यादींची ठेवण किंवा रचना आणि त्यांची परस्परांशी असलेली प्रमाणे ही मूर्ती गिड्डी असल्याचे सूचित करतात. त्यामुळेच विद्वानांनी काही प्रथम सदृश मूर्ती शिवाच्या असाव्यात असा अंदाज बांधला आहे. या सर्व मूर्तींची शैली, पुरातत्वीय व परिस्थितिजन्य

पुरावा इत्यादी बाबी लक्षात घेता त्यांचा काळ ढोबळ मानाने इ. स. ३५०-४०० असावा असे दिसते. **(राज्य गॅझेटिअर : स्थापत्य व कला (खंड १, भाग-२)** महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ. २३६-२३७.) या मूर्ती आज नागपूर विद्यापीठात प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती व पुरातत्व विभागामध्ये असून अन्य काही नागपूर वस्तू संग्रहालयात प्रदर्शित केलेल्या आहेत.

मोवाड

मोवाड : (ता. नरखेड, २१°२५' उ., ७८°२५' पू.) नागपूरच्या वायव्येस ९३.३२ कि. मी. अंतरावर मोवाड येथे प्रदीर्घ काळापासून नागरी वसाहत होती असे दिसते. बादशहा औरंगजेबाने येथील काही मुस्लीम लोकांना दानपत्रे दिल्याचे वयोवृध्द लोक सांगतात. हे शहर नागपूरकर भोसले व हैद्राबादचे निजाम यांच्या सिमेवरच असल्याने महसूल जमा करण्यावरून वाद होत असत. त्यामुळे जमिनदार दोन्ही राज्यांना महसूल देत असत. येथील नगरपरिषदेची स्थापना १८६७ मध्ये झाली.

वर्धा नदीवर मराठ्यांनी बांधलेले पाच घाट व बाजाराभोवती बांधलेली टुमदार घरे आहेत. तर नदीच्या पाण्यापासून संरक्षण व्हावे म्हणून उत्तरेस मोठा बंधारा बांधला असून १९६१ नंतर त्याची उंची १.५२४ मी. वाढविण्यात आली. मोवाड हातमागासाठी, सुतारकामासाठी प्रसिध्द असून येथे एक कृष्णाचे मंदिर आहे. हे मंदिर चंद्रवण जगन्नाथ छत्रपुरे धतरपुरे या सावकाराने बांधले, तसेच येथे शंभर वर्षापूर्वीची एक मशिदही आहे. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** महाराष्ट्र स्टेट, बॉम्बे, १९६६, पृ. ७२९-३०.)

मौदा

मौदा : (ता. मौदा) नागपूर-कलकत्ता राष्ट्रीय महामार्गावरील व कन्हान नदी किनाऱ्यावर वसलेले शहर असून ते नागपूरपासून ३३.८० कि. मी. आहे. शहराभोवती आमराईमध्ये सती शिळा असून त्यावर अस्पष्ट स्वरूपात स्त्री प्रतिमा कोरली आहे. **(नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** महाराष्ट्र स्टेट, बॉम्बे, १९६६, पृ. ७२९.) येथे श्रीविष्णू मंदिर असून मंदिराच्या बाह्य भागावर म्हणजे मंडोवरावर महाभारतातील काही प्रसंग कोरलेले आहेत. गाभाऱ्यात विष्णू मूर्ती असून मंदिरावर समतल वितान आहे त्यावर शिखर नाही. विष्णू मूर्ती काळ्यापाषाणात कोरलेली असून प्रभावळीसह आहे. समभंगात उभ्या असलेल्या विष्णूच्या हाती प्रदक्षणा क्रमाने शंख, पद्म, गदा व चक्र अशी आयुधे आहेत. छातीवर श्रीवत्स दाखवले आहे. करंडक मुकूटधारी ही विष्णू मूर्ती सालंकृत आहे. पायालगत लक्ष्मी प्रतिमा असून त्यापुढे खालील दोन्ही बाजूस दोन युगल दर्शविले आहेत. अपराजितपृच्छा या (इ. स. ११७५-१२५०) ग्रंथातील नोंदिप्रमाणे शंख, पद्म, गदा, चक्र या आयुध क्रमाची ही विष्णू मूर्ती नारायण मूर्ती ठरते.

रामटेक

रामटेक : (ता. रामटेक, २१°१५' उ., ७८°३५' पू.) नागपूर जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण असून परिसरातील एक महत्त्वाचे धार्मिक श्रध्दास्थान, ऐतिहासिक वारसा असलेले तीर्थक्षेत्र व व्यापारी पेठ म्हणून याला महत्त्व आहे. रामटेक शहर नागपूर-जबलपूर या

राष्ट्रीय महामार्गावर पूर्वेस असलेल्या मनसर या स्थानापासून ७ कि. मी. अंतरावर एका उपरस्त्यावर आहे. नागपूर शहरापासून ४९ कि. मी. अंतरावर हे स्थान आहे. नागपूरवरून राज्य परिवहनच्या बसने प्रवास करणे सोयीस्कर ठरते. शहर सातपुडा पर्वताच्या अंबागड नावाने ओळखल्या जाणाऱ्या पर्वतरांगेमध्ये आहे. या पर्वतरांगेतील टेकडीच्या पश्चिमेकडील शेवटच्या टोकावर आहे. टेकडीचा दक्षिण आणि पश्चिमेकडील भाग नैसर्गिकरित्या झीजला असल्यामुळे त्याचे दोन उंच सुळके दूरवरूनच दृष्टीस पडतात. रामटेक टेकडीची उंची समुद्रसपाटीपासून ४२७ मीटर आहे. टेकड्यावर जाण्यासाठी अनेक वाटा आहेत. उत्तरेच्या बाजूने बराचसा रुंद रस्ता आहे. त्याने तटाच्या उत्तर दरवाजापर्यंत जाता येते. पश्चिमेच्या बाजूने दोन मार्ग आहेत. त्यापैकी एक फरसबंदी पायऱ्यांचा असून दुसरा मार्ग पश्चिमेच्याच बाजूने धुम्रेश्वराच्या देवालयाजवळ जाऊन नंतर पूर्वेकडून येणाऱ्या फरसबंदी वाटेस मिळतो. तिसरा मार्ग पूर्वेच्या बाजूने अंबाला तळ्याजवळून गडावर जातो. सर्व मार्गापैकी हा मार्ग सोईस्कर आहे. रामटेक येथे गड, मंदिरे व अन्य स्मारके आहेत. त्यांच्या पायथ्याशी रामटेक शहर वसले आहे. या टेकडीला राम टेकडी म्हणून ओळखतात. याच स्थानाचे प्राचीन नाव सिंधुगिरि, तपोगिरि असेही आहे. ही दोन्हीही नावे रामटेक येथील लक्ष्मण मंदिराच्या सभामंडपात असलेल्या शिलालेखात दिली आहेत.

दुसऱ्या पृथ्वीसेनाच्या मांढळ ताम्रपटामध्ये या स्थानाचा उल्लेख रामगिरि असा आहे. वा. वि. मिराशी यांच्या मते कालिदासाच्या 'मेघदूतातील रामगिरि' हेच रामटेक होय. वाकाटक राजवटीत या स्थानाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. त्यांच्या राजधानीचे केंद्र काही काळ याठिकाणी होते. प्राचीनकाळी हे तटबंदीयुक्त वसलेले नगर असून तेथे अनेक मंदिरे, प्रासाद आणि जलाशयाची निर्मिती करण्यात आली. स्थानमहात्म्यनुसार हे स्थळ रामाच्या पदस्पर्शाने पुनित झाले आहे. त्यामुळे रामगिरि हे नाव प्राप्त झाले. विष्णुने हिरण्यकश्यपूस ठार करण्यासाठी येथे नरसिंह अवतार घेतला व त्याची आठवण म्हणून येथे केवलनरसिंह मंदिर दाखविले जाते. वाकाटक राणी प्रभावतीगुप्ता आणि यादवराजा रामचंद्रदेव यांचे शिलालेख येथे आहेत. वाकाटक, यादवकालीन आणि उत्तरकालीन अनेक वास्तूंचे अवशेष या परिसरात आढळतात.

या स्थानाला वाकाटकपूर्व काळापासून ते उत्तर मध्ययुगीन काळापर्यंत सलग इतिहास लाभला असून त्या त्या काळातील इतिहासाची साक्ष देणारी स्मारके येथे पाहावयास मिळतात. रामटेकचे प्राचीनत्व अगदी रामायण काळापर्यंत जाते व त्यामुळेच रामटेक मंदिरात राम व लक्ष्मणाच्या मूर्ती पुरातन वनवासी वेशातील आहेत. या स्थानाविषयी असलेल्या आख्यायिकेप्रमाणे त्रेतायुगानंतर श्री रामचंद्र वनवासात असताना रामगिरिवर आले होते. येथे अगस्ति मुनींचा आश्रम असल्याचे दाखविले जाते. टेक या शब्दाचा अर्थ प्रतिज्ञा असाही होतो. रामचंद्रांनी या स्थानावर असलेल्या राक्षसांचा अंत करण्याची प्रतिज्ञा पूर्ण केली असे मानले जाते म्हणून या गावास रामटेक असे म्हणतात. वा. वि. मिराशी यांनी रामायणातील शैवलागिरि या स्थानाचे वर्णन रामटेकशी जुळणारे आहे असे म्हटले आहे. या संदर्भात शंबूकाचे कथानक त्यांनी सांगितले आहे. या स्थानाबद्दल 'बृहद्सिंधुगिरि' महात्म्य यामध्ये रामटेक येथील तपोगिरि व सिंधुगिरि या दोन नावांशिवाय महाशैवल या नावाचा उल्लेख मिळतो. रामटेक

येथील लक्ष्मण मंदिराच्या मुख्य सभामंडपात कोरलेल्या शिलालेखात नरसिंहाने आपल्या तीक्ष्ण नखाग्राने हिरण्यकश्यपूचे वक्षस्थळ फाडले व त्यामुळे प्रवाहित झालेल्या रक्तामुळे हा प्रदेश माखला गेला. तेव्हापासून याला सिंधुगिरि म्हणू लागले अशी कथा दिली आहे. (मिराशी, वा. वि., **मेघदूतातील रामगिरि अर्थात रामटेक,** विदर्भ संशोधन मंडळ, ग्रंथमाला क्रमांक ११, नागपूर १९५८, या ग्रंथाच्या आधारे.) तसेच ती कथा 'बृहद्सिंधुगिरि महात्म्यातही' आहे. रामटेक या स्थानी प्रसिध्द कवि कुलगुरु कालिदास याने आपल्या 'मेघदूतात' काव्याची रचना केली. याविषयी मिराशी यांनी आपल्या मेघदूतातील रामगिरि ग्रंथात येथील चर्चा केली आहे. 'मेघदूत' या सुप्रसिध्द खंडकाव्याच्या प्रारंभी रामगिरिविषयक वर्णन दिलेले आहे. या स्थानाला इ ाालेल्या रामचंद्रांच्या पदस्पर्शाची नोंद पाहावयास मिळते. (मिराशी, वा. वि., **मेघदूतातील रामगिरि अर्थात रामटेक,** विदर्भ संशोधन मंडळ, ग्रंथमाला क्रमांक ११, नागपूर १९५८, या ग्रंथाच्या आधारे., पृ. ७६.)

कश्चिन्ताविरहगुरुणा स्वाधिकारात्प्रमत्त। शापेनास्तंगमितमहिमा वर्षभोग्येण भर्तु :
यक्षश्चक्रे जनकतनयास्नानपुण्योदकेषु स्निग्धच्छायातरुषु वसतिं रामगियश्रिमेषु ।।१।।

'मेघदूता'तील प्रारंभिक श्लोकामध्ये सीतेच्या न्हानीची नोंद आहे. यावरून ऐतिहासिक काळाच्या प्रारंभापासून या स्थानाशी राम कथेचा आलेला संबंध सर्वज्ञात असावा असे वाटते. रामगिरि नावाची अनेक स्थाने भारताच्या इतर प्रदेशात असली तरी नागपूर जवळील रामगिरि कालिदासाला अभिप्रेत होते हे आता सर्वमान्य झाले आहे.

वाकाटक काळापासून येथे धार्मिक वास्तूशिल्पाच्या निर्मितीची सुरुवात झाली असे दिसते. वाकाटक काळात रामटेक येथे रामकथेशी संबंधात अनेक वास्तूंची निर्मिती झाली. द्वितीय रुद्रसेनची राणी प्रभावती गुप्ता ही प्रामुख्याने यास कारणीभूत होती. ही स्वत: परमभागवत गुप्त सम्राट चंद्रगुप्ताची मुलगी असून परमवैष्णव होती. तिने आपला अल्पवयस्क पुत्र दिवाकरसेन याचे युवराजत्वाच्या तेराव्या वर्षी दिलेल्या पुणे ताम्रपटात स्वत:करीता ''अत्यंत भागवत भक्त'' असे विशेषण लावल्याचे दिसते. ती ज्या भगवंताची भक्त होती तो राम होय. प्रभावती गुप्ताच्या ऋद्दिपूर ताम्रपटातील लेख रामगिरिस्वामीच्या पादमुलातून देण्यात आले होते. त्या काळात रामटेक येथे रामाशी संबंधित अनेक वास्तूंची निर्मिती झाली असावी. वाकाटकांच्या मांढळ ताम्रपटामध्ये नोंदवल्याप्रमाणे प्रभावती गुप्ताचे निधन झाले तेव्हा तिच्या स्मृतिप्रित्यर्थ प्रभावती गुप्तास्वामी नावाच्या देवळाची निर्मिती करण्यात आली. रामटेक येथील केवलनरसिंह मंदिरात नव्याने उपलब्ध झालेल्या शिलालेखातून या बाबीला पुष्टी मिळते. या देवळाची निर्मिती तिच्या अजातनामणी पुत्री व पुत्र (द्वितीय प्रवरसेन संभवत:) प्रवरसेनद्वारा करण्यात आली होती असे लेखावरून ध्वनीत होते. तिच्या तीन पुत्रांपैकी दामोदरसेन याचे नाव विष्णुच्या एका नावापैकी होय. पृथ्वीसेनाच्या अलिकडे नव्याने मांढळ येथे सापडलेल्या ताम्रपटात रामगिरि स्थानातून दाने दिल्याची नोंद आहे. या सर्व नोंदीवरून वाकाटक काळामध्ये रामटेक हे प्रमुख प्रशासकीय केंद्र आणि धार्मिक तीर्थक्षेत्र म्हणून विकसित होत होते असे दिसते. वाकाटकांच्या नंतरसुध्दा ही परंपरा चालू राहिली. यादव काळात येथे अनेक वास्तूंची निर्मिती करण्यात आली. रामटेक आणि त्याच्या परिसरात यादव काळात विकसित झालेल्या वास्तू, मंदिरे व तीर्थस्थानाची नोंद आपल्याला यादव सम्राट रामचंद्रदेव

याच्या रामटेक येथील शिलालेखात उपलब्ध होते. हा शिलालेख लक्ष्मण मंदिराच्या सभामंडपात आहे. याच काळामध्ये महानुभवपंथ संस्थापक चक्रधरस्वामी येथे आल्याची नोंद मिळते. विशेषत: भोगराम मंदिरामध्ये त्यांचा निवास होता. यादवानंतरच्या काळातसुध्दा या स्थानाला सतत महत्त्व प्राप्त झाले.

गोंड राजवटीमध्ये अंबाला परिसरात काही मंदिरांची निर्मिती झाली. भोसले काळात गडावरील वास्तूंची दुरूस्ती करण्यात आली. तटाचा विकास करण्यात आला. गडाचा पहिला दरवाजा विशाल असून तो पहिल्या रघोजीराजे भोसले यांनी बांधला. इ. स. १७३६ च्या सुमारास रघोजीराजे भोसले यांनी येथे भेट दिली. तसेच त्याला देवगडच्या स्वारीत मिळालेल्या यशामुळे रघोजीराजेनी १७५३ मध्ये येथील यादवकालीन मंदिरात नव्याने मूर्तीची प्रतिष्ठापना केल्याचे नागपूरकर भोसलेंच्या शकावलीवरून समजते. भोसले काळात रामटेकवरील देवळांची दुरूस्ती तसेच पूजा-अर्चा कायमस्वरूपी लावण्याचा प्रयत्न झाला. अगदी विसाव्या शतकामध्ये या स्थानाचा विकास होताना दिसतो तो कालिदासाचे स्मारक व राज्य पुरातत्व विभागाकडून झालेल्या उत्खनन व संशोधनामुळे. मूलत: रामटेकच्या इतिहासाची साधने म्हणून ज्याचा उल्लेख करता येईल त्यामध्ये कालिदासाचे 'मेघदूत' काव्य, या स्थानाचा उल्लेख असलेले विविध वाकाटक राजांचे ताम्रपट व शिलालेख, राष्ट्रकूट व कलचूरी राजांच्या काळातील लेख तसेच लक्ष्मण मंदिरातील यादवकालीन शिलालेख अशा कितीतरी साधनांचा उल्लेख करता येतो. अभिलेखीय साधनांशिवाय ज्याला स्थलमहात्म्य म्हणून नोंदवता येईल असे 'बृहत्सिंदूगिरी-महात्म्य' तसे महानुभव 'लीळाचरित्र' व 'स्थानपोथी' आदी ग्रंथ यांचा उपयोग या स्थानाचा परिचय करून घेताना होतो. अनेक प्रकारचे पुरातत्वीय व साहित्यिक पुराभिलेख यांच्या सहाय्याने वा. वि. मिराशी यांनी या संदर्भामध्ये स्वतंत्रपणे उल्लेखनीय काम केले आहे. या पार्श्वभूमीवर या परिसरातील स्मारकांचा परिचय करून घेता येईल.

१) रामटेक येथील गड : या स्थानाला प्रशासकीय महत्त्व प्राप्त होत गेले. तसतसा परिसरातील मंदिर व प्राकारांचाही विकास होत गेला. रामगिरि या नावाने प्रसिध्द असलेला या टेकडीवरील गड हा साधारणपणे वाकाटक काळापासून विकसित होत असावा. आज दिसणाऱ्या तटाची भिंत ओबडधोबड पध्दतीने बनविलेल्या चिरेबंदी दगडांची असून काही ठिकाणी ती भग्नावस्थेत आहे. या गडाच्या संदर्भात ज्या दंतकथा प्रचलित आहेत त्याप्रमाणे विदर्भामध्ये गवळ्यांचे राज्य असताना त्यांनी हा गड बांधला असे मानले जाते. अर्थात मिराशीनी केलेल्या संशोधनानंतर वाकाटक काळापासून या स्थानाचे महत्त्व वाढत गेल्याचे स्पष्ट दिसते. रामटेक जवळील गडाला दोन बाजूने निसर्गदत्त तटबंदी उपलब्ध झाली आहे. टेकडीच्या दोन्ही बाजू तासल्या गेल्यामुळे ही तटबंदी दिसते. वाकाटक काळामध्ये रामटेक परिसराचे लष्करी महत्त्व लक्षात घेऊन तटांची निर्मिती झाली असावी. यादव काळामध्ये या तटबंदीचा पुन्हा वापर करण्यात आला असावा. गडाच्या दक्षिण आणि पश्चिमेकडे सरळसोट कडा तुटलेला असल्यामुळे तेथे वेगळे बांधकाम करण्याची आवश्यकता नव्हती. तर उत्तर आणि पूर्व दिशेने चढाव कमी असल्याने तेथे एकात एक असे दोन तट उभारलेले दिसतात. त्यापैकी बाहेरील तट हा लांबच लांब असून तो गडाला वळसा घालून अंबाला तळ्यापर्यंत बांधलेला आहे. बाहेरील तटाच्या आत पहिला रघुजी भोसले यांनी अठराव्या

शतकात बांधलेला दुसरा उंच तट आहे तो सध्या चांगल्या स्थितीत असून भोसले राजवटीमध्ये नागपूरकर भोसल्यांचा दारूगोळा या गडावर ठेवण्यात येत होता. या स्थानावर वाकाटक काळामध्ये प्रभू रामचंद्रांच्या पादुकांची प्रतिष्ठापना करण्यात आली असे अभिलेखीय नोंदीवरून म्हणता येईल. येथील निसर्गदत्त सौंदर्याने भारावून जाऊन कुलगुरू कालिदास यांनी काव्यनिर्मिती केली असावी. गडावरील मंदिरांची संपूर्णपणे सार्वजनिक न्यास म्हणून १९६८ मध्ये नोंद करण्यात आली आहे. तर या परिसरातील काही मंदिरे राज्य व केंद्रीय पुरातत्व विभागाच्या वतीने संरक्षित स्मारके म्हणून घोषित करण्यात आली आहेत. या स्थानावर ऑक्टोबर ते जानेवारी या चार महिन्यांमध्ये भाविक व पर्यटक मोठ्या संख्येने प्रतिवर्षी येतात. येथे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने निवास व्यवस्थाही केली आहे. या परिसरातील स्मारकांची क्रमशः माहिती पाहणे उपयुक्त ठरेल. किल्ल्याच्या संदर्भामध्ये असे म्हणता येईल की, पहिली प्रमुख तटबंदी, नंतर निर्माण झालेली अठराव्या शतकातील भोसलेकालीन तटबंदी जी आज चांगल्या स्थितीत आहे. या किल्ल्यातील बालेकिल्ल्याचा भाग व परिसरातील मंदिरे तसेच गडावर येताना येथे एक मशीद असून ती औरंगजेबाच्या राजदरबारातील कोणा एका व्यक्तीच्या स्मरणार्थ उभारली गेली. (मिराशी, वा. वि., **मेघदूतातील रामगिरि अर्थात रामटेक,** विदर्भ संशोधन मंडळ, ग्रंथमाला क्रमांक ११, नागपूर, १९५८, पृ. ९.)

रामझरोका : रामटेक गडावर जाताना भोगराम मंदिराच्या नंतर आतील तटास सिंहपूर (सिंगणापूर) दरवाजा लागतो. तो ओलांडल्यावर आपण दुसऱ्या प्रशस्त अशा दरवाजातून प्रवेश करतो. या भागात भोसल्यांचा तोफखाना आणि दारूगोळा ठेवला जात असे. याच्या पलीकडे भैरव दरवाजा नावाचा दुसरा एक प्रवेशमार्ग आहे, येथे भैरवाची एक मूर्ती दाखवतात, या दरवाजातून आपण तिसऱ्या चौकात प्रवेश करतो, या चौकाच्या सभोवताली आक्रमण झाल्यास तटावरून मारा करण्यासाठी तटास माऱ्याच्या जागा ठेवलेल्या आहेत. तटबंदीचा हा भाग अद्याप चांगल्या स्थितीत आहे. याच भागात परिसरातील मंदिराच्यासाठी जो सेवकवर्ग आहे त्यांची घरे आहेत. डाव्या बाजूस नगारखाना व जवळच राधा-कृष्णाचे मंदिर आहे. हे मंदिर तसेच भैरवाचा उल्लेख येथील यादवकालीन शिलालेखात मिळतो. यापुढील भागात गोकुळ दरवाजा आहे व राममंदिराच्या पुढे मागील बाजूस असलेल्या सज्जास रामझरोका म्हणतात. त्या पलीकडे गेल्यास एक तोरण बांधलेले आहे. त्याच्या पश्चिम भागात गणेशाची एक मूर्ती बसवलेली आहे. पूर्वेच्या अर्ध्या भागावर कबीरपंथी आपला हक्क सांगतात.

रामटेक येथे गडावर धार्मिक उत्सव मोठ्या समारंभपूर्वक होतात. येथे त्रिपुरी पौर्णिमेस आणि नंतर रामनवमीच्या वेळेस हा उत्सव असतो. यावेळी मोठ्या प्रमाणात भक्तजन व पर्यटक येतात. शंकराने त्रिपुरासूर नावाच्या राक्षसाचा वध केला त्याच्या स्मृतिप्रित्यर्थ प्रतिवर्षी त्रिपुरी पौर्णिमेस रामचंद्र मंदिरांच्या शिखरावर पितांबर जाळण्यात येतो. या उत्सवातील हा एक महत्त्वाचा भाग मानला जातो. गडाच्या पायथ्याशी व गडावर दोन्ही परिसरामध्ये विविध काळात उभारण्यात आलेली मंदिरे आहेत.

२) रामटेक येथील प्राचीन मंदिरे : रामटेक येथे राज्य पुरातत्व विभागाने १९८१ ते

१९८३ या काळात केलेल्या जतनविषयक कामामुळे येथे मूलत: उभ्या असलेल्या मंदिरांची प्राचीनता स्पष्ट झाली. रामटेक येथे यादवपूर्व काळातील मंदिरे ही केवळ प्राचीनतेच्या दृष्टीने महत्त्वाची ठरतात असे नव्हे तर ती शैलीच्या दृष्टीनेही महत्त्वाची आहेत. भारतीय कला इतिहासामध्ये अभिजात म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गुप्त कलेचे केंद्र उत्तर भारतामध्ये गुप्त सम्राटाच्या आणि त्यांच्या मांडलिकांच्या उदार आश्रयातून उदयास आली. दख्खनमधील अजिंठा येथील स्थापत्य, शिल्पकला या अभिजात परंपरेचा काहीसा वैशिष्ट्यपूर्ण असा फरक लक्षात घेऊन सुध्दा यामधील दुवा म्हणून रामटेक येथील देवळांचे विशेष असे महत्त्व आहे. रामटेक येथील मंदिरे, अजिंठा येथील वाकाटककालीन लेणीच्याही अगोदरची मानली जातात. आज महाराष्ट्रातील मंदिरांची प्राचीनता विशेषत: पाषाणातील घडीव मंदिरांची प्राचीनता केवळ रामटेकमुळे जवळपास सहा शतकांनी मागे नेता येते. येथील मंदिरांच्या स्थापत्याचे वैशिष्ट्य असे की, एकाच तलविन्यासावर सर्व मंदिरे न उभारता प्रत्येक वेळी काही वेगळे निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. इसवी सनाच्या चौथ्या शतकात उभारण्यात आलेल्या या वास्तू तत्कालीन शैलीची साक्ष देतात.

येथील मंदिरांचे तलविन्यास आणि मंदिर बांधणीसाठी अवलंबिलेले तंत्र पाहिले तर या ठिकाणी राजस्थपतींनी स्थापत्यांचे निरनिराळे प्रयोग करून पाहिले असे लक्षात येईल.

गुप्तराम मंदिर : गुप्तराम मंदिराचा तलविन्यास अगदी साधा असून (६.०५ मीटर पूर्व-पश्चिम x ३.४७ मीटर दक्षिणोत्तर आकाराचा) त्यात गर्भगृह (२.६५ मीटर पूर्व-पश्चिम x ३.४७ मीटर दक्षिणोत्तर) व मंडपाचा (२.३५ मीटर पूर्व-पश्चिम x ३.४५ मीटर दक्षिणोत्तर) समावेश होतो. गर्भगृह आणि अर्धस्फुट अंतराळाला चार स्तंभ असून पुढील दोन स्तंभ मंडपाच्याच भिंतीचे भाग बनले आहेत. उरलेले दोन अर्धस्तंभ गर्भगृहाच्या प्रवेशाच्या दोन बाजूस आहेत. मंडपाच्या स्तंभाच्या हस्तावर असलेल्या तुळ्या मंडपाचे चतु:स्तंभी स्वरूप स्पष्ट करतात. स्तंभ विवक्षितपणे वाकाटक प्रकारचे असून चौरस तळखडा, खांब, त्याच्या वरच्या बाजूस नेहमी जिथे कमलतबक (Lotus Medialliaon) असते त्या जागी पट्ट आणि पटाच्या वर हस्त असे या स्तंभांचे घटक आहेत.

वराह मंदिर : वराह मंदिर हे तौलनिकदृष्ट्या साधे मंदिर असून चार रुचक प्रकारचे स्तंभ असलेला मंडप असे त्याचे स्वरूप आहे. मंदिर २.६५ मीटर लांबीच्या चौरस जगतीवर उभे असून मंदिरात जाण्यासाठी पायऱ्यांची योजना आहे. चौरस स्तंभ दोन कमलतबकांनी सुशोभित केलेले आहेत. या दोन कमलतबकांमध्ये एक छोटा अष्टकोनी आणि षोडशकोनी असे भाग आहेत. स्तंभांच्या वर चार साधे हस्त असून त्यांच्यावर तुळई आहे. तुळईच्या आतील बाजूस पद्मपत्राची नक्षी कोरलेली आहे. या प्रत्येक स्तरावरील चार तुळ्या (lantern) एकमेकांना छेदतील असे छत असून एका चौरसात आणखी एक चौरस दोन शिलास्तरांनी बनलेले आहेत. छताच्या आतील भागाला दाट चुन्याचे हात देऊन गिलावा करण्यात आला आहे. जतनाचे काम चालू असता एक आमलक सापडला आहे. त्याकाळातील प्रचलित शैलीप्रमाणे छताच्या वरच्या बाजूस चार कोपऱ्यात चार लहान आमलक बसविले गेले असावेत आणि हा सापडलेला आमलक या चार आमलकांपैकी एक असावा असा निष्कर्ष काढता येतो.

अनुक्रमणिका

त्रिविक्रम मंदिर : हे मंदिर सध्या भग्नावस्थेत आहे. केंद्र सरकारच्या भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने हे मंदिर "राष्ट्रीय संरक्षित स्मारक" म्हणून घोषित केले आहे. या ठिकाणी पूर्णाकाराची मोठी त्रिविक्रमाची मूर्ती आहे. या मूर्तीमुळेच या मंदिराला त्रिविक्रम मंदिर हे नाव दिले गेले असावे. मंदिराच्या अवशेषांची वास्तुवैशिष्ट्ये आणि काहीशा तुटलेल्या आणि झीज झालेल्या मूर्तीची शैली यावरून हे मंदिर वाकाटककालीन आहे असे निश्चितपणे म्हणता येईल. मंदिराचा पुढचा खुला मंडपच टिकून आहे. गर्भगृह पूर्णपणे पडून गेले आहे. मंडप, खुर, कुंभ आणि वेदिका असे तीन थर असलेल्या पीठावर स्तंभिकांनी बनला आहे. या स्तंभिकांवर मंडपाच्या तुळ्या आहेत. मंडपाच्या पुढच्या दोन कोपऱ्यात नेहमीचे वाकाटक शैलीचे स्तंभ आहेत. मात्र या स्तंभांवर कमलतबक दिसून येत नाही. तथापि, दोन कमलतबकांच्या मधल्या भागात दिसणारे छोटे अष्टकोनी आणि षोडशकोनी भाग दिसून येतात. वेदिका आणि कक्षासनावर असलेल्या वामन-स्तंभांवरील अलंकरण उल्लेखनीय आहे. वेदिका खोलगट देवकोष्ठ आणि अर्धस्तंभांच्या पटाने अलंकृत करण्यात आली आहे. देवकोष्ठकांमध्ये गण दाखविले आहेत आणि अर्धस्तंभांवर फुलांची नक्षी आहे. वेदिकेवरील वामनस्तंभांचे तळखडे पूर्णकुंभांचे असून कुंभांच्या तळाजवळील प्रवेशभागात पुष्पहार दाखवला आहे. पूर्णकुंभावर खांब असून हे खांब अर्धकमलतबकांनी अलंकृत केले आहेत. अष्टकोनी भागासह असलेले हे वामनस्तंभ स्तूपासभोवताली असलेल्या कठड्यांच्या खांबांची आठवण करून देतात. या उलट रुचक स्तंभांवर असलेल्या तुळ्या मात्र बाहेरून मौक्तिकजालांनी आणि आतील बाजूस सिंहमुखांनी अलंकृत केलेल्या आहेत. छत सपाट म्हणजेच समतलवितान प्रकारचे आहे. त्याच्यावर लाकडासारखी पटई बनविण्यात आली आहेत.

केवलनरसिंह मंदिर : हे मंदिर सध्याच्या कालिदास स्मारकाच्या परिसरात असून या टेकडीवरील इतर सर्व प्राचीन मंदिरांप्रमाणेच याही मंदिराचा भोसल्यांच्या काळात दुरूस्ती आणि जीर्णोध्दार करण्यात आला होता. जीर्णोध्दार करताना या मंदिरात बांधण्यात आलेले वाढीव घटक काढून टाकल्यानंतर मूळ वाकाटककालीन मंदिराचा तलविन्यास तर स्पष्ट झालाच, पण त्याशिवाय मंडपाच्या आतील बाजूस दक्षिणेकडील भिंतीवर १५ ओळींचा प्रभावतीगुप्ताचा प्रशस्ती लेखही सापडला. मंदिराच्या समतलवितानावर आढळणारी पुसट कमलतबके आणि त्याचप्रमाणे पावसाच्या पाण्याचा निचरा करणारे, आज वापरात नसलेले दगडी प्रणाल यावरून छताच्या खाली वाकाटककालीन मंदिर जसेच्या तसे शाबूत आहे असे म्हणता येईल. मूळ मंदिराच्या छप्परावर जीर्णोध्दार करताना ०.९१ मीटर उंचीचा चुनेगच्ची थर टाकण्यात आला आहे. मूळचे वाकाटककालीन शिखर आज अस्तित्वात नाही. मंदिर पश्चिमाभिमुख असून त्याच्या तलविन्यासात आतून समान रुंदी असलेल्या स्तंभांच्या आणि अर्धस्तंभांच्या प्रत्येकी एक जोडीने विभक्त केलेल्या गर्भगृह आणि मंडपाचा समावेश होतो. मंदिर जगतीवर बांधलेले असून मंदिरात जाण्यासाठी पायऱ्यांची व्यवस्था आहे. मंदिराचे प्रवेशद्वार इंग्रजी "टी" अक्षराच्या आकारासारखे असून द्वारशाखांवर प्रत्येक बाजूस खालच्या बाजूस एक व त्याच्याच वर तीन अशी कोष्ठे आहेत. खालच्या बाजूस असलेल्या देवकोष्ठांमध्ये धनाच्या पिशव्या उलट्या करून नाणी ओतणारे गण दाखविले आहेत तर त्यांच्या वरील बाजूस असलेल्या एकूण सहा कोष्ठकांमध्ये निरनिराळ्या स्थितीत उभे असलेले गण दाखविले आहेत. खालच्या बाजूला असलेल्या कोष्ठांतील गण वरच्या कोष्ठातील

गणांपेक्षा आकाराने मोठे आहेत. गर्भगृहापेक्षा लक्षणीयपणे लहान असलेल्या मंडपाच्या तिन्ही बाजूस खालच्या द्वार पातळीवर वेदिकापट असून त्यात छोटी देवकोष्ठे आणि अर्धस्तंभ एकामागून एक येतात. या वेदिकेच्या वर एक आणि खाली एक असे पद्मपत्रपट्ट आहेत. गर्भगृहाच्या बाह्य भिंतीच्या मध्यावरही अशाच तऱ्हेची वेदिका आहे. हे अलंकरण त्रिविक्रम मंदिराच्या मंडपाच्या बाह्यांगावर आढळणाऱ्या अलंकरणाशी खूपच मिळतेजूळते आहे. अर्धस्तंभावर रत्नपटांची नक्षी असून त्यातील मोकळ्या जागेत फुलांची नक्षी आहे.

गर्भगृह आयताकार असून त्याच्या दोन बाजूस गवाक्षे आहेत. गवाक्षांवर स्तंभजालिका आहेत. गर्भगृहामध्ये मूर्तीभोवती प्रदशिणापथ आहे. गर्भगृहाच्या मध्यभागी चार खांबाच्या किंवा चतुष्कीच्या मधली जागा व्यापणारा चौथरा आहे व त्यावर केवलनरसिंहाची मूर्ती आहे.

गर्भगृहाच्या पुढच्या बाजूस असलेल्या मंडपालाही असेच अंकण (म्हणजे आयताकृती चौथरा व त्यावर चतुष्की) असून त्यावर चतुष्कीचे चार स्तंभ आहेत. गर्भगृह आणि मंडप दोन स्तंभ आणि दोन अर्धस्तंभ यांच्या ओळींनी विभक्त केलेले आहेत. गर्भगृह आणि मंडपात असलेल्या अंकणाच्या चतुष्कीचे स्तंभ सपाट पृष्ठभागाचे असून ते बेसॉल्टमध्ये (Trap Rock) आहेत तर गर्भगृहाला मंडपापासून स्वतंत्र करणारे स्तंभ वालुकाश्माचे (Sand Stone) आहेत. मंडपाच्या स्तंभांवर लसूनशीर्षे असून त्यावरील हस्तांवर तुळ्या आहेत. वरच्या भागाच्या दोन टोकांवर आडवे किंवा भूमिसमांतर "मरकतमाणिक्यपट्ट" आहेत. आतील स्तंभही तलविन्यासात चौरसाकृती आणि वरच्या भागातील तबकालंकरणाचा अपवाद वगळता साधे सपाट आहेत. छतावरील कमी उठावात कोरलेली कमलतबके उल्लेखनीय आहेत. वालुकाश्माचे स्तंभ त्रिविक्रम मंदिरातील वामनस्तंभांप्रमाणेच अलंकृत आहेत. हे स्तंभ खांबावरील (Shaft) किंवा स्तंभमध्यावरील आडव्या नाजुक नक्षीकामाच्या पट्टाने सजविले आहेत. या नक्षीकामात रत्नपट्टांचा समावेश होतो. रत्नपट्टांच्या खाली मौक्तिकजाल आणि त्याच्याही अर्धपुष्पकोषाच्या नागमोडी लाटा दाखविल्या आहेत. क्वचित प्रसंगी मधल्या भागात रत्नपट्टाऐवजी पुष्पपत्रे दाखविली आहेत. मधल्या भागात रत्न आणि गोलकांचा पट्ट आहे.

रुद्रनरसिंह मंदिर : रुद्रनरसिंह मंदिरही एका जगतीवर (१५.७० मीटर पूर्व-पश्चिम x १०.३० मीटर दक्षिणोत्तर) उभे असून त्यांची जास्तीत जास्त रुंदी ७.१० मीटर व लांबी ११.४० मीटर आहे. केवलनरसिंह मंदिराप्रमाणेच याही मंदिराला सांधार गर्भगृह आणि मंडप आहे. गर्भगृह आणि मंडप या दोहोंमध्ये मध्यभागी चतुष्की असून त्याखाली अंकण आहे. मंदिराच्या मूळ जमिनीच्या पातळीवर साठलेला मलबा काढून टाकल्यानंतर मंदिराचा तलविन्यास स्पष्ट झाला. त्याचप्रमाणे मंदिराच्या पडून गेलेल्या भिंतीवर (Fallen walls) बांधण्यात आलेल्या सध्याच्या भिंती अत्यंत घाईगर्दीने उभारण्यात आल्या असून त्या बांधताना बाह्यरेषेशी सुसंगतता राखण्याची काळजीही घेतलेली दिसत नाही. या भिंती बहुधा मराठा-काळात उभारण्यात आल्या असाव्यात.

मातीचा भराव काढण्याचे काम चालू असताना एक जुने मकरप्रणालही सापडले आहे. सध्या केलेल्या जीर्णोध्दाराची बाह्यरेषा मंदिराच्या मूळ बाह्यरेषेशी काही अंशी मिळतीजुळती नसली तरी या मंदिराला अंगे प्रत्यंगे मिळून दहा पुढे आलेले भाग (Projections) आणि

आठ पाण्याची कुंडे असावीत असा निष्कर्ष काढता येतो. ही पाण्याची कुंडे जगतीच्या खालच्या पातळीवर आहेत. दहा पुढे आलेल्या भागांपैकी आठ भाग मंदिराच्या कोनांवर आहेत आणि दोन भाग मध्यभागी आहेत. या पुढे आलेल्या भागाचे प्रयोजन काय होते आणि या भागांवर देवप्रतिमा होत्या की नाही हे आज निश्चितपणे सांगता येणार नाही. मात्र ती आठ कुंडे देवमूर्तीवरील अभिषेकजल साठविण्यासाठी असावीत असे वाटते. अशाप्रकारे रूद्रनरसिंह मंदिराच्या तलविन्यासाच्या बाह्यांगात विकास झालेला आढळतो. हा विकास बहुदा अनेक विधींच्या गरजा भागविण्यासाठी घडून आला असावा. मंडपात जाण्यासाठी असलेल्या द्वारावर नंतर बसविण्यात आलेले मध्ययुगीन द्वार काढून टाकल्यानंतर मूळचे साधे द्वार उघडकीस आले. या द्वारांच्या शाखांवर द्वारशाखांच्या तळाशी गणमूर्ती आहेत, पण केवलनरसिंह मंदिरातील गणांप्रमाणे हे गण धनाच्या पिशव्या ओतणारे नसून त्यांच्या हातात फक्त दंड आहे. या मंदिरातील मंडप (५.५५ मीटर दक्षिणोत्तर x ४.४० मीटर पूर्व-पश्चिम) आणि गर्भगृह (५.५५ मीटर दक्षिणोत्तर x ४.९० मीटर पूर्व-पश्चिम) यांना विभक्त करणारे स्तंभ आणि अर्धस्तंभ केवलनरसिंह मंदिराप्रमाणे लाल दगडात घडविलेले नाहीत. परिणामत: हे स्तंभ कमालीचे साधे सपाट आहेत.

या मंदिराच्या भिंती भोसले काळात नव्याने बांधण्यात आल्या असल्यामुळे केवलनरसिंह मंदिराप्रमाणे याही मंदिरात मंडपाच्या आणि गर्भगृहाच्या भिंतीच्या खालच्या भागात वेदिका आणि गर्भगृहाला दोन बाजूंनी जलवातायने होती किंवा नाही हे आज निश्चितपणे सांगता येणार नाही. **(राज्य गॅझेटिअर : स्थापत्य व कला,** (खंड १, भाग-२) महाराष्ट्र शासन, मुंबई २००२, पृ. १२५-१३१.)

भोगराम मंदिर (महानुभाव पंथ संस्थापक श्री चक्रधरस्वामी यांनी रामटेक येथील स्थानांना भेटी दिल्या होत्या याविषयीची नोंद **लीळाचरित्र** आणि **स्थानपोथी** या ग्रंथातून आली आहे. येथील नोंदीप्रमाणे भोगराम मंदिराशी श्री चक्रधरांचा संबंध आला असून या परिसरातील एकूण २० स्थानांची नोंद आपणास पाहावयास मिळते. विशेषत: सीतेच्या न्हाणीचा उल्लेख जो मेघदूतातील "जनकतनयास्नान-पुण्योदकेषु आश्रयेषु" या वर्णनाशी जुळणारा आहे. **स्थानपोथीत** भोगराम व गुप्तराम यांची देवालये आणि सेंन्दुरवावी व कापुरवावी याची नोंद पाहावयास मिळते. विशेष म्हणजे या बारवांचे उल्लेख येथील यादवकालीन शिलालेखात सुध्दा पाहावयास मिळतात. यासंबंधीची निश्चित नोंद अशी. भोगरामी अवस्थान मांस : भोगरामू पूर्वाभिमूख : दक्षिणिले भींतीसिं रीगतां डावेया हाता पुर्व पसीम उत्तराभिमुख ओटा : तेथ गोसावियांसी अवस्थान : दोन्हीं देऊळांची संदि : संदी पसीमे बोनेबाइयांची गुंफा : जवळीचि बैरवांची देउळी पटिसाळ; जगतीचा दारवठा : उत्तराभिमुख.....भोगरामा इसान्ये : रामां पूर्वे सेंदूरवावी ।। उत्तरें कापुरवावि ।। गांवा पुढे दुरूस्त आंबाळे ।।.....रामाचे देउळ पूर्वाभिमुख : रामाचेया देउळा पुढे लक्ष्मणाचे देऊळ पुर्वाभिमुख : लक्ष्मीमनाचेया देउळा दक्षीने न्हाणि : न्हानिये उत्तरे आसन : न्हाणि सीतेची ।। भोगरामीची स्थाने ।। [कोलते वि. भि. (संपा) स्थानपोथी (मलकापुरी) प्र. आ. १९५६]. पृ. ५.) : भोगराम मंदिर वराह-मंडपाच्या समोर असून मंदिरात जाण्यासाठी पायऱ्यांची योजना आहे. मंदिराच्या धोपटून सपाट बनविलेल्या प्रांगणाभोवती असलेली भिंत आधुनिक काळात बांधलेली असली तरी पूर्वी त्याच जागी मूळ सीमाभिंत असावी असे मानण्यास जागा आहे. या मंदिराला दोन गर्भगृहे आहेत व ती मधल्या चिंचोळ्या जागेत विभक्त झाली आहेत. मात्र या दोन गर्भगृहांना एकच लंबचौकोनाकृती मंडप आहे. मंडपाच्या पुढे मुखमंडप असून तो एकूण सहा स्तंभांच्या ओळीने काही प्रमाणात

पेलला गेला आहे. मुखमंडपातील स्तंभ साधे चौरस स्तंभ असून त्यांचे तळखडे चौकोनी ठोकळ्यासारखे आहेत. खांबांच्या वरच्या बाजूस अष्टकोनी भाग असून त्याच्यावर वाकाटक शैलीतील साधे हस्त आहेत. या स्तंभांवर तबके आढळत नाहीत हे येथे मुद्दाम नमूद केले पाहिजे. प्रत्येकी दोन स्तंभजाल वातायने असलेल्या या दोन गर्भगृहाच्या बाह्यांगावर सर्व बाजूंनी साध्या सपाट थरांच्यावर वेदिकापट्ट आहे. मंडपाच्या बाह्यांगावर त्रिविक्रम मंदिराच्या बाह्यांगावर आहे तशाच प्रकारचा अर्धस्तंभ आणि कोष्ठे आलटून पालटून आल्यामुळे बनलेला (गलपाद) पट्ट आहे. कोष्ठांमध्ये निरनिराळ्या स्थितीत उभे असलेले गण दाखविले आहेत. तर अर्धस्तंभ रत्नपट्टांची किनार असलेल्या कल्पलतांनी अलंकृत केले आहेत. अशाच प्रकारचा पट्ट गर्भगृहाच्या बाह्यांगावरही आहे. एका गर्भगृहावरील अशा पट्टातील कोष्ठात अधोमुखी झेप घेणारी मगर दाखविली आहे. मुखमंडपात त्याच्या तिन्ही बाजूंनी प्रवेश करता येतो आणि त्याच्या मागील भिंतीतील दोन पुढे आलेल्या भागांमध्ये एक देवकोष्ठ असून सध्या ते रिकामे आहे. या मंदिराची दोन गर्भगृहे तलविन्यासासारखी भासली तरी त्यांच्या मोजमापात किंचित फरक आहे.

मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळील छताच्या भागात असलेल्या कमलतबकावरून सध्या असलेले छत हे मूळचेच छत आहे असे अनुमान काढता येईल. गर्भगृहातील मूळ मूर्ती आज अस्तित्वात नाहीत. गर्भगृहाच्या मागील भिंतीला लागून असलेल्या कट्ट्यावर आज यादव काळात घडविलेल्या मूर्ती आहेत. मंडपाच्या अंकणावर केवलनरसिंह आणि रुद्रनरसिंह मंदिरांप्रमाणेच उंच कट्ट्यावर मूर्ती होत्या असे दिसते. आज त्या अस्तित्वात नाहीत.

रामटेकच्या टेकडीवरील शुष्कसांधी दगडी मंदिरे अनेक तऱ्हांनी आगळीवेगळी आहेत. पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे महाराष्ट्रातील शुष्कसांधी मंदिर स्थापत्यतंत्राची प्राचीनता उत्तर भारतातील काही प्रांतांमध्ये इ. स. च्या सहाव्या शतकाइतकीच मागे जाते हे या मंदिरांनी सिध्द केले आहे. ही मंदिरे उजेडात येण्याआधी अंबरनाथ येथील इ. स. १०६० मधील अंबरनाथ मंदिरच महाराष्ट्रातील अशाप्रकारचे सर्वात प्राचीन मंदिर आहे अशी पुरातत्वज्ञांची धारणा, होती. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे अन्यत्र कुठेही, अगदी गुप्त राजाच्या मुलुखातही या मंदिराशी तुलना करता येईल अशी मंदिरे एकाच जागी इतक्या संख्येने बांधलेली आज तरी आढळत नाहीत. त्याचप्रमाणे या मंदिरातील शिल्पांची वैशिष्ट्यपूर्ण शैली आणि केवलनरसिंह मंदिरात सापडलेल्या प्रभावती गुप्ताचा प्रशस्तीचा शिलालेख यावरून ही मंदिरे इ. स. च्या पाचव्या शतकात बांधली गेली असे निःसंशयपणे सांगता येते. तिसरी महत्त्वाची बाब म्हणजे येथील स्थपती मंदिराच्या तलविन्यासाची आखणी करण्याच्या बाबतीत खूपच सर्जनशील आणि कल्पक होते. त्यांनी या मंदिराची बांधणी करताना अगदी हेतुपुरःस्सरपणे दोन भिन्न प्रकारच्या दगडांचा वापर केला होता.

मूर्तिशास्त्रीय दृष्टिकोनातूनदेखील या मंदिरामध्ये महाराष्ट्रातील सर्वाधिक प्राचीन वैष्णव मूर्ती होत्या.

वाकाटककालीन मूर्तीशिल्प : रामटेक आणि त्याच्या परिसरातील मूर्तीमध्ये बऱ्यापैकी झीज झालेली त्रिविक्रमाची अष्टभुज मूर्ती वाकाटककालीन असल्याची माहिती वा. वि. मिरार्शीच्या लिखाणामुळे अगोदरच उजेडात आली होती. रामटेक येथे केलेल्या जतनकामात

केवलनरसिंह आणि रुद्रनरसिंहाच्या मूर्तीचे मूळ स्वरूप उजेडात आले. साफसफाईचे काम चालू असता दोन महाकाय द्वारपालांचा शोध लागला. त्रिविक्रमाच्या मूर्तीची खूपच झीज झाली असल्याने तिच्या मूर्तिशैलीच्या वैशिष्ट्यांचा शोध घेण्यासाठी खूप बारकाईने निरिक्षण करावे लागले. तथापि, येथील वराह आणि दोन नरसिंह मूर्तीवरील शेंदूर आणि तेलाचे थर काढून टाकल्यानंतर त्यांच्या शैलीची वैशिष्ट्ये आता स्पष्ट झाली आहेत. हे केवलनरसिंहाचे स्वरूप वाकाटकांच्या राज्यात खूपच लोकप्रिय असावे असे दिसते. या अशा तऱ्हेच्या मूर्ती नंतरच्या काळात देवगड (मध्य प्रदेश) येथे आहेत. अशाच धाटणीचे केवलनरसिंह असलेले पट (Plaques) नागपूर जिल्ह्यात नगरधन आणि नांदपूर, वर्धा जिल्ह्यातील पवनार येथे आढळले आहेत. या मूर्तीवर फारसे श्रीमंती दागदागिने किंवा वस्तू नाहीत. हा सिंहमुखी केवलनरसिंह राजासारखा बसला आहे. भक्तांच्या मनात त्याच्याबदल आदर आणि दबदबा निर्माण करण्यासाठी शिल्पकाराला या मूर्तीला आणखी हात देण्याची आवश्यकता भासली नाही. केवलनरसिंहाने पायाचा एक गुडघा किंचित उंचावला असून त्यावर त्याचा चक्रधारी हात विसावला आहे, तर दुसरा हात दुमडलेल्या पायाजवळ भक्कमपणे विसावला आहे. एक कंठी आणि पाठीवर रूळणारे केस बांधणारी रत्नमाला हे दोन दागिने सोडले तर मूर्तीवर अन्य कोणतेही दागिने नाहीत. या दोन नरसिंहमूर्ती भारतातील अभिजात शिल्पकलेच्या उच्चतम अभिव्यक्ती आहेत. त्याच टेकडीवर पाच आमलक आणि कलशाने युक्त अशा साध्या मंडपात राजेशाही थाटात उभ्या असलेल्या वराहाची मूर्ती आहे. ही मूर्ती वाकाटक शिल्पींची एक श्रेष्ठ कलाकृती आहे. ही महाकाय वराहमूर्ती बेसॉल्टच्या दगडात खोदलेली असून नितळ कोरीव अवयवांद्वारे तिचे ऐश्वर्य दिसून येते. या मूर्तीवर अलंकरणात्मक प्रयोजने नाहीत किंवा त्यातील पशुशरीराचे तपशील काटेकोरपणे दाखविण्याची काळजी घेतलेली नाही. हा देवाचा अनावृत्त अवतार खोल पाण्यातील नागाच्या वेटोळ्यावर उभा असून त्याने स्वत:च्या नाकाडावर मानवी रुपातील पृथ्वीला पेलले आहे. या तीन मूर्ती त्याचप्रमाणे रामटेक येथील त्रिविक्रम, पवनार येथील बुध्द व रुद्रनरसिंह मंदिरात सापडलेले महाकाय द्वारपाल या मूर्ती पूर्वेकडील वाकाटक कलेच्या उच्चतम अभिव्यक्ती आहेत. प्रस्तरलेखांच्या आणि कलात्मक पुराव्यांवरून या मूर्ती इ. स. च्या पाचव्या शतकाच्या पहिल्या चतुर्थकातील आहेत असे म्हणता येईल. **(राज्य गॅझेटिअर : स्थापत्य व कला,** (खंड १, भाग २) महाराष्ट्र शासन, मुंबई २००२, पृ. २३७-२३८.)

धूम्रेश्वर मंदिर : अंबाला तलावाच्या बाजूने गडावर चढत असताना डाव्या बाजूस धूम्रेश्वरचे देवालय चौथऱ्यावर बांधले आहे. या स्थानासंबंधी ज्या आख्यायिका प्रचलित आहेत त्याप्रमाणे हे स्थान शंबूकाशी संबंधित आहे. रामायणाशी संबंधित या कथानकाप्रमाणे धूम्रेश्वरनामक शिवलिंगाचे प्रथम दर्शन घेऊन नंतर गडावरील श्रीरामाच्या दर्शनास जातात. याच स्थानाचा उल्लेख यादवकालीन शिलालेखात सुध्दा आलेला आहे. यावरून स्थानाच्या संबंधी रूढ असलेली कथा यादवपूर्व काळापासून प्रचलित असावी. आज उभे असलेले मंदिर हे भोसलेकालीन असून मंदिराचे बांधकाम एका चौथऱ्यावरील गर्भगृह व त्यावरील पुढील मंडप अशा द्विविधानातील असून गर्भगृहावर पिरॅमीड आकाराचे शिखर आहे.

लक्ष्मण मंदिर : रामटेक गडावरील राममंदिर नंतर महत्त्वाचे असलेले दुसरे मंदिर म्हणजे

लक्ष्मणस्वामीचे मंदिर होय. हे राममंदिराच्या समोर स्वतंत्रपणे बांधलेले मंदिर असून पूर्वाभिमुख मंदिर आहे. सामान्यत: राम मंदिरातच राम, लक्ष्मण व सीतेच्या मूर्ती असतात. येथे मात्र लक्ष्मणाचे स्वतंत्र मंदिर आहे हे विशेष. वनवासात असताना लक्ष्मण नेहमी पुढे चालत असून त्यामागून सीता व राम असतात यासारख्या रामायणातील वर्णनावरून गडावरील मंदिराची रचना झालेली दिसते. मंदिरातील लक्ष्मणाची मूर्ती ही वनवासी वेशातील व यादव शैलीतील आहे, भूमीज स्थापत्य शैलीला जवळचे असलेले हे मंदिर गर्भगृह, अंतराळ, सभामंडप अशी रचना असून मंदिराचा बाहेरील प्रवेशद्वाराचे दरवाजे पितळेच्या पत्र्याने व गर्भगृहाचे दरवाजे चांदीच्या पत्र्यात बनविलेले आहेत. मंदिरावर नागर शिखर आहे. सभामंडप हा आठ स्तंभांवर उभा असून सभामंडपाच्या प्रवेश दरवाजाच्या उजव्या बाजूच्या भिंतीवर यादव राजा रामदेवराय (इ. स. १२७१ ते १३१२) याच्यावेळचा शिलालेख कोरलेला आहे. ही लेखशिळा काहीशी भग्न झालेली असून यावर यादव नृपति रामचंद्रदेव व वंशावळ तसेच रामटेक गडावरील पुढील मंदिर व तीर्थस्थानाचा उल्लेख मिळतो.

रामेश्वर, घंटेश्वर, सुधेश्वर, केदारेश, आंजनेय, शंखतीर्थ, अग्नितीर्थ, अंबतीर्थ, वरुणतीर्थ, शुक्लतीर्थ, नृसिंहतीर्थ, कुरुक्षेत्र, लक्ष्मीतीर्थ, हंसतीर्थ, चक्रतीर्थ, धनुतीर्थ, पितृतीर्थ, वाजिमेध, कलिपा नदी, सूरनदी, मणिकालकुंड, मोक्षकुंड, रामतीर्थ, सिंदूरवापी, कर्पूरवावी, गजेंद्रवदन, धर्मेश्वर, धूम्राक्ष, मुक्तीश्वर, गोपाल, आदिकोल, दशरथ, कुशलव, महाभैरव, चंद्रमौलि, भोगराम, गुप्तराम, शंखराम याची स्थलनिश्चिती करण्याचा प्रयत्न वा. वि. मिराशी यांनी रामटेकवरील पुस्तकात केला आहे.

राम मंदिर : राम आणि लक्ष्मणाच्या मंदिरामध्ये केवळ दोन-तीन मीटर इतकेच अंतर आहे. या मंदिरामधील रचनेत साम्य आहे. रामाचे मंदिर नागर प्रकारचे असून पुढच्या बाजूस मुखमंडप (२.७० मीटर x १.४५ मीटर) आणि दोन बाजूस दोन अर्धमंडप आहेत. बाजूचे अर्धमंडप (३.२० मीटर x २.७० मीटर) मुखमंडपापेक्षा आकाराने मोठे आहेत. पुढे मुखमंडप आणि दोन बाजूला अर्धमंडप असलेला मंडप, त्याच्यामागे काहीसे अंतराळ (३.५० मीटर x १.५० मीटर) आणि चौरस गर्भगृह असा मंदिराचा तलविन्यास आहे. सध्या मंदिराच्या व्यवस्थापन समितीने दक्षिणेकडील अर्धमंडपाचे स्ट्रॉंगरूममध्ये रुपांतर केले आहे. गर्भगृहाच्या बाह्यरेषेचा तलविन्यास पंचरथ प्रकारचा आहे. गर्भगृहावर शिखर-शेखरी प्रकारचे नागर शिखर आहे. मंडपावर घूमटाकार छत आहे. गर्भगृहाचे दरवाजे चांदी व पितळेने मढवलेले आहेत तर शिखरावर वारंवार दिलेल्या चुन्याचे थर आढळतात.

वाकाटककाळामध्ये गडावर रामचंद्रांच्या पादुकांची पुजा केली जात असे. या पादुकांची प्रतिष्ठापना वाकाटक राणी प्रभावतीगुप्ता हीच्या काळात झाली याविषयीचा उल्लेख ऋध्दपूर येथे सापडलेल्या ताम्रपटात आला आहे. "रामगिरिस्वामीन् पादमूलात्" म्हणजे रामगिरिवरील भगवान रामचंद्रांच्या पादुकाजवळ अभिलेखातील दाने दिली गेली. प्रभावतीगुप्ताचा द्वितीय पुत्र प्रवरसेन याच्याही ताम्रपटामध्ये भगवान पादमूल असा उल्लेख येतो. वा. वि. मिराशी यांच्या कालीदासाच्या 'मेघदूता'तील निर्वाचित यक्ष रामटेक येथेच राहात असावा. या काव्यातील नोंदीप्रमाणे "वंद्यै : पुसां रघुपतिपदैरडि : कृत मेखलासु" (भगवान रामचंद्रांच्या पुज्य पादुकांनी पावन झालेला) असे वर्णन 'मेघदूतात' आहे. याच वर्णनाआधारे असे म्हणता

येईल की, वाकाटककाळात रामटेकवर पादुकांची पुजा होत असे, तसेच विष्णुच्या विविध मूर्तींच्या स्थापना करण्यात आल्या होत्या. रामटेकवरील एक महत्त्वाचे स्थान म्हणजे राममंदिर असून आज उभे असलेले मंदिर तेराव्या शतकातील आहे. तथापि, मंदिरातील मूर्तीची पुन:स्थापना प्रथम रघुजी भोसले यांच्या काळात इ. स. १७५३ मध्ये करण्यात आली याविषयीची नोंद नागपूरकर भोसले यांच्या शकावलीवरून मिळते. याचवेळी रामटेक कसबा व परगणा देवस्थान तीर्थोपाध्ये यांना दिल्याचे समजते. रघुजी भोसले प्रथम याला देवगड स्वारीत मिळालेल्या विजयानंतर त्याने जयपूरवरून या नवीन मूर्त्या मागविल्या. तथापि, या नवीन मूर्तीची प्रतिष्ठापना करण्याऐवजी अचानकपणे शरयू नदीत मिळालेल्या मूर्त्यांची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली याविषयीची नोंद उपलब्ध आहे. (मिराशी, वा. वि. **मेघदूतांतील रामगिरि अर्थात रामटेक,** वि. सं. मं. सर, क्र. ११, नागपूर, १९५८, पृ. १४, १५.)

कर्पूरवापी : कर्पूरवापी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या पायविहिरीचा उल्लेख लक्ष्मणस्वामी मंदिरातील यादवकालीन शिलालेखात आहे. तसेच तो उल्लेख महानुभावांच्या 'स्थानपोथी'त आला आहे. कर्पुरवापी हे गडाच्या पूर्व बाजूच्या उतारावरून येत असताना लागते. कर्पूरवापीचा आकार १३.७० x १३.७० मीटर आहे. या परिसरात काही यादवकालीन मंदिरे होती असे येथील उपलब्ध अवशेषांवरून वाटते. यापैकी एक देऊळ ढासळलेल्या स्थितीत उभे असून या देवळात पाच देवकुलीका आहेत. या सर्वावर लहानलहान शिखरे असून त्याच्यासमोर एक आयताकार मंडप स्तंभाच्यावर उभा आहे. या मंदिराच्या समोर या बारवेची निर्मिती करण्यात आली. मंदिराचा आयताकार मुखमंडप जलाशयाच्या सभोवताली असलेल्या मंडपासारखाच असून तो ढासळलेल्या स्थितीत उभा आहे. मंदिरामध्ये एक सप्तमातृकापट्ट आढळतो.

सिंदूरवापी : भोगराम मंदिराच्या ईशान्येस व रामंदिराच्या पूर्वेस असल्याची नोंद 'स्थानपोथी'त आहे. यादवकालीन शिलालेखात याची नोंद आहे. ही बारव गडावरील नरसिंह मंदिराच्या ईशान्येस आहे व याविषयीची नोंद 'सिंधुगिरि' महात्म्यात आढळते. आता "सेंदूरबावली" म्हणून ओळखतात.येथून पिण्यासाठी व पुजेसाठी पाणी घेण्यात येते.

सीतेची न्हाणी : लक्ष्मण मंदिराच्या डाव्या बाजूस काही पायऱ्या उतरल्यावर पाण्याचे कुंड लागते, त्याला सीतेची न्हाणी म्हणून संबोधतात. याही स्थानाचा उल्लेख 'स्थानपोथी'त आहे. तसेच कालिदासाने रामगिरिवरील आश्रमाचे वर्णन करताना "जनकतनयास्नानपुण्योदकेषु" (ज्यामधील जल सीतादेवीच्या स्नानामुळे पवित्र झाले आहे) अशा शब्दात केली आहे. या वर्णनातील हे स्थळ असावे अशी मिराशी यांची धारणा आहे. एकूण याठिकाणी आज उभ्या असलेल्या सिंदूरवापी आणि सीतेची न्हाणी या वास्तू यादव कालखंडातील म्हणजे तेराव्या शतकातील आहेत. या परिसरामध्ये 'बृहत्सिंदूरगिरिमहात्म्यांत' यादवकालीन स्थानांपैकी घंटेश्वर, सुधेश्वर, केदारेश्वर, अंजनेय यांची मंदिरे होती असे दिसते.

धर्मेश्वर देवालय : धर्मेश्वराचे लहानसे देवालय लक्ष्मण मंदिराच्या दक्षिणेस आहे. या मंदिरामध्ये हरिहरेश्वर व लक्ष्मीनारायणाच्या मूर्ती आहेत.

कालंका देवी (कालिका) मंदिर : कालंका या नावाने ओळखले जाणारे हे मंदिर गडमंदिरावरील वाकाटककालीन मंदिरांच्या नंतरच्या काळात निर्माण झालेले पण शिल्प स्थापत्याचा एक महत्त्वाचा टप्पा दर्शविणारे मंदिर आहे. मंदिर पूर्वाभिमुख असून त्याचा तलविन्यास अगदी साधा आहे. गर्भगृह आणि त्यापुढील मंडप अशी या वास्तूची रचना असून हा संपूर्ण बंदिस्त म्हणजे गुडमंडप आहे. अर्थात मंडप उत्तरकालीन आहे. या मंदिराच्या चारही बाजूंना सीमाभिंती उभारण्यात आलेल्या आहेत. मंदिराचे संपूर्ण बांधकाम वालुकापाषाणात आहे. मंदिराचा आकार पूर्व-पश्चिम ६.५० मीटर व उत्तर-दक्षिण ५.१० मीटर आहे. मंदिरावरील शिखर हे पिरॅमीडच्या आकाराप्रमाणे टोकाकडे लहान होत जाणारे असून शालाशिखर आहे. [हे शालाशिखर दोन्ही बाजूने बहिर्वक्र होत जाणारे असून याला गजपृष्ठाकृती शैलीतील काम असेही म्हणता येते.] पुरातत्वज्ञांच्या मते ही वास्तू राष्ट्रकूट काळातील असून साधारणपणे सातव्या व आठव्या शतकातील असावी. हे मंदिर केंद्रिय पुरातत्व विभागाने संरक्षित स्मारक म्हणून घोषित केले आहे. मात्र गर्भगृह आणि सभामंडपाच्या भागात संगमरवर बसविला असल्यामुळे त्याचे मूळ स्वरूप लुप्त झाले असून मंदिरातील दुर्गेची मूर्ती ही संगमरवरी असून साधारणत: विसाव्या शतकाच्या प्रथमार्धात बसविण्यात आली असावी. नवरात्रौमध्ये देवीचा मोठा उत्सव असतो.

रामटेक येथील जैन मंदिरे : रामटेक येथे शैव, वैष्णव, सौर, गाणपत्य, शाक्त या सांप्रदायाची मंदिरे आढळतात. त्याचप्रमाणे येथे जैन मंदिरेसुध्दा आहेत. ही मंदिरे गावाच्या पूर्वेस टेकडीच्या पायथ्याशी आहेत. रेल्वे स्टेशनपासून साधारणपणे ५ कि. मी. अंतरावर आणि बस स्थानकापासून २ कि. मी. अंतरावर पूर्वेस ही मंदिरे आहेत. शांतीनाथ, पार्श्वनाथ, अजितनाथ, सुपार्श्वनाथ, अदिनाथ, नेमीनाथ, चंद्रप्रभू इत्यादि तीर्थंकारांची मंदिरे या परिसरात आहेत. मंदिराच्या या परिसरात भव्य असे प्रवेशद्वार आहे. प्रवेशद्वारावरील भागात भगवान शांतीनाथाचे लांछन हरीण दर्शविले आहे. प्रवेशद्वारातून आत गेल्यास प्रथम मानसस्तंभाचे दर्शन होते. हा भाग २४ X १२ मीटरच्या पाषाणातील सीमाभिंतीने संरक्षित केला आहे. या स्थानाबद्दल काही आख्यायिका रूढ आहेत. या मंदिर संकुलाची निर्मिती साधारणपणे अठराव्या शतकात म्हणजे भोसले कालखंडात झाली.

शांतिनाथ मंदिर : दिगंबर जैन मंदिर समुहातील हे प्रमुख मंदिर असून मंदिराची रचना गर्भगृह, अंतराळ व त्यापुढील सभामंडप अशा पध्दतीची आहे. मंदिरावर शंक्वाकृती (पिरॅमीड) आकाराचे शिखर आहे. मंदिरामध्ये शांतीनाथाची ४.१५ सें. मी. उंचीची कायोत्सर्ग मुद्रेतील समपाद मूर्ती उभी आहे. शांतीनाथाच्या मागे प्रभावलय व शीर्षावल छत्र वक्षस्थळावर श्रीवत्स अंकित आहे. पादपीठावर हरीण लांछन कोरले आहे. ही मूर्ती तेराव्या शतकातील असावी. सन १९६५ मध्ये मूर्तीवर वज्रलेपन करण्यात आले. मंदिरास संगमरवरी दगड बसविल्यामुळे मूळ स्थापत्य स्पष्ट होत नाही.

पार्श्वनाथ मंदिर : गर्भगृह आणि त्यापुढे मंडप अशी या मंदिराची रचना असून येथील सभामंडप ४० स्तंभांवर उभा आहे. गर्भगृहाच्या बाह्यांगावर जगतीपासून थेट शिखराच्या कळसापर्यंत भौमित्तिक नक्षीचे अलंकरण आहे. मंदिरावर दोन शिखरे असून संपूर्ण मंदिराचे बांधकाम फिकट गुलाबी रंगाच्या वालुकापाषाणात केले आहे. गाभाऱ्यात पार्श्वनाथ, महावीर आणि चंद्रप्रभू या तीर्थंकारांच्या मूर्त्या आहेत.

सुपार्श्वनाथ मंदिर : याची रचना गर्भगृह, अंतराळ आणि मंडप अशा पध्दतीची आहे. पार्श्वनाथ मूर्ती साधारणपणे ६२ सें. मी. उंचीची आहे. याशिवाय येथे आदिनाथ, ममुनिसव्रताची मूर्ती आहे. मंदिराच्या बाह्यांगावर भौमित्तिक नक्षीचे अलंकरण असून शिखरावरील देवकोष्ठात सुपार्श्वनाथाची मूर्ती आहे. तसेच मिथूनशिल्प, योगीनी यासारखे भारवाहक शिल्पांचे अंकण मंदिरावर पाहावयास मिळते. फिकट गुलाबी रंगाचे वालुकापाषाणात हे मंदिर उभारले आहे. मंदिर प्रवेशद्वाराच्या ललाटबिंबावर नरसिंहाचे शिल्प कोरले आहे.

आदिनाथ : सुपार्श्वनाथ, पार्श्वनाथ मंदिर, नेमिनाथ मंदिर अशी स्वतंत्र लहान-मोठी मंदिरे असून मेरू मंदिर म्हणजे एकावर एक गोलाकार सज्जे तयार करून उभारलेले मंदिर आहे. सर्वात वरील सज्जावर आठ स्तंभानियुक्त अष्टकोनी छत्री आहे. या शिखरावर चंद्रप्रभू तीर्थंकारांची मूर्ती बसविण्यात आली आहे.

मानसस्तंभ : १९२२ मध्ये या मंदिर संकुलासमोर मानसस्तंभाची निर्मिती करण्यात आली आहे. याची उंची १६ मीटर असून उत्तमप्रकारचा वालुकापाषाण उपयोगात आणला आहे. स्तंभाच्या सर्वात वरील भागाच्या शीर्षस्थानी चतुष्की असून त्यात चारही दिशेने शांतीनाथाच्या मूर्ती बसविलेल्या आहेत. एकूण येथील जैन मंदिरांचा समूह हा उत्तर मध्ययुगीन काळात विकसित झालेला एक चांगला मंदिरसमूह असून दिगंबर जैन परिवार मंदिराचे विश्वस्त असून प्रवाशांसाठी निवासव्यवस्था असलेली धर्मशाळाही आहे. दरवर्षी कार्तिक शु. १३ ते १५ या काळात यात्रा भरते.

कालिदास स्मारक : महाराष्ट्र शासनाच्या वतीने रामटेक येथे कवि कुलगुरू कालिदास यांचे स्मारक उभारण्यात आले आहे. ही एक अत्यंत आकर्षक वास्तू असून या बांधकामास १० डिसेंबर, १९६८ मध्ये प्रारंभ झाला व १२ डिसेंबर १९७३ मध्ये हे काम पूर्ण होऊन तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते त्याचे विमोचन करण्यात आले. उत्कृष्ट अशा वालुकापाषाणात उभारण्यात आलेल्या या स्मारकासाठी रु. ३,५९,००० इतका खर्च आला असून ते स्मारक नट, कवि, साहित्यीक यांचे प्रेरणास्थान म्हणून उभे आहे. ही वास्तु वर्तुळाकृती असून तिला तीन प्रवेश व तीन गवाक्षे आहेत. गवाक्षे आणि प्रवेशद्वार यांच्यामध्ये प्रत्येकी एक १.२१ x १.८२ मीटर आकाराची सहा भव्य चित्रे प्रदर्शित करण्यात आलेली आहेत. वालुकापाषाणातील पिवळसर रंगाच्या भिंती, फरशी आणि छत जे गुलाबी रंगछटा असलेल्या आतल्या बाजूस असलेले काळ्या तुळतुळीत रंगाचे नक्षीकाम साधे पण सुडौल आकाराचे आहे. (स्तंभ व त्यावर उभारण्यात आलेले छत, छताला असलेल्या घुमूटाच्या माथ्यावर पितळेच्या साखळीत लावण्यात आलेला तांब्याचा कलात्मक असा लामणदिवा, गवाक्षांना नाजूक नक्षीकाम असलेली लोखंडी जाळी आणि प्रवेशद्वारांना पॉलिश केलेले लाकडी मजबूत दरवाजे, प्रत्येक गवाक्षाच्या खालील बाजूस मोकळ्या असलेल्या जागेत सिमेंटची बैठक केलेली आहे. हेतू असा की या बैठकीवर बसून चित्रांचा आनंद घेता यावा). वास्तूच्या या कलात्मक रचनेतून ही वास्तू केवळ चित्रांसाठीच उभारली आहे असे प्रतीत होते. वास्तूचे बाह्यांग जितके प्रेक्षणीय आहे त्याहून अधिक चित्रांच्या आणि वास्तूच्या रंगसंगतीमुळे अंतरभाग मनोवेधक झाला आहे.

रामटेक येथे कालिदासाने 'मेघदूताची' रचना केली. वाकाटक काळातील कालिदासाची रामटेकवरील अस्तित्वाची स्मृति घेऊन आज हे स्मारक उभे आहे. कालिदास हा

कलात्मक सौंदर्याचा उत्कट भावनांचा सुक्ष्म संवेदनांचा वेध घेऊन त्या अभिव्यक्त करणारा श्रेष्ठ कवि होता. तेव्हा कालिदासाच्या रचना चित्रबध्द करून त्यांचे कलात्मक दर्शन घडविण्याचा प्रयत्न कालिदास स्मारकात करण्यात आला आहे. येथे प्रदर्शित करण्यात आलेल्या चित्रांमध्ये वासुदेव स्मार्त याने "रघुवंश" चित्रित केले. त्याने जैन लघुचित्रात आढळतात त्याप्रमाणे चित्राचे तीन भाग पाडून तीन प्रसंग रंगविले आहेत. चित्रात खालच्या भागात लग्नविधीचे चित्रण आहे. मंगलकलश, होमाग्नि या पार्श्वभूमीवर सूर्य-चंद्र चित्रित करून मंगलप्रसंग सूचीत केले आहेत. दिनेश शहा, "कुंभार संभव" याचे चित्रण केले आहे. या चित्रात शिवपार्वतीच्या विवाहाचे चित्रण आहे. चित्र एकसंघ असले तरी त्यात सुमारे आठ प्रसंग चित्रित केलेले दिसतात. त्यामुळे या चित्रात शंकराच्या आणि पार्वतीच्या प्रत्येकी चार प्रतिमा दाखविण्यात आल्या आहेत. "मालविकाग्निमित्र" याचे चित्रण पुण्याच्या शांताराम कामत याने केले आहे. वामन करंजकर यांने "विक्रमोर्वशीयचे" चित्रण केले आहे. या शैलीवर बंगाली पध्दतीचा प्रभाव जाणवतो. आधुनिक भारतीय चित्रकलेमध्ये मुरली लाहोटी यांच्या चित्राची गणना होते. त्याने आधुनिक शैलीमध्ये "मेघदूतावरील" चित्र तयार केले आहे. "अभिज्ञानशाकुंतल" याचे मनोहरी चित्रण मधु पोकळे याने केले आहे. "ऋतुसंवाद" वगळता कालिदासाच्या सहा कलाकृतींचे या स्मारकात चित्रण करून ठेवले आहे.

कालिदासाच्या काव्यात्मक कलाकृतीचे कलात्मक चित्रण चित्रित करण्याचा प्रयत्न या सर्व चित्रकारांनी आपापल्या कुवतीप्रमाणे केला आहे त्यामुळे हे स्मारक एक वैशिष्ट्यपूर्ण स्मारक ठरते.

ओंकार उद्यान : कालिदास स्मारक परिसराला लागूनच वैधानिक विकास मंडळाने केलेल्या अर्थसाह्यातून रामटेक येथे ओंकार आकाराचे एक उद्यान विकसित करण्यात आले असून त्यामुळे या पर्यटन क्षेत्राच्या वैभवात वाढ झाली आहे.

अंबाला तलाव : रामटेक डोंगर रांगात अर्धवर्तुळाकार टेकडी असून त्याच्या खोलगट भागात अंबाला तलाव निर्माण झाला आहे. रामटेकपासून ३ कि. मी. अंतरावर गडाच्या पूर्वेकडील पायथ्याशी अंबाला हा निसर्गरम्य जलाशय आहे. या जलाशयाच्या काठावर ध्यानधारणा व ज्ञानदान करणाऱ्या ऋषींचे आश्रम प्राचीन काळात असत. आज अस्तित्वात असलेला तलावाचा घाट पहिल्या रघोजी भोसल्याने बांधला. या तलावाचा बांध (पाळू) दगडात बांधला असून त्याच्या सभोवताली पायऱ्या आहेत. अलीकडेच नगरपालिकेने या तलावाची दुरूस्ती करून नव्याने पायऱ्या तयार केल्या आहेत. तलावात कित्येक वर्षापासून साचलेला गाळ मागील दशकात काढण्यात आला आहे. तलावाच्या किनाऱ्यावर अनेक मंदिरे व छत्री स्वरुपात स्मृतिस्मारके उभारलेली आहेत. प्रधान स्मारकांची एकूण संख्या ३३ आहे. यात बरीच मंदिरे गोंड व भोसले काळातील असून काही त्यानंतरची आहेत. या मंदिरांचे प्रतिबिंब तलावातील पाण्यात पडते तेव्हा एक नयनरम्य दृश्य दिसते. या मंदिरांपैकी एक मंदिर सूर्यदेवतेचे आहे. या स्थानाविषयी अनेक कथानके रूढ आहेत. त्यामध्ये अंबा नावाच्या एका सूर्यवंशी राजपुत्राने या जलाशयात स्नान केले व त्याचा त्वचारोग नष्ट झाला अशी श्रध्दा आहे. या राजाच्या नावावरून त्याने बांधलेल्या या जलाशयाला अंबाला तलाव असे

नाव पडले. या स्थानावर श्रध्देचा एक भाग म्हणून मृतांच्या अस्थि व रक्षा विसर्जन करण्यात येतात. या स्थानाचे पावित्र्य गंगेच्या पाण्याइतकेच मानले जाते. येथे असलेल्या विविध घाटांपैकी दशक्रीया घाट म्हणून एक भाग ओळखला जातो. येथे एकूण आठ घाट असून त्यांनाच अष्टतीर्थ मानतात. शंखतीर्थ, अग्नितीर्थ, अंबूतीर्थ, वरूणतीर्थ, मुक्ततीर्थ, नृसिंह तीर्थ यासारखी या तीर्थस्थानांची नावे आहेत. रामटेक गाव आणि परिसरात मिळून एकूण २७ तलाव आहेत व त्यापैकी अनेक जलाशयांना धार्मिकदृष्ट्या वेगळे महत्त्व आहे. अंबाला जलाशयाच्या पश्चिम किनाऱ्यावर मंदिर समूह असून या मंदिर समुहात सूर्यमंदिर, पंचमुखी महादेव मंदिर ही विशेष जागृत स्थाने मानली जातात. पहिला रघुजी भोसले हा पंचमुखी महादेव मंदिरात रुद्राभिषेक करीत असे. उत्तर दिशेस पाच कळस असलेले एक मंदिर आहे. अंबाकुंडास प्रदक्षिणा घातल्यानंतर पहिले रघुजीराजे या मंदिरात विश्रांती घेत. अंबाला तलावाचे परिक्षेत्र १,३३,५०० चौ. मी. चे आहे. आज उभ्या असलेल्या वास्तू ह्या प्रामुख्याने भोसले काळात विकसित झाल्या असून याच काळात या स्थानाचे महत्त्व वाढले. या जलाशयालगत अंबाला या नावाने वसलेली एक छोटी वस्ती आहे. या स्थानावर मोठ्याप्रमाणामध्ये कर्मकांड करणारे पांडे यांची वस्ती आहे, शिवाय गोवारी, कुणबी, माळी, ठाकूर या जमातीचे लोकही येथे राहतात. येथे प्राचीन काळापासून मरणोत्तर दशक्रीयासारखे विधी होतात. अनेक घराण्यातील पूर्वजांच्या याद्या येथील पांड्यांकडे नोंदवहीत पाहावयास मिळतात. येथील मंदिरसमुहामध्ये ब्राह्मण, मराठा, ठाकूर या समाजाने बांधलेल्या मंदिरांबरोबरच चांभार जमातीचे एक महादेव मंदिर, दत्त मंदिर व धर्मशाळा आहे. या परिसरात असलेल्या एकूण स्मारकांचा क्रमवारीने विचार करायचा झाल्यास राज्य पुरातत्व विभागाने त्यावर नोंदविलेले क्रमांक विचारात घेता क्रमांक एक व त्यानंतर असलेल्या पश्चिमेकडील मंदिराचा क्रमांक विचारात घेऊन शेवटचा क्रमांक हा भूतलेश्वर व त्यालगतच्या महादेव मंदिरास दिला आहे. पुरातत्व विभागाने दिलेल्या क्रमांकाच्या अनुषंगाने या मंदिरांची नोंद घेता येते. ही स्थाने राज्य पुरातत्व विभागाने संरक्षित केली आहेत.

अंबाला दरवाजा : रामटेकपासून ३ कि. मी. अंतरावर अंबाला दरवाजा आहे. या दरवाजास काशी दरवाजा असेही म्हणतात. हे प्रवेशद्वार इ. स. अठराव्या शतकात भोसल्यांच्या काळात उभारण्यात आले. दरवाजाचे बांधकाम वालुकापाषाणात व विटात केलेले असल्यामुळे त्यांची जुडाई चुन्यात केलेली आहे. प्रवेशद्वार हे गोलाकार असून त्यांच्या दोन्ही बाजूला दोन कक्ष आहेत. प्रवेशद्वारावर उत्तर-दक्षिण भागात प्रत्येकी एक देवकोष्ठ असून त्यात गरुड व गणेशाचे शिल्प आहे, तर काही देवकोष्ठे रिक्त आहेत. प्रवेशद्वारावरील पट्टीत एकूण ९ देवकोष्ठे असून त्यात गणेश, महिषासूरमर्दीनी, शेषशाही विष्णु इत्यादि मुर्त्या आहेत. प्रवेशद्वाराचे स्थापत्य विचारात घेता त्यावर मोगल शिल्पस्थापत्याचा प्रभाव जाणवतो. प्रवेशद्वाराच्या उत्तर व दक्षिण बाजूस प्रत्येकी एक बुरूज आहे. या दरवाजाची पूर्व-पश्चिम लांबी २८.१६ मीटर असून मध्यभागी असलेल्या प्रवेशकमानीची उत्तर-दक्षिण रुंदी ५ मीटर आहे. एकूण १४०.८० चौ. मी. क्षेत्रात या प्रवेशद्वाराची व्याप्ती सामावलेली आहे. त्याची उंची ९ मीटर आहे. या प्रवेशमार्गातूनच अंबाला जलाशयात प्रवेश करावा लागतो. या वास्तूच्या निर्मितीचा हेतू लोकांना संरक्षण देणे हाच असावा. याशिवाय तत्कालीन वैभवाची

साक्ष सुध्दा या वास्तूमुळे मिळते. येथे असलेल्या मंदिरांमध्ये महादेव मंदिर (स्मा. क्र. ६), महादेव मंदिर (स्मा. क्र. ८), महादेव मंदिर (स्मा. क्र. १०), शिव मंदिर (स्मा. क्र. ११), शिव मंदिर (स्मा. क्र. १२), सूर्य मंदिर (स्मा. क्र. १४), चंद्रमौळी मंदिर (स्मा. क्र. १५), राणीसाहेब मंदिर (स्मा. क्र. १६), गणेश मंदिर (स्मा. क्र. १८), हरिहर मंदिर (स्मा. क्र. २०), पंचशिखरी मंदिर (स्मा. क्र. २२), दत्त मंदिर (स्मा. क्र. २३), दगडी महल (स्मा. क्र. २५), जगन्नाथ मंदिर (स्मा. क्र. २८), रेणुकादेवी मंदिर (स्मा. क्र. २९), आणि चर्मकार समाजाचे शिवमंदिर (स्मा. क्र. ३०), भुतलेश्वर मंदिर (स्मा. क्र. ३१), महादेव मंदिर (जामदार मंदिर स्मा. क्र. ३२), स्मृतिस्मारक (स्मा. क्र. ३७) हे उल्लेखनीय असून यांची निर्मिती गोंड राजे, भोसले आणि त्यानंतरच्या काळात झालेली आहे. साधारणत: सतराव्या अठराव्या शतकात निर्माण झालेल्या ह्या वास्तू एकसारख्याच शैलीतील आहेत. अंबाला येथील मंदिर व अन्य स्मारके यांचा विचार करता हा मंदिरसमूह इ. स. तेराव्या-चौदाव्या शतकापासून तर विसाव्या शतकापर्यंत विकसित झालेला दिसतो. कालानुक्रमे स्थापत्य रचनेत झालेले बदल येथे जाणवतात. त्यानुसार या स्मारकांचे एकूण चार गट करता येतात. १) द्राविडीयन शैलीचे शिखर असलेली साधारणत: हेमाडपंती पध्दतीची मंदिरे, २) घुमटाकृती शिखरे असलेली सतराव्या शतकातील प्रामुख्याने मोगल शैलीचा प्रभाव असलेली गोंड काळातील स्मारके, ३) पिरॅमीड पध्दतीची शिखरे असलेली अठराव्या-एकोणीसाव्या शतकातील भोसलेकालीन स्मारके व ४) त्यानंतर उभारण्यात आलेली विसाव्या शतकातील काही स्मारके येथे आहेत. अंबाला येथे शैव, शाक्त, वैष्णव, सौर आणि गाणपत्य या पाच सांप्रदायाची मंदिरे आहेत. एकूण हे स्थान यादव काळापासून व प्रामुख्याने उत्तर मध्ययुगीन काळात एक श्रध्दास्थान म्हणून विकसित झाले आहे.

शिवमंदिर : हे राज्य पुरातत्व विभागाचे स्मारक क्र. ११ असून अंबाला तलावाच्या पश्चिम किनाऱ्यावर आहे. या तलावाकाठची सर्वच मंदिरे तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिध्द आहेत. प्राचीन काळापासून या क्षेत्राचे महात्म्य असून एक श्रध्दास्थान म्हणून या स्थानाचा विकास झाला आहे. या मंदिराची रचना गर्भगृह आणि त्यापुढील मंडप अशाप्रकारची असून हा मंडप निरंधार पध्दतीचा आहे. गाभाऱ्याच्या चारही बाजूंना हा मंडप असून त्याचा वापर प्रदक्षिणापथासारखा केला जावू शकतो. मंडपास एकूण अष्टकोनी आकाराचे ३२ स्तंभ आहेत. मंदिराचे गर्भगृह चौरस असून त्यात शिवलिंगाची स्थापना केली आहे. मंदिराचे छत समतल असून त्यावर एक छत्री आहे. त्यामुळे ही वास्तु दुमजली असल्यासारखी वाटते. छत्रीचे शिखर घुमटाकृती आहे. छत्रीच्या सज्जावर सुरईच्या आकाराचे अंकण केले आहे. त्याचप्रमाणे गर्भगृहाच्या मागील भिंतीवर हत्तीची झुंज, सिंह, वाघ, योध्दे आदींची शिल्पे कोरली आहेत. या शिल्पांची ठेवण व कलाकुसर पाहता हे स्मारक गोंड काळात बांधले गेले असावे असे दिसते. पूर्व-पश्चिम ७.५० मीटर व उत्तर-दक्षिण ६.८५ मीटर आणि १० मीटर उंच असलेले हे स्मारक गोंडकालीन स्थापत्य रचनेचा एक उत्तम नमूना आहे. वास्तवात शिवमंदिर म्हणून ओळखले जाणारे हे मंदिर तत्कालीन एखाद्या योध्द्याचे अथवा राजपुत्राचे समाधीस्थळ म्हणून विकसित केले असावे असे वाटते.

सूर्य मंदिर : (पुरातत्व विभागाचे स्मारक क्र. १४) हे अंबाला तलावाच्या पश्चिम

किनाऱ्यावर (बापू नेवरेंच्या घरासमोर) बांधलेले आहे. या मंदिराची रचना गर्भगृह, मंडप आणि त्यापुढील अर्धमंडप अशाप्रकारची असून मंदिर पूर्वाभिमुख आहे. गर्भगृहात सूर्यदेवतेची प्रतिमा असून गाभाऱ्यावरील शिखर पिरॅमीडप्रमाणे खालून वर निमुळते होत गेले आहे. यापुढील मंडप ६ x ६ मीटर आकाराचा असून त्यासमोर अर्धमंडप आहे. मंडप व अर्धमंडपासाठी म्हणून १२ चौकोनी स्तंभांची उभारणी करण्यात आली आहे. मंडपाचे शिखर गजपृष्ठाकृती आहे. अर्धमंडपाचे शिखर कुंभाकृती आहे. दरवाजाची कमान नागमोडी असून मंडपाची कमान मात्र त्रिकोणाकृती आहे. या मंदिराच्या रचनेवरून ते भोसलेकालीन आहे.

मंदिरात सूर्याची संगमरवरातील मूर्ती असून दोन्ही हातात कमलपुष्प धारण केले आहेत व तो अश्व असलेल्या रथावर आरूढ आहे. त्याच्या डोक्यावर मुगूट, गळ्यात माळा, कानात कुंडले आदी अलंकार दर्शविले आहेत. आज उभे असलेले सूर्यमंदिर अठराव्या शतकातील असले तरी सूर्याची उपासना या क्षेत्रात यादवपूर्वकाळापासून रूढ असावी याविषयीची नोंद रामटेक येथील शिलालेखात पाहायला मिळते. पहिले रघुजी भोसले या मंदिरात नित्यनियमाने रुद्राभिषेक करीत अशी नोंद उपलब्ध आहे.

राणीसाहेबांची समाधी : अंबाला तलावाच्या पश्चिम किनाऱ्यावर काळ्या ग्रॅनाइटमध्ये ही समाधी बांधली असून समाधीचे बांधकाम चौरस चबुतऱ्याचे आहे. यावर मधोमध तुळशीवृंदावन असून या छोटेखानी तुळशीवृंदावनास जालवातायन ठेवण्यात आल्यामुळे ते आकर्षक दिसते. ही समाधी दुसऱ्या रघुजीची आई व मुधोजीची पत्नी चिमाबाई भोसल्याची आहे. समाधीची लांबी पूर्व-पश्चिम ४ मीटर व उत्तर-दक्षिण ३.५० मीटर आहे. येथेच दुसरी एक समाधी आहे. ती आप्पासाहेबांना असलेल्या दोन भार्यापैकी उमाबाईची आहे. त्या जून १८१८ मध्ये मरण पावल्या. आप्पासाहेबांना जेव्हा इंग्रजांनी कैद केले तेव्हा कैदेतून निसटण्याविषयीच्या कटात उमाबाईची मदत झाली होती. तिने राजकीय कारभारामध्येही मदत केली. तसेच द्रव्य पुरविले याविषयीची नोंद नागपूरकर भोसले यांच्या इतिहासात पाहायला मिळते.

ही व अशी अनेक स्मारके या परिसरात आढळून येतात.

रामटेक परिसर : नागार्जून गुंफा व शिवमंदिर : या परिसरातील डोंगर रांगात नागार्जून टेकडीची उंची समुद्रसपाटीपासून ५०२ मीटर आहे. रामगिरिच्या पूर्वेस ३० मीटर अंतरावर असलेल्या एका टेकडीमध्ये नागार्जूनाची गुहा या नावाचे स्थान आहे. नागार्जून या बौध्द पंडिताचा संबंध या स्थानाशी जोडण्यात येतो. या स्थानाला नागार्जूनाची टेकडी असे संबोधले जाते. हा नागार्जून एक सिध्दयोगी असून तो शिव उपासक होता अशीही एक मान्यता आहे. या टेकडीच्या माथ्यावर एक शिवमंदिर असून या मंदिराच्यालगत खालील बाजूस योग्याची गुहा व नागार्जूनस्वामीची समाधी आहे.

खिंडशी तलाव : अंबाला तलावाच्या पलीकडे ईशान्येस कालीया व सूर या दोन नद्यांच्या संगमावर बांध घालून विशाल जलाशय निर्माण करण्यात आला असून त्याला खिंडशी तलाव म्हणून ओळखतात. या तलावातून कालवा काढून कालव्याद्वारे ते पाणी भंडारापर्यंत पोहोचले आहे. या जलाशयाच्या पाण्याचा उपयोग भंडारा तसेच रामटेक येथील भातशेतीसाठी होतो. महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाच्यावतीने खिंडशी येथे एक विश्रामगृहाची निर्मिती

करण्यात आली असून पर्यटनस्थळ म्हणून या स्थानाचा विकास होत आहे. येथील निसर्ग व परिसराविषयी असलेली श्रध्दा यातून पर्यटक या स्थानाकडे आकर्षित होतात.

श्रीनारायणस्वामी समाधी : अंबालाच्या पूर्वेस असलेली टेकडी नारायण टेकडी म्हणून ओळखतात. या टेकडीवर नारायणस्वामी हे सिध्दपुरुष तपस्या करीत होते. तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी या स्थानावर एक तपपर्यंत खडतर तपस्या केली व येथेच त्यांना पुर्वानुभूती प्राप्त झाली. नारायणस्वामींच्या नावावरून या स्थानास नारायण टेकडी असे म्हणतात. येथेच त्यांनी संजीवन समाधी घेतली असून ते अनेकांचे श्रध्दास्थान आहे.

रायपूर

रायपूर : (ता. हिंगणा, २१°००' उ., ७८°५५' पू.) बोरगावप्रमाणे नागपूरच्या पश्चिमेस १८ किलोमीटरवर रायपूर येथे महापाषाण संस्कृतीची दफनभूमी आहे. बोरगावप्रमाणेच येथेही कातळ उघडे पडलेले असून जवळच फारशा उंच नसलेल्या टेकड्या आहेत. रायपूरच्या परिसरातील वानाडोंगरी, नागलवाडी, टाकळी, हिंगणा इत्यादी खेड्यांचा अंतर्भाव केल्यास एकूण ३९१ शिळावर्तुळे जवळजवळ १० हेक्टर इतक्या विस्तृत प्रदेशावर नोंदली गेली आहेत. या ठिकाणच्या शिळावर्तुळांचे उत्खनन १९८४-८५ व त्यानंतरही १९८७-८८, ८८-८९, ८९-९० या साली करण्यात आले.

रायपूरच्या दफनांची काही उल्लेखनीय वैशिष्ट्ये नमूद करणे आवश्यक आहे. सर्वात मोठे शिळावर्तुळ जवळजवळ २३ मीटर तर सर्वात लहान ८ मीटर व्यासाचे असून यातील काहींच्या शिळांवर उथळ, गोल चिन्हांच्या ओळी आढळून येतात. दफनाकरिता वापरलेल्या शिळा स्थानिक खडकात उपलब्ध होत्या. आजही हवामानातील तीव्र फरकामुळे (उन्हाळा-हिवाळा) खडकांना भेगा पडल्याचे दिसून येते आणि अशा खडकांतून मोठमोठ्या शिळा आजही लोखंडी पहारीच्या साहाय्याने काढल्या जातात. एकूण आठ शिळावर्तुळांचे उत्खनन करण्यात आले. मृतासाठी तयार करून ठेवण्यात आलेली परंतु न वापरलेली दोन-तीन शिळावर्तुळे येथे दिसून आली. चार शिळावर्तुळांमध्ये मानवी अवशेष सापडले तर इतर चारमध्ये ते सापडले नसल्याने कदाचित ते नष्ट झालेले असावेत अथवा ती दफने सांकेतिक स्वरूपाची असावीत असे म्हणता येते. दुसरे वैशिष्ट्य असे की, एका शिळावर्तुळात एकच व्यक्ती किंवा त्याचे अवशेष पुरण्यात आलेले नसून काही दफनांमध्ये दोन किंवा तीन व्यक्तींचे अवशेषही ठेवण्यात आलेले होते. एका दफनांमध्ये तर खालच्या स्तरावर प्रौढाचे अवशेष आणि त्याच दफनामध्ये काहीशा वरच्या स्तरावर लहान मुलाचे अवशेष पुरलेले आढळले. एकूण पाच ते सहा व्यक्तींचे अवशेष उपलब्ध झाले. यापैकी एका दफनामध्ये १२ ते १५ वयोगटाच्या व्यक्तींचे अवशेष होते तर दुसऱ्या एका मृताचे वय अंदाजे १० वर्षाचे असावे. लहान मुलाच्या दफनाच्या संदर्भात रायपूरची दफने लक्षणीय ठरली आहेत.

वयोगटातील विविधतेबरोबर शिळावर्तुळातील निरनिराळ्या रचनांचे प्रकारही नमूद करणे आवश्यक आहे. काही शिळावर्तुळांच्या मधोमध चार-पाच प्रचंड शिळा दगडगोट्यांच्या टेकूच्या साहाय्याने लावून त्यांची जणू काही एक ओबडधोबड पेटिकाच तयार केलेली होती. हिची खोली जवळजवळ १.५ मीटर असून लांबी-रुंदी प्रत्येकी १ मीटर होती. दुसऱ्या एका

दफनामध्ये मधोमध जवळजवळ १.५ मीटर लांबीच्या आणि पाऊण मीटर रुंदीच्या फरशांच्या साहाय्याने पेटिका तयार करण्यात आली. या पेटिकेच्या मधोमध दोन फरशा उभ्या ठेवून दोन कप्पे केलेले होते. या पेटिकेवर फरशीचे झाकण ठेवलेले होते. मात्र या दोन्ही प्रकारच्या पेटिकांच्या आत मानवी अवशेष सापडले नाहीत.

मृताबरोबर, इतर ठिकाणी आढळून आलेल्या वर्गाची मडकी ठेवल्याचे दिसून आले. यांचे आकारही फारसे विभिन्न नव्हते. फक्त वर्गाच्या मडक्यात पसरट बुडाचे स्टँड आणि बाजूला अर्धगोल कड्या (हॅण्डल) असलेले वाडगे उल्लेखनीय आहेत. याशिवाय काळ्या रंगात चित्रकारी केलेली लाल खापरेही मिळाली. या खापरांचा पोत, आकार आणि चित्रकारांचे प्रकार नैकुंडशी मिळतेजुळते आहेत. याशिवाय काही खापरांवर उत्कीर्ण रेषा आहेत. यामध्ये एका घड्यावर कोरून काढलेले जनावराचे चित्र अप्रतिम आहे. या जनावराचे पाय उंच व शरीर काहीसे लांबट असून याची छोटी शेपटी आणि वशिंडही यथार्थपणे दाखवलेले आहे. त्या मानाने तोंड लहान असून डोक्यावर शिंगे दाखविली आहेत. हे बैलाचे चित्र असावे.

दफनामध्ये तांब्याच्या जाड बांगड्या, तारेची वळी, आंगठ्या आणि तांब्याची अनेक लहानसहान वळी एकमेकांत गुंतवून केलेला कंठहार, तांब्याच्या पत्र्याचे वाडगे आणि त्यावरील अलंकृत माथ्याच्या वैशिष्ट्यपूर्ण झाकण्या (या अलंकरणात चार पक्षी व लहान पशूची जोडी यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे.) आणि घोड्याच्या अंगावर घालण्यासाठी बनविलेले उत्कृष्ट अलंकार ठेवलेले होते. यातील घंटा, पत्र्याच्या बनविलेल्या चंद्रकोरी आणि पदके, यांच्याशिवाय घोड्याच्या मुखावर घालण्यासाठी बनविलेला जाड पत्र्याचा दागिना उल्लेखनीय आहे. हा दागिना आणि इतर घटक माहूरझरी आणि खापा या ठिकाणी सापडलेल्या घोड्याच्या दागिन्याप्रमाणेच असले तरी रायपूरचा अलंकार अनेक छोट्या घटकांनी आणखी अलंकृत केलेला होता. हा दागिना तांब्याच्या जाड पत्र्यापासून केलेला असला तरी याच्यावर तांब्याच्या गोल चकत्या, मागे लोखंडी छोट्याछोट्या पट्ट्यांच्या साहाय्याने दर्शनी भागावर बसविल्या होत्या. या दागिन्याला वरच्या भागावर दोन उंच होत गेलेले शिंगासारखे घटक असून त्यावर कदाचित गोंडे लटकविले जात असावेत. अशा दागिन्याबरोबरच अनेक लहानसहान तांब्याच्या नळ्या आणि दोन हूक असलेली, पानाच्या आकाराची पदके घोड्याच्या अवशेषाबरोबर सापडली. या नळ्या आणि पदके बहुधा एकत्र ओवून घोड्याच्या गळ्यात किंवा पुठ्ठ्यावर दोन्ही बाजूला बसवीत असावेत. या दागिन्याबरोबरच तांब्याच्या पत्र्याची बनविलेली लहान आकाराची कासवाची आकृती या लोकांच्या तंत्र-कौशल्याची त्याचप्रमाणे सौंदर्यदृष्टीची साक्ष पटविते. तांब्याव्यतिरिक्त सोन्याच्या तारेपासून बनविलेले अलंकरण उल्लेखनीय आहे.

मृताबरोबर लोखंडाच्या निरनिराळ्या वस्तू पुरल्या जात. यामध्ये कट्यारी, भाले, बाणाग्रे यांच्यासारखी हत्यारे, कुऱ्हाडी, राप्या आणि चाकू यासारखी अवजारे आणि दिवे आणि कढ्यासारखी भांडी व नखण्यासारखी प्रसाधनाची साधने होती. घोड्याच्या तोंडात बसविली जाणारी व्हटाळी ज्या दफनामध्ये घोड्याचे अवशेष पुरले होते त्यात सापडली. याशिवाय काही दफनात नैकुंडप्रमाणे दगडी बत्तेही ठेवलेले आढळले. बोरगावप्रमाणेच रायपूरच्या दफनामध्ये विविध रंगीबेरंगी दगडाचे-कार्नेलियन, ॲगेट, जास्पर, स्फटिक वगैरे-विविध आकाराचे १७२ मणी सापडले. कार्नेलियनच्या मण्यामध्ये पांढऱ्या रंगात पक्की नक्षी केलेले

मणी संख्येने जास्त होते. रायपूरच्या दफनांचा कालखंड शास्त्रीयदृष्ट्या निश्चित करता आला नाही, परंतु ही दफने विदर्भातील इतर दफनांच्या कालखंडातीलच असावीत याबद्दल संशय असण्याचे काही कारण नाही. (देगलूरकर, जी. बी. ॲण्ड लाड, गौरी, पी. **मॅगॉलिथिक रायपूर** (१९८५-९०), डेक्कन कॉलेज, पूणे, १९९२ च्या आधारे.)

वाकोडी

